Barcode - 99999990319632
Title - Manorama Va Shabdaratna (bhag-3 )
Subject - Devotional
Author - Wadegaokar,N.D
Language - marathi
Pages - 495
Publication Year - 1923
Creator - Fast DLI Downloader
https://github.com/cancerian0684/dli-downloader
Barcode EAN.UCC-13
9999999031963

भट्टोजी दीक्षितकृत

# प्रौढ मनोरमा

व

त्या ग्रंथावरील शब्दरत्ननामक टीका

याचे स्त्रीप्रत्ययान्त

विस्तृत विवरणासह व प्रक्रियेसह

मराठी

# सुबोध भाषांतर

## भाग ३ रा

(अच्संधिप्रकरण व हल्संधिप्रकरण 'वान्तो यि प्रत्यये' पासून पुढें)

★


विवरणकर्ता

कै० रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम. ए.

सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर


★

किंमत रु. ९·५०

— प्रकाशक —

खं. ना. वाडेगावकर,

रा. ब. वाडेगावकराचा बंगला,

धनतोली, नागपूर

BHARATIYA VIDYA BHAVAN LIBRARY

S. N.

(या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन)

— मुद्रक —

वि. ना. वाडेगांवकर

उद्यम कमर्शियल प्रेस,

धर्मपेठ, नागपूर १.

## अर्पणपत्रिका–

कर्तव्यनिष्ठा व न्यायप्रियता यांमुळें पारतंत्र्याच्या काळांतील सरकारी नौकरींतहि सरकार व समाजमान्यता पावलेले, ईश्वरावरील अनन्य विश्वास हें ज्यांच्या जीवननौकेचें एकमेव सुकाणु होतें, ज्यांच्या पराकाष्ठेच्या विद्याभिरुचीनें व्यसनाची मर्यादा गाठली होती अशा माझ्या परमपूज्य कै. ती. ना. दा. वाडेगांवकर यांच्या स्मृतीस त्यांचीच ही कृति अंशात्मक प्रकाशित स्वरूपांत अत्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणानें व नम्रभावानें समर्पण करीत आहे.

# विद्वानांनी प्रशंसिलेलें

नागेशभट्टकृत

# परिभाषेन्दुशेखराचें

# मराठी भाषांतर

(विस्तृत विवरणासह व प्रक्रियेसह)

कागदी बांधणीच्या प्रतीची किंमत रु. ४-०-०

कापडी बांधणीच्या प्रतीची किंमत रु. ५-०-०

टपालखर्च सुमारे ७५ नये पैसे, निराळा.

अनुवादक व प्रकाशक

रा. ब. नारायण दाजीबा वाडेगांवकर, एम् ए.

रिटायर्ड डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर

खास विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरिता हें भाषांतर तयार करण्यात आलें आहे. विद्यार्थ्यांना कंटाळवाणें होऊं नये म्हणून फक्त महत्वाच्या विषयाचेंच यांत विवेचन केलें आहे. महाराष्ट्रीय विद्यार्थीवर्गानें प्रस्तुत ग्रंथापासून अवश्य लाभ घ्यावा. शिवाय शास्त्री-पंडितांना तसेंच संस्कृत-भाषाभिमानी लोकांनाहि हें पुस्तक उपयुक्त वाटेल असा विद्वानांचा अभिप्राय आहे.

— पुस्तकें मिळण्याचा पत्ता —

सं. ना. वाडेगांवकर, रा. ब. वाडेगांवकर यांचा बंगला,
धन्तोली, नागपूर.

# मनोरमा व शब्दरत्न

यांचें

# मराठी भाषांतर

## भाग ३ रा

## अनुक्रमणिका

### अच्सन्धिप्रकरणम्


| विषय | | | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|
| १. 'वान्तो यि प्रत्यये' सू. ६३ | वरील | मनोरमा | १– ४ |
| २. 'वान्तो यि प्रत्यये' सू. ६३ | ,, | शब्दरत्न | ४– |
| ३. 'धातोस्तन्निमित्तस्यैव' सू. ६४ | ,, | मनोरमा | ४– ५ |
| ४. 'क्षय्यजय्यौ शक्यार्थे' सू. ६५ | ,, | ,, | ५– ६ |
| ५. 'लोपः शाकल्यस्य' सू. ६७ | ,, | ,, | ६– ७ |
| ६. 'उरण्रपरः' सू. ७० | ,, | ,, | ७– ८ |
| ७. ,, | ,, | शब्दरत्न | ८–१० |
| ८. 'झरो झरि सवर्णे' सू. ७१ | ,, | मनोरमा | १०–१५ |
| ९. ,, | ,, | शब्दरत्न | १५–१९ |
| १०. 'एत्येधत्यूठ्सु' सू. ७३ | ,, | मनोरमा | २०–४० |
| ११. ,, | ,, | शब्दरत्न | ४०–५७ |
| १२. 'अक्षादूहिन्यामुपसंख्यानम्' सू. ७३ वरील वार्तिक | | मनोरमा | ५७–६२ |
| १३. ,, | ,, | शब्दरत्न | ६२–६६ |

| | विषय | | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|
| १४ | 'स्वादीरेरिणो' सू. ७३ वरील वार्तिक | मनोरमा | ६६– ६८ |
| १५ | 'प्राद्गूहोढो' सू. ७३ वरील वार्तिक | मनोरमा | ६८– ७७ |
| १६ | ,, ,, | शब्दरत्न | ७७– ८३ |
| १७ | 'प्रवत्सतरकम्बलवसन' सू. ७३ वरील वार्तिक | मनोरमा | ८३– ८४ |
| १८ | ,, ,, | शब्दरत्न | ८४– |
| १९ | 'अन्तादिवच्च' सू ७५ वरील | मनोरमा | ८४– ८९ |
| २० | ,, ,, | शब्दरत्न | ८९– ९९ |
| २१ | 'खरवसानयो' सू ७६ ,, | मनोरमा | ९९–१०० |
| २२ | ,, ,, | शब्दरत्न | १००–१०१ |
| २३ | 'वा सुप्यपिशले' सू ७७ ,, | मनोरमा | १०१– |
| २४ | 'एङि पररूपम्' सू. ७८ ,, | मनोरमा | १०१–१०४ |
| २५ | ,, ,, | शब्दरत्न | १०४–१२८ |
| २६ | 'शकन्ध्वादिषु पररूप वाच्यम्' सू ७९ वरील वार्तिक | मनोरमा | १२८–१३२ |
| २७ | ,, ,, | शब्दरत्न | १३२–१३४ |
| २८ | 'ओत्वोष्ठयो समासे वा' सू ७९ वरील वार्तिक | मनोरमा | १३५– |
| २९ | 'अव्यक्तानुकरणस्यात इतौ' सू ८१ वरील ,, | | १३५–१४५ |
| ३० | ,, ,, | शब्दरत्न | १४५–१५६ |
| ३१ | 'अक सवर्णे दीर्घ' सू ८५ वरील | मनोरमा | १५६–१५९ |
| ३२ | ,, ,, | शब्दरत्न | १५९–१६३ |
| ३३ | 'एङ पदान्तादति' सू ८६ ,, | मनोरमा | १६३–१६४ |
| ३४ | ,, ,, | शब्दरत्न | १६४–१६६ |
| ३५ | 'सर्वत्र विभाषा गो.' सू ८७ ,, | मनोरमा | १६६–१७१ |
| ३६ | ,, ,, | शब्दरत्न | १७१–१८५ |

| | विषय | | | | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | 'अवङ् स्फोटायनस्य' | सू ८८ | ,, | मनोरमा | १८५–१९६ |
| ३८ | ,, | | ,, | शब्दरत्न | १९६–२०९ |
| ३९ | 'इन्द्रे च' | सू ८९ | ,, | मनोरमा | २०९–२१० |
| ४० | ,, | ,, | ,, | शब्दरत्न | २१०– |
| ४१ | 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' | सू ९० | ,, | मनोरमा | २१०–२११ |
| ४२ | ,, | | ,, | शब्दरत्न | २११–२१२ |
| ४३ | इकाऽसवर्णे' | सू ९१ | ,, | मनोरमा | २१२–२१४ |
| ४४ | 'दूराद्धूते च' | सू ९५ | ,, | ,, | २१४–२१५ |
| ४५ | ,, | | , | शब्दरत्न | २१५– |
| ४६ | 'गुरोरनृत' | सू ९७ | ,, | मनोरमा | २१५–२१९ |
| ४७ | ,, | | , | शब्दरत्न | २१९–२२५ |
| ४८ | 'ईदूदेद्द्विवचनम्' | सू १०० | | मनोरमा | २२५–२३२ |
| ४९ | ,, | | ,, | शब्दरत्न | २३२–२३४ |
| ५० | 'अदसो मात' | सू १०१ | ,, | मनोरमा | २३४–२४१ |
| ५१ | ,, | | ,, | शब्दरत्न | २४१–२५३ |
| ५२ | 'शे' | सू १०२ | ,, | मनोरमा | २५३–२५४ |
| ५३ | , | | ,, | शब्दरत्न | २५४–२५६ |
| ५४ | 'निपात एकाजनाङ्' | सू १०३ | ,, | मनोरमा | २५६–२५८ |
| ५५ | ,, | | ,, | शब्दरत्न | २५८–२५९ |
| ५६ | 'ओत्' | सू १०४ | ,, | मनोरमा | २५९–२६० |
| ५७ | 'सम्बुद्धौ शाकल्यस्य' | सू १०५ | ,, | ,, | २६०–२६३ |
| ५८ | ,, | | ,, | शब्दरत्न | २६३–२८२ |
| ५९ | 'उञ' | सू १०६ | ,, | मनोरमा | २८२– |
| ६० | 'ऊँ' | सू १०७ | ,, | ,, | २८२–२८३ |
| ६१ | ,, | | ,, | शब्दरत्न | २८३–२८७ |
| ६२ | 'मय उञो वो वा' | सू १०८ | ,, | मनोरमा | २८७–२९२ |
| ६३ | | | ,, | शब्दरत्न | २९२–२९४ |

## हल्सन्धिप्रकरणम्


| | विषय | | | | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| ६४ | 'स्तोः श्चुना श्चुः' | सू १११ | वरील | मनोरमा | २९५–२९९ |
| ६५ | ,, | | ,, | शब्दरत्न | २९९–३०३ |
| ६६ | 'ष्टुना ष्टुः' | सू ११३ | ,, | मनोरमा | ३०३–३०४ |
| ६७ | 'न पदान्ताट्टोः' | सू ११४ | ,, | ,, | ३०४–३०६ |
| ६८ | ,, | | ,, | शब्दरत्न | ३०६–३०७ |
| ६९ | 'प्रत्यये भाषायां नित्यम्' | सू ११६ | वरील वार्तिक | मनोरमा | ३०८–३११ |
| ७०. | ,, | ,, | | शब्दरत्न | ३११–३१२ |
| ७१ | 'उद स्थास्तम्भोः' | सू ११८ | वरील | मनोरमा | ३१२–३१५ |
| ७२ | ,, | | ,, | शब्दरत्न | ३१५–३२२ |
| ७३ | 'खरि च' | सू १२१ | ,, | मनोरमा | ३२२–३३० |
| ७४. | | | ,, | शब्दरत्न | ३३०–३३७ |
| ७५ | 'नश्चापदान्तस्य' | सू १२३ | ,, | मनोरमा | ३३७–३३८ |
| ७६ | 'यथासंख्यमनुदेशः' | सू १२८ | ,, | ,, | ३३८–३३९ |
| ७७ | , | | ,, | शब्दरत्न | ३३९–३४० |
| ७८ | 'ङ्णोः कुक्टुक्' | सू १३० | ,, | मनोरमा | ३४०–३४२ |
| ७९ | 'ड सि धुट्' | सू १३१ | ,, | ,, | ३४२–३४९ |
| ८० | ,, | | ,, | शब्दरत्न | ३४९–३५४ |
| ८१ | 'शि तुक्' | सू १३३ | ,, | मनोरमा | ३५५–३६५ |
| ८२ | ,, | | ,, | शब्दरत्न | ३६५–३६८ |
| ८३ | 'ङमो ह्रस्वादचि' | सू १३४ | ,, | मनोरमा | ३६८–३८० |
| ८४ | ,, | | ,, | शब्दरत्न | ३८०–३९५ |
| ८५ | 'समः सुटि' | सू. १३५ | ,, | मनोरमा | ३९५–३९६ |
| ८६ | ,, | | ,, | शब्दरत्न | ३९६–३९७ |
| ८७ | 'अत्रानुनासिकः' | सू १३६ | ,, | मनोरमा | ३९७–३९९ |
| ८८ | ,, | | ,, | शब्दरत्न | ३९९–४०१ |

| विषय | | | | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|---|
| ८९. | 'अनुनासिकात्परो' सू. १३७ | ,, | मनोरमा | ४०२–४०३ |
| ९०. | ,, | ,, | शब्दरत्न | ४०३–४०४ |
| ९१. | 'विसर्जनीयस्य सः' सू. १३८ | ,, | मनोरमा | ४०४–४०७ |
| ९२. | ,, | ,, | शब्दरत्न | ४०७–४१६ |
| ९३ | 'पुमः खय्यम्परे' सू. १३९ | ,, | मनोरमा | ४१६–४१९ |
| ९४. | ,, | ,, | शब्दरत्न | ४१९–४२१ |
| ९५ | ,, | ,, | मनोरमा | ४२१–४३० |
| | | ,, | मनोरमा | ४३०–४४० |
| ९६. | ,, | ,, | शब्दरत्न | ४४०–४४५ |
| ९७. | 'नश्छव्यप्रशान्' सू. १४० | ,, | मनोरमा | ४४५–४४७ |
| ९८. | ,, | ,, | शब्दरत्न | ४४७–४५२ |
| ९९ | 'नॄन्पे' सू. १४१ | ,, | मनोरमा | ४५२–४५३ |
| १००. | 'कुप्वोः ᳲकᳲपौ च' सू. १४२ | ,, | ,, | ४५३–४५५ |
| १०१. | | ,, | शब्दरत्न | ४५५–४५७ |
| १०२. | 'कानाम्रेडिते' सू. १४३ | ,, | मनोरमा | ४५८– |
| १०३. | 'कस्कादिषु च' सू. १४४ | ,, | ,, | ४५८–४५९ |
| १०४. | ,, | ,, | शब्दरत्न | ४५९–४६१ |
| १०५. | 'दीर्घात्' सू. १४८ | ,, | मनोरमा | ४६१–४६३ |
| १०६. | ,, | ,, | शब्दरत्न | ४६३–४६५ |

# प्रकाशकाचें निवेदन

माझे परमपूज्य वडील, कै रा व ना दा वाडेगावकर, एम् ए सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज, नागपूर, यांनी लिहिलेल्या 'प्रौढ मनोरमा व शब्दरत्न याचे विवरणात्मक मराठी भाषातर' या ग्रथाचा तिसरा भाग आज प्रकाशित करण्यात मला फार आनद वाटतो प्रकाशन सुरु होतेच की नाही या भयातून पहिल्या भागाच्या प्रकाशनाने मला जो आनद वाटला त्या मानाने नतर प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक भागाच्या प्रकाशनाचे वेळी हा आनद गुणिला जावा व सकल्पित कामाचा बोजा क्रमश कमी होत आहे या जाणिवेने त्यात विशेष भर पडावी हे अगदी स्वाभाविक आहे

आतापर्यंतच्या प्रत्येक भागाचे प्रकाशन एकेका व्यक्तीच्या सहृदयतेमुळेंच होऊ शकले प्रस्तुत भागाच्या प्रकाशनाचे सपूर्ण श्रेय माझे कनिष्ट बधु श्री रा विश्वनाथराव वाडेगावकर, सपादक उद्यम, याचे आहे या भागाचा सपूर्ण खर्च त्यानी सोसला आहे याबद्दल प्रकाशक या नात्यानें मी त्याचा अत्यत आभारी आहे दुसऱ्या भागात अच्सधिप्रकरण खडित झाले होते व ते शक्य तितक्या लौकर प्रकाशित होणे हे वाचकाच्या दृष्टीने अत्यावश्यक होते म्हणून वाचकाच्या सोयीच्या दृष्टीने त्याचे मानावे तितके आभार थोडेच होतील

पहिल्या व दुसऱ्या भागाच्या प्रकाशनात साडेसहा वर्षांचा काळ गेला. त्यानतर आता सवातीन वर्षांनी प्रस्तुत भाग प्रसिद्ध होत आहे या तीन्ही भागामुळे, या दहा वर्षात, हस्तलिखिताच्या एकूण ३३०० पानापैकी केवळ ११९८ च पानें खर्ची पडली अजून २१०० पानाचे हस्तलिखित प्रकाशित होणे आहे हे लक्षात घेतले

म्हणजे प्रकाशन अधिक द्रुत गतीने झाल्यास सर्व पक्षी सोयीचे होईल संस्कृताभिमान्यांना या ग्रंथाची योग्यता या तीन्ही भागांनी पटेलच तेव्हा सहायार्थ विशेष लांबलचक प्रार्थना करीत नाही

दुसरा भाग प्रसिद्ध झाल्यावर पुढील प्रकाशनास सहाय म्हणून दोन प्रमुख देणग्या मिळाल्या एका सांस्कृतिक संस्थेने चवथे भागास लागणाऱ्या छपाईचे कागदाची किंमत म्हणून ८५० रु दिले त्याबद्दल मी संस्थाचालकांचा अत्यंत आभारी आहे तसेच प्रस्तुत भागाच्या प्रकाशनास सहाय म्हणून पुणे विद्यापीठाने ५०० रु देण्याचे ठरविले आहे त्याबद्दल प्रकाशक या नात्याने मी पुणे विद्यापीठाचा फार ऋणी आहे शेवटी नम्रपणे एवढीच विनंती की या महान् प्रकाशनाचे जबाबदारीतून मला शीघ्रातिशीघ्र मोकळे करण्याचा सर्वांनी आर्थिक सहाय देऊन प्रयत्न करावा व संपूर्ण हस्तलिखित प्रकाशित करवून मला उपकृत करावे

धतोली, नागपूर

ख. ना वाडेगावकर

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

रा. रा. रावबहादुर ना. दा. वाडेगावकर यानी प्रौढ मनोरमा व शब्दरत्न या ग्रंथाचे जे स्त्रीप्रत्ययान्त विवरण केले आहे त्याचा बराचसा भाग मी वाचला. या ग्रन्थात प्रथम प्रत्येक पक्तीचा अक्षरार्थ देऊन पुढे कसात त्या पक्तींचे विस्तृत व मार्मिक विवरण केले आहे व आवश्यक ठिकाणी पूर्ण प्रक्रिया दिली आहे. त्यामुळे ग्रन्थाचा बोध होण्यास साधारण बुद्धीच्या विद्यार्थ्याला देखील माझ्या मते काही अडचण येऊ नये. या ग्रन्थात ठिकठिकाणी भाष्य, प्रदीप, उद्योत, काशिका, पदमञ्जरी इत्यादि ग्रन्थातून समर्पक उतारे दिले असल्यामुळें हा ग्रन्थ आदर्शभूत झाला आहे व युनिव्हर्सिटीसारख्या सस्थानी हा माननीय ग्रन्थ सग्रही ठेवण्यास अत्यत लायक आहे. विद्यार्थीवर्गाच्या हिताकरिता हा ग्रन्थ जितक्या लवकर छापला जाईल तितके बरे व या ग्रन्थाचे हिन्दीत भाषान्तर करून ते छापल्यास यू. पी , पजाब, बगाल वगैरे प्रातातील विद्यार्थ्यांना फार फायदा होईल. मी हा ग्रन्थ वाचून फार प्रसन्न झालो आहे व एवढे कठिण व्याकरणशास्त्राचे ग्रन्थ महाराष्ट्र भाषेत उतरविणे दुष्कर असून देखील रा. ब वाडेगावकर यानी हें जें काम सरळ व सुदर भाषा लिहून प्रशसनीय रीतीनें केले आहे त्याबद्दल मी त्याचे मनःपूर्वक अभिनन्दन करितो.

बनारस
ता ६–१२–४४

गोपाल शास्त्री नेने
व्याकरणाध्यापक, ग. स. कॉलेज, बनारस

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

संस्कृत भाषेंतील शास्त्रीय ग्रन्थाचें मराठी भाषेंत यथार्थ भाषान्तर करणें हें कार्य सगळ्यानाच उत्तम रीतीनें साधतें असें नाही. प. आचार्य भक्त विष्णुशास्त्री बापट, दीक्षित भाऊशास्त्री लेले, म. म. पं. वासुदेव शास्त्री अभ्यंकर प्रभृति दिवंगत व विद्यमान प. घुण्डिराज शास्त्री उर्फ बापू दीक्षित बापट पाचगांवकर प्रभृति ग्रन्थकारानी केलेली भाषांतरें वजा करिता बहुतेक भावार्थानुवादात्मकच भाषांतरें आहेत म्हणावयास हरकत नाही. भाषांतरित ग्रन्थांत सुद्धा वेदान्तादि शास्त्रीय ग्रन्थांची भाषांतरें लोकांत प्रचलित असलेल्या दृष्टान्तादिकानी सुगचिर तरी करिता येतात. परंतु सर्वथा नीरस व क्लिष्ट अशा व्याकरण शास्त्रातील विशिष्ट टीकाग्रन्थांचें भाषांतर सुव्यवस्थित व यथार्थ रीतीनें करणें हें कार्य अति अवघड व फारच कष्टसाध्य असें आहे. म्हणूनच जेथें वेदान्त, धर्मशास्त्र वगैरे शास्त्रातील दहा दहा ग्रन्थांची भाषांतरें झालेली मिळतात, तेथें व्याकरणशास्त्रातील दोन तीनच ग्रन्थांची भाषांतरें झाली आहेत याचें कारण उघडच आहे. प्रस्तुत ग्रन्थकारानी काही वर्षांपूर्वी श्री. नागोजीभट्ट काळे यानी केलेल्या परिभाषेन्दुशेखर नावाच्या ग्रन्थाचें मराठीत सुन्दर भाषांतर केलेलें प्रसिद्ध आहेच. आता प्रकृत ग्रन्थकारानी शब्दरत्न मनोरमेचे अव्ययान्त भागाचे मराठीत भाषान्तर केले आहे. तें मी बरेच स्थळी आपातत व एकाध प्रकरण अक्षरशः संपूर्ण वाचून पाहिलें आहे. त्यामुळें मला निश्चयानें असें सांगता येतें की सदरहू भाषांतर प्राचीन परंपरेला व मूळातील गंभीर अर्थाला कोठेंहि न सोडता उत्तम रीतीनें केलेलें आहे. व्याकरणासारख्या नीरस, क्लिष्ट शास्त्रातील अति कठिण टीकाग्रन्थांचें उत्कृष्ट भाषांतर करिता येतें याकरिता हा ग्रन्थ सर्वदा उत्कृष्ट उदाहरण म्हणून दाखविता येण्यासारखा आहे. अस्तु. ज्यांना व्याकरणशास्त्राचें अध्ययन करण्याची आवड आहे परंतु गुरुकडे जाऊन अध्ययन करिता

येणे शक्य नाही तसेच गुरुजवळ अध्ययन करूनहि ग्रन्थ स्पष्ट होण्याकरिता पुन चिंतनाची आवश्यकता आहे अशा उभयविध जिज्ञासूना या ग्रन्थान फार उपयोग होणार आहे

७५ चे आतबाहेर वय, इंद्रियें एका काळी आपली असूनहि आपली नाहीत अशी साक्ष पटवीत आहेत या काळातील सासारिक सुख अशा परिस्थितीत १५–१५ तास दिवसा तसेच रात्रीहि व्याकरणशास्त्रासारख्या नीरस क्लिष्ट विषयात एकाग्रचित्तानें विचार करीत समाधि स्थितीत असलेल्या श्रीमान् पडित बाबासाहेब वाडेगावकराना पाहिले म्हणजे प्राचीन विद्वानाची वर्णनें प्रत्यक्ष डोळ्यासमोर उभी राहतात असा हा ग्रन्थ लवकरच प्रसिद्ध होण्याचा योग यावा व मराठी भाषेत एका उत्कृष्ट भाषातराची भर पडावी अशी सदिच्छा प्रकट करितो.

पौष वद्य २०८६ बुधवार
ता ६–१२–४४, काशी

प. अनत शास्त्री फडके
व्याकरणाचार्य, मीमासातीर्थ
प्रा. ग स कॉ., काशी

॥ श्री विश्वनाथो विजयते तमाम् ॥

रा. ब. श्री. ना. दा. वाडेगावकर यांनी 'प्रौढ-मनोरमा आणि शब्दरत्न' ह्या व्याकरण शास्त्रावरील जटिल दोन ग्रन्थांचे जे महाराष्ट्र भाषेत विस्तृत विवरण केले आहे त्याचा काही भाग मी वाचला. हा ग्रन्थ सर्वांगसुन्दर जाहला आहे. जसा एखादा वैयाकरणमूर्द्धन्य आपल्या प्रियतम विद्यार्थ्यास प्रत्येक पक्तींचे विशद विवरण करून ग्रन्थांचे गूढ ग्रन्थिरहस्य एकान्तात सांगतो तसे हे 'भाषान्तर' वाचकास चटकन ग्रन्थ प्रमेय सांगते. यात प्रत्येक पक्तीचा अक्षरार्थ प्रथम देऊन नतर क्रमाने त्याचे विस्तृत विवरण केले आहे व जेथे प्रक्रिया देणे आवश्यक आहे तेथे सूत्रे देऊन सविस्तर प्रक्रिया दिली आहे आणि ठिकठिकाणी भाष्य, काशिका, प्रदीप, उद्योत, शब्देन्दुशेखर, पदमंजरी इत्यादि ग्रन्थांतील समर्पक उतारे दिले आहेत, त्यायोगें ग्रन्थ समजण्यास अडचण जात नाही. माझी पूर्ण खात्री आहे की ज्याने कौमुदीचे अध्ययन केले आहे त्याला शिक्षकाच्या सहाय्याशिवाय हा ग्रन्थ वाचल्यानें मनोरमा व शब्दरत्न यांतील पक्ति उत्तम रीतीनें समजू शकते. असा सर्वोत्कृष्ट ग्रन्थ लिहिल्याबद्दल मी रावबहादुर यांचे सप्रेम हार्दिक अभिनदन करितो. महाराष्ट्र प्रान्तात व्याकरणशास्त्राचा प्रचार विरळ आहे. उत्तर (हिन्दुस्थानात) भारतात व्याकरणशास्त्राचा विशेष प्रचार असल्यामुळें या ग्रन्थाचे हिन्दीत भाषान्तर होणे आवश्यक आहे तसे भाषान्तर केल्यास व्याकरणशास्त्राध्ययन करणाऱ्या छात्रवर्गावर फार उपकार होतील

बनारस
कार्तिक शु. १३ सोमवार
ता. १२-११-४८

सदाशिव शास्त्री मुसलगांवकर
माजी प्रिन्सिपल, संस्कृत कॉलेज, ग्वाल्हेर

॥ श्री ॥

श्री रा व ना दा वाडेगावकर यांनी प्रौढ मनोरमा व शब्द-रत्न या गहन ग्रन्थाचे महाराष्ट्र भाषेंत जें स्त्रीप्रत्ययान्त विवरण केलें आहे त्याची तीन प्रकरणे मी वाचली या विवरणात प्रत्येक पक्तीचा प्रथम अक्षरार्थ देऊन पुढे कसात विस्तृत विवेचन केले आहे व अवश्य ठिकाणी सूत्रे व सूत्राङ्क देऊन पूर्ण प्रक्रिया दिली आहे, आणि तसेच भाष्य, प्रदीप, उद्योत, शब्देन्दुशेखर, काशिका, पदमञ्जरी इत्यादि ग्रथातून आवश्यक स्थली समर्पक उतारे दिले असून त्याचा भावार्थहि दिला आहे त्यामुळें प्रत्येक पक्तीचा उत्तम रीतीनें अर्थबोध होतो. हा ग्रथ सरल व सुदर भाषेंत लिहिला असल्यामुळे सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्याला देखील ग्रथबोध होण्यात काही अडचण येऊ नये शब्दरत्नाची भाषा फार अवघड आहे व त्या ग्रथाचा गूढार्थ मराठी भाषेत पूर्णपणे उतरविणे हे दुष्कर असून देखील या विवरणात ते उत्तम रीतीनें केले साराश हें विवरण अत्यन्त सुदर, बोधप्रद व आदर्शभूत झाले आहे व या उतारवयात शरीर रोगग्रस्त झाले असून देखील वाडेगावकर साहेबानी जो एवढा प्रचण्ड व सुदर ग्रन्थ निर्माण केला आहे त्याबद्दल त्याचे जितके कौतुक व अभिनदन केले तितके कमीच आहे

ता ६-१२-४४

दिवाकर शास्त्री जोशी,
व्याकरणाचार्य,
व्याकरण शास्त्राध्यापक, गवर्नमेण्ट सस्कृत कॉलेज व स्था जैन विद्यालय, बनारस



कै० रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम्. ए.
सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स, जज्ज, नागपूर.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

# ॥ अच्सन्धिप्रकरणम् ॥

## (भाग २ वरून पुढें चालू)

मनोरमा—वान्तो यि यकारादाविति । विशेषणमात्मान्तस्य सञ्ज्ञा स्यादित्येतदर्थकस्य "येन विधिः-" इति सूत्रस्यापवादभूतेन "यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे" इति वार्तिकेनायमर्थो लभ्यते। ओदौतोरिति । पूर्वसूत्रे तयोरेव वान्तो प्रति स्थानित्वेन निर्णीतत्वादित्यर्थः। ननु गव्यूतिरित्यत्र "हलि सर्वेषाम्" इति, "लोपः शाकल्यस्य" इति वा लोपः स्यादित्याशङ्क्याह वान्त इति ।

'विशेषण तदन्तस्य सञ्ज्ञा स्यात्' या अर्थाचे वाचक 'येन विधिस्तदन्तस्य' सू. २६ हे जें सूत्र आहे त्याचा अपवाद 'यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे' हे वार्तिक असल्यामुळें, 'वान्तो यि प्रत्यये' सू. ६३ या सूत्रातील 'यि' या पदाचा ('यान्ते' असा अर्थ न होता) 'यकारादौ' असा अर्थ होतो. (वरील वार्तिकाचा असा अर्थ आहे की, सूत्रात सप्तमी विभक्तीत कोणताहि अल् उच्चारून तो अल् पुढें असताना जें कार्य होणें सांगितले आहे तें कार्य तसा अलादि समुदाय पुढें असताना होतें असा अर्थ करून करावें. हें वार्तिक असल्यामुळें प्रकृत सूत्रातील 'यि प्रत्यये' या पदाचा 'यादौ प्रत्यये परे सति' असा अर्थ होतो. 'येन विधिस्तदन्तस्य' १. १. ७२ या सूत्रावरील भाष्यात हे वार्तिक पठित केले आहे व हें वार्तिक परिभाषेन्दुशेखरात परिभाषारूपानें पठित केले आहे आणि त्याचे विस्तृत विवरण परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरात पान १२३–२५ मध्यें केले आहे व ते तेथें पाहावें. प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'ओदौतोरव् आव् एतौ स्त' असे म्हटले आहे व त्या पक्तीत 'एच.' असे न म्हणता) 'ओदौतोः' असे जें म्हटले आहे त्याचे कारण हे की,

('एचोऽयवायाव' सू ६१ या) पूर्व सूत्रात 'वान्त'–म्हणजे 'अव्, 'आव' या वकारान्त–आदेशाचे 'ओ औ' हे स्थानी निर्णीत–सिद्ध होणारे– आहेत (साराश प्रकृत सूत्रात 'वान्त' हे पद असल्यामुळें व 'अव, आव्' हे वकारान्त आदेश 'ए, ऐ' याचे जागी होणारे आदेश नसून 'ओ, औ' चच जागी 'एचोऽयवायाव' या सूत्रानें यथासख्य न्यायान्वयें निर्णीत–स्पष्टपणे ज्ञात व सिद्ध–होणारे आदेश असल्यामुळें, 'एच' यातील 'ए ऐ' ची अनुवृत्ति न करिता, 'वान्त' या पदाच्या सामर्थ्यानें केवळ 'ओ, औ' ची अनुवृत्ति करून 'आदोतो' असे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे) 'गव्यूति' या उदाहरणात 'हलि सर्वेषाम्' सू १७१ या सूत्रानें नित्य वकारलोप व 'लोप शाकल्यस्य' सू ६७ या सूत्रानें विकल्पें-करून वकारलोप होण्याची आपत्ति येते ही शका मनात धरून त्या शकेचे निवारण करण्याकरिता (व वकारलोप वरील उदाहरणात का होत नाही याचे कारण सागण्याकरिता) प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'वान्त इत्यत्र वकारात, गोर्यूतावित्यत्र च्छकाराद्वा पूर्वभागे लोपो व्योर्वलीति लोपेन वकार प्रश्लिष्यते' असे म्हटले आहे ('गो+यूति = गव्यूति' या उदाहरणात 'गोर्यूतौ छन्दसि' या वार्तिकानें 'गो' यातील ओकाराचे जागी 'अव' आदेश होऊन 'गव् यूति' अशी स्थिति झाली असता, वकार हा अवर्णापुढे येत असून त्यापुढे यकार हा हल् आहे व तो वकार 'गव्' या पदाच्या अन्तीहि आहे त्यामुळें 'हलि सर्वेषाम्' किंवा 'लोप शाकल्यस्य' या सूत्रानी पावलेला वकारलोप का होत नाही याचे कारण दीक्षित कौमुदीत असे देतात की, 'वान्तो यि प्रत्यये' या सूत्रातील 'वान्त' हा शब्द वकारप्रश्लेषयुक्त म्हणजे 'व्वान्त' असा आहे व त्या शब्दातील पूर्व वकाराचा 'लोपो व्योर्वलि' सू ८७३ या सूत्रानें लोप झाला आहे आणि प्रश्लिष्ट वकार 'वान्त' या पदाचे विशेषण आहे असे समजावे तो वकार विशेषण असल्या-

मुळें, 'येन विधिस्तदन्तस्य' सू. २६ या सूत्रान्वयें त्याचा 'वकारान्त.' असा अर्थ होतो व त्यामुळें 'वकारान्तः वान्तः आदेशः स्यात्' असा 'वान्त.' या पदाचा अर्थ होत असल्यामुळें, श्रूयमाणवकारान्त, म्हणजे ज्यात वकाराचा लोप न होता वकाराचे श्रवण होते असा, आदेश होतो असा अर्थ प्रकृत सूत्रातून निष्पन्न होतो आणि त्यामुळें 'गव्यूतिः' या स्थली 'गो' या पदापुढें 'यूति.' हे यकारादि पद असल्यामुळें 'गो' यातील 'ओ' चे जागी जो 'अव्' आदेश होतो त्या आदेशातील वकाराचा लोप न होता तो वकार जसाचा तसाच कायम राहतो आणि त्यामुळें 'गव्यूति.' हे इष्ट रूप सिद्ध होते वास्तविक 'वान्तो यि प्रत्यये' या सूत्रात दीक्षितानी जो वकारप्रश्लेष मानला आहे तसा मानण्याची काहीच गरज नाही; कारण त्या सूत्राची 'गव्य, नाव्य' इत्यादि जी उदाहरणे आहेत त्या सर्व उदाहरणात यकारादि प्रत्यय पुढें येत असल्यामुळें, 'यचि भम्' सू २३१ या सूत्रानें अङ्गाला भमज्ञा होते व ही भमज्ञा पदसंज्ञेची बाधक असल्यामुळें वकार पदान्ती येतो असे मानता येत नाही आणि त्यामुळे 'हलि सर्वेषाम्' व 'लोपः शाकल्यस्य' या सूत्रानी होणारा पदान्त वकाराचा लोप पावतच नाही. तसेच 'गामिच्छति गव्यति = गो + अम् + क्यच्' या स्थली जरी 'सुपो धातुप्रातिपदिकयो' सू ६५० या सुत्रानें 'अम्' या अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रानें 'गो' याला पदसज्ञा प्राप्त होते तरी, 'क्यचि क्यङि च नान्तमेव पद स्यात्' या अर्थाचे वाचक 'न क्ये' सू २६५९ हे नियामक सूत्र असल्यामुळें आणि 'गो' हा शब्द नकारान्त नसल्यामुळें त्या शब्दाला पदसज्ञा होत नाही व त्यामुळें 'गव्यति' या स्थलीं देखील वकारलोप पावत नाही. ही अरुचि मनात धरूनच दीक्षितानी 'गोर्यूतावित्यत्र च्छकाराद्वा' असे पुढें म्हटले आहे. त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'गव्यूति.' या उदाहरणात 'गो' या

पदापुढें यकारादि प्रत्यय आला नसून 'यूति·' हे यकारादि पद आले असल्यामुळें आणि त्यामुळें 'गो' याला भसंज्ञा होत नसून त्याची पदसंज्ञा कायम राहत असल्यामुळें, त्या उदाहरणातच 'लोपः शाकल्यस्य' व 'हलि सर्वेषाम्' या सूत्रानी वकारलोप होण्याची आपत्ति येते व ती आपत्ति टाळण्याकरिता दीक्षित असे सुचवितात की, 'गोर्यूतौ छन्दस्युपसङ्ख्यानम्' या वार्तिकातील 'छन्दसि' या पदापूर्वी वकारप्रश्लेष मानावा व त्या प्रश्लिष्ट वकाराचा 'लोपो व्योर्वलि' सू. ८७३ या सूत्रानें लोप झाला आहे असे समजावे, आणि त्या वार्तिकात 'वान्तो यि प्रत्यये' या सूत्रातून 'वान्त·' हे पद अनुवृत्त होत असल्यामुळें व प्रश्लिष्ट वकार त्या अनुवृत्त 'वान्तः' या पदाचे विशेषण होत असल्यामुळे, वर सांगितल्याप्रमाणे, 'श्रूयमाण-वकारान्तः वान्तः आदेशः स्यात्' असा त्या वार्तिकाचा अर्थ होतो व त्यामुळें 'गव्यूतिः' या स्थली वकारलोप होण्याची आपत्ति टळते.)

**शब्दरत्न——वार्तिकेत्यनेन तस्य वाचनिकत्वं सूचितम् । पूर्वसूत्रे इति । वान्तज्ञानाय तत्पर्यालोचनस्यावश्यकत्वादिति भावः ।**

'यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे' हे वार्तिक आहे असे दीक्षितानी म्हटले असल्यामुळें त्यावरून हे सिद्ध होते की, हे वचन वार्तिक-कारानें वार्तिकरूपाने पठित केले आहे 'पूर्वसूत्रे' असे जे मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हे की, वकारान्त आदेश कोणते आहेत (व त्या आदेशाचे स्थानी कोणते आहेत) याचे ज्ञान होण्याकरिता पूर्व सूत्राकडे, म्हणजे 'एचोऽयवायाव.' या सूत्राकडे, लक्ष देणे (व त्या सूत्रान्वयें कोणत्या स्थानीचे जागी वान्त आदेश होतात याचे ज्ञान करून घेणे) आवश्यक आहे.

**मनोरमा——लव्यमिति । लुनातेरचो यत् । "सार्वधातुकार्ध-धातुकयोः" इति गुणः । अवश्यलाव्यमिति । "ओरावश्यके" इति ण्यत् ॥**

('धातोस्तन्निमित्तस्यैव' सू ६४ या सूत्रावरील कौमुदीत) 'लव्यम्' हे जें उदाहरण दिले आहे त्या उदाहरणात 'लू' धातूहून 'अचो यत्' सू २८४२ या सूत्रानें 'यत् = य' प्रत्यय झाला आहे व 'सार्वधातुकार्धधातुकयो' सू २१६८ या सूत्रानें 'लू' यातील अन्त्य ऊकारास गुण होऊन (व ओचे जागी अवादेश होऊन) 'लव्यम्' असे रूप झाले आहे 'अवश्यलाव्यम्' या उदाहरणात 'ओरावश्यके' सू २८८६ या सूत्रानें 'लू' धातूहून 'ण्यत् = य' प्रत्यय झाला आहे (व तो प्रत्यय णित असल्यामुळें 'अचो ञ्णिति' सू २५४ या सूत्रानें 'लू' यातील अन्त्य ऊकारास वृद्धि होऊन व औचे जागी 'आव्' असा आदेश होऊन 'अवश्यलाव्यम्' हे रूप सिद्ध झाले आहे)

**मनोरमा—** क्षय्यमिति । "शकि लिङ् च" इति चात्कृत्या । क्षेयमिति । "अर्हे कृत्यतृचश्च" इति यत् ।

'शकि लिङ् च' सू २८२३ या सूत्रात 'च' हे पद घातले असल्यामुळें ('क्षय्यजय्यौ शक्यार्थे' सू ६५ या सूत्रातील 'क्षय्यम्' या स्थलीं 'क्षि' धातूहून 'क्षेतु शक्यम्' या शक्यार्थामध्यें 'अचो यत्' सू २८४२ या सूत्रानें 'कृत्याः प्राङ् ण्वुल' सू २८३१ या सूत्रान्वयें कृत्यसंज्ञक असणारा) 'यत = य' हा कृत्यप्रत्यय झाला आहे ('क्षि + यत्' येथे 'सार्वधातुकार्धधातुकयो' सू २१६८ या सूत्रानें 'क्षि' यातील अन्त्य इकारास गुण होऊन 'क्षे + य' अशी स्थिति झाली असता, शक्यार्थात 'यत्' प्रत्यय झाला असल्यामुळें 'ए' चे जागी अयादेश होऊन 'क्षय्य' असे प्रकृत सूत्रान्वयें निपातनानें रूप सिद्ध होते 'प्रातिस्विकविधिं विना सिद्धप्रक्रियस्य शब्दस्वरूपस्य निर्देशो निपातनम्' या व्याख्यान्वयें एखाद्या रूपाची सिद्धि होण्याकरिता सूत्र न करिता त्या सिद्ध रूपाचाच सूत्रात निर्देश करणे याला निपातन म्हणतात पाणिनीनें 'शक्यार्थे क्षिज्योर्यन्ति' असे स्वतन्त्र सूत्र न करिता 'क्षय्यजय्यौ शक्यार्थे' असे सूत्र केले असल्यामुळें, 'क्षय्य, जय्य' ही रूपें शक्यार्थामध्यें निपातनानें होतात असे म्हटले

आहे. याचे कारण हे की, 'यत्' प्रत्यय पुढे असल्यामुळे 'क्षि, जि' यातील अन्त्य इकारास गुण होऊन 'क्षे, जे' अशी स्थिति झाली असता, एकारापुढें अच् नसल्यामुळें 'एचोऽयवायाव.' या सूत्राने 'ए' चे जागी होणाऱ्या अयादेशाची प्राप्तीच नाही. तथापि तसा अयादेश, शक्यार्थामध्यें 'यत्' प्रत्यय झाला असता, निपातनानें होतो असा प्रकृत सूत्राचा अर्थ निष्पन्न होतो.) 'क्षेयम्' या उदाहरणात 'अर्हे कृत्यतृचश्च' सू. २८२२ या सूत्रान्वयें 'क्षेतु योग्यम्' अशा अर्हार्थामध्यें 'क्षि' धातूहून 'अचो यत्' या सूत्रानें 'यत् = य' हा कृत्यप्रत्यय झाला आहे ('क्षेयम्' या उदाहरणात शक्यार्थामध्ये 'यत्' प्रत्यय झाला नसून, तो प्रत्यय अर्हार्थामध्यें झाला असल्यामुळे, 'सार्वधातुकार्धधातुकयो' या सूत्राने 'क्षि' यातील अन्त्य इकारास गुण होऊन 'क्षे + य' अशी स्थिति झाली असता 'क्षे' यातील एकाराचे जागीं अयादेश न होता 'क्षेयम्' असे रूप सिद्ध होते.)

**मनोरमा**—हरएहीति । इह "ओमाङोश्च" इति पररूपं प्राप्तम् ।।

('लोप शाकल्यस्य' सू. ६७ या सूत्रावरील कौमुदीत) 'हर एहि' हें जें उदाहरण दिलें आहे त्या उदाहरणात 'ओमाङोश्च' सू. ८० या सूत्रानें पररूप एकादेशाची प्राप्ति आहे ('हरे+आ+इहि' या स्थली 'एचोऽयवायाव' सू ६१ या सूत्रानें 'हरे' यातील 'ए' चे जागी 'अय्' आदेश होऊन 'हरय् + आ + इहि' अशी स्थिति झाल्यावर 'लोप शाकल्यस्य' या सूत्रानें 'हरय्' या पदातील अन्त्य यकाराचा लोप होऊन 'हर + आ + इहि' अशी स्थिति झाली असता, 'हर' यातील अन्त्य अकारापुढें 'आङ् = आ' हा उपसर्ग आला असल्यामुळें, 'ओमाङोश्च' या सूत्रानें पररूप एकादेशाची प्राप्ति होते पण यकारलोप त्रैपादिक सूत्रानें झाला असल्यामुळे 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ या सूत्रान्वयें तो यकारलोप 'ओमाङोश्च' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरतो त्यामुळें 'हर' यातील

अन्त्य अकार व 'एहि = आ + इहि' यातील 'आङ्' या दोहोंमध्यें यकाराचें व्यवधान आहे असें मानावें लागत असल्यामुळें, पररूप एकादेश होत नाही आणि 'धातूपसर्गयोः कार्यमन्तरङ्गम्' या भाष्यवचनान्वयें 'आ + इहि' याचा 'एहि' असा प्रथम अन्तरङ्ग सन्धि होऊन 'हर एहि' असा प्रयोग पररूप एकादेश न होता व 'हरेहि' असें रूप न होता, सिद्ध होतो. 'लोपः शाकल्यस्य' या सूत्रानें होणारा यकारलोप वैकल्पिक असल्यामुळे यकारलोप न केल्यास, 'हरे + एहि = हरय् + एहि = हरयेहि' असे पाक्षिक रूप सिद्ध होते.)

**मनोरमा—उरण् रपरः ।। आन्तरतम्यादिति । रेफशिरस्कस्याऽर् इत्यस्य रेफद्वारा ऋकारेण स्थानसाम्यादित्यर्थः । पक्षे द्वित्वमिति । ऋधेर्धस्येति भावः ।।**

('उरण्रपरः' सू. ७० या सूत्रावरील कौमुदींत 'कृष्णर्द्धिः' हें जें उदाहरण दिले आहे त्या उदाहरणात 'कृष्ण = ऋद्धिः' या स्थली 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्राने 'अ+ऋ' या दोहोंचे जागी 'अ' असा गुणरूप एकादेश केल्यावर त्या गुणरूप 'अ' या अण्पुढें 'उरण्रपरः' या सूत्रानें रकार होतो व अशा रीतीनें 'अ + ऋ' या दोहोंचे जागी 'अर्' असा रेफसहित आदेश होतो त्याचे कारण हें की,) ऋकार व रेफ यांचे (मूर्धन्य हे) समान स्थान असल्यामुळें, रेफशिरस्क—रेफ आहे डोक्यावर किंवा पुढें ज्याच्या अशा—'अर्' या आदेशाचे स्थानीशी (स्थानसाम्यरूप) अत्यन्त सादृश्य आहे ('अर' या आदेशातील 'अ' हा गुणसंज्ञक वर्ण 'अ' या प्रथम स्थानीशी अत्यन्त सदृश असून त्या आदेशातील 'र्' हा 'ऋ' या द्वितीय स्थानीशी स्थानसाम्यामुळें अत्यन्त सदृश आहे व म्हणून 'अ + ऋ' याचे जागी स्थानसाम्यामुळें 'अर्' हा आदेश होतो आणि 'ए, ओ' हे देखील जरी 'अदेङ् गुणः' या सूत्रान्वयें गुणसंज्ञक आहेत तरी त्यांचे अकार या प्रथम स्थानीशी स्थानसाम्य नसल्यामुळें ते अकाराचे जागी होत

नाहीत व तसेच प्रकृत सूत्रात निर्दिष्ट असलेल्या 'र' प्रत्याहारात जरी लकार अन्तर्भूत आहे तरी त्याचे 'ऋ' या द्वितीय स्थानीशीं स्थानसाम्य नसल्यामुळें तो ऋकाराचे जागी होत नाहीं असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'पक्षे द्वित्वम्' असे जें प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे ते 'ऋध्' धातूतील धकारासंबधानें म्हटले आहे (याचे विवरण लगेंच पुढे शब्दरत्नात करण्यात येईल )

शब्दरत्न-- ऋधेर्धस्येति । न च द्वित्वभिन्ने पूर्वत्र कर्तव्ये परमसिद्धमित्यर्थकेन "पूर्वत्रासिद्धमद्वित्वे" इत्यनेन धातुधकारस्य जश्त्वे दस्येति वक्तुमुचितमिति वाच्यम्, फले विशेषाभावेन तदनादरणात् । न ह्यत्र जश्त्वात्पूर्वम् अनन्तरं वा द्वित्वे रूपे विशेषोऽस्ति, तदनन्तरं जश्त्वप्रवृत्ते सत्त्वात् । यत्र पूर्वत्रासिद्धप्रवृत्तौ, तन्निषेधे वा फले विशेषस्तत्रैवास्या परिभाषात्वेन प्रवृत्तेरित्यन्यत्र विस्तरः । यद्वा धस्य तत्स्थानिकस्येत्यर्थ इति दिक् ॥

('ऋधेर्धस्य' असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे ते बरोबर नाही अशी शकाकार शका करतो व तो म्हणतो की,) पूर्व सूत्रानें द्वित्वभिन्न कार्य करतेवेळी 'पूर्वत्रासिद्धम्' हे सूत्र लागू पडते या अर्थाची 'पूर्वत्रासिद्धमद्वित्वे'–परि १२६–ही परिभाषा असल्यामुळे 'ऋध्' धातूतील धकाराचे ('झला जश् झशि' सू ५२ या द्वित्वकार्य करतेवळी पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध न ठरणाऱ्या त्रैपादिक परसूत्रानें) जश्त्व केल्यावर, म्हणजे दकार केल्यावर, त्या दकारास ('अचो रहाभ्या द्वे' सू ५१ या त्रैपादिक पूर्व सूत्रानें) द्वित्वाची प्राप्ति होते असे दीक्षितानी मनोरमेंत म्हणावयास पाहिजे होते पण ही शकाकाराची शका बरोबर नाही, कारण दकाराच द्वित्व केले किंवा धकाराचे द्वित्व केले तरी शेवटीं एकच प्रकारचे रूप होत असल्यामुळें, दीक्षितानीं (दकाराचे द्वित्व प्राप्त होते असे न म्हणता) धकाराचे द्वित्व प्राप्त होते असे म्हटले आहे जश्त्व केल्यावर किंवा जश्त्व करण्यापूर्वीं द्वित्व केले तरी

रूपात कांही फरक पडत नाहीं कारण जश्त्व करण्यापूर्वी द्वित्व केले तरी द्वित्व केल्यावर जश्त्वाची प्राप्ति आहेच. जेथें 'पूर्वत्रासिद्धम्' हें सूत्र प्रवृत्त झाले असता किंवा त्या सूत्राचा निषेध होऊन ते सूत्र प्रवृत्त झाले नसता रूपात काही फरक पडत असेल तेथेंच 'पूर्वत्रासिद्धमद्वित्वे' ही परिभाषा प्रवृत्त होते-लागू पडते-असे इतर ग्रथात, म्हणजे परिभाषेन्दुशेखरात, विस्तारपूर्वक सागितले आहे. ('कृष्ण + ऋद्धि' या उदाहरणात 'ऋध्' धातूहून 'स्त्रियां क्तिन्' सू ३२७२ या सूत्रानें 'क्तिन् = ति' हा प्रत्यय झाला आहे 'कृष्ण ऋध् ति' या स्थली 'आद्गुण' ६९ या सूत्रानें 'कृष्ण' यातील अन्त्य अकाराचे व त्यापुढील ऋकाराचे जागी 'अ' असा गुणरूप एकादेश होऊन व 'उरण्रपर' सू ७० या सूत्राने तो एकादेश रपर होऊन आणि 'झषस्तथोर्धो.' सू २२८० या सूत्रानें 'ति' या प्रत्ययातील तकाराचा धकार होऊन 'कृष्णर्ध् धि' अशी स्थिति झाली असता, 'अचो रहाभ्यां द्वे' सू ५९ या द्वित्वविधायक सूत्राची व तसेच 'झलां जश् झशि' सू ५२ या जश्त्वसपादक सूत्राची युगपत् प्राप्ति होते. ही दोन्ही सपादिक सूत्रें असून 'झलां जश् झशि' हे परसूत्र आहे द्वित्वकार्य करतेवेळीं 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' या परिभाषान्वयें 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ हे सूत्र येथें लागू पडत नसल्यामुळें 'झलां जश् झशि' हे सपादिक परसूत्र 'अचो रहाभ्यां द्वे' या पूर्वसूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नाही आणि म्हणून ते परसूत्र असल्यामुळें 'पूर्वात् पर बलवत्' या न्यायान्वयें प्रथम प्रवृत्त केले असता 'कृष्णर्द् धि' अशी स्थिति झाल्यावर 'अचो रहाभ्यां द्वे' या पूर्व सूत्रानें दकाराचे द्वित्व प्राप्त होते असे दीक्षितांना म्हणावयास पाहिजे होत असे शकाकाराचे म्हणणे आहे व तो असे म्हणतो की, दकाराचे द्वित्व करून आणि नतर 'झरो झरि सवर्णे' सू ७१ या सूत्रानें पूर्व दकाराचा लोप करून 'कृष्णर्द् धि= कृष्णर्द्धि' असे अखेरीस रूप होते. या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,

'कृष्णर्घ् धि' अशी पूर्वी सांगितल्याप्रमाणे स्थिति झाल्यावर या स्थली 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' ही परिभाषा प्रवृत्त न करिता व धकाराचे प्रथम जश्त्व न करिता 'अचो रहाभ्यां द्वे' या सूत्रानें प्रथम द्वित्व केले तरी, 'कृष्णर्ध्ध् धि' अशी स्थिति झाल्यावर 'झलां जश् झशि' या सूत्रानें रेफापुढील दोन्ही धकाराचा दकार होऊन व 'झरो झरि' या सूत्रानें पूर्व दकाराचा लोप होऊन 'कृष्णर्द्धि' असेच रूप सिद्ध होते अशा रीतीने 'कृष्णर्द्धिः' या उदाहरणात 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' ही परिभाषा प्रवृत्त केली किंवा न केली तरी एकसारखेच इष्ट रूप होत असल्यामुळें अशी उदाहरणें त्या परिभाषेचा विषय नव्हत आणि म्हणून ती परिभाषा अशा ठिकाणी उपयोगात आणण्याची काही गरज नाही व जेथें ती प्रवृत्त केल्याने रूपात फरक पडत असेल तेथेंच ती उपयोगात आणावी असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' या परिभाषेचे विस्तृत विवरण परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरात पान ५२९–३३ मध्यें केले आहे व ते वाचले म्हणजे समग्र विषय नीट ध्यानात येईल. साराश वर सांगितल्याप्रमाणे 'कृष्णर्द्धि' या उदाहरणात रेफापुढील यर्चे द्वित्व करतेवेळी 'पूर्वत्रासिद्धमद्वित्वे' ही परिभाषा प्रवृत्त केली किंवा न केली तरी रूपात फरक पडत नसल्यामुळे व अशा रीतीने ते उदाहरण त्या परिभाषेचा विषय होत नसल्यामुळें, 'ऋधेर्धस्य' असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्यात काही दोष येत नाही व 'दस्य' असे दीक्षितानी म्हणावयास पाहिजे होते असे जे शंकाकाराचे म्हणणे आहे ते अयोग्य ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे ) अथवा 'ऋधेर्धस्य' या मनोरमेच्या पंक्तीतील 'धस्य' याचा 'धकारस्थानिकदकारस्य, म्हणजे धकाराचे जागी झालेल्या दकाराचे, असा अर्थ करावा (असा अर्थ केल्यानें वरील शंका उत्पन्नच होत नाही )

**मनोरमा**–लोपो वेति । "झयो होऽन्यतरस्याम्" इति सूत्राद्विकल्पानुवृत्तेः । एतच्च "नाज्झलौ" इति सूत्रे भाष्यकैयटयोः स्पष्टम् ।

प्राचस्तु विकल्पानुवृत्तेरनुक्तेर्न्यूनता। यदपि व्याख्यातृभिः "शरोऽचि" इति ज्ञापकमुपन्यस्य तत्संवादार्थं भाष्यमुपन्यस्तम्—"अनुवर्तते विभाषा शरोऽचि यद्वारयत्ययं द्वित्वम्" इति, तन्न, तदुत्तरभाष्ये एव उक्तज्ञापकस्य दूषितत्वात्। लोपस्य हि नित्यत्वे "अचो रहाभ्याम्–" इति द्वित्वं लोपापवादः स्यात्। तथा च "शरोऽचि" इत्यस्य सार्थक्यं स्पष्टमेव। तस्माद्विकल्पानुवृत्तौ ज्ञापकान्तरमनुसर्तव्यम्। भाष्यकारादिव्याख्यानमेव वा शरणम्। द्वित्वलोपयोरिति। यत्तु द्वित्वविधानसामर्थ्याद् द्वावेव शिष्येते इति, तन्न, लोपस्य वैकल्पिकत्वेन द्वित्वस्य पक्षे चरितार्थत्वात्। त्रिधर्मिति। "यणो मय" लक्षणान्तरेण पुनर्द्वित्वे तु चतुर्धमपि बोध्यम्॥

('झरो झरि सवर्णे' सू. ७१ या सूत्रावरील कौमुदीत) 'झरो लोपो वा स्यात्' असे म्हटले आहे. त्याचे कारण हे की, त्या सूत्रात 'झयो होऽन्यतरस्याम्' या पूर्व सूत्रातून 'अन्यतरस्याम्' या पदाची अनुवृत्ति होते. 'नाज्झलौ' सू. १·१·१० या सूत्रावरील भाष्यावरून व कैयटाच्या वृत्तीवरून हे स्पष्ट होते. (त्या भाष्यात भाष्यकारांनी 'विभाषा तु स लोपः' असे म्हटले आहे व कैयटानें आपल्या वृत्तींत असे स्पष्ट म्हटले आहे की, 'लोपोऽपि विभाषा, झयो होऽन्यतरस्यामित्यतोऽन्यतरस्यामित्यनुवर्तनादित्यर्थः) प्रक्रिया-कौमुदीकारांनी 'झरो झरि' या सूत्रात विकल्पाची अनुवृत्ति सांगितली नसल्यामुळें, त्यांच्या वृत्तींत न्यूनतारूप दोष येतो. त्यांच्या टीकाकारांनी—प्रकाशकारांनी—मात्र 'झरो झरि' या सूत्रानें सांगितलेल्या लोपाचा विकल्प मानला आहे, पण त्याच्या समर्थनार्थ त्यांनी 'शरोऽचि' सू ३४० हे सूत्र ज्ञापक दिले आहे आणि त्याच्या म्हणण्यास भाष्य प्रमाण आहे हे सिद्ध करण्याकरिता, त्यांनी 'अनुवर्तते विभाषा शरोऽचि यद्वारयत्ययं द्वित्वम्' हा भाष्यातील उतारा दिला आहे. परंतु त्यांनी दिलेले ज्ञापक बरोबर नाही, कारण पुढील भाष्यात ते ज्ञापक दूषित ठरविले आहे. भाष्यकारांनी

'कृष्णर्ध् धि' अशी पूर्वीं सांगितल्याप्रमाणे स्थिति झाल्यावर या स्थली 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' ही परिभाषा प्रवृत्त न करिता व धकाराचे प्रथम जश्त्व न करिता 'अचो रहाभ्यां द्वे' या सूत्रानें प्रथम द्वित्व केले तरी, 'कृष्णर्ध्ध् धि' अशी स्थिति झाल्यावर 'झला जश् झशि' या सूत्रानें रेफापुढील दोन्ही धकाराचा दकार होऊन व 'झरो झरि' या सूत्रानें पूर्व दकाराचा लोप होऊन 'कृष्णर्द्धि' असेच रूप सिद्ध होते अशा रीतीने 'कृष्णर्द्धिः' या उदाहरणात 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' ही परिभाषा प्रवृत्त केली किंवा न केली तरी एकसारखेच इष्ट रूप होत असल्यामुळें अशी उदाहरणें त्या परिभाषेचा विषय नव्हत आणि म्हणून ती परिभाषा अशा ठिकाणी उपयोगात आणण्याची काही गरज नाही व जेथें ती प्रवृत्त केल्यानें रूपात फरक पडत असेल तेथेंच ती उपयोगात आणावी असा शब्द-रत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' या परिभाषेचे विस्तृत विवरण परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरात पान ५२९–३३ मध्यें केले आहे व ते वाचले म्हणजे समग्र विषय नीट ध्यानात येईल. साराश वर सांगितल्याप्रमाणे 'कृष्णर्द्धि' या उदाहरणात रेफापुढील धर्चे द्वित्व करतेवेळी 'पूर्वत्रासिद्धमद्वित्वे' ही परिभाषा प्रवृत्त केली किंवा न केली तरी रूपात फरक पडत नसल्यामुळें व अशा रीतीनें ते उदाहरण त्या परिभाषेचा विषय होत नसल्यामुळें, 'ऋधेर्धस्य' असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्यात काही दोष येत नाही व 'दस्य' असे दीक्षितानी म्हणावयास पाहिजे होते असे जें शंकाकाराचे म्हणणे आहे ते अयोग्य ठरतें असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे ) अथवा 'ऋधेर्धस्य' या मनोरमेच्या पक्तींतील 'धस्य' याचा 'धकारस्थानिकदकारस्य, म्हणजे धकाराचे जागी झालेल्या दकाराचे, असा अर्थ करावा (असा अर्थ केल्यानें वरील शंका उत्पन्नच होत नाही )

मनोरमा–लोपो वेति । "झयो होऽन्यतरस्याम्" इति सूत्राद्वि-कल्पानुवृत्तेः । एतच्च "नाज्झलौ" इति सूत्रे भाष्यकैयटयोः स्पष्टम् ।

आधार घेऊनच प्रकाशकारानी 'शरोऽचि' हे सूत्र 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचे ज्ञापक मानले आहे परंतु दीक्षित म्हणतात की, प्रकाशकारानी हे ज्ञापक देतेवेळीं वरील भाष्याच्या लगेच पुढें जें भाष्य आहे त्या भाष्याकडे दुर्लक्ष केले आहे ते भाष्य असे आहे-'नैतदस्ति ज्ञापकम् । नित्येऽपि तस्य लोपे स प्रतिषेधोऽवश्य वक्तव्य । यदेतदचो रहाभ्यामिति द्विर्वचन लोपापवादः स विज्ञायते । कथम् ?। यर इत्युच्यत एतावन्तश्च यरो यदुत झरो वा यमो वा । यदि चात्र नित्यो लोप. स्याद् द्विर्वचनमनर्थक स्यात् ।' या उत्तरभाष्यात पूर्वभाष्यात केलेल्या प्रतिपादनाचे खडन करून भाष्यकारानी असे स्पष्ट म्हटले आहे की, 'शरोऽचि' हे सूत्र 'झरो झरि' या सूत्रानें होणाऱ्या लोपाच्या विकल्पाचे ज्ञापक मानता येत नाही व याला भाष्यकार असे कारण देतात की, जर लोप नित्य मानला तर, 'अचो रहाभ्याम्' या सूत्रानें सांगितलेले द्वित्व लोपाचे अपवादक ठरेल 'यर्' हे जे वर्ण आहेत ते 'झर्' किंवा 'यम्' यापैकीच असतात व 'झरो झरि' या सूत्रानें झराचा लोप होणे व 'हलो यमा यमि लोप' या सूत्रानें यमाचा लोप होणे सांगितले आहे. म्हणून द्वित्व झाल्यावर जर लोप नित्य होईल तर द्वित्व होणे निरर्थक ठरेल व द्वित्व करून न केल्यासारखेंच होईल आणि द्वित्व सांगण्याचा काहीच उपयोग झाला नाही असे ठरेल त्यामुळें द्वित्व चरितार्थ ठरण्याकरिता, ते लोपाचा अपवाद मानणे भाग पडेल, आणि तसे मानल्यास, द्वित्व झाल्यावर लोप मुळीच होणार नाही त्यामुळें 'चतुर्पु' या स्थली 'अचो रहाभ्या द्वे' या अपवादक सूत्रानें पकाराचे द्वित्व केल्यावर 'झरो झरि' या बाधित सूत्रानें पूर्व पकाराचा लोप होणार नाही व द्विपकारयुक्त अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल ती टाळण्याकरिता 'शरोऽचि' हे द्वित्वनिषेधक सूत्र मुद्दाम केले आहे व अशा रीतीनें ते सूत्र चरितार्थ ठरत असल्यामुळें, ते सूत्र 'झरो झरि' या

पुढील त्या भाष्यात असे म्हटले आहे की, लोप नित्य मानल्यास, 'अचो रहाभ्या द्वे' सू ५९ या सूत्रानें होणारे द्वित्व ('झरो झरि सवर्णे' सू ७१ या सूत्रानें होणाऱ्या) लोपाचे अपवादक--बाधक--ठरेल, व तसे मानल्यास, 'शरोऽचि' सू. ३४० हे सूत्र सार्थक ठरेल हे उघड आहे ('हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यात 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप 'विभाषा च स लोप', म्हणजे वैकल्पिक आहे, असे सांगून पुढें भाष्यकार असे म्हणतात--'अनुवर्तते विभाषा शरोऽचि यद्वारयत्यय द्वित्वम् । यदय शरोऽचि इति द्विर्वचनप्रतिषेध शास्ति तज्ज्ञापयत्याचार्योऽनुवर्तते विभाषेति । कथ कृत्वा ज्ञापकम् ? । नित्ये हि तस्य लोपे प्रतिषेधार्थो न कश्चित्स्यात् । यदि नित्यो लोप. स्यात् प्रतिषेधवचनमनर्थकं स्यात् । अस्त्वत्र द्विर्वचनम् । झरो झरि सवर्णे इति लोपो भविष्यति । पश्यति त्वाचार्यो विभाषा स लोप इति, ततो द्विर्वचनप्रतिषेध शास्ति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'झरो झरि' या सूत्राने होणारा लोप नित्य मानल्यास, 'शरोऽचि' या सूत्रानें सागितलेला द्वित्वाचा निषेध व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल, कारण 'चतुर्प्सु' या उदाहरणात 'अचो रहाभ्या द्वे' सू. ५९ या सूत्रानें पकाराचे द्वित्व केले तरी, 'झरो झरि' या सूत्रानें पूर्व पकाराचा लोप अवश्य होऊन 'चतुर्प्सु' हे रूप सिद्ध होऊ शकतेच मग 'शरोऽचि' हा निषेध का सागितला ? तो निषेध सार्थक ठरण्याकरिता हे मानणे आवश्यक आहे कीं, 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप नित्य नसून वैकल्पिक आहे, व तसे मानले म्हणजे, 'चतुर्प्सु' या स्थलीं पकाराचे द्वित्व केल्यावर, लोप वैकल्पिक असल्यामुळें, जेव्हा पूर्व पकाराचा लोप केला जाणार नाहीं तेव्हा द्विपकारयुक्त अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरिता 'शरोऽचि' हा निषेध सांगितला आहे व अशा रीतीनें तो निषेध 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचे ज्ञापक ठरतो. या वरील भाष्याचा

आधार घेऊनच प्रकाशकारानी 'शरोऽचि' हें सूत्र 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचें ज्ञापक मानले आहे परंतु दीक्षित म्हणतात की, प्रकाशकारानी हे ज्ञापक देतेवेळी वरील भाष्याच्या लगेंच पुढें जें भाष्य आहे त्या भाष्याकडे दुर्लक्ष केले आहे. तें भाष्य असें आहे-'नैतदस्ति ज्ञापकम् । नित्येऽपि तस्य लोपे स प्रतिषेधोऽवश्य वक्तव्यः । यदेतदचो रहाभ्यामिति द्विर्वचन लोपापवाद. स विज्ञायते । कथम् ? । यर इत्युच्यत एतावन्तश्च यरो यदुत झरो वा यमो वा । यदि चात्र नित्यो लोपः स्याद् द्विर्वचनमनर्थक स्यात् ।' या उत्तरभाष्यात पूर्वभाष्यात केलेल्या प्रतिपादनाचे खडन करून भाष्यकारानी असें स्पष्ट म्हटले आहे की, 'शरोऽचि' हें सूत्र 'झरो झरि' या सूत्रानें होणाऱ्या लोपाच्या विकल्पाचे ज्ञापक मानता येत नाही व याला भाष्यकार असें कारण देतात की, जर लोप नित्य मानला तर, 'अचो रहाभ्याम्' या सूत्रानें सांगितलेले द्वित्व लोपाचे अपवादक ठरेल 'यर्' हे जे वर्ण आहेत ते 'झर्' किंवा 'यम्' यापैकीच असतात व 'झरो झरि' या सूत्रानें झराचा लोप होणें व 'हलो यमा यमि लोप.' या सूत्रानें यमाचा लोप होणें सांगितले आहे. म्हणून द्वित्व झाल्यावर जर लोप नित्य होईल तर द्वित्व होणें निरर्थक ठरेल व द्वित्व करून न केल्यासारखेंच होईल आणि द्वित्व सांगण्याचा काहींच उपयोग झाला नाही असें ठरेल त्यामुळें द्वित्व चरितार्थ ठरण्याकरिता, तें लोपाचा अपवाद मानणे भाग पडेल, आणि तसें मानल्यास, द्वित्व झाल्यावर लोप मुळीच होणार नाही. त्यामुळें 'चतुर्प्पु' या स्थली 'अचो रहाभ्या द्वे' या अपवादक सूत्रानें पकाराचे द्वित्व केल्यावर 'झरो झरि' या बाधित सूत्रानें पूर्व पकाराचा लोप होणार नाही व द्विपकारयुक्त अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. ती टाळण्याकरिता 'शरोऽचि' हे द्वित्वनिषेधक सूत्र मुद्दाम केलें आहे व अशा रीतीनें तें सूत्र चरितार्थ ठरत असल्यामुळें, तें सूत्र 'झरो झरि' या

सूत्राने होणाऱ्या लोपाच्या विकल्पाचे ज्ञापक मानता येत नाही. आणि म्हणूनच भाष्यकार म्हणतात.–'तस्मान्नित्येऽपि लोपेऽवश्य स प्रतिषेधो वक्तव्य. । तदेतदत्यन्त सन्दिग्ध वर्तत आचार्याणा विभाषानुवर्तते न वेति ।' परतु लोप वैकल्पिक आहे किंवा नाही याबद्दल जरी सदेह उत्पन्न होतो तरी, 'व्याख्यानतो विशेषप्रतिपत्तिर्न हि सन्देहादलक्षणम्' प. १ या न्यायान्वये, भाष्यकार 'झरो झरि' या सूत्रात विकल्पाची अनुवृत्ति करितात. म्हणून त्या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याला वरील भाष्यातील व्याख्यान प्रमाण आहे व कैयटानें असे स्पष्ट म्हटले आहे की, 'झरो झरि' या सूत्राने होणारा लोप जो भाष्य॰ कारानीं वैकल्पिक मानला आहे त्याचे कारण हे की, त्या सूत्रात 'झयो होऽन्यतरस्याम्' या पूर्वसूत्रातून 'अन्यतरस्याम्' या पदाची अनुवृत्ति केली आहे. साराश 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचे 'शरोऽचि' हे सूत्र ज्ञापक मानता येत नाही हे वरील भाष्यावरून स्पष्ट होते.) म्हणून 'झरो झरि' या सूत्रात विकल्पाची अनुवृत्ति मानण्याकरिता, म्हणजे त्या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे हे सिद्ध करण्याकरिता एक तर दुसरे ज्ञापक शोधले पाहिजे किंवा भाष्यकारादिकाचे व्याख्यान प्रमाण मानले पाहिजे, म्हणजे प्रकृत सूत्रात 'झयो ह' या पूर्व सूत्रातून 'अन्यतरस्याम्' या पदाची अनुवृत्ति होते असे जें वरील भाष्याचे व्याख्यान करिताना कैयटानें म्हटले आहे ते म्हणणे प्रमाण मानलें पाहिजे द्वित्वविधायक सूत्रात द्वित्वाचे विधान केले असल्यामुळे त्या विधानाच्या सामर्थ्याने द्वित्व केल्यानें झालेले दोन्ही वर्ण कायम राहतात (व पूर्व वर्णाचा लोप करता येत नाही, कारण तसे केल्यास द्वित्व करून न केल्यासारखेच होईल असे जें 'हलो यमि यमा लोप.' या सूत्रावरील वृत्तीत प्रक्रियाकौमुदीकारानी म्हटले आहे व त्याचे व्याख्यान करिताना प्रसादकारानी 'तत्र यदि द्वितीयस्यापि यस्य लोप स्यात् हर्य्यनुभव इत्यत्र प्रवर्तमान द्वित्वल-

क्षण व्यर्थं स्यात् । ततो द्वित्वविधानसामर्थ्याद्द्वौ यकारावशिष्येते ।' असे जें म्हटले आहे) हे म्हणणे बरोबर नाही, कारण लोप वैकल्पिक असल्यामुळें जेव्हा लोप केला जात नाही तेव्हा त्या पक्षात द्वित्व चरितार्थ ठरतें (व अशा रीतीनें द्वित्व अनवकाश ठरत नसल्यामुळें ते लोपाचे बाधक होऊ शकत नाही ) 'कृष्णर्द्धि ' या उदाहरणात 'सति द्वित्वे लोपे चासति त्रिधम्', म्हणजे धकाराचे द्वित्व केल्यास व लोप न केल्यास त्रिधकारयुक्त रूप सिद्ध होतें, असे जें प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे त्याशिवाय 'यणो मयो द्वे वाच्ये' या भिन्न लक्षणानें—वार्तिकानें-पुन्हा धकाराचे द्वित्व केल्यानें ज्यात चार धकार आहेत असें देखील रूप होऊ शकते हे जाणावे. ('कृष्णर्ध् + ति = कृष्णर्ध् + धि ' या स्थली मूळचे दोन धकार आहेत त्यापैकी रेफापुढें असणाऱ्या प्रथम धकाराचे 'अचो रहाभ्या द्वे' सू ५१ या सूत्राने द्वित्व केल्यास व प्रकृत सूत्रानें होणारा झर्चा लोप वैकल्पिक असल्यामुळें पूर्व धकाराचा लोप न केल्यास त्रिधकार-युक्त रूप सिद्ध होते. 'यणो मयो द्वे वाच्ये' या वार्तिकाचा 'यण परस्य मय द्वे वाच्ये' असा अर्थ करून त्या वार्तिकानें रेफ या यणापुढें असलेल्या 'ध्' या मय्चे पुन्हा द्वित्व केल्यास, ज्यात चार धकार आहेत असे रूप देखील सिद्ध होऊ शकते येथें जरी त्याच धकाराचे दोनदा द्वित्व केले जाते तरी तें एकाच सूत्रानें केले जात नसून दोन भिन्न लक्षणानी, म्हणजे 'अचो रहाभ्याम्' व 'यणो मयो द्वे' या दोन भिन्न लक्षणानी, केले जात असल्यामुळें, 'लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्ति ' हा न्याय आड येत नाही )

शब्दरत्न— नाज्झलाविति सूत्रे इति । "हयवरट्" सूत्रशेषे चेत्यपि बोध्यम् । अनुवृत्तेरिति । "हलो यमाम्" इत्यत्र "झरो झरि" इत्यत्र चेति भावः । ज्ञापकमिति । उभयत्रापि विकल्पानु-वृत्ताविति भावः । लोपस्य होति । लोपमात्रस्येत्यर्थः । लोपापवाद इति । आरम्भसामर्थ्यादिति भावः । ज्ञापकान्तरमिति । "अणुदित्"

सूत्रस्थमण्ग्रहण हल' परस्य परो लोपो वैकल्पिक इति सामान्या-पेक्षमाश्रयणीयमिति भावः। तस्य "हलो यमाम्-" इति विशेषा-पेक्षत्वे आह--व्याख्यानमेव वेति। यदि तु "हलो यमाम्-" इत्यत्र विकल्प सिद्ध कृत्वा द्वित्वस्य तद्विषये चारितार्थ्येन "झरो झरि" इत्यत्र तदनुवृत्तौ "शरोऽचि" इति ज्ञापकमुपन्यस्यते तदा सम्यगेव, पर तु प्राचा भाष्यसमतिलेख. प्रामादिक, तद्ग्राहयस्योभयविषय-तया प्रवृत्ते ॥

'झरा झरि सवर्णे' या सूत्रात विकल्पाची अनुवृत्ति आहे हे 'नाज्झलौ' या सूत्रावरील भाष्यात सागितले आहे असे जे मनोरमेत म्हटले आहे त्याशिवाय 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्याच्या अखेरीस देखील तसेच सागितले आहे हे लक्षात ठेवावे (हे भाष्य मनोरमेत दिलेच आहे) प्रक्रियाकौमुदीकारानी जसा 'झरो झरि' या सूत्रावरील वृत्तीत त्या सूत्रानें होणाऱ्या लोपाचा विकल्प सागितला नाही तसाच त्यानी 'हलो यमा यमि लोप' या सूत्रावरील वृत्तीत देखील त्या सूत्राने होणाऱ्या लोपाचा विकल्प सागितला नाही (आणि म्हणून त्याची दोन्ही सूत्रावरील वृत्ति न्यून ठरते पण) प्रकाशकारानी त्या दोन्ही सूत्रानी होणारा लोप वैकल्पिक आहे याचे 'शरोऽचि हे सूत्र ज्ञापक मानले आहे (व ते सूत्र लोपाच्या विकल्पाचे ज्ञापक का मानता येत नाहीं याचे मनोरमेत विवरण केलेच आहे) 'लोपस्य हि नित्यत्वे' या मनोरमेच्या पङ्क्तीतील 'लोपस्य' याचा 'लोपमात्रस्य' म्हणजे 'झरो झरि' व 'हलो यमाम्' या दोन्ही सूत्रानी होणारा लोप, असा अर्थ आहे मनोरमेत 'द्वित्व लोपापवाद स्यात्' असे जें म्हटले आहे त्याचे कारण हे की, द्वित्वविधायक सूत्रें मुद्दाम आरभिली असल्यामुळें त्याच्या आरभसामर्थ्याने तीं लोपाचा अपवाद होण्याची आपत्ति येईल (याचे विवरण मनोरमेत केलेच आहे) 'ज्ञापकान्तरमनुसर्तव्यम्' असे जे मनोरमेत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, हलापुढें असलेल्या यर्चा लोप वैकल्पिक

आहे याचे 'अणुदित्' सू. १४ या सूत्रातील 'अण्' या पदाचे ग्रहण सामान्यापेक्ष ज्ञापक मानले पाहिजे. ते अण्ग्रहण 'हलो यमां यमि लोपः' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचे विशेषापेक्ष ज्ञापक आहे असे मानल्यास (व 'झरो झरि'-या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचे ते ज्ञापक मानता येत नाही असे म्हटल्यास) 'व्याख्यानमेव वा शरणम्' असे दीक्षितांनी मनोरमेंत म्हटले आहे. ('अणुदित्' सू १४ या सूत्रात परणकारानें साधलेल्या अण्-प्रत्याहाराचें ग्रहण न करिता अच्प्रत्याहाराचे ग्रहण केले असते तरी काम भागू शकले असते पण त्या सूत्रात अण्प्रत्याहाराचे ग्रहण मुद्दाम अशाकरिता केले आहे की, अच्प्रत्याहारात अन्तर्भूत नसलेल्या निरनुनासिक 'य्, व्, ल्' या वर्णांनीं सानुनासिक 'यँ वँ, लँ' या सवर्णांचे ग्रहण होऊन 'सय्यँन्ता, सव्वँत्सरः' इत्यादि स्थलीं त्रियकारयुक्त व त्रिवकारयुक्त इष्ट रूप व्हावे 'सम् + यन्ता' या स्थली 'मोऽनुस्वारः' सू १२२ या सूत्रानें मकाराचा अनुस्वार होऊन व 'वा पदान्तस्य' सू. १२५ या सूत्रानें अनुस्वाराचे जागीं विकल्पेंकरून परयकाराचा सवर्ण, म्हणजे अनुनासिक 'यँ' होऊन 'सयँयन्ता' असे द्वियकारयुक्त रूप सिद्ध झाल्यावर 'अनचि च' हें सूत्र प्रवृत्त करून 'स' यातील 'अ' या अन्त्य अचापुढें असलेल्या 'यँ' या अनुनासिक यर्चे द्वित्व केल्यानें त्रियकारयुक्त रूप सिद्ध होते. जर 'अणुदित्सवर्णस्य' या ग्रहणकशास्त्रात अण्प्रत्याहाराचे ग्रहण न करिता त्यात अन्तर्भूत असलेल्या अच्प्रत्याहाराचे ग्रहण केले असते तर, त्या अच्प्रत्याहरात अन्तर्भूत नसलेल्या 'य्, व्, ल्' या निरनुनासिक वर्णांनीं त्याच्या सानुनासिक 'यँ, वँ, लँ' या सवर्णांचे ग्रहण होऊ शकले नसते व त्यामुळें 'सम् + यन्ता' या स्थली मकाराचा अनुस्वार केल्यावर त्या अनुस्वाराचे जागीं त्यापुढें असलेल्या यकाराचा सवर्ण अनुनासिक 'यँ' होऊ शकला नसता व त्रियकारयुक्त इष्ट रूप सिद्ध न होता, द्वियकारयुक्त रूपच सिद्ध झाले

असते तसच 'हलो यमा यमि लोप.' या सूत्राने होणारा लोप नित्य मानल्यास, 'अनचि च' या सूत्रानें यकाराचे द्वित्व केल्यावर प्रथम यकाराचा लोप अवश्य होणार व त्रियकारयुक्त रूप कधीहि सिद्ध होऊ शकणार नाही पण तसे रूप होणे तर इष्ट आहे व लोप वैकल्पिक मानल्यानेंच, लोप न केल्यास, तसे रूप सिद्ध होऊ शकते व अशा रीतीनें 'हलो यमाम्' या सूत्राने होणारा लोप वैकल्पिक आहे याचे 'अणुदित' या सूत्रातील अण्प्रत्याहाराचे ग्रहण ज्ञापक ठरते पण अशा रीतीने ते अण्ग्रहण 'हलो यमाम्' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे एवढ्यापुरतेच ज्ञापक, म्हणजे विशेष ज्ञापक, ठरते व 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचे ते अण्ग्रहण ज्ञापक मानता येत नाही असे कोणी म्हट-ल्यास त्यावर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, ते अण्ग्रहण 'हलो यमाम्' व 'झरो झरि' या दोन्ही सूत्रानी होणारा लोप वैकल्पिक आहे याच 'ज्ञापकाना सामान्ये पक्षपात' या न्यायान्वयें सामान्य ज्ञापक मानावे व 'हलो यमाम्' या सूत्रानें होणाऱ्या लोपापुरतेच विशेष ज्ञापक मानू नये अथवा ते अण्ग्रहण सामान्यापेक्ष ज्ञापक मानता येत नाही व 'हलो यमाम्' या सूत्रानें होणाऱ्या लोपापुरतेच ते विशेष ज्ञापक मानता येते असा आग्रह असल्यास, भाष्यकारादि-काच्या व्याख्यानाचेच अवलंबन केले पाहिजे व वरील दोन्ही सूत्रात 'ङयो होऽन्यतरस्याम्' या पूर्व सूत्रातून 'अन्यतरस्याम्' या पदाची अनुवृत्ति होते असे मानले पाहिजे. साराश वरील दोन्ही सूत्रानी होणारा लोप वैकल्पिक आहे हे सिद्ध करण्याकरिता वर सांगितलेल्या दोन मार्गांपैकी—म्हणजे अण्ग्रहण सामान्यापेक्ष ज्ञापक मानणे किंवा भाष्यकारादिकाच्या व्याख्यानाचे अवलंबन करणे या दोन उपाया-पैकी—कोणता तरी एक मार्ग स्वीकारला पाहिजे व प्रसादकाराचे जे म्हणणे आहे की, 'झरोऽचि' हे सूत्र 'हलो यमाम्' या सूत्रानें होणाऱ्या लोपाच्या वैकल्पिकत्वाचे ज्ञापक आहे ते म्हणणे बरोबर

मानता येत नाही असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'अणुदित्' या सूत्रातील अण्ग्रहणानें 'हलो यमाम्' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे हे सिद्ध केल्यावर त्या लोपाच्या विषयात–त्याच्या वैकल्पिकत्वामुळें–('अचो रहाभ्यां द्वे' या सूत्रानें होणारे) द्वित्व ('हर्य्यनुभवः' इत्यादि स्थळी) चरितार्थ ठरत असल्यामुळे, 'झरो झरि' या सूत्रात विकल्पाची अनुवृत्ति होण्याकरिता 'शरोऽचि' हे सूत्र ज्ञापक मानल्यास काहीं दोष उद्भवत नाही. परतु प्रकाशकारानी ('हलो यमाम्' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे हे सिद्ध करण्याकरितां 'अनुवर्तते विभाषा शरोऽचि यद्वारयत्यय द्वित्वम्' या) भाष्याचा जो आधार दिला आहे तो चूक ठरतो; कारण ते भाष्य 'हलो यमाम्' व 'झरो झरि' या दोन्ही सूत्रानीं होणाऱ्या लोपाला लागू पडणारे भाष्य आहे (व त्या भाष्यान्वयें 'झरो झरि' या परसूत्रात विभाषेची–'अन्यतरस्याम्' या पदाची–अनुवृत्ति होते असे मानले म्हणजे, 'हलो यमाम्' या पूर्व सूत्रात विभाषेची अनुवृत्ति आहे हे आपोआपच सिद्ध होते व त्या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे हे सिद्ध करण्याकरिता 'शरोऽचि' हें सूत्र ज्ञापक मानण्याची काहीच गरज राहत नाही. जर 'हलो यमा यमि लोप' या सूत्राने होणारा लोप वैकल्पिक आहे याचे 'अणुदित्' या सूत्रातील अण्ग्रहण विशेषापेक्ष ज्ञापक मानले तर मात्र 'झरो झरि' या सूत्रानें होणारा लोप वैकल्पिक आहे याचे 'शरोऽचि' हे सूत्र ज्ञापक मानले पाहिजे. पण प्रकाशकारानी तसे केले नसल्यामुळें त्याचे म्हणणे बरोबर मानता येत नाही. दुसरे असे की, ज्या भाष्याचा त्यानी आधार दिला आहे ते एकदेशि भाष्य आहे व त्या एकदेशि भाष्याचे भाष्यकारानी स्वतः पुढें खण्डन केले आहे. म्हणून तसे भाष्य प्रमाणरूपानें उपन्यस्त करणे अयोग्य आहे हे मनोरमेंत सांगितलेच आहे.)

मनोरमा– एत्येधत्यूठ्सु ॥ अत्र एधतीत्यनुवर्तते तच्च एतेरेव विशेषणं नत्वेधते, अव्यभिचारात्। नाप्यूठ, असम्भवादिति प्राञ्च। अत्र कैयट –'एधतेरपि विशेषणम्, मा भवान् प्रेदिधदित्यत्र व्यभिचारात्'। यद्यपीदं कैयटपुस्तकेषु प्रायेण न दृश्यते, तथाऽपि क्वचिद् दृश्यत एव। न च "णौ चङि–" इति ह्रस्वे कृते नाधमेधतिरिति वाच्यम्, एकदेशविकृतस्यानन्यत्वात्। न चैवमपि "अजादेर्द्वितीयस्य" इति धिशब्दस्थाने धिधिशब्दादेशे सति वस्नसोरिव प्रकृतिप्रत्ययविभागसंमोह इति वाच्यम्, द्वि प्रयोगो द्विर्वचनं षाष्ठमिति षाष्ठभाष्ये सिद्धान्तितत्वात्। अन्यथेहैव णिलोपो न स्यात्। जिघांसतीत्यादौ सन सकारेण विशिष्टस्य द्वित्वे कृते कुत्वं च न स्यात्। न चान्तरङ्गत्वात् प्रथमं "चङि" इति द्वित्वे कृते ह्रस्वो न भवत्येवेति वाच्यम्, ओणेर्ऋदित्करणेन बहिरङ्गस्यापि "णौ चङि" इति ह्रस्वस्य प्रथमं प्रवृत्तिरिति ज्ञापितत्वात्। अत्र माधव –'मा भवान् प्रेदिधत्' इत्यत्र नातिप्रसङ्ग, ण्यन्तस्य शब्दान्तरत्वादेधतिग्रहणेनाग्रहणात्। अत एव हि "न भाभूपूकमिगमि–" इत्यत्र "ण्यन्तानां च भादीनामुपसंख्यानम्" इत्युक्तम्। तत्रैव शब्दान्तरत्वादप्राप्तावुपसंख्यानमिति कैयटन्यासकारहरदत्तादिभि सर्वैरेवोक्तम्। किं च व्यधिकस्यापि ग्रहणे "उपसर्गात्सुनोति–" इत्यत्राभिषावयतीत्युदाहृत्य ण्यन्तेनाभेर्योगात्सुनोतिं प्रत्यनुपसर्गत्वात्कथं षत्वमित्याशङ्क्याभे प्रकृत्यर्थविशेषकत्वेन समाधानं भाष्यकाराद्युक्तमसङ्गतं स्यात्। न च "हेरचङि" इति लिङ्गात् "प्रकृतिग्रहणे ण्यधिकस्यापि ग्रहणम्" इति भ्रमितव्यम्, ज्ञापकस्य कुत्वमात्रविषयकत्वात्। तथा च वार्तिकम्–"हेश्चङि प्रतिषेधानर्थक्यमङ्गान्यत्वात्"। 'ज्ञापकं तु चङोऽन्यत्र ण्यन्तेऽपि कुत्वभावस्य' इति। तस्माद्युक्तिविरोधाद्भाष्यवार्तिकवृत्तिन्यासादिग्रन्थैः, पूर्वापरस्वग्रन्थेन च विरोधादुपेक्ष्योऽयं कैयट इति। अत्रेदं वक्तव्यम्–अस्तु विशिष्टस्य शब्दान्तरत्वं तावताऽपि प्रकृतिभागस्यैधरूपत्वं केनापगतमित्यवधार्यताम्।

नहृच्युपंधत इत्यादौ तिङन्तस्यं भूपता नास्तीति प्रकृत्यंशे सा ह्रीयते। तथा च—"उपसर्गात्सुनोति-" इति सूत्रे वार्तिकं—"सिद्धं त्ववयवानन्यत्वात्" इति। यस्त्वभिधावयतीत्यत्रत्यभाष्यविरोधोद्भावनं तद्विपरीतम्, यतः प्रकृतेः सुनोतिरूपानपायात्, कैयटमते सिद्धा यथोक्तव्यवस्था। त्वन्मते तु रूपान्तरत्वेन ण्यधिकस्याग्रहणादसङ्गतैव प्रागुक्तव्यवस्था स्यात्। को ह्येधयतिसावयत्योर्विशेषः। यदेधतेर्ण्यधिकस्याग्रहणं सुनोतेस्तु ग्रहणमिति। यदपि ण्यन्तभादीनामुपसंख्यानमुपन्यस्तं तदपि नास्माकं प्रतिकूलम्, विशिष्टस्य शब्दान्तरत्वेन प्रकृत्यंशस्य तु णिचा व्यवधानेनोपसंख्यानस्यावश्यकत्वात्। अत एव न तत्रत्यन्यासादिभिः, स्वोक्त्या वा विरोधः। प्रत्युत तवैव विरोधः, यष्ठे भाष्यवार्तिकयोः "एत्येधत्योः-" इति योग विभज्य "एचि" इति विशेषितत्वात्। तस्मादिह वृत्तिग्रन्थो माधवग्रन्थश्चासङ्गत एवेत्यभिप्रेत्य व्याचष्टे-एजाद्योरिति ॥

('एत्येधत्यूठ्सु' सू. ७३ या प्रकृत सूत्रात 'आद्गुणः' या पूर्व सूत्रातून 'आत्' या पदाची व लगेच पूर्वी असलेल्या 'वृद्धिरेचि' या सूत्राची अनुवृत्ति होते. 'एचि' हे अनुवृत्त पद सप्तम्यन्त असून अल्वाचक-'ए, ओ, ऐ, औ' या अलाचे वाचक-असल्यामुळें, 'यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे'-परि. ३३-या परिभाषान्वयें त्या पदाचा 'एजादौ' असा अर्थ होतो. दीक्षितानी 'एचि=एजादौ' हे अनुवृत्त पद प्रकृत सूत्रातील 'एति' व 'एधति' या दोन्ही पदाचे विशेषण मानले आहे व त्यामुळें त्यानी 'अवर्णादेजाद्योरेत्येधत्योरूठि च परे वृद्धिरेकादेशः स्यात्' असा प्रकृत सूत्राचा कौमुदीत अर्थ दिला आहे. पण काशिकाकारानी 'एचि=एजादौ' हे अनुवृत्त पद 'एधति' याचे विशेषण न मानता 'एति' याच पदाचे विशेषण मानले आहे काशिकाकार म्हणतात 'वृद्धिरेचीति वर्तते, आदिति च। तदेतदेज्ग्रहणमेतेरेव विशेषण न पुनरेधतेरव्यभिचारादूठश्चासम्भवात्।' व प्रकाशकारानीं आणि प्रसादकारानीं देखील असेच

म्हटले आहे या मताचा दीक्षित पुढील मनोरमेच्या पङ्क्तींत अनुवाद करितात.) प्राचीन वैयाकरणाचे असे म्हणणे आहे कीं, प्रकृत सूत्रात 'एचि' हे पद अनुवृत्त होतें व ते अनुवृत्त पद प्रकृत सूत्रातील 'एति' या पदाचेच विशेषण होते व 'एधति' या पदाचे विशेषण होत नाही; कारण ('एध् वृद्धौ' या धातूची रूपें नेहमीं 'एच्'-नेंच सुरू होणारीं असतात व तीं रूपें इतर वर्णांनीं केव्हाहि सुरू होत नसतात व अशा रीतीनें त्या धातूच्या एजादि रूपात केव्हाहि) व्यभिचार–फरक–होत नाही (आणि म्हणून 'एचि' हें अनुवृत्त पद 'एधति' याचे विशेषण मानण्याची काहीच गरज नाही. पण 'इण् गतौ' या धातूची अनेक रूपें–'इव', इम, इथः, इथ, इतः' इत्यादि–एजादि नसल्यामुळें व त्या धातूचीं एजादि रूपें अवर्णापुढें आलीं असताच वृद्धिरूप एकादेश होणे सांगितले असल्यामुळें, 'एचि = एजादौ' हे अनुवृत्त पद 'एति' या प्रकृत सूत्रातील पदाचेच विशेषण मानणे योग्य आहे) 'एचि' हे अनुवृत्त पद 'ऊठ्' चे विशेषण होणे सभवतच नाही (कारण 'ऊठ्' हा ऊकारानें सुरू होणारा असून एजादि असणे केव्हाहि सभवत नसल्यामुळें, 'सम्भव-व्यभिचाराभ्या स्याद्विशेषणमर्थवत्' या न्यायान्वयें, 'एचि' हे 'ऊठ्' चे विशेषण मानता येत नाहीं) पण (प्रकृत सूत्रावरील सू ६ १ ८९ भाष्याच्या वृत्तीत) कैयटानें असे म्हटले आहे की, 'मा भवान् प्रेदिधत्' या प्रयोगात ('प्र' या उपसर्गपूर्वक 'एध्' धातूच्या 'प्र + इदिधत् = प्रेदिधत्' या लुङाच्या रूपात 'इदिधत्' हे रूप एकारानें सुरू होणारे नसून इकारानें सुरू होणारे असल्या-मुळे व अशा रीतीनें त्या धातूच्या रूपात एजादित्वाचा) व्यभिचार होत असल्यामुळें, 'एचि' हे अनुवृत्त पद प्रकृत सूत्रातील 'एधति' या पदाचे देखील विशेषण मानणे आवश्यक आहे. ('एचि' हे अनुवृत्त पद 'एधति' चे विशेषण मानले तरच 'प्र + इदिधत्' या स्थली 'एध्' धातूचे 'इदिधत्' हे लुङाचे रूप एजादि नसल्यामुळें,

प्रकृत सूत्राची प्रवृत्ति न होता व वृद्धिरूप एकादेश न होता, 'आद्गुण.' या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'प्रेदिधत्' असे इष्ट रूप सिद्ध होतें; तसें न मानल्यास, 'प्रैदिधत्' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल हे उघड आहे ) 'एधतेरपि विशेषणम् मा भवान् प्रेदिधदित्यत्र व्यभिचारात्' ही पंक्ति जरी कैयटाच्या बऱ्याच प्रतींत आढळत नाहीं तरी क्वचित् प्रतींत ती पंक्ति आढळतेच. (सध्या छापलेल्या प्रतींत कैयटाच्या वृत्तींत ही पंक्ति आढळत नाहीं. पण माधवाच्या धातुवृत्तिवरून व उद्योतावरून असें दिसून येतें की, माधवाजवळ व उद्योतकाराजवळ असलेल्या प्रतींत ही पंक्ति होती व म्हणूनच माधवानें त्या पक्तीचें खण्डन केलें आहे व 'अत एवैत्येधत्योरिति योग विभज्य तस्यैवेति विशेषणमुक्त भाष्ये, मा भवान् प्रेदिधदित्यादौ व्यभिचारसम्भवात् ।' असें उद्योतात म्हटलें आहे ) 'णौ चङि उपधाया ह्रस्वः' सू. २३१४ या सूत्रानें उपधा ह्रस्व केल्यावर 'एध्' धातु राहतच नाही, म्हणजे जें भिन्न रूप उपधा ह्रस्व केल्यावर होतें तें 'एध्' आहे असें मानता येत नाहीं, असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण उपधा ह्रस्व होऊन झालेल्या ('इध्' या) एकदेशविकृत रूपाला 'एध्' च आहे असें (स्थानिवद्भावानें) मानता येते. 'अजादेर्द्वितीयस्य' सू २१७६ या सूत्रानें णिजन्त इधि धातूतील 'धि' या द्वितीय एकाचाचें द्वित्व करून 'धि' या शब्दाचे जागी 'धिधि' असा आदेश केल्यावर, ज्याप्रमाणे 'वम्, नम्' या आदेशामध्यें प्रकृति कोणती व प्रत्यय कोणता हे सागता येत नाहीं तसेच 'इधिधि' यातील कोणता भाग मूळ धातु आहे व कोणता भाग प्रत्यय आहे हें सांगता येऊ शकत नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाही, कारण षष्ठाध्यायातील भाष्यात म्हणजे 'एकाचो द्वे प्रथमस्य' ६·१·१ या सूत्रावरील व्याख्यान,· 'द्विःप्रयोगो द्विर्वचन षाष्ठम्,' म्हणजे षष्ठाध्यायात

सांगितलेले द्विर्वचन धातूचा दोनदा प्रयोग किंवा उच्चार करणे होय. असा सिद्धान्त भाष्यकारांनी सांगितला आहे. तो सिद्धान्त न मानल्यास, 'इदिधत्' या उदाहरणातच 'णि' प्रत्ययाचा लोप होऊं शकणार नाही. ('मा भवान् प्रेदिधत्' या वाक्यात 'माङ्' या अव्ययाचा उपयोग केला असल्यामुळें 'माङि लुङ' सू. २२१९ या सूत्रान्वयें 'एध्' धातूच्या लुङाचा प्रयोग केला आहे व 'न माङ्योगे' सू. २२२८ हे निषेधक सूत्र असल्यामुळें 'प्रेदिधत्' या स्थलीं 'आट्' आगम झाला नाही हे लक्षात ठेवावे. णिजन्त 'एध्' धातूचे लुङाचे रूप करिताना, 'णिश्रिद्रुस्रुभ्य.' सू. २३१२ या सूत्रानें 'च्लि' चे जागी 'चङ' केल्यावर 'प्र+एध्+णि+चङ+त्' या स्थितीत 'णौ चङि' सू २३१४ या सूत्रानें 'एध्' धातूतील उपधेंत असणाऱ्या एकाराचा ऱ्हस्व केल्यावर, म्हणजे 'एच इग्घ्रस्वादेशे' सू २२३ या सूत्रान्वयें इकार केल्यावर, 'इधि' असे जें णिजन्त रूप होतें त्याला 'सनाद्यन्ता धातवः' सू. २३०४ या सूत्रानें धातुसंज्ञा होते व हा णिजन्त धातु अजादि अनेकाच् असल्यामुळें 'चङि' सू. २३१५ या सूत्रानें द्वित्व करतेवेळी 'अजादेर्द्वितीयस्य' सू २१७६ या सूत्रान्वयें 'धि' या द्वितीय एकाचाचे द्वित्व होतें व 'प्र+इधिधि' अशी स्थिति होते. अशा स्थितीत 'प्र' या अदन्त उपसर्गापुढें 'एध्' धातु नसून 'इधिधि' असे विकृत रूप आहे. म्हणून या स्थली प्रकृत सूत्राची प्राप्तीच होत नाही असें शंकाकाराचे म्हणणे आहे. या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, जरी 'एध्' यातील अर्ध्यापेक्षा अधिक भाग, ऱ्हस्व केल्यानें, विकृत झाला असल्यामुळें 'एकदेशविकृतमनन्यवत्' परि. ३७ हा न्याय येथें लागू पडत नाही तरी, ऱ्हस्व केल्यानें 'एध्' या धातूचे 'इध्' असे जें एकदेशविकृत रूप होते ते 'एध्' धातूच आहे असे स्थानिवद्भावानें मानता येते. पण ते रूप एजादि आहे असे मात्र मानता येत नाही, कारण 'एच्त्व' हा अल्मात्रवृत्ति धर्म असल्यामुळें, तसे मानणे हा अलाश्रयविधि

ठरतो आणि 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, 'इदिधत्' हे रूप एजादि आहे असें मानतां येत नाहीं, आणि म्हणूनच 'प्र+इदिधत्' या स्थलीं प्रकृत सूत्र किंवा 'एङि पररूपम्' सू. ७८ हें सूत्र प्रवृत्त न होता, 'आद्‌गुणः' सू. ६९ हे सूत्र प्रवृत्त होऊन 'प्रेदिधत्' हे इष्ट रूप सिद्ध होतें. यावर शंकाकार पुन्हा अशी शंका करतो की, 'अजादेर्द्वितीयस्य' या सूत्रानें 'इधि' यातील 'धि' या द्वितीय एकाचाचे द्वित्व करून 'इधिधि' असे रूप झालें असता, ज्याप्रमाणे 'युष्मद्+शस्' किंवा 'अस्मद्+शस्' याचे जागीं 'बहुवचनस्य वस्नसौ' सू. ४०५ या सूत्रानें 'वस्, नस्' असा अनुक्रमें आदेश झाल्यावर त्यात प्रकृति कोणती व प्रत्यय कोणता हे ओळखता येत नाही त्याचप्रमाणे 'इधिधि' या स्थलीं देखील 'धि' चे जागीं 'धिधि' असा आदेश द्विर्वचन केल्यानें झाल्यावर मूळ धातु कोणता व प्रत्यय कोणता हें ओळखता येत नाही व त्यामुळें या उदाहरणात प्रकृत सूत्र मुळीच लागू पडत नाही. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात की, षष्ठाध्यायात सांगितलेल्या द्विर्वचनाचा 'धातूचा दोनदा प्रयोग–उच्चार–करणे' असा भाष्यकारांनी सिद्धान्तरूप अर्थ केला असल्यामुळें, 'इधिधि' हें मूळ णिजन्त 'एध्' धातूचेच द्विरुच्चारण आहे असें मानले पाहिजे. 'एकाचो द्वे प्रथमस्य' सू. ६.१.१ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात– 'अथ यस्य द्विर्वचनमारभ्यते किं तस्य स्थाने भवत्याहोस्विद्वि प्रयोग इति ? । कश्चात्र विशेषः ? । स्थाने द्विर्वचने णिलोपवचनं समुदायादेशत्वात् । स्थाने द्विर्वचने णिलोपो वक्तव्यः,–आटिटत्, आशिशत् । किं कारणम् ? । समुदायादेशत्वात् । समुदायस्य समुदाय आदेशस्तत्र नम्रमुग्धत्वात्प्रकृतिप्रत्ययसमुदायस्य नष्टो णिर्भवतीति,–णेरनिटीति णिलोपो न प्राप्नोति ।' या भाष्यावरून हें स्पष्ट होते की, भाष्यकारानी त्या सूत्रातील 'एकाच' हे पद स्थानषष्ठी न मानता 'उच्चारणे' या पदाचा अध्याहार करून कर्मणिषष्ठी मानली आहे व त्या

सूत्राचा 'प्रथमस्य एकाचो द्वे उच्चारणे भवत.' असा अर्थ केला आहे आणि त्यामुळें 'अजादेर्द्वितीयस्य' या सूत्राचा देखील 'अजादेः अनेकाच धातोः द्वितीयस्य एकाच द्वे उच्चारणे भवतः' असाच अर्थ होतो. या अर्थान्वयें णिजन्त 'एध्' धातुचेच 'इधिधि' हे द्विरुच्चारण आहे असे मानले पाहिजे, व अशा रीतीनें 'प्र' या अदन्त उपसर्गापुढें णिजन्त 'एध्' धातु येत असल्यामुळे, 'एचि' हे अनुवृत्त पद 'एधति' याचे देखील विशेषण न मानल्यास, 'प्र + इदिधत्' या स्थळी प्रकृत सूत्र प्रवृत्त होण्याचो व वृद्धिरूप एकादेश होऊन 'प्रैदिधत्' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. पण 'एचि' हे अनुवृत्त पद 'एधति' याचे विशेषण मानल्यानेंच ती आपत्ति टाळता येते, कारण 'प्र' या अदन्त उपसर्गापुढें जरी णिजन्त 'एध्' धातूचे रूप आहे तरी ते रूप एकारानें सुरू होणारे नसून इकारानें सुरू होणारे असल्यामुळें, प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊ शकत नाही व वृद्धिरूप एकादेश न होता 'आद्गुणः' या सूत्राने गुणरूप एकादेश होऊन 'प्रेदिधत्' असे इष्ट रूप सिद्ध होते. दुसरे असे की, 'बहुवचनस्य वस्नसौ' हा जो दृष्टान्त शकाकाराने दिला आहे तो 'प्रेदिधत्' या उदाहरणात मूळीच लागू पडत नाही, कारण त्या सूत्रानें होणारा आदेश प्रकृतिप्रत्ययसमुदायाचे जागी होणे सांगितले असल्यामुळे 'वस्, नस्' या आदेशात कोणता भाग प्रकृति व कोणता भाग प्रत्यय आहे हे सांगता येणे शक्य नाही परंतु 'एध्+णि+चङ' या स्थळी चङ्परक 'णि' असल्यामुळें 'णौ चङि' या सूत्राने जो ऱ्हस्वादेश होतो तो केवळ धातूच्या उपधेंतील एकाराचे जागीच होत असल्यामुळें तसा ऱ्हस्वादेश केल्यावर 'इध्' असे जें एकदेशविकृत रूप होते तें, वर सांगितल्याप्रमाणे, स्थानिवद्भावाने 'एध्' धातूच आहे व त्यापुढें 'णि' व 'चङ्' प्रत्यय आहेत हे सहज ओळखता येते नंतर 'इधि' या एकदेशविकृत णिजन्त 'एध्' धातूच्या 'धि' या द्वितीय एकाचाचे द्विरुच्चारण करून 'इधिधि' असे रूप झाल्यावर

त्या रूपात 'इधिष्' हा धातूचा भाग असून त्यातील अन्त्य इकार हा 'णि=इ' प्रत्यय आहे हे सहज ओळखता येतें आणि त्यामुळेंच त्या णिप्रत्ययापुढें 'इट्' नसल्यामुळें त्या णिप्रत्ययाचा 'णेरनिटि' सू २३१३ या सूत्रानें लोप होऊन व 'अभ्यासे चर्च' सू २१८२ या सूत्रानें *अभ्यासातील धकाराचे जश्त्व–दकार–होऊन 'इदिधत्'* हे रूप सिद्ध झाले असता, गुणरूप एकादेश होऊन वर सांगितल्याप्रमाणे 'प्रेदिधत्' असे इष्ट रूप सिद्ध होतें. 'द्वि प्रयोगो द्विर्वचन षाष्ठम' हा जो भाष्यकारानी सिद्धान्त सांगितला आहे तो न मानता 'धि'चे जागी 'धिधि' असा आदेश झाला आहे असे मानल्यास, वर दिलेल्या *भाष्यात भाष्यकारानीं सांगितल्याप्रमाणे या आदेशात प्रकृति कोणती* व प्रत्यय कोणता हें जाणता येणे शक्य नसल्यामुळे णिलोप होणार नाहीं व अनिष्ट रूप सिद्ध होण्याची आपत्ति येईल असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे ) तसेच (द्वि प्रयोगो द्विर्वचन षाष्ठम्' हा सिद्धान्त न मानता स्थानेद्वित्वपक्ष मानल्यास) 'जिघांसति' इत्यादि स्थली 'सन्' प्रत्ययातील सकारानें युक्त अशा रूपाचे, म्हणजे सन्नन्ताचे, द्वित्व केल्यावर कुत्व न होण्याची आपत्ति येईल ('हन्+सन्+ति' या स्थली 'अज्झनगमां सनि' सू. २६१४ या सूत्रानें 'हन्' यातील अकाराचा दीर्घ–आकार–करून 'हान्स' असे जें सन्नन्त रूप होत त्याचे 'सन्यङो' सू २३९५ या सूत्रानें द्विर्वचन करून व 'हलादि शेष' सू २१७९, 'ऱ्हस्व' सू २१८०, 'कुहोश्चु' सू २२४५ व 'सन्यत' सू २३१७ ही सूत्रें प्रवृत्त करून *'जिहान्सति' अशी स्थिति होते येथें जर 'जिहान्स' हा* 'हन्' धातूचे जागी आदश झाला आहे असे मानल तर, 'अभ्यासाच्च' सू २४३० या सूत्रानें होणारे कुत्व 'हान्स' यातील हकाराला होणार नाही, म्हणजे हकाराचे जागीं घकार होणार नाही, व 'जिघांसति' असें इष्ट रूप सिद्ध हाणार नाही, कारण समुदायाचे ठिकाणी समुदायादेश झाला आहे असे मानले असता त्या आदेशात

अभ्यास कोणता व धातूचा भाग कोणता आहे हे ओळखता येणें शक्य नसल्यामुळें, अभ्यासापुढील धातूतील हकाराचे जें कुत्व होणें सांगितलें आहे ते करता येऊ शकणार नाही. परतु 'द्वि प्रयोगो द्विर्वचनं पाष्ठम्' हा न्याय मानला असता, 'जिह्मन्स' या द्विरुच्चारणानें व वर सांगितलेल्या प्रक्रियेप्रमाणें सिद्ध झालेल्या रूपात 'जि' हा अभ्यास असून त्या अभ्यासापुढे 'ह्मन्स' हा सन्नन्त धातु आहे असे सहज ज्ञान होऊ शकत असल्यामुळे, 'अभ्यासाच्च' या सूत्रानें धातूतील हकाराचे होणारे कुत्व होण्यात व 'नश्चापदान्तस्य' सू. १२३ या सूत्रानें नकाराचा अनुस्वार होऊन 'जिघांसति' असे इष्ट रूप सिद्ध होण्यात काही अडचण येत नाही. म्हणून वरील भाष्यकारीय सिद्धान्त मानणे आवश्यक आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे) 'एध्' धातूहून 'णिच्' करून 'चङ्' केला असता 'चङि' सू. २३१५ या सूत्रानें द्वित्वरूप अन्तरङ्गकार्य प्रथम केल्यावर ('णौ चङि' सू २३१४ या सूत्राने होणाऱ्या) ऱ्हस्वाची प्राप्तीच होत नाही असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे बरोबर नाही, कारण 'ओण्' धातु धातुपाठात 'ओणृ' असा ऋदित् पठित केला असल्यामुळें त्या ऋदित्करणानें हे ज्ञापित होते की, 'णौ चङि' या सूत्राने होणारे ऱ्हस्वकार्य प्रथम होते ('एध् + णि + चङ + त्' या स्थली 'णि + चङ्' या दोन निमित्तामुळें 'णौ चङि' सू. २३१४ या सूत्राने उपधाऱ्हस्वकार्य पावले आहे व त्या दोन निमित्तापैकी 'चङ्' या निमित्तामुळें 'चङि' सू २३१५ या सूत्राने द्विर्वचन पावले आहे. म्हणून अल्पापेक्ष द्विर्वचनकार्य अन्तरङ्ग ठरते व त्याच्या मानानें बहवपेक्ष उपधाऱ्हस्वकार्य बहिरङ्ग ठरते त्यामुळे अन्तरङ्ग द्विर्वचनकार्य प्रथम केल्यावर 'एधिधि + चङ् + त्' अशी स्थिति झाली असता, अशा स्थितीत 'एधिधि' यातील 'ए' उपधेत राहत नसल्यामुळे, 'णौ चङि' या सूत्रानें त्या एकाराचे ऱ्हस्व होऊ शकत नाही व त्यामुळें 'ऐदिधत्' असे रूप होऊच शकत नाही म्हणून

'एचि' हे अनुवृत्त पद 'एधति' याचे विशेषण मानण्याची काहीच आवश्यकता नाही, कारण 'एध्' धातूच्या रूपात नेहमी एकार आदि राहणेच असे शंकाकाराचे म्हणणे आहे या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, जरी 'णि' व 'चङ' या निमित्तसमुदायाला मानून 'णौ चङि' या सूत्रानें होणारें उपधाऱ्हस्वकार्य बहिरङ्ग आहे व त्या समुदायात अन्तर्गत असलेल्या 'चङ्' प्रत्यय या निमित्ताला मानून 'चङि' या सूत्रानें होणारें द्विर्वचनकार्य अन्तरङ्ग आहे तरी, 'ओणृ' हा धातु ऋदित् पठित केला असल्यामुळें त्या ऋदित्करणा-वरून हे ज्ञापित होते की, उपधाऱ्हस्वकार्य बहिरङ्ग असून देखील प्रथम होते व द्विर्वचनकार्य अन्तरङ्ग असून देखील नंतर होते 'ओणृ अपनयने' या धातूहून 'णिच्' व नंतर 'चङ' प्रत्यय केला असता 'आ + ओण् + णि + चङ् + त् = आ + ओणि + अ + त्' अशा स्थितीत 'चङ' प्रत्ययाला मानून 'चङि' या सूत्राने अन्तरङ्ग द्विर्वचनकार्य पावले आहे आणि 'णि' व 'चङ' या दोन्ही प्रत्ययाना मानून 'णौ चङि' या सूत्रानें बहिरङ्ग उपधाऱ्हस्वकार्य पावले आहे द्विर्वचनकार्य अन्तरङ्ग असल्यामुळें ते प्रथम केल्यास, 'आ+ओणिणि+अ+त्' अशी स्थिति होते अशा स्थितीत ओकार उपधेंत राहत नसल्यामुळें त्याला 'णौ चङि' या सूत्रानें होणारें उपधाऱ्हस्वकार्य पावतच नाही. मग 'नाग्लोपिशास्वृदिताम्' सू २५७२ या सूत्रानें ऋदित् धातूना उपधाऱ्हस्वकार्याचा जो निषेध केला आहे तो निषेध 'ओणृ' धातूला देखील लागू पडावा याकरिता त्या धातूचे जें ऋदित्करण केले आहे ते व्यर्थ ठरू पाहते म्हणून ते ऋदित्करण व्यर्थ न ठरावे याकरिता 'बहिरङ्गमप्युपधाऱ्हस्वकार्यम-न्तरङ्गद्विर्वचनकार्याद्बलवत्तरम्' असें मानणें आवश्यक आहे आणि तसे मानल्यानेंच तें ऋदित्करण चरितार्थ ठरते, म्हणजे ओणृ धातूला जें उपधाऱ्हस्वकार्य प्रथम प्राप्त होते ते त्याला न व्हावे याकरिता तो धातु मुद्दाम ऋदित् पठित केला आहे असे मानल्यानेंच त्याचे

ऋदित्करण सार्थक ठरते सारांश बहिरङ्ग उपधाह्रस्वकार्य अन्तरङ्ग द्विर्वचनकार्यापूर्वी होत असल्यामुळें, 'एध्+णि+चङ+त्' या स्थली उपधाह्रस्वकार्य प्रथम होऊन व नंतर द्वित्वकार्य होऊन 'मा भवान् प्रेदिधत्' असा इष्ट प्रयोग सिद्ध होतो. यावरून हे स्पष्ट होतें की, 'एध्' धातूची सर्वच रूपें एजादि राहतात हे म्हणणे बरोबर ठरत नाही. त्या धातूची काही रूपें एजादि राहत नसल्यामुळें, तशी रूपें अवर्णापुढें आल्यास वृद्धिरूप एकादेश होऊ नये याकरिता 'एचि' हे अनुवृत्त पद 'एधति' याचे देखील विशेषण मानणे आवश्यक आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे ) यावर माधवाचे असे म्हणणें आहे की, 'मा भवान् प्रेदिधत्' या (कैयटाने दिलेल्या) प्रयोगात 'प्रेदिधत्' या स्थली (प्रकृत सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होण्याचा) अतिप्रसङ्ग–आपत्ति–मुळीच येत नाही, कारण मूळ धातूहून णिच्प्रत्यय केला असता, तशा णिजन्त धातूचे रूपान्तर होत असल्यामुळे, म्हणजे मूळ धातूचे जें स्वरूप असते त्याहून भिन्न स्वरूप होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रातील 'एधति' या पदानें णिजन्त 'एध्' धातूचे ग्रहण होऊ शकत नाही. (म्हणून 'प्रेदिधत्' या स्थली मूळ 'एध' धातु नसून णिजन्त 'एध्' धातु असल्यामुळे, त्याला प्रकृत सूत्र लागू पडत नाही व त्यामुळे वृद्धिरूप एकादेश होण्याची आपत्ति येत नाही आणि 'आद्गुण' या सूत्राने गुणरूप एकादेश होऊन 'प्रेदिधत्' हे रूप सिद्ध होण्यात काही अडचण येत नाही म्हणून 'एध्' धातूचे णिजन्ताचे 'इदिधत्' हे रूप वगळण्याकरिता 'एचि' हे अनुवृत्त पद 'एधति' याचे विशेषण मानण्याची काही गरज नाही असा माधवाच्या म्हणण्याचा आशय आहे मूळ धातूनें त्याच्या ण्यन्त रूपाचे ग्रहण होत नाही) म्हणूनच, 'न भाभूपूकमिगमि' सू. २८४० या सूत्रावर 'ण्यन्ताना च भादीनामुपसङ्ख्यानम्' हे वार्तिक वार्तिककारानें पठित केले आहे व ण्यन्त धातूचे मूळ धातूहून शब्दान्तर–रूपान्तर–होत असल्यामुळे, 'न भाभूपूकमि'

या सूत्राने सांगितलेला निषेध त्या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या धातूच्या णिजन्त रूपाला लागू पडत नाही म्हणूनच, तसे वार्तिक पठित करावे लागले असे कैयट, न्यासकार, हरदत्त इत्यादि सर्व टीकाकारांनी म्हटले आहे ('न भाभूपूकमि' ८. ४. ३४ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारांनी 'ण्यन्तस्य चोपसङ्ख्यानम्' हे वार्तिक पठित करून, 'ण्यन्तस्य चोपसङ्ख्यानं कर्तव्यम् । किं पूज एव ? । नेत्याह । अविशेषेण । प्रभापनं परिभापनम् ।' असे म्हटले आहे व त्या भाष्यावरील वृत्तीत 'ण्यन्तस्य धात्वन्तरत्वान्निषेधो न प्राप्नोतीति वचनम् ।' असे कैयटाने म्हटले आहे आणि हरदत्तानेंदेखील पदमञ्जरीत 'ण्यन्तस्य धात्वन्तरत्वान्न प्राप्नोति इति वचनम्' असेच म्हटले आहे. जर मूळ धातूनें त्याच्या ण्यन्त रूपाचे ग्रहण होऊ शकले असते तर, वार्तिककाराने वरील वार्तिक मुळीच पठित केले नसते व कैयट हरदत्तादिकांनी 'ण्यन्तस्य धात्वन्तरत्वान्निषेधो न प्राप्नोतीति वचनम्' असे म्हटले नसते सारांश वरील वार्तिकावरून व कैयटादिकांच्या व्याख्यानावरून हे स्पष्ट होते की, ण्यन्त धातु मूळ धातूहून भिन्न असतो व त्यामुळे मूळ धातूनें त्याच्या ण्यन्त रूपाचे ग्रहण होऊ शकत नाही.) दुसरे असे की, मूळ धातूने त्या धातूच्या ण्यन्त रूपाचे देखील ग्रहण होऊ शकले असते तर, 'उपसर्गात्सुनोति' सू ८. ३. ६५ या सूत्रावरील भाष्यात 'अभिषावयति' हे उदाहरण देऊन, 'अभि' हा उपसर्ग ण्यन्त 'सु' धातूला लागलेला उपसर्ग असून मूळ 'सु' धातूला लागलेला उपसर्ग नसल्यामुळे या उदाहरणात कसे षत्व होते अशी शंका उपस्थित करून त्या शंकेवर उत्तर देताना भाष्यकारांनी 'अभि' हा उपसर्ग मूळ 'सु' धातूचा विशेष अर्थ सांगणारा असल्यामुळे षत्व होऊ शकते असे जें त्या शंकेचे समाधान करिताना म्हटले आहे ते असङ्गत-चूक-ठरण्याची आपत्ति येते. ('उपसर्गात्सुनोति' या सूत्रावरील भाष्यात 'सुनोत्यादीनां षत्वे ण्यन्तस्योपसङ्ख्यानमविकृतत्वात्' हे

वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात–'सुनोत्यादीनां षत्वे ण्यन्तस्योपसङ्ख्यानं कर्तव्यम् । अभिषावयति । किं कारणं न सिध्यति ? । अधिकत्वात् । व्यतिरिक्त सुनोत्यादिरिति कृत्वोपसर्गात्सुनोत्यादीनामिति षत्वं न प्राप्नोति ।' यानंतर 'नामधातोस्तु प्रतिषेध ' हे वार्तिक व त्याचे प्रत्याख्यान करणारे 'न वाऽनुपसर्गत्वात्' हे दुसरे वार्तिक पठित करून भाष्यकार म्हणतात–'इहापि तर्हि न प्राप्नोति–अभिषावयति । अत्रापि न सुनोतिं प्रति क्रियायोगः । किं तर्हि ? । सावयतिं प्रति । सुनोतिं प्रत्यत्र क्रियायोगः । कथम् ? । नासावेव प्रेष्यते–सुन्वभीति । किं तर्हि ? । उपसर्गविशिष्टामसौ क्रियां प्रेष्यते–अभिषुण्विति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की ण्यन्त धातु मूळ धातूहून भिन्न असल्यामुळें, 'उपसर्गात्सुनोति' या सूत्रानें त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या मूळ धातूच्या सकाराचे उपसर्गस्थनिमित्तक जें षत्व होणे सांगितले आहे तें त्या धातूच्या णिजन्त रूपांतील सकारास देखील व्हावे असे वचन पठित करणे आवश्यक आहे पण हे वचन नामधातूंना मात्र लावू नये, म्हणजे नामधातूंचे ठिकाणी या वचनाचा प्रतिषेध करावा पण तसे प्रतिषेधक वार्तिक पठित करण्याची काही गरज नाही, कारण 'अभिसावकीयति, परिसावकीयति' इत्यादि उदाहरणांत 'यत्क्रियायुक्तास्तं प्रति गत्युपसर्गसंज्ञे भवतः' या वचनान्वयें 'अभि' व 'परि' हे उपसर्ग 'सुनोति' या धातूस लागलेले उपसर्ग नसून 'सावकीयति' या नामधातूला लागलेले उपसर्ग आहेत आणि म्हणून वरील दोन उदाहरणांत षत्वाची प्राप्तीच होत नाही परंतु असे जर मानले तर, 'अभिषावयति' या उदाहरणांत देखील षत्व न होण्याची आपत्ति येते, कारण या स्थली देखील 'सुनोति' या मूळ धातूस 'अभि' हा उपसर्ग लागलेला नसून 'सावयति' या णिजन्त 'सु' धातूला तो उपसर्ग लागलेला आहे परंतु पुढें भाष्यकार असे म्हणतात की,

'अभि' हा उपसर्ग 'सु' या मूळ धातूचा विशेष अर्थ सांगणारा असल्यामुळें तो मूळ 'सु' धातूला लागलेलाच उपसर्ग आहे व त्यामुळें 'अभि+सु' अशा स्थितीतच 'उपसर्गात्सुनोति' सू. २२७० या सूत्रानें 'सु' यातील सकाराचें प्रथम षत्व झाल्यावर नंतर णिच्प्रत्यय झाला आहे असे मानल्यानें 'अभिषावयति' हें रूप सिद्ध होण्यात कांहीं अडचण येत नाहीं. सारांश ण्यन्त धातु मूळ धातूहून भिन्न असल्यामुळें, 'अभिषावयति' या स्थलीं षत्व होऊं शकत नाहीं अशी शंका उपस्थित करून त्या शंकेचें भाष्यकारांनीं मूळ धातूनें त्या धातूच्या ण्यन्त रूपाचें ग्रहण होतें अशा रीतीनें समाधान न करिता, वर सांगितल्याप्रमाणें जें समाधान केलें आहे तें, मूळ धातूनें ण्यन्त धातूचें देखील ग्रहण होतें असें मानल्यास, असङ्गत ठरण्याची आपत्ति येते असा माधवांच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'हेरचङि' सू २५३१ या सूत्रांत 'अचङि' हा निषेध सांगितला असल्यामुळें, 'प्रकृतिग्रहणे ण्यधिकस्यापि ग्रहणम्'—परि ९२—ही परिभाषा ज्ञापित होते असा कोणीहि मनांत भ्रम उत्पन्न होऊं देऊं नयें, कारण तें ज्ञापक केवळ कुत्वविषयक आहे आणि म्हणूनच त्या सूत्रावर 'हेरचङि प्रतिषेधानर्थक्यमङ्गान्यत्वात्' म्हणजे 'हि' धातूच्या णिजन्त रूपाचें अङ्ग त्या मूळ धातूच्या अङ्गाहून भिन्न असल्यामुळें, चङ्प्रत्यय पुढें आला असता, णिजन्त 'हि' धातूच्या हकाराचें कुत्व होऊं नये असा जो त्या सूत्रांत प्रतिषेध सांगितला आहे तो सांगण्याची कांहीं गरज नव्हती—असें वार्तिक पठित केलें आहे चङ्प्रत्यय पुढें नसल्यास ण्यन्त 'हि' धातूचें देखील कुत्व होऊं शकतें एवढ्याच पुरता 'अचङि' हा प्रतिषेध ज्ञापक ठरतो. (णिजन्त धातूचें लुङाचें रूप करितांना, 'च्लि लुङि' सू २२२१ या सूत्रानें होणाऱ्या 'च्लि' चे जागीं 'णिश्रिद्रुस्रुभ्यः कर्तरि चङ्' सू २३१२ या सूत्रान्वयें 'चङ्' आदेश होतो जर मूळ धातु त्याच्या णिजन्त रूपाहून भिन्न आहे व मूळ धातूनें त्याच्या णिजन्त रूपाचें

ग्रहण होत नाही असे मानले तर, 'हि' धातूच्या णिजन्ताहून चङ्-प्रत्यय केला असता, णिजन्त रूप मूळ धातूहून भिन्न असल्यामुळें, तशा णिजन्त रूपातील अभ्यासापुढें असलेल्या धातूच्या हकाराचे कुत्व प्राप्तच होत नाही व 'प्राप्तस्यैव निषेध ' असा न्याय असल्यामुळे, 'हेरचङि' या सूत्रातील 'अचङि' हा प्रतिषेध व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते परंतु ज्या अर्थी तो प्रतिषेध केला आहे त्याअर्थी त्या प्रतिषेधावरूनच हे स्पष्ट होते की, धातूला सांगितलेले कार्य त्या धातूच्या णिजन्त प्रकृतीला देखील होते, आणि अशा रीतीनें तो प्रतिषेध चरितार्थ होऊन 'प्रकृतिग्रहणे ण्यधिकस्यापि ग्रहणम्' या परिभाषेचा ज्ञापक ठरतो आणि त्या परिभाषान्वये प्रकृत सूत्रातील 'एधति' याने णिजन्त 'एध्' धातूचे देखील ग्रहण होत असल्यामुळे, तसा तो णिजन्त धातु एजादि नसून अवर्णापुढे आला असल्यास वृद्धिरूप एकादेश न व्हावा याकरिता 'एचि' हे अनुवृत्त पद 'एधति' च देखील विशेषण मानणे आवश्यक आहे असे शंकाकाराचे म्हणणे आहे या शंकेवर माधवाचे असे उत्तर आहे की, 'हेरचङि' ७ ३ ५६ या सूत्रावर वार्तिककारानें वर दिलेले जें वार्तिक पठित केले आहे व त्या वार्तिकात 'अङ्गान्यत्वात्' हा जो हेतु दिला आहे त्यावरून हे स्पष्ट होते की, मूळ धातूने त्याच्या णिजन्त रूपाचे ग्रहण होत नाही त्या सूत्रावर 'ज्ञापकं त्वन्यत्र ण्यधिकस्य कुत्वविज्ञानार्थम्' असे देखील वार्तिक पठित केले आहे व त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात–'एवं तर्हि ज्ञापयत्याचार्योऽन्यत्र ण्यधिकस्य कुत्वं भवतीति। किमेतस्य ज्ञापने प्रयोजनम् ?। प्रजिघाययिषतीत्यत्र कुत्वं सिद्धं भवति।' या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, 'हेरचङि' या सूत्रातील प्रतिषेध, कुत्वविधि करतेवेळी मूळ धातूने ण्यन्त धातूचे देखील ग्रहण होते, एवढ्याचाच ज्ञापक आहे सारांश ते ज्ञापक विशेषापेक्ष असून सामान्यापेक्ष ज्ञापक नसल्यामुळे, त्या ज्ञापकावरून 'प्रकृतिग्रहणे ण्यधिकस्यापि ग्रहणम्'

असा सामान्य नियम मुळीच मानता येत नाही आणि त्यामुळें मूळ 'एध्' धातूनें णिजन्त 'एध्' धातूचे देखील ग्रहण होतें असें जें कैयटाचे म्हणणे आहे तें अयोग्य ठरतें.) म्हणून कैयटाचे म्हणणे युक्तीला धरून नसल्यामुळें व तसेंच भाष्य, वार्तिक, काशिका, न्यास इत्यादि ग्रन्थांच्या आणि त्याचप्रमाणे कैयटानें स्वत: लिहिलेल्या पूर्व व पर पङ्क्तींशीं विरुद्ध असल्यामुळे, तें म्हणणें स्वीकारार्ह नाही. ('सनाद्यन्ता धातव.' सू. २३०८ या सूत्रानें णिजन्त धातूंना स्वतंत्र रीतीनें धातुसंज्ञा होणें सांगितलें असल्यामुळें व मूळ धातूचे रूप व त्याच्या णिजन्ताचे रूप या दोहोंमध्यें स्पष्ट फरक दृष्टिगोचर होत असल्यामुळें, णिजन्त धातु मूळ धातूहून भिन्न आहे हें युक्तीनेच सिद्ध होतें. भाष्यकाराचे व वार्तिककाराचे मत वर दिलेच आहे व त्यावरून देखील हेंच सिद्ध होतें की, मूळ धातूनें त्याच्या ण्यन्त रूपाचें ग्रहण होत नाही. कैयटानें स्वत: 'ण्यन्तस्य धात्वन्तरत्वाद्विधो न प्राप्नोतीति वचनम्' असेंच म्हटलें आहे आणि हरदत्तानें देखील पदमञ्जरीत तसेंच म्हटलें आहे. त्याचप्रमाणे 'हेरचङि' या सूत्रावरील वृत्तीत काशिकाकारानें देखील 'अचङीति शक्यमकर्तुम्, कथं चङ्यभ्यासनिमित्ते णौ हिनोतिरङ्ग भवति ? । तत्राभ्यासनिमित्ते प्रत्यये हेरङ्गम्येति विज्ञायमाने प्राप्तिरेव नास्ति । तर्हि तज्ज्ञापकार्थम् । एतज्ज्ञाप्यते । हेरचङीति चङोऽन्यत्र हेर्ण्यधिकस्यापि कुत्वं भवतीति । तेन प्रजिघाययिषति इति सिद्धं भवति ।' असें म्हटलें आहे. या वरील सर्व ग्रन्थावरून हें सिद्ध होतें की, मूळ धातूनें त्याच्या ण्यन्त रूपाचें ग्रहण होत नाही, व त्यामुळें 'प्र+इदिधत्' या स्थली 'प्र' या उपसर्गांतील अवर्णापुढें मूळ 'एध्' धातूचे रूप नसून ण्यन्त 'एध्' धातूचे रूप असल्यामुळे, प्रकृत सूत्राची प्रवृत्तीच होऊं शकत नाही व वृद्धिरूप एकादेश होण्याची मुळीच आपत्ति येत नाही आणि म्हणून कैयटाचें म्हणणें अयोग्य ठरतें असा माधवाच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे 'अत्र माधव·' पासून

'उपेक्ष्योऽयं कैयट इति' पर्यंत माधवाच्या धातुवृत्तीतील ग्रन्थाचा दीक्षितानी उपन्यास केला आहे व ते आता माधवानें केलेल्या शकेवर असे उत्तर देतात की) माधवानें जें वर म्हटले आहे त्यावर आमचे असे म्हणणे आहे की णिजन्त धातूचे रूप मूळ धातूच्या रूपाहून भिन्न असले तरी, 'एध्' धातूहून णिच्प्रत्यय केला असता त्या णिजन्त रूपात मूळ प्रकृति जो 'एध्' धातु आहे तो वसा नाहीसा होतो याबद्दल विचार करावा. 'उपैधत' इत्यादि स्थली जरी तिङन्त रूप मूळ 'एध्' धातूहून भिन्न आहे तरी त्या तिङन्त रूपातील 'एध्' ही प्रकृति नाहीशी होत नाही, म्हणजे त्या तिङन्त रूपात 'एध्' ही प्रकृति कायमच आहे. असे असल्यामुळेंच, 'उपसर्गात्सुनोति' या सूत्रावर. ('सुनोत्यादीना षत्वे ण्यन्तस्योपसङ्ख्यानमधिकत्वात्' असे जें वार्तिक प्रथम पठित केलें आहे त्या वार्तिकाचे प्रत्याख्यान करणारे) 'न वाऽवयवस्याऽनन्यत्वात्' असे वार्तिक पठित केले आहे (दीक्षिताचे असे म्हणणे आहे की, जरी णिजन्त धातु मूळ धातूहून स्वरूपानें भिन्न असतो तरी त्या णिजन्त धातूत मूळ धातु प्रकृतिरूपानें कायम राहतोच; कारण त्या मूळ धातूहूनच णिच् प्रत्यय होत असतो व तो धातु त्या णिच्प्रत्ययाची प्रकृति आहे व अशा रीतीनें णिच्प्रत्यय केल्यावर देखील मूळ धातुरूप प्रकृति त्या णिजन्त रूपात कायम राहतेच म्हणून 'प्रैदिधत्' या स्थली जरी 'एध्' धातूहून णिच्प्रत्यय झाला आहे तरी त्या णिजन्त रूपात मूळ 'एध्' धातु प्रकृतिरूपानें कायम आहेच. हे खरे की, 'णौ चङि' या सूत्रानें उपधाऱ्हस्वकार्य झाले असल्यामुळें 'एध्'चे 'इध्' असे रूपान्तर झाले आहे. परतु एकदेशविकृत 'इध्' हे रूप 'एध्'च आहे असे स्थानिवद्भावानें मानता येते हे पूर्वी सांगितलेच आहे. तरी पण ते रूप एकारानें सुरू होणारे नसल्यामुळें, 'प्र' या अदन्त उपसर्गापुढें तसे रूप आले असता वृद्धि रूप एकादेश न व्हावा याकरिता 'एचि' हे अनुवृत्त पद 'एधति'चे

देखील विशेषण मानणे आवश्यक आहे. दुसरे असे की, 'उपसर्गात्सुनोति' या सूत्रावर जें वार्तिक प्रथम पठित केले आहे व ज्याचा ण्यन्त रूपात केवळ मूळ धातु नसून णिचप्रत्यय अधिक असल्यामुळें मूळ धातूहून णिजन्त धातु भिन्न होतो आणि त्यामुळें 'उपसर्गात्सुनोति' या सूत्रात ज्या धातु पठित केल्या आहेत त्याच्या ण्यन्ताचे देखील, तशा ण्यन्त रूपातील सकाराचे षत्व होण्याकरिता, ग्रहण करावे, असा अर्थ आहे त्या वार्तिकाचे प्रत्याख्यान करिताना 'न वाऽवयवस्याऽनन्यत्वात्' असे दुसरे वार्तिक वार्तिककारानें पठित केले आहे या दुसऱ्या वार्तिकाचा असा अर्थ आहे की, पहिले वार्तिक पठित करण्याची काही गरज नाही; कारण ण्यन्ताचा अवयव जो मूळ धातु तो मूळ धातूहून भिन्न नाही, म्हणजे तो मूळ धातु ण्यन्तरूपात अवयवरूपानें कायम असतोच. म्हणून 'अभिषावयति' या ण्यन्त रूपात 'सु' हा मूळ धातु कायम असल्यामुळें, 'उपसर्गात्सुनोति' या सूत्रानें त्या मूळ धातूच्या सकाराचे षत्व होण्यांत कांही अडचण येत नाहीं या द्वितीय वार्तिकावरून हे स्पष्ट होते की, मूळ धातु त्याच्या ण्यन्तरूपात अवयवरूपानें कायम असतोच असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे )मूळ धातूनें त्याच्या णिजन्ताचे ग्रहण होते असे मानल्यास भाष्याशी विरोध येतो असा जो माधवानें 'अभिषावयति' या उदाहरणासंबधानें दोष दाखविला आहे तो अगदीच चूक आहे, कारण 'सु' धातूच्या 'अभिषावयति' या ण्यन्त रूपात मूळ धातु 'सु' ही प्रकृति नष्ट झालेली नसून अवयवरूपानें कायम आहेच. ('उपसर्गात्सुनोति' या सूत्रावरील भाष्यात दिलेल्या 'अभिषावयति' या उदाहरणात धातूच्या सकाराचे षत्व होण्यात कांही अडचण येत नाही हे सिद्ध करतेवेळी भाष्यकारांनी) जी व्यवस्था सांगितली आहे ती कैयटाचे मत मानल्यानेंच सिद्ध होऊं शकते. परंतु तुमचे-माधवाचे-मत बरोबर मानल्यास, ण्यन्त धातु मूळ धातूहून भिन्न ठरत असल्यामुळें, मूळ धातूनें ण्यन्त धातूचे

ग्रहण होऊ शकत नाही आणि त्यामुळें भाष्यकारानी सांगितलेली व्यवस्था चूक ठरण्याची आपत्ति येते. 'एधयति' व 'सावयति' या दोन स्थळी असा कोणता फरक आहे की, ज्यामुळें 'एध्' धातूनें त्याच्या ण्यन्त रूपाचे ग्रहण करता येत नाहीं व 'सु' धातूनें त्याच्या ण्यन्त रूपाचे ग्रहण करता येते ? (भाष्यकाराचे असे म्हणणे आहे की, धातूच्या णिजन्त रूपात मूळ धातु अवयवरूपानें कायम असतोच आणि म्हणूनच 'अभिषावयति' या स्थली 'सु' धातु प्रकृतिरूपानें कायम असल्यामुळें, 'अभि + सु' अशा स्थितीतच 'सु' धातूतील सकाराचे षत्व होऊन वरील षत्वयुक्त णिजन्त रूप होण्यात कांहीं अडचण येत नाहीं. या मताविरुद्ध माधवाचे असे मत आहे की, मूळ धातु त्याच्या णिजन्त रूपात नसतो म्हणून ते भाष्य कैयटमताच्या विरुद्ध नसून उलट माधवाच्याच मताविरुद्ध आहे, आणि ज्याअर्थी 'अभिषावयति' या ण्यन्त रूपात भाष्यकारानी मूळ धातु अवयवरूपानें कायम आहे असे मानले आहे त्याअर्थी 'एधयति' किंवा 'इदिधत्' या 'एध्' धातूच्या णिजन्त रूपात 'एध्' धातु अवयवरूपानें कायम आहे असेच मानले पाहिजे, कारण वर दिलेली दोन्ही रूपें सारखीच णिजन्त असल्यामुळें, त्या दोन रूपात कोणत्याहि प्रकारचा भेद करता येत नाही सारांश मूळ धातूच्या स्वरूपाहून त्या धातूच्या णिजन्ताचे स्वरूप भिन्न असते एवढ्याच कारणावरून मूळ धातूनें त्याच्या णिजन्त रूपाचे ग्रहण होऊ शकत नाहीं हें माधवाचे म्हणणे बरोबर मानता येत नाही, कारण वर मनोरमेंत सांगितल्याप्रमाणे 'उपैधत' हे रूप जरी 'एध्' धातूच्या स्वरूपाहून भिन्न दिसतें तरी त्यांत 'एध्' धातु प्रकृतिरूपानें कायम असल्यामुळें तें 'एध्' धातूचेच रूप आहे असे ज्याप्रमाणे आपण मानतो त्याचप्रमाणे 'इदिधत्' या णिजन्त रूपात देखील 'एध्' धातु प्रकृतिरूपानें कायम असल्यामुळें, 'एध्' धातूनें त्याच्या णिजन्ताचे ग्रहण करता येते असे मानता येते म्हणून

'प्र+इदिघत्' या स्थली प्रकृत सूत्रानें वृद्धिरूप एकादेश न व्हावा याकरिता 'एचि' हें अनुवृत्त पद 'एधति' चे देखील विशेषण मानणे आवश्यक आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.)
'न भाभूपूकमि' सू. २८४० या सूत्रावर 'ण्यन्तभादीनामुपसङ्ख्यानम्' असे जें वार्तिक पठित केले आहे तें आम्हाला प्रतिकूल नाही, म्हणजे आमच्या मताविरुद्ध जात नाहीं; कारण ण्यन्त धातु मूळ धातूहून स्वरूपानें भिन्न असल्यामुळें आणि त्या णिजन्त धातूच्या अवयवरूप मूळ धातूत व नकारयुक्त 'कृत्' प्रत्ययात णिचाचें व्यवधान होत असल्यामुळे, वरील वार्तिक पठित करणें भाग पडले. ('प्र+भा+णिच्+अनीयर्' या स्थली मूळ 'भा' धातु नकारयुक्त 'अनीयर्' प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी नसून दोहोंमध्यें णिच्प्रत्ययाचे व्यवधान असल्यामुळें, 'न भाभूपूकमि' हा णत्वाचा निषेध तशा व्यवधानयुक्त रूपास लागू पडला नसता. तो तशा रूपास देखील लागू पडावा व 'प्रभापणीयम्' असे 'कृत्यच' सू. २८३५ या सूत्रान्वयें रूप न होता 'प्रभापनीयम्' असे रूप व्हावे याकरिता वरील वार्तिक पठित केले आहे व अशा रीतीने, ते वार्तिक असल्यानें, आमचे मत चूक ठरत नाही.) या वरील विवेचनावरून हे स्पष्ट होतें की, कैयटाचे म्हणणें त्याच्या पूर्वपर पक्षीच्या किंवा न्यासकारादिकांच्या ग्रन्थाच्या विरुद्ध जात नाही. उलट माधवाचेंच मत त्या ग्रन्थाच्या विरुद्ध जाते; कारण भाष्यकारानी व वार्तिककारानें 'एत्येधत्यूठ्सु' ६. १. ८९ या षष्ठाध्यायात पठित असलेल्या सूत्राचा 'एत्येधत्योः' असा योगविभाग करून त्या सूत्रात अनुवृत्त असलेले 'एचि' हें पद 'एति' व 'एधति' या दोहोंचेहि विशेषण मानले आहे. म्हणून प्रकृत सूत्रासंबधानें काशिकावृत्तीत व माधवाच्या धातुवृत्तीत जें म्हटले आहे ते भाष्यविरुद्ध असल्यामुळें, प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'एजाद्यो. एत्येधत्योः' असे व्याख्यान केले आहे. ('एत्येधत्यूठ्सु' या सूत्रावरील

भाष्यात भाष्यकारानी 'योगविभागात्सिद्धम्' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना 'योगविभागः करिष्यते। वृद्धिरेचि। वृद्धिरेचि भवति। तत एत्येधत्योः। एत्येधत्योरचि वृद्धिर्भवति। तत ऊठि। ऊठि च वृद्धिर्भवतीति' असे म्हटले आहे या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, भाष्यकारानी 'एचि' हे पद 'एति' व 'एधति' या दोहोचेहि विशेषण मानले आहे पण काशिकाकाराने व माधवानें 'एचि' हे अनुवृत्त पद केवळ 'एति' याचे विशेषण मानले असून 'एधति' याचे विशेषण मानले नसल्यामुळें, त्याचे मत भाष्याच्या विरुद्ध जाते हे उघड आहे आणि हे सर्व लक्षात धरूनच, प्रकृत सूत्राचे कौमुदीत व्याख्यान करिताना 'एजाद्यो एत्येधत्यो' असे म्हटले आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे सारांश काशिकाकार व माधव याचे मत स्वीकारार्ह नसून कैयटाचेच मत स्वीकारार्ह आहे असे दीक्षिताचे म्हणणे आहे )

शब्दरत्न—असम्भवादिति। न च आ अवतीति और्जनस्य और्जनोरित्यादावचे ववाधूठपाद्‌गुणे परादिवत्त्वेनोठ्‌त्वात्सम्भवोऽस्ति। न च "वृद्धिरेचि" इति सिद्धिः, "ओमाङोश्च" इत्यनेन बाधाद्, अनेन तु सामर्थ्यात्तद् बाध्यत इति वाच्यम्, तस्यानभिधानादित्याशयात्। किं च "ओमाङोः-" इत्येतदबाधकल्पनापेक्षया सामर्थ्येन, लक्ष्यानुरोधेन च "एचि" इत्यस्यासम्बन्धकल्पनंवोचिता। ह्रस्वे कृते इति। वृद्धेः पूर्वमित्यादिः। वार्णपरिभाषयेति भावः। अनन्भवत्वादिति। न च "अचः परस्मिन्" इति स्थानिवत्त्वेनैजादित्वं सुलभम्, पूर्वपरविधित्वात्। पूर्वस्यैव विधौ हि सः। मध्येऽपवादन्यायेनाद्‌गुणं बाधित्वा इहैव स्यात्। उपेधत इत्यादौ तु पररूपमेव स्यादिति भावः। समोह इति। एधतेरादेशाभावेन न स्थानिवत्त्वेन तत्त्वम्। न स्यादिति। न च "णेरनिटि" इत्यस्य ण्यन्तस्याङ्गस्य लोप इत्यर्थः, स धात्वोग्यपरिभाषयाऽन्त्यस्य, एवं च प्रकृते न दोषः। "सर्वे सर्वपदादेशा" इति न्यायेनैधोरयस्यैधिधि-

इत्यादेशसत्त्वेन स्थानिनो ण्यन्ततया आदेशेऽपि स्थानिवद्भावेन ण्यन्तत्वस्य सुलभत्वादिति वाच्यम्, अलोऽन्त्यपरिभाषया, निर्दिश्यमानपरिभाषया च "णेरनिटि" इत्यस्य ण्यन्तस्याङ्गस्यान्त्यो यो निर्दिश्यमानो णिस्तस्य लोप इत्यर्थेन दोषात्। अन्ते णेरसत्त्वात्। सूत्र तु आद्यादित्यादौ चरितार्थमिति भावः। कुत्वं च न स्यादिति। हल्पयवयवहकाराभावात्। सम्बन्धिसार्वशिष्ट्याभावे तु स्थानिवत्त्वेन कुत्वं स्यादपीति भावः। अन्तरङ्गत्वादिति। चङ्परणिनिमित्तह्रस्वापेक्षया चङ्मात्रनिमित्तत्वेनाल्पपदार्थापेक्षत्वादित्यर्थः। भाष्ये तु नित्यत्वमात्रमेव द्वित्वस्योक्तम्,। ज्ञापितत्वादिति। इदं च "णौ चङि-" इति सूत्रे भाष्ये स्पष्टम्। असङ्गतं स्यादिति। सुनातिग्रहणेन सावयतेरपि ग्रहणेन शङ्काया एवाभावादिति भावः। अवयवानन्यत्वादिति। ण्यन्तावयवस्य सुनोते सुनोतिभिन्नत्वाभावादिति तदर्थः। सुनोतिरूपानपायादिति। सुनोतित्वानपायादित्यर्थः। असङ्गतैवेति। ण्यन्तेनाभेदयोगादिति शङ्का, प्रकृत्यर्थविशेषकत्वेन समाधानरूपा च व्यवस्थाऽसङ्गतैव स्यात्, त्वदुक्तरीत्या पर्याये परत्वाप्राप्तेरित्यर्थः। तदेवाह—को होति॥

(येथें शङ्काकार अशी शङ्का करतो की, 'ऊठ्' नेहमी ऊकारानें सुरू होणारा असल्यामुळें प्रकृत सूत्रात अनुवृत्त असलेलें 'एचि' हें पद 'ऊठ्'चें विशेषण होणें असम्भवनीय आहे असें जें दीक्षितांनी मनोरमेंत म्हटलें आहे तें त्यांचें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं, कारण) 'आ अवनीति औ, जनस्य औ जनौ' इत्यादि स्थळीं 'अव्' धातूपासून क्विप्प्रत्यय केला असतां, 'अव्'चे जागी 'ऊठ्' झाल्यावर 'आ + ऊ' याचा 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें सन्धि होऊन 'ओ' असा जो गुणरूप एकादेश होतो तो परादिवद्भावानें 'ऊठ्'च आहे असें मानल्यानें 'ऊठ्' हें सुद्धा एजादि मिळण्याचा सम्भव आहे. ('जन + औ' याचा 'जनौ' असा सन्धि) 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रान्वयें होऊं शकत नाहीं, कारण 'ओमाङोश्च'

सू ८० हे सूत्र त्या सूत्राचे बाधक आहे परतु 'एत्येधत्यूठ्सु' सू. ७३ हें सूत्र मुद्दाम आरंभिले असल्यामुळें, त्या सूत्राच्या आरंभ-सामर्थ्यानें 'ओमाङोश्च' हे (पररूपविधायक) सूत्र बाधित होते (व प्रकृत सूत्रान्वये 'जन + ओ' या स्थली वृद्धिरूप एकादेश होऊन 'जनौ' असे रूप सिद्ध होते म्हणून 'नाप्यूठ, असम्भवात्' असें जें मनोरमेंत म्हटले आहे ते बरोबर मानता येत नाही असे शंकाकाराचे म्हणणे आहे या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,) 'जनौ' इत्यादि तऱ्हेचे प्रयोग भाषेंत मुळीच आढळत नाहीत हा आशय मनात धरून दीक्षितानीं 'नाप्यूठ', असम्भवात्' असे मनोरमेंत म्हटले आहे ('आ + अव् + क्विप्' या स्थली 'ज्वरत्वर' सू २६५४ या सूत्रानें पूर्ण 'अव्'चे जागी 'ऊठ् = ऊ' होऊन 'आ + ऊ असी स्थिति होते 'एचि' हे अनुवृत्त पद 'ऊठ्'चे विशेषण मानले तर, या स्थली 'ऊठ्' एजादि नसल्यामुळे 'एत्येधत्यूठ्सु' सू ७३ ह प्रकृत सूत्र प्रवृत्त न होता 'आद्गुण' सू ६९ ह सूत्र प्रवृत्त होऊन 'आ + ऊ' याचा 'ओ' असा सन्धि होतो या 'ओ'चा 'जन' या पूर्व अकारान्त शब्दाशीं सन्धि करतेवेळी 'वृद्धिरेचि' सू ७२ हें सूत्र प्रवृत्त होऊ शकत नाही, कारण 'जन' या अकारान्त शब्दापुढें जो 'ओ' हा शब्द आहे तो 'आङ् + ऊठ्' या दोहाचा सन्धि होऊन बनलेला शब्द आहे आणि अशा रीतीनें 'जन' यातील अन्त्य अकारापुढें 'ओ' याचा पूर्वावयव 'आङ्' असल्यामुळें व 'वृद्धिरेचि' या सूत्राचे 'ओमाङोश्च सू ८० हें बाधक सूत्र असल्यामुळें, त्या बाधक सूत्राची प्राप्ति होते त्या सूत्रानें सन्धि केल्यास, 'जनौ' असा सन्धि न होता, 'जनो असा सन्धि होईल. परतु जरी 'ओमाङोश्च' हे सूत्र 'वृद्धिरेचि' याचे बाधक आहे तरी, 'एत्येधत्यूठ्सु' हें सूत्र मुद्दाम आरंभिले असल्यामुळें त्या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें 'ओमाङोश्च' हें परसूत्र असून देखील त्याचे बाधक ठरू शकत नाहीं त्यामुळें 'जन + ओ' या स्थलीं

'ओ' हा 'अन्तादिवच्च सू. ७५ या सूत्रान्वयें परादिवद्भावानें 'ऊठ्'च आहे असे मानता येत असल्यामुळें व अशा रीतीनें तो 'ऊठ्' एजादि–ओकारानें सुरु होणारा–ठरत असल्यामुळें 'एत्येधत्यूठ्सु' या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होऊन 'जनौ' असे रूप सिद्ध होतें. म्हणून या वरील उदाहरणात 'जन' या अकारान्त शब्दापुढें एजादि 'ऊठ्' आला असल्यामुळें, 'नाप्यूठ, असम्भवात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे तें बरोबर मानता येत नाही असे शङ्काकाराचें म्हणणे आहे. या शङ्केवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'जनौ' हा केवळ काल्पनिक प्रयोग असून असा प्रयोग भाष्यांत कोठेंहि आढळत नसल्यामुळें, 'ऊठ्' एजादि सम्भवतो याचे 'जनौ.' हें काल्पनिक उदाहरण योग्य उदाहरण मानता येत नाहीं आता कदाचित् कोणी असे म्हणेल की, 'जनौ' हा प्रयोग भाष्यांत कोठेंहि आढळत नाही असे भाष्यकारांनी कोठेंहि म्हटलें नसल्यामुळें व अशा रीतीनें 'अनभिधानात्' असे जें म्हटले आहे त्याला भाष्यसंमति नसल्यामुळें, तसा प्रयोग भाष्यांत आढळत नाहीं हें म्हणणे बरोबर मानता येत नाहीं. आणि ही अरुचि मनांत धरूनच, 'एचि' हें अनुवृत्त पद 'ऊठ्'चें विशेषण मानता येत नाही याचें शब्दरत्नकार दुसरें कारण देतात.) दुसरें असे की, 'एत्येधत्यूठ्सु' या सूत्रात अनुवृत्त असलेले 'एचि' हें पद 'ऊठ्'चें विशेषण मानून हें सूत्र आरम्भसामर्थ्यानें 'ओमाङोश्च' या सूत्राचें बाधक ठरतें अशी कल्पना करण्यापेक्षा, इष्ट रूपाची सिद्धि होण्याकरितां 'एचि' हें अनुवृत्त पद 'ऊठ्'चें विशेषण न मानणें हेंच अधिक योग्य ठरतें ('पुरस्तादपवादा अनन्तरान्विधीन् बाधन्ते नोत्तरान्'– म्हणजे पूर्वी पठित केलेले अपवादक सूत्र त्याच्या नंतर प्रथम सांगितलेल्या उत्सर्गाचें बाधक होतें, पुढें सांगितलेल्या उत्सर्गाचें बाधक होत नाहीं– परि ६०– या न्यायान्वयें 'एत्येधत्यूठ्सु' हें अपवादक सूत्र 'एङि पररूपम्' सू. ७८ या सूत्राचेंच बाधक ठरतें, 'ओमाङोश्च' सू. ८०

या नतर पठित असलेल्या सूत्राचे बाधक ठरत नाही. 'जनौ' हे रूप सिद्ध होण्याकरिता 'एचि' हे अनुवृत्त पद 'ऊठ्'चे विशेषण मानून व अशा रीतीनें 'एत्येधत्यूठ्सु' हे सूत्र एजादि 'ऊठ्'चे ठिकाणी चरितार्थ व्हावे म्हणून, 'येन नाप्राप्ते'– परि ५८ –या न्यायान्वयें ने सूत्र 'ओमाङोश्च' या सूत्राचे बाधक ठरते असे मानले तर, जरी ओमाङोश्च' हें बाधित सूत्र प्रवृत्त न होता 'ऊठ्' एजादि असल्यामुळें प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊन व वृद्धिरूप एकादेश होऊन 'जनौ' या काल्पनिक रूपाची सिद्धि होईल तरी, भाषेंत प्रचलित असलेल्या 'विश्वौह, प्रष्ठौह' इत्यादि अनेक इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकणार नाही 'विश्वौह = विश्व + वह् + ण्वि + शस' या स्थली 'वह्' धातूहून 'वहश्च' सू ३४१० या सूत्रानें ण्विप्रत्यय केल्यावर ता प्रत्यय णित् असल्यामुळें 'अत उपधाया' सू २२८२ या सूत्रानें 'वह्' यातील अकाराची 'आ' अशी वृद्धि होऊन व 'वाह ऊठ्' सू ३२९ या सूत्रानें 'वाह्' यातील वकाराचे जागी मप्रसारणरू 'ऊठ् = ऊ' होऊन व 'सम्प्रसारणाच्च' सू ३३० या सूत्रानें 'ऊ + आ' या दोहोंचे जागी 'ऊ' असा पूर्वरूप एकादेश होऊन व 'वेरपृक्तस्य' सू ३७५ या सूत्रानें 'ण्वि = व्' या अपृक्त प्रत्ययाचा लाप होऊन 'विश्व + ऊह् + अस्' अशी स्थिति झाली असता, 'विश्व' या अदन्त शब्दापुढें असलेल्या 'ऊह्' यातील ऊठ्रूप ऊकार एजादि नसल्यामुळें प्रकृत सूत्रान्वयें वृद्धिरूप एकादेश न केल्यास व 'आद्गुण' सू ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश केल्यास, 'विश्वौह' असे भाष्यात दिलेले इष्ट रूप सिद्ध न होता 'विश्वोह' असे अनिष्ट रूप सिद्ध होण्याची आपत्ति येते व त्याचप्रमाणे 'प्रष्ठौह' असे भाष्यात दिलेले इष्ट रूप सिद्ध न होता वर सांगितलेल्या प्रक्रियेप्रमाणे 'प्रष्ठोह' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते म्हणून 'जनौ.' हे एक काल्पनिक रूप सिद्ध होण्याकरिता 'एचि' हें अनुवृत्त पद 'ऊठ्'चे विशेषण मानणें व अशा

रीतीनें ते सूत्र 'ओमाङोश्च' या सूत्राचे बाधक मानणे योग्य नाही. 'एचि' हे अनुवृत्त पद 'ऊठ्'चे विशेषण न मानल्यानेंच 'विश्वौह.' इत्यादि उदाहरणात प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊन व वृद्धिरूप एकादेश होऊन भाषेत प्रचलित असलेल्या अनेक इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकते म्हणून 'एचि' हें अनुवृत्त पद 'ऊठ्'चे विशेषण न मानणेच योग्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.)
मनोरमेंतील 'णौ चङि इति ऱ्हस्वे कृते' या पदापूर्वी 'वृद्धे पूर्वम्' ही पदें अध्याहृत आहेत, म्हणजे 'वृद्धेः पूर्वं णौ चङि इति ऱ्हस्वे कृते' अशी ती पंक्ति वाचावी, व 'वार्णादाङ्गं बलीयः'– परि. ५५ –ही परिभाषा असल्यामुळें, 'णौ चङि' सू २३१४ या सूत्रानें होणारे उपधाऱ्हस्वकार्य प्रकृत सूत्रानें होणाऱ्या वृद्धिरूप एकादेशकार्या-पूर्वी होते असा त्या पंक्तीचा भावार्थ आहे ('प्र + एध् + णि + चङ् + त्' या स्थळी वृद्धिरूप एकादेशाचे निमित्त एजादि 'एध्' यातील 'ए' पूर्वोपस्थित असल्यामुळें, 'पूर्वोपस्थितनिमित्तकमन्तरङ्गं परोपस्थितनिमित्तकं बहिरङ्गम्' या न्यायान्वयें जरी प्रकृत सूत्रानें होणारे वृद्धिरूप एकादेशकार्य प्रथम प्राप्त होते व 'णि' आणि 'चङ्' या पलीकडे असणाऱ्या निमित्तानें होणारे उपधाऱ्हस्वकार्य नंतर प्राप्त होते तरी, वृद्धिरूप एकादेशकार्य वार्णकार्य असून उपधाऱ्हस्वकार्य हें अङ्गाधिकारात सांगितलेले आङ्गकार्य असल्यामुळे 'वार्णादाङ्गं बलीय' या परिभाषान्वयें वार्ण वृद्धिरूप एकादेशकार्य प्रथम न होता उपधाऱ्हस्वरूप आङ्गकार्य प्रथम होते. ते कार्य प्रथम केल्यावर 'एध्'चे 'इध्' असे जें एकदेशविकृत रूप होते ते 'स्थानिवदादेशः' सू ४९ सूत्रान्वयें 'एध' आहे असे जरी मानता येतें तरी ते रूप एजादि आहे असे मानता येत नाही, कारण तसे मानणे, म्हणजे उपधाऱ्हस्वकार्य होऊन 'ए' या अल्चे जागी झालेला 'इ' हा आदेश 'ए'च आहे असे स्थानिवद्भावानें मानणे, हे त्या सूत्रात 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, त्या प्रतिषेधाविरुद्ध

ठरते त्यामुळें 'प्र + इदिधत्' या स्थली 'इदिधत्' हे 'एध्' धातूचे एजादि रूप आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत नसल्यामुळें, प्रकृत सूत्र प्रवृत्त न होतां 'आद्गुणः' हे सूत्र प्रवृत्त होऊन 'प्रेदिधत्' असे रूप सिद्ध होते हे पूर्वी मनोरमेंत सांगितलेंच आहे यावर शंकाकार अशी शंका करतो की, 'स्थानिवदादेश·' या सूत्रात 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळे जरी त्या सूत्रान्वये 'इदिधत' हे रूप एजादि आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत नाही तरी, 'प्र + इदिधत्' या स्थली स्थानिभूत 'ए' या अचापूर्वी असलेला 'प्र' या उपसर्गांतील अन्त्य अकार व त्याच्या लगेच पुढें असलेला 'इ' याचे जागी वृद्धिरूप एकादेशकार्य करणे असल्यामुळें, 'अच. परस्मिन्' सू ५० या अल्विध्यर्थक सूत्रान्वये 'ए'चे जागी झालेला 'इ' हा अल्स्थानिक आदेश 'ए'च आहे असे स्थानिवद्भावानें मानता येते व अशा रीतीनें अवर्णापुढें एजादि 'एध्' आहे असे मानता येत असल्यामुळे, प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊन व वृद्धिरूप एकादेश होऊन 'प्रैदिधत्' असेच रूप सिद्ध होऊ शकते व 'प्रेदिधत्' असे रूप मुळीच सिद्ध होऊ शकत नाही. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,) 'अच परस्मिन् पूर्वविधौ' या सूत्रानें 'इध्' हा एजादि 'एध्'च आहे असे मानता येत नाही; कारण या स्थली पूर्ववर्ण व परवर्ण या दोहोनाहि मिळून कार्य करणें आहे व जेथें केवळ पूर्ववर्णाला कार्य करणे आहे तशाच ठिकाणी ते सूत्र लागू पडते. ('प्र + एध् + णि + चङ् + त्' या स्थलीं 'णौ चङि' सू. २३१४ या सूत्रानें 'एध्' यांतील 'ए' या उपधेचा ऱ्हस्व होऊन 'प्र + इध् + णि + चङ + त्' अशी स्थिति झाली असता, 'इध्' हा एजादि 'एध्'च आहे असे, 'अच परस्मिन्' या सूत्रानें इकारादेशाचे ठिकाणी तो 'ए'च आहे अशी स्थानिवद्बुद्धि केल्यानें, मानता येते व त्यामुळें 'एत्येधत्यूठ्सु' या सूत्रानें प्राप्त होणारे वृद्धिरूप एकादेशकार्य टाळता येत नाही,

व ते कार्य केल्याने 'प्रैदिषत्' असेच रूप सिद्ध होऊ शकते व 'मा भवान् प्रेदिधत्' हा कैयटप्रयोग अशुद्ध ठरतो असे जें शब्दकाराचे म्हणणें आहे तें बरोबर नाही, कारण 'परनिमित्तोऽजादेशः स्थानिवत्स्यात् स्थानिभूतादच. पूर्वत्वेन दृष्टस्य विधौ कर्तव्ये' असा 'अचः परस्मिन् पूर्वविधौ' या सूत्राचा अर्थ आहे प्रकृत उदाहरणात परनिमित्तक इकारादेशाचा जो 'एध्' यातील 'ए' हा स्थानी आहे त्याच्या पूर्वी 'प्र' या उपसर्गातील अन्त्य अकार आहे व वृद्धिरूप एकादेशकार्य या पूर्व अकारासच करणे नसून, ते कार्य तो पूर्व अकार व पर आदेशरूप इकार या दोघाना मिळून करणे आहे असे पूर्व व पर वर्णाना मिळून कार्य करतेवेळी 'अच परस्मिन्' या सूत्रानें अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करता येत नाही. जेथें केवळ पूर्व वर्णाला कार्य करणे आहे तशाच ठिकाणी त्या सूत्रानें अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करिता येतो असे असल्यामुळें, प्रकृत स्थली 'अ' व 'इ' या दोन पूर्व व पर वर्णांचे ठिकाणी वृद्धिरूप एकादेश करतेवेळी 'इध्' यातील 'इ' हा 'ए'च आहे अशी स्थानिवद्भावाने वृद्धि करता येत नाही, व त्यामुळें 'एत्येधत्यूठ्सु' हे सूत्र येथें लागू न पडता, 'आद्गुण' हेच सूत्र लागू पडते व त्या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'प्रेदिधत्' असेच रूप सिद्ध होऊ शकत आणि वरील कैयट प्रयोग व्याकरण-रीत्या साधु ठरतो असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे शब्दरत्नकाराच्या म्हणण्यास 'अच परस्मिन्' १ १ ५७ या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे त्या भाष्यात भाष्यकारानी 'किं पुनरनन्तरस्य विधि प्रति स्थानिवद्भाव आहोस्वित्पूर्वमात्रस्य'— म्हणजे स्थानिभूत अचाच्या लगेच पूर्वी असलेल्याच वर्णाला कार्य करिताना स्थानिवद्भाव होतो किंवा त्या स्थानिभूत अचाच्या व्यवहितपूर्व वर्णाला देखील कार्य करतेवेळी स्थानिवद्भाव होतो— असा प्रश्न केला आहे व्यवहितपूर्व वर्णास कार्य करताना स्थानि-

वद्भाव मानल्यास, 'गुरुसंज्ञा च' असे वार्तिक पठित करून भाष्यकार म्हणतात:–'गुरुसंज्ञा च न सिध्यति। श्लेष्म ३ घ्न, पित्त ३ घ्न, द ३ ध्यश्व, म ३ ध्वश्व। हलोऽनन्तराः संयोग. इति संयोगसंज्ञा, संयोगे गुरु इति गुरुसंज्ञा, गुरोरिति प्लुतो न प्राप्नोति।' या भाष्याचा अर्थ नीट कळण्याकरिता 'श्लेष्मघ्न' व 'पित्तघ्न'- या भाष्यातील उदाहरणाची प्रक्रिया सांगणे आवश्यक आहे या दोन्ही उदाहरणात 'अमनुष्य कर्तृके च' सू २९७० या सूत्राने 'हन् धातूहून 'टक् = अ' प्रत्यय झाला आहे व हा प्रत्यय कित् असल्यामुळें, 'गमहनजनखनघसा लोप' सू २३६३ या सूत्रानें 'हन्' धातूंतील उपधा अकाराचा लोप होऊन व हकाराच्या पुढें नकार आला असल्यामुळें 'हो हन्ते' सू ३५८ या सूत्रानें हकाराचा घकार होऊन, 'श्लेष्मघ्न, पित्तघ्न' अशी रूपें सिद्ध झाली आहेत. या दोन उदाहरणातील 'घ्न्' याला 'हलोऽनन्तरा संयोग.' सू ३० या सूत्रानें संयोगसंज्ञा करतेवेळी 'हन्' यातील उपधाभूत अकाराचा जो लोप झाला आहे त्या लोपाचे ठिकाणी तो 'अ'च आहे अशी स्थानिवद्बुद्धि केल्यास, 'घ्' व 'न्' या दोन व्यंजनात 'अ' चे व्यवधान आहे असे मानावे लागेल व तसे मानल्यास, 'घ्न्' याला संयोगसंज्ञा होऊ शकणार नाही व ती संयोगसंज्ञा न झाल्यास, 'घ्न्' याच्या पूर्वी असलेल्या अकाराला 'संयोगे गुरु' सू ३२ या सूत्रानें प्राप्त होणारी गुरुसंज्ञा होऊ शकणार नाही व त्यामुळें तो अकार 'गुरोरनृत' सू ९७ या सूत्रान्वयें प्लुत होऊ शकणार नाही तसेच 'दध्यश्व, मध्वश्व' या पुढील दोन उदाहरणात 'इको यणचि सू ४७ या सूत्रानें जो यणादेश झाला आहे तो स्थानिवद्भावाने अनुक्रमें 'इ' व 'उ' आहे असे मानल्यास, ध्य् व ध्व् हे अनुक्रमें 'धि' व 'धु' आहेत असे मानणे भाग पडेल. त्यामुळें त्याना संयोग-संज्ञा होऊ शकणार नाही व त्यामुळें त्याच्या लगेंच मागें असणारा अकार गुरुसंज्ञक ठरणार नाही व 'गुरोरनृत' या सूत्रानें तो प्लुत

होऊं शकणार नाहीं असा वरील भाष्याचा भावार्थ आहे. हा दोष दाखवून पुढें भाष्यकार म्हणतात –'न वैष दोषः । किं कारणम् ? । संयोगस्यापूर्वविधित्वात् । न पूर्वविधिः संयोगः । किं तर्हि ? । पूर्वपरविधिः संयोगः ।' या भाष्यांचा अर्थ असा आहे की, वरील चार उदाहरणात जो वर दोष दाखविला आहे तो दोष येत नाही; कारण संयोगसंज्ञा ही पूर्वीच्या वर्णाला होणारे कार्य नसून, पूर्व व पर या दोघाना मिळून होणारी संज्ञा आहे आणि त्यामुळें येथें अजादेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भाव होऊ शकत नाही व त्यामुळें वर दाखविलेल्या सर्व आपत्ति आपोआप टळतात. या भाष्यावरून हें स्पष्ट होते की, जेथें स्थानिभूत अचाच्या पूर्वी असलेल्या वर्णालाच कार्य करणे आहे तेथेंच 'अचः परस्मिन्' या सूत्रानें अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करता येतो, पण जेथें पूर्व व पर वर्णांना मिळून कार्य करणे आहे तेथें त्या सूत्रानें अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करता येत नाही याच भाष्याचा आधार घेऊन शब्दरत्नकारानी 'पूर्वस्यैव विधौ हि सः' असे शब्दरत्नात म्हटले आहे सारांश 'प्र + इदिधत्' या स्थली 'अ' व 'इ' या पूर्व व पर वर्णांना वृद्धिरूप एकादेशकार्य करणे असल्यामुळें, 'इदिधत्' यातील आद्य इकार 'ए'च आहे असे 'अच परस्मिन्" या सूत्रानें स्थानिवद्भाव करून मानता येत नाही आणि प्रकृत सूत्रात 'एचि= एजादौ' हे अनुवृत्त असलेले पद 'एधति' याचे विशेषण मानले असल्यामुळें व 'इदिधत्' हे 'एध्' धातूचे एजादि रूप नसून इकारादि रूप असल्यामुळें, येथें प्रकृत सूत्रान्वयें वृद्धिरूप एकादेश न होता 'आद्गुणः' या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'प्रेदिधत्' असे रूप होते. प्रकृत सूत्रात अनुवृत्त असलेले 'एचि' हें पद 'एधति'चे विशेषण न मानल्यास, मध्यें पठित असलेले अपवादक सूत्र त्याच्या पूर्वी पठित असलेल्या सूत्राचे बाधक होते व नंतर पठित असलेल्या उत्तरसूत्राचे बाधक होत नाहीं या अर्थाच्या) 'मध्येऽपवादाः पूर्वान् विधीन् बाधन्ते नोत्तरान्–' परि. ६१–

या परिभाषान्वयें 'एत्येधति' हें प्रकृत सूत्र 'आद्गुण' या पूर्व सूत्राचें बाधक ठरेल (व 'एङि पररूपम्' सू ७८ या उत्तरसूत्राचे बाधक होऊं शकणार नाही, व त्यामुळें) 'प्र + इदिधत्' या स्थली गुणरूप एकादेश न होता वृद्धिरूप एकादेश होईल व 'उप + एधते = उपैधते' इत्यादि स्थली वृद्धिरूप एकादेश होणार नाही आणि परत्वामुळें ('एङि पररूपम्' सू ७८ या पर सूत्रानें) पररूप एकादेशच होईल (व 'उपधते' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल) 'प्रकृतिप्रत्ययविभागसम्मोह' असे जें मनोरमेंत शकाकारानें म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, 'एधि' चे जागी 'इदिधि' हा आदेश झाला नाही (व केवळ 'धि' चे जागी 'धिधि' हा आदेश झाला आहे) आणि म्हणून 'इदिधि' हा 'एधि' च आहे असे स्थानिवद्भावानें मानता येऊ शकत नाही (या शंकेचे विवरण मनोरमेंत केलेच आहे व तिचें खण्डनहि तेथें केलेच आहे) 'अन्यथा इहैव णिलोपो न स्यात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यावर शकाकार अशी शंका करतो की 'णेरनिटि' सू २३१३ (हें सूत्र अङ्गाधिकारांत पठित असल्यामुळें व या सूत्रांत 'अङ्गस्य' हें पद अनुवृत्त होत असल्यामुळें) या सूत्राचा ण्यन्त अङ्गाचा लोप होतो असा अर्थ होतो व 'अलोऽन्त्यस्य' सू ४२ या परिभाषान्वयें ण्यन्त अङ्गाच्या अन्त्य वर्णाचा लोप होतो असा सूत्रार्थ निष्पन्न होतो व त्यामुळें 'इदिधि' या स्थली अन्त्य इकाराचा लोप होण्यांत काही अडचण येत नाहीं (आतां जर कोणी असें म्हणेल की 'इधि' हें ण्यन्त असून 'इदिधि' हें ण्यन्त अङ्ग नाही तर त्यावर शकाकार असे उत्तर देतो की,) 'सर्वे सर्वपदादेशा' या न्यायान्वयें, 'इधि' चे जागी झालेला 'इदिधि' हा आदेश, 'इधि' च आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत असल्यामुळें व त्यांनी 'इधि' ण्यन्त असल्यामुळें, 'इदिधि' हा आदेश देखील ण्यन्त आहे असे स्थानिवद्भावानें सहज मानता येऊं शकते (व त्यामुळें त्या आदेशांतील अन्त्य वर्णाचा, म्हणजेच 'णि = इ' चा,

अलोऽन्त्यपरिभाषान्वयें लोप होण्यात काही अडचण येत नाही. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, शंकाकाराचें) हे म्हणणें बरोबर नाही, कारण 'अलोऽन्त्यस्य' सू ४२ व 'निर्दिश्यमानस्या-देशा भवन्ति'—परि. १२—या दोन परिभाषा असल्यामुळें (व त्या दोन परिभाषामध्यें बाध्यबाधकभाव नसल्यामुळें त्याची एकवाक्यता केल्यानें) 'णेरनिटि' या सूत्राचा असा अर्थ होतो की, ण्यन्त अङ्गातील अन्त्य वर्ण जो त्या सूत्रात निर्दिष्ट असलेला 'णि = इ' आहे त्याचा लोप होतो व असा त्या सूत्राचा अर्थ होत असल्यामुळें, मनोरमेंत जो दोष दिला आहे तो दोष येतो; कारण अङ्गाच्या अन्तीं 'णि' नाही. (शंकाकार असें म्हणतो कीं, 'इधि' हें अजादि अनेकाच् अङ्ग असल्यामुळें 'अजादेर्द्वितीयस्य' सू. २१७६ या सूत्रानें 'धि' या ज्या द्वितीय एकाचाचें द्विर्वचन होतें तो एकाच् अर्थरहित असल्या-मुळें, जरी 'धि' चे जागीं 'धिधि' असा श्रौत आदेश होतो तरी, 'सर्वे सर्वपदादेशाः' या न्यायान्वयें 'इधि' या अर्थवानाचे जागीं 'इधिधि' असा आनुमानिक आदेश झाला आहे असे मानता येतें व ज्या स्थानीच्या जागीं, म्हणजे 'इधि' चे जागीं, तो आनुमानिक आदेश झाला आहे तो स्थानी णिजन्त–णिप्रत्ययान्त–असल्यामुळें, 'इधिधि' हा आदेश देखील णिप्रत्ययान्त आहे असे स्थानिवद्भावानें मानता येते आणि त्यामुळें 'णेरनिटि' सू २३१३ या सूत्रानें त्या ण्यन्त आदेशरूप अङ्गातील अन्त्य 'णि' चा 'णेरनिटि' या सूत्राचा वर जसा त्यानें अर्थ केला आहे, ह्या अर्थामध्यें लोप होऊ शकतो व 'प्र इदिधत्' असें रूप सिद्ध होऊ शकतें. म्हणून 'अन्यथा इहैव णिलोपो न स्यात्' हा मनोरमेंत दाखविलेला दोष प्रकृत स्थलीं येत नाही. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'णेरनिटि' या सूत्रात लोपाचा स्थानी 'णि' हा साक्षात् निर्दिष्ट असल्यामुळें व तो 'णि' 'इधि' या स्थानीच्या अन्तीं असून 'इधिधि' या आदेशाच्या अन्तीं नसल्यामुळें, 'ण्यन्तस्य अङ्गस्यअन्त्यणेर्लोपः स्यात्', म्हणजे ण्यन्त अङ्गातील अन्त्य 'णि' चा लोप होतो, हे सांगणाऱ्या

'णेरनिटि' या सूत्रानें 'इधिधि' यातील अन्त्य इकाराचा लोप होऊ शकत नाही, कारण आदेशपक्षात भाष्यकारानी सांगितल्या-प्रमाणे प्रकृतिप्रत्ययविभागसमोह होत असल्यामुळें, 'इदिधि' यातील अन्त्य इकार 'णि' आहे असे मानता येत नाही व त्यामुळें ते अङ्ग ण्यन्त नाहीं व त्यातील अन्त्य इकार 'णि' नाहीं असेच मानले पाहिजे. सारांश 'इधिधि' या अङ्गात जो अन्त्य इकार आहे तो, वर सांगितल्याप्रमाणे, 'णि' नाही, व त्या अङ्गात जो 'णि' आहे तो त्या अङ्गाचा अन्त्य वर्ण नाही व त्यामुळें आदेशपक्षात णिलोप न होण्याची व 'इदिधत्' हें इष्ट रूप सिद्ध न होण्याची आपत्ति येते. परंतु आदेशपक्ष न मानता, 'द्वि प्रयोगो द्विर्वचन पाष्ठम्' या भाष्यसिद्धान्तान्वयें द्विरुच्चारणपक्ष मानल्यास, या पक्षात 'धि' या ण्यन्त एकाचाचे द्विरुच्चारण केले आहे असे मानावे लागत असल्यामुळें, जसा प्रथम 'धि' ण्यन्त आहे तसाच द्विरुच्चारणानें उत्पन्न झालेला द्वितीय 'धि' देखील ण्यन्त आहे असे मानतां येते आणि अशा रीतीनें या द्विरुच्चारणपक्षात प्रकृतिप्रत्ययविभागसमोह मुळींच उत्पन्न होत नसल्याकारणानें 'इधिधि' हे अङ्ग ण्यन्त ठरत असल्यामुळें, त्यातील अन्त्य 'णि = इ' चा 'णेरनिटि' या सूत्रानें लोप होण्यात व 'इदिधत्' हे इष्ट रूप सिद्ध होण्यात काहीं अडचण येत नाहीं म्हणून आदेशपक्ष न मानता द्विरुच्चारणपक्षच मानणे योग्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.)
'आद्यात्' इत्यादि स्थली 'णेरनिटि' हे सूत्र (आदेशपक्षात) चरितार्थ ठरते. (शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा असा आशय आहे कीं, आदेशपक्ष मानला असता प्रकृतिप्रत्ययविभागसमोह होत असल्यामुळें म्हणजे 'एकाचो द्वे प्रथमस्य' सू. ६. १. १. या सूत्रा-वरील भाष्यात सांगितल्याप्रमाणे प्रकृति कोणती व प्रत्यय कोणता हें ओळखता येणे अशक्य असल्यामुळें, ज्या उदाहरणात समुदायरूप स्थानीचे जागीं समुदायरूप आदेश होत नाही अशा उदाहरणात आदेश-पक्षात 'णेरनिटि' हें सूत्र चरितार्थ ठरते, म्हणजे तशा स्थली 'णि'

ओळखण्यात व णिलोप करण्यात कोणतीहि अडचण येत नसल्यामुळें तेथें 'णेरनिटि' या सूत्रानें णिलोप करता येतो. 'अद् णि यासुट् त्' या स्थलीं 'अत उपधायाः' सू. २२८२ या सूत्रानें 'अद्' यातील उपधा अकाराचा आकार होऊन व 'लिङ्‌स लोपोऽनन्त्यस्य' सू. २२११ या सूत्रानें 'यासुट् = यास्' या आगमातील अन्त्य सकाराचा लोप होऊन 'आद् णि या त्' अशी स्थिति झाली असता, या स्थलीं द्वित्वाची प्राप्ति होत नसल्याकारणानें प्रकृतिप्रत्यय-विभागसमोह मुळींच उत्पन्न होत नसल्यामुळें व 'णि' सहज *ओळखता येत असल्यामुळें व त्या णिपुढें अनिट् 'या' असल्यामुळें,* 'णेरनिटि' या सूत्रानें त्या 'णि' चा लोप होऊन, तें सूत्र 'आद्यात्' इत्यादि स्थलीं आदेशपक्ष मानला तरी, चरितार्थ होतें व तें सूत्र त्या पक्षात देखील व्यर्थ ठरण्याची आपत्ति येत नाहीं ) 'कुत्व च न स्यात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचें कारण हें की, '('द्वि प्रयोगो द्विर्वचनं पाष्ठम्' हें वचन न मानता 'हान्स' चे जागी 'जिहान्स' हा आदेश झाला आहे असें मानल्यास, 'जिहान्स' यातील 'हान्स' हा 'हन्' धातु नव्हे असे मानावे लागेल व तसें मानल्यास, 'जि' या अभ्यासापुढें असलेला) हकार 'हन्' धातूचा अवयव आहे असे मानता येणार नाहीं (व त्यामुळें 'अभ्यासाच्च' सू. २४३० या सूत्रानें त्या हकाराचें कुत्व होऊ शकणार नाहीं.) 'सन् = स' या प्रत्ययातील सकारास वगळून जर 'हान्' एवढ्याचेच द्वित्व झाले असतें तर कदाचित् 'हान्' हा स्थानिवद्भावानें 'हन्' धातूच आहे असे मानून कुत्व करता आलें असतें. ('हन्' धातूहून 'सन् = स' प्रत्यय केला असता 'हन्+सन्+ति' या स्थितीत 'अज्झनगमा सनि' सू. २६१४ या सूत्रानें 'हन्' धातूतील अकार दीर्घ होऊन 'हान्स' असें सन्प्रत्ययविशिष्ट शब्दस्वरूप होतें हें पूर्वी मनोरमेंत सांगितलेंच आहे. 'हान्स' यात 'हान्स्' हा सर्वांत मोठा प्रथम एकाच् असल्यामुळें, 'एकाचो द्वे प्रथमस्य' सू. २१७५ या सूत्रानें त्याचें द्विर्वचन केल्यावर 'जिहान्स्' असें रूप होतें व त्याची

प्रक्रिया पूर्वी मनोरमेंत सांगितलीच आहे. 'जिहान्स्' हा 'हान्स्' चे जागी आदेश झाला आहे असे मानल्यास, 'जिहान्स्' या आदेशातील 'हान्स्' हा मूळ धातु किंवा सनन्त धातु नसून, 'हन् = हान्' हा मूळ धातु व 'सनाद्यन्ता धातवः' सू २३०४ या सूत्रान्वयें 'हन् + सन् = हान्स' हा सन्नन्त धातु असल्यामुळें, धातुसंज्ञक नसलेल्या 'हान्स्' या रूपात 'हन्' धातूचा हकार आहे असे मानता येत नाहीं व त्यामुळें 'अभ्यासात्परस्य हन्तेर्हस्य कुत्वं स्यात्' या अर्थाच्या वाचक 'अभ्यासाच्च' सू. २४३० या सूत्रानें 'जिहान्स्' यातील हकाराचे कुत्व-घकार-होऊं शकत नाहीं. तथापि 'निजो चत्वार एकाच' या भाष्यवचनान्वयें 'हान्स' यातील 'हान्स्' हा प्रथम एकाच् न मानता 'हान्' एवढाच भाग प्रथम एकाच् मानल्यास, 'हान्' हे 'हन्' धातूचे उपधादीर्घकार्य होऊन झालेले एकदेशविकृत रूप असल्यामुळें ते स्थानिवद्भावानें 'हन'च आहे व त्यांत 'हन्' धातूचा हकार आहे असे मानता येते व त्याचे द्विर्वचन केले असता त्यातील हकाराचे कुत्व होणे कदाचित् संभवनीय आहे परतु वास्तविक 'सन्यङो' सू. २३९५ या सूत्रानें सन्नन्त धातूचे द्विर्वचन होणे सांगितले असल्यामुळें, 'हान्स' या सन्नन्त शब्दस्वरूपात जो सर्वांत मोठा एकाच् आहे त्याचेच, म्हणजे 'हान्स्' याचेच, द्विर्वचन करणे प्राप्त होते. 'एकाचो द्वे प्रथमस्य' सू ६.१.१ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात 'नेनिजतीत्यत्र निज्शब्दोऽप्येकाच्, इज्शब्दोऽप्येकाच्, इकारोऽप्येकाच, निशब्दोपि। तत्र निज्शब्दस्य द्विर्वचने रूपं सिद्धं दोषाश्च न सन्ति। इज्शब्दस्य द्विर्वचने रूपं न सिध्यति दोषा अपि न सन्ति। इकारस्य द्विर्वचने रूपं न सिद्ध्यति दोषाश्च सन्ति। निशब्दस्य द्विर्वचने रूपं सिद्धं दोषाश्च भवन्ति।' 'निज्' या सर्वांत मोठ्या असलेल्या एकाचात अन्तर्भूत असलेल्या 'नि, इ, इज्' या तीन लहान एकाचाचे द्विर्वचन केल्यास कोणकोणते दोष येतात हें सांगून भाष्यकार 'सिद्धं तु तत्समुदायैकाच्वाच्छास्त्राऽहाने' हें

वार्तिक पठित करतात व म्हणतात की, 'तत्समुदायैकाचो द्विर्वचन भविष्यति । कुत एतत् ? । शास्त्राऽहाने । एवं हि शास्त्रमहीनं भवति ।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें की, सर्वांत मोठ्या एकाचाचेच द्विर्वचन करणे योग्य आहे व तसें केल्यानेंच 'एकाचो द्वे प्रथमस्य' हें द्विर्वचनविधायक शास्त्र चरितार्थ होतें म्हणून 'हान्' याचे द्विर्वचन न करिता 'हान्स्' याचेच द्विर्वचन केले पाहिजे व त्याचे द्विर्वचन केलें असता जें रूप होते ते 'हान्म्'चे जागी आदेशरूपानें झाले आहे असे मानल्यास, वर सांगितल्याप्रमाणे, त्यात 'हन्' धातूचा हकार आहे असे मानता येत नसल्यामुळें, त्या हकाराचे कुत्व होऊ शकत नाही परंतु 'द्वि प्रयोगो द्विर्वचन पाष्ठम्' हें वचन मानल्यानेंच त्या हकाराचे कुत्व होऊ शकते हें मनोरमेंत पूर्वी सांगितलेच आहे.) 'अन्तरङ्गत्वात् प्रथमं चङि इति द्वित्वे कृते' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हें आहे की, उपधा ह्रस्वकार्य 'णि' व त्याचे पुढें असणारा 'चङ्' या दोन प्रत्ययाच्या समुदायाच्या निमित्तामुळें होणारे बह्वपेक्ष कार्य असल्यामुळें, त्याच्या मानानें, त्या समुदायात अन्तर्भूत असलेल्या केवळ 'चङ्' प्रत्ययाच्या निमित्तानें 'चङि' सू २३१५ या सूत्रानें होणारे अल्पापेक्ष द्वित्वकार्य अन्तरङ्ग ठरते. परंतु भाष्यकारानी द्वित्वकार्य नित्य आहे एवढेंच म्हटलें आहे ('णौ चङि' सू ७ ४.१ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात-- 'इदमिह सम्प्रधार्यं--द्विर्वचन क्रियतां ह्रस्वत्वमिति, किमत्र कर्तव्यम् ? । परत्वाद्ध्रस्वत्वम् । नित्यं द्विर्वचनम् । कृतेऽपि ह्रस्वत्वे प्राप्नोत्यकृतेऽपि ।' या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, भाष्यकारानीं उपधाह्रस्वकार्य बहिरङ्ग असून द्विर्वचनकार्य अन्तरङ्ग आहे असे न म्हणता ह्रस्वकार्य जरी परसूत्रानें होणारे कार्य आहे तरी ते अनित्य आहे व द्विर्वचनकार्य जरी पूर्व सूत्रानें होणारे कार्य आहे तरी तें कृताकृतप्रसङ्गि असल्यामुळें नित्य असे म्हटले आहे, व 'परान्नित्य बल्वत्' या न्याय असल्यामुळें द्विर्वचनकार्याची प्रथम प्राप्ति होते सारांश द्विर्वचनकार्य नित्य मानल्यानेंच त्याची प्रथम प्राप्ति सिद्ध

होत असल्यामुळें, ते कार्य अन्तरङ्ग आहे हे सिद्ध करण्याची खटपट व्यर्थ आहे व अन्तरङ्गत्वापर्यंत धाव घेण्याची काही गरज नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'ओणेॠदित्करणेन .. ज्ञापितत्वात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे ते 'णौ चङि' सू. ७-४-१ या सूत्रावरील भाष्यावरून स्पष्ट होते (त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात- 'एवं तर्ह्याचार्यप्रवृत्तिर्ज्ञापयति- द्विर्वचनाद्‍ह्रस्वत्वं बलीय इति यदयमोणिमृदितं करोति । कथं कृत्वा ज्ञापकम् ? । ॠदित्करणे एतत्प्रयोजनम्- ॠदितां नेति प्रतिषेधो यथा स्यात् । यदि चाऽत्र पूर्वं द्विर्वचनं स्याद् दित्करणमनर्थकं स्यात्, द्विर्वचने कृते परेण रूपेण व्यवहितत्वाद् ह्रस्वत्वं न भविष्यति । पश्यति त्वाचार्यो- द्विर्वचना-द्‍ह्रस्वत्वं बलीय इति तत ओणिमृदितं करोति । तस्मान्मा भवानटिटदित्येव भवितव्यम्' याचे विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे ) 'भाष्यकाराद्युक्तमसङ्गतं स्यात्' असे जें माधवानें म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, जर 'सुनोति'नें 'सावयति'चे, म्हणजे मूळ 'सु धातूनें णिजन्त 'सु' धातूचे, देखील ग्रहण होऊ शकले असते तर, भाष्यकारानी केलेली शका उपस्थितच होऊ शकली नसती (याच विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे. 'सिद्धं तु अवयवानन्यत्वात्' या वार्तिकातील) 'अवयवानन्यत्वात्' याचा अर्थ असा आहे की, 'सु' धातूहून णिच्प्रत्यय केला असता देखील त्या णिजन्त रूपात 'सु' धातु प्रथमावयवरूपानें कायम राहतोच, म्हणजे णिच्प्रत्ययाची 'सु' ही जो प्रकृति आहे ती णिच्प्रत्यय केल्यावर देखील नष्ट न होता जशीची तशीच णिजन्त रूपात प्रथमावयवरूपानें कायम राहतेच 'प्रकृतेः सुनोतिरूपानपायात्' या मनोरमेच्या पङ्क्तीतील 'सुनोतिरूपानपायात्' या पदाचा 'सुनोतित्वानपायात्' असा अर्थ आहे. म्हणजे त्या पदात 'रूप' हा शब्द 'भाव' या अर्थाचा वाचक आहे (व त्या पङ्क्तीचा असा अर्थ आहे की, 'सु' धातूहून णिच्प्रत्यय केला असता, वर सांगितल्याप्रमाणे, णिच्प्रत्ययाची प्रकृति जो मूळ 'सु' धातु आहे तो नष्ट न होता

जसाचा तसाच प्रकृतिरूपानें–प्रथमावयवरूपानें–कायम राहतोच ) 'असङ्गनैव प्रागुक्तव्यवस्था स्यात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, 'अभि' हा उपसर्ग णिजन्त 'सु' धातूला लागला असल्यामुळें (व 'उपसर्गात्सुनोति' या सूत्रात मूळ 'सु' धातूचे ग्रहण केले असून ण्यन्त 'सु' धातूचे ग्रहण केले नसल्यामुळें, 'सु' धातूच्या 'अभिषावयति' या णिजन्त रूपात) षत्वाची प्राप्ति होत नाही अशी शंका उपस्थित केली आहे व 'अभि' हा उपसर्ग मूळ 'सु' धातूचा, म्हणजे णिच्प्रत्ययाची प्रकृति जो 'सु' धातु त्याचा, विशेष अर्थ सागणारा असल्यामुळें तो मूळ 'सु' धातूला लागलेलाच उपसर्ग आहे असे मानता येते अशा रीतीनें त्या शंकेचे समाधान करून भाष्यकारानी जी व्यवस्था लावली आहे ती चूक ठरण्याची आपत्ति येते परंतु तुमच्या मते–माधवाच्या मतें–(धातूचे णिजन्त रूप मूळ धातूच्या रूपाहून भिन्न मानले असल्यामुळें 'अभिषावयति' या 'सु' धातूच्या णिजन्त रूपात) षत्वाची प्राप्ति होऊ शकत नाही. ('उपसर्गात्सुनोति' या सूत्रात 'सुनोति' हा अण्यन्त धातु निर्दिष्ट असल्यामुळें, ण्यन्त धातु मूळ धातूहून भिन्न आहे व मूळ धातूनें त्याच्या णिजन्ताचे ग्रहण करता येत नाही असे जें माधवाचे म्हणणे आहे ते बरोबर मानल्यास, त्या सूत्रानें 'अभिषावयति' या 'सु' धातूच्या णिजन्त रूपातील सकाराचे षत्व होऊ शकत नाही. परंतु भाष्यकारानी तर 'अभिषावयति' या स्थली णिच्प्रत्ययाची प्रकृति जो मूळ 'सु' धातु तो अवयवरूपानें कायम आहे असे सागून षत्वाची सिद्धि केली आहे म्हणून माधवाचे मत भाष्यविरुद्ध असल्यामुळें स्वीकारार्ह नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे) व असे असल्यामुळेंच दीक्षितानी मनोरमेंतील पुढील पक्तींत 'को त्वेषयतिसावयत्योर्विशेष.' असे म्हटले आहे (व या पक्तीचे विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे.)

**मनोरमा**––अक्षौहिणीति। ऊहोऽस्त्यस्या ऊहिनी अक्षाणामूहिनीतो विग्रहः। परिमाणविशेषविशिष्टा सेना अक्षौहिणी।

"पूर्वपदात्संज्ञायाम" इति णत्वम् । यत्तु प्राचा विगृहीतमक्षाणामूहः समूहः सोऽस्त्यस्या इति । तदपि ऊहिनीशब्देन षष्ठीतत्पुरुष इत्येवंपरतयैव कथंचिन्नेयम् । ऊहशब्देन समासे तत इनौ तु वृद्धिर्न स्यात्, अन्तरङ्गेण गुणेन बाधात । अपवादभूताया अपि वृद्धेरूहिनीशब्देन विग्रहे चरितार्थत्वात् । तथा चोक्त प्राक्–"इण्–ङि–शीनामाद्गुणः सवर्णदीर्घत्वात्" इति ॥

('एत्येधत्यूठ्सु' सू ७३ या सूत्रावरील कौमुदीत 'अक्षादूहिन्यामुपसङ्ख्यानम्' असे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे 'अक्षौहिणी' हें जें उदाहरण दिले आहे त्याचा) 'ऊह अस्ति अस्या ऊहिनी अक्षाणामूहिनी अक्षौहिणी' असा विग्रह आहे त्या शब्दाचा 'विशिष्टसंख्यायुक्त सेना' म्हणजे २१८७०० असा अर्थ आहे. (शब्दकल्पद्रुमात 'अक्षौहिणी' या शब्दाची व्याख्या अशी दिली आहे—'अक्षौहिण्यामित्यधिकैः सप्तत्यन्ताष्टभिः शतैः । संयुक्तानि सहस्राणि गजानामेकविंशति । एवमेव रथानां तु सख्यानं कीर्तितं बुधैः । पञ्चषष्टिसहस्राणि षट्शतानि दशैव तु । संख्यातास्तुरगास्तज्ज्ञैर्विना रथ्यैस्तुरङ्गमैः । नृणां शतसहस्रं तु सहस्राणि नवैव तु । शतानि त्रीणि चान्यानि पञ्चाशच्च पदातयः । म्हणजे २१८७० हस्तिनः, २१८७० रथाः, ६५६१० घोटकाः, १०९३५० पदातयः = २१८७०० ही अक्षौहिणी सेना होय) 'अक्षौहिणी' या स्थली 'पूर्वपदात्संज्ञायामगः' सू ८५७ या सूत्रानें णत्व झालें आहे. प्रसादकरानी 'अक्षाणामूहः समूहः सोऽस्त्यस्या (मत्वर्थीय इनि । ऋन्नेभ्यो ङीप् इति ङीप्') अशा रीतीनें 'अक्षौहिणी' शब्दाचा जरी विग्रह केला आहे तरी 'अक्ष' शब्दाचा 'ऊहिनी' शब्दाशीं षष्ठीतत्पुरुषसमास केला आहे असे मानूनच त्यानीं केलेल्या विग्रहाचें कसें तरी समर्थन केलें पाहिजे प्रथम 'अक्ष' शब्दाचा 'ऊह' शब्दाशी षष्ठीतत्पुरुषसमास करून नंतर (त्या सामासिक शब्दाला मत्वर्थीय) 'इनि' प्रत्यय लावल्यास, ('अक्षादूहिन्यामुपसङ्ख्यानम्' या वार्तिकानें होणारी) वृद्धि–वृद्धिरूप एकादेश–होणार नाहीं,

कारण अन्तरङ्ग गुणकार्य–गुणैकादेशरूप कार्य–वृद्धिकार्याचा बाध करेल. याचे कारण हे की, ('अक्षादूहिन्यामुपसङ्ख्यानम्' या वार्तिकानें होणारे) वृद्धिकार्य ('आद्गुण:' सू. ६९ या सूत्रानें होणाऱ्या गुणकार्याचे) अपवादक–बाधक–आहे तरी, 'अक्ष' शब्दाचा 'ऊहिनी' शब्दाशी समास केल्यानें ते वार्तिक चरितार्थ होते (व त्यामुळें 'अक्ष' शब्दाचा 'ऊह' शब्दाशीं समास करतेवेळी तें वार्तिक प्रवृत्त होऊ शकत नाही व 'आद्गुण:' या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन नतर 'इनि' प्रत्यय व ङीप्प्रत्यय केल्यास, 'अक्षौहिणी' असे इष्ट रूप सिद्ध न होता 'अक्षोहिणी' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. प्रक्रियाकौमुदीत 'अक्षादूहिन्याम्' असे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे 'अक्षौहिणी' हे उदाहरण दिले आहे व प्रसादकारानी आपल्या टीकेत त्या वार्तिकाचा 'अक्षशब्द-स्योहिन्या परतो वृद्धिर्वक्तव्येत्यर्थ:' असा अर्थ करून 'अक्षौहिणी' या शब्दाचा विग्रह करतेवेळी 'अक्षाणामूह: समूह: सोऽस्यास्तीति मत्वर्थीय इनि:। ऋन्नेभ्यो ङीप् इति ङीप्' असे म्हटले आहे. हा विग्रह दीक्षिताच्या मतें अशुद्ध असल्यामुळें त्यानी मनोरमेंतील वरील पंक्ति लिहिली आहे त्याच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे की, 'अक्षाणामूह = अक्ष + आम् + ऊह + सु' या स्थलीं 'सुपो-धातुप्रातिपदिकयो:' सू ६५० या सूत्रानें अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'अक्ष + ऊह' अशी स्थिती झाली असता, 'अक्ष' शब्दापुढें 'ऊहिनी' शब्द नसून 'ऊह' शब्द असल्यामुळें व वरील वार्तिकानें 'अक्ष' शब्दापुढें 'ऊहिनी' शब्द आला असतानाच वृद्धिरूप एकादेशकार्य होणे सांगितलें असल्यामुळें, वरील वार्तिक प्रवृत्त होऊ शकत नाही व 'आद्गुण:' सू ६९ या सूत्रानें गुणैका-देशरूप कार्य होऊन 'अक्षोह' असेच रूप सिद्ध होऊ शकतें. 'अक्षोह' या शब्दाहून 'अत इनिठनौ' सू १९२२ या सूत्रानें मत्वर्थीय इनिप्रत्यय केल्यास 'अक्षोहिन्' असे रूप होतें व हें रूप नकारान्त असल्यामुळें त्याहून 'ऋन्नेभ्यो ङीप्' सू ३०६ या सूत्रानें

'ङीप् = ई' हा स्त्रीप्रत्यय केल्यानें 'अक्षोहिणी' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. दीक्षितानीं वृद्धिरूप एकादेशकार्याच्या मानानें गुणरूप एकादेशकार्य अन्तरङ्ग आहे व त्या अन्तरङ्गकार्यानें वृद्धिरूप एकादेशकार्याचा बाध होईल असे जें वर म्हटले आहे त्याचे कारण हें की, 'अक्ष + ऊह' या स्थली 'अक्ष' यातील अन्त्य अकारापुढें 'ऊ' हा अच् प्रथमोपस्थित निमित्त असल्यामुळें, 'आद्गुणः' या सूत्रानें होणारे गुणरूप एकादेशकार्य अन्तरङ्ग ठरते व 'अक्षोह' हें रूप सिद्ध झाल्यावर त्याहून मत्वर्थीय इनिप्रत्यय व ङीप्प्रत्यय केला असता, पुढें होणाऱ्या त्या दोन प्रत्ययांच्या निमित्तानें प्रकृत वार्तिकान्वयें होणारे वृद्धिरूप एकादेशकार्य 'पूर्वोपस्थितनिमित्तक-मन्तरङ्ग परोपस्थितनिमित्तक बहिरङ्गम्' या न्यायान्वयें त्याच्या मानानें बहिरङ्ग ठरते, आणि ते वृद्धिरूप कार्य जरी गुणरूप कार्याचे अपवादक आहे तरी 'अक्ष + ऊहिनी' या स्थली तें अपवादक वार्तिक चरितार्थ ठरत असल्यामुळें, 'अपवादो यद्यन्यत्र चरितार्थस्तर्ह्यन्तरङ्गेण बाध्यते'–परि. ६६–या न्यायान्वयें 'अक्ष + ऊह' या स्थलीं प्राप्त होणाऱ्या गुणैकादेशरूप अन्तरङ्ग कार्याचे ते अपवादक वार्तिक बाधक होऊ शकत नाहीं व त्यामुळें प्रसादकारानी जसा विग्रह केला आहे तसा केल्यास, 'अक्षोहिणी असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरिता प्रथम 'ऊह' शब्दाहून मत्वर्थीय इनिप्रत्यय करून व नंतर ङीपप्रत्यय करून 'ऊहिनी' हा शब्द सिद्ध केल्यावर, त्या नंतर 'अक्षाणामूहिनी' असा विग्रह केला पाहिजे व तसे केल्यानेंच प्रकृत अपवादक वार्तिक प्रवृत्त होऊन 'अक्षौहिणी' हे रूप सिद्ध होऊ शकते, कारण 'अक्ष + ऊहिनी' या स्थली 'अक्ष', शब्दापुढें 'ऊहिनी' शब्द आला असल्यामुळें 'आद्गुणः' हें सूत्र बाधित होऊन त्याची प्रवृत्ति न होता 'अन्तरङ्गादप्यपवादो बलीयान्' या न्यायान्वयें प्रकृत अपवादक वार्तिक प्रवृत्त होते व त्यामुळें 'अक्षौहिणी' हें इष्ट रूप सिद्ध होण्यात कांहीं अडचण येत नाहीं

असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.) असे असल्यामुळेंच, 'इण्–ङि–शीनामाद्गुण: सवर्णदीर्घत्वात्,' म्हणजे 'इट्, ङि, शि' यांना सवर्णदीर्घ न होता 'आद्गुण:' या सूत्रानें गुणरूप एकादेश होतो, असें वार्तिक पठित केले आहे व तें वार्तिक ('परनित्यान्त-रङ्गापवादानामुत्तरोत्तर बलीय:' या परिभाषेचें मनोरमेंत विवरण करतेवेळी) पूर्वी सांगितलेंच आहे. (त्या वार्तिकाचें विस्तृत विवरण परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरात पान २२७ मध्यें केले आहे व ते वाचल्यास त्या वार्तिकाचा अर्थ नीट ध्यानात येईल. 'अक्ष+'ऊह' या स्थली 'आद्गुण.' या सूत्रानें प्राप्त होणाऱ्या अन्तरङ्गकार्याचा इतर स्थली चरितार्थ होणारे प्रकृत अपवादक वार्तिक बाध करूं शकत नाही हें सिद्ध करण्याकरिता दीक्षितानी वरील वार्तिकाचा प्रमाणरूपानें उल्लेख केला आहे व त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, प्रकृत वार्तिकानें होणारे वृद्धिरूप एकादेशकार्य जरी 'आद्गुण.' या सूत्रानें होणाऱ्या कार्याचें अपवादक आहे व 'अन्तरङ्गादप्यपवादो बलीयान्' असा न्याय आहे तरी, वर सांगितल्याप्रमाणे तें अपवादक कार्य 'आद्गुण' या सूत्रानें होणाऱ्या कार्याच्या मानानें बहिरङ्ग असल्यामुळें व 'अक्ष+ऊहिनी' या स्थली ते अपवादक शास्त्र चरितार्थ ठरत असल्यामुळें आणि 'अपवादो यद्यन्यत्र चरितार्थस्तर्ह्यन्तरङ्गेण बाध्यते' अशी परिभाषा असल्यामुळें ते अपवादक वार्तिक 'अक्ष+ऊह' या स्थली 'आद्गुण:' या सूत्रानें प्राप्त होणाऱ्या अन्तरङ्ग गुणकार्याचा बाध करूं शकत नाही, आणि अशी परिभाषा आहे याला 'इण्–ङि–शीनामाद्गुण: सवर्णदीर्घत्वात्' हें वार्तिक प्रमाण आहे, कारण 'अक: सवर्णे दीर्घ:' या परसूत्रानें होणारे पदद्वयाश्रित सवर्णदीर्घकार्य 'आद्गुण:' या सूत्रानें होणाऱ्या प्रकृतिप्रत्ययसंधिरूप गुणकार्याच्या मानानें बहिरङ्ग असल्यामुळें व इतर स्थली 'अक: सवर्णे दीर्घ:' हें पर-शास्त्र चरितार्थ ठरत असल्यामुळें, 'पूर्वात्पर बलवत्' या न्याया-न्वयें जरी परशास्त्रानें होणारें कार्य पूर्व शास्त्रानें होणाऱ्या

कार्याच्या मानानें बलवत्तर आहे तरी, 'अ+यज्+शप्+इट्+इन्द्रम्=अयज+इ+इन्द्रम्' इत्यादि स्थलीं बहिरङ्ग सवर्णदीर्घ-कार्यानें अन्तरङ्ग गुणकार्याचा बाध होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'अयजे इन्द्रम्' इत्यादि इष्ट प्रयोगाची सिद्धि होते. त्या वार्तिकाचीं इतर उदाहरणें परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरात पान २२७ मध्यें दिलीं आहेत व तीं तेथें पाहावीं.)

शब्दरत्न— विग्रह इति । समस्यमानपदस्वरूपबोधक इत्यर्थः । तत इनाविति । "अत इनिठनौ इति विहित इत्यर्थः । अन्त-रङ्गेणेति । प्रथमप्रवृत्तिकेनेत्यर्थः । समर्थग्रहणेन कृतसन्धिकार्यादेव तद्धितोत्पत्त्या तद्विषये ऽकृतव्यूहपरिभाषाया अप्रवृत्तेः, तस्या असत्त्वाच्चेति भावः । चरितार्थत्वादिति । तद्घटकोहिनीशब्दस्य कल्पितार्थेनाप्यर्थवत्त्वाभावेन तत्रैतत्सूत्राप्रवृत्तेश्चेत्यपि बोध्यम् ॥

'ऊहोऽस्त्यस्या ऊहिनी अक्षाणामूहिनीति विग्रहः' या मनोरमेच्या पङ्क्तीतील 'विग्रह.' या शब्दाचा 'समस्यमानपदस्वरूप-बोधकः'—म्हणजे समासातील पदें कोणकोणती व कोणत्या स्वरूपाचीं आहेत याचा बोध करून देणारा—असा अर्थ आहे. 'तत इनौ'—म्हणजे 'ऊह' शब्दाहून 'इनि' प्रत्यय केला असतां—असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा अर्थ हा आहे की, 'ऊह' या शब्दाहून 'अत इनिठनौ' सू. १९२२ या सूत्रानें 'इनि' प्रत्यय होतो. 'अन्तरङ्गेण गुणेन बाधात्' या मनोरमेच्या पङ्क्तीतील 'अन्तरङ्गेण' या पदाचा 'प्रथमप्रवृत्तिकेन' असा अर्थ आहे ('अक्ष+ऊह' या समासातील दोन पदांचा सन्धि करतेवेळीं 'अक्ष' या अकारान्त शब्दापुढें गुणाचें निमित्त जो 'ऊह' यातील 'ऊ' हा अच् प्रथम उपस्थित असल्यामुळें व तदा स्थितीत प्रकृत अपवादक वार्तिकाची प्राप्तीच होत नसल्यामुळें आणि 'नित्यः समासे' या वचनान्वयें समासांत सन्धिकार्य नित्य होणारें असून, तें तद्धितप्रत्ययोत्पत्तीची वाट पाहणारें कार्य नसल्यामुळें, गुणकार्य प्रथम होतें, व याचें

विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे ) 'समर्थाना प्रथमाद्वा' सू १०७२ या सूत्रात 'समर्थानाम्' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें (व त्या पदाचा 'कृतसन्धिकार्याणाम्' असा अर्थ असल्यामुळें) सन्धिकार्य प्रथम केल्यानंतरच तद्धितप्रत्ययाची उत्पत्ति होते, आणि तद्धितप्रत्ययोत्पत्ति करतवेळी 'अकृतव्यूहा. पाणिनीया '–परि. ५६– या परिभाषेची प्रवृत्ति होत नाही व दुसर असे की, तशी परिभाषाच नाही ('अक्ष+ऊह+इनि+ङीप्' या स्थली पूर्वोपस्थितनिमित्तक अन्तरङ्ग गुणैकादेशरूप कार्य जरी प्रथम प्राप्त होत तरी, 'इनि' व 'ङीप्' प्रत्यय नंतर केल्यावर 'अक्षादूहिन्याम्' हें अपवादक वार्तिक पुढें प्रवृत्त होणार असल्यामुळें, गुणकार्य प्रथम केले तरी त्याचा प्रकृत वार्तिकानें होणाऱ्या वृद्धिकार्यानें बाध होणारच आहे म्हणून 'निमित्त विनाशोन्मुख दृष्ट्वा तत्प्रयुक्त कार्यं न कुर्वन्ति' या अर्थाची 'अकृतव्यूहा पाणिनीया' ही परिभाषा असल्यामुळें व 'प्रक्षालनाद् हि पङ्कस्य दूरादस्पर्शनं वरम्' असा न्याय असल्यामुळें, गुणैकादेशरूप कार्य 'अक्ष + ऊह' अशा स्थितीत एकदम न करिता, 'इनि' हा तद्धित प्रत्यय व नंतर 'ङीप्' हा स्त्रीप्रत्यय केल्यावर प्रकृत वार्तिकानें प्राप्त होणार वृद्धिकार्यच केले पाहिजे असे शकाकाराचे म्हणणे आहे या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'समर्थाना प्रथमाद्वा' सू. १०७२ या सूत्रात 'समर्थानाम् = कृतसन्धि-कार्याणाम्' हें पद मुद्दाम घातले असल्यामुळें त्यावरून हें स्पष्ट होतें की, सन्धिकार्य केल्यावरच तद्धितप्रत्ययोत्पत्ति होते. त्यामुळें 'अक्ष + ऊह' या समासातील दोन पदाचा प्रथम सन्धि केल्यावरच 'इनि' हा तद्धित प्रत्यय लावता येता त सन्धिकार्य करतेवेळी 'अक्ष' या शब्दापुढें 'ऊह' हा शब्द असून 'ऊहिनी' हा शब्द नसल्यामुळें, 'अक्षादूहिन्याम्' या वार्तिकाची प्राप्तीच होत नाही व त्यामुळें 'आद्गुण ' या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'अक्षौह' असे रूप सिद्ध झाल्यावरच 'इनि' हा तद्धित प्रत्यय होऊ शकता व ता प्रत्यय करून नंतर 'ङीप्' हा स्त्रीप्रत्यय केल्यास, 'अक्षौहिणी'

असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. अशा ठिकाणी 'अकृतव्यूहा पाणिनीया' ही परिभाषा प्रवृत्त होऊं शकत नाही, कारण 'समर्थानां प्रथमाद्वा' या सूत्रात 'समर्थानाम्' या पदाचें ग्रहण केले असल्यामुळें, तें पद त्या परिभाषेच्या प्रवृत्तीचे बाधक ठरते व तशी परिभाषा मानली तरी, सन्धिकार्य तद्धितप्रत्ययोत्पत्तीची वाट न पाहता प्रथम होत व तें कार्य झाल्यावरच तद्धितप्रत्ययोत्पत्ति होऊं शकते म्हणून वरील परिभाषा मानली तरी, 'अक्षोहिणी' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति टाळता येत नाही दुसरे असे की, ती परिभाषा भाष्यात कोठेंहि पठित केली नसल्यामुळें व भाष्य-कारानी तिचा कोठेंहि उपयोग केला नसल्यामुळें ती परिभाषा मानताच येत नाहीं व म्हणून शंकाकाराची शंका अनुपपन्न ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'अक्ष' शब्दाचा 'ऊह' शब्दाशी समास केला असता वृद्धि होऊ शकत नाही याला मनोरमेंत 'ऊहिनीशब्देन विग्रहे चरितार्थत्वात्' असे जें कारण दिले आहे त्याखेरीज दुसरें कारण हें देखील आहे कीं, (प्रसादकारानी 'अक्षौहिणी' हा शब्द ज्या रीतीनें सिद्ध करून दाखविला आहे तशा रीतीनें सिद्ध केलेल्या त्या शब्दातील) 'ऊहिनी' या अवयवात कल्पित अर्थवत्ता देखील नसल्यामुळें, तेथें 'अक्षादूहिन्यामुपसंख्यानम्' हें सूत्र—वार्तिक—प्रवृत्त होऊ शकत नाहीं (प्रसादकारानी 'अक्षाणा-मूह समूह सोऽस्त्यस्या इति अक्षौहिणी' असा 'अक्षौहिणी' शब्दाचा विग्रह केला आहे त्यानी 'अक्ष' व 'ऊह' या दोन शब्दाचा प्रथम षष्ठीतत्पुरुष करून त्या योगानें सिद्ध झालेल्या सामासिक शब्दाहून 'इनि' प्रत्यय व नतर 'ङीप्' प्रत्यय केला आहे 'अक्षाणामूह' या स्थलीं समासाचे घटक—अवयव—'अक्ष' व 'ऊह' हे दोन शब्द आहेत 'समासे समुदायस्यैवार्थवत्त्व, अवयवस्य कल्पितमर्थवत्त्वम्' या न्यायान्वयें, 'अक्ष' व 'ऊह' या दोन शब्दाचा समास करून 'अक्षोह' असा जा सामासिक शब्द सिद्ध होतो त्याचेच ठिकाणीं वास्तविक अर्थवत्ता आहे समास झाल्यावर

'अक्ष' व 'ऊह' याचे ठिकाणी वास्तविक अर्थवत्ता राहत नसून ती केवळ कल्पिली जाते. 'ऊहिनी' हा शब्द त्या समासाचा अवयव नसल्यामुळें, त्या शब्दाचे ठिकाणी कल्पित अर्थवत्ता देखील नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे येथे जो 'इनि' प्रत्यय केला आहे तो 'ऊह' शब्दाहून केला नसून 'अक्षोह' या शब्दाहून केला आहे व 'प्रकृत्यर्थान्वितस्वार्थबोधकत्व प्रत्ययानाम्' या न्यायान्वयें, 'इनि' प्रत्यय 'अक्षोह' या प्रकृतीचा अर्थ सागणारा असून 'ऊह' याचा अर्थ सागणारा नव्हे अशा रीतीनें प्रसादकारानी केलेल्या व्युत्पत्तीप्रमाणें 'ऊहिनी' हा शब्द अर्थरहित ठरत असल्यामुळें व जेथें अर्थवानाचे ग्रहण सभवते तेथें अनर्थकाचे ग्रहण करू नये या अर्थाची 'अर्थवद्ग्रहणे नानर्थकस्य'–परि १४– ही परिभाषा असल्यामुळें, वार्तिकात निर्दिष्ट असलेल्या अर्थवान् 'ऊहिनी' शब्दानें तशा अनर्थक 'ऊहिनी' शब्दाचे ग्रहण करता येत नाही आणि त्यामुळें प्रकृत वार्तिक तशा समासास लागू शकत नाही व वृद्धिरूप एकादेश होऊ शकत नाही 'अक्षादूहिन्यामुपसख्यानम्' हे वास्तविक वार्तिक असून सूत्र नव्हें असे असून देखील 'तत्रैत-त्सूत्राप्रवृत्तेश्चेत्यपि बोध्यम्' या शब्दरत्नातील पक्तीत त्या वार्तिकाला 'सूत्र' कसे म्हटले आहे असा कोणी प्रश्न केल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, भाष्यकारानी कित्येक ठिकाणी वार्तिकाचा 'सूत्र' या शब्दानें निर्देश केला आहे उदाहरणार्थ पस्पशान्हिकात 'भवे' व 'प्रोक्तादयश्च तद्धिता' अशी दोन भिन्न वार्तिके वार्तिककारानें का पठित केली आहेत व 'प्रोक्तादयश्च तद्धिता' एवढेंच वार्तिक का पठित केले नाही यासबधानें चर्चा करतेवेळीं भाष्यकारानीं म्हटले आहे–'पुरस्तादिदमाचार्येण दृष्ट भवे तद्धित इति, तत्प-ठितम् । तत उत्तरकालमिद दृष्ट प्रोक्तादयश्च तद्धिता इति तदपि पठितम् । न चेदानीमाचार्या सूत्राणि कृत्वा निवर्तयन्ति ।' त्याच-प्रमाणे 'स्वरितो वानुऽदात्ते पदादौ' सू ८–२–६ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, वार्तिक-

कारानें 'प्रगृह्यसंज्ञाया च' एवढेंच वार्तिक पठित न करिता 'अदस ईत्वोत्वे स्वरे बहिष्पदलक्षणे' हे वार्तिक देखील का पठित केले आहे, कारण 'प्रगृह्यसंज्ञाया च' एवढेंच वार्तिक पठित करूनहि काम भागले असते या प्रश्नाचे उत्तर देताना भाष्यकार म्हणतात — 'पुरस्तादिदमाचार्येण दृष्टं, स्वरे बहिष्पदलक्षणे इति, तत्पठितम्। तत उत्तरकालमिदं दृष्टं प्रगृह्यसंज्ञाया चेति। तदपि पठितम्। न चेदानीमाचार्याः सूत्राणि कृत्वा निवर्तयन्ति।' या दोन्ही भाष्यात भाष्यकारानीं वार्तिककारासंबधानें लिहिले असून त्यात वार्तिककारास आचार्य असे म्हटले आहे व वार्तिककारानें रचलेल्या वार्तिकाना 'सूत्राणि' असे म्हटले आहे आणि 'अल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखम्। अस्तोभमनवद्यञ्च सूत्रं सूत्रविदो विदुः' ही व्याख्या जशी पाणिनीय सूत्राना लागू पडते तशीच वार्तिकाना देखील ती बहुवशी लागू पडत असल्यामुळें भाष्यकारानीं वार्तिकाना 'सूत्राणि' असे जें म्हटले आहे ते योग्य ठरते त्यामुळें शब्दरत्नकारानी 'अक्षाद्रूहिन्यामुपसंख्यानम्' हें वार्तिक असून देखील त्याला 'सूत्र' असें जें म्हटले आहे त्याला भाष्याचा आधार असल्यामुळें, ते म्हणणे वावगें ठरत नाही )

मनोरमा—"स्वादीरेरिणोः"। इरेरिण्योरिति क्वाचित्कोऽपपाठ, स्वैरीनि णिन्यन्तस्यास्त्रिया वृद्ध्यभावप्रसङ्गात्। स्वैरिणीत्यत्र तु ङीपः प्राग्भागमादाय वृद्धिर्बोध्या। यत्तु व्याचख्युः लिङ्गविशिष्टपरिभाषयेति तन्निष्फलम्॥

('स्वादीरेरिणो.' असा वास्तविक वार्तिकपाठ 'एत्येधत्यूठ्सु' सू ६·१ ८९ या सूत्रावरील भाष्यात दिलेला आढळतो; पण) क्वचित् स्थली 'स्वादीरेरिण्योः' असा अशुद्ध वार्तिकपाठ आढळतो. (तो पाठ अशुद्ध आहे असे म्हणण्याचे कारण हें की, तो पाठ मानल्यास, 'स्व' या शब्दापुढें) 'णिनि' प्रत्ययान्त पुल्लिङ्ग किंवा नपुंसकलिङ्ग 'ईरिन्' शब्द आल्यास, वृद्धिरूप एकादेश न होण्याची आपत्ति येईल

व 'स्वैरिन्' असे इष्ट रूप सिद्ध होणार नाही. ('ईर गतौ' या अदादिगणात पठित असलेल्या धातूहून 'ईरणमीरः' या अर्थामध्यें 'भावे घञ्' प्रत्यय केल्यानें 'ईर' हा शब्द सिद्ध होतो व 'ईरितु शील यस्य' या अर्थामध्यें 'सुप्यजातौ णिनिस्ताच्छील्ये' सू २९८८ या सूत्रानें 'णिनि=इन्' प्रत्यय केल्यानें 'ईरिन्' असा शब्द सिद्ध होतो व हा शब्द नकारान्त असल्यामुळें त्याहून 'ऋन्नेभ्यो ङीप्' सू. ३०६ या सूत्रानें 'ङीप्' प्रत्यय केल्यानें, त्या 'ईरिन्' शब्दाचे 'ईरिणी' असे स्त्रीलिङ्गाचे रूप होतें. 'स्वादीरेरिण्योः' असा प्रकृत वार्तिकाचा पाठ मानल्यास, 'स्व' शब्दापुढें 'ईर' किंवा 'ईरिणी' शब्द आला असतां पूर्व व पर अचाचे जागी वृद्धिरूप एकादेश होतो असा त्या वार्तिकाचा अर्थ होईल व त्यामुळें 'स्व' शब्दापुढें 'णिनि' प्रत्ययान्त पुल्लिङ्गी किंवा नपुंसकलिङ्गी 'ईरिन्' शब्द आल्यास, तसा शब्द त्या वार्तिकात पठित नसल्यामुळें व 'ईरिणी' हा स्त्रीलिङ्गी शब्द पठित असल्यामुळें, वृद्धिरूप एकादेश होणार नाही व 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'स्वेरिन्' असे पुल्लिङ्गाच्या व नपुंसकलिङ्गाच्या प्रातिपदिकाचे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. म्हणून प्रकृत वार्तिकाचा तसा अशुद्ध पाठ न मानता त्या वार्तिकाचा कौमुदीत जसा पाठ दिला आहे तसाच पाठ मानणे योग्य आहे व तो पाठ मानल्यानेंच 'स्वैरिन्' हे इष्ट रूप सिद्ध होऊ शकते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे. पण प्रकृत वार्तिकाचा कौमुदीत जसा पाठ दिला आहे तसा पाठ मानला तर, 'स्व' शब्दापुढें 'ईरिणी' हा ङीप्प्रत्ययान्त स्त्रीलिङ्गी शब्द आल्यास वृद्धिरूप एकादेश न होता 'आद्गुणः' या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'स्वेरिणी' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात कीं,) ङीप् प्रत्ययापूर्वी जो भाग, म्हणजे 'स्वैरिन्' शब्द, आहे त्यात वृद्धिरूप एकादेश झाला आहे असे समजावे. ('स्वेन ईरितु शील यस्य' या अर्थामध्यें णिनिप्रत्यय

होऊन 'स्वैरिन्' असे रूप प्रकृत वार्तिकान्वयें सिद्ध झाल्यावर त्याहून 'ऋन्नेभ्यो ङीप्' सू. ३०६ या सूत्रानें ङीप्प्रत्यय केला असता, 'स्वैरिणी' असे इष्ट रूप सिद्ध होण्यात काही अडचण येत नाही. साराश प्रकृत वार्तिकात 'ईरिणी' हा शब्द नसून देखील, वर सांगितल्याप्रमाणे, 'स्वैरिणी' हे इष्ट रूप सहज सिद्ध करता येते.) प्रकाशकारानी असे व्याख्यान केले आहे की, 'प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणम्'--परि-७२-या परिभाषान्वयें वार्तिक-निर्दिष्ट 'ईरिन्' या प्रातिपदिकानें 'ईरिणी' या स्त्रीलिङ्ग रूपाचे ग्रहण करता येते (व त्यामुळें 'स्वैरिणी' हे रूप सिद्ध होते) पण हें व्याख्यान निष्फल आहे, म्हणजे असे व्याख्यान केल्यानें कोणतेहि विशेष फल निष्पन्न होत नसल्यामुळें तसे व्याख्यान करण्याची काहीच आवश्यकता नव्हती, (कारण वरील परिभाषेचे अवलंबन न करिता जर 'स्वैरिणी' हें रूप, वर सांगितल्याप्रमाणे, सहज सिद्ध होऊ शकतें तर परिभाषेपर्यंत धाव घेण्याची प्रकाशकाराना काहीच गरज नव्हती असा दीक्षिताचे म्हणण्याचा आशय आहे. 'एत्येधत्यूठ्सु' ६·१ ८९ या सूत्रावरील भाष्यात 'स्वादीरेरिणो' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकारांनी 'स्वात् ईर ईरिनित्येतयोर्वृद्धिर्वक्तव्या । स्वैर स्वैरी । ईरिन्ग्रहण शक्यमकर्तुम् । कथ स्वैरीति ? । इनिनैतन्मत्वर्थीयेन सिद्धम् । स्वैरोऽस्यास्तीति स्वैरी ।' असे म्हटले आहे. या भाष्यावरून हे स्पष्ट होत की, प्रकृत वार्तिकात 'ईरिन्' शब्द असण्याची काही गरज नाही, कारण 'स्वैर' शब्दाहून 'अत इनिठनौ' सू १९२२ या सूत्रानें मत्वर्थीय इनिप्रत्यय केला असता 'स्वैरिन्' असे रूप सहज सिद्ध होऊ शकते. मग णिनिप्रत्ययान्त 'स्वैरिन्' हे रूप कसे सिद्ध होऊ शकणार ? या प्रश्नाचे कैयटानें असे उत्तर दिले आहे कीं, 'णिनिस्त्वनभि-धानान्न भविष्यति')

मनोरमा--"प्राद्रूहोढोढ्येषैष्येषु"। अत्रोहशब्दः केश्चित्प्र-क्षिप्तो भाष्यादौ तु न दृश्यत इति प्राञ्चः। इदानीन्तनपुस्तकेषु तु

भाष्यवार्तिकयोरूहशब्दो दृश्यत एव। नानर्थकस्येति। उपस्थित-स्यार्थस्य शब्दं प्रति विशेषणत्वसंभवे त्यागायोगादिति भावः। सीरदेवस्त्वाह-"व्रश्च" इतिसूत्रे राजेः पृथग् भ्राजिग्रहणमिह ज्ञापकमिति। नन्वेतदयुक्तम्, फणादिना राजिना साहचर्यात् तथाभूतस्यैव षत्वार्थतया भ्राजिग्रहणस्योपक्षीणत्वादिति चेत्, विभ्राट् विभ्रागिति रूपद्वयं हि साध्यं तच्च व्रश्चादिसूत्रे "राज्" इति पठित्वाऽपि सुसाधम्, एकस्य भ्राजतेर्ऋकारस्य प्रागपि दातुं शक्यत्वात्-ऋभ्राज इति, "भ्राजभास" इति विकल्पस्य वाचनिक-तया ऋकारस्य आत्मनेपदमात्रफलकतया वक्ष्यमाणत्वेन तत्स्थाने-ऽकारस्य सुपठत्वाच्च। तस्मात् सीरदेवोक्तं ज्ञापकमपि सम्यगेव। प्रैष्य इति। एवसाहचर्यादिष्योऽपि अनव्ययं गृह्यते। तेन ण्यन्तादिषेः ल्यपि पररूपमेव, न तु वृद्धिः। प्रेष्य गतः॥

प्रकाशकाराचे असे म्हणणे आहे की, 'प्रादूहोढोढ्येषैष्येषु' या प्रकृत वार्तिकात 'ऊह' हा शब्द कोणी तरी प्रक्षिप्त केला असावा; कारण तो शब्द भाष्यादिकात आढळत नाही. (या वार्तिकाचे व्याख्यान करिताना प्रसादकारानी 'अन्यमतोपसङ्ग्रहार्थं वक्तव्यमध्ये ऊहशब्दस्य प्रक्षेपः प्रौह इत्युदाहरणं च।' असे म्हटले आहे व प्रकाशकारानी देखील आपल्या टीकेत बहुधा असेच म्हटले असावे आणि म्हणूनच दीक्षितानी मनोरमेत 'प्राञ्चः' असा बहुवचनप्रयोग केला आहे) परंतु आता उपलब्ध असलेल्या भाष्याच्या व वार्तिकपाठाच्या प्रतीत 'ऊह' हा शब्द आढळतोच. ('प्र+ऊढवान्' या स्थली प्रकृत वार्तिकानें वृद्धिरूप एकादेश होत नाही व 'आद्गुण.' या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'प्रोढवान्' असे रूप सिद्ध होते असे दीक्षितानी कौमुदीत म्हटले आहे व 'प्रौढवान्' असे रूप सिद्ध होऊ शकत नाही याचे समर्थन करण्या-करिता 'अर्थवद्ग्रहणे नानर्थकस्य-' परि. १४-ही परिभाषा प्रमाण दिली आहे आणि अनर्थकाचे ग्रहण का होत नाही हे आता दीक्षित पुढील पङ्क्तीत सागतात.) अनर्थकाचे ग्रहण होत नाही याचे कारण

हें की, शब्द उच्चारला असता त्याहून ज्ञात होणारा अर्थ त्या शब्दाचे विशेषण असणे संभवत असल्यामुळें म्हणजे तथा अर्थविशिष्ट शब्दाचेच त्या शब्दानें ग्रहण होत असल्यामुळें, त्या अर्थाचा त्याग करता येत नाही ('क्तक्तवतू निष्ठा' सू. ३०१२ या सूत्रान्वयें 'क्त' व 'क्तवत्' हे प्रत्यय निष्ठासंज्ञक आहेत. 'क्त' हा प्रत्यय भावे व कर्मणि या अर्थामध्यें होत असून 'क्तवत्' हा प्रत्यय कर्तरि या अर्थात होत असतो 'क्तवत्' हा संपूर्ण प्रत्यय अर्थवान् असून त्यातील 'क्त' हा एकदेश अर्थवान् नाही म्हणून प्रकृत वार्तिकात क्तप्रत्ययान्त अर्थवान् 'ऊढ' हा शब्द उच्चारला असल्यामुळें, क्तवत्प्रत्ययान्त 'ऊढवत्' या अर्थवान् शब्दात जो अनर्थक 'ऊढ' हा भाग आहे त्या भागाचे वार्तिकनिर्दिष्ट अर्थवान् 'ऊढ' शब्दानें ग्रहण करता येत नाही त्यामुळें 'प्र+ऊढ' या स्थली 'ऊढ' हा क्तप्रत्ययान्त शब्द अर्थवान असल्यामुळें प्रकृत वार्तिकान्वयें वृद्धिरूप एकादेश होऊन 'प्रौढ' असे रूप सिद्ध होतें परंतु 'प्र+ऊढवान्' या स्थली जरी 'प्र' या उपसर्गापुढें 'ऊढवान्' यातील 'ऊढ' हा एकदेश आहे तरी तो अर्थवान् नसून अर्थरहित असल्यामुळें, वार्तिकनिर्दिष्ट 'ऊढ' शब्दानें त्या अनर्थक 'ऊढ' या एकदेशाचे ग्रहण होऊ शकत नाही व म्हणून या स्थली प्रकृत वार्तिक प्रवृत्त न होता 'आद्गुण' सू ६९ हे सूत्र प्रवृत्त होऊन व गुणरूप एकादेश होऊन 'प्रोढवान्' असे रूप सिद्ध होतें प्रसादकारानीं देखील 'ननु कथं प्रोढवानित्यत्र न वृद्धि । अर्थवद्ग्रहणे नानर्थकस्य इति परिभाषया ।' असेच म्हटले आहे ) सीरदेवाचे असे म्हणणे आहे की, 'व्रश्चभ्रस्ज' सू २९४ या सूत्रात 'राज्' धातूचे ग्रहण केले असून देखील पुन्हा त्या सूत्रात जें 'भ्राज्' धातूचे पृथक् ग्रहण केले आहे तें 'अर्थवद्ग्रहणे नानर्थकस्य' या परिभाषेचे ज्ञापक आहे ('भ्+राज्=भ्राज्' हा धातूमध्यें 'राज्' हा अवयव आहे पण तो अवयव त्या धातूत अर्थवान् नसून 'भ्राज' हा पूर्ण धातु अर्थवान् आहे म्हणून त्या 'राज्' या अनर्थक शब्दानें

'भ्राज्' चे ग्रहण होऊ शकत नाही आणि याकरिताच 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राज्' धातूचे ग्रहण केले असून देखील पुन्हा 'भ्राज्' धातूचें पृथक् ग्रहण केले आहे व अशा रीतीनें ते 'भ्राज्' धातूचे पृथक् ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचें ज्ञापक ठरते असे सीरदेवाचे म्हणणे आहे.) यावर अशी शंका करण्यात येते कीं, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रातील 'भ्राज' धातूचे ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे'—परि. १४—या परिभाषेचे ज्ञापक मानता येत नाही, कारण फणादि-गणात पठित असलेल्या 'राज्' धातूच्या साहचर्यामुळें त्या गणातच पठित असलेल्या 'भ्राज्' धातूच्या अन्त्य वर्णाचें षत्व व्हावे याकरिता 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात तो धातु पठित केला आहे व अशा रीतीनें त्या सूत्रातील 'भ्राज्' धातूचे ग्रहण उपक्षीण—चरितार्थ—झालेलें असल्यामुळें, तें 'भ्राज्' धातूचे ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचें ज्ञापक मानता येत नाही (या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की) ही शंका बरोबर नाही; कारण 'विभ्राट्, विभ्राक्' हीं दोन रूपें सिद्ध व्हावीत एवढ्याच-करिता 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रातील 'भ्राज्' धातु फणादिगणात पठित असलेला धातु घ्यावा असा जर शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय असेल तर, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात ('भ्राज्' धातु पठित न करिता केवळ) 'राजृ' असा ऋदित् धातु पठित केल्यानें देखील वरील दोन्ही रूपें सहज सिद्ध करता येतात (एवढेंच कीं, हीं दोन रूपें सिद्ध होण्याकरिता फणादिगणात पठित नसलेल्या 'भ्राजृ' धातूचा 'भ्राजृ' असा जो धातुपाठात ऋदित् पाठ केला आहे त्या ऐवजी) त्या धातूपुढील ऋकार त्या धातूच्या मागें घालता येणे शक्य असल्यामुळें 'ऋभ्राज' असा पाठ सहज करता येतो दुसरे असे कीं, 'भ्राजभास' सू. २५६५ या सूत्रानें होणारे उपधा-ऱ्हस्वकार्य विकल्पेंकरून होणे सांगितले असल्यामुळें, 'भ्राजृ' धातूच्या ऋदित्करणाचे, पुढें जें आम्ही सांगणार आहोत त्याप्रमाणे, एवढेंच फल होऊ शकते कीं, तो धातु केवळ आत्मनेपदी समजला

जावा. पण (तो धातु 'भ्राजृ' असा धातुपाठांत ऋदित् पठित न करिता) इत्संज्ञक ऋकाराचे जागी इत् अकार पठित करून 'भ्राज' असा देखील धातुपाठात धातु सहज पठित करतां येऊं शकतो. म्हणून 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात केलेले 'भ्राज' धातूचे पृथक् ग्रहण अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचे जें सीरदेवानें ज्ञापक मानलें आहे ते ज्ञापक देखील अगदी योग्य ठरते. (धातुपाठात 'भ्राजृ' असा ऋदित् धातु दोन ठिकाणी पठित केला आहे.) एक 'टु भ्राजृ दीप्तौ–धातु न. ८२३–असा फणादिगणात व दुसरा 'भ्राजृ दीप्तौ'–धातु न. १८१–असा त्याचे बरेच पूर्वी पठित केला आहे. हा द्वितीय 'भ्राजृ' धातु अफणादि–फणादिगणात पठित नसलेला–धातु आहे. फणादिगणात पठित असलेला व अफणादि 'भ्राजृ' धातु हे दोन्ही आत्मनेपदी आहेत. 'राजृ' धातु हा 'राजृ दीप्तौ'–धातु न. ८२२–असा केवळ फणादिगणात पठित आहे. शंकाकाराचे असे म्हणणे आहे की, जरी 'भ्राज' धातु फणादि व फणादि भिन्न असा दोन्ही प्रकारचा धातु आहे तरी, केवळ फणादिगणात पठित असलेल्या 'राज' धातूसह तो 'भ्राज' धातु 'व्रश्चभ्रस्ज' सू. २९४ या सूत्रात उच्चारला असल्यामुळें, 'सहचरिता सहचरितयोः सहचरितस्यैव ग्रहणम्'–परि. ११२–या साहचर्य-न्यायान्वयें, त्या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या 'भ्राज' धातूनें फणादि 'भ्राज' धातूचेच ग्रहण करतां येते, व तसें केल्याचे फल हे आहे की, त्या फणादि 'भ्राज' धातूहून क्विप्प्रत्यय केला असता, '*वि + भ्राज् + क्विप् + सु' असा स्थितीत 'क्विप् = व्*' या अपृक्त प्रत्ययाचा 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें लोप झाल्यावर व 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप झाल्यावर 'भ्राज्' धातूतील जकार पदान्ती येत असल्यामुळें, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रानें त्या जकाराचे षत्व होऊन व नंतर 'झलां जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें त्या षकाराचे जश्त्व–ड्–होऊन आणि 'वाऽवसाने' सू. २०६ या सूत्रानें 'ड्' चे जागीं विकल्पें करून 'ट्' होऊन

'विभ्राट्, विभ्राड्' अशी इष्ट पाक्षिक रूपें सिद्ध होतात तसेच फणादिगणात पठित नसलेला जो 'भ्राज' धातु 'व्रश्चभ्रस्ज' या सुत्रांत अन्तर्भूत नाही त्या धातूहून क्विप्‌प्रत्यय केला असता 'वि+भ्राज्+क्विप्+सु' अशा स्थितीत वर सांगितल्याप्रमाणें 'क्विप्' व 'सु' प्रत्ययाचा लोप झाल्यावर 'विभ्राज्' असे जें रूप होते त्याला 'व्रश्चभ्रस्ज' हें सूत्र लागू पडत नसल्यामुळें, 'विभ्राज्' यातील पदान्ती असलेल्या जकाराचे षत्व होऊ शकत नाही त्यामुळें 'चो कु' सू ३७८ हे सूत्र प्रवृत्त होऊन व पदान्ती असलेल्या जकाराचे जागी गकार होऊन आणि 'वाऽवसाने' या सूत्रानें गकाराचे जागीं ककार होऊन 'विभ्राक्, विभ्राग्' अशीं पाक्षिक इष्ट रूपें सिद्ध होतात. जर 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात पठित असलेल्या 'भ्राज' धातूनें फणादि व फणादि भिन्न अशा दोन्ही प्रकारच्या त्या धातूचे ग्रहण केले तर 'विभ्राट्, विभ्राड्' एवढेंच रूप सिद्ध होईल व 'विभ्राक् विभ्राग्' हे इष्ट रूप सिद्ध होऊ शकणार नाहीं म्हणून दोन्ही प्रकारची रूपें सिद्ध होण्याकरिता 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात पठित असलेल्या 'भ्राज' धातूनें फणादिगणातील 'भ्राज' धातूचेच ग्रहण करणे योग्य आहे अशा रीतीनें ते ग्रहण पदान्ती असलेल्या जकाराचे षत्व होण्याकरिता चरितार्थ ठरत असल्यामुळें, ते ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचे ज्ञापक मानता येत नाही असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, (१) 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राज'चे जागी 'राजृ' असा पाठ केला व (२) फणादि-भिन्न 'भ्राजृ' धातु जसा धातुपाठात ऋदित् पठित केला आहे तसा तो पठित न करिता 'ऋभ्राज' किंवा 'भ्राज' असा पठित केला आणि (३) 'अर्थवद्ग्रहणे'–परि १४–ही परिभाषा न मानली तर, जरी 'व्रश्चभ्रस्ज' सू २९४ या सूत्रातून 'भ्राज' धातु नाहीसा केला तरी त्या सूत्रात पठित केलेल्या फणादि 'राजृ' धातूनें फणादि 'भ्राजृ' धातूचेच ग्रहण होऊ शकेल व अफणादि 'ऋभ्राज'

जावा पण (तो घातु 'भ्राजृ' असा धातुपाठात ऋदित् पठित न करिता) इत्संज्ञक ऋकाराचे जागी इत् अकार पठित करून 'भ्राज' असा देखील धातुपाठात धातु सहज पठित करता येऊ शकतो म्हणून 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात केलेले 'भ्राज' धातूचे पृथक् ग्रहण अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचे जें सीरदेवानें ज्ञापक मानले आहे ते ज्ञापक देखील अगदी योग्य ठरते (धातुपाठात 'भ्राजृ' असा ऋदित् धातु दोन ठिकाणी पठित केला आहे ) एक 'टु भ्राजृ दीप्तौ– धातु न ८२३–असा फणादिगणात व दुसरा 'भ्राजृ दीप्तौ'– धातु न. १८१–असा त्याचे बरेच पूर्वी पठित केला आहे हा द्वितीय 'भ्राजृ' धातु अफणादि–फणादिगणात पठित नसलेला– धातु आहे फणादिगणात पठित असलेला व अफणादि 'भ्राजृ' धातु हे दोन्ही आत्मनेपदी आहेत 'राजृ' धातु हा 'राजृ दीप्तौ'–धातु न ८२२–असा केवळ फणादिगणात पठित आहे शकाकाराचे असे म्हणणे आहे की, जरी 'भ्राज' धातु फणादि व फणादि भिन्न असा दोन्ही प्रकारचा धातु आहे तरी, केवळ फणादिगणात पठित असलेल्या 'राज' धातूसह तो 'भ्राज' धातु 'व्रश्चभ्रस्ज' सू २९४ या सूत्रात उच्चारला असल्यामुळें, 'सहचरिता सहचरितयो सहचरितस्यैव ग्रहणम्'–परि ११२–या साहचर्य-न्यायान्वयें, त्या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या 'भ्राज' धातूनें फणादि 'भ्राज' धातूचेच ग्रहण करतां येते, व तसे केल्याचे फल हे आहे कीं, त्या फणादि 'भ्राज' धातूहून क्विप्प्रत्यय केला असतां, 'वि + भ्राज् + क्विप् + सु' अशा स्थितीत 'क्विप् = व्' या अपृक्त प्रत्ययाचा 'वेरपृक्तस्य' सू ३७५ या सूत्रानें लोप झाल्यावर व 'हल्ङ्याब्भ्य' सू २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप झाल्यावर 'भ्राज्' धातूतील जकार पदान्ती येत असल्यामुळें, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रानें त्या जकाराचे षत्व होऊन व नतर 'झला जशोऽन्ते' सू ८४ या सूत्रानें त्या षकाराचे जश्त्व–ड्–होऊन आणि 'वाऽवसाने' सू २०६ या सूत्रानें 'ड्' चे जागीं विकल्पें करून 'ट्' होऊन

'विभ्राट्, विभ्राड्' अशी इष्ट पाक्षिक रूपें सिद्ध होतात तसेच फणादिगणात पठित नसलेला जो 'भ्राज' धातु 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रांत अन्तर्भूत नाही त्या धातूहून क्विप्प्रत्यय केला असता 'वि+भ्राज्+क्विप्+सु' अशा स्थितीत वर सांगितल्याप्रमाणें 'क्विप्' व 'सु' प्रत्ययाचा लोप झाल्यावर 'विभ्राज्' असें जें रूप होते त्याला 'व्रश्चभ्रस्ज' हें सूत्र लागू पडत नसल्यामुळें, 'विभ्राज्' यातील पदान्ती असलेल्या जकाराचे षत्व होऊ शकत नाही त्यामुळें 'चो कु' सू ३७८ हे सूत्र प्रवृत्त होऊन व पदान्ती असलेल्या जकाराचे जागी गकार होऊन आणि 'वाऽवसाने' या सूत्रानें गकाराचे जागीं ककार होऊन 'विभ्राक्, विभ्राग्' अशीं पाक्षिक इष्ट रूपें सिद्ध होतात जर 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात पठित असलेल्या 'भ्राज' धातूनें फणादि व फणादि भिन्न अशा दोन्ही प्रकारच्या त्या धातूचे ग्रहण केले तर 'विभ्राट्, विभ्राड्' एवढेंच रूप सिद्ध होईल व 'विभ्राक् विभ्राग्' हे इष्ट रूप सिद्ध होऊ शकणार नाहीं म्हणून दोन्ही प्रकारची रूपें सिद्ध होण्याकरिता 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात पठित असलेल्या 'भ्राज' धातूनें फणादिगणातील 'भ्राज' धातूचेच ग्रहण करणे योग्य आहे अशा रीतीनें तें ग्रहण पदान्ती असलेल्या जकाराचे षत्व होण्याकरिता चरितार्थ ठरत असल्यामुळें, ते ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचे ज्ञापक मानता येत नाही असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, (१) 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राज'चे जागी 'राजृ' असा पाठ केला व (२) फणादि-भिन्न 'भ्राजृ' धातु जसा धातुपाठात ऋदित् पठित केला आहे तसा तो पठित न करिता 'ऋभ्राज' किंवा 'भ्राज' असा पठित केला आणि (३) 'अर्थवद्ग्रहणे'–परि १४–ही परिभाषा न मानली तर, जरी 'व्रश्चभ्रस्ज' सू २९४ या सूत्रातून 'भ्राज' धातु नाहीसा केला तरी त्या सूत्रात पठित केलेल्या फणादि 'राजृ' धातूनें फणादि 'भ्राजृ' धातूचेच ग्रहण होऊ शकेल व अफणादि 'ऋभ्राज'

किंवा 'भ्राज' धातूचे ग्रहण होऊ शकणार नाही, कारण फणादि 'भ्राजृ' धातूतच 'राजृ' हा अवयव असून अफणादि 'ऋभ्राज' किंवा 'भ्राज' या धातूत 'राजृ' असा अवयव नाही. त्यामुळें 'वि' या उपसर्गपूर्वक फणादि 'भ्राजृ = भ्राज्' धातूहून 'क्विप्' व 'सु' प्रत्यय केला असता, वर सांगितल्याप्रमाणे, 'विभ्राट्–विभ्राड्' असे रूप सिद्ध होऊ शकते. तसेच 'वि' या उपसर्गपूर्वक अफणादि 'ऋभ्राज' किंवा 'भ्राज = भ्राज्' धातूहून 'क्विप्' व 'सु' प्रत्यय केला असता, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, 'विभ्राक्–विभ्राग्' असे रूप सिद्ध होऊ शकते. मग असे असून देखील 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राजृ' धातु पठित करून देखील पुन्हा त्या सूत्रात फणादि 'भ्राज' धातूचे ग्रहण का केले आहे ? ते 'भ्राज' धातूचे पृथक् ग्रहण व्यर्थ ठरू पाहते पण 'अर्थवद्ग्रहणे' ही परिभाषा मानल्यानेंच ते पृथक् ग्रहण व्यर्थ ठरत नाही, कारण फणादि 'भ्राजृ' हा संपूर्ण शब्द अर्थवान् असून त्या धातूतील 'राजृ' हा अवयव अनर्थक असल्यामुळें, त्या अनर्थक अवयवाचे 'राजृ' या अर्थवान् धातूनें ग्रहण होऊ शकत नाहीं व त्यामुळें जर त्या सूत्रात फणादि 'भ्राज' धातुचे पृथक् ग्रहण केले नसते तर 'विभ्राट्' असे इष्ट रूप सिद्ध होऊ शकले नसते. अशा रीतीनें ते 'भ्राज' धातूचे त्या सूत्रात केलेले पृथक् ग्रहण चरितार्थ ठरून 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचे ज्ञापक ठरतें. आता कोणी असं म्हणेल कीं, अफणादि 'भ्राजृ' धातु धातुपाठात ऋदित् पठित केला आहे याचे कारण हे की, त्या धातूपुढें 'णि' व 'चङ्' प्रत्यय आले असता 'णौ चङ्युपधाया: ह्रस्व' सू २३१४ या सूत्रानें जें उपधाह्रस्वकार्य प्राप्त होतें ते, तो धातु ऋदित् केला असल्यामुळें, 'नाग्लोपिशास्वृदिताम्' सू. २५७२ या निषेधान्वयें होऊ नये. पण या म्हणण्यात कांहीच अर्थ नाही, कारण 'भ्राज्' धातूपुढें 'णि' व 'चङ्' प्रत्यय आले असतां 'भ्राजभास' सू २५६५ या सूत्रानें विकल्पेंकरून उपधाह्रस्वकार्य होणे सांगितले असल्यामुळें, त्या धातूला 'नाग्लोपि' हें

निषेधक सूत्र लागूच पडत नाही व उपधाह्रस्वकार्य, ते निषेधक सूत्र असून देखील, विकल्पें करून होतेच. मग येथें सहज असा प्रश्न येतो की अफणादि 'भ्राजृ' धातु धातुपाठात ऋदित् का पठित केला आहे या प्रश्नाचे उत्तर हेच असू शकतें की, तो धातु अनुदात्तेत् होऊन 'अनुदात्तङित आत्मनेपदम्' सू २१५७ या सूत्रान्वयें आत्मनेपदी ठरावा. पण तो धातु ऋदित् पठित न करिता धातुपाठात 'भ्राज' असा त्यातील अन्त्य अकार अनुनासिक करून अनुनासिकान्त पठित केला व तो अन्त्य अकार अनुदात्तस्वरयुक्त पठित केला तरी 'उपदेशेऽजनुनासिक इत्' सू. ३ या सूत्रानें तो अनुनासिक अकार इत्संज्ञक ठरून 'अनुदात्तङित' या सूत्रानें अफणादि 'भ्राज' धातु आत्मेनपदी होऊ शकतोच त्याचप्रमाणे तो धातु 'ऋभ्राज' असा पठित केला व त्यातील 'ऋ' अनुनासिक व अनुदात्त पठित केला तरी देखील, वर सांगितल्याप्रमाणे, तो धातु आत्मनेपदी ठरू शकतोच. म्हणून कोणतादि संदेह उत्पन्न न व्हावा याकरिता अफणादि 'भ्राज' धातु धातुपाठात 'भ्राजृ' असा ऋदित् पठित न करिता तो धातु 'ऋभ्राज' किंवा 'भ्राज' असाच पठित करणे योग्य आहे. तसे केले व 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राज' चे जागी 'राजृ' असा पाठ केला आणि त्या सूत्रातून 'भ्राज' धातु नाहीसा केला तर त्या सूत्रातील 'राजृ' धातूनें, वर सांगितल्याप्रमाणें, अफणादि 'ऋभ्राज' किंवा 'भ्राज' धातूचे ग्रहण होऊ शकणार नाहीं व अर्थवद्ग्रहणपरिभाषा न मानल्यास, फणादि 'भ्राजृ' धातूचेच ग्रहण होऊ शकेल. असें असून देखील पाणिनीनें 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात फणादि 'राजृ' धातु पठित करून पुन्हा फणादि 'भाजृ = भ्राज' धातूचे त्या सूत्रात पृथक् ग्रहण केलें असल्यामुळें, त्यावरून हें ज्ञापित होतें की, फणादि 'भ्राजृ' धातूत 'राजृ' हा अवयव अर्थवान् नसून अनर्थक असल्यामुळें, 'राजृ' या अर्थवान् धातूनें फणादि 'भ्राजृ' धातूतील अनर्थक 'राजृ' चे ग्रहण होऊ शकत नाही व अशा रीतीनें त्या सूत्रात फणादि 'भ्राज' धातूचे

केलेले पृथक् ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचे ज्ञापक ठरते असे जें सीरदेवानें म्हटले आहे ते योग्य ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'प्रादूह' या प्रकृत वार्तिकात 'एष' या (अव्यय नसणाऱ्या कृदन्त) शब्दासह 'एष्य' हा शब्द उच्चारला असल्यामुळें साहचर्यन्यायान्वयें, अनव्यय-म्हणजे अव्यय नसणाऱ्या ण्यत्प्रत्ययान्त कृदन्त-'एष्य' शब्दाचेच ग्रहण होते. ('इष्' धातूहून 'भावे' सू ३१८४ किंवा 'अकर्तरिच कारके' सू. ३१८६ या सूत्रानें 'घञ्' प्रत्यय केला असता, 'पुगन्तलघूपधस्य च' सू. २१८९ या सूत्रानें उपधेचा गुण होऊन 'एष' हे घञ्प्रत्ययान्त रूप होते, व त्या धातूहून 'ऋहलोर्ण्यत्' सू. २८७२ या सूत्रानें 'ण्यत् = य' प्रत्यय केला असता 'एष्य' असे ण्यत्प्रत्ययान्त रूप होते. दीक्षित म्हणतात की, 'एष' या अनव्यय कृदन्तासह 'एष्य' हा शब्द प्रकृत वार्तिकात उच्चारला असल्यामुळें 'सहचरितासहचरितयो'-परि. ११२-या परिभाषान्वयें ण्यत्प्रत्ययान्त कृदन्त 'एष्य' याचेच ग्रहण होऊ शकते व 'क्त्वातोसुन्कसुनः' सू. ४५० या सूत्रान्वयें अव्ययसंज्ञक असणाऱ्या 'प्र + इष् + ल्यप् = प्रेष्य' अशा ल्यबन्तरूपाचे ग्रहण होऊ शकत नाही ) म्हणून णिजन्त 'इष्' धातूहून क्त्वाप्रत्यय केला असता त्या प्रत्ययाचे जागी ल्यबादेश झाल्यावर ('प्र + एष्य' या स्थली ) प्रकृत वार्तिकान्वयें वृद्धिरूप एकादेश न होता पररूप एकादेशच होऊन 'प्रेष्य गत.' असा प्रयोग सिद्ध होतो. ('प्र + इष् + णिच् + क्त्वा' या स्थली 'पुगन्तलघूपधस्य च' सू. २१८९ या सूत्रानें उपधेचा गुण होऊन व 'समासेऽनञ्पूर्वे क्त्वो ल्यप्' सू. ३३३२ या सूत्रानें क्त्वाप्रत्ययाचे जागीं 'ल्यप् = य' असा आदेश होऊन आणि 'णेरनिटि' सू. २३१३ या सूत्रानें णिचा लोप होऊन 'प्र + एष्य' अशी स्थिति झाली असता, येथें 'एष्य' हें ल्यप्प्रत्ययान्त अव्यय असल्यामुळें प्रकृत वार्तिकान्वयें वृद्धिरूप एकादेश न होतां 'एङि पररूपम्' सू. ७८ या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'प्रेष्य' असे रूप होतें, व 'प्रैष्य' असे रूप होत नाही. येथें हें

लक्षात ठेवावें कीं, 'क्त्वा' चे जागीं झालेला 'ल्यप्' आदेश 'स्थानिवदादेशः' या सूत्रान्वयें 'क्त्वा' च आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत असल्यामुळें, 'क्त्वातोसुन्कसुनः' या सूत्रान्वयें ल्यबन्त शब्द देखील अव्ययसंज्ञक ठरतो )

शब्दरत्न--ज्ञापकमितीति। भ्राजौ राजेरपि सत्वेन राजिग्रहणेनैव सिद्धेस्तद् व्यर्थं सज्ज्ञापकमिति भावः। तथाभूतस्यैवेति। फणादेरेवेत्यर्थः। राजृइति पठित्वेति। न चैवमनुबन्धनिर्देशाद्राराष्टीत्यादौ यङ्लुकि षत्व न स्यादिति वाच्यम्, यङ्लुकश्छान्दसत्वात्, "श्तिपा शपा" इत्यस्यानित्यत्वाच्च, भाष्ये तस्यानुक्तत्वाच्च। एतेन फणादित्वेन ग्रहणे गणेन ग्रहणाद्यङ्लुकि न स्यादित्यपास्तम्, गणेन निर्देशाभावाच्च। राट्, विभ्राट्, इत्यादौ राजृत्व तु भूतपूर्वगत्या, राशब्दपूर्वकजृधातोः क्विपि निष्पन्नराजृशब्दे नपुंसके न षत्व, सूत्रे राजृ इत्यनुनासिकस्य पाठात्। सुपठत्वाच्चेति। एवञ्च "भ्राजभास" इति सूत्रे भ्राजिग्रहण न कार्यमिति बोध्यम्। सोरस्वोक्तमिति। अत्रारुचिबीज तु वश्चादिसाहचर्येण धातुसञ्ज्ञकराजेर्ग्रहण स्यादिति भ्राजि ग्रहणस्यावश्यकत्वम्। किञ्च भ्राजन्तर्गतराजेर्न ऋकारानुबन्धत्वं, तस्य समुदायानुबन्धत्वादिति।

मनोरमेंत 'राजे. पृथग् भ्राजिग्रहणमिह ज्ञापकम्' असें जें म्हटले आहे त्याचे कारण हे की, 'भ्राजृ' धातूमध्यें देखील 'राजृ' हा अवयवरूपानें असल्यामुळें, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राजृ' धातूच्या ग्रहणानेंच 'भ्राजृ' धातूचे ग्रहण होत असून पुन्हा त्या सूत्रात जें 'भ्राजृ' धातूचे ग्रहण केले आहे ते व्यर्थ ठरत असल्यामुळें (अर्थवद्ग्रहणपरिभाषा असल्यामुळें तें चरितार्थ ठरून त्या परिभाषेचे) ज्ञापक ठरते. (याचे विवरण मनोरमेंत केलेच आहे) मनोरमेंतील 'तथाभूतस्यैव' याचा 'फणादेरेव,' म्हणजे फणादिगणात पठित असलेल्या 'भ्राजृ' धातूच्या अन्त्य जकाराचे षत्व व्हावे याकरिता 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात त्या फणादि 'भ्राजृ' धातूचे

केलेले पृथक् ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचे ज्ञापक ठरतें असं जें सीरदेवानें म्हटले आहे ते योग्य ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'प्राद्वह' या प्रकृत वार्तिकात 'एष' या (अव्यय नसणाऱ्या कृदन्त) शब्दासह 'एष्य' हा शब्द उच्चारला असल्यामुळें साहचर्यन्यायान्वयें, अनव्यय-म्हणजे अव्यय नसणाऱ्या ण्यत्प्रत्ययान्त कृदन्त-'एष्य' शब्दाचेच ग्रहण होते ('इष्' धातूहून 'भावे' सू ३१८४ किंवा 'अकर्तरिच कारके' सू ३१८६ या सूत्रानें 'घञ्' प्रत्यय केला असता, 'पुगन्तलघूपधस्य च' सू २१८९ या सूत्रानें उपधेचा गुण होऊन 'एष' हे घञ्प्रत्ययान्त रूप होते, व त्या धातूहून 'ऋहलोर्ण्यत्' सू २८७२ या सूत्रानें 'ण्यत् = य' प्रत्यय केला असता 'एष्य' असे ण्यत्प्रत्ययान्त रूप होते दीक्षित म्हणतात की, 'एष' या अनव्यय कृदन्तासह 'एष्य' हा शब्द प्रकृत वार्तिकात उच्चारला असल्यामुळें 'सहचरितासहचरितयो -परि. ११२-या परिभाषान्वयें ण्यत्प्रत्ययान्त कृदन्त 'एष्य' याचेच ग्रहण होऊ शकतें व 'क्त्वातोसुन्कसुन ' सू ४५० या सूत्रान्वयें अव्ययसंज्ञक असणाऱ्या 'प्र + इष + ल्यप् = प्रेष्य' अशा ल्यबन्तरूपाचे ग्रहण होऊ शकत नाही ) म्हणून णिजन्त 'इष्' धातूहून क्त्वाप्रत्यय केला असता त्या प्रत्ययाचे जागीं ल्यबादेश झाल्यावर ('प्र + एष्य' या स्थली ) प्रकृत वार्तिकान्वयें वृद्धिरूप एकादेश न होता पररूप एकादेशच होऊन 'प्रेष्य गत ' असा प्रयोग सिद्ध होतो. ('प्र + इष् + णिच + क्त्वा' या स्थली 'पुगन्तलघूपधस्य च' सू २१८९ या सूत्रानें उपधेचा गुण होऊन व 'समासेऽनञ्पूर्वे क्त्वो ल्यप्' सू ३३३२ या सूत्रानें क्त्वाप्रत्ययाचे जागीं 'ल्यप् = य' असा आदेश होऊन आणि 'णेरनिटि' सू २३१३ या सूत्रानें णिचा लोप होऊन 'प्र + एष्य' अशी स्थिति झाली असता, येथें 'एष्य' हे ल्यप्प्रत्ययान्त अव्यय असल्यामुळें प्रकृत वार्तिकान्वयें वृद्धिरूप एकादेश न होता 'एङि पररूपम्' सू ७८ या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'प्रेष्य' असं रूप होतं, व 'प्रैष्य' असे रूप होत नाही. येथें हे

लक्षात ठेवावे कीं, 'क्त्वा' चे जागीं झालेला 'ल्यप्' आदेश 'स्थानिवदादेशः' या सूत्रान्वयें 'क्त्वा' च आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत असल्यामुळें, 'क्त्वातोसुन्कसुनः' या सूत्रान्वयें ल्यबन्त शब्द देखील अव्ययसंज्ञक ठरतो.)

शब्दरत्न—ज्ञापकमितीति । भ्राजौ राजेरपि सत्वेन राजिग्रहणेनैव सिद्धेस्तद् व्यर्थं सज्ज्ञापकमिति भावः । तथाभूतस्यैवेति । फणादेरेवेत्यर्थः । राजृइति पठित्वेति । न चैवमनुबन्धनिर्देशाद्राराष्ट्रीत्यादौ यङ्लुकि षत्वं न स्यादिति वाच्यम्, यङ्लुकश्छान्दसत्वात्, "श्तिपा शपा" इत्यस्यानित्यत्वाच्च, भाष्ये तस्यानुक्तत्वाच्च । एतेन फणादित्वेन ग्रहणे गणेन ग्रहणाद्यङ्लुकि न स्यादित्यपास्तम्, गणेन निर्देशाभावाच्च । राट्, विभ्राट्, इत्यादौ राजृत्व तु भूतपूर्वगत्या, राशब्दपूर्वकजुधातोः क्विपि निष्पन्नराजृशब्दे नपुंसके न षत्वं, सूत्रे राजृ इत्यनुनासिकस्य पाठात् । सुपठत्वाच्चेति । एवञ्च "भ्राजभास" इति सूत्रे भ्राजिग्रहण न कार्यमिति बोध्यम् । सोरदेवोक्तमिति । अग्रादिबीज तु व्रश्चादिसाहचर्येण धातुसञ्ज्ञकराजेर्ग्रहण स्यादिति भ्राजि ग्रहणस्यावश्यकत्वम् । किञ्च भ्राजन्तर्गतराजेर्न ऋकारानुबन्धत्वं, तस्य समुदायानुबन्धत्वादिति ।

मनोरमेंत 'राजेः पृथग् भ्राजिग्रहणमिह ज्ञापकम्' असे जें म्हटले आहे त्याचे कारण हें की, 'भ्राजृ' धातूमध्यें देखील 'राजृ' हा अवयवरूपानें असल्यामुळें, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राजृ' धातूच्या ग्रहणानेंच 'भ्राजृ' धातूचे ग्रहण होत असून पुन्हा त्या सूत्रात जें 'भ्राजृ' धातूचे ग्रहण केले आहे तें व्यर्थ ठरत असल्यामुळें (अर्थवद्ग्रहणपरिभाषा असल्यामुळें तें चरितार्थ ठरून त्या परिभाषेचें) ज्ञापक ठरतें. (याचे विवरण मनोरमेंत केलेच आहे) मनोरमेंतील 'तथाभूतस्यैव' याचा 'फणादेरेव,' म्हणजे फणादिगणात पठित असलेल्या 'भ्राजृ' धातूच्या अन्त्य जकारास षत्व व्हावें याकरितां 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात त्या फणादि 'भ्राजृ' धातूचे

पृथक् ग्रहण केले आहे, असा अर्थ आहे 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राज' धातु 'राजृ' असा पठित केला तर तशा अनुबन्धनिर्देशामुळें 'राराष्टि' इत्यादि यङ्लुकाच्या रूपात षत्व होणार नाहीं असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे बरोबर नाहीं, कारण यङलुकाचा प्रयोग वेदातच होत असतो व दुसरे असे की, 'श्तिपा शपा'–परि. १३१–ही परिभाषा अनित्य आहे आणि तिसरे असे कीं या परिभाषेचा भाष्यात कोठेंहि उल्लेख केला नाहीं ('राज्+यङ+ति' या स्थली 'यङोऽचि च' सु २६५० या सूत्रानें यङ्प्रत्ययाचा लुक् होऊन व प्रत्ययलक्षणानें 'सन्यङो' सू २३९५ या सूत्रानें धातूचे द्विर्वचन होऊन 'ह्रस्व' सू २१८० या सूत्रानें अभ्यासातील आकार ऱ्हस्व केल्यावर 'दीर्घोऽकित' सू २६३२ या सूत्रानें पुन्हा अभ्यास दीर्घ करून 'राराज्+ति' अशी स्थिति झाली असता, 'व्रश्चभ्रस्ज' सू २९४ या सूत्रानें 'राज्' धातूच्या अन्त्य जकाराचे षत्व पावले आहे पण जर तो धातु 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राजृ' असा ऋकारानुबन्धसहित पठित केला तर, 'श्तिपा शपाऽनुबन्धेन निर्दिष्ट यद्गणेन च । यत्रैकाज्ग्रहणं चैव पञ्चैतानि न यङ्लुकि ॥' –परि १३१–ही परिभाषा असल्यामुळें, 'राजृ' या अनुबन्धयुक्त धातूच्या यङ्लुकाच्या वरील रूपात जकाराचे षत्व होणार नाही व 'राराष्टि' असे इष्ट रूप सिद्ध न होतां, 'चोः कु' सू ३७८ या सूत्रानें अन्त्य जकाराचे कुत्व होऊन, म्हणजे गकार होऊन, व नंतर 'खरि च' सू १२१ या सूत्रानें त्या गकाराचा ककार होऊन 'राराक्ति' असे अनिष्ट रूप सिद्ध होण्याची आपत्ति येईल म्हणून 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रांत 'राजृ' असा ऋकारानुबन्धसहित धातु पठित करावा असे जें दीक्षीतांनी मनोरमेंत म्हटले आहे तसे केल्यानें वरील आपत्ति येत असल्यामुळें, 'राजृ' असा पाठ त्या सूत्रात करणे योग्य नाही असें शब्दकाराचें म्हणणे आहे या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, यङ्लुकाचा प्रयोग भाषेंत होत नसून केवळ वेदांतच होत असतो व 'छन्दसिदृष्टानुविधि.' या न्यायान्वयें वेदात

जसा प्रयोग आढळत असेल तसा प्रयोग शुद्ध मानलाच पाहिजे. दुसरें असे की, जे वैयाकरण 'श्तिपा शपाऽनुबन्धेन' ही परिभाषा मानतात त्याच्याच मतें ती परिभाषा अनित्य असल्यामुळें जेथें ती प्रवृत्त केल्यानें अनिष्ट रूप सिद्ध होऊ पाहते तेथें त्या परिभाषेची तिच्या अनित्यत्वामुळें प्रवृत्ति न करिता इष्ट रूपाची सिद्धि करण्यात काहीं अडचण येत नाही. तिसरे असे की, वरील परिभाषा भाष्यात कोठेंहि पठित नसल्यामुळें व भाष्यकारानी तिचा कोठेंहि उपयोग केला नसल्यामुळें, ती भाष्यानुक्त परिभाषा स्वीकारता येत नाही व त्यामुळें जरी 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राजृ' असा ऋकारानुबन्धसहित धातु पठित केला तरी, ती परिभाषा न मानल्यानें 'राराज् + ति' या स्थली 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रानें 'राज्' यातील अन्त्य जकाराचे षत्व होऊन व 'ष्टुना ष्टुः' सू ११३ या सूत्रानें 'ति' प्रत्ययातील तकाराचा टकार होऊन 'राराष्टि' असे इष्ट रूप सिद्ध होण्यात काहीं अडचण येत नाही.) म्हणून 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात फणादिगणात पठित असलेल्या 'राजृ' धातूचे *गणरूपानें ग्रहण केल्यास त्या धातूच्या यङ्लुकाच्या* ('राराष्टि' इत्यादि) रूपात अन्त्य जकाराचे षत्व होऊ शकणार नाही असे जें कित्येक वैयाकरणाचे म्हणणे आहे तें (वर दिलेल्या कारणामुळें) चूक ठरतें. दुसरे असें की, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात गणाचा निर्देश करून षत्वकार्य होणे सांगितले नाही. (कित्येक वैयाकरणाचे असें म्हणणे आहे की, 'श्तिपा शपाऽनुबन्धेन'— परि. १३१—या परिभाषेंत 'निर्दिष्ट यद्गणेन च' असे वचन असल्यामुळें, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या व फणादिगणात अन्तर्भूत असलेल्या 'राज्' धातूचे यङ्लुकाचे रूप करतेवेळी 'राज्' यातील अन्त्य जकाराचे षत्व होऊ शकत नाही. त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'राज्' धातूचे गणरूपानें ग्रहण केल्यास त्या धातूचे ठिकाणी '*निर्दिष्ट यद्गणेन च*' हें वचन प्रवृत्त होऊन जकाराचे षत्व होणार नाही. यावर शब्दरत्नकार असे उत्तर

देतात की, 'श्तिपा शपा' ही परिभाषा नसल्यामुळें व वर जीं कारणे दिली आहेत त्या कारणामुळें, त्या वैयाकरणाचे म्हणणे आपोआपच चूक ठरते आणखी असें कीं, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात फणादिगणाचा निर्देश करून षत्वकार्य होणे सांगितले नसल्यामुळें, त्या गणात अन्तर्भूत असलेल्या 'राज' धातूच्या जकाराचे षत्व होण्यात, वरील परिभाषा मानली तरी ती आड येत नाही, कारण त्या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या फणादिगणान्तर्भूत 'राज' धातूचे फणादित्व हे ग्राहकतावच्छेदक-ग्रहण करण्यास कारणीभूत लिङ्ग-नसून 'राजत्व -ता 'राज्' धातु आहे- हे ग्राहकतावच्छेदक आहे म्हणून त्या वैयाकरणानी केलेली शंका अनुपपन्न ठरते असा शब्दरत्न-काराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'राट्, विभ्राट्' इत्यादि स्थळी 'राज' चे ठिकाणी 'राजृत्व' आहे (व 'भ्राज' चे ठिकाणी 'भ्राजृत्व' आहे) असे जें मानले जाते ते भूतपूर्वगतीनें-पूर्व स्वरू-पाचा आश्रय केल्यानें-मानले जाते ('राजृ' किंवा 'भ्राजृ' धातूहून क्विप्' व 'सु' प्रत्यय करून 'राट्, विभ्राट्' इत्यादि रूपाची सिद्धि करतेवेळीं 'राजृ' किंवा 'भ्राजृ' असा ऋकारानु-बन्धसहित धातु राहत नसून त्यातील ऋकारानुबन्ध नाहीसा होऊन त्या धातूचे 'राज्, भ्राज्' असे अनुबन्धरहित स्वरूप होते व फणादिगणान्तर्भूत 'राजृ, भ्राजृ' हे धातु धातुपाठात ऋकारानु-बन्धसहित पठित केले असल्यामुळें, तशा फणादिगणान्तर्भूत 'राजृ, भ्राजृ' धातूनाच 'व्रश्चभ्रस्ज' हे सूत्र लागू पडते असे मानले तर, त्या धातूचा अनुबन्ध नाहीसा झाल्यावर त्याचे ठिकाणी 'व्रश्चभ्रस्ज' हे सूत्र प्रवृत्त करता येऊ शकणार नाही अशी शंकाकाराची शंका आहे या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, जरी 'क्विप' व 'सु' प्रत्यय करतेवेळी 'राजृ, भ्राजृ' या धातूचा अनुबन्ध नाहीसा होऊन त्याचे 'राज्, भ्राज्' असे रूप होते तरी, त्याचे 'राजृ, भ्राजृ' असे जें मूळचे पूर्व स्वरूप आहे त्या पूर्व स्वरूपाचा आश्रय केल्यानें, 'साम्प्रतिकाभावेभूतपूर्वगतिः'- परि ७७- या

न्यायान्वयें व 'अनुबन्धसहितस्य निर्देशो सर्वत्र भूतपूर्वस्य गतिरेव सुप्रसिद्धा' या वचनान्वयें, तशा अनुबन्धरहित धातूंना देखील 'व्रश्चभ्रस्ज' हे सूत्र लागू पडते व त्यामुळें त्या धातूतील अन्त्य जकाराचे षत्व होण्यात काही अडचण येत नाही.) 'रा' शब्दपूर्वक 'जॄ' धातूचे 'राजॄ' असे जें रूप होते त्याचे ('ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' सू. ३१८ या सूत्रानें ऱ्हस्व करून) 'राजृ' असे नपुंसकाचे रूप केल्यावर तशा रूपात षत्व होत नाहीं; कारण 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राजृ' असा जो धातु (दीक्षितांनी) पठित करणे सांगितले आहे त्यातील अन्त्य ऋकार अनुनासिक आहे. (शकाकाराचे असे म्हणणे आहे की, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राज' या शब्दाचे जागी 'राजृ' असा पाठ केला तर, 'रातीति रा. त जृणातीति राजृ' या नपुंसकाच्या रूपात 'राजृ' हा शब्द असल्यामुळें त्यातील अन्त्य वर्णाचे षत्व होण्याची आपत्ति येईल या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'राज' चे जागी 'राजृ' असा शब्द पठित करावा असे जें दीक्षितांनी म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, त्या शब्दातील अन्त्य ऋकार अनुनासिक पठित करावा. तो ऋकार तसा पठित केल्यानें 'उपदेशेऽजनुनासिक इत्' सू ३ या सूत्रानें तो इत्संज्ञक होऊन व 'तस्य लोपः' सू. ६२ या सूत्रानें त्याचा लोप होऊन 'राज्' असे जें रूप होते त्यातील अन्त्य जकाराचे 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रानें षत्व होते शकाकारानें वर सांगितल्याप्रमाणे सिद्ध केलेल्या 'राजृ' या नपुंसकाच्या रूपात अन्त्य ऋकार अनुबन्ध व अनुनासिक नसल्यामुळें, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात अनुनासिकान्त व ऋकारानुबन्धसहित पठित केलेल्या 'राजृ, शब्दानें तशा अनुबन्धरहित निरनुनासिकान्त नपुंसक प्रातिपदिकाचे ग्रहण होऊ शकत नाही व त्यामुळें तशा रूपाचे ठिकाणी 'व्रश्चभ्रस्ज' हे सूत्र प्रवृत्त होऊ शकत नाही आणि षत्व होण्याची आपत्ति येत नाही या खेरीज येथें असे देखील म्हणता येते की, 'लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम्'–

परि. ११४–ही परिभाषा असल्यामुळें 'व्रश्चभ्रस्ज' हे सूत्र 'राज्' या प्रतिपदोक्त सूत्रनिर्दिष्ट धातूलाच लागू पडते व वर प्रमाणे सिद्ध केलेल्या 'राज्' या लाक्षणिक रूपाला ते सूत्र लागू पडत नाही व त्यामुळें त्या रूपात षत्व होण्याची आपत्ति मुळीच येत नाही ) 'तत्स्थानेऽकारस्य सुपठत्वाच्च' असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, अफणादि 'भ्राज' धातु 'भ्राज्' असा जो धातुपाठात पठित केला आहे तसा तो पठित न करता 'भ्राज' असा धातुपाठात पठित केल्यास, 'भ्राजभ्रास' सू २५६५ या सूत्रात 'भ्राज' धातूचे ग्रहण करण्याची काही आवश्यकता राहत नाही, (कारण फणादिगणातील 'भ्राज' धातु 'भ्राजृ' असा धातु-पाठात ऋदित् पठित केला असल्यामुळें त्याला 'नाग्लोपि' सू २५७२ हा निषेध लागून त्या णिजन्त धातूच्या चङाच्या रूपात 'णौ चङि' सू २३१४ या सूत्रानें प्राप्त होणारे उपधाह्रस्वकार्य न होता 'अबभ्राजत्' असे रूप सिद्ध होऊ शकते, व अफणादि 'भ्राज्' धातु धातुपाठात 'भ्राज' असा पठित केल्यास, त्याला 'नाग्लोपि' हा निषेध लागू पडत नसल्यामुळें, 'णौ चङि' या सूत्रानें उपधाह्रस्वकार्य होऊन व सन्वद्भाव होऊन आणि 'सन्यत' सू. २३१७ *या सूत्रानें अभ्यासातील अकाराचा इकार* होऊन 'अबिभ्रजत्' असे रूप सिद्ध होऊ शकते सारांश दीक्षितानी 'भ्राज्' धातुसंबधानें धातुपाठात जो फरक करणे सुचविले आहे तसा फरक केल्यास, म्हणजे अफणादि 'भ्राज' धातु 'भ्राज' असा पठित केल्यास, फणादि व अफणादि 'भ्राज' धातूची 'अबभ्राजत्' व 'अबिभ्रजत्' अशी रूपें अनुक्रमें सहज सिद्ध होऊ शकत असल्या-मुळें, त्या रूपाची विकल्पेंकरून सिद्धि होण्याकरिता 'भ्राजभ्रास' या विकल्पविधायक सूत्रात 'भ्राज' धातूचे ग्रहण करण्याची काही आवश्यकता राहत नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'सीरदेवोक्त ज्ञापकमपि सम्यगेव' असे जें दीक्षितानी मनोरमेंत सीरदेवाचा नामनिर्देश करून म्हटल आहे त्यावरून हे

सूचित होतें की, त्याना सीरदेवाचे मत मान्य नाही व त्याचे कारण हें की, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'व्रश्च, भ्रस्ज' इत्यादि धातूच्या साहचर्यामुळें, धातुभजक 'राज'चेच ग्रहण होईल (व 'भ्राज'मधील 'राज'चे ग्रहण होणार नाहीं, कारण 'भ्राज' या धातूतील 'राज' हा अवयव धातु नाही आणि म्हणून त्या सूत्रात) 'भ्राज' धातूचें पृथक् ग्रहण आवश्यक ठरते (व अशा रीतीनें तें ग्रहण चरितार्थ ठरत असल्यामुळें, ते अर्थवद्ग्रहणपरिभाषेचें ज्ञापक मानता येत नाही.) दुसरे असे की, (फणादिगणात पठित असलेल्या 'भ्राज' धातूला) जो ऋकारानुबन्ध लावलेला आहे तो त्या 'भ्राज' धातूतील 'राज' या अवयवाला लावलेला अनुबन्ध नसून, 'भ्राज' या संपूर्ण समुदायाला लावलेला अनुबन्ध आहे. (म्हणून 'व्रश्च-भ्रस्ज' या सूत्रात पठित केलेल्या फणादि 'राजृ' धातूनें फणादि 'भ्राजृ' धातूचें ग्रहण होऊ शकत नाही, कारण 'यदुपदेशप्रयोज्या यस्येत्संज्ञा तदनुबन्धत्वमेव तस्य' या न्यायान्वयें 'भ्राज' धातूला लावलेला ऋकारानुबन्ध त्या धातूतील 'राज' या अवयवाचा अनुबन्ध मानतां येत नाही व अशा रीतीनें 'राजृ'नें 'भ्राजृ'चे ग्रहण होऊ शकत नसल्यामुळें, 'व्रश्चभ्रस्ज' या सूत्रात 'भ्राज' धातूचें पृथक् ग्रहण असणे आवश्यक आहे, आणि म्हणून त्या सूत्रातील 'भ्राज' धातूचे पृथक् ग्रहण चरितार्थ व आवश्यक ठरत असल्यामुळें, तें ग्रहण 'अर्थवद्ग्रहणे' या परिभाषेचें ज्ञापक मानता येत नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे )

मनोरमा—प्रवत्सतरेति । अत्र कालापानुसारिणो वत्सरशब्द-मपि पठित्वा वत्सरे ऋणम् वत्सरार्णमित्युदाहरन्ति । अपरे तु कम्बलशब्दमपि पठन्ति तत्सर्वं भाष्यादिविरुद्धम् ॥

('एत्येधत्यूठ्सु' सू. ७३ या सूत्रावरील कौमुदींत 'प्रवत्सतर-कम्बलवसनदशार्णानामृणे' असे जें वार्तिक पठित केलें आहे) त्या वार्तिकांत कलापतन्त्रानुसारी वैयाकरण 'वत्सर' हा शब्द देखील

पठित करून त्याचे 'वत्सरे देयमृण वत्सरार्णम्' असे उदाहरण देतात. इतर वैयाकरण त्या वार्तिकात 'वत्स' या शब्दाचा देखील पाठ करितात पण हे सर्व भाष्यादिविरुद्ध आहे. ('एत्येधत्यूठ्सु' ६ १. ८९ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी 'प्रवत्सतरकम्बल-वसनाना च ऋणे' व ''ऋणदशाभ्या च' ही दोन वार्तिके पठित केली आहेत व या दोन वार्तिकात ज्या शब्दाचा निर्देश केला आहे तेवढयाच शब्दाचा कौमुदीत पठित केलेल्या वार्तिकात निर्देश केला आहे. भाष्यात पठित केलेल्या वरील दोन वार्तिकात 'वत्सर' व 'वत्स' या शब्दाचा निर्देश केला नसल्यामुळें, जे वैयाकरण त्या दोन शब्दापुढे 'ऋण' हा शब्द आल्यास वृद्धिरूप एकादेश होतो असे म्हणतात ते त्याचे म्हणणे वर दिलेल्या दोन वार्तिकाच्या व भाष्याच्या विरुद्ध ठरते आणि म्हणून त्याचे म्हणणे बरोबर मानता येत नाहीं असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न-- भाष्यादिविरुद्धमिति । तदनुक्तत्वादिति भावः ।।

मनोरमेंत 'भाष्यादिविरुद्धम्' असे जें म्हटले आहे त्याचे कारण की, भाष्यात पठित केलेल्या (वरील दोन) वार्तिकात 'वत्सर' व 'वत्स' या शब्दाचा निर्देश केला नाही.

मनोरमा—अन्तादिवच्च इहैकः पूर्वपरयोरित्यनुवर्तते यथा-सख्यं चेत्यभिप्रेत्याह-पूर्वस्यान्तवदिति । स्थानिवत्सूत्रेणैव गतार्थमिदं सूत्रम् । न चाल्विध्यर्थमिदमिति भ्रमितव्यम्, अस्याप्यल्विधाव-निष्टत्वात् । अन्यथा अयजे इन्द्रमित्यत्र सवर्णदीर्घापत्तेः । तथा च वार्तिकम्—"न वा अताद्रूप्यातिदेशात्" इति । न विसर्ग इति । एतच्च 'सुखार्तः' इत्यादावपि तुल्यम् । अत्र च कार्यकालपक्षे बहिरङ्गत्वादसिद्धत्वमपि बोध्यम् । न च "नाजानन्तर्य-" इति निषेधः, यत्रान्तरङ्गे बहिरङ्गे वा अचोरा नन्तर्यं तत्रेति हरदत्तपक्षे तत्प्राप्तावपि यत्र पश्चात्प्रवर्तमाने ऽजानन्तर्यमिति कैयटमते निषेधा-प्राप्तेः । बह्वपेक्षत्वेन बहिरङ्गाया वृद्धावजानन्तर्यसत्त्वे ऽपि पश्चात्प्रवर्तमाने तदभावात् ।।

'अन्तादिवच्च' सू ७५ या सूत्रात 'एक: पूर्वपरयो.' सू ९८ या पूर्व सूत्राची अनुवृत्ति होत असल्यामुळें येथें यथासंख्यन्याय लागू पडतो आणि म्हणून या सूत्राचे 'योऽयमेकादेश. स पूर्वस्यान्तवत्पर-स्यादिवत्स्यात्' असे कौमुदींत व्याख्यान केले आहे. (प्रकृत सूत्रात 'एक. पूर्वपरयो:' या सूत्राची अनुवृत्ति होत असल्यामुळें, 'एक-पूर्वपरयो अन्तादिवच्च' असे ते सूत्र होते या सूत्रात 'एक पूर्वपरयो' हें उद्देश्य असून 'अन्तादिवत्' हें विधेय आहे. उद्देश्य 'पूर्व' व 'पर' याची संख्या दोन असून 'अन्त' व 'आदि' या विधेयाची देखील संख्या दोनच आहे, व अशा रीतीनें या सूत्रातील उद्देश्य व विधेय समानसंख्याक असल्यामुळें, 'यथासङ्ख्यमनुदेश: समानाम्' सू १२८ हें सूत्र प्रकृत सूत्राचे ठिकाणीं प्रवृत्त होऊन 'एकादेश: पूर्वस्य अन्तवत् परस्य आदिवद्भवति' असा सूत्रार्थ निष्पन्न होतो 'पूर्वस्य अन्तवत्' याला पूर्वान्तवद्भाव असे म्हणत असून 'परस्य आदिवत्' याला परादिवद्भाव असे म्हणतात हें लक्षात ठेवावे) 'स्थानिवदादेश.' सू. ४९ हें सूत्र असल्यामुळें त्या सूत्रानेंच 'अन्तादिवच्च' हे प्रकृत सूत्र गतार्थ होते, म्हणजे हें सूत्र असण्याची काही गरज नाहीं. (या पक्तीचे विवरण शब्दरत्नात करण्यात येईल. आतां येथें शंकाकार अशी शंका करतो कीं, 'स्थानिवदादेश:' या सूत्रात 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें व अल्विधि करतेवेळी ते सूत्र लागू पडत नसल्यामुळें, तसा विधि करतेवेळी देखील पूर्वान्त-वद्भावानें व परादिवद्भावानें स्थानिवद्भाव करता यावा याकरितां प्रकृत सूत्र मुद्दाम केले आहे व अशा रीतीनें ते सूत्र आवश्यक ठरत असल्यामुळें, 'स्थानिवत्सूत्रेणैव गतार्थमिदं सूत्रम्' हें म्हणणे योग्य ठरत नाहीं. या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात कीं,) अल्विधि करतेवेळीं 'अन्तादिवच्च' हे सूत्र लागू पडावे म्हणून ते आवश्यक ठरते हे म्हणणे बरोबर नाहीं, कारण अल्विधि करतेवेळी प्रकृत सूत्र प्रवृत्त केल्यानें देखील अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येते. अल्विधि करतेवेळीं प्रकृत सूत्र लागू पडतें असे मानल्यास,

इन्द्रम्' या स्थली सवर्णदीर्घ होण्याची आपत्ति येते. ('अयज+इट्+इन्द्रम्=अयज+इ+इन्द्रम्' या उदाहरणात 'अयज' ही प्रकृति व त्यापुढील 'इट्=इ' हा प्रत्यय या दोहोंचे सन्धिरूप अन्तरङ्गकार्य 'आद्गुणः' सू ६९ या सूत्रानें केल्यावर 'अयजे+इन्द्रम्' अशी स्थिति झाली असता, 'ए' हा गुणरूप एकादेश 'अन्तादिवच्च' या सूत्रान्वयें पूर्वान्तवद्भावानें इकारच आहे असे मानल्यास, 'अक सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रानें सवर्णदीर्घ होण्याची आपत्ति येते या उदाहरणात एकाराचे ठिकाणी इकार-बुद्धि करून सवर्णदीर्घकार्य करणे हे अलाश्रित कार्य आहे व असे स्थान्यलाश्रित कार्य करतेवेळी 'अन्तादिवच्च' हे सूत्र लागू पडत नसल्यामुळें, सवर्णदीर्घकार्य होण्याची आपत्ति टळते.) अल्विधि करतेवेळी 'अन्तादिवच्च' हे सूत्र लागू पडत नाही याला 'न वा अताद्रूप्यातिदेशात्' हे वार्तिक प्रमाण आहे. (शब्दरत्नाचे व्याख्यान करतेवेळी या वार्तिकाचे विवरण केले जाईल.) 'अन्तवद्भावेन पदान्तरेफस्य न विसर्गः' असे जें ('खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रावरील कौमुदीत) म्हटले आहे ते (जसे 'उपार्च्छति, प्रार्च्छति' या 'उपसर्गादृति धातौ' सू. ७४ या सूत्रावरील कौमुदीत दिलेल्या उदाहरणाना लागू पडते तसेच ते) 'सुखार्तः' इत्यादि उदाहरणाना देखील सारखेंच लागू पडते ('सुखेन ऋतः' या स्थली 'ऋते च तृतीयासमासे' या वार्तिकान्वयें 'सुख' यातील अन्त्य अकार व 'ऋत' या पदातील आद्य ऋकार या दोहोंचे जागीं 'आर्' असा वृद्धिरूप एकादेश होऊन 'सुखार्तः' असे रूप होतें. 'आर्' हा एकादेश पूर्वान्तवद्भावानें 'सुख' या पूर्व पदाचा अन्तावयव आहे असे मानल्यानें, पूर्व पदाच्या अन्ती रकार आहे असे मानता येतें व त्यामुळें 'खरवसानयो.' सू. ७६ या सूत्रानें 'सुखार्' यात पदान्ती असलेल्या रकाराचे जागीं विसर्ग पावतो. रेफाचे जागीं विसर्ग करणे हा जरी अल्विधि आहे तरी, तो स्थानिभूत अलाला मानून करणे नसून आदेश झाल्यावर

त्या आदेशात उत्पन्न झालेल्या रेफाचे जागी करणे असल्यामुळें, या ठिकाणी 'अनल्विधौ' हा प्रतिषेध लागू पडत नाही तसच रेफाचे ठिकाणी पदान्तत्व धर्म आणणें हा देखील अल्विधि नव्हे, कारण पदान्तत्वधर्म केवळ अल्चे ठिकाणी राहणारा धर्म नसून, अनल् समुदायाचे ठिकाणीं देखील राहणारा धर्म आहे म्हणून येथें रेफाचा विसर्ग करण्याची प्राप्ति होते तथापि 'खरवसानयो' या सूत्रावरील कौमुदीत सांगितल्याप्रमाणे 'उभयथर्क्षु' सू ३६३० व 'कर्तरि चर्षिदेवतयो' सू ३१६७ इत्यादि पाणिनीय निर्देश असल्यामुळें व त्या निर्देशात गुणरूप एकादेशातील अनत्य रेफाचे जागी विसर्ग पावला असून देखील पाणिनीनें विसर्ग केला नसल्यामुळें, 'पूर्वान्तवद्भावेन पदान्तत्व प्राप्तस्य रेफस्य विसर्गो न भवति' याचे वरील पाणिनीय निर्देश ज्ञापक ठरतात व त्या ज्ञापकान्वयें 'सुखार्त' या उदाहरणात रेफाचे जागी विसर्ग होत नाही) कार्यकालपक्ष मानल्यास ('सुखार्त' इत्यादि स्थली) वृद्धिरूप एकादेशकार्य बहिरङ्ग असल्यामुळें पदान्त रेफ असिद्ध ठरतो व त्यामुळें त्या रेफाचे जागीं विसर्ग होत नाहीं हें देखील लक्षात ठेवावे. ('मुख + ऋत' या स्थली वृद्धिरूप एकादेशकार्य दोन भिन्न पदात असणाऱ्या दोन वर्णांचे ठिकाणी होणारें कार्य पदद्वयाश्रित कार्य असल्यामुळें तें कार्य, 'खरवसानयो' या सूत्रानें पदान्त रेफाचा विसर्ग करणे या एकपदाश्रित कार्याच्या मानानें, बहिरङ्ग ठरत व 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे'-परि ५०-ही परिभाषा दीक्षिताच्या मतें कार्यकालपक्षात निरपवाद उपस्थित होत असल्यामुळें, जरी रेफाचा विसर्ग करणे हें त्रैपादिक कार्य आहे व वृद्धिरूप एकादेश करणे हें सापादिक कार्य आहे तरी, त्रैपादिक अन्तरङ्ग कार्याच्या दृष्टीनें सापादिक बहिरङ्ग कार्य असिद्ध ठरतें त्यामुळें विसर्गरूप त्रैपादिक अन्तरङ्ग कार्य करतेवेळीं 'आर्' हा बहिरङ्ग वृद्धिरूप एकादेश झालाच नाहीं असे मानावे लागत असल्यामुळें, रेफाचे जागीं विसर्गाची प्राप्तीच होत नाहीं. कार्यकालपक्षात देखील 'असिद्ध

बहिरङ्गमन्तरङ्गे' ही सापादिक परिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नाही असा पक्ष मानल्यास, प्रकृत स्थली रेफाचे जागी विसर्ग होत नाही याला वर सांगितलेले पाणिनीय निर्देशच प्रमाण मानले पाहिजेत) 'सुखार्त' इत्यादि उदाहरणांत 'नाजानन्तर्ये'-परि. ५१- हा निषेध लागू पडतो हे म्हणणे बरोबर नाही, कारण हरदत्ताच्या पक्षांत अन्तरङ्ग किंवा बहिरङ्ग कार्य करतेवेळी एका अचाच्या लगेच पुढे दुसरा अच् असल्यास जरी हा निषेध लागू पडतो तरी, कैयटाचे असे मत आहे की, जेथें बहिरङ्ग कार्य केल्यावर अन्तरङ्ग कार्याची प्राप्ति होते तेथें जर ते अन्तरङ्ग कार्य अचास होणे प्राप्त असेल व त्या अचाच्या लगेच पुढे त्या अन्तरङ्ग कार्याचे निमित्त असेल तर तेथेंच तो निषेध लागू पडतो, आणि म्हणून 'सुखार्त' इत्यादि उदाहरणांना तो निषेध लागू पडत नाही, कारण वृद्धिरूप एकादेशकार्य बह्वपेक्ष-अधिक निमित्ताची अपेक्षा करणारे-असल्यामुळें बहिरङ्ग ठरत असणारे ते कार्य करतेवेळी जरी एका अचाच्या लगेच पुढे दुसरा अच् आहे तरी, ते बहिरङ्ग कार्य केल्यानंतर जेव्हा (रेफाचा विसर्ग करणे या) अन्तरङ्ग कार्याची प्राप्ति होते तेव्हा तें कार्य अचास करणे नसल्या-मुळें, किंवा पुढे असणाऱ्या अचाच्या निमित्तामुळें 'नाजानन्तर्ये' हा निषेध लागू पडत नाही. ('सुख+ऋत.' या स्थलीं 'सुख' या पदातील अन्त्य अकार व 'ऋत.' या पुढील भिन्न पदातील आद्य ऋकार या दोन वर्णांचे ठिकाणी होणारे वृद्धिरूप एकादेशकार्य पदद्वयस्थितवर्णद्वयापेक्ष असून बह्वपेक्ष असल्यामुळें बहिरङ्ग आहे. हे बहिरङ्ग कार्य करतेवेळी 'अ' या अचापुढें 'ऋ' हा अच् आहे व हे कार्य करतेवेळीं रेफाचा विसर्ग करणे या अन्तरङ्ग कार्याची प्राप्तीच नाही; कारण त्यावेळी रेफ अस्तित्वातच नाही. बहिरङ्ग वृद्धिरूप एकादेशकार्य केल्यावरच रेफ अस्तित्वात येतो व 'सुखार्+त' अशी बहिरङ्ग कार्य होऊन स्थिति झाल्यावरच 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या सूत्रानें रेफाचा विसर्ग होणे या

अन्तरङ्ग कार्याची प्राप्ति होते ते अन्तरङ्ग कार्य अचास प्राप्त होत नसून 'र्' या हलास प्राप्त होते. म्हणून कैयटाच्या मताप्रमाणे 'नाजानन्तर्ये' ही निषेधक परिभाषा या उदाहरणास लागू पडत नाही व त्यामुळें 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' ही परिभाषा कार्यकालपक्षात लागू पडते व त्या पक्षात रेफाचा विसर्ग करतेवेळी बहिरङ्ग वृद्धिरूप एकादेशकार्य असिद्ध ठरत असल्यामुळें रकार नाहीच अशी बुद्धि केल्यानें विसर्गरूप अन्तरङ्ग कार्य होत नाही. मनोरमेंतील वरील पक्तीवरून हे स्पष्ट होते की, दीक्षितांना हरदत्ताचे मत मान्य नसून कैयटाचे मत मान्य आहे.)

शब्दरत्न– गतार्थमिदमिति । पूर्वपरयोरिति द्विवचननिर्देशेनोभयोरपि प्रत्येक स्थानित्वादिति भावः । एवं च प्राच्छतीत्यादौ विसर्गवारणाय ज्ञापकाश्रयणमपि न कार्यं, यतस्तत्र स्थानिवत्त्वेन रेफान्ते पदत्वं दुर्लभं, तस्य तत्स्थानि धर्मत्वाभावात् । आनुमानिकवचनकल्पनया प्र ऋच्छतीत्यस्य प्राच्छर्यादेशे तु समुदाये प्रशब्दधर्माणां स्थानिवत्त्वेन लाभेऽपि प्रारित्यत्र तदलाभेन रेफे पदान्तत्वस्य दुर्लभत्वादिति बोध्यम् । न चेति । "वर्णाश्रये विधावन्तादिवद्भावप्रतिषेधो वाच्यः" इत्यस्य प्रत्याख्यानमेतत्–न वा वक्तव्य ताद्रूप्यस्य = वर्णमात्रवृत्तिधर्मस्यानेनातिदेशाभावादिति तदर्थः । पूर्वस्य परस्य च समुदायस्यान्तादिभ्यां वर्णाभ्या पृथगवस्थिताभ्यां ये व्यवहाराः प्रातिपदिकत्व–सुबन्तत्व प्रत्ययत्वादयस्ते कृतैकादेशस्यापि भवन्तीत्यर्थात् । अत एव तुक्यसिद्धवचनं चरितार्थम् । अन्यथाऽधीत्येत्यादौ ह्रस्वत्वप्रयुक्ततुक्सिद्धेरसिद्धवचनवैयर्थ्यं स्पष्टमेव । अत एव खट्वाभिरित्यत्रैस् नेति दिक् । अत्र चेति । सुखार्त इत्यत्र, प्रार्च्छतीत्यत्र चेत्यर्थः । आद्ये विशिष्य ऋतशब्दस्य तृतीयासमाससापेक्षत्वेनान्त्ये उपसर्गत्वधातुत्वादिसापेक्षत्वेन वृद्धेर्बहिरङ्गत्वादिति भावः । अचोरानन्तर्यमिति । अचोऽजानन्तर्यनिमित्तमित्यर्थः । पश्चात्प्रवर्तमाने इति । अन्तरङ्गे इत्यर्थः । अत्र च "पत्वतुकोः– इति सूत्रस्थं तुग्ग्रहणं ज्ञापकम् । अन्यथाऽधीत्येत्यादौ ल्यप्प्रवृत्तये पूर्वं समासे तत्र जाते संहिताया नित्यत्वात् ,

ऽवस्थानासम्भवेन एकादेशे ह्यपि लुगपेक्षया पदद्वयसम्बन्धिवर्णद्वयापक्षैकादेशस्य बहिरङ्गतया ऽसिद्धत्वेन तद्वैयर्थ्यं स्पष्टमेव । तत्र पश्चात्प्रवर्तमाने लुवयचो ऽन्यानन्तर्यनिमित्तककार्यत्वान्न दोषः । अजानन्तर्यमिति । अचोऽन्यानन्तर्यमित्यर्थः ।।

'स्थानिवत्सूत्रेणैव गतार्थमिदं सूत्रम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हे कीं, ('अन्तादिवच्च' या प्रकृत सूत्रात 'एकः पूर्वपरयो' हे पूर्व सूत्र अनुवृत्त होत असून त्या अनुवृत्त सूत्रात) 'पूर्वपरयो' असा द्विवचनाचा निर्देश असल्यामुळें, ज्या दोन वर्णांचे जागीं एकादेश होतो त्या दोन वर्णांपैकी प्रत्येक वर्ण देखील एकादेशाचा स्थानी होतो. (*समुदायाचेच ठिकाणी स्थानिता असती व त्या समुदायातील दोन वर्णांपैकीं प्रत्येक वर्णाचे ठिकाणी देखील स्थानिता नसती तर, 'एक पूर्वपरयो' या सूत्रात 'पूर्वपरयोः' असा इतरेतरद्वन्द्व करून द्विवचननिर्देश न करिता, समाहारद्वन्द्व करून एकवचननिर्देश केला असता* समुदायातील दोन वर्णांपैकी प्रत्येक वर्ण, म्हणजे पूर्व समुदायातील अन्त्य वर्ण व पर समुदायातील आदि वर्ण, एकादेशाचा स्थानी होत असल्यामुळें, पूर्ववर्णान्त पूर्व समुदायाचे ठिकाणी एकादेश करण्यापूर्वी जे धर्म होते ते एकादेश केल्यावर देखील 'स्थानिवदादेश' या सूत्रान्वयें तशा एकादेशान्त पूर्व समुदायाचे ठिकाणी स्थानिवद्भावानें येऊ शकतात व तसेच परवर्णादि पर समुदायाचे ठिकाणीं एकादेश करण्यापूर्वी जे धर्म होते ते एकादेश केल्यावर देखील तशा एकादेशान्तादि पर *समुदायाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें येऊ शकतातच आणि म्हणून* प्रकृत सूत्र असण्याची काही गरज नाहीं हें दीक्षिताच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे असे शब्दरत्नकार म्हणतात. परंतु 'अन्तादिवच्च' ६. १. ८५ या सूत्रावरील भाष्यात 'स्थानिवदादेश' या सूत्रानें प्रकृत सूत्र गतार्थ होतें असे म्हटले नाही, उलट प्रकृत सूत्राचे प्रयोजन सांगताना 'अन्तादिवद्वचनमामिश्रस्यादेशवचनात्' हे वार्तिक पठित करून भाष्यकार म्हणतात. 'अन्तादिवदित्युच्यते । किं कारणम् ? ।

आमिश्रस्यादेशवचनात् । आमिश्रम्याऽयमादेश उच्यते, स नैव पूर्वग्रहणेन गृह्यते नाऽपि परग्रहणेन । तद्यथा–क्षीरोदके सम्पृक्ते आमिश्रत्वान्नैव क्षीरग्रहणेन गृह्येते, नाप्युदकग्रहणेन । इष्यते च ग्रहण स्यादिति, तच्चान्तरेण यत्न न सिध्यतीत्यन्तादिवद्वचनम् । एवमर्थं-मिदमुच्यते । अस्ति प्रयोजनमेतत् ।' आणि म्हणूनच बालमनोरमा-काराना या विषयाचा उहापोह करून 'एतेन स्थानिवत्सूत्रेण गतार्थमिद सूत्रमिति निरस्तम्' असे म्हटले आहे ) अशा रीतीनें वर सांगितल्याप्रमाणे स्थानिवद्भावाचा आश्रय केल्यानें 'प्राच्छंति' इत्यादि स्थली विसर्ग होण्याची आपत्ति टाळण्याकरिता ('उभयथर्क्षु' इत्यादि) ज्ञापकाचा आधार घेण्याची काही गरज राहत नाही, कारण त्या उदाहरणात (एकादेशाचा कोणताहि स्थानी पदसंज्ञक नसल्यामुळें) रेफान्ताचे ठिकाणी स्थानिवद्भावानें पदसंज्ञा होऊ शकत नाही. (साक्षात् श्रुत स्थान्यादेशभाव न मानता) आनुमानिक स्थान्यादेशभाव मानला तरी, 'प्र+ऋच्छ्' याचे जागी होणाऱ्या 'प्राच्छ्' या समुदायरूप आदेशाचे ठिकाणीं 'प्र' शब्दात असणारे धर्म जरी स्थानिवद्भावानें येऊ शकतात तरी 'प्रार्' चे ठिकाणी ते धर्म येऊ शकत नसल्यामुळें रेफ = रकार हा पदान्ती असणारा ठरत नाही ('प्र+ऋच्छति' या स्थलीं 'अ' व 'ऋ' या दोन वर्णांचे जागी 'उपसर्गादृति धातौ' सू ७४ या सूत्रानें 'आर्' असा वृद्धिरूप एकादेश होतो 'अ' व 'ऋ' हे जे 'आर्' या एकादेशाचे स्थानी आहेत त्यापैकी कोणालाहि पदसंज्ञा नसून 'प्र' व 'ऋच्छति' याना पदसंज्ञा आहे म्हणून 'आर्' या आदेशाला स्थानिवद्भावानें पदसंज्ञा होऊ शकत नसल्यामुळें, त्या आदेशातील रेफ पदान्ती आहे असे मानता येत नाही आणि त्यामुळें त्या रेफाचे जागी 'खरवसानयो:' या सूत्रानें विसर्गाची प्राप्तीच होत नाही. आता 'अ' व 'ऋ' या साक्षात् श्रुत स्थानीचे जागी 'आर्' हा आदेश झाला आहे असे न मानता, 'प्र' व 'ऋच्छ्' या दोन आनुमानिक स्थानींचे जागीं 'प्राच्छ्' असा आनुमानिक आदेश

झाला आहे असे जरी मानले तरी, 'प्र' या स्थानीचे ठिकाणी असणारे पदत्वादि धर्म 'प्राच्छ्' या आदेशामध्यें स्थानिवद्भावानें येऊ शकतील, पण त्या आदेशातील 'प्रार' या एकदेशाचे ठिकाणी ते धर्म स्थानिवद्भावानें आणता येणे शक्य नाहीं, कारण 'प्रार्' हा अनुमानिक आदेश नसून 'प्राच्छ्' हा आनुमानिक आदेश आहे, आणि जरी 'प्र' या स्थानीत असलेली पदसंज्ञा 'प्राच्छ्' या आदेशाला करता येईल तरी, त्या आदेशात अन्तर्भूत असलेल्या 'प्रार्' या एकदेशाला कोणत्याहि रीतीनें पदसंज्ञा प्राप्त होऊ शकत नाहीं आणि अशा रीतीनें 'प्रार्' यातील रेफ पदान्ती आहे असे मानता येत नसल्यामुळें, त्या रेफाचे जागी विसर्गाची प्राप्तीच होत नाही म्हणून त्या रेफाचा विसर्ग होणे या कार्याचे निवारण करण्याकरिता दीक्षितानी जे पाणिनीय निर्देश ज्ञापकरूपानें मनोरमेंत दिले आहेत त्यांचा आधार घेण्याची कांहीच आवश्यकता नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे)

'वर्णाश्रये विधावन्तादिवद्भावप्रतिषेधो वाच्य'–म्हणजे वर्णाचा आश्रय करून कार्य करतेवेळी 'अन्तादिवच्च' हें सूत्र प्रवृत्त करू नये असा प्रतिषेध सांगितला पाहिजे–या वार्तिकाचे प्रत्याख्यान करणार 'न वाऽताद्रूप्यातिदेशात्' हे वार्तिक आहे व या वार्तिकाचा असा अर्थ आहे कीं, पूर्व वार्तिक पठित करण्याची कांही गरज नाही, कारण 'अन्तादिवच्च' या सूत्रानें केवळ वर्णाचे ठिकाणी राहणाऱ्या धर्माचा–अल्मात्रवृत्तिधर्माचा–अतिदेश करता येत नाहीं (प्रकृत सूत्रावरील भाष्यात 'वर्णाश्रयविधौ च,' म्हणजे 'वर्णाश्रयविधौ च नाऽन्तादिवद्भवतीति वक्तव्यम,' हें वार्तिक पठित करून, पुढें त्या वार्तिकाच प्रत्याख्यान करणार 'न वाऽताद्रूप्यातिदेशात' ह द्वितीय वार्तिक पठित केले आहे व या द्वितीय वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात–'न वा वक्तव्यम् । किं कारणम् ? । अताद्रू-प्यातिदेशात् । न हि ताद्रूप्यमतिदिश्यते । रूपाश्रया वा एते विधयो-ऽताद्रूप्यान्न भविष्यति ।' या भाष्याचा अर्थ कैयटवृत्तीत व उद्योतांत

स्पष्ट केला आहे व तो असा—'अवयववाचकाऽन्तादिशब्दाभ्यामाक्षिप्तसमुदायनिमित्तकार्यमात्रमनेनातिदिश्यते, नत्वन्ताद्यवयवमात्रनिबन्धनकार्यम् ।') पूर्व समुदायाचा अन्त्य वर्ण व पर समुदायाचा आद्य वर्ण या दोहोंचे जागी एकादेश करण्यापूर्वी पूर्व व पर समुदायाचे ठिकाणी जें प्रातिपदिकत्व, सुबन्तत्व, प्रत्ययत्व इत्यादि धर्म होते ते धर्म एकादेश केल्यावर देखील तसा पूर्व व पर समुदायाचे ठिकाणी येतात असा प्रकृत सूत्राचा अर्थ आहे. असा त्या सूत्राचा अर्थ होत असल्यामुळेंच, तुगागम करतेवेळी एकादेश असिद्ध समजावा, म्हणजे एकादेश झालाच नाही असे मानून तुगागम करावा, (या अर्थाचे 'षत्वतुकोरसिद्धः' ३३३३) हें वचन चरितार्थ ठरते. प्रकृत सूत्राचा तसा अर्थ न मानल्यास, 'अधीत्य' इत्यादि स्थली (परादिवद्भावानें 'ई' हा एकादेश ऱ्हस्व 'इ' च आहे असे मानल्यानें) त्या ऱ्हस्वत्वामुळें तुगागमाची सिद्धि होऊन 'षत्वतुकोरसिद्धः' हे एकादेश असिद्ध होतो असे सांगणारे वचन व्यर्थ ठरतें हें उघड आहे. वर सांगितल्याप्रमाणे प्रकृत सूत्राचा अर्थ असल्यामुळेंच, 'खट्वाभिः' या स्थली ('भिस्' प्रत्ययाचे जागी) 'ऐस्' आदेश होत नाही. (एकादेशाचे ठिकाणी ताद्रूप्यातिदेश करता येत नाही, म्हणजे दोन वर्णांचे जागी झालेला एकादेश पूर्ववर्णसदृश किंवा परवर्णसदृश मानून त्या वर्णाच्या निमित्तानें पूर्व किंवा पर समुदायास प्राप्त होणारे कार्य करता येत नाही, म्हणूनच, पाणिनीला 'षत्वतुकोरसिद्धः' हे सूत्र मुद्दाम करावे लागले असे कैयटानें देखील प्रकृत सूत्रावरील भाष्याच्या वृत्तीत म्हटले आहे. त्या वृत्तीत कैयटानें प्रकृत सूत्रान्वयें अल्मात्रनिमित्तक कार्याचा अतिदेश होत नाही हे सांगून पुढें 'तुक्यसिद्धवचनं चास्यार्थस्य लिङ्गम् । यदि हि वर्णाश्रयो विधिरनेनातिदिश्येत तदाऽधीत्य प्रेत्येत्यादावेकादेशस्य ऱ्हस्वत्वं प्रत्यादिवद्भावात्तुकः सिद्धत्वात्तुक्यसिद्धत्वं न ब्रूयात् ।' असे म्हटले आहे. 'अधि + इ + क्त्वा' या स्थली 'समासेऽनञ्पूर्वे क्त्वो ल्यप्' सू. ३३३२ या सूत्रानें 'क्त्वा'चे जागी ल्यबादेश

होण्यापूर्वी धातु व उपसर्ग याचा समास होणे आवश्यक आहे. समास केला असता, *'नित्या समासे' या वचनान्वयें*, धातु व उपसर्ग याचे सन्धिकार्य होणे आवश्यक आहे. 'अक सवर्णे दीर्घ:' सू. ८५ या सूत्रानें प्राप्त होणारे तें अन्तरङ्ग सवर्णदीर्घरूप सन्धिकार्य केल्यावर 'ई' असा एकादेश होऊन 'अधी+य' अशी स्थिति होते. 'अधी' यातील एकादेश ईकार जो दोन ऱ्हस्व इकाराचे जागीं झाला आहे तो परादिवद्भावानें ऱ्हस्व इकारच आहे व 'इ' धातूच आहे असे मानल्यास, त्या ऱ्हस्ववर्णाच्या निमित्तामुळें 'ऱ्हस्वस्य पिति कृति तुक्' सू २८५८ या सूत्रानें तुगागम होऊ शकतोच. मग 'षत्वे तुकि च कर्तव्ये एकादेश असिद्ध: स्यात्' या अर्थाचे 'षत्वतुकोर-सिद्ध.' हे सूत्र पाणिनीने का केले ? ते सूत्र व्यर्थ ठरू पाहते. म्हणून ते सूत्र चरितार्थ ठरण्याकरिता हे मानणे आवश्यक आहे की, प्रकृत सूत्रानें अन्तादिवर्णमात्रप्रयुक्त म्हणजे केवळ अन्त्य किंवा आद्य वर्णाच्या निमित्तानें प्राप्त होणाऱ्या, कार्याचा अतिदेश करता येत नाहीं *त्यामुळें 'अधी+य' या स्थली 'अधी'* हे दीर्घान्त अङ्ग असल्यामुळें, ऱ्हस्वान्त अङ्गास तुगागम होण्याचे विधान करणाऱ्या 'ऱ्हस्वस्य पिति कृति तुक्' या सूत्रानें तुगागम होऊ शकत नाहीं तुगागम न केल्यास, 'अधीय' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते तसे अनिष्ट रूप न व्हावे म्हणून, तुगागम करतेवेळी एकादेश असिद्ध समजावा या अर्थाचे 'षत्वतुकोरसिद्ध' हें सूत्र पाणिनीनें मुद्दाम केले आहे ते सूत्र असल्यामुळें, तुगागम करतेवेळी एकादेश झालाच नाही व 'अधि+इ' अशीच स्थिति आहे आणि 'इ' हे ऱ्हस्वान्त अङ्ग कायमच आहे असे मानल्याने, तुगागम होऊन *'अधीत्य'* असे इष्ट रूप सिद्ध होते *आणि अशा रीतीनें 'षत्वतुकोर-*सिद्ध:' हे सूत्र प्रकृत सूत्रानें अन्तादिवर्णमात्रप्रयुक्त कार्याचा अतिदेश करता येत नाही याचे ज्ञापक ठरते तसेच 'खट्व+टाप्+भिस्= खट्व+आ+भिस्' अशा स्थितीत 'खट्व' यातील अन्त्य अकाराच्या व त्यापुढील आकाराच्या जागी 'अक: सवर्णे दीर्घ:

सू. ८५ या सूत्रानें 'आ' असा जो एकादेश होतो तो पूर्वान्त-वद्भावानें 'अ' च आहे असे मानून त्या अदन्तत्वनिमित्तामुळें 'अतो भिस ऐस्' सू. २०३ या सूत्रानें प्राप्त होणारे 'भिस्' प्रत्ययाचे जागी 'ऐस्' आदेश करणे हे कार्य करता येत नाही व त्यामुळें 'भिस्' प्रत्ययाचे जागी 'ऐस्' आदेश न होता 'खट्वाभिः' असे इष्ट रूप सिद्ध होते. प्रकृत सूत्रानें ताद्रूप्यातिदेश करता आला असता तर 'अतो भिस ऐस्' सू २०३ हे सूत्र प्रवृत्त होऊन 'खट्वैः' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती.) 'अत्र च कार्यकालपक्षे' या मनोरमेच्या पंक्तीतील 'अत्र' या पदाचा 'सुखार्तः इत्यत्र प्रार्च्छतीत्यत्र च' असा अर्थ आहे 'सुखार्त' या प्रथम उदाहरणात 'ऋत' या विशिष्ट शब्दाचा निर्देश केला असून त्याला तृतीयासमासाची अपेक्षा असल्यामुळें व 'प्रार्च्छति' या द्वितीय उदाहरणात उपसर्गत्व, धातुत्व इत्यादिकाची अपेक्षा असल्यामुळें, त्या दोन्ही उदाहरणात होणारे वृद्धिरूप एकादेशकार्य (रेफाचा विसर्ग करणे या कार्याच्या मानानें) बहिरङ्ग ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे ('ऋते च तृतीयासमासे' या वार्तिकानें जें वृद्धिरूप एकादेशकार्य होणे सागितले आहे ते 'अ' वर्णान्तापुढें 'ऋत' हा विशिष्ट शब्द आल्यास त्या दोन शब्दाचा जेथें तृतीयासमास होतो तशाच ठिकाणी होणे सागितले आहे. साराश वृद्धिरूप एकादेशकार्य त्या वार्तिकान्वयें होण्याकरिता 'ऋत' या विशिष्ट शब्दाची व तृतीयासमासाची अपेक्षा आहे, आणि म्हणूनच 'कृष्णस्य ऋद्धिः कृष्णर्द्धिः', परमर्तः, इत्यादि स्थली वृद्धिरूप एकादेश न होता गुणरूप एकादेश होतो. 'खरवसानयोर्विसर्जनीय' सू ७६ या सूत्रानें रेफाचा विसर्ग होण्याकरिता तशा निमित्ताची अपेक्षा नाही. अशा रीतीनें वृद्धिरूप एकादेशकार्य अधिकनिमित्तापेक्ष असून त्याच्या मानानें विसर्गाचा रेफ करणे हे कार्य अल्पनिमित्तापेक्ष असल्यामुळें, 'अल्पापेक्षमन्तरङ्ग बह्वपेक्ष बहिरङ्गम्' या न्यायान्वयें वृद्धिरूप एकादेशकार्य विसर्ग-

कार्याच्या मानानें बहिरङ्ग ठरते व 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे'– परि ५०–ही परिभाषा दीक्षिताच्या मतें कार्यकालपक्षात त्रिपादीत उपस्थित होत असल्यामुळें, वृद्धिरूप एकादेशकार्य सापादिक असून देखील त्रैपादिक अन्तरङ्ग विसर्गकार्य करतेवेळी, तें सापादिक कार्य त्या पक्षात असिद्ध ठरते त्यामुळें विसर्गकार्य करतेवेळी 'आर्' हा एकादेश झालाच नाही व रेफ अस्तित्वातच नाही असे मानावे लागत असल्यामुळें, रेफाचा विसर्ग होणे या कार्याची प्राप्तीच होत नाही तसेच 'प्र + ऋच्छति' या उदाहरणात 'उपसर्गादृति धातौ' सू ७४ या सूत्राने जे वृद्धिरूप एकादेशकार्य होते त्या कार्याला 'अ' वर्णान्त उपसर्गपूर्वी असणे व त्यापुढें ऋकारानें सुरू होणारा धातू असणे अशा प्रकारच्या उपसर्गत्व व धातुत्व या अधिक निमित्ताची अपेक्षा असून, रेफाचा विसर्ग होण्यास तशा निमित्ताची अपेक्षा नाही म्हणून अल्पापेक्ष विसर्गकार्य बह्वपेक्ष वृद्धिरूप एकादेशकार्याच्या मानानें वर सांगितल्याप्रमाणे अन्तरङ्ग ठरते व कार्यकालपक्षात 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषान्वयें विसर्गकार्य करतेवेळी वृद्धिरूप एकादेशकार्य असिद्ध ठरत असल्यामुळें, म्हणजे ते कार्य झालेच नाही व रेफाचे अस्तित्वच नाही असे मानावे लागत असल्यामुळें, विसर्गकार्याची त्या पक्षात प्राप्तीच होत नाही असा दीक्षिताचे म्हणण्याचा आशय आहे असे शब्दरत्नकार म्हणतात.) 'अचोरानन्तर्यं तन्नेति हरदत्तपक्षे' या मनोरमेच्या पक्तीतील 'अचोरानन्तर्यम्' या पदाचा 'अचोऽजानन्तर्यनिमित्तम्'– म्हणजे जेथें एका अचाच्या लगेंच पुढें त्याचे ठिकाणीं कार्य होण्याचे अच्रूप निमित्त उपस्थित आहे– असा अर्थ आहे ('निमित्त-निमित्तिभावापन्नाजुद्वयनिरूपितपरस्परानन्तर्यनिमित्तकेऽन्तरङ्गे, बहि-रङ्गे वा बहिरङ्गासिद्धत्वम्' असा हरदत्ताच्या मते 'नाजानन्तर्ये बहिष्ट्वप्रक्लृप्तिः.'–परि–५१–या परिभाषेचा अर्थ आहे. पण हा अर्थ दीक्षितांना मान्य नाहीं हे पूर्वी मनोरमेंत सांगितलेच आहे.) मनोरमेंतील 'पश्चात् प्रवर्तमाने' या पदाचा 'पश्चाच् प्रवर्तमाने

अन्तरङ्गे' असा अर्थ आहे. 'नाजानन्तर्ये' या परिभाषेचे 'पत्वतुकोरसिद्ध:' सू. ३३३३ या सूत्रात केलेले तुक्चे ग्रहण ज्ञापक आहे. ही परिभाषा न मानली तर, 'अधीत्य' इत्यादि स्थली ('क्त्वा'चे जागी) ल्यबादेश होण्याकरिता पूर्वी ('अधि' हा उपसर्ग व त्यापुढील 'इ' हा धातु या दोहोंचा 'कुगतिप्रादय.' सू. ७६१ या सूत्रानें होणारा) समास करणे आवश्यक आहे व समास केल्यावर ('नित्या समासे' या वचनान्वयें 'अधि' व 'इ' याचा,) सन्धि करणे हे कार्य नित्य असल्यामुळें (सन्धि करणे टाळता येत नाही व धातु व उपसर्ग याचा समास होऊन सन्धि झाल्यावरच 'क्त्वा' चे जागी ल्यबादेश होऊ शकतो) व ल्यबादेश होईपर्यंत (धातु व उपसर्ग याचे) सन्धि न होता पृथक् स्थितीत--सन्धिशिवाय--राहणे अशक्य असल्यामुळें, ('अक: सवर्णे दीर्घ:' सू ८५ या सूत्रानें सवर्णदीर्घरूप) एकादेश प्रथम केला असता, तो एकादेश दोन भिन्न पदात असणाऱ्या दोन वर्णांचे जागी होणारा असल्याकारणानें, (केवळ 'ल्यप्' या पित् प्रत्ययाच्या निमित्तामुळें 'ह्रस्वस्य पिति कृति तुक्' सू. २८५८ या सूत्रानें होणाऱ्या) तुगागमकार्याच्या मानानें बहिरङ्ग ठरत असल्यामुळें ('असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषान्वयें) असिद्ध ठरतोच. (म्हणून तो एकादेश असिद्ध ठरण्याकरिता 'पत्वतुकोरसिद्ध:' सू. ३३३३ या सूत्रात केलेले) तुग्ग्रहण व्यर्थ ठरू पाहते हे उघड आहे. (समास प्रथम होऊन व नतर नित्य सन्धिकार्य होऊन सवर्णदीर्घरूप बहिरङ्ग एकादेश झाल्यावर, 'ल्यप्' प्रत्ययाच्या निमित्तामुळें, नतर) जेव्हा तुगागमरूप अन्तरङ्गकार्याची प्राप्ति होते तेव्हा ते अन्तरङ्गकार्य अचाच्या लगेंच पुढें असणाऱ्या (ल्यप्रूप) भिन्न निमित्तामुळें होणारे कार्य असल्यामुळें काही दोष येत नाहीं, म्हणजे 'नाजानन्तर्ये' ही परिभाषा वरील उदाहरणास लागू पडते व त्यामुळें पूर्वी झालेले बहिरङ्ग एकादेशरूप कार्य बहिरङ्ग ठरत नाहीं. ('अधीत्य' या रूपाची प्रक्रिया पूर्वी दिलीच आहे 'अधि+इ+क्त्वा' या स्थली 'अधि' व 'इ' याचा समास होऊन व नतर

सवर्णदीर्घ एकादेशरूप सन्धिकार्य होऊन 'क्त्वा' चे जागीं ल्यबादेश झाला असता 'अधी+ल्यप्=अधी+य' अशी स्थिति होते. येथें 'अधी' हे दीर्घान्त अङ्ग असल्यामुळें, 'ऱ्हस्वस्य पिति कृति तुक्' या सूत्रानें ऱ्हस्वान्त अङ्गाला होणाऱ्या तुगागमाची प्राप्ति होत नाही. जरी ल्यप्प्रत्ययनिमित्तक तुगागमकार्य पदद्वयस्थितवर्णद्वयापेक्ष एकादेशकार्याच्या मानानें अन्तरङ्ग आहे व एकादेशकार्य बहिरङ्ग आहे तरी, 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषेची 'नाजानन्तर्ये' ही निषेधक परिभाषा असल्यामुळें, सवर्णदीर्घ एकादेश बहिरङ्ग असून देखील तो बहिरङ्ग आहे असे मानता येत नाही, कारण या स्थली जें तुगागमरूप अन्तरङ्गकार्य करणे आहे ते 'इ' या अचास त्याच्या लगेंच पुढे असलेल्या ल्यप्प्रत्ययाच्या निमित्तामुळें करणे आहे अशा रीतीने पूर्वी झालेले एकादेशरूप बहिरङ्गकार्य 'नाजानन्तर्ये' या परिभाषान्वयें बहिरङ्ग ठरत नसल्यामुळें, ते कार्य बहिरङ्ग असून देखील असिद्ध ठरत नाहीं, म्हणजे एकादेश झालाच नाही असे मानता येत नाहीं. त्यामुळें 'अधि+इ+य अशीच स्थिति आहे असे मानता येत नसल्यामुळें व 'अधी+य' अशीच वास्तविक स्थिति आहे असे मानणे भाग पडत असल्यामुळें, 'अधी' या दीर्घान्त अङ्गाला, वर सांगितल्याप्रमाणे, तुगागम होऊ शकत नाहीं. तुगागम न केल्यास 'अधीय' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरिता पाणिनीनें 'षत्वतुकोरसिद्ध' या सूत्रात तुग्ग्रहण केले आहे. त्यामुळें तुगागमकार्य करतेवेळी पूर्वी झालेला सवर्णदीर्घरूप एकादेश असिद्ध ठरतो व 'अधि+इ' अशीच स्थिति आहे असे मानावे लागते आणि अशा स्थितीत 'ल्यप्' या पित्प्रत्ययाच्या पूर्वी 'इ' हे ऱ्हस्वान्त अङ्ग येत असल्यामुळें, 'ऱ्हस्वस्य पिति कृति तुक्' या सूत्राने त्या ऱ्हस्वान्त अङ्गास तुगागम होऊन 'अधीत्य' असे इष्ट रूप सिद्ध होते व अशा रीतीने 'षत्वतुकोर-सिद्ध' या सूत्रातील तुग्ग्रहण 'नाजानन्तर्ये' या परिभाषेचे ज्ञापक ठरते. ती परिभाषा नसती तर, वरील सूत्रात तुग्ग्रहण करण्याची

काहींच गरज नव्हती, कारण तुगागमरूप अन्तरङ्गकार्य करतेवेळीं बहिरङ्ग एकादेश 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषान्वयें असिद्ध ठरलाच असता व तुगागम सहज करता आला असता पण 'नाजानन्तर्ये' ही परिभाषा असल्यामुळें तो एकादेश बहिरङ्ग व असिद्ध न ठरण्याची जी आपत्ति येत होती ती टाळण्याकरिताच पाणिनीला 'षत्वतुकोरसिद्ध' या सूत्रात तुग्ग्रहण मुद्दाम करावे लागले आणि अशा रीतीनें ते तुग्ग्रहण 'नाजानन्तर्ये' या परिभाषेचं ज्ञापक ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे) 'अजानन्तर्यमिति कैयटमते' या मनोरमेच्या पक्तीतील 'अजानन्तर्यम्' या पदाचा 'अच अन्यानन्तर्यम्' असा अर्थ आहे (सारांश बहिरङ्गकार्य केल्यावर अन्तरङ्गकार्याची प्राप्ति झाली असता, 'नाजानन्तर्ये' ही परिभाषा लागू पडण्याकरिता ज्या अचाला अन्तरङ्गकार्य करणे आहे त्या अचापुढें दुसरा अच् असणे या निमित्ताची आवश्यकता जी हरदत्त मानतो तशी आवश्यकता नसून, त्या अचापुढें असणाऱ्या निमित्तामुळें—मग ते निमित्त अच्रूप असो किंवा अज्भिन्न असो—अन्तरङ्गकार्य प्राप्त होणें एवढ्याचीच आवश्यकता आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा—उपसर्गेणेति। यत्क्रियायुक्ताः प्रादयस्तं प्रत्येव गत्युपसर्गसञ्ज्ञा इत्युक्तत्वादिति भावः।

('खरवसानयोर्विसर्जनीय' सू. ७६ या सूत्रावरील कौमुदीत 'उपसर्गादृति धातौ' सू ७४ या सूत्रासबधानें) 'उपसर्गेणैव धातोराक्षेपे सिद्धे' असे जें म्हटले आहे त्याचे कारण हें कीं, ज्या धातूच्या क्रियारूप अर्थामध्यें (प्रादिगणात पठित असलेल्या) 'प्र' इत्यादि शब्दाचा अन्वय होतो त्या धातूचे ते प्रादिशब्द गतिसज्ञक किंवा उपसर्गसज्ञक होतात असे भाष्यकारादिकानीं म्हटले आहे. ('गतिश्च' सू. १ ४·६० या सूत्रावरील भाष्यात 'गत्युपसर्गसञ्ज्ञा

क्रियायोगे यत्क्रियायुक्तास्त प्रतीतिवचनम्' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे भाष्यकारानी 'गत्युपसर्गसज्ञा क्रियायोगे यत्क्रियायुक्तास्त प्रति गत्युपसर्गसज्ञा भवन्तीति वक्तव्यम्' असे व्याख्यान केले आहे साराश दीक्षितानीं जें मनोरमेंत वर सांगितल्याप्रमाणे व्याख्यान केले आहे त्याला वरील वार्तिक व भाष्य प्रमाण आहे असा त्याच्या म्हणण्याचा आशय आहे या वरील भाष्यावरून हे सिद्ध होते की, उपसर्गाचा धातूशी नित्य सबध असतो व ता धातूशिवाय स्वतत्रपणे कधीहि राहत नाही त्यामुळें 'उपसर्ग' हा शब्द उच्चारला की, धातु आपोआपच आक्षिप्त होतो म्हणून 'उपसर्गादृति धातौ' या सूत्रात 'उपसर्गात' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें 'धातौ' या पदाचे ग्रहण केले नसते तरी चालू शकले असते तथापि त्या सूत्रात त्या पदाचे जें ग्रहण केले आहे त्याचे कारण हे की त्या सूत्राचा 'धातौ' असा योगविभाग, पुनर्वृद्धिविधानाकरिता व 'ऋत्यक' सू ९२ या सूत्रानें प्राप्त होणा या पाक्षिक प्रकृतिभावाचा बाध होण्याकरिता, करता यावा असे दीक्षितानी कौमुदीत म्हटले आहे )

**शब्दरत्न--यतक्रियेति । यदर्थक्रियायुक्ता इत्यर्थ । इत्युक्तत्वादिति । भाष्यकारादिभिरिति शेष ॥**

मनोरमेंतील 'यत्क्रियायुक्ता' या पदाचा 'यदर्थक्रियायुक्ता' असा अर्थ आहे ('यत्क्रियायुक्ता' या पदातील 'यत' या सर्वनामाने धातूचा परामर्श होतो धातूचा व त्याने बोधित होणाऱ्या क्रियेचा अर्थार्थिभावसबध आहे व हा अर्थ स्पष्ट करण्याकरिता शब्दरत्नकारानी 'यदर्थक्रियायुक्ता' असा मनोरमेंतील पदाचा अर्थ केला आहे ) मनोरमेंतील 'इत्युक्तत्वात' या पदापुढें 'भाष्यकारादिभि' हे पद अध्याहृत आहे (ज्या वार्तिकात व भाष्यात दीक्षितानी व्याख्यान केल्याप्रमाणे म्हटले आहे त वार्तिक व भाष्य मनोरमेच्या विवरणात वर दिलेच आहे व त्या भाष्यात 'वृद्धिविधौ

च धातुग्रहणानर्थक्यम्' हें वार्तिक पठित करून भाष्यकारानीं 'वृद्धिविधौ च धातुग्रहणानर्थक्यम् । उपसर्गादृति धातौ इति' असे स्पष्ट म्हटले आहे.)

मनोरमा—प्रार्पभीयतीति "शरोऽचि" इति द्वित्वनिषेधः ॥

('वा सुप्यापिशलेः' सू. ७७ या सूत्रावरील कौमुदीत दिलेल्या) 'प्रार्पभीयति' या उदाहरणात ('अचो रहाभ्यां द्वे' सू ५९ या सूत्रानें पावलेले पकाराचे द्वित्व होत नाही याचे कारण हे कीं,) 'शरोऽचि' सू. ३४० हें द्वित्वनिषेधक सूत्र आहे (व ते द्वित्वनिषेधक सूत्र असल्यामुळें, जरी 'आ' या अचापुढें रकार असून त्यापुढें पकार हा 'यर्' आहे तरी, तो शर् असल्यामुळें त्या पकाराचे 'अचो रहाभ्यां द्वे' या सूत्रानें पावलेले वैकल्पिक द्वित्व होत नाही.)

मनोरमा—प्रेजत इति । एजृ दीप्तौ । कम्पनार्थस्तु परस्मैपदी । एजते कम्पते इति तु प्राचा व्याख्यानं प्रामादिकमेव । एङ्येडित्येव सिद्धे परग्रहणमुत्तरार्थं रूपग्रहणं तु चिन्त्यप्रयोजनम्, एङि पर इत्येव सिद्धेः । यथा "अमि पूर्वः" इति । नियोगोऽवधारणमिति । यदाहुः—

"अनवक्लृप्तौ यदा दृष्टः पररूपस्य गोचरः ॥
एवस्तु विषयो वृद्धेर्नियमेऽय यदा भवेत्" ॥ १ ॥ इति

एतेन 'नियोजनं नियोगो व्यापारः' इति व्याख्यानं परास्तम्. "यदैव पूर्वे ज्वलने शरीरं" "ममैव जन्मान्तरपातकानाम्" इत्यादिप्रयोगविरोधात्, उदाहृतवृत्तिस्थश्लोकविरोधात्, "लङः शाकटायनस्यैव" "तपस्तपःकर्मकस्यैव" इत्यादिसौत्रप्रयोगविरोधाच्च । यत्तु श्लोकवार्तिकमिदमित्याहुः, तद्भ्रमसात् ॥

('एङि पररूपम्' सू. ७८ या सूत्रावरील कौमुदीत) 'प्रेजते' हें जें उदाहरण दिलें आहे ते 'एजृ दीप्तौ' या धातूचे उदाहरण

होय. 'कम्पने' या अर्थाचा वाचक 'एजृ' धातु परस्मैपदी आहे. ('एङि पररूपम्' या सूत्रावरील प्रक्रियाकौमुदीत 'प्रेजते' हे जें उदाहरण दिले आहे त्याचे व्याख्यान करिताना) 'एजते कम्पते' असे जें प्रकाशकारानी म्हटले आहे ते नि.संशय चूक आहे. ('एजृ' धातु धातुपाठात भ्वादिगणात दोनदा पठित आहे. या दोन धातूंपैकी 'एजृ दीप्तौ'–धातु न. १७९–हा आत्मनेपदी असून 'एजृ कम्पने'–धातु न. २३४–हा धातु परस्मैपदी आहे म्हणून 'एजृ कम्पने' या परस्मैपदी धातूचे 'प्रेजते' असे रूप होऊ शकत नाही 'एजृ दीप्तौ' या आत्मनेपदी धातूचेच तसे रूप होऊ शकतें त्यामुळें 'प्रेजते' हे 'एजृ कम्पने' या धातूचे रूप आहे असें जें प्रकाशकारानी म्हटले आहे ते चूक ठरते हें उघड आहे प्रसादकारानी देखील 'प्रेजते इति । एजृ कम्पने' असेच म्हटले आहे व तें म्हणणे देखील चूक आहे हे वरील व्याख्यानावरून स्पष्ट होते.) 'एङि एङ' एवढेंच सूत्र करून देखील इष्ट रूपाची सिद्धि होऊं शकल असता, 'एङि पररूपम्' या सूत्रात जें 'पर' शब्दाचे ग्रहण केले आहे ते त्या शब्दाची उत्तरसूत्रात–'ओमाङोश्च' इत्यादि पुढील तीन सूत्रात–अनुवृत्ति व्हावी याकरिता केले आहे 'एङि पर' एवढेच सूत्र केल्यानें इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकल असता (व 'पर' हे पद पुढील तीन सूत्रात अनुवृत्त होऊ शकत असता) त्या सूत्रात 'रूप' या शब्दाचे जें ग्रहण केले आहे त्याचे प्रयोजन चिन्त्य आहे, म्हणजे त्या सूत्रात 'रूपम्' या शब्दाचे ग्रहण करण्याची वास्तविक काही आवश्यकता नव्हती. उदाहरणार्थ 'अमि पूर्व.' सू १९४ एवढेंच सूत्र केले आहे, म्हणजे त्या सूत्रात 'रूप' शब्दाचे ग्रहण न करिता 'पूर्व' एवढयाच शब्दाचे ग्रहण केले आहे (व त्याचप्रमाणे 'एङि पररूपम्' असे सूत्र न करिता 'एङि परः' असे सूत्र केल्यानें सहज काम भागू शकले असते व सर्व इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकली असती आणि 'पर.' हे पद उत्तर सूत्रात अनुवृत्त करता येऊ शकले असते. 'एङि पररूपम्' या सूत्रावरील कौमुदीत

'एवे चानियोगे' हें जें वार्तिक पठित केलें आहे त्या वार्तिकातील) 'नियोग' या शब्दाचा 'अवधारण' असा अर्थ आहे व त्या शब्दाचा असा अर्थ आहे याला 'अनवक्लृप्तौ यदा दृष्टः पररूपस्य गोचरः । एवस्तु विषयो वृद्धेर्नियमेऽस्य यदा भवेत् ॥' ही कारिका प्रमाण आहे. (या कारिकेचा अर्थ असा आहे कीं, जेव्हा 'एव' हा शब्द 'अवक्लृप्ति = अवधारण' या अर्थाचा वाचक नसतो तेव्हा तो 'एव' शब्द पररूप एकादेशाचा विषय होतो, म्हणजे अनवधारणार्थक 'एव' शब्द अवर्णान्तापुढें आल्यास 'वृद्धिरेचि' सू ७२ या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश न होता 'एवे चानियोगे' या वार्तिकान्वयें पररूप एकादेश होतो. परंतु जेव्हा 'एव' हा शब्द 'नियम = अवधारण' या अर्थाचा वाचक असतो तेव्हा तो वृद्धीचा विषय होतो, म्हणजे अवधारणार्थक 'एव' शब्द 'अ' वर्णान्तापुढें आल्यास वरील वार्तिकान्वयें पररूप एकादेश होत नाही व 'वृद्धिरेचि' या सूत्रान्वयें वृद्धिरूप एकादेश होतो) अशी ही कारिका असल्यामुळें, 'नियोजनं नियोगो व्यापारः' असे जें (प्रसादकारानी) म्हटले आहे तें चूक ठरते, कारण त्यानी केलेला अर्थ 'यदैव पूर्वं ज्वलने शरीरम्', 'ममैव जन्मान्तरपातकानाम्' इत्यादि प्रयोगाच्या व तसेच त्यानी आपल्या टीकेत जो श्लोक उदाहरणरूपानें दिला आहे त्याच्या आणि तसेच 'लङः शाकटायनस्यैव' सू. २४६३ 'तपस्तपःकर्मकस्यैव' सू २७७१ इत्यादि पाणिनीय सूत्रातील प्रयोगाच्या विरुद्ध आहे. (वरील सर्व प्रयोगांत 'एव' या शब्दाचा 'अवधारण' या अर्थामध्यें उपयोग केला असून 'व्यापार' या अर्थामध्यें उपयोग केला नाही आणि असें असून देखील वृद्धिरूप एकादेश केला आहे. या वरील सर्व उदाहरणावरून हे स्पष्ट होतें की, वरील वार्तिकातील 'नियोग' या शब्दाचा 'व्यापार' असा अर्थ नसून 'अवधारण' असाच अर्थ आहे, व त्याच्या उलट 'अनियोग' या शब्दाचा 'निश्चयात्मक काहीच सागता येत नाही' असा अनिश्चितरूप किंवा असंभावना असा अर्थ आहे आणि म्हणूनच कौमुदीत दिलेल्या 'क्वेव

भोक्ष्यसे', म्हणजे तू कोठें जेवशील याबद्दल निश्चयात्मक काहीच सागता येत नाही किंवा 'तव भोजन क्वचिदपि न सभाव्यते' या अर्थाच्या वाचक उदाहरणात 'एव' हा शब्द अनिश्चितरूप अर्थाचा किंवा असभावना या अर्थाचा वाचक असल्यामुळें येथें वृद्धिरूप एकादेश न होता, वरील वार्तिकान्वयें पररूप एकादेश झाला आहे प्रक्रियाकौमुदीकारानी 'एङि पररूपम्' या सूत्रावरील वृत्तीत 'एवे चानियोगे' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाची उदाहरणे देताना 'अद्येव। नियोगे तु अद्यैव गच्छ' असे म्हटले आहे व प्रसादकारानीं आपल्या टीकेत वरील वार्तिकाचे व दोन उदाहरणाचें व्याख्यान करिताना 'नियोजन नियोगो व्यापार ।... एवशब्दो नियमे वर्तते । यदा व्यापारेणाविशिष्ट नियममाह तदा पररूप भवति । यदा तु व्यापारविशिष्ट तदा न, किन्तु वृद्धिरेव स्यादिति । अद्येवेति । स्वरूपाख्यान न तु नियोग । अद्यैव गच्छेति नियोग । अन्ये तु नियोगो नियमोऽवधारणमिति यावदिति नियोग व्याख्यायाऽनियोगमनवधारण कथयन्ति । ततश्च यदेव पूर्वं ज्वलने शरीरम् इत्यादय प्रयोगा उपपन्ना भवन्तीत्याहु ' असे म्हटले आहे. परतु भाष्यकारानी हे वार्तिक 'एङि पररूपम्' सू ६·१ ९४ या सूत्रावरील भाष्यात पठित करून जरी त्या वार्तिकाचीं उदाहरणे दिलीं आहेत तरी 'नियोग' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला नाहीं तथापि कैयटानें आपल्या वृत्तीत 'नियोगोऽवश्यभाव, अवधारण, तस्मादन्यत्रार्थे पररूप भवति। यथा—क्वेव भोक्ष्यते । अत्रानवक्लृप्तावेवशब्द । यदा त्ववधारणे वर्तते तदा वृद्धि ।' असे स्पष्ट म्हटले आहे साराश 'नियोग' शब्दाचा प्रसादकारानी जो अर्थ केला आहे तो मनोरमेंत दिलेल्या कारिकेच्या व कैयटवृत्तीच्या विरुद्ध असल्यामुळें, स्वीकारार्ह नाहीं असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे ) वर दिलेली कारिका श्लोकवार्तिक आहे असे जें प्रकाशकारानीं म्हटले आहे ते विचार न करिता म्हटले आहे (व ते चूक आहे, कारण असे श्लोकवार्तिक भाष्यात कोठेंहि पठित केलेले आढळत नाहीं )

शब्दरत्न—उत्तरार्थमिति । तेनाद्यर्यात्, भिन्द्युः, पचन्ति, इत्यादिसिद्धिः । "अतो गुण इत्युत्तरार्थम्" इति क्वाचित्कोऽपपाठः । चिन्त्यप्रयोजनमिति । न च शिवायेत्यत्र "अणो ऽप्रगृह्यस्य–" इत्यनुनासिकत्वे तदनुकरणे ततः परमोमित्यस्य "ओमाङोश्च" इति पररूपे ऽनुनासिकाभावार्थं परस्य यादृशं रूपं तादृशं यथा स्यादिति रूपग्रहणम् । स्पष्टं चेदं "ऐऔच्" इत्यत्र भाष्ये, कैयटे चेति वाच्यम्, "तृज्वत्क्रोष्टुः" इति सूत्रभाष्योक्तरीत्या गुणस्य शब्दत्वादिवद्रूपत्वाभावेन रूपग्रहणेनाव्यावृत्तेः । रूपशब्देन च श्रावणज्ञानविषयोऽवयवसंस्थानवान् । अत एव तृज्वत्सूत्रे न हि स्वरो रूपवानित्युक्तम् । वर्णरूपावयवसंस्थानमेव शब्दस्य रूपं तद्वत्त्वमेव शब्दस्य रूपमिति व्यवहारः, स्वरस्तु न तद्वानिति शब्दस्याविषय स शब्दस्य रूपमिति तदर्थः । तत्र सूत्रे रूपातिदेशे स्वरातिदेशो न स्यादित्युपक्रम्येदमुक्तम् । परः किं गुणको भवतीत्याकाङ्क्षायां स्थानिगुणक इति लभ्यते । तत्रोभयगुणकस्यासम्भवादेकस्यान्यतरतमत्वात्तद्गुणकस्यैवोपस्थित्या च तस्यैव सिद्धेश्च । परशब्देन प्रयोगस्थस्योपस्थितस्य ग्रहणं, प्रयोगे च गुणो, भेदक एव । शास्त्रे परमुच्चारितो गुणो ऽभेदको न तु प्रयोगे इति परशब्देनोपस्थितानुनासिकस्यैवैकस्यान्यन्तरतमत्वात्सिद्धिः । यत्र तु स्थानिद्वयगुणकसम्भवस्तत्र स एव । अत एव स्वग्निनान्न-सुभ्रूपथाशब्दस्य निपातत्वादुदात्तेन ओंशब्देन "ओमाङोः–"

सूत्रस्थकैयटस्तु चिन्त्य एव। तत्रहि—इक्परिभाषाऽभावे जनेर्गुणोऽनुनासिक स्यादिति शङ्किते पररूपेण शुद्धो भविष्यतीति भाष्ये उक्तम्। तस्य मदुक्तरीत्या उपपत्ते·। "ऐऔच्" इति सूत्रस्थकैयटस्तु पूर्वपक्षोपपादकत्वान्न स्वार्थे साधक इति दिक्॥

नावक्लृप्तौ यदेति पाठे न च्छन्दोभङ्ग। तद्रभसादिति। वृत्तौ भवमिति व्याख्याने वार्त्तिकशब्दस्य पूर्वनिपातापत्तिरित्याहु।

'परग्रहणमुत्तरार्थम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे तसे असल्यामुळें, 'अद्यर्श्यात्, भिन्द्यु, पचन्ति' इत्यादि रूपें सिद्ध होतात 'अतो गुण इत्युत्तरार्थम्' असा जो मनोरमेच्या क्वचित् प्रतीत पाठ आढळतो तो अशुद्ध पाठ आहे (कारण 'एङि पररूपम्' या सूत्रातून 'अतो गुणे' एवढ्याच सूत्रात 'पर' या शब्दाची अनुवृत्ति होते व 'ओमाङोश्च' आणि 'उस्यपदान्तात्' या पूर्व दोन सूत्रात त्या पदाची अनुवृत्ति होत नाही असे मानल्यास, 'अद्यर्श्यात्, भिन्द्यु' इत्यादि रूपाची सिद्धि होऊ शकणार नाही 'अद्य + आ + ऋश्यात् = अद्यर्श्यात्' या उदाहरणात 'ऋश्यात्' हे धातूचे रूप नसून 'ऋश्य' या प्रातिपदिकाच्या पञ्चमीविभक्तीचे एकवचनाचे रूप आहे व 'गोकर्णपृषतैणर्श्यरोहिताश्चमरो मृगा' या अमरवचनान्वयें 'ऋश्य' हा शब्द 'मृग' या अर्थाचा वाचक आहे त्यामुळें या स्थळीं 'उपसर्गादृति धातो' सू ७४ हे सूत्र लागू पडत नाहीं या वरील उदाहरणात 'अद्य + आ' याचा 'अद्या' असा प्रथम सन्धि करून नतर 'अद्या' याचा 'ऋश्यात्' याशीं सन्धि केल्यानें, 'आद्गुण' सू ६९ या सूत्रान्वयें जरी गुणरूप एकादेश होऊन 'अद्यर्श्यात्' असे रूप सिद्ध होते तरी, 'आ + ऋश्यात् = अर्श्यात्' असा प्रथम सन्धि करून 'अद्य + अर्श्यात्' याचा नतर सन्धि केल्यास व 'ओमाङोश्च' या सूत्रात 'पर' या शब्दाची अनुवृत्ति न मानल्यास, 'अक: सवर्णे दीर्घ' सू ८५ या उत्तरसूत्रानें सवर्णदीर्घ होऊन 'अद्यार्श्यात्' असे अनिष्ट रूप होईल व

'अद्यर्श्यात्' असे पररूप एकादेशानें सिद्ध होणारे इष्ट रूप सिद्ध होऊ शकणार नाही. 'ओमाङोश्च' या सूत्रात 'पर' या शब्दाची अनुवृत्ति मानली तरच, तसें इष्ट रूप सिद्ध होऊ शकतें; कारण 'आ+ऋश्यात् =अर्श्यात्' यातील 'अर्' हा पूर्वान्तवद्भावानें 'आ' च आहे अशी वृद्धि केल्यानें, पररूप एकादेश होतो. याचे कारण हें की, जरी 'ओमाङोश्च' हें पूर्वसूत्र आहे व 'अकः सवर्णे दीर्घः' हे परसूत्र आहे तरी, 'ओमाङोश्च' हा प्रतिपदोक्तविधि असल्यामुळें, तें सूत्र 'अक सवर्णे दीर्घः' या सूत्राचा बाध करून प्रथम प्रवृत्त होते व पररूप एकादेश होऊन 'अद्य + अर्श्यात् = अद्यर्श्यात्' असे इष्ट रूप सिद्ध होते. 'ओमाङोश्च' ६·१·९५ या सूत्रावरील भाष्यात 'अद्यर्श्यात्' असेंच रूप होणे इष्ट आहे असे भाष्यकारानी स्पष्ट म्हटलें आहे. त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात:–' किमर्थश्चकारः ?। एङीत्यनुवृष्यते । किं प्रयोजनम् ? । इह मा भूत्–आ–ऋश्यात् । अर्श्यात् । अद्य–अर्श्यात्–अद्यार्श्यात् । कदार्श्यात् । नैतदस्ति प्रयोजनम् । अद्यर्श्यादित्येव भवितव्यम् । एवं हि सौनागाः पठन्ति । चोऽनर्थकोऽनधिकारादेङः ॥' तसेच 'भिदिर् विदारणे' या रुधादिगणात पठित असलेल्या धातूचे विधिलिङाचे प्रथमपुरुषाचे बहुवचन करिताना 'भिन्द् + यासुट् + झि' अशा स्थितीत 'लिङः स लोपोऽनन्त्यस्य' सू २२११ या सूत्रानें 'यासुट् = यास्' यातील अन्त्य सकाराचा लोप होऊन व 'झेर्जुस्' सू. २२१३ या सूत्रानें 'झि' चे जागी 'उस्' असा सर्वादेश होऊन 'भिन्द् + या + उस्' अशी स्थिति होते. 'उस्यपदान्तात्' या सूत्रात 'पर' या शब्दाची अनुवृत्ति न मानली तर, 'आद्गुणः' सू. ६९ हे सूत्र येथें प्रवृत्त होऊन अनिष्ट रूप सिद्ध होण्याची आपत्ति येईल व 'भिन्द्युः' असे इष्ट रूप सिद्ध होऊ शकणार नाही. पण 'उस्यपदान्तात्' या सूत्रात 'पर' या शब्दाची अनुवृत्ति मानली म्हणजेच, 'भिन्द् + या + उस् = भिन्द्युः' असे, पररूप एकादेश होऊन, इष्ट रूप सिद्ध होते. 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रात

मनोरमेच्या वरील अपपाठात देखील 'पर' या शब्दाची अनुवृत्ति मानली आहे व शब्दरत्नकारानीं त्या सूत्रानें होणाऱ्या पररूप एकादेशाचे 'पचन्ति' हें उदाहरण दिले आहे 'पच्+शप्+झि' या स्थलीं 'झोऽन्त' सू २१६९ या सूत्रानें 'झि' यातील झकाराचे जागी 'अन्त्' असा आदेश होऊन 'पच्+अ+अन्ति=पच+अन्ति' अशी स्थिति झाली असता, 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रात 'एङि पररूपम्' या सूत्रातून 'पर' या शब्दाची अनुवृत्ति होत असल्यामुळें व 'पच' यातील अन्त्य अकार पदान्ती नसल्यामुळें आणि त्यापुढें 'अ' हा गुणसंज्ञक वर्ण असल्यामुळें, पररूप एकादेश होऊन 'पचन्ति' असे रूप होते. साराश दीक्षिताच्या म्हणण्याचा वास्तविक असा आशय आहे की, 'एङि पररूपम्' या सूत्रापुढें 'ओमाङोश्च, उस्यपदान्तात्, अतो गुणे' ही जीं तीन सूत्रें अष्टाध्यायीत पठित केली आहेत त्या तीन्ही सूत्रात 'पर' या शब्दाची अनुवृत्ति व्हावी याकरिता 'एङि पररूपम्' या सूत्रात 'पर' या शब्दाचे ग्रहण केले आहे, म्हणून 'परग्रहणमुत्तरार्थम्' या मनोरमेंतील पाठाऐवजीं 'परग्रहणमतो गुणे इत्युत्तरार्थम्' असा मनोरमेच्या क्वचित् प्रतीत आढळणारा पाठ मानल्यास, 'अतो गुणे' या सूत्रात 'एङि पररूपम्' या सूत्रातून 'पर' या शब्दाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करावी लागेल व तशी अनुवृत्ति करणे दोषयुक्त आहे हे पूर्वी अनेकदा सांगितलेच आहे. तशी दोषयुक्त अनुवृत्ति केली व 'ओमाङोश्च' आणि 'उस्यपदान्तात्' या मधील दोन सूत्रात 'पर' या शब्दाची अनुवृत्ति न केली तर 'अद्यश्यात्, भिन्द्यु' इत्यादि उदाहरणाची सिद्धि होऊ शकणार नाहीं म्हणून 'अतो गुणे उत्तरार्थम्' हा क्वाचित्क पाठ अशुद्धच मानला पाहिजे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे आता मनोरमेंत 'रूपग्रहण तु चिन्त्यप्रयोजनम्' असे जें म्हटले आहे त्यावर शकाकार, 'एङि पररूपम्' या सूत्रातील 'रूप' या शब्दाचे देखील ग्रहण सार्थक आहे हे सिद्ध करण्याकरिता, असे

म्हणतो कीं,) 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः' सू. ११० या सूत्रानें ('नमः शिवाय' इत्यादि वाक्याच्या शेवटी असलेल्या) 'शिवाय' यातील अन्य अप्रगृह्य अकार अनुनासिक करून व तशा अनुनासिकान्त 'शिवायँ' या शब्दाचे अनुकरण करून, तशा अनुकरणरूप 'शिवायँ' या शब्दापुढें 'ओम्' हा शब्द आल्यास, 'ओमाङोश्च' सू. ८० या सूत्रानें जो पररूप एकादेश प्राप्त होतो तो परस्थानीचे- 'ओम्' यातील 'ओ' या निरनुनासिकाचें-जसे (निरनुनासिक) रूप आहे तशा प्रकारचा (निरनुनासिक) पररूप एकादेश व्हावा व अनुनासिक आदेश होऊ नये याकरिता 'पररूपम्' या पदात 'रूप' या शब्दाचे ग्रहण केले आहे (शङ्काकाराचे असे म्हणणे आहे की, अनुकरणरूप 'शिवायँ' या शब्दापुढें 'ओम्' हा शब्द आल्यास, 'ओमाङोश्च' सू. ८० या सूत्रानें पररूप एकादेशाची प्राप्ति होते त्या एकादेशाचे 'शिवायँ' यातील अन्त्य अनुनासिक 'अँ' व त्यापुढें असणाऱ्या 'ओम्' यातील निरनुनासिक 'ओ' हे दोन स्थानी आहेत. त्या दोन स्थानीपैकीं परस्थानी 'ओ' निरनुनासिक असून पूर्व स्थानी, म्हणजे 'शिवायँ' यातील अन्त्य 'अँ', अनुनासिक असल्यामुळें 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या सूत्रान्वयें एकादेशाचे ठिकाणी अनुनासिकत्वाच्या प्राप्तीचा संभव आहे. ते अनुनासिकत्व एकादेशास न व्हावे व परस्थानीचे, म्हणजे 'ओम्' यातील 'ओ'चे, जसें निरनुनासिक रूप आहे तसेच एकादेशाचे निरनुनासिक रूप व्हावें याकरिता 'पररूपम्' या स्थली 'रूप' शब्दाचें ग्रहण केले आहे व अशा रीतीनें तें ग्रहण चरितार्थ ठरतें व शङ्काकार पुढें असे म्हणतो की) 'ऐऔच्' या शिवसूत्रावरील भाष्यात व तसेच ('इको गुणवृद्धी' १ १·३ या सूत्रावरील भाष्याच्या) कैयटवृत्तीत 'रूप' ग्रहणाची सार्थकता दाखविली आहे 'ऐऔच्' या शिव सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात–'पचन्तीत्यत्रो गुणे पर इतीयता सिद्धम् । सोऽयमेव सिद्धे सति यद्रूपग्रहणं करोति तस्यैतत्प्रयोजनं यथाजातीयकं परस्यरूपं तथाजातीयकमुभयोर्यथा स्यादिति ।' 'एङि

पररूपम' या सूत्रातून 'अतो गुणे' या सूत्रात 'पररूपम्' या पदाची अनुवृत्ति होते हे पूर्वी सागितलेच आहे भाष्यकार म्हणतात कीं, 'अतो गुणे पररूपम्' असे सूत्र न करिता 'अतो गुणे पर' असे सूत्र केले असते तरी, 'पच + अन्ति' या स्थलीं त्या सूत्राने 'पच' यातील अन्त्य अकार व 'अन्ति' यातील आद्य अकार या दोहोंचे जागी पर अकार आदेश झालाच असता असे असून देखील ज्याअर्थी पाणिनीनें 'रूपम्' हा अधिक शब्द उच्चारला आहे त्याअर्थी पाणिनीचा हेतु असा दिसतो की ज्याप्रकारचे – जितक्या मात्राचे व ज्या गुणानें युक्त–परस्थानीचे रूप आहे त्याचप्रकारचे एकादेशाचे रूप व्हावे तसेच 'इको गुणवृद्धी' या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तीत कैयटाने असे म्हटले आहे की, 'रूपग्रहणस्येदमेव प्रयोजनम्–यादृक् परस्य रूप तादृगेव यथा स्यादिति' म्हणून शकाकार म्हणतो की, ज्याअर्थी भाष्यकार व कैयट या दोघानीहि वर सागितल्याप्रमाणे 'रूप' ग्रहणाची सार्थकता सिद्ध करून दाखविली आहे त्याअर्थी 'रूपग्रहण तु चिन्त्यप्रयोजनम्' असे जे दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे ते बरोबर मानता येत नाही सारांश शकाकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'यथाजातीकयक परस्य रूप तथाजातीयकमुभयोर्यथास्यात' याकरिता, पाणिनीनें 'पर' एवढाच शब्द न उच्चारता, त्याबरोबर 'रूपम्' हा अधिक शब्द उच्चारून 'एडि पररूपम्' या सूत्रात 'पररूपम्' असा शब्दप्रयोग केला आहे या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,) ही शका बरोबर नाही, कारण 'तृज्वत्क्रोष्टु' ७ १ ९५ या सूत्रावरील भाष्यात जें व्याख्यान केले आहे त्या व्याख्यानान्वयें, ज्याप्रमाणे शब्दत्व हे (शब्दाचा केवळ गुण असून) शब्दाचे रूप नव्हे त्याचप्रमाणे गुण–म्हणजे अनुनासिकत्व, निरनुनासिकत्व, उदात्तत्व, अनुदात्तत्व, स्वरितत्व, ह्रस्वत्व, दीर्घत्व– इत्यादिकाचे ठिकाणी रूपाचा अभाव असल्यामुळें, 'पर' या शब्दाबरोबर 'रूप' या अधिक शब्दाचे ग्रहण केले तरी,

('शिवायें + ओम्' या स्थळीं 'ओमाङोश्च पररूपम्' अशा शब्दघटित सूत्रानें पररूप सन्धि करतेवेळी) अनुनासिक एकादेश टाळता येणे अशक्य आहे. (शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'ओमाङोश्च' या सूत्रात 'पर' एवढ्याच शब्दाचे ग्रहण केल्यास जर पररूप एकादेश अनुनासिक होण्याची आपत्ति शंकाकाराच्या मतें टाळता येत नाही तर, त्या सूत्रात 'रूप' या अधिक शब्दाचे ग्रहण केल्यानें देखील ती आपत्ति टाळता येणे शक्य नाही, कारण गुण रूपवान् नसल्यामुळें ज्याअर्थी 'रूप' या शब्दानें गुणाचे ग्रहण होऊ शकत नाही त्याअर्थी, जसे परस्थानीचे रूप आहे तसे एकादेशाचे रूप व्हावे असे म्हटल्यानें, दोन स्थानींचे जागी पररूप एकादेश करतेवेळी तो एकादेश 'स्थानेऽन्तरतम' सू ३९ या सूत्रान्वयें अन्तरतम—अत्यन्त सदृश—होणारा आदेश असल्यामुळें व प्रकृत उदाहरणात दोन स्थानींपैकी पूर्वस्थानी अनुनासिक असल्यामुळें, अनुनासिकगुणवान् पररूप एकादेश होणे हे कसे टाळता येऊ शकणार? शंकाकार म्हणतो कीं, परस्थानी निरनुनासिक असल्यामुळें त्याचे जसे निरनुनासिक रूप आहे तसे पररूप एकादेशाच रूप होईल पण निरनुनासिकत्व हे परस्थानीचे रूप नसून, तो त्याचा गुण—धर्म—आहे म्हणून परस्थानीच्या रूपासारखें पररूप एकादेशाचे रूप होणें असे म्हटल्यानें, त्या एकादेशाचे ठिकाणी आन्तरतम्यानें प्राप्त होणारा व रूपाहून भिन्न असणारा अनुनासिक गुण कसा टाळता येणे शक्य आहे?) जें कानानी ऐकिले जाते व ज्याची वर्णरूप अवयवानी अवस्थिति आहे तशा कर्णेन्द्रियगोचर वर्णानुपूर्वीला शब्दाचे 'रूप' असे म्हणतात म्हणूनच 'तृज्वत्क्रोष्टु' या सूत्रावरील भाष्यात 'न हि स्वरो रूपवान्' असे भाष्यकारानी म्हटले आहे त्या भाष्यपङ्क्तीचा अर्थ असा आहे कीं, वर्णानुपूर्वीनें युक्त शब्द राहत असल्यामुळेंच, तशा वर्णानुपूर्वीला शब्दाचे रूप म्हणण्याचा व्यवहार आहे स्वराचे ठिकाणी वर्णानुपूर्वी नसल्यामुळें, ज्याप्रमाणे शब्दत्व हे शब्दाचे रूप नव्हें त्याचप्रमाणे स्वर देखील

शब्दाचे रूप नव्हे. त्या भाष्यात 'रूपातिदेशे स्वरातिदेशो न स्यात्' असा उपक्रम करून भाष्यकारानी 'न हि स्वरो रूपवान्' असे म्हटले आहे. ('राम' या शब्दात र्, आ, म्, अ अशी कानानी ऐकू येणारी वर्णानुपूर्वी आहे. त्या कर्णेन्द्रियगोचर वर्णानुपूर्वीला 'राम' या शब्दाचे रूप असे म्हणतात. अनुनासिकत्व, निरनुनासिकत्व हे गुण व तसेच उदात्तादि स्वर जरी कानानी ऐकू येतात तरी त्याचे ठिकाणी, 'रूप' हा शब्द लागू पडण्यास आवश्यक असणारी, वर्णानुपूर्वी नाही आणि म्हणून त्याना–गुणाना–'रूप' असे म्हणता येत नाही. त्यामुळें अमुक प्रकारचा पूर्वरूप किंवा पररूप एकादेश व्हावा असे म्हटल्यानें, जरी पूर्वाच्या किंवा पराच्या रूपाचा अतिदेश होतो तरी, त्याचे ठिकाणी असणारे गुण त्याचे रूप नसल्यामुळें, त्याच्या रूपातिदेशानें त्याच्या गुणाचा अतिदेश होत नाही याला 'तृज्वत्क्रोष्टु:' या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात – 'अथ वा पुनरस्तु रूपातिदेश:। अथैतस्मिन्रूपातिदेशे सति किं प्रागादेशेभ्यो यद्रूप तदतिश्यते, आहो स्वित्कृतेष्वादेशेषु ? । ··· उभयथा च स्वरोऽनतिदिष्ट· । किं कारणम् ? । न हि स्वरो रूपवान् ।' या भाष्याचा थोडक्यात अर्थ असा आहे की, रूपातिदेश व्हावा असे जें म्हटले आहे त्याचा अर्थ असा समजावा काय की, आदेश करण्यापूर्वी जे रूप होते त्याचा अतिदेश करावा, किंवा आदेश केल्यानतर जें रूप होते त्याचा अतिदेश करावा ? या दोहोपैकी काहीहि म्हटले तरी, स्वराचा अतिदेश होऊ शकत नाही, कारण स्वर हा रूप नव्हे या भाष्यावरून हे स्पष्ट होते कीं, गुण हा रूप नसल्यामुळें, रूपातिदेश केल्यानें गुणातिदेश होत नाही. म्हणून 'शिवायँ+ओम्' या प्रकृत उदाहरणात, 'ओमाङोश्च पररूपम्' असे सूत्र मानून देखील तशा सूत्रान्वयें पररूप एकादेश करतेवेळी, येथें केवळ रूपातिदेश केला असून गुणातिदेश केला नसल्यामुळें, 'स्थानेऽन्तरतम:' या सूत्रान्वयें आन्तरतम्यानें प्राप्त होणारा

अनुनासिकगुणयुक्त पररूप एकादेश होणे कसे टाळता येऊ शकणार ? म्हणून 'पररूपम्' या ठिकाणी 'रूपम्' हा अधिक शब्द घातल्यानें जर इष्ट प्रयोजन सिद्ध होऊ शकत नाहीं तर तो अधिक शब्द सूत्रांत घालून उपयोग काय ? मग जर 'पररूपम्' असे म्हटल्यानें इष्ट प्रयोजन सिद्ध होऊं शकत नाही तर, 'ओमाङोश्च परः' असे सूत्र करून त्या सूत्रात 'परः' एवढाच शब्द घातल्यानें इष्ट रूप कसे सिद्ध होऊ शकणार असे शकाकारानें म्हटल्यास, शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'ओमाङोश्च परः' एवढेंच जरी सूत्र असले तरी, इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकते, व ती कशी होऊ शकते हे शब्द-रत्नकार पुढील पक्तींत सागतात ) पररूप एकादेश कोणत्या गुणानीं युक्त व्हावा अशी आकाक्षा उत्पन्न झाली असता, ('स्थानेऽन्तर-तमः' सू. ३९ या सूत्रान्वयें) त्याच्या स्थानीचे जे गुण असतील त्या गुणानी युक्त तो पररूप एकादेश व्हावा असे निष्पन्न होतें. परंतु ('शिवायँ+ओम्' या प्रकृत उदाहरणात पररूप एकादेशाचे 'अँ' व 'ओम्' हे जे दोन स्थानी आहेत त्याच्यापैकीं पूर्वस्थानी 'अँ' अनुनासिक असून, परस्थानी 'ओम्' यातील आद्य ओकार निरनुनासिक असल्यामुळें व अनुनासिकत्व आणि निरनुनासिकत्व हे दोन गुण परस्परविरुद्ध असल्यामुळें, ते) दोन्ही (परस्परविरुद्ध) गुण पररूप एकादेशाचे ठिकाणीं येणे असंभवनीय आहे. म्हणून (त्या परस्पर-विरुद्धगुणयुक्त दोन स्थानीपैकी कोणत्या तरी) एका स्थानीच्याच गुणाशी अन्तरतम असा तो पररूप एकादेश होऊ शकतो. (अशा स्थितीत तो पररूप एकादेश कोणत्या स्थानीच्या गुणाशी अन्तरतम व्हावा असा प्रश्न उत्पन्न झाला असता, 'ओमाङोश्च परः' या सूत्रातील) 'परः' या शब्दानें (निरनुनासिकगुणयुक्त 'ओम्' या) परस्थानीची उपस्थिति होऊन (त्या परस्थानीच्या गुणाशीं सदृशतम असा निरनुनासिकच) पररूप एकादेश होणे सिद्ध होतें (व 'शिवायँ + ओम् = शिवायोम्' असे इष्ट रूप सिद्ध होतें. सारांश 'ओमाङोश्च परः' या सूत्रात 'परः' एवढाच शब्द घातल्यानें

देखील इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकत असल्यामुळें व त्या 'पर' शब्दाला 'रूपम्' हा अधिक शब्द जोडल्यानें कोणताहि अधिक अर्थ निष्पन्न होत नसल्यामुळें, 'रूपग्रहण तु चिन्त्यप्रयोजनम्' असे जें मनोरमेत दीक्षितानी म्हटले आहे ते म्हणणे यथार्थ ठरते व त्यावर शकाकारानें केलेल्या शकेत काहीच अर्थ नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे येथें हे देखील लक्षात घेण्याजोगें आहे कीं, 'अमि पूर्व ' सू. १९४ या सूत्रात 'पूर्वरूपम्' या शब्दाचे ग्रहण न करिता 'पूर्व ' एवढ्याच शब्दाचे ग्रहण केले आहे. 'अमि पूर्वः' या सूत्रातून 'सम्प्रसारणाच्च' सू ३३० या परसूत्रात 'पूर्वः' या पदाची अनुवृत्ति होते साराश या दोन्ही सूत्रात 'पूर्व.' एवढेंच पद असून जर इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकते तर, 'एङि पररूपम्, ओमाङाश्च, उस्यपदान्तात्' व 'अतो गुणे'. या सूत्रात 'पररूपम्' हा शब्द असण्याची आवश्यकता काय ? जशी प्रथम दोन सूत्रात 'पूर्व',' हा शब्द असल्यानें इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकते त्याच-प्रमाणें वरील पुढील चार उत्तरसूत्रात 'पर.' एवढाच शब्द घातल्याने इष्ट रूपाची सिद्धि होण्यात काहीं अडचण येऊं शकत नाहीं आणि त्यामुळें 'पररूपम्' यातील 'रूपम्' हा शब्द व्यर्थ व निष्प्र-योजनक ठरतो हे उघड आहे 'ओमाङोश्च परः' इत्यादि पररूप विधायक सूत्रातील) 'पर' या शब्दानें, प्रयोगात म्हणजे जेथें पर-रूप एकादेश करणे आहे अशा उदाहरणात, जो पलीकडे उपस्थित–विद्यमान–आहे तशा परस्थानीचे ग्रहण होतें, व लौकिक प्रयोगात गुण भेद करणारे आहेत म्हणजे निरनुनासिक हा गुण अनुनासिकत्व या गुणाहून भिन्न असून एकानें दुसऱ्याचे ग्रहण होऊ शकत नाही व अशा रीतीनें गुण भिन्नव्यवहारसंपादक आहेत, असेंच मानले जाते. परंतु व्याकरणशास्त्रात उच्चारित गुणामुळें भेद उत्पन्न होत नाहीं असें मानले आहे तथापि तो व्याकरणशास्त्रात मानलेला नियम म्हणजे 'अभेदका गुणा ' परि ११८ हा न्याय, लौकिक प्रयोगात लागू पडत नाही असे असल्यामुळें, ('शिवायँ + ओम्' या प्रकृत

उदाहरणात 'ओमाङोश्च पर' या सूत्रानें पररूप एकादेश करते-वेळी, त्या सूत्रातील) 'पर.' या शब्दानें ('ओम्' या) निरनुनासिक परस्थानीची उपस्थिति होऊन, त्या एकाच परस्थानीच्या गुणाशीं अन्तरतम असा निरनुनासिक पररूप एकादेशविधि होतो. (लौकिक प्रयोगात गुण भेद उत्पन्न करणारे आहेत असें मानले असल्यामुळें व 'ओमाङाश्च पर.' या सूत्रातील 'पर.' या शब्दानें उपस्थित झालेला 'ओम्' हा परस्थानी म्हणजे त्यातील 'ओ' हा आद्य अच, निर-नुनासिक असल्यामुळें, येथें अनुनासिक पररूप एकादेश करता येत नाही आणि परस्थानीच्या गुणाशी अन्तरतम असा निरनुनासिक आदेशच होऊ शकतो आणि अशा रीतीनें 'शिवायोम्' असें पररूप एकादेश केल्यानें इष्ट रूप सिद्ध होतें. 'ऐऔच' या शिवसूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात – 'भेदका गुणा' । कथ पुनर्ज्ञायते भेदका गुणा इति ? । एव हि दृश्यते लोके, एकोऽयमात्मा उदक नाम, तस्य गुण-भेदादन्यत्व भवति, अन्यदिद शीतम्, अन्यदिदमुष्णमिति । ननु च भो अभेदका अपि गुणा दृश्यन्ते । तद्यथा । देवदत्तो मुण्ड्यपि जट्यपि शिख्यपि स्वामाख्या न जहाति, तथा बालो युवा वत्सो दम्यो बली-वर्द इति । उभयमिद गुणेषुक्तम् – भेदका', अभेदका इति । कि पुनरत्र (व्याकरणशास्त्रे) न्याय्यम् ? । अभेदका गुणा इत्येव न्याय्यम् । कुत एतत् ? । यदयम् अस्यिदधिसक्थ्यक्ष्णामनङुदात्त इत्यु-दात्तग्रहण करोति । यदि भेदका गुणाः स्युरुदात्तमेवोच्चारयेत् ।' या वरील भाष्याच्या टीकेत कैयटानें असे म्हटलें आहे कीं, 'आम्नाय-शब्दा नियतस्वरा इति वेदे गुणाना भेदकत्वम् । लोके तूभयथा व्यव-हार, गोपिण्डो हि वत्साद्यवस्थाभेदात् क्रयविक्रयादिषु मूल्यादिभेदा-द्भेदेन व्यवह्रियते, स एवायमिति प्रत्यभिज्ञानादभेदेनापि ।' या वरील भाष्यावरून व कैयटवृत्तीवरून हें स्पष्ट होते की, जरी व्याकरणशास्त्रात उच्चारित गुणानें भेद उत्पन्न होत नाहीं तरी, लौकिक व्यवहारात गुण हे भेद उत्पन्न करणारे आहेत असेच मानले जातें. पाणी हा पदार्थ जरी एकच आहे तरी त्याचे थड पाणी, ऊन

पाणी, गढूळ पाणी, स्वच्छ पाणी इत्यादि भेद मानले जातात. त्यामुळें लौकिक प्रयोगात अनुनासिकत्व व निरनुनासिकत्व हे गुण भिन्न मानले जातात आणि म्हणून जेथे पररूप एकादेश होणें सांगितले आहे तेथें परस्थानी निरनुनासिक असल्यास, निरनुनासिकच पररूप एकादेश होतो, अनुनासिक पररूप एकादेश करता येत नाही 'अभेदका गुणा ' या परिभाषेचे विस्तृत विवेचन परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषांतरात पान ५०१-१२ मध्यें केले आहे. ते वाचल्यास त्या परिभाषेचा अर्थ व प्रकृत विषय नीट ध्यानात येईल ) परतु जेथें पूर्व व पर स्थानीचे ठिकाणी असणारे गुण (परस्पर विरुद्ध नसल्यास) एकादेशाचे ठिकाणी येणें संभवनीय आहे तेथें उभयस्थानींच्या गुणाशी अन्तरतम असाच एकादेश होतो. असे असल्यामुळेंच, स्वरितान्त 'सुब्रह्मण्या' या शब्दाला, 'ओम्' हा निपात असल्यामुळें आद्युदात्त असणाऱ्या त्या निपाताशीं, 'ओमाङोश्च' या सूत्रानें पररूप सन्धि करतेवेळीं, 'सुब्रह्मण्योम्' असे जें पररूप एकादेश केल्यानें रूप होतें त्यातील 'ओम्' हा एकादेश स्वरित होतो असे 'तस्यादित'' १-२-३२ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी व तसेंच कैयटानें आपल्या भाष्यवृत्तीत म्हटले आहे (त्या भाष्यात 'न सुब्रह्मण्यायां स्वरितस्यतूदात्त ' सू. ३६६६ या सूत्रानें होणारा उदात्त स्वर, जेथे सापादिक शास्त्राने स्वरित स्वर झाला आहे व त्यामुळें सिद्ध आहे, तेथेंच होऊ शकतो या अर्थाचे 'स्वरितोदात्तार्थं च' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात -- 'स्वरितोदात्तार्थं च तत्रैव कर्तव्यम् । न सुब्रह्मण्यायां स्वरितस्य तूदात्तः । इन्द्र आगच्छ । क्व तर्हि स्यात् ? । य. सिद्ध स्वरित । सुब्रह्मण्योमिन्द्र आगच्छ ।' व कैयटानें त्या भाष्याच्या वृत्तींत 'सुब्रह्मण्योम्' या रूपाची प्रक्रिया सांगताना पुढें लिहिल्याप्रमाणें म्हटले आहे . 'सुब्रह्मणि साधुरिति यत् प्रत्ययस्तित्वात्स्वरितः । ततष्टाबेकादेश. स्वरितानुदात्तयोरान्तरतम्यात्स्वरितः। ततः ओमाङोश्चेत्युदात्तस्वरितयोरेकादेशः स्वरित एव ।' या कैयटवृत्तीचा अर्थ

असा आहे की, 'सुब्रह्मणि साधुः सुब्रह्मण्यः' या स्थली 'तत्र साधुः' सू १६५० या सूत्रानें 'यत् = य' प्रत्यय झाला आहे व हा प्रत्यय तित् असल्यामुळें, 'तित्स्वरितम्' सू ३७२९ या सापादिक सूत्रानें 'सुब्रह्मण्य' हा तित्प्रत्ययान्त शब्द स्वरितान्त होतो 'अनुदात्तौ सुप्पितौ' सू. ३७०९ या सूत्रान्वयें अनुदात्त असणारा 'टाप् = आ' हा पित् स्त्रीप्रत्यय 'सुब्रह्मण्य' शब्दाहून केला असता, त्या शब्दातील अन्त्य 'अ' हा स्वरित व 'आ' हा प्रत्यय अनुदात्त असल्यामुळें व स्वरितामध्यें, 'समाहारः स्वरितः' सू. ७ या सूत्रान्वयें एकदेश अनुदात्त राहत असल्यामुळें, उभय स्थानीच्या गुणाशी अन्तरतम असा 'आ' हा एकादेश स्वरित होतो. अशा स्वरितान्त 'सुब्रह्मण्या' शब्दाचा, 'निपाता आद्युदात्ताः' फिट् सू ८० या सूत्रान्वयें आद्युदात्त असणाऱ्या, 'ओम्' या निपाताशी पररूप सन्धि करतेवेळी, 'ओमाङोश्च' या सूत्रान्वयें होणारा 'ओम्' हा पररूप एकादेश, दोन्ही स्थानीचे स्वर ज्यात आहेत अशा, अन्तरतम स्वरित स्वरानें युक्त होतो स्वरितातील एकदेश उदात्त व एकदेश अनुदात्त राहत असल्यामुळें, स्वरितत्व हा धर्म उदात्तत्वाशीं किंवा अनुदात्तत्वाशी विरुद्ध ठरत नाहीं हें उघड आहे व त्यामुळें स्वरित पूर्व स्थानी व उदात्त पर स्थानी याचा पररूप एकादेश होतेवेळीं, दोन्ही गुणानी युक्त असा स्वरित पररूप एकादेश होतो ) 'ऐऔच्' या शिवसूत्रावरील भाष्यात, 'आद्गुणः' इत्यादि सूत्रानी होणाऱ्या एकादेशास 'दीर्घ' हें विशेषण लावावे व तसे विशेषण लावण्याचे प्रयोजन हें आहे कीं, (जेथें दोन्ही स्थानीच्या मिळून तीन किंवा चार मात्रा होत असनात तेथें त्याचे जागीं) त्रिमात्रिक किंवा चतुर्मात्रिक एकादेश न व्हावा (व द्विमात्रिकच एकादेश व्हावा) असें वार्तिककारानें म्हटलें आहे त्यावर भाष्यात असें म्हटले आहे कीं, 'अकः सवर्णे दीर्घः' या सूत्राचा 'दीर्घः' असा योगविभाग करून, 'एकः पूर्वपरयोः' या सूत्रात निर्दिष्ट असलेला (व पूर्व व पर स्थानीचे जागीं होणारा) एकादेश दीर्घ होतो – म्हणजे द्विमात्रिकच होतो– असें व्याख्यान करावे, म्हणजे 'एकः पूर्वपरयोर्दीर्घः' असें सूत्र पठित

करावे. पण असें केल्यास 'पच + अन्तिः = पचन्ति' या स्थली दोष येईल, म्हणजे 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रानें या उदाहरणात होणारा एकादेश देखील दीर्घ होण्याची आपत्ति येईल, अशी शंका करून त्या शंकेचे उत्तर देताना ('अतो गुणे' या सूत्रात 'एङि. पररूपम्' या पूर्व सूत्रातून 'पररूपम्' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें व अशा रीतीनें त्या सूत्रात केवळ 'पर' एवढयाच शब्दाचे ग्रहण न करिता) 'रूपम्' या अधिक शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें, परस्थानीचे जसें रूप आहे तसेच एकादेशाचे रूप होईल असे जें एकदेशीनें म्हटलें आहे ते (ऱ्हस्व हा गुण असून देखील) ऱ्हस्वत्व या गुणाचे ठिकाणी रूपाचा आरोप करून म्हटले आहे. परतु त्या सूत्रात 'रूप' या शब्दाचे जें ग्रहण केले आहे ते केवळ अर्थ स्पष्ट होण्याकरिता केले आहे हें ('तपरे गुणवृद्धी' असा सिद्धान्त सांगितला असल्यामुळें) त्या भाष्यावरूनच ध्वनित होते. पण 'इको गुणवृद्धी' १-१-३ या सूत्रावरील भाषाच्या वृत्तींत कैयटानें ( पररूपेण शुद्धो भविष्यति' या भाष्यातील पक्तीचे व्याख्यान करिताना 'रूपग्रहणस्येदमेव प्रयोजन यादृक परस्य रूप तादृगेव यथा स्यादिति' असें ) जें म्हटले आहे ते चिन्त्यच आहे, म्हणजे ते म्हणणें मुळीच बरोबर मानता येत नाही. त्या भाष्यात, 'इको गुणवृद्धी' ही परिभाषा नसल्यास, 'जन' धातूतील अन्त्य नकाराचा ('सार्वधातुकार्धधातुकयोः' सू. २१६८ या सूत्रानें गुण होऊन) गुणरूप आदेश अनुनासिक होण्याची आपत्ति येईल अशी शंका उपस्थित केली असता, त्या शंकेवर 'पररूपेण शुद्धो भविष्यति' — म्हणजे गुणरूप आदेश अनुनासिक झाला तरी पुन्हा पररूप एकादेश केल्यावर तो आदेश निरनुनासिक होईल — असें भाष्यात उत्तर दिले आहे व (पर. किं गुणको भवतीत्याकाङ्क्षाया ...... एकस्यान्यन्तरतमत्वाद्विधिः' असें जें आम्ही पूर्वी शब्दरत्नात म्हटलें आहे त्या) आम्ही सांगितलेल्या तऱ्हेनें त्या भाष्याची उपपत्ति लावता येते, म्हणजे ते भाष्य आमच्या पूर्वी सांगितलेल्या मताच्या विरुद्ध जात नाहीं. 'ऐऔच्' या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तीत जें

कैयटानें म्हटलें आहे तें केवळ पूर्वपक्षाचे उपपादन करणारे विवेचन असून, कैयटाचे स्वतःचे तसें मत आहे असें, म्हणजे 'पररूपम्' या स्थली 'रूप' हा शब्द असणें आवश्यक आहे असें, प्रतिपादन करणारे ते विवेचन नव्हे. ('ऐऔच्' या शिवसूत्रावरील भाष्यात 'एकादेशे दीर्घग्रहणम्' असें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात – 'एकादेशे दीर्घग्रहणं कर्तव्यम् । आद्गुणो दीर्घः । वृद्धिरेचि दीर्घ इति । किं प्रयोजनम् ? । आन्तर्यतस्त्रिमात्रचतुर्मात्राणां स्थानिनां त्रिमात्रचतुर्मात्रा आदेशा मा भूवन्निति । ...... खट्वा ऐतिकायनः खट्वैतिकायनः । खट्वा औपगवः खट्वौपगवः । तत्तर्हि दीर्घग्रहणं कर्तव्यम् ? । न कर्तव्यम् । उपरिष्टाद्योगविभागः करिष्यते । अकः सवर्णे एको भवति । ततो दीर्घः । दीर्घश्च स भवति यः स एकः पूर्वपरयोरित्येव निर्दिष्ट इति । इहापि तर्हि प्राप्नोति । पटु, विद्ध, पचन्तीति । नैष दोष. । ... पचन्तीति । अतो गुणे परः इतीयता सिद्धम् । सोऽयमेवं सिद्धे सति यद्रूपग्रहणं करोति तस्यैतत्प्रयोजनम् – यथाजातीयकं परस्य रूपं तथाजातीयकमुभयोर्यथा स्यात् इति । इह तर्हि खट्वर्श्यो माल्दर्श्य इति दीर्घवचनादकारो न, अनान्तर्यादिकारोकारौ न । तत्र को दोषः – ? । त्रिगृहीतस्य श्रवणं प्रसज्येत । न ब्रूमो, यत्र क्रियमाणे दोषस्तत्र कर्तव्यमिति । किं तर्हि ? । यत्र क्रियमाणे न दोषस्तत्र कर्तव्यमिति । क्व च क्रियमाणे न दोषः ? । संज्ञाविधौ । वृद्धिरादैज्दीर्घः । अदेङ्गुणो दीर्घ इति । तत्तर्हि दीर्घग्रहणं कर्तव्यम् ? । न कर्तव्यम् । कस्मादेवान्तर्यतस्त्रिमात्रचतुर्मात्राणां स्थानिनां त्रिमात्रचतुर्मात्रा आदेशा न भवन्ति ? । तपरे गुणवृद्धी । ननु च तः परो यस्मात्सोऽयं तपरः । नेत्याह । तादपि परस्तपर इति ।' या भाष्याचा असा अर्थ आहे की, 'एओङ्, ऐऔच्' या शिवसूत्रांतील 'ए, ओ, ऐ, औ' तपर न केल्यास, एकादेशविधायक सूत्रांत 'दीर्घ' हा शब्द घालावा लागेल व 'आद्गुणो दीर्घः, वृद्धिरेचि दीर्घः' अशा प्रकारे एकादेशाचे विधान करणारी सूत्रें पठित केली पाहिजेत. तसें तीं सूत्रें पठित करण्याचे प्रयो-

जन हे आहे कीं, जेथे दोन्ही स्थानीच्या मिळून तीन किंवा चार मात्रा होतात तेथें एकादेश त्रिमात्रिक किंवा चतुर्मात्रिक न होता द्विमात्रिकच व्हावा उदाहरणार्थ खट्वा+ऐतिकायनः' व 'खट्वा+ औपगव ' या स्थली एकादेशाचे जे दोन स्थानी आहेत त्या दोहोंच्या मिळून चार मात्रा होत असल्यामुळें जो चतुर्मात्रिक आदेश आन्तरतम्याने प्राप्त होतो तो एकादेश चतुर्मात्रिक न होता द्विमात्रिकच व्हावा परंतु एकादेशविधायक सूत्रात 'दीर्घ' या पदाचे ग्रहण न केलें तरी चालू शकते, कारण 'आद्गुणः, वृद्धिरेचि' या सूत्राच्या पलीकडे पठित असलेल्या 'अक सवर्णे दीर्घः' या सूत्राचा 'अकः सवर्णे' व 'दीर्घ ' असा योगविभाग केल्यानें, 'दीर्घ ' या योगविभागाचा असा अर्थ होतो कीं, 'एक पूर्वपरयो ' या अधिकारामध्यें पठित असलेल्या कोणत्याहि सूत्रानें जो एकादेश होणें सांगितले आहे तो एकादेश दीर्घ होतो पण असा अर्थ केल्यास, 'अतो गुणे' हे सूत्र देखील वरील अधिकारात पठित असल्यामुळें, त्या सूत्रानें होणारा एकादेश देखील दीर्घ होण्याची आपत्ति येईल पण वास्तविक ही आपत्ति येत नाहीं, कारण 'अतो गुणे' सू १९१ या सूत्रात 'एङि पररूपम्' या पूर्व सूत्रातून 'पररूपम्' या पदाची अनुवृत्ति होत आहे व 'अतो गुणे पर ' असे सूत्र करून देखील काम भागत असता, आचार्य पाणिनीनें ज्याअर्थी 'रूप' हा अधिक शब्द उच्चारला आहे त्याअर्थी हे सिद्ध होते की, ज्याप्रकारचे – जितक्या मात्राचे – परस्थानीचे रूप आहे तशाच प्रकारचे दोन्ही स्थानीचे जागी होणाऱ्या एकादेशाचें रूप व्हावे परंतु असे मानले तरी, 'खट्वा+ऋश्य , माला+ऋश्य ' या उदाहरणात, 'एक पूर्वपरयो ' या अधिकारात पठित असलेल्या 'आद्गुण ' या सूत्रात 'दीर्घ' या शब्दाचे ग्रहण केल्यानें, 'आ' या स्थानीचा जरी स्थानसाम्यानें 'अ' हा अन्तरतम आहे तरी तो ऱ्हस्व असल्यामुळें होणार नाही व 'ए, ओ' याशी आकाराचे स्थानसाम्य नसल्यामुळें तेहि होणार नाहीत व त्याचा परिणाम असा होईल कीं, सन्धि न होता 'आ' व 'ऋ' या दोहोंचेंहि श्रवण

होईल. या आपत्तीचें निरसन करितांना भाष्यकार असे म्हणतात कीं, 'एकादेशे दीर्घग्रहणम्' या वार्तिकाचा आम्ही असा अर्थ म्हणत नाहीं कीं, ज्या एकादेशविधायक सूत्रामध्यें एकादेश दीर्घ होतो असे म्हटल्यानें दोष येतो तेथें देखील 'दीर्घ' या शब्दाचें ग्रहण करावें. जेथें दोष येत नसेल तेथेंच 'दीर्घ' शब्दाचें ग्रहण करावें असें आमचें म्हणणें आहे. वृद्धि व गुण या संज्ञांचें स्वरूप सांगणाऱ्या 'वृद्धिरादैच्' 'अदेङ्गुणः' या दोन सूत्रांत 'दीर्घः' या पदाचें ग्रहण करून 'वृद्धिरादैच् दीर्घः' 'अदेङ्गुणो दीर्घः' अशीं ही सूत्रें पठित करावीं. परंतु वास्तविक त्या दोन सूत्रांत देखील 'दीर्घ' या शब्दाचें ग्रहण करण्याची कांहीं गरज नाहीं; कारण त्या दोन्ही सूत्रांत तपर उच्चारण केलें आहे व 'तपर' या शब्दाचा 'तः परो यस्मात्' एवढाच विग्रह होत नसून 'तात् परः' असा देखील विग्रह होतो त्यामुळें 'तपरस्तत्कालस्य' सू. १५ या सूत्रांतील 'तपरः' हा बहुव्रीहिसमास मानल्यानें 'अदेङ् गुणः', 'वृद्धिरादैच्' या सूत्रांत तकार पुढें जोडलेले गुणसंज्ञक 'अ' व वृद्धिसंज्ञक 'आ' हे तपर ठरून, व तो पञ्चमी-तत्पुरुषसमास मानल्यानें, तकारापुढें निर्दिष्ट असलेले 'एङ्, ऐच् = ए, ओ, ऐ, औ' हे तपर ठरून तात्कालिक वर्णांचे ग्राहक होत असल्यामुळें, वर दर्शविलेल्या सर्व आपत्तींचें सहज निवारण होऊं शकतें असा भाष्यकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. या वरील भाष्यांत भाष्यकारांनीं वर सांगितल्याप्रमाणें अर्थरीत्या जो सिद्धान्त सांगितला आहे त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'अतो गुणे पररूपम्', 'ओमाङोश्च पररूपम्' अशीं सूत्रें पठित न करितां, 'अतो गुणे परः, ओमाङोश्च परः' अशीं सूत्रें पठित केलीं तरी, म्हणजे त्या दोन सूत्रांत 'एङि पररूपम्' या पूर्व सूत्रांतून 'पररूपम्' या संपूर्ण पदाची अनुवृत्ति न करितां 'पर' एवढ्याच शब्दाची अनुवृत्ति केली तरी, 'अवर्णान्तात् गुणसंज्ञके वर्णे परे सति परः एकादेशो भवति' असा प्रथम सूत्राचा अर्थ होऊन 'पच + अन्ति' या स्थळीं 'अ' वर्णापुढें गुणसंज्ञक अकार असल्यामुळें दोन्ही अकारांचे

जन हे आहे की, जेथें दोन्ही स्थानींच्या मिळून तीन किंवा चार मात्रा होतात तेथें एकादेश त्रिमात्रिक किंवा चतुर्मात्रिक न होता द्विमात्रिकच व्हावा उदाहरणार्थ खट्वा + ऐतिकायन.' व 'खट्वा + औपगव' या स्थली एकादेशाचे जे दोन स्थानी आहेत त्या दोहोंच्या मिळून चार मात्रा होत असल्यामुळें जो चतुर्मात्रिक आदेश आन्तरतम्यानें प्राप्त होतो तो एकादेश चतुर्मात्रिक न होता द्विमात्रिकच व्हावा परतु एकादेशविधायक सूत्रात 'दीर्घ' या पदाचे ग्रहण न केलें तरी चालू शक्ते कारण 'आद्गुण, वृद्धिरेचि' या सूत्राच्या पलीकडे पठित असलेल्या 'अक सवर्णे दीर्घः' या सूत्राचा 'अक सवर्णे' व 'दीर्घ' असा योगविभाग केल्यानें, 'दीर्घ' या योगविभागाचा असा अर्थ होतो कीं, 'एक पूर्वपरयो' या अधिकारामध्यें पठित असलेल्या कोणत्याहि सूत्रानें जो एकादेश होणें सागितले आहे तो एकादेश दीर्घ होतो पण असा अर्थ केल्यास, 'अतो गुणे' हे सूत्र देखील वरील अधिकारात पठित असल्यामुळें, त्या सूत्रानें होणारा एकादेश देखील दीर्घ होण्याची आपत्ति येईल पण वास्तविक ही आपत्ति येत नाही, कारण 'अतो गुणे' सू १९१ या सूत्रात 'एडि पररूपम्' या पूर्व सूत्रातून 'पररूपम्' या पदाची अनुवृत्ति होत आहे व 'अतो गुणे पर' असे सूत्र करून देखील काम भागत असता, आचार्य पाणिनीनें ज्याअर्थी 'रूप' हा अधिक शब्द उच्चारला आहे त्याअर्थी हे सिद्ध होते की ज्याप्रकारचे – जितक्या मात्राचे – परस्थानीचे रूप आहे तशाच प्रकारचे दोन्ही स्थानीचे जागी होणाऱ्या एकादेशाचे रूप व्हावे परतु असे मानले तरी 'खट्वा + ऋश्य, माला + ऋश्य' या उदाहरणात 'एक पूवपरयो' या अधिकारात पठित असलेल्या 'आद्गुण' या सूत्रात 'दीर्घ' या शब्दाचे ग्रहण केल्यानें, 'आ' या स्थानीचा जरी स्थानसाम्यानें 'अ' हा अन्तरतम आहे तरी तो ऱ्हस्व असल्यामुळे होणार नाही व 'ए ओ' याशी आकाराचें स्थानसाम्य नसल्यामुळें तेहि होणार नाहीत व त्याचा परिणाम असा होईल की, सन्धि न होता 'आ' व 'ऋ' या दोहोंचेंहि श्रवण

होईल या आपत्तीचे निरसन करिताना भाष्यकार असे म्हणतात की, 'एकादेशे दीर्घग्रहणम्' या वार्तिकाचा आम्ही असा अर्थ म्हणत नाही की, ज्या एकादेशविधायक सूत्रामध्यें एकादेश दीर्घ होतो असे म्हटल्यानें दोष येतो तेथें देखील 'दीर्घ' या शब्दाचे ग्रहण करावे. जेथें दोष येत नसेल तेथेंच 'दीर्घ' शब्दाचे ग्रहण करावं असे आमचे म्हणणे आहे वृद्धि व गुण या सञ्ज्ञाचे स्वरूप सागणाऱ्या 'वृद्धिरादैच्' 'अदेङ्गुण' या दोन सूत्रात 'दीर्घ' या पदाचे ग्रहण करून 'वृद्धिरादैच् दीर्घ' 'अदेङ्गुणो दीर्घ' अशी ती सूत्रें पठित करावीं परतु वास्तविक त्या दोन सूत्रात देखील 'दीर्घ' या शब्दाचे ग्रहण करण्याची काही गरज नाही, कारण त्या दोन्ही सूत्रात तपर उच्चारण केले आहे व 'तपर' या शब्दाचा 'त परो यस्मात्' एवढाच विग्रह होत नसून 'तात् पर' असा देखील विग्रह होतो त्यामुळें 'तपरस्तत्कालस्य' सू. १५ या सूत्रातील 'तपर' हा बहुव्रीहिसमास मानल्याने 'अदेङ् गुण', 'वृद्धिरादैच्' या सूत्रात तकार पुढें जोडलेले गुणसञ्ज्ञक 'अ' व वृद्धिसञ्ज्ञक 'आ' हे तपर ठरून, व तो पञ्चमी-तत्पुरुषसमास मानल्यानें, तकारापुढें निर्दिष्ट असलेले 'एङ्, ऐच् = ए, ओ, ऐ, औ' हे तपर ठरून तात्कालिक वर्णांचे ग्राहक होत असल्यामुळें, वर दर्शविलेल्या सर्व आपत्तीचे सहज निवारण होऊ शकते असा भाष्यकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे या वरील भाष्यात भाष्यकारानीं वर सांगितल्याप्रमाणे अखेरीस जो सिद्धान्त सांगितला आहे त्यावरून हे स्पष्ट होते की, 'अतो गुणे पररूपम्', 'ओमाङोश्च पररूपम्' अशी सूत्रें पठित न करिता, 'अतो गुणे पर, ओमाङोश्च पर' अशी सूत्रें पठित केलीं तरी, म्हणजे त्या दोन सूत्रात 'एङि पररूपम्' या पूर्व सूत्रातून 'पररूपम्' या संपूर्ण पदाची अनुवृत्ति न करिता 'पर' एवढ्याच शब्दाची अनुवृत्ति केली तरी, 'अवर्णान्तात् गुणसञ्ज्ञके वर्णे परे सति पर एकादेशो भवति' असा प्रथम सूत्राचा अर्थ होऊन 'पच + अन्ति' या स्थली 'अ' वर्णान्तापुढे गुणसञ्ज्ञक अकार असल्यामुळें दोन्ही अकाराचे

जागी पर अकार होण्यांत काहीं अडचण येत नाही आणि तो पर गुणसंज्ञक अकार 'तपरे गुणवृद्धी' या भाष्यसिद्धान्तान्वयें तात्कालिक वर्णाचा ग्राहक होत असल्यामुळें, वरील उदाहरणात दीर्घादेश होण्याची किंवा जेथें पूर्व अकार अनुनासिक आहे तेथें गुणरूप एकादेश अनुनासिक होण्याची आपत्ति येत नाहीं. त्याचप्रमाणे 'अवर्णान्तात् ओमि आङि च परे परः एकादेशः स्यात्' असा 'ओमाङोश्च परः' या सूत्राचा अर्थ होऊन, 'परो निरनुनासिकश्चेदेकादेशो निरनुनासिक, परोऽनुनासिकश्चेदेकादेशोऽनुनासिकः' असा त्या सूत्रातून सहज अर्थ निष्पन्न होऊ शकत असल्यामुळें व 'ओ' हा गुणसंज्ञक वर्ण आणि 'आ' हा वृद्धिसंज्ञक वर्ण तात्कालिक वर्णांचे व जसा त्याचा गुण किंवा धर्म आहे तशाचेच ग्राहक होऊ शकत असल्यामुळें आणि 'शिवायें + ओम्' या स्थळी 'ओम्' या परस्थानीतील आद्य 'ओ' हा निरनुनासिक असल्यामुळें, पररूप एकादेश अनुनासिक होण्याची आपत्ति मुळीच येत नाही व पररूप एकादेश निरनुनासिकच होऊ शकतो. म्हणून 'रूपग्रहण तु चिन्त्य-प्रयोजनम्' असे जें दीक्षितानीं मनोरमेंत म्हटले आहे ते वर दिलेल्या भाष्यसिद्धान्तान्वये अगदी योग्य आहे. हे खरे कीं, वरील भाष्यात 'अतो गुणे परः इतीयता सिद्धम् . तथाजातीयकमुभयोर्यथा स्यात्' असे म्हटले आहे. पण ते एकदेशीचे वचन असून, 'तपरे गुणवृद्धी' असा भाष्यसिद्धान्त असल्यामुळें, एकदेशीच्या वचनाचे आधारावर शंकाकारानें जी वर शंका उपस्थित केली आहे ती अखेरीस सांगितलेल्या सिद्धान्तपक्षास धरून नसल्यामुळें अयोग्य ठरते हे उघड आहे. तसेच त्या भाष्यावरील वृत्तीत 'तस्मात् पूर्वश्रुतिः पूर्वरूपार्था। सैवोत्तरत्रानुवर्तते इति सिद्धमिति पूर्वरूप भविष्यति।' असे जें कैयटानें म्हटले आहे ते केवळ पूर्वपक्षाचे कसे तरी समर्थन करण्याकरिता म्हटले असून सिद्धान्तप्रतिपादक नसल्यामुळे, शंकाकार त्या वचनाचा देखील आधार घेऊ शकत नाही आणि त्यामुळें त्याची शंका अयोग्यच ठरते. पण पुढें शंकाकार असे म्हणतो की, जरी

सूत्रानें 'जन्' यातील 'टि'चा, म्हणजे 'अन्'चा लोप व्हावा जर व्यञ्जनाला गुण होऊ शकतो असे मानले तर, 'सप्तम्या जनेर्डः' या सूत्रातील 'ड' प्रत्ययाचे डित्करण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते, कारण 'जन्' यातील नकाराचे जागीं 'अ' असा गुणादेश केल्यावर तीन्ही अकाराचा पररूप सन्धि होऊन 'उपसरज मन्दुरज' हीं रूपें सिद्ध होऊ शकतातच परंतु व्यञ्जनाला गुण होऊ शकत नाहीं असे आचार्य पाणिनीचे मत असल्यामुळे, त्याने 'जन्' धातूहून 'ड' प्रत्यय होणे मुद्दाम सांगितले आहे या भाष्याचा अर्थ नीट ध्यानात येण्याकरिता आपण 'पङ्के जातम् = पङ्कजम्' हे उदाहरण घेऊ या उदाहरणात 'जन्' धातूहून 'ड' प्रत्यय न करिता 'अ' प्रत्यय केला व व्यञ्जनास गुण होतो असे मानले तर 'जन् अ' या स्थलीं 'सार्वधातुकार्धधातुकयोः' सू २१६८ या सूत्रानें अर्धमात्रिक नकार या व्यञ्जनाचे जागीं एकमात्रिक अकार होऊन 'जन् + अ = ज + अ + अ' अशी स्थिति झाली असता, 'अतो गुणे' सू १९१ या सूत्राने प्रथम 'ज + अ = ज' असा पररूप एकादेश होऊन व नंतर 'ज + अ = ज' असा पुन्हा पररूप एकादेश होऊन 'पङ्कज' असे रूप सिद्ध होऊ शकतेच व त्यामुळें पाणिनीनें 'जन्' धातूहून जे 'ड' प्रत्यय होण्याचे विधान केले आहे ते व्यर्थ ठरू पाहते व्यञ्जनाला गुण होऊ शकत नाही असे मानले तरच 'ड' प्रत्ययाचे डित्करण चरितार्थ ठरत डित्करण केले नसते व 'अ' प्रत्यय होणे सांगितले असते तर, पाणिनीच्या मते व्यञ्जनास गुण होत नसल्यामुळे, 'अभस्यापि टेर्लोपो डिति' या वचनान्वयें 'टेः' सू ३१६ या सूत्रानें होणारा टिलोप झाला नसता व 'जन् + अ = जन' असे अनिष्ट रूप होऊन 'पङ्कजन' असे अशुद्ध रूप होण्याची आपत्ति आली असती ती आपत्ति टाळण्याकरिता पाणिनीने 'अ' प्रत्यय होण्याचे विधान न करिता 'ड' हा डित्प्रत्यय होण्याचे विधान केले आहे आणि अशा रीतीनें व्यञ्जनाला गुण होत नाहीं याचे ते

डित्करण ज्ञापक ठरतें. पण पुढें भाष्यकार असें म्हणतात की, 'सप्तम्यां जनेर्डः' या सूत्रात केलेले 'ड' प्रत्ययाचे डित्करण व्यञ्जनाला गुण होत नाही याचे ज्ञापक मानता येत नाहीं; कारण एखादें सूत्र केले नसता इष्ट रूपाची सिद्धि होत असून देखील जर तसे सूत्र मुद्दाम केलें असले तरच, तसें सूत्र व्यर्थ न ठरावें म्हणून, ज्ञापक मानता येतें. पण 'सप्तम्या जनेर्डः' या सूत्रात केलेले 'ड' प्रत्ययाचे डित्करण व्यर्थ ठरत नाहीं, कारण 'जन्' धातूतील नकाराचा गुण केल्यानें इष्ट रूप सिद्ध होऊ शकत नाही. याचे कारण हे की, 'अदेङ् गुण.' या सूत्रान्वयें 'अ, ए, ओ' हे तीन्ही वर्ण गुणसंज्ञक असल्यामुळें, नकार या व्यञ्जनास गुण करतेवेळीं नकाराचे जागी अकारच कां व्हावा व एकार किंवा ओकार का होऊ नये ? नकाराचे जागी एकार किंवा ओकार असा गुणरूप आदेश केल्यास, 'उपसरज , मन्दुरज.' अशी इष्ट रूपें सिद्ध होऊ शकत नाहीत पण येथें असें म्हणता येतें की, नकार या व्यञ्जनाची अर्धमात्रा असल्यामुळें व अकार एकमात्रिक असून 'ए, ओ' हे वर्ण द्विमात्रिक असल्यामुळें आणि अशा रीतीनें 'ए, ओ' याच्या मानानें नकार व अकार या दोहोत अधिक प्रमाणरूप सादृश्य असल्यामुळें, नकाराचे जागी 'ए' किंवा 'ओ' असा गुणरूप आदेश होऊ शकत नाही व अकार हाच गुणरूप आदेश होऊ शकतो पण नकाराचे जागी जरी अकारादेश केला तरी, नकार अनुनासिक असल्यामुळें आदेशरूप अकार आन्तरतम्यानें अनुनासिक होईल. परतु गुणरूप अकारादेश अनुनासिक झाला तरी 'जन् + अ + अ = ज + अँ + अ = जँ + अ' अशी स्थिति झाली असता, 'अतो गुणे' सू १९१ या सूत्रानें पररूप एकादेश केल्यावर अखेरीस जें रूप–'ज'–सिद्ध होतें तें निरनुनासिकच होईल व त्यामुळें इष्टरूप सिद्ध होण्यात काहीं अडचण येणार नाही. या भाष्यात 'पररूपेण शुद्धो भविष्यति' असें जें म्हटले आहे व असें म्हणताना 'यथाजातीयकः परः तथाजातीयकः उभयो. स्थाने

एकादेशो भविष्यति' असे न म्हणता 'पररूपेण' या शब्दाचे जें ग्रहण केले आहे व त्या भाष्यपङ्क्तीचे व्याख्यान करिताना पूर्वी सांगितल्याप्रमाणे कैयटानें जें म्हटले आहे त्या दोन्ही वचनाचा आधार घेऊन शंकाकार असे म्हणतो की, 'रूपग्रहण तु चिन्त्यप्रयोजनम्' असे जें दीक्षितांनी मनोरमेंत म्हटले आहे ते बरोबर मानता येत नाही, कारण वरील भाष्यात व कैयटवृत्तीत 'रूप' या शब्दाच्या ग्रहणाची सार्थकता दाखविली आहे. या शंकेवर शब्द-रत्नकार असे उत्तर देतात की, 'पररूपेण शुद्धो भविष्यति' असे जें भाष्यात म्हटले आहे त्यावरून असा अर्थ काढता येत नाही की, 'एङि पररूपम्' या सूत्रात केलेले 'रूप' या शब्दाचे ग्रहण आवश्यक आहे, कारण 'पर' किंगुणको भवतीत्याकाङ्क्षाया ...... एकस्थान्यन्तरतमत्वाद्विधि:' असे जें शब्दरत्नात पूर्वी म्हटले आहे त्या व्याख्यानानुरूप वरील भाष्यपङ्क्तीचा अर्थ सहज करता येतो व म्हणून 'रूपग्रहण तु चिन्त्यप्रयोजनम्' असें जें मनोरमेंत म्हटले आहे ते त्या भाष्यपङ्क्तीच्या विरुद्ध ठरत नाही. परंतु त्या भाष्यपङ्क्तीचे व्याख्यान करिताना कैयटानें जें आपल्या वृत्तीत म्हटले आहे ते मात्र विरुद्ध जाते. पण कैयटाचे म्हणणे बरोबर मानता येत नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. हरदत्तानें देखील 'एङि पररूपम्' या सूत्रावरील पदमञ्जरीत 'रूपग्रहण चिन्त्यप्रयोजनम्, तथा चामि पूर्व इत्यत्र रूपग्रहण न कृतम् ।' असेंच म्हटले आहे व नागेशानी 'रूपग्रहणस्येदमेव प्रयोजनम् – यादृक् परस्य रूप तादृगेव यथा स्यादिति' या कैयटवृत्तीचे व्याख्यान करिताना उद्योतात, शब्दरत्नात जें म्हटले आहे तेच, म्हटले आहे. सारांश 'रूपग्रहण तु चिन्त्यप्रयोजनम्' असें जें मनोरमेंत म्हटले आहे ते अगदी योग्य असून शंकाकारानें केलेली शंका अयोग्य आहे असें शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे.) 'नावक्लृप्तो यदा' असा ('अनवक्लृप्तो यदा' या ऐवजी) पाठ केल्यास कारिकेतील छन्दोभंग नाहीसा होतो. 'वार्तिक' या शब्दाचे 'वृत्तौ भवम्' असें व्याख्यान केल्यास, 'वार्तिक'

शब्दाचा पूर्वनिपात होण्याची आपत्ति येईल असें काही वैयाकरणाचे म्हणणें आहे. ('यत्तु श्लोकवार्तिकमिदमित्याहुः, तद्भ्रमसात्' असें जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्यावर खण्डनकाराचे असें म्हणणे आहे की, 'अनवक्लृप्तौ यदा दृष्टः' ही कारिका श्लोक-वार्तिक आहे असें जें प्रकाशकारानी म्हटले आहे ते मुळीच चूक नाही, कारण त्यानी 'श्लोकवार्तिक' असें म्हणताना जो 'वार्तिक' शब्दाचा उपयोग केला आहे तो 'वार्तिककारानें रचलेले वार्तिक' या रूढ अर्थामध्यें केला नसून 'वृत्तौ भव.' – वृत्तींत दिलेला – या यौगिक अर्थामध्यें त्या शब्दाचा उपयोग केला आहे – म्हणजे 'वृत्ति' या द्व्यच्क शब्दाहून 'व्यजुद्ब्राह्मण' सू० १४५१ या सूत्रानें 'तत्र भव' या अर्थामध्यें 'ठक्' प्रत्यय केला असता, 'किति च' सू० १०७६ या सूत्रानें 'ऋ' या आद्य अचाची वृद्धि होऊन व 'यस्येति च' सू० ३११ या सूत्रानें 'वृत्ति' मधील अन्त्य इकाराचा, 'ठक् = इक' हा तद्धित प्रत्यय पुढें असल्यामुळें, लोप होऊन बनलेला 'वार्तिक' हा यौगिक शब्द आहे. त्यामुळें दीक्षितानी जें मनोरमेंत वर सांगि-तल्याप्रमाणें म्हटले आहे ते अयोग्य ठरतें पण खण्डनकाराचे हें व्याख्यान बरोबर मानल्यास, 'वार्तिक' हा शब्द 'श्लोक' या शब्दाचे विशेषण ठरतो व या दोन विशेषणविशेष्यवाचक पदाचा 'विशेषण विशेष्येण बहुलम्' सू० ७३६ या सूत्रानें समास केल्यास, 'वार्तिक' हें विशेषण 'प्रथमानिर्दिष्ट समास उपसर्जनम्' सू ६५३ या सूत्रा-न्वयें उपसर्जनसंज्ञक ठरेल व 'उपसर्जन पूर्वम्' सू ६५४ या सूत्रा-न्वयें तें पद समासात पूर्व पद होऊन 'वार्तिकश्लोक' असें सामासिक पद होईल. पण प्रकाशकारानीं अशा पदाचा उपयोग न करिता 'श्लोकवार्तिकम्' या पदाचा उपयोग केला असल्यामुळें, खण्डनका-रानें केलेले व्याख्यान बरोबर मानतां येत नाहीं असें कांही वैयाकर-णाचे म्हणणें आहे. या शब्दरत्नातील पंक्तीत 'आहु.' हें जें पद घातलें आहे ते भैरवीकाराच्या व भावप्रकाशकाराच्या मते अरुचि-प्रदर्शक आहे, म्हणजे त्या वैयाकरणाचे म्हणणें शब्दरत्नकारांना मान्य

नाही, व भैरवीकारानी 'आहुरित्यस्वरसबीजन्तु पूर्वनिपातप्रकरण-स्यानित्यत्वेन तथा व्याख्यानमपि युक्तमेवेति ।' असें म्हटले आहे व *त्याचा अर्थ हा आहे की, पूर्वनिपाताची सूत्रें अनित्य असल्यामुळें,* खण्डनकाराने केलेले व्याख्यान अयोग्य ठरत नाही.)

मनोरमा---शकन्ध्वादिष्विति । शकन्ध्वादिविषये तत्सिद्ध्यनुगुण पररूपं वाच्यमित्यर्थः । अत एवाह–तच्च टेरिति । यदि तु 'आत्' इत्यधिकारादकारस्यैवेष्येत तर्हि मनीषा, इति न सिद्ध्येत् । केचित्तु मनःपतच्छब्दयोः पृषोदरादित्वादन्त्यलोपेऽकारस्यैव पररूपमाहुः । शकानां देशविशेषाणामन्धुः=कूपः–शकन्धुः । कर्काणां राज्ञामन्धुः । बदरीवाची तु कर्कन्धूशब्दो दीर्घान्तः "अन्दूदृम्भू–" इत्यादिना उणादिषु वक्ष्यते । अटतीत्यटा पचाद्यच् । कुलस्य अटा कुलटा । ईष उञ्छे, ईष गत्यादिषु, आभ्यां "गुरोश्च हलः" इत्यप्रत्यये ईषा । मनस ईषा मनीषा । हलस्य ईषा हलीषा=लाङ्गलदण्डः । मूर्द्धन्योपधः । यस्तु

"प्रभुशङ्करयोरीशः स्त्रियां लाङ्गलदण्डके ।"

इति रभसकोशात् तालव्योपधस्तस्मिन् परे "आद्गुणः" इत्येव भवति, हलेशा । पतन्नञ्जलिर्यस्मिन् नमस्कार्यत्वादिति पतञ्जलिः । मार्तण्ड इति । केचिदत्र सवर्णदीर्घमाहुः । परा मार्ताण्डमास्यत्, पुनर्मार्ताण्डमाभरत्, विदथो मार्ताण्डोऽव्रजदित्यादिवैदिकप्रयोगास्तेषामनुकूलाः ॥

(*'अचोऽन्त्यादि टि' सू० ७९ या सूत्रावरील कौमुदीत पठित* असलेल्या 'शकन्ध्वादिषु पररूप वाच्यम्' या वार्तिकाचा असा अर्थ आहे कीं, 'शकन्धु' इत्यादि शब्दाच्या विषयात, म्हणजे 'शकन्धु' इत्यादि रूपें सिद्ध करतेवेळी, ज्या स्थानीचे जागीं पररूप आदेश केल्याने इष्ट रूप सिद्ध होऊ शकते तशाच स्थानीचे जागीं पररूप आदेश करावा, आणि म्हणूनच 'तच्च टेः' असें कौमुदीत व्याख्यान केले आहे. (वास्तविक 'टेः' हा शब्द प्रकृत

वार्तिकांत निर्दिष्ट नाहीं. तथापि शकन्ध्वादिगणांत अन्तर्भूत
असलेल्या शब्दांच्या 'टि' चा त्या 'टि' च्या लगेच पुढें असणाऱ्या
अचाशीं पररूप संधि केल्यानेंच इष्ट रूपांची सिद्धि होऊं शकत
असल्यामुळें, 'टि' चे व पुढील अचाचे जागीं मिळून पररूप एकादेश
करावा असें कौमुदींत म्हटलें आहे ) जर 'आद्‌गुणः' या पूर्व
सूत्रांतून 'आत्' या अधिकारपदाची प्रकृत वार्तिकांत अनुवृत्ति केली
तर (व 'अ' वर्णाचेच जागीं पररूप आदेश होतो असें मानलें तर)
'मनीषा' हें रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं, (कारण 'मनस् + ईषा'
या स्थलीं 'ई' या अचापूर्वी 'अ' वर्ण नसून 'अस्' आहे 'तच्च
टेः' असें व्याख्यान केल्यानेंच म्हणजे 'टि' चे जागीं पररूप आदेश
होतो असें मानल्यानेंच, 'अस्' या 'टि' चे जागीं 'ई' हा पररूप
आदेश होऊन शकन्ध्वादिगणांत पठित असलेल्या 'मनीषा' या
रूपाची सिद्धि होऊं शकते ) कित्येक वैयाकरणांचे (प्रकाशकारांचे)
असें म्हणणें आहे कीं, 'मनस्' व 'पतत्' या शब्दांतील अन्त्य
वर्णाचा 'पृषोदरादीनि यथोपदिष्टम्' सू १०३४ या सूत्रान्वयें लोप
केला असतां, (प्रकृत वार्तिकांत 'आद्‌गुणः' या सूत्रांतून 'आत्'
या अधिकारपदाची अनुवृत्ति मानली तरी देखील) 'अ' वर्णाचेच,
म्हणजे सकाराचा व तकाराचा अनुक्रमें लोप केल्यानें 'मन, पत'
अशीं जीं रूपें होतात त्यांतील अन्त्य अकाराचे, जागीं पररूप आदेश
होतो (व 'मनीषा' आणि 'पतञ्जलि' या इष्ट रूपांची सिद्धि
होते ) 'शकानां देशविशेषाणामन्धुः' असा 'शकन्धु' या शब्दाचा व
'कर्काणां राज्ञामन्धुः' असा 'कर्कन्धु' या शब्दाचा विग्रह आहे (व हे
दोन्ही शब्द पररूप एकादेश होऊन सिद्ध झाले आहेत आणि या शब्दां-
तील 'अन्धु' या शब्दाचा 'कूप' असा अर्थ आहे ) बोराचा वाचक
'कर्कन्धू' हा शब्द दीर्घ ऊकारान्त आहे व 'अन्दूदृम्भू' उणादि
सू ९३ या उणादि सूत्राचें व्याख्यान करतेवेळीं त्या शब्दाची व्युत्पत्ति
सांगण्यांत येईल ('कर्कं दधातीति कर्कन्धूः' या स्थलीं 'धा'
धातूहून वरील उणादि सूत्रान्वयें 'कू = ऊ' हा उणादि कित् प्रत्यय

होऊन 'कर्कन्धू' हा शब्द सिद्ध झाला आहे) 'अटतीति अटा' या स्थली ('नन्दिग्रहिपचादिभ्य' सू २८९६ या सूत्रान्वयें) पचादि या आकृतिगणात अन्तर्भूत असलेल्या 'अट्' धातूहून 'अच् = अ' प्रत्यय झाला आहे (व अशा रीतीनें 'अट' हे अदन्त प्रातिपदिक सिद्ध होऊन त्याहून 'अजाद्यतष्टाप्' सू ४५४ या सूत्रानें स्त्रीत्व बोधक 'टाप=आ' प्रत्यय केल्यावर 'अटा' असे स्त्रीलिङ्गाचे रूप होते व शकन्ध्वादिगणात अन्तर्भूत असलेल्या 'कुलटा' या शब्दाचा) 'कुलस्य अटा' असा विग्रह आहे (व या स्थली पररूप एकादेश होऊन 'कुलटा' हें रूप सिद्ध झाले आहे.) 'ईष उञ्छे' किंवा ईष गत्यादिषु' या धातूहून 'गुरोश्च हल' सू ३२८० या सूत्रानें 'अ' प्रत्यय होऊन (व नंतर 'ईष' या अदन्त प्रातिपदिकाहून 'टाप्=आ' प्रत्यय होऊन स्त्रीलिङ्गाचे) 'ईषा' असे रूप होते व 'मनस ईषा मनीषा, हलस्य ईषा हलीषा' हीं रूपें (पररूप सन्धि केल्यानें) सिद्ध होतात 'हलीषा' या शब्दाचा 'नांगराचा दांडा' असा अर्थ आहे व या शब्दाच्या उपधेंत मूर्धन्य षकार आहे 'लाङ्गलदण्डक' या अर्थाचा वाचक जो तालव्योपध 'ईशा' हा शब्द 'प्रभुशङ्करयोरीष, स्त्रियां लाङ्गलदण्डके' या रभस-कोषातील श्लोकात निर्दिष्ट आहे तो शब्द 'हल' या शब्दापुढें आला असता, 'आद्गुण' या सूत्रानें गुणरूप एकादेशच होतो व 'हलेशा' असें रूप सिद्ध होते ('हलीषा' हा शब्द शकन्ध्वादिगणात पठित असून, ज्याच्या उपधेंत तालव्य शकार आहे असा 'हलीशा' या प्रकारचा शब्द त्या गणात पठित नाहीं त्यामुळें 'हल्+ईशा' या स्थली प्रकृत वार्तिकान्वयें पररूप एकादेश न होता 'आद्गुण' सू ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'हलेशा' असेच रूप सिद्ध होते व 'हलीशा' असे रूप सिद्ध होऊ शकत नाही) पतञ्जलि' या शब्दाचा 'पतन्' अञ्जलिर्यस्मिन्, नमस्कार्यत्वात्' असा विग्रह आहे (ज्याला पाहताक्षणीच किंवा ज्याचे नाव उच्चारताक्षणीच लोक

बद्धाञ्जलि होऊन नमस्कार करतात तो पूज्य व नमस्कारार्ह महर्षि पतञ्जलि होय. गोनर्ददेशात कोणी एक ऋषि सन्ध्या करीत असताना त्याच्या अञ्जलीतून महर्षि पतञ्जलि पडले व अशा रीतीनें त्याचा जन्म झाला या दन्तकथेचा आधार घेऊन कित्येक वैयाकरण 'पतञ्जलि' या शब्दाचा 'अञ्जलेः पतन्' असा विग्रह करतात व म्हणतात कीं, या स्थली 'मयूरव्यंसकादयश्च' सू. ७५४ या सूत्रानें 'पतन्' या पदाचा पूर्व निपात झाला आहे.) 'मार्तण्डः' या स्थली कित्येक वैयाकरण ('अकः सवर्णे दीर्घः' सू ८५ या सूत्रानें) सवर्णदीर्घ करतात (व मार्ताण्डः' असे देखील रूप होतें असे म्हणतात,) व त्याच्या म्हणण्यास 'परा मार्ताण्डमास्यत्, पुनर्मार्ताण्डिमाभरत्, विश्वो मार्ताण्डोऽव्रजत्' इत्यादि वैदिक प्रयोग अनुकूल–प्रमाण–आहेत. ('मृतमण्ड यस्य सः मृतण्डः कश्चिदृषि.' या स्थली 'मृत+अण्ड' येथें 'अकः सवर्णे दीर्घः' या सूत्रानें जो सवर्ण दीर्घ पावला आहे त्याचा प्रकृत वार्तिकानें बाध होऊन व पररूप एकादेश होऊन, 'मृताण्डः' असे रूप न होता, 'मृतण्डः' असे रूप होते 'मृतण्ड' शब्दाहून 'तस्यापत्यम्' सू. १०८८ या अर्थामध्ये 'अण=अ' प्रत्यय केला असता 'तद्धितेष्वचामादेः' सू. १०७५ या सूत्रानें 'ऋ' या आद्य अचाची वृद्धि होऊन 'मृतण्डस्य अपत्य पुमान मार्तण्डः' असे रूप सिद्ध होते पण वैदिक प्रयोगात 'मार्ताण्ड' असा शब्द आढळत असल्यामुळें, कित्येक वैयाकरण 'मृत + अण्ड' या स्थळी प्रकृत वार्तिकानें सवर्णदीर्घाचा बाध न करिता सवर्णदीर्घ करून 'मृताण्ड' असे रूप सिद्ध करतात. व 'मृताण्डस्य अपत्य पुमान् मार्ताण्डः' या रूपाची सिद्धि करतात. दीक्षित म्हणतात की, असे करण्यास वैदिक प्रयोग अनुकूल असल्यामुळें त्याचे तसें करणे वावगें मानता येत नाही पण 'दृष्टानुविधिश्छन्दसि' या वचनान्वयें 'मार्ताण्ड' या छान्दस प्रयोगाची सिद्धि करणे अधिक इष्ट आहे.)

होऊन 'कर्कन्धू' हा शब्द सिद्ध झाला आहे.) 'अटतीति अटा' या स्थली ('नन्दिग्रहिपचादिभ्यः' सू. २८९६ या सूत्रान्वयें) पचादि या आकृतिगणात अन्तर्भूत असलेल्या 'अट्' धातूहून 'अच्=अ' प्रत्यय झाला आहे (व अशा रीतीनें 'अट' हे अदन्त प्रातिपदिक सिद्ध होऊन त्याहून 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें स्त्रीत्व बोधक 'टाप्=आ' प्रत्यय केल्यावर 'अटा' असे स्त्रीलिङ्गाचे रूप होते व शकन्ध्वादिगणात अन्तर्भूत असलेल्या 'कुलटा' या शब्दाचा) 'कुलस्य अटा' असा विग्रह आहे ( व या स्थली पररूप एकादेश होऊन 'कुलटा' हे रूप सिद्ध झाले आहे. ) 'ईष उञ्छे' किंवा ईष गत्यादिषु' या धातूहून 'गुरोश्च हलः' सू ३२८० या सूत्रानें 'अ' प्रत्यय होऊन (व नतर 'ईष' या अदन्त प्रातिपदिकाहून 'टाप्=आ' प्रत्यय होऊन स्त्रीलिङ्गाचे ) 'ईषा' असे रूप होतें व 'मनसः ईषा मनीषा, हलस्य ईषा हलीषा' ही रूपें (पररूप सन्धि केल्यानें) सिद्ध होतात. 'हलीषा' या शब्दाचा 'नांगराचा दाडा' असा अर्थ आहे व या शब्दाच्या उपधेंत मूर्धन्य षकार आहे. 'लाङ्गलदण्डक' या अर्थाचा वाचक जो तालव्योपध 'ईशा' हा शब्द 'प्रभुशङ्करयोरीषः, स्त्रियां लाङ्गलदण्डके' या रभस-कोषातील श्लोकात निर्दिष्ट आहे तो शब्द 'हल' या शब्दापुढें आला असता, 'आद्गुणः' या सूत्रानें गुणरूप एकादेशच होतो व 'हलेशा' असे रूप सिद्ध होतें. ('हलीषा' हा शब्द शकन्ध्वादिगणात पठित असून, ज्याच्या उपधेत तालव्य शकार आहे असा 'हलीशा' या प्रकारचा शब्द त्या गणात पठित नाहीं. त्यामुळें 'हल+ईशा' या स्थली प्रकृत वार्तिकान्वयें पररूप एकादेश न होता 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'हलेशा' असेच रूप सिद्ध होते व 'हलीशा' असे रूप सिद्ध होऊ शकत नाही. ) पतञ्जलिः' या शब्दाचा 'पतन्' अञ्जलिर्यस्मिन्, नमस्कार्यत्वात्' असा विग्रह आहे. (ज्याला पाहताक्षणीच किंवा ज्याचे नाव उच्चारताक्षणीच लोक

बद्धाञ्जलि होऊन नमस्कार करतात तो पूज्य व नमस्कारार्ह महर्षि पतञ्जलि होय. गोनर्ददेशात कोणी एक ऋषि सन्ध्या करीत असताना त्याच्या अञ्जलीतून महर्षि पतञ्जलि पडले व अशा रीतीनें त्याचा जन्म झाला या दन्तकथेचा आधार घेऊन कित्येक वैयाकरण 'पतञ्जलि' या शब्दाचा 'अञ्जले: पतन्' असा विग्रह करतात व म्हणतात की, या स्थलीं 'मयूरव्यंसकादयश्च' सू. ७५४ या सूत्रानें 'पतन्' या पदाचा पूर्व निपात झाला आहे.) 'मार्तण्डः' या स्थली कित्येक वैयाकरण ('अक: सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रानें) सवर्णदीर्घ करतात (व मार्ताण्डः' असे देखील रूप होते असे म्हणतात,) व त्याच्या म्हणण्यास 'परा मार्ताण्डमास्यत्, पुनर्मार्ताण्डिमाभरत्, विश्वो मार्ताण्डोऽव्रजत्' इत्यादि वैदिक प्रयोग अनुकूल–प्रमाण–आहेत. ('मृतमण्ड यस्य सः मृतण्डः कश्चिदृषिः' या स्थली 'मृत+अण्ड' येथें 'अक: सवर्णे दीर्घः' या सूत्रानें जो सवर्ण दीर्घ पावला आहे त्याचा प्रकृत वार्तिकानें बाध होऊन व पररूप एकादेश होऊन, 'मृताण्डः' असे रूप न होता, 'मृतण्डः' असे रूप होते. 'मृतण्ड' शब्दाहून 'तस्यापत्यम्' सू. १०८८ या अर्थामध्ये 'अण=अ' प्रत्यय केला असता 'तद्धितेष्वचामादेः' सू. १०७५ या सूत्रानें 'ऋ' या आद्य अचाची वृद्धि होऊन 'मृतण्डस्य अपत्य पुमान मार्तण्डः' असे रूप सिद्ध होते पण वैदिक प्रयोगात 'मार्ताण्ड' असा शब्द आढळत असल्यामुळें, कित्येक वैयाकरण 'मृत + अण्ड' या स्थळी प्रकृत वार्तिकानें सवर्णदीर्घाचा बाध न करिता सवर्णदीर्घ करून 'मृताण्ड' असे रूप सिद्ध करतात. व 'मृताण्डस्य अपत्य पुमान् मार्ताण्डः' या रूपाची सिद्धि करतात दीक्षित म्हणतात की, असे करण्यास वैदिक प्रयोग अनुकूल असल्यामुळें त्याचे तसे करणे वावगें मानता येत नाही. पण 'दृष्टानुविधिश्छन्दसि' या वचनान्वयें 'मार्ताण्डः' या छान्दस प्रयोगाची सिद्धि करणे अधिक इष्ट आहे.)

'शब्दरत्न---विषय इति । शकन्ध्वादिष्विति विषयसप्तमीति भावः । अत एवाहेति । ईदृशव्याख्यानतो लब्धमाहेत्यर्थः ॥

आहुरिति । अत्रारुचिबीजं तु वचनद्वयव्यापारो व्यर्थः, पृषोदरादित्वाट्टिलोपेनैव सिद्धेरिति । देशविशेषाणामिति । देशविशेषशब्दस्य यौगिकत्वेन जातिवाचकत्वाभावात् "विशेषणानां चाजातेः" इति न निषेध इति बोध्यम् । कुलटयाटेति । कर्मणः शेषत्वविवक्षायां षष्ठी । अन्यथा कर्मण्यणि कुलाटीति स्यादिति भावः ।

'शकन्ध्वादिषु पररूप वाच्यम्' या वार्तिकाचा अर्थ करतेवेळीं 'शकन्ध्वादिविषये तत्सिद्ध्यनुगुण पररूप वाच्यम्' असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, त्या वार्तिकांतील 'शकन्ध्वादिषु' ही विषयसप्तमी आहे. 'अत एवाह' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, वर सांगितल्याप्रमाणे 'तत्सिद्ध्यनुगुण पररूपं वाच्यम्' असे जें प्रकृत वार्तिकाचे दीक्षितानी व्याख्यान केले आहे त्या व्याख्यानावरूनच 'तच्च टेः' हा अर्थ निष्पन्न होतो. (कारण 'टि' चे जागी पररूप आदेश केल्यानेंच मनोरमेच्या विवरणात सांगितल्याप्रमाणें इष्ट रूपाची सिद्धी होऊं शकते. मनोरमेंत 'अकारस्यैव पररूपमाहुः' असे जें प्रकाशकाराचे मत सांगताना दीक्षितानी म्हटलें आहे त्यातील 'आहुः' हा शब्द अरुचिप्रदर्शक आहे, म्हणजे प्रकाशकाराचे म्हणणे दीक्षिताना मान्य नाहीं, व) त्याचे कारण हे कीं, 'पृषोदरादीनि यथोपदिष्टम्' सू. १०३४ एवढेंच सूत्र प्रवृत्त करून टिलोप केल्यानेंच 'मनीषा, पतञ्जलिः' ही रूपें निपातनानें सिद्ध होऊं शकत असता, ते सूत्र व प्रकृत वार्तिक हीं दोन्ही प्रवृत्त करून ती दोन रूपें सिद्ध करण्याची खटपट करणे व्यर्थ आहे. (प्रकाशकाराच्या अनुयायीचे असे म्हणणे आहे की, 'मनस् + ईषा, पतत् + अञ्जलिः' या स्थलीं वर सांगितल्याप्रमाणे टिलोप केल्यास, 'मन् + ईषा, पत् + अञ्जलिः' अशीं रूपें होतील व या स्थलीं

नकार व तकार पदान्ती असल्यामुळें, 'न लोप. प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें 'मन्' यातील अन्त्य नकाराचा लोप होण्याची व तसेच 'झला जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें 'पत्' यातील अन्त्य तकाराचा दकार होण्याची आपत्ति येईल. म्हणून वरील दोन उदाहरणात 'टि' लोप न करिता 'मनस्, पतत्' यातील अन्त्य वर्णाचा 'पृषोदरादीनि' या सूत्रानें निपातनानें लोप करावा असे प्रकाशकारानी म्हटले आहे. तसे केल्यास 'मन + ईशा, पत + अञ्जलि:' अशी स्थिति झाली असता, प्रथम उदाहरणात 'आद्गुण:' सू. ६९ हें सूत्र व द्वितीय उदाहरणात 'अक: सवर्णे दीर्घ:' सू. ८५ हें सूत्र प्रवृत्त होऊ पाहतें. म्हणून त्या सूत्राचा बाध होण्याकरिता प्रकृत अपवादक वार्तिकाची प्रवृत्ति करणे आवश्यक आहे व प्रकृत वार्तिक प्रवृत्त केल्यानें पररूप एकादेश होऊन वरील दोन्ही इष्ट रूपाची सिद्धि होते. यावर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, 'पृषोदरादि' या आकृतिगणात 'मनीषा, पतञ्जलि:' हे शब्द अन्तर्भूत आहेत असे मानल्यानें 'पृषोदरादीनि यथोपदिष्टम्' या सूत्रान्वयेंच त्या दोन्ही शब्दाची निपातनानें सिद्धि होऊ शकत असता, त्या शब्दाची सिद्धि करण्याकरिता पुन्हा प्रकृत वार्तिक प्रवृत्त करण्याची गरज काय? 'पृषोदरादीनि' हें सूत्र प्रवृत्त केल्यानेंच काम भागत असता पुन्हा प्रकृत वार्तिकाची प्रवत्ति करणे अनावश्यक व व्यर्थ आहे)

'शकाना देशविशेषाणाम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यातील 'देशविशेष'–विशिष्ट देश–हा शब्द यौगिक अर्थानें जातीचा वाचक नसल्यामुळें, 'विशेषणाना चाजाते.' सू १३०० हा निषेध येथें लागू पडत नाही हें लक्षात ठेवावे. ('शकाना राज्ञा निवास:' या स्थली 'तस्य निवास:' सू. १२८१ या सूत्रानें चातुर्रथिक 'अण्' प्रत्यय केला असता, 'जनपदे लुप्' सू. १२९३ या सूत्रानें 'अण्' प्रत्ययाचा लुप् होतो व 'लुपि युक्तवद्व्यक्तिवचने' सू. १२९४ या सूत्रान्वयें 'शक' या प्रकृतीचे जें लिङ्ग–पुल्लिङ्ग–व वचन–बहुवचन–आहे त्या लिङ्गाचा व वचनाचा शब्द सिद्ध होणे सांगितले

असल्यामुळें, 'शकाना निवास जनपद' याचे 'शक' असे रूप न होता 'शका' असे रूप होते शक राजाचे राहण्याचे स्थान एक असून अनेक नसल्यामुळें, 'शकाना देशविशेपस्य' असे दीक्षितानी म्हणावयास पाहिजे होते व 'शकाना देशविशेपाणाम' असा जो त्यानी मनोरमेंत प्रयोग केला आहे तो असाधु ठरतो असे शकाकाराचे म्हणणे आहे या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, जरी 'देश' हा शब्द जातिवाचक आहे तरी 'देशविशेष' या शब्दाचा 'विशिष्ट देश' असा यौगिक अर्थ असल्यामुळें आणि अशा रीतीनें 'देशविशेष' हा शब्द व्यक्तीचा वाचक असल्यामुळें, 'विशेषणाना चाजाते' या सूत्रात सागितलेला 'अजाते' हा निपेध त्या शब्दाला लागू पडत नाही व त्यामुळें 'शकानाम्' या शब्दाचे जें लिङ्ग व वचन आहे तेच 'देशविशेष' या विशेपणरूप शब्दाचे होऊ शकते आणि म्हणून 'शकाना देशविशेपाणाम्' असाच प्रयोग साधु ठरतो व 'शकाना देशविशेपस्य' असा प्रयोग साधु ठरत नाही ) 'कुलस्य अटा कुलटा' या स्थली कर्माची शेपत्वानें विवक्षा असल्यामुळें 'कुलस्य' ही शेपे पष्ठी आहे कर्मरूपानें विवक्षा असल्यास, 'कर्मण्यण्' सू २९१३ या सूत्रानें अण्प्रत्यय होऊन 'कुलाटी' असे रूप होईल. (कर्मणि उपपद असताना 'कर्मण्यण्' या सूत्रानें धातूहून 'अण्' प्रत्यय होणे सागितले आहे म्हणून 'कुलस्य अटा' या स्थली 'कुलस्य' ही कर्मणि पष्ठी मानल्यास 'अट्' धातूहून 'अण्' प्रत्यय होईल व तो प्रत्यय णित् असल्यामुळें 'अत उपधाया' सू २२८२ *या सूत्रानें 'अट्' यातील 'अ' या उपधेची वृद्धि होईल आणि* 'टिड्ढाणञ्' सू ४७० या सूत्रानें 'डीप्' प्रत्यय होऊन, 'कुलटा' असे रूप न होता, 'कुलाटी' असे रूप होईल म्हणून 'कुलस्य' ही कर्मणि पष्ठी न मानता शेपे पष्ठी मानावी, म्हणजे येथें कर्माची कर्मत्वरूपानें विवक्षा नसून शेपत्वरूपानें विवक्षा आहे असे मानावे, व तसे मानल्यानें 'कुलटा' हें रूप पररूप एकादेश केल्यानें सिद्ध होते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा—ओत्वोष्ठयोरिति। अकारस्य ओत्वोष्ठयोश्चैकत्र समासे स्थितौ सत्यामिदं प्रवर्तते। तेनेह न, वृषलसुतौष्ठ-व्रणस्ते इति ॥

('अचोऽन्त्यादि टि' सू ७९ या सूत्रावरील कौमुदीत पठित असलेले) 'ओत्वोष्ठयो. समासे वा' हे वार्तिक अशाच ठिकाणी प्रवृत्त होते की, जेथें 'अ' वर्णान्त शब्द व त्या पुढील 'ओतु' किंवा 'ओष्ठ' हा शब्द या दोहोंचे समासात एकत्र अवस्थान आहे, म्हणजे 'अ' वर्णान्त शब्दाचा त्या पुढील 'ओतु' किंवा 'ओष्ठ' या शब्दाशी समास झाला असताच प्रकृत वार्तिक प्रवृत्त होते. असे असल्यामुळें, 'हे वृषलसुत ओष्ठव्रणस्ते' या स्थली पररूप एकादेश होत नाही व 'वृषलसुतौष्ठव्रणस्ते' असे सन्धि केल्यानें रूप सिद्ध होते. (जरी 'वृषलसुत' या 'अ' वर्णान्त पदापुढें 'ओष्ठ' हा शब्द आहे तरी त्या दोहोंचा समास झालेला नसल्यामुळें व त्याची भिन्न पदात पृथक् अवस्थिति असल्यामुळें, या स्थली, समास झाला असताच प्रवृत्त होणारे, प्रकृत वार्तिक प्रवृत्त होऊ शकत नाहीं आणि पररूप एकादेश न होता 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होऊन 'वृषलसुतौष्ठव्रणस्ते' असा सन्धियुक्त प्रयोग सिद्ध होतो.)

मनोरमा—अव्यक्तशब्दं व्याचष्टे—ध्वनेरिति। अनुकरण-स्येति। परिस्फुटाकारादिवर्णस्येति भावः। तस्य चानुकरणत्वं किञ्चित्साम्येन बोध्यम्। यत्तु प्राचोक्तम्—अतः किम्? दकारान्ते मा भूदिति। यच्च व्याख्यातं दकारान्त इति रूपान्तरोपलक्षणं चटक्, मरुत् इत्यादेरपीति, तन्न सारम्, प्रश्नस्य, दान्त इत्युत्तरस्य च निरालम्बनत्वात्। यत्तु व्याचख्यु.—"अतो गुणे" इत्यतोऽत इत्यनुवर्त्य शब्दाधिकाराश्रयणात्सिद्धमिति प्रश्नः। यदा जश्त्व-शाद्दान्तत्वं तदाऽपि स्यात्पुनरद्ग्रहणे तु श्रौततान्तत्वस्य विवक्षणान्ने-त्युत्तरमिति, तच्चिन्त्यम्, जश्त्वशास्त्रस्यासिद्धत्वेन पररूपस्यैव

प्रवृत्तेः, "नाम्रेडितस्य–" इति निषेधे पटत्पटदितीत्युदाहरणस्या-सबद्धत्वापत्तेश्च । तत्र हि भवदुक्तरीत्या प्राप्तिरेव नास्ति, दान्तत्वात् । एतेनानुकार्यानुकरणयोरभेदविवक्षया विभक्त्यभावेन गवित्ययमाहेतिवदपदत्वात् पटत् इतीत्यत्र जश्त्वं नेति ग्रन्थोऽपि प्रत्युक्तः, उत्तरग्रन्थविरोधात्, जश्त्वस्यासिद्धतया पररूपेणैव बाधाच्च । ननु तदपि नित्यं तथा च कथं पररूपविरहेण प्रयोग इति, चेन्न, अलौकिक प्रक्रियावाक्यमिदमिति स्वयमेव व्याख्यातत्वात् संहिताया अविवक्षायां तत्सम्भवाच्चेति दिक् ।।

('अव्यक्तानुकरणस्यात इतौ' सू ८१ या सूत्रातील) 'अव्यक्त' या शब्दाचा 'ध्वनि' असा कौमुदीत अर्थ दिला आहे व त्या सूत्रातील 'अनुकरणस्य' या पदाचा 'परिस्फुटाकारादिवर्णस्य,' म्हणजे ज्यात अकारादिवर्ण स्पष्टपणें ऐकू येतात, असा अर्थ आहे. ध्वनि व त्याचें अनुकरण या दोहोमध्यें (ध्वनिरूप) थोडेसे साम्य राहत असल्या-मुळें, ध्वनीच्या अनुकरणाला 'अनुकरण' असे म्हणता येते हे जाणावें. (कोणी एखादा शब्द उच्चारल्यास दुसऱ्यानें तोच शब्द तशाच तऱ्हेनें उच्चारणें याला अनुकरण म्हणतात, व ज्याचे अनुकरण केले जाते त्याला अनुकार्य म्हणतात व अशा अनुकार्य व अनुकरण यात पूर्णपणें साम्य असते पण ध्वनीचे अनुकरण करणाऱ्या शब्दाचे ठिकाणी तसे साम्य राहणें शक्य नाही, कारण ध्वनि अव्यक्त-अपरिस्फुटवर्णविभाग – असून ज्या शब्दानें त्याचे अनुकरण केले जाते तो शब्द व्यक्त – परिस्फुटवर्णविभाग–असतो, म्हणजे ध्वनी-मध्यें अकारादि वर्ण नसून त्याच्या अनुकरणात अकारादि वर्ण असतात व त्याचे स्पष्टपणें श्रवण होते. पाऊस जोरानें पडत असला किंवा आंब्याच्या झाडावरून आंबे वाऱ्यामुळें खाली पडत असले तर 'पट्, पट्' असा आवाज होतो हा अव्यक्त ध्वनि होय. कारण यात अकारादि कोणत्याहि वर्णाचे स्पष्ट उच्चारण नसते. पण त्या अव्यक्त ध्वनीचे अनुकरण करणारा 'पट्, पट्' हा शब्द व्यक्त आहे, म्हणजे त्यात अकारादिवर्ण असून ते सर्व वर्ण स्पष्टपणें ऐकू येतात म्हणून

ध्वनि व त्याचे अनुकरण या दोहोंत पूर्ण साम्य नसल्यामुळें, ध्वनीच्या अनुकरणाला वास्तविक 'अनुकरण' असे म्हणता येत नाही तथापि त्या दोहोंत ध्वनिरूप थोडेसे साम्य राहून असल्यामुळें, ध्वनीच्या अनुकरणाला पाणिनीनें प्रकृत सूत्रात 'अनुकरण' म्हटले आहे असे दीक्षिताचे म्हणणें आहे ) प्रक्रियाकौमुदीकारानी 'अत किम्' असा जो प्रश्न केला आहे व त्या प्रश्नाचे 'दकारान्ते मा भूत्' असें जें उत्तर दिले आहे आणि याचे व्याख्यान करिताना 'दकारान्ते इति रूपान्तरोपलक्षण वटक् मरुत् इत्यादेरपि' असें जें प्रकाशकारानीं म्हटले आहे तें सर्व व्यर्थ आहे, कारण प्रक्रियाकौमुदीत केलेला प्रश्न व त्याचे उत्तर ही दोन्ही निराधार आहेत (प्रक्रिया-कौमुदीकारानीं प्रकृत सूत्रावरील वृत्तींत 'अत किम्' असा जो प्रश्न केला आहे व 'दकारान्ते मा भूत्' असे जें त्याचे उत्तर दिले आहे त्या दोहोंचा भावार्थ हा आहे कीं, ध्वनीचे अनुकरण करणारा जो शब्द त्याच्या अन्तीं 'अत्' असा तकारान्त शब्द असल्यास व त्या 'अत्' पुढें 'इति' हा शब्द आल्यास, 'अत्' व 'इ' या दोहोंचे जागी 'इ' असा पररूप आदेश होतो आणि प्रकृत सूत्रात 'अत्' असे तकारान्ताचे ग्रहण केले असल्यामुळें, जेथें ध्वनीचे अनुकरण करणाऱ्या शब्दाच्या अन्तीं 'अद्' असा दकारान्त शब्द-वर्णसमुदाय-असून त्यापुढें 'इति' हा शब्द आहे तेथें पररूप एकादेश होत नाही. याचे व्याख्यान करिताना प्रकाशकारानी असे म्हटले आहे की, 'दकारान्ते मा भूत्' यातील 'दकारान्ते' हा शब्द उपलक्षणात्मक असून त्या पदानें केवळ दकारान्ताचीच व्यावृत्ति होत नसून 'अत्' याहून भिन्न कोणतीहि वर्णानुपूर्वी अनुकरण करणाऱ्या शब्दाच्या अन्तीं असल्यास, तशा वर्णानुपूर्वीची देखील व्यावृत्ति होते आणि म्हणूनच 'मरुत् इति, वटक् इति' इत्यादि स्थलीं 'उत्' किंवा 'अक्' चे जागी पररूप एकादेश होत नाही. पण दीक्षित म्हणतात कीं, प्रक्रियाकौमुदीकारांनीं हा जो प्रश्नोत्तराचा व प्रकाशकारानी -लाबलचक व्याख्यानाचा खटाटोप केला आहे तो

सर्व व्यर्थ आहे, कारण प्रकृत सूत्रात 'अतः' या पदाचे मुद्दाम ग्रहण केले असल्यामुळें त्यावरूनच हे स्पष्ट होतें कीं, जेथें अनुकरण करणाऱ्या शब्दाच्या अन्ती 'अत्' अशी वर्णानुपूर्वी आहे तेथेंच प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊ शकते व इतरत्र प्रकृत सूत्राची प्रवृत्ति मुळीच होऊ शकत नाही.) 'अत किम्' या प्रश्नाचे व्याख्यान करिताना प्रकाशकारानी असे म्हटले आहे की, प्रकृत सूत्रात 'अतो गुणे' या पूर्व सूत्रातून 'अत·' या पदाची अनुवृत्ति करून (अर्थाधिकार न मानता, येथे) शब्दाधिकार मानल्याने, म्हणजे 'अतो गुणे' या सूत्रात 'अतः' या तपर पदाचा 'ऱ्हस्व अकार' असा जो अर्थ आहे त्या अर्थाने युक्त अशा 'अत·' या पदाची अर्थाधिकार मानून अनुवृत्ति न करिता, केवळ 'अत्' या आनुपूर्वीविशिष्टबोधक शब्दाची शब्दाधिकार मानून अनुवृत्ति केल्याने, काम भागत असता, पुन्हा प्रकृत सूत्रात 'अत.' या पदाचे ग्रहण का केले आहे असा प्रक्रिया-कौमुदीकारानी केलेल्या 'अतः किम्' या प्रश्नाचा आशय आहे, आणि त्या प्रश्नाचे ('दान्ते मा भूत्' असे प्रक्रियाकौमुदीकारानी) जे उत्तर दिले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('झला जशोऽन्ते' सू ८४ या सूत्रानें 'अत्' यातील तकाराचे) जश्त्व–दकार–झाले असता देखील ('अद्' हा एकदेशविकृतन्यायाने 'अत्' च आहे असे मानल्यानें) पररूप एकादेशाची प्राप्ति होते, परतु प्रकृत सूत्रात पुन्हा तान्त अशा 'अत्' शब्दाचे मुद्दाम ग्रहण केले असल्यामुळें, तशा तान्त 'अत्' शब्दाचेच जागीं एकादेश होणे विवक्षित आहे व त्यामुळें (जश्त्व होऊन दकारान्त झालेल्या) 'अद्' चे जागी पररूप एकादेश होत नाही. पण प्रकाशकारानी केलेले हें व्याख्यान चिन्त्य आहे, म्हणजे बरोबर आहे असे मानता येत नाही, कारण (प्रकृत सापादिक सूत्राच्या दृष्टीनें 'झला जशोऽन्ते' हे त्रैपादिक) जश्त्व-शास्त्र ('पूर्वत्रासिद्धम्' सू १२ या सूत्रान्वयें) असिद्ध ठरत असल्यामुळें (त्रैपादिक जश्त्वशास्त्राची प्रवृत्ति न होता, प्रकृत सापादिक) पररूप शास्त्राचीच प्रवृत्ति होते. दुसरे असे की,

(प्रकाशकाराचें वरील म्हणणें बरोबर मानल्यास) 'नाम्रेडितस्य' सू. ८२ या निषेधक सूत्रावरील वृत्तींत त्या सूत्राचें 'पटत्पटदिति' हें जें उदाहरण दिलें आहे तें चूक ठरण्याची आपत्ति येते, कारण त्याच्या म्हणण्याप्रमाणें (जश्त्व झाल्यावर 'अत्' हा 'अद्' होत असल्यामुळें) पररूप एकादेशाची दान्तत्वामुळें प्राप्तीच होत नाहीं. (प्रक्रियाकौमुदीकारांनीं 'दकारान्ते मा भूत्' असे जें म्हटलें आहे त्याचा असा आशय दिसतो कीं, मूळ अनुकरण दकारान्त असल्यास *त्यातील अन्त्य 'अद्' चे जागीं पररूप आदेश होऊं नये याकरिता* प्रकृत सूत्रात 'अत.' या पदाचें ग्रहण केलें आहे व त्यांनी 'घटद् + इति = घटदिति' असे दकारान्त अनुकरणातील 'अद्' चे जागी पररूप एकादेश होत नाही याचें उदाहरण दिलें आहे पण प्रकाशकार म्हणतात कीं, त्या उत्तराचा भावार्थ असा आहे कीं, प्रकृत सूत्रात 'अतो गुणे' या पूर्व सूत्रांतून 'अत.' या पदाची अनुवृत्ति केल्यानें व वर सांगितल्याप्रमाणे अर्थाधिकार न मानता शब्दाधिकार *मानल्यानें काम भागत असता, म्हणजे 'अत.' या अनुवृत्त पदाचा* 'ऱ्हस्व अकार' असा अर्थ न मानता त्या पदाचा 'अत्' हा शब्द असा अर्थ केल्यानें काम भागू शकत असता, पुन्हा प्रकृत सूत्रात 'अत.' या पदाचें जें ग्रहण केलें आहे ते अशाकरितां केलें आहे कीं, 'पटत् + इति' या स्थली 'झलां जशोऽन्ते' या सूत्रानें 'पटत्' यातील अन्त्य तकाराचा दकार केल्यावर 'पटद् + इति' अशी जेव्हा स्थिति होते तेव्हा जरी 'पटद्' यातील 'अद्' हा 'अत्' च आहे असे एकदेशविकृतन्यायानें मानता येतें व त्यामुळें पररूप एकादेशाची प्राप्ति होते तरी, तशा दान्त 'अद्' चे जागीं पररूप *आदेश होऊं नये. पण दीक्षित म्हणतात कीं, प्रकाशकारांनीं केलेलें हे* व्याख्यान बरोबर मानता येत नाही, कारण 'पटत् + इति' या स्थली जरी 'झलां जशोऽन्ते' या त्रैपादिक शास्त्राची व प्रकृत सापादिक शास्त्राची युगपत् प्राप्ति आहे तरी, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक शास्त्र असिद्ध

ठरत असल्यामुळें व ते नाहीच असे मानावे लागत असल्यामुळें वरील उदाहरणात जश्त्वविधायक त्रैपादिक शास्त्र प्रवृत्त होऊच शकत नाही व प्रकृत सापादिक शास्त्रच प्रवृत्त होऊ शकतें आणि त्यामुळें 'पटत् + इति' याचे 'पटद् + इति' असे रूप होऊच शकत नाहीं. प्रकाशकाराच्या म्हणण्याचा असा आशय दिसतो की, जश्त्वकार्य त्रैपादिक असून देखील प्रकृत सापादिक सूत्रानें पररूप एकादेशकार्य करण्यापूर्वी ते करता येते व ते जश्त्वकार्य पूर्वी केल्यास, प्रकृत सूत्रात 'अत.' या पदाचे मुद्दाम ग्रहण केले असल्यामुळें, पररूप एकादेशाची प्राप्ति होत नाही आणि जेव्हा जश्त्व प्रथम केले जात नाही तेव्हाच पररूप एकादेश होऊ शकतो. पण हे त्याचे म्हणणे बरोबर मानल्यास, 'पटत्पटदिति' हे जें 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे प्रक्रियाकौमुदीत उदाहरण दिले आहे तें चूक ठरण्याची आपत्ति येते. या उदाहरणात 'डाचि बहुल द्वे भवतः' सू. ८२ वरील वार्तिक, या वार्तिकातील 'बहुल' शब्दाच्या ग्रहणसामर्थ्यानें 'पटत्' या अनुकरणाचे द्वित्व केले आहे व या उदाहरणातील द्वितीय 'पटत्' हा शब्द 'तस्य परमाम्रेडितम्' सू. ८३ या सूत्रान्वयें आम्रेडितसंज्ञक आहे. या द्वितीय आम्रेडितसंज्ञक 'पटत्' शब्दापुढें 'इति' हा शब्द आहे. 'अव्यक्तानुकरणस्य' या प्रकृत सूत्रानें येथें जी पररूप एकादेशाची प्राप्ति होते तिचा निषेध व्हावा याकरिता 'नाम्रेडितस्य' हे निषेधक सूत्र केले आहे. पण 'पटत्पटत् + इति' या स्थली जश्त्व त्रैपादिक असून देखील प्रथम केल्यावर 'पटत्पटद् + इति' अशी स्थिति झाली असता, प्रकाशकाराचे म्हणणें बरोबर मानल्यास, पररूप एकादेशाची प्राप्तीच होत नाही. मग 'पटत्पटदिति' हे 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण कसे ठरू शकणार ? 'प्राप्तस्यैव निषेध ' या न्यायान्वयें जें प्राप्त आहे त्याचाच निषेध केला जातो जें प्राप्तच नाहीं त्याचा निषेध करण्याची काहींच गरज नाहीं. म्हणून 'पटत्पटदिति' या स्थली दान्तत्वामुळें पररूप एकादेशाची प्रकाशकाराच्या

मते प्राप्तीच नसल्यामुळें तें 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचें योग्य उदाहरण ठरत नाहीं हे उघड आहे परंतु प्रकृत पररूपविधायक सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र असिद्ध असल्यामुळें 'पटत्पटत् + इति' या स्थलीं जश्त्वाची मुळीच प्राप्ति होत नसून प्रकृत सूत्रानें जी पररूप एकादेशाची प्राप्ति होते तिचा निषेध व्हावा व वरील उदाहरणात पररूप एकादेश होऊ नये याकरिताच 'नाम्रेडितस्य' हे निषेधक सूत्र मुद्दाम केले आहे असे मानल्यानेंच, वरील उदाहरण त्या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरतें व ते निषेधक सूत्र असल्यामुळेंच, वरील उदाहरणात प्रकृत सूत्रानें जो पररूप एकादेश प्राप्त होतो तो होत नाही आणि जश्त्व होऊन 'पटत्पटदिति' असे रूप सिद्ध होतें या वरील विवेचनावरून हे स्पष्ट होतें की, प्रकाशकारानी वर जें व्याख्यान केले आहे ते चूक ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृत सूत्राच्या विषयात अनुकार्य व अनुकरण या दोहोमध्यें अभेदाची विवक्षा असल्यामुळें, म्हणजे अनुकार्य व अनुकरण हे भिन्न नसून एकच आहेत असा अभेदानुकरणपक्ष मानावा लागत असल्यामुळें, ज्याप्रमाणे 'गवित्ययमाह' या स्थलीं ('गो' या अनुकरणास) विभक्तिप्रत्ययाचे अभावी पदसंज्ञा होत नाही त्याचप्रमाणें 'पटत् + इति' या स्थलीं 'पटत्' या अनुकरणाला पदसंज्ञा होत नसल्यामुळें, 'पटत्' यातील अन्त्य तकाराचे जश्त्व होत नाही असे जें प्रकाशकारांनी आपल्या टीकेंत म्हटले आहे तें देखील वरील विवेचनावरून चूक ठरतें, कारण हें त्याचे म्हणणें त्यानी आपल्या टीकेंत जें पुढें म्हटले आहे त्याशीं विरोध येतो व जश्त्वशास्त्र असिद्ध असल्यामुळें पररूप शास्त्रानें त्या जश्त्वशास्त्राचा बाध होतोच (अभेदानुकरणपक्ष व भेदानुकरणपक्ष असे दोन्ही प्रकारचे पक्ष व्याकरणशास्त्रात मानले आहेत. अभेदानुकरणपक्षात अनुकरण अर्थवान् नसते, कारण अनुकार्य जरी अर्थवान् आहे तरी, त्या पक्षात अनुकरण हे अनुकार्याच्या केवळ वर्णानुपूर्वीचे दर्शक असल्यामुळें, ते अनुकार्याच्या

अर्थाचे वाचक होत नाही व अशा रीतीनें त्या पक्षात अनुकरण अर्थवान् ठरत नसल्यामुळें, 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू० १७८ या सूत्राने अर्थवानाला होणारी प्रातिपदिकसंज्ञा त्या अर्थरहित अनुकरणाला होत नाही. त्यामुळें ' ङ्याप्प्रातिपदिकात् ' सू० १८२ या अधिकारसूत्राने प्रातिपदिकाहून होणारी सुबुत्पत्ति त्या अनुकरणाहून होत नाहीं व त्यामुळें 'सुप्तिङन्त पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी पदसंज्ञा त्याला होत नाही. म्हणूनच 'गवित्ययमाह'-त्यानें 'गो' असें म्हटले–या स्थली 'गो' या अनुकरणाला अभेदानुकरण पक्षात पदसंज्ञा होत नसल्यामुळें, 'अवङ् स्फोटायनस्य' सू० ८८ या सूत्रान्वये पदान्तीं असणाऱ्या 'गो' शब्दास होणारा 'अवङ्' आदेश त्याला होत नाही व 'गो इति' या स्थली 'एचोऽयवायाव.' सू० ६१ या सूत्रानें 'गो' यातील ओकाराचे जागी अवादेश होऊन 'गव् + इति' अशी स्थिति झाल्यावर 'गव्' यातील अन्त्य वकार पदान्तीं आहे असें मानता येत नसल्यामुळे, पदान्तीं असणाऱ्या वकाराचा विकल्पेंकरून लोप होतो हे विधान करणाऱ्या 'लोपः शाकल्यस्य' सू. ६७ या सूत्राची प्रवृत्ति होत नाहीं व वकाराचा लोप न होता 'गविति' असें रूप होते. त्याचप्रमाणें 'पटत्+इति' या स्थली 'पटत्' या अनुकरणाला अभेदानुकरणपक्षात पदसंज्ञा होत नसल्यामुळें, पदान्तीं असणाऱ्या झल्चे जागी जश् होतो असें विधान करणारे 'झला जशोऽन्ते' सू० ८४ हे सूत्र प्रवृत्त होत नाहीं व त्यामुळें 'पटत्' यातील अन्त्य तकाराचे जश्त्व–दकार–होत नाही असें प्रकाशकाराचे म्हणणें आहे. यावर दीक्षित असे उत्तर देतात की, प्रकृत सूत्राच्या विषयात अभेदानुकरणपक्षच मानला पाहिजे व 'प्रकृतिवदनुकरण भवति'–परि ३६– या न्यायान्वयें सिद्ध होत असलेला भेदानुकरणपक्ष मानता येत नाही असे म्हणण्यास कोणतेच प्रमाण नाहीं. उलट प्रकृत सूत्राच्या विषयात अभेदानुकरणपक्ष मानल्यास, 'यदा जश्त्ववशाद्दान्तत्वम्' असे जें प्रकाशकारानी म्हटले आहे ते व तसेच

'पटत्पटदिति' हे जें 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचें उदाहरण दिले आहे ते विसङ्गत ठरतें, कारण अभेदानुकरणपक्षात 'पटत्' व तसेच 'पटत्पटत्' या अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा व पदसंज्ञा होत नसल्यामुळें, त्यातील अन्त्य तकार पदान्ती आहे असे मानता येत नाहीं आणि त्यामुळें 'झलां जशोऽन्ते' या सूत्रानें होणारे जश्त्व त्या तकाराला पावतच नाही व त्यामुळें 'पटत् इति' या स्थलीं जश्त्वाची प्राप्तीच होत नाहीं आणि तसेच 'पटत्पटदिति' असे रूप सिद्ध होऊच शकत नाही पण प्रकाशकारानीं तर 'पटत्पटदिति' हे 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे उदाहरण मानले असून त्यातील अन्त्य तकाराचे जश्त्व केले आहे व हें त्याचे करणे त्यानी वर जें म्हटले आहे त्याच्या विरुद्ध जाते हें उघड आहे. परंतु व्याकरणशास्त्रात दोन्ही पक्ष मानले असल्यामुळें, प्रकृत स्थलीं भेदानुकरणपक्ष मानल्यास, त्या पक्षात अनुकरण अर्थवान् ठरत असून त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत असल्यामुळें व त्याहून सुबुत्पत्ति होत असल्यामुळें, 'पटत्' या अनुकरणाहून 'सु' प्रत्यय होऊन 'हल्ङ्याब्भ्य' सू २५२ या सूत्रानें त्या 'सु' प्रत्ययाचा लोप झाल्यावर 'पटत् इति' या स्थलीं 'पटत्' या अनुकरणाला प्रत्यय-लक्षणानें पदसंज्ञा होते व त्यामुळें त्यातील अन्त्य तकारास 'झलां जशोऽन्ते' या त्रैपादिक सूत्रानें जश्त्वाची व तसेच 'अव्यक्तानुकरण-स्यात इतौ' या प्रकृत सापादिक सूत्रानें पररूपाची युगपत् प्राप्ति होते, व प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र सिद्ध मानल्यास, तें परशास्त्र प्रथम प्रवृत्त होऊन 'पटद् इति' अशी स्थिति होईल व 'अत्' च्या अभावी प्रकृत सूत्र नंतर प्रवृत्त होऊ शकणार नाहीं. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रकृत सापादिक पररूप शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र असिद्ध असल्यामुळें तसे मानल्यानेंच जश्त्वशास्त्राचा बाध होऊन प्रकृत पररूप शास्त्रच प्रवृत्त होतें व त्यामुळें 'पटदिति' असे रूप न होता 'पटिति' असेच रूप होतें. 'पटत्पटत् + इति' या स्थली देखील प्रकृत सूत्रान्वयें 'पटत्पटिति'

असे रूप होऊ पाहतें. परंतु या उदाहरणात द्वितीय 'पटत्' हा शब्द आम्रेडितसंज्ञक असल्यामुळें व 'नाम्रेडितस्य' हे निषेधक सूत्र असल्यामुळे, येथें पररूप एकादेश होत नाहीं व भेदानुकरणपक्ष मानल्यानेंच त्या पक्षात अन्त्य तकाराचे जश्त्व होऊन 'पटत्पटदिति' असा इष्ट प्रयोग सिद्ध होतो ) 'अव्यक्तानुकरणस्य' सू ८१ या सूत्रानें होणारे पररूप कार्य देखील नित्य असल्यामुळें (त्या सूत्राचे उदाहरण देताना कौमुदीत 'पटत् इति पटिति' असे जें म्हटले आहे त्यात 'पटत इति' असा) पररूप सन्धि न करिता कसा प्रयोग केला आहे अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाही, कारण 'पटत इति' हे अलौकिक प्रक्रियावाक्य आहे असें प्रकाश-कारानी स्वत च आपल्या टीकेत व्याख्यान करिताना म्हटले आहे व दुसरे असे की, 'पटत् इति' या वाक्यात सन्धि करण्याची विवक्षा नाही असें मानल्यानें तसा प्रयोग होणे देखील संभवते (शंकाकाराची अशी शंका आहे की, प्रकृत सूत्रानें होणारे पररूप सन्धिकार्य नित्य असल्यामुळे दीक्षितानीं प्रकृत सूत्राचे उदाहरण देताना 'पटत् इति पटिति' असे जें कौमुदीत म्हटले आहे त्या वाक्यात 'पटत् इति' असा जो पररूपसन्धिविरहित प्रयोग केला आहे तो अशुद्ध ठरतो आणि म्हणून त्यानी तसे वाक्य न उच्चारता 'पटिति' असे उदाहरण द्यावयास पाहिजे होते या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात कीं, 'पटत इति' हा उदाहरणाचा भाग नसून 'पटिति' या उदाहरणाचे, 'राजन् + ङस + पुरुष + सु' असे जें 'राजपुरुष' याचे अलौकिक-प्रक्रियावाक्य होते तशा प्रकारचे, अलौकिकप्रक्रियावाक्य आहे, म्हणजे 'पटिति' हा लौकिक प्रयोग कसा सिद्ध होतो याची केवळ प्रक्रिया करून दाखविणारे ते वाक्य आहे, आणि त्यामुळें शंकाकारानें केलेली शंका अनुपपन्न ठरते दुसरे असें की, 'पटत् इति' हे लौकिक वाक्य मानल्यास देखील 'वाक्ये तु सा विवक्षामपेक्षते' या वचनान्वयें वाक्यात सन्धि करणे किंवा न करणे हे वक्त्याच्या इच्छेवर अवलंबून असल्यामुळें, ते सन्धिरहित वाक्य देखील शुद्ध ठरतें आणि 'पटत्

इति पटिति' असे जें प्रक्रियाकौमुदींत प्रकृत सूत्राचें उदाहरण दिलें आहे त्याचें व्याख्यान करिताना 'पटत् इति' हें अलौकिकप्रक्रियावाक्य आहे असेंच प्रकाशकारानी देखील म्हटलें आहे. म्हणून शंकाकारानें केलेल्या शंकेत काहीच अर्थ नाही असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे )

शब्दरत्न—किं चित्साम्येनेति । तदभावे हि भग्नदन्ताद्युच्चारिताव्यक्तशब्दे एव स्यादव्यक्तत्वं चार्थबोधाजनकत्वेनापि वक्तुं शक्यमित्याहुः । निरालम्बनत्वादिति । अद्ग्रहणं तद्भिन्नव्यावृत्त्यर्थमित्यर्थस्य बालैरपि सुज्ञेयत्वेनात' किमिति प्रश्नस्य, दान्ते मा भूत्, चटक्, मददित्यत्र च मा भूदिति उत्तरस्य च निरालम्बनत्वमित्यर्थः । शब्दाधिकारेति । तदाश्रयणाच्चाच्छब्दस्येत्यर्थो भविष्यतीति भावः । तदाऽपि स्यादिति । एकदेशविकृतन्यायेनाच्छब्दत्वादिति भावः । जश्त्वशास्त्रस्येति । अनुकार्यानुकरणयोर्भेदे पदान्ततया जश्त्वेऽपीत्यादि । तदसिद्धत्वेनात एव सत्त्वादितिभाव' । ननु पुनरद्ग्रहणाज्जश्त्वासिद्धत्वमपि बाध्यतामत आह—नाम्रेडितेति । उदाहरणस्य = घृत्यादिस्यस्य । अनुकार्यानुकरणयोरिति । सर्वत्र जश्त्वप्राप्त्योदाहरणासम्भवाशङ्कायां ह्येतदुक्तं तैरिति बोध्यम् । उत्तरग्रन्थेति । नाम्रेडितस्येत्यस्य पटत्पटदितीत्युदाहरणपरग्रन्थेत्यर्थः । ननु स ग्रन्थो जश्त्वासिद्धत्वेन योज्य इति चेत्तत्राह—जश्त्वेति । तस्यासिद्धतया पररूपेणैव भवितव्यमिति जश्त्वस्याप्रवृत्तिलक्षणो बाधः । एवं च यदा जश्त्ववशाद्दान्तत्वमिति प्रन्यामगनिरिति मेयमुभयतः स्पाशा रज्जुरिति भाव. । दिगिति । दिगर्थस्तु अपदान्तादित्यनुवृत्त्यैव जश्त्वविषये व्यावृत्तिसिद्धेः पुनरद्ग्रहणं व्यर्थमेव । एतेन पुनरद्ग्रहणं श्रौतनान्तर्यविवक्षाद्वारा जश्त्वविषये ऽभेदविवक्षायामेव यथा स्यान्न तु भेदविवक्षायां जश्त्वविषय इत्यर्थकमित्यपास्तम् । ममाद्ग्रहणं तु शास्त्राधिकारानित्यत्वज्ञापनार्थमिति दिक् ॥

कित्येक वैयाकरणाचें असें म्हणणें आहे कीं, 'अव्यक्तानुकरणस्य' सू ८१ या प्रकृत सूत्रांत 'अनुकरणस्य' हें पद घातलें नसतें

(व 'अव्यक्तस्यात इतौ' एवढेंच जर सूत्र केले असते) तर, ज्याचे दात पडले आहेत इत्यादि (बोबड्या) पुरुषानी उच्चारलेल्या अव्यक्त शब्दाचे ठिकाणीच (तशा 'अत्' शब्दान्त अव्यक्त शब्दापुढें 'इति' हा शब्द आला असता) प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊ शकले असते (व तशाच ठिकाणी पररूप एकादेश होऊ शकला असता आणि अव्यक्त ध्वनीचे अनुकरण करणाऱ्या 'अत्' शब्दान्त शब्दापुढें 'इति' हा शब्द आला असता, पररूप एकादेश होऊ शकला नसता. तसे न व्हावे व ध्वनीचे अनुकरण करणाऱ्या शब्दाच्या अन्ती 'अत्' शब्द असून त्यापुढें 'इति' हा शब्द आला असता, तशाच स्थली पररूप एकादेश व्हावा याकरिता प्रकृत सूत्रात 'अनुकरण' या शब्दाचे ग्रहण केले आहे पण भग्नदन्तादि बोबड्या पुरुषानी उच्चारलेल्या शब्दामध्ये अकारादि वर्ण असल्यामुळे त्यानी उच्चारलेल्या शब्दाना 'अव्यक्त' म्हणता येत नाही व ध्वनीमध्यें अकारादि वर्णांचा अभाव असल्यामुळें ध्वनीलाच 'अव्यक्त' हा शब्द लागू पडतो अशी कोणी शका केल्यास, त्या शकेवर ते वैयाकरण असे उत्तर देतात कीं,) भग्नदन्तादि बोबड्या पुरुषानीं उच्चारलेल्या शब्दापासून अर्थबोध होऊ शकत नसल्यामुळें, तशा शब्दाना देखील 'अव्यक्त' म्हणता येणे शक्य आहे (म्हणून अकारादिवर्णरहित अव्यक्त ध्वनीत 'अत्' शब्द असणे सभवनीय नसून त्या ध्वनीच्या अनुकरणामध्येच तसा 'अत्' शब्द येणे सभवनीय असल्यामुळे, प्रकृत सूत्रात 'अनुकरण' हा शब्द घातला नसता तरी अर्थापत्तीनें अनुकरणाचे ग्रहण झालेच असते आणि अशा रीतीनें या प्रकृत सूत्रात केलेले 'अनुकरण' या पदाचे ग्रहण व्यर्थ ठरते असें जें प्रकाशकारानी म्हटले आहे ते त्याचे म्हणणें चूक ठरते असा त्या वैयाकरणाच्या म्हणण्याचा आशय आहे. पण अकारादिवर्णविशिष्ट अनुकरण तर 'सदृशमनुकरण भवति' या वचनान्वयें वर्णसमूहात्मक शब्दाचेच होऊ शकते, म्हणजे अनुकार्य व अनुकरण हे सजातीय असले पाहिजे. म्हणून एखाद्या पुरुषाने एखादा शब्द उच्चारला

असता दुसऱ्या पुरुषानें तोच शब्द तशाच तऱ्हेनें उच्चारल्यास त्याला अनुकरण म्हणता येतें. परंतु ध्वनीमध्यें अकारादि वर्णांचा अभाव असल्यामुळें, अकारादिवर्णयुक्त शब्दानें त्या ध्वनीचें अनुकरण केल्यास, तशा विजातीय अनुकरणाला 'अनुकरण' हा शब्द लागू पडत नाहीं अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर दीक्षितांनी 'तस्य चानुकरणत्वं किञ्चित्साम्येन बोध्यम्' असें मनोरमेंत उत्तर दिलें आहे. (या पंक्तीचा अर्थ मनोरमेच्या विवरणांत स्पष्ट केलाच आहे. साराश ध्वनि व त्याचें शब्दानें केलेलें अनुकरण या दोहोंमध्यें थोडेंसें ध्वनिरूप साम्य असल्यामुळें, तशा ध्वनीच्या अनुकरणाला देखील 'अनुकरण' म्हणता येतें असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे असें शब्दरत्नकार म्हणतात ) 'निरालम्बनत्वात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, प्रकृत सूत्रांत 'अत्' या शब्दाचें जें ग्रहण केलें आहे तें अशाकरितां कीं, 'अत्' शब्दाहून भिन्न शब्दाचें ग्रहण होऊं नये हा अर्थ बालांना -- साधारण बुद्धीच्या पुरुषांना -- सहज कळू शकत असल्यामुळें, प्रक्रियाकौमुदीकारांनी 'अत किम्' हा जो प्रश्न केला आहे व 'दान्ते मा भूत्, वटक् मदत् इत्यत्र च मा भूत्' असें जें त्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे हा सर्व खटाटोप निरर्थक ठरतो. 'शब्दाधिकाराश्रयणात्सिद्धम्' असें जें प्रकाशकाराचें म्हणणें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('अतो गुणे' या पूर्व सूत्रांतून प्रकृत सूत्रांत 'अतः' या पदाची अनुवृत्ति केल्यास व अर्थाधिकार मानल्यास, त्या अनुवृत्त 'अत्' शब्दाचा ऱ्हस्व अकार असा जो अर्थ होतो तसा अर्थ) शब्दाधिकार मानल्यानें न होता, त्या अनुवृत्त पदाचा 'अत्शब्दस्य' असा अर्थ होऊं शकलाच असता (याचें विवरण पूर्वी मनोरमेंत केलेंच आहे.) 'यदा जश्त्ववशाद्दान्तत्वं तदाऽपि स्यात्' या मनोरमेंतील पंक्तींत 'तदाऽपि स्यात्' असें जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('पटत्' यांतील अन्त्य तकाराचें जश्त्व--दकार--केलें तरी त्यांतील 'अद्' हा 'अत्' च आहे असें एकदेशविकृतन्यायानें

मानता येते. (याचें विवरण मनोरमेंत केलेच आहे.) 'जश्त्वशास्त्र-स्यासिद्धत्वेन पररूपस्यैव प्रवृत्तेः' या मनोरमेंतील पक्तीपूर्वी 'अनुकार्यानुकरणयोर्भेदे पदान्ततया जश्त्वेऽपि' ही पदें अध्याहृत आहेत, म्हणजे 'अनुकार्यानुकरणयोर्भेदे पदान्ततया जश्त्वेऽपि जश्त्व-शास्त्रस्यासिद्धत्वेन पररूपस्यैव प्रवृत्तेः' अशी ती पक्ति पठित करावी, (व त्या पक्तीचा अर्थ असा आहे की, भेदानुकरणपक्ष मानल्यास 'पटत इति' या स्थलीं 'पटत्' हे अनुकरण अर्थवान् ठरत असून त्याला प्रातिपदिकसंज्ञा व पदसंज्ञा होत असल्यामुळें व अशा रीतीनें 'पटत्' यातील तकार पदान्ती आहे असे मानता येत असल्यामुळें, जरी 'झलां जशोऽन्ते' हे त्रैपादिक जश्त्वशास्त्र प्रवृत्त होऊ पाहते तरी, प्रकृत सापादिक शास्नाच्या दृष्टीनें ते शास्त्र असिद्ध ठरत असल्यामुळें, त्या त्रैपादिक शास्त्राचा बाध होऊन पररूप सापादिक शास्त्रच प्रवृत्त होते व त्यामुळें 'पटत्' यातील अन्त्य तकाराचे जश्त्व होऊच शकत नाही याचे विस्तृत विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे.) अशा रीतीनें प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र असिद्ध असल्यामुळें, 'पटत्' यात 'अत्' च राहू शकतो, (व त्या 'अत्' चे 'अद्' असे रूप होऊच शकत नाही ) प्रकृत सूत्रात 'अत्' या शब्दाचे पुन्हा ग्रहण केले असल्या-मुळें जश्त्वाच्या असिद्धत्वाचा देखील बाध होतो असे म्हणणें असल्यास, त्यावर मनोरमेंत 'नाम्रेडितस्य ... . असम्बद्धत्वापत्तेः' हे उत्तर दिले आहे येथें असे म्हणण्यात येतें की, 'अतो गुणे' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'अत.' या पदाची अनुवृत्ति करता येत असून देखील व शब्दाधिकार मानल्याने त्या अनुवृत्त पदाचा ऱ्हस्व अकार असा अर्थ न होता 'अत्शब्द' असा अर्थ करता येत असून देखील पुन्हा प्रकृत सूत्रात 'अत.' अशा वर्णानुपूर्वीविशिष्ट शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें त्यावरून हे स्पष्ट होते की, अत्भिन्नाचे ग्रहण होऊ शकत नाही व 'अत्' अशा वर्णानुपूर्वीविशिष्ट शब्दाचेच ग्रहण होऊ शकते. पण प्रकृत सापादिक सूत्राच्या दृष्टीने 'झलां

जशोऽन्ते' हे त्रैपादिक जश्त्वशास्त्र असिद्ध मानल्यास, 'पटत् इति' इत्यादि उदाहरणात 'पटत्' या अनुकरणातील अन्त्य तकाराचा दकार होऊच शकत नाहीं व पररूप एकादेशच होऊ शकतो, व पररूप एकादेश केल्यावर 'अत्' नाहीसा होत असल्यामुळें, तकाराचे अभावी जश्त्वाची प्राप्तीच होत नाही आणि 'अद्' असे रूप मिळूच शकत नाही. म्हणून 'अत्' याला 'अद्' असे व्यावर्त्य मिळणें शक्य नसल्यामुळें, प्रकृत सूत्रात वर सांगितल्याप्रमाणें 'अत.' या पदाची अनुवृत्ति करता येत असून पुन्हा त्या सूत्रात केलेले 'अत.' या पदाचे ग्रहण, व्यावर्त्याच्या अभावामुळें, व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते तें ग्रहण चरितार्थ ठरण्याकरिता व 'अत्' याला 'अद्' असे व्यावर्त्य मिळण्याकरिता असे मानले पाहिजे कीं, जश्त्वशास्त्र त्रैपादिक असून देखील प्रकृत सापादिक पररूप शास्त्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नाहीं. तसे मानले असता, 'पटत् इति' या स्थली उत्तर त्रैपादिक शास्त्र प्रथम प्रवृत्त केल्यावर जेव्हा 'पटद् इति' अशी स्थिति होते तेव्हा 'अत्' अशी विशिष्टवर्णानुपूर्वी न राहता तिचे 'अद्' असे भिन्नवर्णानुपूर्वीविशिष्ट स्वरूप होत असल्यामुळें, तशा स्थली प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊ शकत नाही व पररूप एकादेश होऊ शकत नाही आणि अशा रीतीनें 'अत्' या शब्दाला व्यावर्त्य मिळून त्याचे प्रकृत सूत्रात केलेले ग्रहण चरितार्थ ठरतें. यावर दीक्षितानीं 'नाम्रेडितस्य इति निषेधे पटत्पटदिती युदाहरणस्यासम्बद्धत्वापत्तेः' हें मनोरमेंत उत्तर दिले आहे असे शब्दरत्नकाराच म्हणणें आहे व त्या पक्तीचे विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे सारांश प्रकृत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र सिद्ध मानल्यास, 'पटत्पटत् इति' या स्थलीं प्रकृत पूर्व सूत्रानें होणाऱ्या पररूप एकादेशाची प्राप्तीच होत नाहीं व सिद्ध मानलेल्या त्रैपादिक पर जश्त्वशास्त्राचीच, 'पूर्वात्पर बलवत्' या न्यायान्वयें, प्राप्ति होते व त्यामुळे 'पटत्पटदिति' असेच रूप सिद्ध होऊ शकते. मग जर या वरील उदाहरणात पररूप एका-

देशाची प्राप्तीच नाहीं व जश्त्वाचीच प्राप्ती आहे तर हें उदाहरण 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण कसे ठरू शक-णार ? पररूप एकादेशाची प्राप्ति असून देखील 'नाम्रेडितस्य' हे निषेधक सूत्र असल्यामुळें, पररूप एकादेश होऊ शकत नाही असे मानले तरच, ते त्या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरू शकते, आणि प्रकृत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र असिद्ध आहे असे मानल्याशिवाय पररूप एकादेशाची प्राप्ति होऊ शकत नसल्यामुळें, त्या सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र सिद्ध आहे हे मानणें अगदीं अयोग्य ठरते. जश्त्वशास्त्र असिद्ध मानल्याने जी पररूप एकादेशाची प्राप्ति होते तिचा 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्रानें निषेध होऊन 'पटत्पटदिति' हे उदाहरण 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण मानता येते म्हणून जश्त्वासिद्धत्व-मपि वाच्यताम्' असे जें म्हणणें आहे ते बरोबर मानल्यास 'पटत्पट-दिती' हे 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरत नसल्यामुळें, ते म्हणणें बरोबर मानता येत नाहीं असा शब्दरत्न-काराच्या म्हणण्याचा आशय आहे यावर प्रकाशकारानुयायी खण्डन-काराचे असे म्हणणें आहे कीं, 'नाम्रेडितस्यान्त्यस्य तु वा' या सूत्राचे दोन भाग असून 'नाम्रेडितस्य' हा प्रथम भाग प्रकृत सूत्रानें प्राप्त होणाऱ्या पररूप एकादेशाचा निषेधक आहे व 'अन्त्यस्य तु वा' हा द्वितीय भाग अन्त्य तकाराचे जागीं पररूप एकादेशाचे विकल्परूपानें विधान करणारा आहे, आणि प्रक्रियाकौमुदीत या सूत्राचीं 'पटत्पटेति, पटत्पटदिति' ही जी दोन उदाहरणें दिलीं आहेत त्यापैकीं 'पटत्पट-दिति' हे द्वितीय उदाहरण निषेधक प्रथम भागाचे उदाहरण नसून, जेव्हा द्वितीय विकल्पविधायक भागानें अन्त्य तकाराचे जागीं विकल्पामुळें पररूप आदेश होत नाही तेव्हा त्या तकाराचे जश्त्व होऊन जें रूप होते त्या रूपाचे प्रदर्शक आहे, व जेव्हा विकल्पानें अन्त्य तकाराचेच जागीं पररूप आदेश होतो त्याचे 'पटत्पटेति' हे प्रथम उदाहरण आहे म्हणून दीक्षितानी मनोरमेंत 'नाम्रेडितस्य

इति निषेधे पटत्पटदितीत्युदाहरणस्यासम्बद्धत्वापत्ते.' असा जो दोष वरील उदाहरणासंबधानें दिला आहे तो अयोग्य ठरतो. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, मनोरमेच्या वरील पङ्क्तीतील) 'उदाहरणस्य' या शब्दाचा 'वृत्त्यादिस्थस्य उदाहरणस्य' असा अर्थ आहे (शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, काशिकावृत्ति इत्यादि सर्व ग्रन्थात 'नाम्रेडितस्य' या निषेधक भागाचेच 'पटत्पटदिति' हें उदाहरण दिलें असल्यामुळें, तें त्या निषेधक भागाचे उदाहरण नव्हे असें जें खण्डनकारानें म्हटलें आहे तें बरोबर मानता येत नाहीं आणि प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र असिद्ध मानल्याशिवाय तें उदाहरण, वर सांगितल्याप्रमाणें, 'नाम्रेडितस्य' या निषेधक भागाचे योग्य उदाहरण ठरत नसल्यामुळें, दीक्षितांनी मनोरमेंत जो दोष दिला आहे तो योग्य ठरतो ) 'अनुकार्यानुकरणयोरभेदविवक्षया... पटत् इतीत्यत्र जश्त्व न' असें जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे त्याचे कारण हें आहे की, (जश्त्वकार्य नित्य असल्यामुळें) सर्वत्र जश्त्वाची प्राप्ति होईल व त्यामुळें 'अव्यक्तानुकरणस्य' हें प्रकृत सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतेंहि उदाहरण मिळणे सम्भवनीय नाहीं. (प्रकृत सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र असिद्ध न मानतां सिद्ध मानल्यास, 'अत्' शब्दान्त अनुकरणापुढें 'इति' हा शब्द आला असता, जश्त्वविषयक परसूत्रानें तशा शब्दातील अन्त्य तकाराचा दकार होऊन 'अद्' शब्दान्तच रूप मिळेल व 'अत्' शब्दान्त रूप मिळूच शकणार नाहीं व त्यामुळें प्रकृत सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतेंहि उदाहरण मिळणे शक्य नसल्यामुळें, तें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. ही आपत्ति टाळण्याकरिता प्रकाशकारांनी प्रकृत सूत्राच्या विषयांत अमदानुकरणपदां मानला आहे त्या पक्षांत, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, पटत् इति' इत्यादि स्थळीं 'पटत्' या अनुकरणास पदसंज्ञा होत नसल्यामुळें, 'पटत्' यातील अन्त्य तकाराचे जश्त्व होण्याची आपत्ति टळते व प्रकृत सूत्र प्रवृत्त होण्यांत व पररूप एकादेश होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. हें प्रकाशकारांचे मत त्यांच्या उत्तरग्रन्थाविरुद्ध आहे

असे दीक्षितानीं 'उत्तरग्रन्थविरोधात्' हा शब्द वापरून म्हटले आहे व त्यातील) 'उत्तरग्रन्थ' या शब्दाचा, 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे 'पटत्पटदिति' हे उदाहरण देतेवेळी त्यानी आपल्या टीकेत जें म्हटले आहे तो उत्तरग्रन्थ, असा अर्थ आहे. पदद्वित्वप्रकरणात पठित असलेल्या 'डाचि बहुल द्वे' या वार्तिकानें पदाचे द्विर्वचन होणे सांगितले आहे म्हणून 'पटत्' हे अनुकरण पदसञ्ज्ञक मानल्या-शिवाय त्याचे द्विर्वचन होऊ शकत नाही. पण अभेदानुकरणपक्ष मानल्यास, 'पटत्' या अनुकरणाला पदसञ्ज्ञा होत नसल्यामुळे त्याचे द्विर्वचन करता येणे शक्य नाहीं. परतु 'पटत्' या अनुकरणाचे 'पटत्पटत्' असे प्रकाशकारानी द्विर्वचन केले असल्यामुळें, अभेदानुकरणपक्ष मानल्याने 'पटत्' याला पदसञ्ज्ञा होत नाहीं व त्यामुळें त्या अनुकरणातील अन्त्य तकाराचे जश्त्व होत नाही असे जे त्यानी म्हटले आहे हे त्याचे म्हणणे चूक ठरते हे उघड आहे. साराश 'पटत्' या अनुकरणाला पदसञ्ज्ञा होऊन त्याचे द्विर्वचन होण्याकरिता येथें भेदानुकरणपक्षच मानला पाहिजे. पण तो पक्ष मानला व त्याबरोबरच प्रकृत सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र असिद्ध ठरत नाही असे मानले तर, 'पटत् इति = पटिति' या प्रकृत सूत्रावरील उदाहरणात पर जश्त्वशास्त्र प्रथम प्रवृत्त होईल व 'पटत्' या पदसञ्ज्ञक अनुकरणा-तील अन्त्य तकाराचा दकार होईल व त्यामुळें 'अत्' शब्दान्त अनुकरण मिळणे असभवनीय असल्यामुळें, प्रकृत सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल तसेच 'पटत्पटत् इति' या उदाहरणात देखील जश्त्वशास्त्राची प्रथम प्राप्ति होईल व जश्त्व प्रथम केल्यावर आम्रेडितसञ्ज्ञक अनुकरण 'अद्' शब्दान्त होईल आणि त्यामुळें पररूप एकादेशाची प्राप्तीच होत नसल्याकारणानें, 'नाम्रेडितस्य' हे निषेधक सूत्र देखील व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. पररूप एकादेशाची प्राप्ति होत असून देखील 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राने पररूप एकादेशाचा निषेध होतो व पररूप एकादेश होत नाही अशी

जर स्थिति असेल तरच, 'पटत्पटत् इति' हें 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरू शकते. पण प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्व सिद्ध मानल्यास, वरील उदाहरणात पररूपाची प्रथम प्राप्ति होत नसून जश्त्वाचीच प्रथम प्राप्ति होत असल्यामुळें, ते उदाहरण 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण मानता येत नाहीं हें उघड आहे म्हणून प्रकृत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र सिद्ध मानणे अयोग्य आहे प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र असिद्ध मानले व भेदानुकरणपक्ष मानला तरच, 'पटत्पटदिति' हे 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरत, कारण या उदाहरणात 'अव्यक्तानुकरणस्य' या प्रकृत सूत्रानें पररूप एकादेशाची प्राप्ति आहे, परतु 'अत्' शब्दान्त 'पटत्' हा द्वितीय शब्द आम्रेडितसंज्ञक असल्यामुळें, 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्रानें पररूप एकादेशाचा निषेध होतो व त्यामुळें पररूप एकादेश न होता अन्त्य तकाराचे जश्त्व होऊन 'पटत्पटदिति' असे रूप होते प्रकृत सूत्राच्या विषयात अभेदानुकरणपक्ष मानणे व 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राच्या विषयात भेदानुकरणपक्ष मानणे हें तर अगदीच अयोग्य आहे, कारण ही दोन्ही सूत्रें एकाच प्रकरणात पठित असून निषेध्यनिषेधकभावानें परस्पराशीं सबद्ध असल्यामुळें, दोन्ही सूत्राच्या विषयात एकच पक्ष मानणे उचित आहे, व भेदानुकरणपक्ष मानल्याशिवाय 'पटत्' याचे वर सांगितल्याप्रमाणे द्विर्वचन होऊ शकत नसल्यामुळें आणि 'पटत्पटदिति' हें 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरत नसल्यामुळें, वरील दोन्ही सूत्राच्या विषयात भेदानुकरणपक्ष मानणेच उचित आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे आता प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र असिद्ध मानल्यास 'पटत्पटदिति' हे 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरत नाहीं असे जें वर म्हटले आहे त्यासबधानें प्रकाशकाराच्या तर्फे असे म्हणण्यात येते की,) प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्व-

शास्त्र असिद्ध मानून प्रकाशकाराच्या उत्तरग्रन्थाची उपपत्ति लावावी–म्हणजे 'पटत्पटदिति' या उदाहरणात जश्त्वशास्त्र असिद्ध मानले असता, जी पररूप एकादेशाची प्राप्ति होते तिचा 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्रानें बाध होतो व त्या निषेधक सूत्राचे ते योग्य उदाहरण ठरते असा प्रकाशकाराच्या उत्तरग्रन्थाचा अर्थ करावा यावर दीक्षितानीं मनोरमेंत 'जश्त्वस्यासिद्धतया पररूपेणैव बाधात्' असे म्हटले आहे व त्या पक्तीचा असा अर्थ आहे कीं, प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र असिद्ध असल्यामुळें, जश्त्व-शास्त्राची प्रवृत्ति होऊ शकत नाही व अशा रीतीनें त्या जश्त्व-शास्त्राच्या प्रवृत्तीचा बाध होत असल्यामुळें, पररूप एकादेशच झाला पाहिजे (पण 'नाम्रेडितस्य' हे निषेधक सूत्र असल्यामुळें, पररूप एकादेशाची प्राप्ति असून देखील पररूप एकादेश होत नाही व त्यामुळें 'पटत्पटदिति' हे 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे योग्य उदाहरण ठरते असा प्रकाशकाराच्या उत्तर ग्रन्थाचा अर्थ करता येतो ) पण असा त्या उत्तर ग्रन्थाचा अर्थ केल्यास, (प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र सिद्ध मानून) 'यदा जश्त्ववशाद्दान्तत्व तदाऽपि स्यात्' हा प्रकाशकाराचा पूर्वग्रन्थ असङ्गत ठरतो, (व प्रकृत सूत्राच्या दृष्टीने जश्त्वशास्त्र सिद्ध मानल्यास, त्याचा उत्तरग्रन्थ असङ्गत ठरतो, आणि अशा रीतीनें एकदा जश्त्वशास्त्र सिद्ध व एकदा असिद्ध मानल्यानें त्याच्या पूर्वपरग्रन्थात विरोध येत असल्यामुळें) प्रकाशकार दोन्हीकडून दोरीनें बाधले गेले आहेत– म्हणजे प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र सिद्ध मानले तर उत्तर-ग्रन्थाशी विरोध येतो व जश्त्वशास्त्र असिद्ध मानले तर पूर्व ग्रन्थाशी विरोध येतो व अशा रीतीनें एकीकडे आड व एकीकडे विहीर अशी त्याची स्थिति झाली आहे (म्हणून प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें जश्त्वशास्त्र असिद्ध मानल्यानें व भेदानुकरणपक्ष मानल्यानें कोणताहि विरोध येत नसल्यामुळें, तसेच मानणे उचित आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'तत्सम्भवाच्चेति

दिक्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यातील 'दिक्' या शब्दाचा भावार्थ हा आहे कीं, ('अतो गुणे' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'अतः' या पदाची अनुवृत्ति करता येत असून व शब्दाधिकार मानल्यानें त्या पदाचा 'ऱ्हस्व अकार' असा अर्थ न होता 'अत् शब्द' असा अर्थ करता येत असून देखील आणि तसेच 'उस्यपदान्तात्' या पूर्व सूत्रांतून प्रकृत सूत्रात ) 'अपदान्तात्' या पदाची अनुवृत्ति केल्यानें ( 'झलां जशोऽन्ते' सू ८४ या सूत्रात पदान्ती असणाऱ्या झल्‌चा जश् होतो असे विधान केले असल्यामुळें, त्या सूत्रानें होणाऱ्या ) जश्त्वाची आपोआपच व्यावृत्ति होत असून देखील, पुन्हा प्रकृत सूत्रात 'अत.' या पदाचे जें ग्रहण केले आहे ते व्यर्थ ठरतेंच. त्यामुळें प्रकृत सूत्रात 'अतः' या पदाचे जें ग्रहण केले आहे ते अशाकरिता कीं, 'पररूप' एकादेश होण्याकरिता 'अत्' अशा तान्त रूपाची, म्हणजे तान्त रूप असतानाच पररूप एकादेश व्हावा, अशी विवक्षा आहे हें ज्ञापित व्हावें व भेदानुकरणपक्ष मानल्यानें जी जश्त्वाची प्राप्ति होते ती न व्हावी व जश्त्व केले असता पररूप एकादेश न व्हावा आणि तान्त रूप मिळण्याकरिता अभेदानुकरणपक्ष मानावा व तो पक्ष मानल्यानें जश्त्वाची प्राप्तीच होत नसल्यामुळें तशाच स्थलीं पररूप एकादेश व्हावा हे ज्ञापित व्हावें असे जें (प्रकाशकार-मतानुयायींचे) म्हणणें आहे तें वरील विवेचनावरून चूक ठरतें, कारण प्रकृत सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक जश्त्वशास्त्र असिद्ध असल्यामुळें, भेदानुकरणपक्षात देखील 'पटत् इति' इत्यादि उदाहरणात जश्त्वाची प्राप्ति न होता पररूप एकादेशाचीच प्राप्ति होते. म्हणून जश्त्व होण्याची आपत्ति टळावी व तान्त रूप मिळावें याकरितां अभेदानुकरणपक्ष मानण्याची कांहींच गरज नाहीं. उलट तो पक्ष मानल्यास 'पटत्पटदिति' हें जें 'नाम्रेडितस्य' या निषेधक सूत्राचे काशिकाकारादिकांनी उदाहरण दिलें आहे तें अयोग्य ठरण्याची आपत्ति येत असल्यामुळें, प्रकृत सूत्राच्या विषयात तो पक्ष न मानतां भेदानुकरणपक्षच मानणें उचित आहे आणि हा पक्ष मानला असतां,

पूर्वी सांगितल्याप्रमाणें कोणताहि दोष येत नसल्यामुळें, खण्डनकारानें प्रकाशकाराच्या मताचे समर्थन करण्याकरिता जें वर म्हटले आहे तें चूक ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. मग प्रकृत सूत्रात केलेले 'अत' या पदाचे ग्रहण व्यर्थ ठरत असून देखील पुन्हा या सूत्रात त्या पदाचे ग्रहण का केले आहे असा खण्डनकारादिकानी प्रश्न केल्यास, त्या प्रश्नाचे शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, शब्दाधिकार अनित्य आहे हे ज्ञापित करण्याकरिताच प्रकृत सूत्रात आमच्या मते 'अत:' या पदाचे ग्रहण केले आहे. (सारांश प्रकृत सूत्रात 'अत:' या पदाचे पुन्हा ग्रहण करण्याचे प्रकाशकारानी जें कारण दिले आहे तें बरोबर नसून खरे कारण हे आहे की, शब्दाधिकार मानून पूर्व सूत्रातून उत्तर सूत्रात एखाद्या पदाची अनुवृत्ति करणे हा पक्ष अनित्य असल्यामुळें, त्या अनित्य पक्षाचा आश्रय न करिता अर्थाधिकार मानल्यानें 'अत.' या अनुवृत्त होणाऱ्या पदाचा 'ह्रस्व अकार' असा अर्थ होण्याची जी आपत्ति येते ती टळावी व 'अत:' या पदाचा 'अत् शब्द' असा अर्थ व्हावा याकरिता पाणिनीनें प्रकृत सूत्रात 'अत:' या पदाचे मुद्दाम ग्रहण केले आहे )

**मनोरमा– "अक: सवर्णे" अचि पर इति । यदा तूष्मणामीषद्विवृतत्वमाश्रित्य "नाज्झलौ" इति सूत्र प्रत्याख्यायते तदा इहाचीति नानुवर्तनीयम् । अकोऽ कि दीर्घ इति सुवचम् । वर्णद्वय द्विमात्रमिति । यत्तु प्राचा व्याख्यात दीर्घे प्राप्ते ह्रस्व ऋकार:, ऌकारश्च विधीयत इति तद्भाष्यकैयटादिविरोधादुपेक्ष्यम् ।।**

( 'अक:सवर्णे दीर्घ:' सू ८५ या सूत्रात 'इको यणचि' या पूर्व सूत्रातून 'अचि' या पदाची अनुवृत्ति करून त्या सूत्राचे व्याख्यान करिताना ) 'अचि परे' असे कौमुदीत म्हटले आहे. पण ऊष्मवर्णाचा, म्हणजे 'श्, ष्, स्, ह्' या वर्णांचा, आभ्यन्तरप्रयत्न ईषद्विवृत आहे या पक्षाचा आश्रय करून 'नाज्झलौ'

सू. १३ या सूत्राचे प्रत्याख्यान केले तर, प्रकृत सूत्रात 'अचि' या पदाची अनुवृत्ति करण्याची काही गरज नाही. ('कुमारी शेते' इत्यादि उदाहरणात 'ई' व 'श्' याचे जागी प्रकृत सूत्रानें सवर्ण-दीर्घरूप एकादेश न व्हावा म्हणून या सूत्रात 'अचि' या पदाची अनुवृत्ति करणे आवश्यक आहे 'ई' व 'श्' या दोहोंचेहि तालुस्थान असल्यामुळें त्या दोहोंत स्थानसाम्य आहे व 'विवृतमूष्मणा स्वराणां च' हा पक्ष मानल्यास, त्या दोन वर्णांत विवृतरूप आभ्यन्तरप्रयत्नसाम्य देखील आहे म्हणून 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' सू. १० या सवर्णसंज्ञाविधायक सूत्रान्वयें इकार व शकार सवर्ण ठरतात 'नाज्झलौ' सू १३ हा निषेध शिवसूत्रात साक्षात् पठित असलेल्या वर्णांनाच लागू पडणारा असल्यामुळें आणि दीर्घ ईकार हा वर्ण अक्षरसमाम्नायात साक्षात् पठित नसल्यामुळें व अशा रीतीनें त्या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या अच्प्रत्याहारानें दीर्घ ईकाराचे ग्रहण होऊं शकत नसल्यामुळें, तो निषेध ईकार व शकार याचे सावर्ण्य नाहीसे करण्यास समर्थ होऊ शकत नाहीं पण 'नाज्झलौ' या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या अच्प्रत्याहारानें आक्षरसमाम्नायिक वर्णांचेच ग्रहण होनें व त्या वर्णांच्या दीर्घप्लुतादिकाचे ग्रहण होत नाहीं असे जरी मानले तरी, 'आदिरन्त्येन सहेता' सू. २ या सूत्रान्वयें अच्प्रत्याहार सिद्ध केल्यावर त्या प्रत्याहारानें उपस्थित होणाऱ्या ऱ्हस्व अकारादि वर्णांना 'अणुदित्सवर्णस्य' सू १४ या ग्रहणकशास्त्राच्या सहायानें त्याच्या दीर्घादिकाचे ग्रहण करता येत आणि अशा रीतीनें [illegible]

कौमुदीत 'नाज्झलाविति सावर्ण्यनिषेधस्तु न दीर्घशकारयोः, ग्रहणकशास्त्रस्य सावर्ण्यविधिनिषेधाभ्यां प्रागनिष्पत्तेः' असे उत्तर दिले आहे व पूर्वी वाक्यापरिसमाप्तिन्याय सांगतेवेळीं या विषयाचें विस्तृत विवरण प्रकृत ग्रन्थात केलेच आहे. या विषयासंबंधानें 'नाज्झलौ' या सूत्रावरील प्रक्रियाकौमुदींत 'न निषिद्धं सवर्णत्वं नाज्झलाविति दीर्घशो. । ग्रहोदितनिषिद्धत्वादन्यत्र न निषिद्धिता ।।' ही कारिका पठित केली आहे व या कारिकेचे व्याख्यान करिताना प्रसादकारानी 'नाज्झलौ इत्यत्र अच् इति प्रत्याहारसन्निविष्टा एवाकारादयो गृह्यन्ते, न तु तत्सवर्णा अपि । अणुदित्सवर्णस्य चाप्रत्यय इत्यस्य शास्त्रस्य सवर्णसंज्ञाविधायकशास्त्रं प्रत्यसिद्धेः । यतस्तस्य सवर्णसंज्ञा अङ्गम् । तस्या अङ्गभूताया असिद्धावङ्गिनोऽपि ग्रहणकशास्त्रस्यासिद्धिः । तस्मान्नाज्झलौ इति शास्त्रं प्रति ग्रहणकशास्त्रनिवृत्तेस्तत्र प्रत्याहारसूत्रसन्निविष्टा एवाकारादयो गृह्यन्ते । तेन दीर्घशकारयोरस्य सावर्ण्यनिषेधो न । दीर्घस्य प्रत्याहारसूत्रसन्निवेशाभावादिति ।' असे म्हटले आहे. म्हणून 'कुमारी शेते' इत्यादि स्थली सवर्णदीर्घ होण्याची आपत्ति न यावी याकरिता प्रकृत सूत्रात 'अचि' या पदाची अनुवृत्ति करणे आवश्यक आहे असे दीक्षिताचे म्हणणे आहे. तशी अनुवृत्ति केली असता, 'कुमारी' यातील अन्त्य ईकारापुढें असणारा शकार हा अच् नसल्यामुळें, त्या उदाहरणात सवर्णदीर्घ एकादेश होत नाही. परंतु 'विवृतमूष्मणां स्वराणां च' या वचनाऐवजी 'ईषद्विवृतमूष्मणां, विवृतं स्वराणां च' असे वचन पठित केले तर, ईकार व शकार यांचा आभ्यन्तरप्रयत्न भिन्न ठरून ईकाराचे शकाराशी सावर्ण्य होत नसल्यामुळे, 'कुमारी शेते' इत्यादि उदाहरणात सवर्णदीर्घ होण्याची आपत्ति आपोआपच टळते आणि तशा स्थितीत 'नाज्झलौ' हे सूत्र असण्याची देखील काही आवश्यकता राहत नाहीं. अशा रीतीनें त्या सूत्राचे प्रत्याख्यान केल्यास, प्रकृत सूत्रात 'अचि' या पदाची अनुवृत्ति करण्याची काहीच गरज नाही असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.)

'अक: सवर्णे दीर्घ:' या प्रकृत सूत्राऐवजीं 'अकोऽकि दीर्घ:' असे सूत्र पठित करणे अधिक योग्य आहे. (तसे सूत्र पठित केल्यानें उद्देश्य व निमित्त याची सख्या समान होत असल्यामुळें, 'यथासङ्ख्यमनुदेश: समानाम्' सू. १२८ हा यथासङ्ख्यन्याय येथें लागू पडतो व त्यामुळें 'सवर्णे' हे अधिक मात्राचे पद प्रकृत सूत्रातून गाळता येते व प्रकृत सूत्रात 'अचि' या पदाची अनुवृत्ति करण्याची देखील गरज राहत नाही पण प्रकृत सूत्रावर वार्तिककारानें 'ऋति ऋ वा' व 'ऌति ऌ वा' अशीं दोन वार्तिके पठित केली असल्यामुळें व त्या दोन वार्तिकात प्रकृत सूत्रातून 'सवर्णे' या पदाची अनुवृत्ति होत असल्या-मुळें, प्रकृत सूत्रातील 'सवर्णे' हे पद गाळल्यास त्या दोन्ही वार्तिकात 'सवर्णे' हे पद घालावे लागेल व अशा रीतीनें लाघव न होता उलट गौरव होण्याची आपत्ति येईल अशी कोणी शका केल्यास, त्या शकेवर हे उत्तर आहे की, भाष्यकारानी त्या दोन्ही वार्तिकाचे प्रत्याख्यान केले असल्यामुळें, वरील शका अनुपपन्न ठरते. वरील दोन्ही वार्तिकात ॠकार व ॡकार हे जे दोन वर्ण पठित आहेत ते) द्विमात्रिक वर्ण आहेत असे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे. प्रसादकारानीं त्या वार्तिकाचे 'दीर्घे प्राप्ते ऱ्हस्व ऋकार ऌकारश्च विधीयते' असे जें व्याख्यान केले आहे ते भाष्यकैयटादि ग्रन्थाच्या विरुद्ध असल्यामुळें स्वीकारार्ह नाही (प्रसादकाराचे असे म्हणणे आहे की, ऋकारापुढें ऋकार व ऌकारापुढें ऌकार आला असता त्या दोहोचे जागी वरील वार्तिकान्वयें जो विकल्पेंकरून अनुक्रमें ॠकार व ॡकार होणे सागितले आहे तो ऱ्हस्व ऋकार व ऌकार होय. पण भाष्यकारानीं व कैयटानें तो द्विमात्रिक आदेश आहे असे म्हटले असल्यामुळें, प्रसादकाराचे म्हणणे चूक ठरते हे उघड आहे. ज्या भाष्यात द्विमात्रिक आदेश होतो असे म्हटले आहे ते भाष्य शब्दरत्नात सागण्यात येईल )

शब्दरत्न– सुवचमिति । जातिपक्षाश्रयणे यथासंख्येनेष्टसिद्धेरिति भाव: । एव रीत्या यथासंख्यं "इको यणचि" इत्यत्रापि बोध्यमिति

सूचितम् । तद्भाष्येति । "तुल्यास्य" सूत्रस्थभाष्येत्यर्थः । तत्र हि "अक सवर्णे" इति सूत्रेणंतद्वार्तिकाग्ययासिद्धिरुद्भाविता ।

'अकोऽकि दीर्घ इति सुवचम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, (व्यक्तिपक्षात अनन्त व्यक्ति असल्यामुळें त्याच्या सख्येचे ज्ञान होणे सभवनीय नाहीं म्हणून तो पक्ष न मानता) जातिपक्ष मानल्यास यथासङख्यन्यायानें इष्ट रूपाची सिद्धि करता येते (जातिपक्ष मानल्यानें अक या उद्देश्याची व अक् या निमित्ताची सख्या समान होत असल्यामुळे येथें यथासख्यन्याय प्रवृत्त करण्यात काही अडचण येत नाही) व याच रीतीनें 'इको यणचि' सू ४७ या सूत्राचे ठिकाणी देखील (जातिपक्ष मानून) यथासख्यन्यायाची प्रवृत्ति करावी असे दीक्षितानी सुचविले आहे ( इको यणचि' या सूत्रावरील मनोरमेंत दीक्षितानी व्यक्तिपक्ष मानून त्या सूत्राचे ठिकाणीं यथासख्यन्याय लागू पडत नाही असे पूर्वी म्हटले आहे पण प्रकृत सूत्राऐवजी 'अकोऽकि दीर्घ ' असे सूत्र पठित करून त्या सूत्राचे ठिकाणी त्यानी यथासख्यन्याय लावला असल्यामुळें, ते असे ध्वनित करतात की दोन्ही सूत्राच्या विषयात जातिपक्ष मानून यथासख्यन्यायाची प्रवृत्ति करणे हेंच अधिक उचित आहे ) 'तद्भाष्यकैयटादिविरोधादुपेक्ष्यम्' या मनोरमेच्या पक्तीत 'भाष्य' हा जो शब्द वापरला आहे तो 'तुल्यास्यप्रयत्न सवर्णम्' १ १ ९ या सूत्रावरील भाष्यासबधानें वापरला आहे त्या भाष्यांत 'अक सवर्णे दीर्घ ' या प्रकृत सूत्रानें 'ऋति ऋ वा, लृति लृ वा' ही दोन्ही वार्तिके गतार्थ होतात (व तीं वार्तिके मानण्याची गरज नाही कारण त्या दोन वार्तिकानी जी रूपे सिद्ध होतात ती प्रकृत सूत्रानेहि सिद्ध करता येतात) असे सिद्ध करून दाखविले आहे (त्या भाष्यात 'ऋकारलृकारयो सवर्णविधि ' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात— 'ऋकारलृकारयो सर्वणसज्ञा विधेया । होतृलृकार होतृकार । किं प्रयोजनम् ? । अक सवर्णे दीर्घ इति दीर्घत्व यथा स्यात् ।'

या भाष्याचा भावार्थ हा आहे की, ऋकाराचे मूर्धन्यस्थान असून ऌकाराचे दन्तस्थान असल्यामुळें व अशा रीतीनें त्या दोन वर्णांत स्थानसाम्य नसल्यामुळें, ऋकारापुढें ऌकार आल्यास प्रकृत सूत्रानें दोहोंचे जागी दीर्घ ऋकार होऊं शकणार नाही, पण तसें होणें इष्ट असल्यामुळें, ते दोन वर्ण सवर्ण मानले पाहिजेत व तसें मानले तरच, 'होतृ+ऌकार.=होतॄकार:' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें. पण भाष्यकार पुढें म्हणतात— 'नैतदस्ति प्रयोजनम् । वदयत्येतत्— सवर्णदीर्घत्वे ऋति ऋ वा वचनम् ऌति ऌ वा वचनमिति ॥ तत्सवर्णे यथा स्यात् । इह मा भूत् दध्यॢकार: मध्वॢकार: इति ॥ यदेतत्सवर्णदीर्घत्वे ऋतीति एतदृत इति वक्ष्यामि । तत –ऌति । ऌकारे परत ऌकारो वा भवतीति । ऋत इत्येव ॥ तन्न वक्तव्यं भवति ॥ अवश्य तद्वक्त-व्यम् । ऊकालोऽज्झ्रस्वदीर्घप्लुतसंज्ञो भवतीत्युच्यते । न च ऋकार ऌकारो वाऽजस्ति ॥ ऋकारस्य ऌकारस्य चाऽच्त्वं वक्ष्यामि । तच्चा-वश्य वक्तव्यम् । प्लुतो यथा स्यात् । होतृ–ऋकार होतॄकार: । होतॄ३कार इति । होतृ–ऌकार: होतॣकार· होतॣ३कार इति ॥ किं पुनरत्र ज्याय: ? ॥ सवर्णसंज्ञावचनमेव ज्याय. । दीर्घत्व चैव हि सिद्ध भवति ।' भाष्यकाराच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे की, सवर्णसंज्ञाविधायक वार्तिकाचें जें वर प्रयोजन सांगितलें आहे तें इतर रीतीनें सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, त्या प्रयोजनाच्या सिद्धीकरिता तें वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज नाही, कारण 'अक: सवर्णे दीर्घ.' या सूत्रावर वार्तिककारानें 'ऋति ऋ वा, ऌति ऌ वा' हीं दोन वार्तिकें पठित केली आहेत व त्या वार्तिकांनीं द्विमात्रिक ऋकार व ऌकार असा आदेश होऊं शकतोच. पण 'अक: सवर्णे दीर्घ.' या सूत्रात 'सवर्णे' हें पद घातलें असल्यामुळें, ऋकारापुढें सवर्ण नसलेला ऌकार आल्यास दोहोंचे जागी द्विमात्रिक वार्तिकनिर्दिष्ट विलक्षण प्रकारचा ऋकार होण्याकरिता वरील

सवर्णसंज्ञाविधायक वार्तिक पठित करणे आवश्यक आहे. ते वार्तिक मानले तरच, 'होतृ + लृकार ' या स्थली 'ऋ' व 'लृ' हे सवर्ण ठरून त्या दोहोंचे जागी द्विमात्रिक ऋकारादेश किंवा द्विमात्रिक लृकारादेश होऊ शकतो व 'दधि + ऋकार, दधि + लृकार.' या स्थली तसा आदेश होण्याची आपत्ति टळते पण भाष्यकार म्हणतात की, 'ऋति ऋ वा' या प्रथम वार्तिकात 'ऋति' या ऐवजी 'ऋत ' हे पञ्चम्यन्त पद घातल्यानें व 'अक सवर्णे दीर्घ ' या ज्या सूत्रावर ते वार्तिक पठित आहे त्या प्रकृत सूत्रातून या वार्तिकात 'सवर्णे' या पदाची अनुवृत्ति केल्याने, ऋकाराचा सवर्ण ऋकारच असल्यामुळें, ऋकारापुढें ऋकार आल्यासच हे प्रथम वार्तिक प्रवृत्त होईल व दोन ऋकाराचे जागी द्विमात्रिक ऋकार होईल आणि ऋकारापुढें भिन्न अच् असल्यास, ते वार्तिक मुळीच प्रवृत्त होणार नाही 'लृति लृ वा' या द्वितीय वार्तिकात प्रथम वार्तिकातून 'ऋत ' या पञ्चम्यन्त पदाची अनुवृत्ति केल्यानें व प्रकृत सूत्रातून 'सवर्णे' या पदाची अनुवृत्ति न केल्यानें, द्वितीय वार्तिकाचा असा अर्थ होतो की, ऋकारापुढें लृकार आल्यास त्या दोहोंचे जागी विकल्पेंकरून 'लृ' असा द्विमात्रिक आदेश करावा व या अर्थान्वयें ऋकाराहून भिन्न अचापुढे लृकार आल्यास, ते द्वितीय वार्तिक प्रवृत्त होणार नाही अशा रीतीने वरील दोन वार्तिके मानल्यानें ऋकारापुढें ऋकार आल्यास, दोहोंचे जागी द्विमात्रिक ऋकार व दीर्घ ऋकार, आणि लृकार आल्यास दोहोंचे जागी द्विमात्रिक लृकार व दीर्घ ऋकार, होऊन इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकत असल्यामुळें, 'ऋकारलृकारयो सवर्णविधि ' हे सवर्ण विधीचे वार्तिक पठित करण्याची काही गरज राहत नाहीं पण भाष्यकार पुढें म्हणतात की, ते सवर्णविधीचे वार्तिक मानलेच पाहिजे, कारण 'ऊकालोऽज् ह्रस्वदीर्घप्लुत ' सू ४ या सूत्रान्वयें अच्‌च दीर्घ व प्लुत होऊ शकतो आणि 'ऋति ऋ वा, लृति लृ वा' या दोन वार्तिकान्वयें होणारे द्विमात्रिक ऋकार व लृकार याचा

आभ्यन्तरप्रयत्न ईषत्स्पृष्ट असून विवृत नसल्यामुळें, ते अच् ठरू शकत नाहींत व त्यामुळें त्याना दीर्घ, प्लुत या संज्ञा होऊ शकत नाहीत पण भाष्यकार पुढें म्हणतात की, हे जे विलक्षण प्रकारचे ईषत्स्पृष्ट द्विमात्रिक ऋकार व लृकार वरील दोन वार्तिकान्वयें होण्याचे सांगितले आहे त्याचा 'अइउण्' या शिवसूत्रापुढें अच्प्रत्याहारात पाठ केल्यानें, ते अच् ठरून, ते द्विमात्रिक असल्यामुळें दीर्घ ठरतील व त्याना प्लुतसंज्ञा होण्यात काही अडचण येणार नाहीं. पण अशा रीतीनें त्या ईषत्स्पृष्ट, द्विमात्रिक ऋकार व लृकार याचा अच्-प्रत्याहारात पाठ केल्यानें ज्याअर्थी ते अच् ठरतात त्याअर्थी ते 'ऋ, लृ' या वर्णांचे सवर्ण देखील ठरतात व त्यामुळें 'अक सवर्णे दीर्घः' या सूत्रानेंच ते द्विमात्रिक ऋकारादेश व लृकारादेश होऊ शकतात आणि त्यामुळें वरील दोन वार्तिकें पठित करण्याची काही गरज राहत नाही साराश सवर्णसंज्ञेचे वार्तिक मानल्यानें प्रकृत सूत्रानेंच तसे आदेश व त्याचप्रमाणें दीर्घ ऋकारादेश होऊ शकत असल्यामुळें, भाष्यकारानी वरील दोन वार्तिकाचे प्रत्याख्यान केले आहे यावरील भाष्यव्याख्यानावरून हे स्पष्ट होते कीं, ऋकारापुढें ऋकार किंवा लृकार आल्यास त्या दोहोंचे जागी जो विलक्षण प्रकारचा 'ऋ' किंवा 'लृ' आदेश होणे सांगितले आहे तो द्विमात्रिक आहे व ऱ्हस्व द्विमात्रिक नसून एकमात्रिक असल्यामुळें, 'दीर्घे प्राप्ते ऱ्हस्व ऋकार लृकारश्च विधीयते' असे जें प्रसादकारानी आपल्या टीकेत म्हटले आहे ते चूक ठरते कैयटानें प्रदीपात 'द्वावप्येतौ दीर्घौ ऋ लृ इति' व 'तस्माद्द्विमात्रावेतावभ्युपगन्तव्यौ' असे स्पष्ट म्हटले आहे. म्हणून प्रसादकाराचे म्हणणें भाष्यविरुद्ध व कैयटमतविरुद्ध ठरत असल्यामुळें, ते स्वीकारार्ह नाही असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे असे शब्दरत्नकार म्हणतात )

मनोरमा–"एङः पदान्तात्" "ङसिङसोश्च" इत्यस्यारम्भादस्य पदान्तविषयत्वे लब्धे उत्तरार्थं पदान्तादिति स्पष्टार्थमिहैव कृतम् ॥

'ङसिङसोश्च' सू. २४६ या (अपदान्त एङ्विषयक लगेच पुढें पठित असलेल्या) सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें 'एङः पदान्तादति' सू. ८६ हे सूत्र पदान्तविषयक आहे हे सिद्ध होत असून देखील या सूत्रात 'पदान्तात्' या शब्दाचे जें ग्रहण केले आहे ते त्या शब्दाची उत्तर सूत्रात अनुवृत्ति व्हावी व प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट व्हावा याकरिता केलें आहे. ('एङ पदान्तादति' या प्रकृत सूत्राच्या लगेच पुढें 'ङसिङसोश्च' हे सूत्र अष्टाध्यायीत पठित केले आहे व या सूत्रावरील काशिकावृत्तीत 'अपदान्तार्थ आरम्भः'—म्हणजे या सूत्रापासून अपदान्त एङविषयाचा आरंभ होतो—असे स्पष्ट म्हटले आहे, कारण 'ङसि, ङस्' हे विभक्तिप्रत्यय प्रातिपदिकापुढेंच येऊ शकतात व पदापुढें येऊच शकत नाहीत यावरून हे सिद्ध होतें की, 'एङः पदान्तादति' इत्यादि पूर्व सूत्रें पदान्ती असणाऱ्या 'एङ' च्या संबंधाचीं सूत्रें आहेत. म्हणून प्रकृत सूत्रात 'पदान्तात्' या पदाचे ग्रहण करण्याची काही आवश्यकता नव्हती व त्या पदाचे त्या सूत्रात ग्रहण केले नसतें तरी पदान्ती असणाऱ्या 'एङ' च्या संबंधाचे हें सूत्र आहे हे सहज ज्ञात होऊ शकले असते. तथापि प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट व्हावा व 'इकोऽसवर्णे शाकल्यस्य' इत्यादि उत्तर सूत्रात त्या पदाची अनुवृत्ति व्हावी याकरिता या सूत्रात 'पदान्तात्' या पदाचे ग्रहण केले आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे. या विषयाचे अधिक विवरण शब्दरत्नात करण्यात येईल.)

शब्दरत्न—आरम्भादिति । अपदान्ताच्चेन् ङसिङसोरेवेति नियमादिति भावः । उत्तरार्थमिति । "इकोऽसवर्णे" इत्याद्यर्थम् । स्पष्टार्थमिति । विभक्तौ चेन्ङसिङसोरेवेति नियमशङ्कावारणार्थमिति भावः ।

'आरम्भात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, अपदान्त 'एङ' असला तर तशा अपदान्त 'एङ्' पुढें 'ङसि' किंवा 'ङस्' या प्रत्ययाचा अवयव ऱ्हस्व अकार आल्यासच

पूर्वरूप एकादेश होतो अशा प्रकारचे 'ङसिङसोश्च' सू. २४६ हे नियामक सूत्र ठरत असल्यामुळें, त्या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानेंच प्रकृत सूत्र पदान्ती असणाऱ्या 'एङ्' च्या संबंधाचे सूत्र आहे असे (त्या सूत्रात 'पदान्तात्' हा शब्द घातला नसता तरी) ज्ञात होऊं शकलेच असते (याचे विवरण वर मनोरमेंत केलेच आहे) 'उत्तरार्थम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, 'इकोऽसवर्णे' इत्यादि उत्तरसूत्रात प्रकृत सूत्रातून 'पदान्तात्' या पदाची अनुवृत्ति व्हावी. '*स्पष्टार्थमिहैव कृतम्*' असे जें *मनोरमेंत म्हटले आहे त्याचा* भावार्थ हा आहे की, 'ङसिङसोश्च' या सूत्राचा 'विभक्तिप्रत्यये परे चेत् यदि पूर्वरूपैकादेशोभवति तर्हि ङसिङसो प्रत्यययो अति परे एव' अशा तऱ्हेचा विपरीत नियम त्या सूत्रातून निघतो अशी शंका उत्पन्न झाली असता त्या शंकेचे निवारण व्हावे व त्या सूत्राचा तशा प्रकारचा नियामक अर्थ होऊ नये हे स्पष्ट होण्याकरिता प्रकृत सूत्रात 'पदान्तात्' या पदाचे ग्रहण केले आहे. ('एङ अति' एवढेंच जर प्रकृत सूत्र केले असतें तर, पदान्तीं किंवा अपदान्ती 'एङ्' असून त्या पुढें 'अत्', म्हणजे ऱ्हस्व अकार, आला असता पूर्वरूप एकादेश होतो असा त्या सूत्राचा अर्थ झाला असता मग अपदान्त 'एङ्' पुढें 'ङसि = अस्' व 'ङस् = अस्' या प्रत्ययाचा ऱ्हस्व अकार आल्यास त्या दोहोंचे जागी पूर्वरूप एकादेश होतो या अर्थाचे 'ङसिङसोश्च' हे सूत्र करण्याची काही गरज नव्हती, कारण 'एङ अति' या सूत्रानेंच 'ङसिङसोश्च' या सूत्रानें होणाऱ्या रूपाची सिद्धि करता येऊ शकली असती. पण 'ङसिङसोश्च' हें सूत्र मुद्दाम केले असल्यामुळें व 'ङसि' आणि 'ङस्' हे प्रत्यय प्रातिपदिकापुढेंच, म्हणजे अपदान्तापुढेंच, येणारे प्रत्यय असल्यामुळें, 'प्राप्ते सति नियमार्थम्' या न्यायान्वयें ते सूत्र नियामक सूत्र ठरून त्याचा अर्थ असा होतो की, 'अपदान्ताच्चेदेङ. अति परे सति पूर्वरूपैकादेशो भवति तर्हि ङसिङसो· प्रत्यययो. अति परे सत्येव भवति' व तसा त्या सूत्राचा अर्थ होत असल्यामुळें 'एङः अति' इत्यादि पूर्व सूत्रात

'अपदान्तात्' या पदाची व्यावृत्ति होऊन 'एङः अति' या सूत्राचा 'एङ पदान्तादति' असाच अर्थ निष्पन्न होतो. म्हणून प्रकृत सूत्रात 'पदान्तात्' या पदाचे ग्रहण केले नसते तरी चालू शकले असतें. तथापि प्रकृत सूत्रात 'पदान्तात्' या पदाचे ग्रहण अशाकरिता केलें आहे की, 'सर्वत्र विभाषा गो', अवङ् स्फोटायनस्य, इन्द्रे च, इकोऽसवर्णे शाकल्यस्य' इत्यादि पुढील सूत्रात त्या पदाची अनुवृत्ति व्हावी. दुसरे असे की, 'एङ. अति' एवढेंच जर प्रकृत सूत्र केले असते तर, 'असति बाधके प्रमाणाना सामान्ये पक्षपातः' असा न्याय आहे तरी, नियम सजातीयालाच लागू पडत असल्यामुळें व 'ङसिङसोश्च' या सूत्रात विभक्तिप्रत्ययाचेच ग्रहण केले असल्यामुळें त्या नियामक सूत्रात सांगितलेला नियम सामान्यापेक्ष नियम न मानला जाता, विशेषापेक्ष, म्हणजे केवळ विभक्तिप्रत्ययापेक्ष, नियम मानला गेला असता व त्यामुळें 'ङसिङसोश्च' या नियामक सूत्राचा असा अर्थ झाला असता कीं, 'एङ. विभक्तिप्रत्ययस्य अति परे चेत् पूर्वरूपैकादेशो भवति तर्हि ङसिङसो प्रत्यययो. अति परे एव' व तसा अर्थ झाल्यानें, पूर्व सूत्रात अपदान्ताची व्यावृत्ति न होता, 'ङसि' व 'ङस्' हे विभक्तिप्रत्यय सोडून इतर विभक्तिप्रत्ययाचीच व्यावृत्ति झाली असती व त्यामुळें 'भू + शप् + ति = भो + अ + ति' या स्थली 'भो' यातील अपदान्त एङ्पुढें जो 'शप् = अ' आहे तो विभक्तिप्रत्यय नसल्यामुळें, 'एङ. अति' एवढेंच जर सूत्र असतें तर, तें सूत्र प्रवृत्त होऊन पूर्वरूप एकादेश होण्याची व 'भोति' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती ती आपत्ति टळावी व प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट व्हावा याकरितां 'एङ अति' असे सूत्र न करिता 'एङः पदान्तादति' असे प्रकृत सूत्र केले आहे )

मनोरमा—"सर्वत्र विभाषा गोः" यद्यपि छन्दसीति न प्रकृतं तथाऽपि "यज्ञुप्युरः" इत्यादिप्रयोगमात्रच्छन्दस्येवेदमिति सम्भाव्येत, अतः सर्वत्रेत्युक्तम्। तद्व्याचष्टे—लोके वेदे चेति।

इह "एङ" इत्यनुवर्त्यैङन्तस्य गोरिति व्याख्येयम्, तेनेह न—चित्रग्वग्रमिति। प्रतिपदोक्तस्य एङो ग्रहणान्नेह हे चित्रगोऽग्रम्। प्रकृतिभाव इति। "प्रकृत्याऽन्तः पादम्" इति सूत्रात्प्रकृत्येत्यनुवृत्तेः। यद्यपि भाष्ये "इको गुणवृद्धी" इति सूत्रे "नान्तःपादम्" इति पाठः स्थितः। पाठभाष्येऽप्येवम्। तथापि शाकलसूत्रे "ह्रस्वश्च" इति चकारेण "प्रकृत्या इत्यनुकृष्यते" इति भाष्यदर्शनात् "प्रकृत्यान्तः पादम्" इति पाठोऽपि साधुरेव। "न" इति पाठे तु "सर्वत्र" इति सूत्रेण पूर्वरूपमेव विकल्प्येतेत्यवधेयम्॥

जरी 'सर्वत्र विभाषा गोः' सू. ८७ या सूत्रात ('वा छन्दसि' या पूर्व सूत्रातून) 'छन्दसि' या पदाची अनुवृत्ति होत नाहीं, म्हणजे तें पद निवृत्त होते, तरी 'यजुष्युर:' इत्यादि (पाच) वेदविषयक सूत्रें प्रकृत सूत्रापूर्वी पठित असल्यामुळें (व त्यापैकी प्रथम सूत्रात 'यजुषि' हे पद साक्षात् पठित असून पुढील चार सूत्रात त्या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें त्या सूत्रातील 'यजुषि' हे पद प्रकृत सूत्रात अनुवृत्त होते व) प्रकृत सूत्र देखील वेदविषयकच आहे असा समज होण्याचा संभव होता. (तसा चुकीचा समज न व्हावा) याकरिता प्रकृत सूत्रात 'सर्वत्र' या पदाचे ग्रहण केले आहे आणि म्हणूनच त्या पदाचा 'लोके वेदे च' असा कौमुदीत अर्थ केला आहे. प्रकृत सूत्रात ('एङः पदान्तादति' या पूर्व सूत्रातून) 'एङ.' या पदाची अनुवृत्ति करून 'एङन्तस्य गोः' असे व्याख्यान केले पाहिजे तसे व्याख्यान केल्यानें, 'चित्रग्वग्रम्' या उदाहरणात पूर्वरूप एकादेश होत नाही ('एङः पदान्तादति' या सूत्रात 'एङः' हें पञ्चम्यन्त पद आहे प्रकृत सूत्रात ते पद अनुवृत्त करून त्याचा षष्ठीविभक्तीत विपरिणाम केल्यानें ते पद प्रकृत सूत्रातील 'गोः' या षष्ठ्यन्त पदाचे विशेषण होते व 'येन विधिस्तदन्तस्य' सू. २६ या सूत्रान्वयें 'एङ' या विशेषणाचा 'एङन्तस्य' असा अर्थ होतो व प्रकृत सूत्रात 'पदान्तात्' या पदाची देखील अनुवृत्ति असल्यामुळें, प्रकृत सूत्राचा

'एङन्तस्य गोरति वा प्रकृतिभावः स्यात्पदान्ते' असा अर्थ निष्पन्न होतो व तसाच अर्थ कौमुदीत केला आहे. त्यामुळें 'चित्रा गावो यस्य सः चित्रगु , चित्रगाः अग्रम = चित्रगु+ङस्+अग्र+सु' या स्थली 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू. ६५६ या सूत्रानें 'चित्रगु' असे जें रूप झाले आहे त्यातील एकदेशविकृत 'गु' हा 'गो' च आहे असे 'एकदेशविकृतमनन्यवत्'–परि. ३७–या परिभाषान्वयें मानले तर, 'चित्रगु' या शब्दापुढील 'ङस्' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू ६५० या सूत्रानें लुक् झाल्यावर 'चित्रगु' हा शब्द प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञक ठरत असून त्याच्या अन्ती 'गो' हा शब्द आहे असे मानावे लागेल व त्या 'गो = गु' या पदान्ती असणाऱ्या शब्दापुढें अकारानें सुरू होणारा 'अग्र' हा शब्द येत असल्यामुळें, पूर्वरूप एकादेश होऊन 'चित्रगुग्रम्' असे विकृत रूप होण्याची व विकल्पेंकरून प्रकृतिभाव होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टळावी याकरिता 'एङन्तस्य गोः' असे व्याख्यान करणे आवश्यक आहे व तसे व्याख्यान केल्यानें, 'चित्रगु' यातील 'गो' हा शब्द उकारान्त असून एङन्त नसल्यामुळें, पूर्वरूप एकादेश व वैकल्पिक प्रकृतिभाव न होता, 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रानें यणादेश होऊन 'चित्रग्वग्रम्' असे इष्ट रूप सिद्ध होते.) प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङ्चे ग्रहण असल्यामुळें, 'हे चित्रगोऽग्रम्' या उदाहरणात प्रकृतिभाव होत नाही. (कारण या उदाहरणात मूळ शब्द 'चित्रगु' असून त्याचे 'ह्रस्वस्य गुणः' सू. २४२ या सूत्रानें अन्त्य उकारास गुण होऊन 'चित्रगो' असे संबुद्धीचे रूप झाले आहे. या रूपाच्या अन्ती असलेला 'गो' हा शब्द प्रतिपदोक्त 'गो' शब्द नसून लाक्षणिक, म्हणजे पाणिनीय सूत्रान्वयें गुण होऊन सिद्ध झालेला, शब्द आहे. म्हणून अशा लाक्षणिक एङन्त 'गो' शब्दाला प्रकृत सूत्र लागू पडत नसल्यामुळें, 'हे चित्रगोअग्रम्' असा प्रकृतिभाव न होता, 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होऊन 'हे चित्रगोऽग्रम्' असेच रूप होते.) 'प्रकृत्याऽन्त:पादम्'

या पूर्वसूत्रातून प्रकृत सूत्रात 'प्रकृत्या' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, 'वा प्रकृतिभाव स्यात् '–म्हणजे या सूत्रानें विकल्पें करून प्रकृतिभाव होतो– असे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत व्याख्यान केले आहे. जरी 'इको गुणवृद्धी' १. १ ३ या सूत्रावरील भाष्यात ('प्रकृत्याऽन्त पादम्' असा पाठ मानला नसून त्या सूत्राचा) 'नान्त पादम्' असा पाठ मानला आहे व त्याचप्रमाणें षष्ठाध्यायातील ६. १ ११५ सूत्रावरील भाष्यात देखील तसाच पाठ आढळतो तरी, 'इकोऽसवर्णे शाकल्यस्य ऱ्हस्वश्च' या शाकलसूत्रात असलेल्या 'ऱ्हस्वश्च' यांतील 'च' या पदानें 'प्रकृत्या' या पदाचे अनुकर्षण होते असे भाष्यात म्हटले असल्यामुळें 'प्रकृत्याऽन्त पादम्' हा सूत्रपाठ देखील साधु ठरतो (व त्यामुळें तसा पाठ असलेल्या सूत्रातून प्रकृत सूत्रात 'प्रकृत्या' या पदाची अनुवृत्ति केल्यानें वैकल्पिक प्रकृतिभाव सिद्ध होतो सध्या उपलब्ध असलेल्या अष्टाध्यायीपाठात 'प्रकृत्याऽन्त - पादमव्यपरे' असाच सूत्रपाठ आढळतो व काशिकेत देखील असाच सूत्रपाठ दिला आहे पण त्या सूत्राचे षष्ठाध्यायात व्याख्यान करते-वेळी भाष्यकारानी त्या सूत्राचा 'नाऽन्त पादमव्यपरे' असा पाठ केला आहे 'इको गुणवृद्धी' या सूत्रावरील भाष्यात ते सूत्र साक्षात् पठित केले नाही पण त्या भाष्यात जें व्याख्यान केले आहे ते 'नाऽन्त पादमव्यपरे' असा सूत्रपाठ मानला तरच योग्य ठरत, आणि म्हणून दीक्षितानी मनोरमेंत 'भाष्ये इको गुणवृद्धी इति सूत्रे नान्त पादमिति पाठ स्थित' असे म्हटले आहे त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात–'अस्ति पुन क्वचि-दन्यत्रापि, अपवादे प्रतिषिद्धे उत्सर्गोऽपि न भवति ? अस्तीत्याह । सुजाते अश्वसूनृते । अध्वर्यो अद्रिभि सुतम् । शुक्र ते अन्यदिति । पूर्वरूप प्रतिषिद्धेऽयादयोऽपि न भवन्ति ।' या वरील भाष्यात भाष्यकार असा प्रश्न करितात की, अपवादक सूत्राचा निषेध झाल्या-वर उत्सर्गसूत्र–सामान्यशास्त्र–देखील प्रवृत्त होत नाही या सबधाचा इतर कोठें दाखला आहे काय व या प्रश्नाचे 'होय' असे भाष्यकार

उत्तर देतात व तीन वैदिक उदाहरणें देतात. या तीन्ही उदाहरणात 'ए' व 'ओ' या पुढें 'अ' हा अच् असल्यामुळें 'एचोऽयवायावः' सू ६१ या सूत्रानें 'ए, ओ' याचे जागी अनुक्रमें 'अय्, अव्' या आदेशाची प्राप्ति आहे पण ते 'ए' व 'ओ' पदाच्या अन्तीं असल्यामुळें व त्याच्यापुढें ऱ्हस्व अकार असल्यामुळें आणि 'एङः पदान्तादति' सू. ८६ हें सूत्र 'एचोऽयवायावः' या वरील सामान्य-शास्त्राचे अपवादक शास्त्र असल्यामुळें, 'अय्, अव्' या आदेशाची प्राप्ति न होता, अपवादक शास्त्रानें पूर्वरूप एकादेशाची प्राप्ति होते. पण त्या अपवादक शास्त्राचा निषेध करणारे 'नान्तःपादम्' हे निषेधक शास्त्र असल्यामुळें, वरील तिन्ही उदाहरणात अपवादक शास्त्र प्रवृत्त होत नाही व पूर्वरूप एकादेश होत नाही. अशा रीतीनें अपवादक पूर्वरूप शास्त्राचा निषेध झाल्यावर 'एचोऽयवायावः' हे सामान्यशास्त्र देखील भ्रष्टावसरन्यायान्वयें वरील तीन्ही उदाहरणात प्रवृत्त होऊ शकत नसल्यामुळेंच, 'ए, ओ' याचे जागी 'अय्, अव्' असा आदेश श्रुतीत केला नाही यावरून हें सिद्ध होतें कीं, अपवादाचा निषेध झाल्यावर पुन्हा सामान्यशास्त्राची प्रवृत्ति होत नाही असा भाष्यकाराच्या म्हणण्याचा आशय आहे जर 'प्रकृत्याऽन्तः-पादम्' असा सूत्रपाठ भाष्यकारानी मानला असता तर, प्रकृतिभाव झाला असल्यामुळें उत्सर्गशास्त्र व अपवादकशास्त्र याची निवृत्ति झाली आहे असें त्यानीं म्हटलें असते. पण 'नान्तःपादम्' असा सूत्रपाठ त्यानीं मानला असल्यामुळें भाष्यात वर सागितल्याप्रमाणे म्हटले आहे, आणि म्हणूनच या भाष्यावरील प्रदीपात 'नान्तःपादमव्यपरे इति पाठमा-श्रित्यैतदुक्तम्' असें कैयटानें म्हटले आहे व उद्योतकारानी या कैयटपङ्क्तीचे व्याख्यान करिताना 'ननु तत्र प्रकृतिभावेन साक्षादेवो-त्सर्गापवादयोर्निवृत्तिर्न त्वपवादेन बाधादुत्सर्गस्येत्यत आह—नान्त इति। भाष्ये न भवन्तीति। भ्रष्टावसरन्यायेनेति भावः।' असें उद्योतात म्हटले आहे. साराश या वरील भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, भाष्यकारानीं 'नान्तः पादम्' असा पाठ मानला आहे आणि

या सूत्राचे षष्ठाध्यायात व्याख्यान करतेवेळी तर त्यांनी 'नान्त पादमव्यपरे' असा स्पष्ट सूत्रपाठ दिला आहे हे दोन्ही भाष्यपाठ 'प्रकृत्याऽन्त पादम्' हा सूत्रपाठ मानण्याच्या विरुद्ध येतात तथापि 'इकोऽसवर्णे' ६-१-१२७ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात 'किमर्थश्चकार ? । प्रकृत्येत्येतदनुकृष्यते ।' या भाष्याचा असा अर्थ आहे कीं, 'इकोऽसवर्णे' या सूत्रात '"ह्रस्वश्च' या स्थली 'च' हें जें पद घातले आहे त्याचे प्रयोजन हें आहे की, "या पदानें 'प्रकृत्या' या पदाचे पूर्व सूत्रातून अनुकर्षण व्हावे पण 'नान्त-पादम्' या पूर्वसूत्रात जर 'न' असे पद आहे व 'प्रकृत्या' असे पदच नाही तर, 'प्रकृत्या' या पदाचे 'च' नें अनुकर्षण कसे होऊ शकणार ? या भाष्यावरून हे सिद्ध होतें की, भाष्यकारानी 'प्रकृत्याऽन्त पादम्' असा पाठ देखील मानला आहे आणि म्हणूनच दीक्षितानी मनोरमेंत 'प्रकृत्याऽन्त पादम् इति पाठोऽपि साधुरेव' असे म्हटले आहे ) पण 'नान्त पादम्' असा त्या सूत्राचा पाठ मानला तर, 'सर्वत्र विभाषा गो' (या प्रकृत सूत्रात, 'नान्त पादम्' या सूत्रामध्यें 'प्रकृत्या' या पदाचा अभाव असल्यामुळें, 'प्रकृत्या' या पदाची अनुवृत्ति होणे शक्य नाहीं व त्यामुळें) या सूत्रानें पूर्वरूप एकादेशाचाच विकल्प होईल (व इष्ट वैकल्पिक प्रकृतिभाव न होण्याची आपत्ति येईल) हे लक्षात ठेवावे (म्हणून प्रकृत सूत्रात 'प्रकृत्या' या पदाची अनुवृत्ति होण्याकरिता व वैकल्पिक प्रकृतिभाव होण्याकरिता 'प्रकृत्याऽन्त पादम्' असा सूत्रपाठ मानणं इष्ट आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे )

शब्दरत्न– इत्यनुवर्त्येति । षष्ठ्या विपरिणमय्येत्यपि बोध्यम् । प्रतिपदोक्तस्येति । एङ्ग्रहणाऽवृत्त्येति भाव , प्रतिपदोक्तपरिभाषया वा । वर्णग्रहणे तदप्रवृत्तिज्ञापकस्य तदनित्यतामात्रज्ञापकत्वम् । ध्वनित चेदम् "ओत्" सूत्रे भाष्ये । "एङ पदान्तात्" इत्यत्र तु "हलोऽनन्तरा" इत्यादिनिर्देशान्न प्रतिपदोक्तग्रहणम । अत्र च स्थानिवत्सूत्रस्य भाष्य मानमित्यन्यत्र विस्तर । पूर्वरूपमेवेति ।

पूर्वरूपमपीत्यर्थः। गोशब्दस्य यद्यत्प्राप्तं तन्नेति व्याख्यानेन मा॰न्त पाद॰ मित्यनेनैव पूर्वत्वादिक विकल्पेन निषिध्यतेत्यर्थः। तेनावादेशोऽपि न।

मनोरमेंत 'इह एङ इत्यनुवर्त्य' असे जें म्हटले आहे त्याखेरीज 'षष्ठ्या विपरिणमय्य' असे देखील म्हटले पाहिजे हे लक्षात ठेवावे (कारण अनुवृत्त पञ्चम्यन्त 'एङ' या पदाचा षष्ठीविभक्तीत विपरिणाम केल्याशिवाय ते पद सूत्रनिर्दिष्ट षष्ठ्यन्त 'गो' या पदाचे विशेषण होऊ शकत नाहीं व 'एङन्तस्य गो' असा अर्थ निष्पन्न होऊ शकत नाहीं याचे विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे) 'प्रतिपदोक्तस्य एङो ग्रहणात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे ते, 'एङ' या अनुवृत्त पदाचे दोनदा उच्चारण केल्यानें किंवा 'लक्षणप्रतिपदोक्तयो प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम्' –परि ११४– या परिभाषेनें, सिद्ध होते ('एङ' या अनुवृत्त पदाचे दोनदा उच्चारण केल्यानें 'एङन्तस्य गो एङन्तस्य सत एव'– म्हणजे एङन्त 'गो' शब्द एङन्तरूपानें कायम असल्यासच– असा अर्थ होतो त्यामुळें 'चित्रा गावो यस्य = चित्रा + जस् + गो + जस् + सु' या स्थली जरी एङन्त 'गो' शब्द आहे तरी, 'सुपो धातुप्रातिपदिकयो' सू ६५० या सूत्रानें 'जस्' या अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन व या अन्यपदार्थप्रधान बहुव्रीहिसमासात 'चित्रा' व 'गो' ही दोन्ही पदें उपसर्जनीभूत असल्यामुळें 'चित्रा' यातील 'टाप् = आ' या स्त्रीप्रत्ययाचा व एङन्त 'गो' शब्दाचा 'गोस्त्रियोरुप॰ सर्जनस्य' सू ६५६ या सूत्रानें ऱ्हस्व होऊन 'चित्रगु' असे रूप झाले असतां, मूळ एङन्त 'गो' शब्दाचे एङन्तत्व कायम राहत नसल्यामुळें व ते रूप ऱ्हस्व उकारान्त होत असल्यामुळें, तशा उकारान्त शब्दाचे सबुद्धीचे रूप केले असता, 'ऱ्हस्वस्य गुण' सू २४६ या सूत्रानें गुण होऊन जरी पुन्हा 'चित्रगो' असे एङन्त रूप होतें तरी, ते एङन्त 'गो' शब्दाचे एङन्त रूप नसून उकारान्त 'चित्रगु' शब्दाचे एङन्त रूप असल्यामुळें, तशा रूपापुढें ऱ्हस्व अकार आल्यास, प्रकृत सूत्रानें होणारा वैकल्पिक प्रकृतिभाव होत नाही परंतु 'गो + ङस् + अग्रम्'

या स्थली मूळचा एङन्त 'गो' शब्द असून 'ङस्' या अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाल्यावर देखील तो शब्द एङन्त रूपानेंच कायम राहत असल्यामुळें, तेथें प्रकृत सूत्रानें वैकल्पिक प्रकृतिभाव होतो व 'एङ.' या अनुवृत्त पदाचे द्विरुच्चारण करण्याचे हे फल आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे पुढे ते असेहि म्हणतात की, जेथें लाक्षणिक रूपाचे व तसेच प्रतिपदोक्त रूपाचे ग्रहण सभवते तेथें लाक्षणिक रूपाचे ग्रहण न करिता प्रति-पदोक्त रूपाचेच ग्रहण करावे या अर्थाची 'लक्षणप्रतिपदोक्तयो प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम्'—परि ११४—ही परिभाषा असल्यामुळें व 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली 'चित्रगो' हा शब्द 'ह्रस्वस्य गुण' या लक्षणानें—सूत्रानें—सिद्ध झालेला लाक्षणिक एङन्त शब्द असून, 'गो अग्रम्' या स्थली प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्द असल्यामुळें, प्रथम उदाहरणात प्रकृतिभाव न होता द्वितीय उदाहरणात विकल्पें-करून प्रकृतिभाव होतो. साराश 'एङ' या अनुवृत्त पदाचे द्विरुच्चारण केल्यानें किंवा लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषेचा आश्रय केल्यानें 'प्रतिपदोक्तस्य एङो ग्रहणात्' असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे ते सिद्ध होते असे शब्दरत्नकाराचे म्हणणे आहे. आतां येथें शकाकार अशी शका करतो की, जेथें सूत्रात वर्णग्रहण केले आहे तेथें लक्षणप्रतिपदोक्त परिभाषा प्रवृत्त होत नाही याचे 'आदेच उपदेशेऽशिति' सू २३७० या सूत्रातील 'उपदेशे' या पदाचे ग्रहण सीरदेवानें ज्ञापक मानले असल्यामुळें व प्रकृत सूत्रात अनुवृत्त असलेले एङ' हे पद 'ए, ओ' या वर्णांचे वाचक असल्यामुळें, प्रकृत सूत्राचे ठिकाणी लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा प्रवृत्त होऊ शकत नाहीं शका-काराच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'आदेच उपदेशे' या सूत्रात 'लिटि धातोरनभ्यासस्य' या पूर्व सूत्रातून 'धातोः' या पदाची अनुवृत्ति केल्यानें 'गोभ्याम्, नौभ्याम्' इत्यादि स्थलीं 'गो, नौ' या एजन्त शब्दापुढें जरी 'भ्याम्' हा अशित् प्रत्यय आहे तरी 'गो' व 'नौ' हे धातु नसल्यामुळें, 'आदेच' हे सूत्र

त्याना लागू शकत नाहीं परंतु 'आदेच' या सूत्रातून 'उपदेशे' हे पद गाळल्यास व 'आदेच अशिति' असे ते सूत्र पठित केल्यास, 'अचैषीत्, अनैषीत्' इत्यादि स्थलीं त्या सूत्राची प्रवृत्ति होण्याचा संभव आहे, कारण 'अ + चि + सिच् + त्, अ + नी + सिच् + त्' या स्थली 'सिचि वृद्धि परस्मैपदेषु' सू २२९७ या सूत्राने अन्त्य 'इक्'ची वृद्धि होऊन 'चि' व 'नी' या धातूची 'चै, नै' अशीं एजन्तरूपें होत असल्यामुळें आणि त्याच्यापुढें 'सिच्' हा अशित् प्रत्यय आला असल्यामुळें, 'आदेच अशिति' हे सूत्र प्रवृत्त होऊन व अन्त्य 'ऐ'चा 'आ' होऊन 'अचासीत्, अनासीत्' अशी विकृत् रूपें होण्याची आपत्ति येईल परंतु लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा असल्यामुळें आणि 'चै, नै' ही 'चि, नी' या धातूची प्रतिपदोक्त—धातुपाठात साक्षात् पठित असलेली—रूपें नसून, अन्त्य 'इक्'ची वृद्धि होऊन बनलेली लाक्षणिक रूपें असल्यामुळें 'ऐ'चा 'आ' होणे ही आपत्ति टळते व अशा रीतीनें 'आदेच' या सूत्रात 'उपदेशे' या पदाचे ग्रहण न केले तरी इष्ट रूपें लक्षणप्रतिपदोक्त-परिभाषेच्या सहायानें सिद्ध होऊ शकत असल्यामुळें, त्या सूत्रातील 'उपदेशे' या पदाचे ग्रहण व्यर्थ ठरू पाहते परंतु जेथें सूत्रात वर्णग्रहण केले आहे तेथे लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा प्रवृत्त होत नाही असे मानल्यानेंच, 'आदेच' या सूत्रात 'एच' या 'ए, ओ, ऐ, औ' या वर्णांच्या वाचक शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें, त्या सूत्रातील 'उपदेशे' हे पद चरितार्थ ठरून 'वर्णग्रहणे लक्षणप्रतिपदोक्त-परिभाषा न प्रवर्तते' याचे ज्ञापक ठरते म्हणून प्रकृत सूत्रात 'एङ' असे वर्णग्रहण केले असल्यामुळें येथें लक्षणप्रतिपदोक्त-परिभाषेची प्रवृत्ति करता येत नाही व त्यामुळें 'प्रतिपदोक्तस्य एङो ग्रहणात्' हें दीक्षिताचे म्हणणे चूक ठरते. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,) जेथें सूत्रात वर्णग्रहण केले आहे तेथें लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा प्रवृत्त होत नाही याचे ('आदेच उपदेशे' या सूत्रातील 'उपदेशे' हें पद सोडदेवानें)

जें ज्ञापक मानलें आहे ते ज्ञापक लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा अनित्य आहे एवढयाचेच ज्ञापक आहे व 'वर्णग्रहणे एषा न प्रवर्तते' याचे ज्ञापक नव्हें, व 'ओत्' सू १–१–१५ या सूत्रावरील भाष्यात हें ध्वनित केले आहे (त्या सूत्रावरील भाष्यांत 'ओत-श्च्विप्रतिषेध ' हू वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात–'ओदन्तो निपात इत्यत्र च्व्यन्तस्य प्रतिषेधो वक्तव्य । अनद अद अभवत् अदोऽभवत् । तिरोऽभवत् । न वक्तव्य । लक्षणप्रतिपदोक्तयो प्रतिपदोक्तस्यैवेत्येव न भविष्यति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'ओत्' सू १०४ या सूत्रानें ओकारान्त निपाताला जी प्रगृह्यसज्ञा होण सागितले आह ती प्रगृह्यसज्ञा च्विप्रत्ययान्त निपाताला होत नाहीं असा प्रतिषेध सागण आवश्यक आहे, कारण 'अनद अद अभवत् अदाऽभवत्, अतिर तिर अभवत् तिरोऽभवत्' या स्थली 'अदस्' व 'तिरस्' शब्दाहून 'अभूततद्भावे च्वि'–सू २११७ वरील वार्तिक–या वार्तिकानें च्विप्रत्यय होऊन 'ऊर्यादिच्विडाचश्च' सू ७६२ या सूत्रानें त्याना निपातसज्ञा होते च्विप्रत्ययातील चकार इत्सज्ञक असून व इकार उच्चारणार्थ असून 'च्वि=व्' हा अपृक्त एकाल्प्रत्यय आह व 'वेरपृक्तस्य' सू ३७५ या सूत्रानें त्या वकाराचा लाप होऊन 'अदस्+च्वि+अभवत्=अदस्+अभवत्' अशी स्थिति होते येथें 'अदस्' यातील अन्त्य सकाराच 'ससजुषो रु ' सू १६२ या सूत्रानें रुत्व होऊन व 'अतो रो ' सू १६३ या सूत्रानें 'रु' चे जागीं 'उ' होऊन आणि 'आद्गुण ' सू ६९ या सूत्रानें 'अदस्' यातील दकारापुढील अकार, व त्या अकारापुढील सकाराच रुत्व व उत्व होऊन त्या सकाराचे जागी झालेला उकार, या दाहाचे जागीं गुणरूप एकादेश होऊन 'अदस' याचे 'अदो' अस रूप होत हा ओदन्त निपात मानून 'ओत्' या सूत्रानें याला प्रगृह्यसज्ञा केली असता, 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू ९० हें सूत्र असल्यामुळें, 'अदो' व 'अभवत्' याचा 'एङ पदान्तादति'

सू. ८६ या सूत्रानें होणारा पररूप सन्धि न होता प्रकृतिभाव होईल व त्यामुळे 'अदोऽभवत्' असे इष्ट रूप सिद्ध न होता 'अदो अभवत्' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरिता 'ओतश्विप्रतिषेधः' हे वार्तिक मानले पाहिजे. परंतु पुढें भाष्यकार असे म्हणतात की, 'अदो' हा मूळचा ओदन्त निपात नसून 'अदस्' यातील अन्त्य सकाराचे रुत्व व उत्व होऊन व नंतर पूर्व 'अ' व त्या पुढील 'उ' या दोहोंचे जागी 'आद्गुणः' या लक्षणानें—सूत्रानें—गुणरूप एकादेश होऊन बनलेला लाक्षणिक शब्द असल्यामुळें व लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा असल्यामुळें, त्या परिभाषेनें 'अदो' या लाक्षणिक रूपाला 'ओत्' या सूत्रानें होणारी प्रगृह्यसंज्ञा होऊ शकत नाही व त्यामुळें वरील उदाहरणात प्रकृति-भाव न होता पूर्वरूप सन्धि होऊन 'अदोऽभवत्' असे इष्ट रूप सिद्ध होऊ शकत असल्यामुळें 'ओतश्विप्रतिषेधः' हे वार्तिक मानण्याची काही गरज नाही या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, जरी 'ओत्' या सूत्रात 'ओ' या वर्णाचे ग्रहण केले आहे तरी त्या सूत्राचे ठिकाणी भाष्यकारानी लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा प्रवृत्त केली आहे. म्हणून 'वर्णग्रहणे एषा न प्रवर्तते' हे सीरदेवाचे म्हणणे भाष्यविरुद्ध व चूक ठरते, आणि अशा रीतीनें जेथें सूत्रात वर्णग्रहण केले आहे तेथें देखील लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा वरील भाष्यान्वयें प्रवृत्त होत असल्यामुळें 'आदेच' या सूत्रातील 'उपदेशे' या पदाचे ग्रहण 'वर्णग्रहणे एषा न प्रवर्तते' याचे ज्ञापक मानता येत नाही. परि-भाषेन्दुशेखरात 'भुवश्च महाव्याहृतेः' सू. ३६०५ या सूत्रातील 'महाव्याहृतेः' या पदाचे ग्रहण लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषेच्या अनित्यत्वाचे ज्ञापक मानले आहे, त्या परिभाषेच्या अनित्यत्वामुळें ती 'आदेच' या सूत्रात प्रवृत्त न केल्यास, वर सांगितल्याप्रमाणे 'अचासीत्, अनासीत्' इत्यादि अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरिता त्या सूत्रात 'उपदेशे' या पदाचे ग्रहण केले आहे व अशा रीतीनें ते ग्रहण देखील त्या परिभाषेच्या

अनित्यत्वाचेंच ज्ञापक मानणें उचित आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'हलोऽनन्तराः संयोगः' सू. ३० इत्यादि पाणिनीय निर्देश असल्यामुळें, 'एङः पदान्तादति' सू ८६ या सूत्रात प्रतिपदोक्त 'एङ'चें ग्रहण केलें नाहीं हें सिद्ध होतें. ('हलः अनन्तराः = हल् + जस् + अनन्तराः' या स्थलीं 'जस् = अस्' यातील अन्त्य सकाराचें 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें रुत्व होऊन व 'अतो रोः' सू. १६३ या सूत्रानें त्या 'रु'चें उत्व होऊन व 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें 'अ + उ' या दोहोंचे जागीं 'ओ' असा गुणरूप एकादेश होऊन 'हलो + अनन्तराः' अशी स्थिति होते. 'हलो' या पदाच्या अन्तीं असणारा 'ओ' हा 'एङ' प्रतिपदोक्त—मूळचा—नसून, वर सांगितल्याप्रमाणें, पाणिनीय सूत्रें प्रवृत्त केल्यानें बनलेला असल्यामुळें लाक्षणिक आहे म्हणून 'एङः पदान्तादति' या सूत्रात प्रतिपदोक्त 'एङ'चें ग्रहण केलें असतें तर पाणिनीनें पूर्वरूप एकादेश करून 'हलोऽनन्तरा.' असा निर्देश केला नसता. पण तसा निर्देश केला असल्यामुळें, त्यावरून हें सिद्ध होतें कीं, 'एङ. पदान्तादति' या सूत्रात प्रतिपदोक्त 'एङ'चें ग्रहण केलें नाहीं, आणि म्हणूनच 'मुखनासिकावचनोऽनुनासिक' सू ९ इत्यादि पाणिनीय निर्देश व त्याचप्रमाणें 'हरेऽव, विष्णोऽव' इत्यादि प्रयोग देखील शुद्ध ठरतात. परतु 'सर्वत्र विभाषा गो.' या प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त 'एङ'चें ग्रहण केलें आहे व या सूत्राला लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा लागू पडते याला) 'स्थानिवदादेशः' १. १. ५६ या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे व याचें इतर ग्रन्थात—उद्योतात—विस्तृत विवरण केलें आहे. ('स्थानिवदादेश.' या सूत्रावरील भाष्यात 'गोः पूर्वणित्त्वात्त्वस्वरेषु' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात—'गो पूर्वणित्त्वात्त्वस्वरेषु प्रतिषेधो वक्तव्यः। चित्रग्वग्र, शबलग्वग्रम्। सर्वत्र विभाषा गोरिति विभाषा पूर्वत्वं प्राप्नोति। नैष दोषः। एङ इति वर्तते। तत्रानल्विधाविति प्रतिषेधो भविष्यति। एवमपि हे चित्रगो

अग्रम् अत्र प्राप्नोति ।' या भाष्याचे व्याख्यान करण्यापूर्वी हे सांगणे आवश्यक आहे की, 'सर्वत्र विभाषा गोः' या सूत्रात पूर्वरूप एकादेश होण्याचे विधान केले नसून पूर्वरूपाचा अपवाद जो प्रकृतिभाव आहे तो विकल्पेंकरून होण्याचे विधान केले आहे ज्या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होण्याचे विधान केले आहे ते वास्तविक 'एङः पदान्तादति' हें सूत्र आहे. म्हणूनच या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तीत 'प्रकृतिभावोऽनेन विधीयते, न तु पूर्वत्वम् । तस्मादेङ पदान्तादतीति पूर्वत्व प्राप्नोतीति वाच्यम् । यदा त्वप्रकृतिभावः, तदाऽस्य प्रसङ्ग उक्तः । उत्तर त्वल्विधित्वात्स्थानिवत्त्वाऽभाव ।' असे कैयटानें म्हटले आहे आणि उद्योतात तर 'अत्र वार्तिके भाष्ये च पूर्वशब्देन तदपवादो लक्ष्यते' असे स्पष्ट म्हटले आहे या वरून हे स्पष्ट होते की, वरील वार्तिकात व भाष्यात असलेल्या 'पूर्व' या शब्दाचा 'पूर्वरूप' हा अर्थ नसून 'प्रकृतिभाव' हा अर्थ आहे वरील भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'गो' या शब्दाला प्रकृतिभाव, णित्व, आत्व व स्वर हे विधि करतेवेळी 'गो' शब्दाचे जागी झालेल्या आदेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करता येत नाही असा निषेध सांगितला पाहिजे. तसा निषेध न सांगितल्यास, 'चित्रग्वग्रम्, शबलग्वग्रम्' या उदाहरणात 'गो'चे जागी 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू. ६५६ या सूत्रानें 'गु' असा जो आदेश होतो तो स्थानिवद्भावानें 'गो'च आहे असे मानले तर, वरील दोन्ही स्थळी 'सर्वत्र विभाषा गो' या सूत्रानें विकल्पेंकरून प्रकृतिभाव होण्याची आपत्ति येईल. पण भाष्यकार म्हणतात की, हा दोष येत नाही, कारण त्या सूत्रात 'एङः पदान्तादति' या पूर्व सूत्रातून 'एङ' या पदाची अनुवृत्ति आहे आणि एङन्तत्व हा अल्मात्रवृत्ति–केवळ अल्चे ठिकाणी राहणारा–धर्म असल्यामुळें व 'स्थानिवदादेश.' सू ४९ या सूत्रात 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, तसा अल्मात्रवृत्ति धर्माचा आदेशाचे ठिकाणी अतिदेश करता येत नाही आणि म्हणून 'गु' हा आदेश एङन्त 'गो' शब्दच आहे असे मानणे, म्हणजे 'एच इग्घ्रस्वादेशे' सू. ३२३

या सूत्रानें 'गो' यातील 'ओ' या अल्रूप स्थानीचे जागीं झालेला 'उ' हा आदेश 'ओ'च आहे असे मानणे, हा अल्विधि असल्यामुळें, वरील उदाहरणात स्थानिवद्भाव होऊ शकत नाही, व अशा रीतीनें त्या दोन उदाहरणात वैकल्पिक प्रकृतिभाव होण्याची आपत्तीच येत नसल्यामुळें, वैकल्पिक प्रकृतिभाव न व्हावा 'याकरिता वरील वार्तिक मानण्याची काही गरज नाही. पण पुढें भाष्यकार अशी शंका करतात की, वरील दोन उदाहरणाकरिता जरी ते वार्तिक मानण्याची आवश्यकता नसली तरी, 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात प्रकृतिभाव टाळण्याकरिता वरील वार्तिक मानणे भाग आहे, कारण या उदाहरणात 'ऱ्हस्वस्य गुणः' सू. २४२ या सूत्रानें 'चित्रगु' यातील अन्त्य उकारास गुण होऊन 'गो' हा एङन्त होत असल्यामुळें व त्यापुढें अकार असल्यामुळें, 'सर्वत्र विभाषा गो.' या सूत्रानें वैकल्पिक प्रकृतिभावाची प्राप्ति आहे. या उदाहरणात गुण होऊन 'गो' हा एङन्त शब्द उपलब्ध होत असल्यामुळें व तो स्थानिवद्भावानें एङन्त आहे असे मानण्याची काही गरज नसल्यामुळें, येथें 'अनल्विधौ' हा प्रतिषेध लागूच पडत नाहीं व त्यामुळें जी वैकल्पिक प्रकृतिभाव होण्याची आपत्ति येते ती टाळण्याकरिता वरील वार्तिक मानल्याशिवाय गत्यन्तर नाही. या शंकेचे भाष्यकारांनी वरील भाष्यात काही उत्तर दिले नाहीं. पण स्थानिवद्भावाचा निषेध करणाऱ्या वरील वार्तिकांत जीं प्रयोजनें दिलीं आहेत तीं इतर रीतीनें सहज सिद्ध होऊ शकतात असे मानून भाष्यकारांनी त्या वार्तिकाचे प्रत्याख्यान केलें आहे. वार्तिकारम्भपक्षात जीं इष्ट प्रयोजनें सिद्ध होतात तीं वार्तिकप्रत्याख्यानपक्षात सिद्ध होऊ शकत असलीं तरच वार्तिकाचे प्रत्याख्यान योग्य ठरते हें पूर्वी सांगितलेच आहे म्हणून ते प्रत्याख्यान योग्य ठरण्याकरितां हें मानणे आवश्यक आहे कीं, 'सर्वत्र विभाषा गोः' या प्रकृत सूत्रांत प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केलें आहे व तसें मानल्यानेंच, 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात प्रतिपदोक्त

एङन्त 'गो' शब्द नसून 'ऱ्हस्वस्य गुणः' या सूत्रानें बनलेला लाक्षणिक एङन्त 'गो' शब्द असल्यामुळे व जेथें सूत्रात वर्णग्रहण केले आहे तेथें देखील लक्षणप्रतिपदोक्त परिभाषा लागू पडत असल्यामुळे, त्या परिभाषान्वयें वरील उदाहरणात प्रकृतिभाव होण्याची आपत्ति येत नाही व त्यामुळें वरील प्रतिषेधक वार्तिक मानण्याची काही गरज नाही असा भाष्यकाराच्या म्हणण्याचा आशय आहे हें ज्ञापित होते. साराश त्या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केले आहे आणि म्हणूनच शब्दरत्नकारानी 'अत्र च स्थानिवत्सूत्रस्थ भाष्य मानमित्यन्यत्र विस्तरः' असे म्हटले आहे वरील भाष्याचे व्याख्यान करिताना उद्योतात 'लाक्षणिकत्वादस्य गोशब्दस्य स्वतः प्रकृतिभावाऽप्राप्तावपि स्थानिवत्वेन प्राप्नोतीति तत्प्रतिषेधो वक्तव्य इत्यर्थः । यदि तु ओत्सूत्रभाष्योक्तरीत्या वर्णग्रहणेऽपि प्रतिपदोक्त परिभाषा प्रवर्त्तते, तदेद वचन न कार्यम् । एङो लाक्षणिकत्वात् ।' असे म्हटले आहे व त्याचा अर्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्ताचे ग्रहण केले आहे आणि जेथें सूत्रात वर्णग्रहण केले आहे तेथें देखील लक्षणप्रतिपदोक्त परिभाषा लागू पडते असा वरील भाष्याचा आशय आहे ) मनोरमेंतील 'पूर्वरूपमेव' या पदाचा 'पूर्वरूपमपि' असा अर्थ आहे, म्हणजे या पदातील 'एव' हा शब्द 'अपि' या अर्थाचा वाचक आहे. ( तसे मानल्यानें 'अपि' या शब्दानें 'एचोऽयवायाव.' सू ६१ या सूत्रानें होणाऱ्या अवादेशाचे देखील ग्रहण होते. 'एव' हा शब्द 'अपि' या अर्थाचा वाचक न मानता अवधारण या अर्थाचा वाचक मानला तर, 'पूर्वरूपमेव विकल्प्येत' या मनोरमेंतील पंक्तीचा, पूर्वरूपाचाच विकल्पेंकरून निषेध होईल असा अर्थ होईल व अवादेशाचा देखील निषेध होईल असा अर्थ होणार नाही, आणि त्यामुळें 'गो अग्रम्' या उदाहरणात अवादेश होण्याची आपत्ति येईल. पण असा त्या पदाचा अर्थ करणे बरोबर नाही याचे कारण शब्दरत्नकार

पुढील पङ्क्तीत सांगतात ) 'नान्त-पादम्' असे सूत्र मानले तरी (त्यातील 'न' हे पद 'सर्वत्र विभाषा गो.' या प्रकृत सूत्रात अनुवृत्त केल्यानें प्रकृत सूत्राचा अर्थ असा होतो की, 'गो' शब्दापुढें अकार आला असता, त्या) 'गो' शब्दाला ज्या ज्या कार्यांची प्राप्ति होते ती कार्यें होत नाहीत व असे व्याख्यान केल्यानें पूर्वरूप इत्यादि कार्यांचा विकल्पेंकरून निषेध होतो व त्यामुळें अवादेश देखील होत नाहीं. (शब्दरत्नकाराचे असे म्हणणे आहे की, 'प्रकृत्याऽन्त पादम्' असे सूत्र भाष्यात पठित केले नसल्यामुळें तसे सूत्र न मानता, 'नान्त-पादम्' असा जो त्या सूत्राचा भाष्यात पाठ आहे तो मानला तरी सर्व इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकतेच, कारण 'सर्वत्र विभाषा गो' या सूत्रात 'नान्तः पादम्' या सूत्रातील 'न' हें पद अनुवृत्त केल्यानें, 'न इत्यस्य = निषेधस्य, विभाषा = विकल्पः' अशा रीतीनें व्याख्यान केले असता, निषेधाचा विकल्प होऊन 'निषेधविकल्पे विधिविकल्प फलति' या न्यायान्वयें आपोआपच विधिविकल्प सिद्ध होतो व त्यामुळें 'गो+अग्रम्' या स्थली 'एङः पदान्तादति' आणि 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्रान्वयें ज्या कार्याची प्राप्ति आहे तीं कार्यें विकल्पेंकरून होऊ शकतात असा सूत्रार्थ निष्पन्न होतो त्यामुळें 'एङ पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें होणारा पूर्वरूप एकादेश विकल्पेंकरून केल्यास 'गोऽग्रम्' असे रूप होते. पूर्वरूप एकादेश विकल्पेंकरून न केल्यास 'गो अग्रम्' असेच रूप राहते व त्यामुळें आपोआपच प्रकृतिभाव सिद्ध होतो तसेच 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्रानें वरील उदाहरणात विकल्पेंकरून अवङ् आदेश केल्यास 'गवाग्रम्' असे रूप होते व तो आदेश विकल्पेंकरून न केल्यास 'गो अग्रम्' असेच रूप राहते व त्यामुळें देखील प्रकृतिभाव आपोआपच सिद्ध होतो. वरील उदाहरणात 'एचोऽयवायाव' सू ६१ या सूत्रानें जरी अवादेशाची प्राप्ति होते तरी, 'एङ पदान्तादति' हें सूत्र 'एचोऽयवायावः' या सूत्राचे अपवादक सूत्र असल्यामुळें अवादेशाचा बाध होतो व त्यामुळें अवादेश होत नाही, आणि अशा रीतीनें

अवादेश केला नसता 'गो अग्रम्' असा प्रकृतिभाव आपोआपच सिद्ध होतो. सारांश 'प्रकृत्याऽन्त:पादम्' असा सूत्रपाठ न मानल्यानें जरी प्रकृत सूत्रात 'प्रकृत्या' या पदाची अनुवृत्ति होऊ शकत नाही तरी 'प्रकृत्या' हे पद प्रकृत सूत्रात अनुवृत्त केल्यानें जो वैकल्पिक प्रकृति-भाव सिद्ध होतो तो, 'नान्त:पादम्' असा सूत्रपाठ मानल्यानें देखील, 'गो' शब्दाला ज्या ज्या कार्यांची प्राप्ति होते त्या सर्व कार्यांचा विकल्पेकरून निषेध होत असल्यामुळें, जेव्हा तीं कार्यें विकल्पानें केली जात नाहीत तेव्हां प्रकृतिभाव आपोआपच सिद्ध होतो असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. )

मनोरमा—"अवङ् स्फोटायनस्य" अत्राप्येङन्तस्य गोरिति व्याख्येयम् । अगिति सूत्रयितुमुचितम् । विभाषानुवृत्तेः स्फोटायन-ग्रहणं पूजार्थम् । गवीति । यत्तु प्राचा गवे इति प्रत्युदाहृतम्, तन्न, सत्यप्यवङि—"अतो गुणे" इति पररूपेण रूपसिद्धेः । न च सत्यवङि ङेर्यादेशः स्यात्, स्त्रियां तु टाप् स्यादिति, वाच्यम्, सन्निपात-परिभाषया यादेशटापोः सुसमाधानत्वात् । नच साऽनित्येति वाच्यम्, तावताप्यौत्सर्गिकतत्प्रवृत्त्यैष्टसिद्धेः । गवाक्ष इति । गवामक्षीवेति विग्रहः । "अक्ष्णोऽदर्शनात्" इत्यच् समासान्तः । वातायने रूढोऽयम् । पुंस्त्वं लोकात् ।।

'अवङ् स्फोटायनस्य' सू. ८८ या सूत्रात देखील 'एङन्तस्य गो:' असेंच व्याख्यान केलें पाहिजे. (या सूत्रात 'एङः पदान्तादति' या पूर्व सूत्रातून 'एङः पदान्तात्' या पदाची व 'सर्वत्र विभाषा गो:' या पूर्व सूत्रातून 'गो:' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें 'एङन्तस्य गो:' असा अर्थ निष्पन्न होतो असा दीक्षिताच्या म्हण-ण्याचा आशय आहे.) 'अक् स्फोटायनस्य' असें सूत्र पठिन करणें, म्हणजे या सूत्रात 'अवङ्' या आदेशाचे विधान न करिता 'अक्' या आगमाचें विधान करणें, अधिक बरें झालें असतें. 'सर्वत्र विभाषा गो:' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'विभाषा' या पदाची अनुवृत्ति

होत असल्यामुळें, 'स्फोटायन' ग्रहण (विकल्पार्थक न ठरता) पूजार्थक ठरते, म्हणजे अवङादेश विकल्पेंकरून होतो याला स्फोटायनाचे मत देखील प्रमाण आहे असे सांगण्याचा पाणिनीचा आशय आहे असा अर्थ निष्पन्न होतो 'पदान्ते किम्' याचे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'गवि' असे प्रत्युदाहरण दिले आहे. परंतु त्याचे प्रक्रियाकौमुदीकारानी 'गवे' हे जें प्रत्युदाहरण दिले आहे तें योग्य नाहीं, कारण अवङादेश केला तरी 'अतो गुणे' सू १९१ या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'गवे' असेच रूप सिद्ध होते. ('गो+ङे=गो+ए' या स्थली 'गो' हें प्रातिपदिक असून पद नसल्यामुळें व अशा रीतीनें 'गो' हा शब्द पदान्तीं नसल्यामुळें, प्रकृत सूत्रानें पदान्तीं असणाऱ्या 'गो' यातील 'ओ' चे जागी जो अवङादेश होणे सांगितले आहे तो न होता, 'एचोऽयवायाव:' सू ६१ या सूत्रानें अवादेश होऊन 'गव्+ए=गवे' असे रूप सिद्ध होते असा प्रक्रियाकौमुदीकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. पण दीक्षित म्हणतात की, 'गो+ङे' या स्थली अवङादेश करून देखील 'गव+ए' अशी स्थिति झाली असता, अपदान्त 'अ' यापुढें 'ए' हा गुणसंज्ञक वर्ण आला असल्यामुळें, 'अतो गुणे' या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'गवे' असेच रूप होते. म्हणून 'पदान्ते किम्' याचे 'गवे' हे प्रत्युदाहरण न देता 'गवि' हे प्रत्युदाहरण देणे योग्य आहे. वर जें दीक्षितानीं म्हटले आहे त्यावर शंकाकार अशी शंका करतो की, 'गो+ङे' या स्थली) अवङादेश केल्यास ('गव' असे अदन्त रूप होत असल्यामुळें) 'ङेर्यः' सू. २०४ या सूत्रानें 'ङे' चे जागी 'य' हा आदेश होण्याची व तसेच स्त्रीलिङ्गाचे रूप करतेवेळीं (अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें 'गव' या अदन्त शब्दाहून स्त्रीत्वबोधक) टाप्प्रत्यय होण्याची आपत्ति येते. (या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की,) ही शंका बरोबर नाही; कारण सन्निपातपरिभाषा–परि ८६–असल्यामुळें यादेश व 'टाप्' होऊ शकत नाहीत अशा रीतीनें त्या शंकेचें सहज समाधान–

निरसन–करता येते सन्निपातपरिभाषा अनित्य आहे (व तिच्या अनित्यत्वामुळें ती 'गवे' या स्थली प्रवृत्त न केल्यास, 'गवाय' व 'गवायै' अशी अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल आणि म्हणून प्रक्रियाकौमुदीकारानी 'गवे' हे जें प्रत्युदाहरण दिले आहे ते योग्य आहे) असे शंकाकाराचे म्हणणे असल्यास, ते म्हणणे देखील बरोबर नाही; कारण परिभाषा प्रवृत्त होणे हा तिचा स्वाभाविक धर्म असल्यामुळें, जेथें ती प्रवृत्त झाल्यानें इष्ट रूपाची सिद्धि होते तेथें तिची प्रवृत्ति तिच्या अनित्यत्वामुळें रोखली जाऊ शकत नाहीं व त्यामुळें, 'गवे' हे इष्ट रूप सिद्ध होऊ शकते (जेथें अनित्य परिभाषा प्रवृत्त झाल्यास अनिष्ट रूप सिद्ध होण्याची आपत्ति येते तशा स्थली तिच्या अनित्यत्वामुळें तिची प्रवृत्ति न करणे योग्य आहे 'गो + ङे' या स्थली अवङादेश करून 'गव+ङे =गव + ए' अशी स्थिति झाली असता, 'ङेर्यः' सू २०४ या सूत्रानें 'ङे' चे जागी 'य' या आदेशाची प्राप्ति आहे. पण तो आदेश केल्यास, अवङादेशाचे निमित्त जो 'गो' हा एडन्त शब्द व त्यापुढील 'ङे = ए' हा अच् याच्या सन्निपाताचा विनाश होतो व त्या सन्निपाताचा विनाश करणाऱ्या 'ङेर्यः' या सूत्राची प्रवृत्ति होऊ शकत नाही. तसेच 'गव' या अदन्त शब्दाहून 'टाप्' प्रत्यय केल्यास व 'याडापः' सू २९० या सूत्रानें 'ङे = ए' या प्रत्ययाला 'याट् = या' हा आगम केल्यास 'गवा + यै' अशी स्थिति झाली असता, अवङादेशाचे निमित्त जो एङन्त 'गो' शब्द व त्यापुढील 'ए' हा अच् याच्या सन्निपाताचा विनाश होत असल्यामुळें व 'सन्निपातलक्षणो विधिरनिमित्तं तद्विघातस्य' ही परिभाषा असल्यामुळें, 'गव' याहून 'टाप्' प्रत्यय होऊ शकत नाही व त्यामुळें 'याडापः' या सूत्राची देखील प्रवृत्ति होऊ शकत नाही. त्यामुळें 'ङे' चे जागी यादेश न होता व तसेच 'गव' शब्दाहून टाप्प्रत्यय न होता 'अतो गुणे' हें सूत्र प्रवृत्त होऊन 'गवे' असेच रूप सिद्ध होते आणि म्हणून शंकाकारानें केलेली शंका अयोग्य

ठरते असा दिक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत) 'गवाक्ष' हें जें उदाहरण दिले आहे त्याचा 'गवामक्षीव' असा विग्रह आहे व या स्थलीं 'अक्ष्णोऽदर्शनात्' सू ९४४ या सूत्रानें समासान्त 'अच् = अ' प्रत्यय झाला आहे ('गवामक्षीव = गो + आम् + अक्षि + सु + अच्' या स्थली 'सुपो धातुप्रातिपदिकयो' सू ६५० या सूत्रानें अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'गो + अक्षि + अच्' अशी स्थिति झाली असता 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू २६२ या सूत्रानें गो' शब्दाला पदसंज्ञा होते व अशा रीतीनें 'गो' हा शब्द पदान्ती आहे असे मानता येत असल्यामुळें, त्यातील 'ओ'चे जागी प्रकृत सूत्रानें 'अवङ्=अव' आदेश होऊन 'गव + अक्षि + अच' अशी स्थिति झाल्यावर 'अकः सवर्णे दीर्घः' सू ८५ या सूत्रानें सवर्णदीर्घ होऊन 'गवाक्षि + अच्' अशी स्थिति होते येथें 'अच्' हा अजादि तद्धित प्रत्यय असल्यामुळें, 'गवाक्षि' हें अङ्ग भसंज्ञक होते व त्यामुळें 'यस्येति च' सू ३११ या सूत्रानें 'अक्षि' यातील अन्त्य इकाराचा लोप होऊन 'गवाक्ष' असे रूप सिद्ध होते) गवाक्ष' हा शब्द 'वातायन' या अर्थामध्यें रूढ आहे (लिङ्ग भाषेंत रूढ असलेल्या लौकिक प्रयोगावरून ठरत असल्यामुळें) 'गवाक्ष' हा शब्द लौकिकप्रयोगाच्या आधारें पुल्लिङ्गी ठरतो ('वातायन गवाक्ष स्यात' या अमरपाठावरून 'गवाक्ष' हा शब्द पुल्लिङ्गी आहे हे स्पष्ट होते)

शब्दरत्न—एङन्तस्य गोरिति। प्रतिपदोक्तस्यैङ इत्यपि बोध्यम। ननु "गोरवचन स्वरसिद्ध्यर्थमन्यथावङ कदा चिदन्तोदात्तोऽपि स्याद्" इत्येतत्सूत्रस्थभाष्यप्रामाण्याच्चित्रग्वग्रमित्यत्राऽवङभावोऽस्तु, तत्रागवङो रूपे विशेषस्य स्पष्टत्वात्। चित्रगोऽग्रमित्यत्रावङभावकल्पने किं मानमिति, चेन्न, उपदेशे आद्युदात्तत्वनिपातनेनावङ्न्यासस्थापनपरभाष्यस्य मानत्वात्। चित्रगोशब्द आमन्त्रिताद्युदात्तत्वेनान्तानुदात्तस्तत्राकि तस्यागमानुदात्तत्वे उभयोरनुदात्तयोरेव

श्रवणं स्यात् । आद्युदात्तत्वनिपातने तु गकाराकारस्योदात्तस्येति विशेषः स्पष्टः ।।

'अत्राप्येङन्तस्य गोरिति व्याख्येयम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्या खेरीज 'प्रतिपदोक्तस्य' असे देखील म्हटले पाहिजे, म्हणजे 'अत्रापि प्रतिपदोक्तस्य एङन्तस्य गोरिति व्याख्येयम्' अशा रीतीनें ती पक्ति पठित करावी. (अशा रीतीनें ती पक्ति पठित केल्यानें 'चित्रगु + अग्रम्' या स्थली एङन्त 'गो' शब्द नसल्यामुळें अवङादेश न होता, 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रानें यणादेश होऊन 'चित्रग्वग्रम्' असे रूप होते तसेच प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण मानले असल्यामुळें, 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली जरी एङन्त 'गो' शब्द आहे तरी तो प्रतिपदोक्त एङन्त नसून 'ह्रस्वस्य गुणः' सू २४२ या सूत्रानें गुण होऊन बनलेला लाक्षणिक एङन्त 'गो' शब्द असल्यामुळें अवङादेश होत नाही यावर शकाकार अशी शका करतो की,) 'गोरग्वचन स्वरसिद्ध्यर्थमन्यथावङ् कदाचिदन्तोदात्तोऽपि स्यात्' म्हणजे—'गवाग्रम्' या स्थलीं इष्ट स्वर सिद्ध होण्याकरिता 'गो' यातील ओकाराचे जागी 'अवङ्' आदेश न करिता त्याला 'अक्' आगम करावा, तसे न केल्यास व अवङादेश केल्यास कदाचित् अन्तोदात्त स्वर होण्याची आपत्ति येईल—असे प्रकृत सूत्रावरील भाष्यात प्रमाणभूत वचन असल्यामुळें, त्या वचनाच्या आधारे 'चित्रग्वग्रम्' या स्थलीं अवङादेश न करणे योग्य आहे, कारण अवङादेश केल्यास भिन्न प्रकारचे रूप होईल हें उघड आहे पण 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात अवङादेश करता येत नाही असे म्हणण्यास काय प्रमाण आहे ? (या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं,) ही शका बरोबर नाहीं, कारण वरील उदाहरणात अवङादेश करता येत नाही असे म्हणण्याला, प्रकृत सूत्रानें होणारा अवङादेश उपदेशकालीं निपातनानें आद्युदात्त करावा असे सांगून भाष्यकारानीं प्रकृत सूत्रावरील ज्या भाष्यांत अवङादेशपक्ष सिद्धान्तरूपानें स्थापित केला आहे तें भाष्य प्रमाण

आहे. 'हे चित्रगो' हा (संबुद्धयन्त) आमन्त्रितसंज्ञक शब्द ('आमन्त्रितस्य च' सू. ३६५३ या षष्ठाध्यायातील सूत्रान्वयें) आद्युदात्त असल्यामुळें अनुदात्तान्त आहे. त्याहून 'अक्' आगम केल्यास तो आगम ('आगमा अनुदात्ताः' या वचनान्वयें) अनुदात्त असल्यामुळें, दोहोंविहि—म्हणजे गकारापुढील अकाराचें व वकारापुढील अकाराचें—अनुदात्तरूपानें श्रवण होईल. पण निपातनानें उपदेशात आद्युदात्त मानलेला अवङादेश केल्यास, गकारापुढील अकार उदात्त होतो व अशा रीतीनें स्पष्ट फरक पडतो हें उघड आहे (प्रकृत सूत्रावरील भाष्यात 'गोरग्वचनं गवाग्रे स्वरसिद्ध्यर्थम्' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात—'गोरग्वक्तव्यः । किं प्रयोजनम् ? । गवाग्रे स्वरसिद्ध्यर्थम् । गवाग्रे स्वरसिद्धिर्यथा स्यात् । गवाग्रम् । अवङादेशे हि स्वरे दोषः । अवङादेशे हि स्वरे दोषः स्यात् । अन्तोदात्तस्यान्तर्यतोऽन्तोदात्त आदेशः प्रसज्येत । कथं पुनरयमन्तोदात्तो यदैकाच्? । व्यपदेशिवद्भावेन । यथैव तर्हि व्यपदेशिवद्भावेनाऽन्तोदात्त एवमाद्युदात्तोऽपि । तत्रान्तर्यत आद्युदात्तस्याद्युदात्त आदेशो भवति । सत्यमेवमेतत् । नत्विदं लक्षणमस्ति प्रातिपदिकस्यादिरुदात्तो भवतीति । इदं पुनरस्ति प्रातिपदिकस्याऽन्त उदात्तो भवतीति । सोऽसौ लक्षणेनाऽन्तोदात्तस्तत्रान्तर्यतोऽन्तोदात्तस्याऽन्तोदात्त आदेशः प्रसज्येत ।' या भाष्याचें व्याख्यान करण्यापूर्वी हें सांगणें आवश्यक आहे की, व्याकरणशास्त्रात अव्युत्पत्तिपक्ष व व्युत्पत्तिपक्ष असे दोन भिन्न पक्ष मानले असून अव्युत्पत्तिपक्ष हा सिद्धान्तपक्ष मानला आहे. 'उणादय. अव्युत्पन्नानि प्रातिपदिकानि' हा अव्युत्पत्तिपक्ष होय. या पक्षात 'गो' हा शब्द धातूहून उणादिप्रत्यय होऊन सिद्ध झाला आहे असें मानले जात नसून तो शब्द प्रकृतिप्रत्ययविभागरहित स्वत सिद्ध अव्युत्पन्न प्रातिपदिक आहे असें मानलें जाते. 'उणादयो व्युत्पन्नानि प्रातिपदिकानि' हा व्युत्पत्तिपक्ष होय. या पक्षात प्रत्येक प्रातिपदिक धातूहून उणादिप्रत्यय होऊन

सिद्ध झाले आहे असे मानले जातें वरील भाष्य अव्युत्पत्तिपक्षाला धरून लिहिले आहे व त्या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'गाव अग्रेयस्य तत्' असा बहुव्रीहि समास होऊन बनलेल्या 'गवाग्रम्' या शब्दाला 'बहुव्रीहौ प्रकृत्या पूर्वपदम्' सू. ३७३५ या सूत्रान्वयें इष्ट आद्युदात्त पूर्वपदप्रकृतिस्वर होण्याकरिता प्रकृत सूत्रात अवडादेशाचे विधान न करिता 'अक्' आगमाचे विधान करणे आवश्यक आहे, कारण 'अवङ्' आदेश केल्यास अनिष्टस्वरयुक्त रूप होण्याची आपत्ति येते अव्युत्पत्तिपक्षात 'गो' हें प्रातिपदिक 'फिषोऽन्त उदात्त' फिट् सू १ या सूत्रान्वयें अन्तोदात्त ठरते त्यामुळें त्या अन्तोदात्त शब्दातील 'ओ' या उदाताचे जागी 'अवङ् = अव' आदेश केला असता, 'स्थानेऽन्तरतम' सू ३९ या परिभाषान्वयें 'अव' असा अन्तोदात्त आदेश होतो, म्हणजे 'गो = ग् + अव = गव' यातील वकारापुढील अकार उदात्त होतो व त्यामुळें 'अनुदात्त पदमेकवर्जम्' सू ३६५० या सूत्रान्वयें गकारापुढील अकार अनुदात्त होतो पण तो 'गव' शब्द अन्तोदात्त न होता आद्युदात्त होणे इष्ट आहे व ज्याअर्थी अवडादेश केल्यानें 'गवाग्रम्' हा आद्युदात न होता मध्योदात्त होतो त्याअर्थी अवाङदेश केल्यानें स्वरात दोष येतो हें उघड आहे तो दोष टाळण्याकरिता 'गो' यातील 'ओ'चे जागी 'अवङ्' आदेश न करिता त्याला 'अक्' आगम करणे इष्ट आहे तसें केले असता 'गो' + अक् = गो + अ' या स्थली 'एचोऽयवायाव' सू ६१ या सूत्रानें 'गो' यातील 'ओ' या उदात्त स्थानीचे जागी होणारा 'अव' हा आदेश 'स्थानेऽन्तरतम' या परिभाषान्वयें उदात्त होतो व त्यापुढील 'अ' हा आगम 'आगमा अनुदात्ता' या वचनान्वयें अनुदात्त आहे म्हणून 'गो + अ = गव' यातील गकारापुढील अकार उदात्त होत असल्यामुळें 'गव' हा शब्द आद्युदात्त ठरतो व त्यामुळें 'गवाग्रम्' या स्थली इष्ट आद्युदात्त पूर्वपदप्रकृतिस्वर सिद्ध होण्यात कोणताहि दोष येत नाहीं. यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, 'गो' या शब्दात 'ओ' हा एकच अच्

असल्यामुळें तो शब्द अन्तोदात्त आहे असे कसें म्हणतां येते? 'व्यपदेशिवदेकस्मिन्'-परि-३०-या परिभाषान्वयें 'गो' शब्दाला अन्तोदात्त मानतां येतें असें म्हटल्यास, शंकाकार असें उत्तर देतो की, त्याच परिभाषान्वयें 'गो' हा शब्द आद्युदात्त आहे असे देखील मानतां येतें व तसें मानल्यास, 'गो' यातील 'ओ' चे जागीं होणारा 'अवङ् = अव' हा आदेश आन्तरतम्यानें आद्युदात्त होऊन 'गव' हा शब्द आद्युदात्त ठरतो व अशा रीतीनें अवङादेश केल्याने 'गवाग्रम्' या उदाहरणांत इष्ट आद्युदात्त स्वराची सिद्धि होऊं शकत असल्यामुळें, 'अक्' आगमाचें विधान करणारें वरील वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज नाही. या शंकेवर भाष्यकार असें उत्तर देतात की, 'प्रातिपदिकस्य अन्त्य. अच् उदात्तः' या अर्थाचें 'फिषोऽन्त उदात्तः' हें सूत्र आहे. पण त्याच्या उलट 'प्रातिपदिकस्य आदिरच् उदात्तः' या अर्थाचे सूत्र व्याकरणशास्त्रात कोठेंहि पठित नाहीं. म्हणून 'फिषोऽन्त उदात्तः' या सूत्रान्वयें अन्तोदात्त असणाऱ्या 'गो' या प्रातिपदिकांतील 'ओ' चे जागीं 'अवङ् = अव' आदेश केल्यास, तो आदेश आन्तरतम्यानें अन्तोदात्तच होऊं शकतो, म्हणजे गकारापुढील अकार उदात्त न होतां वकारापुढील अकार उदात्त होतो, व त्यामुळें 'गव' हा शब्द अन्तोदात्त होत असल्यामुळें, 'गवाग्रम्' या स्थली आद्युदात्त इष्ट स्वराची सिद्धि होऊं शकत नाही. म्हणून इष्टस्वरसिद्ध्यर्थ वरील वार्तिक अव्युत्पत्तिपक्षांत मानणें आवश्यक आहे येथपर्यंत अव्युत्पत्तिपक्षाचा आश्रय करून व्याख्यान केल्यावर आता व्युत्पत्तिपक्षाचा आश्रय करून भाष्यकार म्हणतातः-'यदि पुनर्गमेर्डोविधीयेत? । किं कृतं भवति?। प्रत्ययाद्युदात्तत्वे कृते आन्तर्यत आद्युदात्तस्याद्युदात्त आदेशो भविष्यति । कथं पुनरयमाद्युदात्तो यदेकाच्? । व्यपदेशिवद्भावेन । यथैव तर्हि व्यपदेशिवद्भावेनाद्युदात्त एवमन्तोदात्तोऽपि । तत्रान्तर्यतोऽन्तोदात्तस्यान्तोदात्त आदेशः प्रसज्येत । सत्यमेवमेतत् । न त्विद लक्षणमस्ति प्रत्ययस्याऽन्त उदात्तो भवतीति । इद पुनरस्ति

प्रत्ययस्यादिरुदात्तो भवतीति। सोऽसौ लक्षणेनाद्युदात्तस्तत्रान्तर्यंत आद्युदात्तस्याद्युदात्त आदेशो भविष्यति। एतदप्यादेशे नास्त्यादेशस्यादिरुदात्तो भवतीति। प्रकृतितोऽनेन स्वरो लभ्यः। प्रकृतिश्चास्य यथैवाद्युदात्तैवमन्तोदात्ताऽपि।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, व्युत्पत्तिपक्षात 'गम्' धातूहून 'गमेर्डोः' उणादि. सू. २२५ या सूत्राने 'डो' हा उणादि प्रत्यय केल्यास, तो प्रत्यय डित् असल्यामुळें 'टे.' सू. ३१६ या सूत्रानें 'अभस्यापि टेर्लोपो डिति' या वचनान्वयें 'गम्' यातील 'अम्' या 'टि' चा लोप होऊन 'गम्' + डो = ग् + ओ = गो' असे जें रूप होतें त्यात 'डो = ओ' हा प्रत्यय अन्तीं असल्यामुळें व 'आद्युदात्तश्च' सू. ३७०८ या सूत्रान्वयें तो प्रत्यय आद्युदात्त असल्यामुळें त्याचे जागी 'अवङ् = अव' आदेश केल्यास, तो आदेश देखील 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या परिभाषान्वयें आद्युदात्तच होतो, म्हणजे गकारापुढील अकार उदात्त होतो, व त्यामुळें 'गव' हा शब्द आद्युदात्त ठरून 'गवाग्रम्' या स्थली आद्युदात्त इष्ट स्वराची सिद्धि होते. पण 'गो' या शब्दात 'ओ' हा एकच अच् असल्यामुळें त्याला जसे व्यपदेशिवद्भावानें आद्युदात्त म्हणता येते तसेच अन्तोदात्त देखील म्हणता येतें व तो अन्तोदात्त मानल्यानें त्याचे जागी होणारा 'अवङ्' आदेश आन्तरतम्यानें अन्तोदात्तच होऊ शकतो अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर भाष्यकार असे उत्तर देतात कीं, 'प्रत्ययस्यादिरुदात्तो भवति' या अर्थाचे 'आद्युदात्तश्च' हें सूत्र पठित आहे. पण त्याच्या उलट 'प्रत्ययस्यान्त उदात्तो भवति' या अर्थाचे सूत्र व्याकरणशास्त्रात कोठेंहि पठित नाही. त्यामुळें 'ओ' या आद्युदात्त प्रत्ययाचे जागी होणारा अवङादेश आन्तरतम्यानें आद्युदात्तच होतो. आदेशाचा आद्य अच् उदात्त होतो याहि अर्थाचे कोणतेहि सूत्र व्याकरणशास्त्रात पठित नाही. म्हणून आदेशाला होणारा स्वर प्रकृतीच्या स्वरावरच अवलंबून आहे, म्हणजे प्रकृति जर आद्युदात्त असली तर त्या प्रकृतीचे

जागी होणारा आदेश आद्युदात्त होतो व प्रकृति जर अन्तोदात्त असली तर त्या प्रकृतीचे जागीं होणारा आदेश अन्तोदात्त होतो. परन्तु वर सांगितल्याप्रमाणे प्रकृत स्थली 'गो' ही प्रकृति जशी व्युत्पत्तिपक्षात आद्युदात्त आहे तशीच तो अव्युत्पत्तिपक्षात अन्तोदात्त देखील आहे. त्यामुळें व्युत्पत्तिपक्षात 'अवङ = अव' हा आदेश आद्युदात्त होतो आणि अव्युत्पत्तिपक्षात तो आदेश अन्तोदात्त होतो व अशा रीतीनें वरील दोन पक्षात भिन्नस्वरयुक्त रूपें होण्याची आपत्ति येते. म्हणून ती आपत्ति टाळण्याकरिता व दोन्ही पक्षात एकच प्रकारच्या स्वराचे रूप सिद्ध होण्याकरिता 'अक्' आगमाचे विधान करणारे वरील वार्तिक मानणे आवश्यक आहे. ते वार्तिक मानल्यानें दोन्ही पक्षात एकच प्रकारचे इष्ट आद्युदात्त 'गवाग्रम्' हे रूप सिद्ध होते. पण पुढें भाष्यकार म्हणतात– 'एवं तर्ह्याद्युदात्तनिपातनं करिष्यते । स निपातनस्वरः प्रकृतिस्वरस्य बाधको भविष्यति । एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्यः यथैव 'निपातनस्वरः प्रकृतिस्वरस्य बाधक एवं समासस्वरस्याऽपि । गवाक्षिय गवाक्षि ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'अक्' आगमाचे विधान करणारे वरील वार्तिक मानण्याची काही गरज नाही; कारण 'अवङ' आदेश निपातनानें आद्युदात्त केल्यानें सर्वत्र इष्टस्वरसिद्धि होऊ शकते तो आदेशाचा आद्युदात्त निपातनस्वर प्रकृतिस्वराचा बाधक होईल, म्हणजे अव्युत्पत्तिपक्षात जरी 'गो' ही प्रकृति अन्तोदात्त आहे तरी त्या प्रकृतीचे जागी होणारा 'अवङ = अव' हा आदेश आन्तरतम्यानें अन्तोदात्त न होता निपातनामुळें आद्युदात्तच होईल व त्यामुळें दोन्ही पक्षात 'गवाग्रम्' हे आद्युदात्तस्वरयुक्त इष्ट रूप सिद्ध होण्यात काही अडचण येणार नाही. पण असे आद्युदात्त स्वराचे निपातन केले तरी, 'समासस्य' सू. ३७३४ हे सूत्र 'अवङ् स्फोटायनस्य' या प्रकृत सूत्राच्या मानानें परसूत्र असल्यामुळें, 'पूर्वात्पर बलवत्' या न्यायान्वयें ते सूत्र प्रथम प्रवृत्त होऊन अन्तोदात्त स्वर झाल्यावर नंतर 'अवङ'

आदेशाचे पूर्व सूत्र प्रवृत्त होईल व त्यामुळें 'गवास्थि, गवाक्षि' या तत्पुरुषसमासात इष्ट अन्तोदात्त स्वर न होता अनिष्ट आद्युदात्त स्वर होण्याची आपत्ति येईल ही आपत्ति टाळण्याकरिता 'एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्य ', म्हणजे मूळ उपदेशातच 'अवङ्' हा आदेश आद्युदात्त होतो, असे म्हटले पाहिजे. तसे म्हणण्याचा परिणाम हा होता की, जरी अवडादेशाचे सूत्र पूर्व सूत्र आहे तरी उपदेशकालीच प्रथम आद्युदात्त अवडादेश होऊन नंतर 'समासस्य' या परसूत्रानें होणारा अन्तोदात्त स्वर होतो व त्यामुळें 'सति शिष्टस्वरबलीयस्त्वम्' या वचनान्वयें मागून होणारा अन्तोदात्त स्वर बलवत्तर ठरून 'गवास्थि, गवाक्षि' इत्यादि स्थली अन्तोदात्त स्वराची सिद्धि होते येथपर्यन्त प्रकृत सूत्रावरील भाष्याचे विवरण सपले शब्दरत्नात उपस्थित केलेली शका व त्या शकेचे शब्दरत्न-कारानी दिलेले उत्तर ही दोन्ही वरील भाष्याच्या आधारे केली असल्यामुळें, त्या भाष्यात भाष्यकारानी काय म्हटले आहे हे वाच-काच्या नीट ध्यानात यावे याकरिता त्या भाष्याचे वर विस्तृत विवरण केले आहे या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, भाष्यकाराच्या मतें उपदेशकाली आद्युदात्त 'अवङ' आदेशाचे विधान केल्यानें इष्टस्वर-सिद्धि होत असल्यामुळें, त्यानी 'अक्' आगमाचे विधान करणाऱ्या वरील वार्तिकाचे प्रत्याख्यान केले आहे व प्रकृत सूत्रात पाणिनीनें जें 'अवङ' आदेशाचे विधान केले आहे त्याचेच समर्थन केले आहे. त्यानीं एवढेंच अधिक म्हटले आहे की, तो अवडादेश निपातनानें आद्युदात्त आहे म्हणजे प्रकृत सूत्राचा एकश्रुतीनें स्वररहित पाठ करून त्यात अवङचे यत्नपूर्वक आद्युदात्त उच्चारण केले आहे, व तो आदेश उपदेशकालीच होतो असे मानावे वार्तिकारमपक्षात जी रूपें सिद्ध होतात तशीच रूपें वार्तिकप्रत्याख्यानपक्षात सिद्ध होऊ शकत असतील तरच वार्तिकप्रत्याख्यान योग्य ठरते. म्हणून वरील भाष्यावरून हा सिद्धान्त निघतो की, जेथें अवडादेश केल्यानें व 'अक्' आगम केल्यानें भिन्न प्रकारची रूपें सिद्ध होत असतील तेथें

'अवङ् स्फोटायनस्य' हें सूत्र प्रवृत्त करू नये, म्हणजे अवङादेश करू नये. या सिद्धान्ताच्या आधारावर शकाकार असे म्हणतो की, 'चित्रगु + अग्रम्' या स्थली 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू ६५६ या सूत्रानें 'गो चे जागी झालेला 'गु' हा आदेश स्थानिवद्भावानें 'गो'च आहे असें मानून 'चित्रगु' यातील ओकारस्थानिक उकाराचे जागी 'अवङ्=अव' आदेश केल्यास 'चित्रगव + अग्रम् = चित्रगवाग्रम्' असे, 'अकः सवर्णे दीर्घः' सू ८५ या सूत्रानें सवर्ण-दीर्घ होऊन, रूप सिद्ध होत असल्यामुळें व 'अक्=अ' आगम केल्यास 'चित्रगु + अ + अग्रम्' अशी स्थिति झाली असता, 'इको यणचि' सू ४७ या सूत्रानें 'चित्रगु' यातील उकाराचे जागी वकार होऊन 'चित्रग्व् + अ + अग्रम्' अशी स्थिति झाल्यावर सवर्णदीर्घ होऊन 'चित्रग्वाग्रम' असे भिन्न प्रकारचे रूप सिद्ध होत असल्यामुळें, या उदाहरणात प्रकृत सूत्राची प्रवृत्ति न करणे योग्य आहे, व तें सूत्र या उदाहरणात प्रवृत्त न व्हावें याकरिता 'एङः पदान्तादति' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'एङ' या पदाची अनुवृत्ति करून 'एङन्तस्य गो' असें जें दीक्षितानी व्याख्यान केलें आहे तसें व्याख्यान करणे उचित आहे तसें व्याख्यान केल्यानें, 'चित्रगु + अग्रम्' या स्थलीं 'गु' हा शब्द एङन्त नसून उकारान्त असल्यामुळें व पूर्वी सांगितल्याप्रमाणे एङन्तत्व या अल्मात्रवृत्तिधर्माचा उकाराचे ठिकाणी स्थानिवद्भावानें, 'अनल्विधौ' या प्रतिषेधान्वयें, अतिदेश करता येत नसल्यामुळें, येथें प्रकृत सूत्र प्रवृत्त न होता व अवङादेश न होता 'इको यणचि' या सूत्रानें यणादेश होऊन 'चित्रग्वग्रम्' असें एकच प्रकारचें रूप सिद्ध होतें म्हणून 'एङन्तस्य गो अवङ् वा स्यात्' असें प्रकृत सूत्राचें व्याख्यान करणें जरी योग्य आहे तरी, 'प्रतिपदोक्तस्य एङन्तस्य गो अवङ् वा स्यात्' असें 'प्रतिपदोक्तस्य' हा अधिक शब्द घालून व्याख्यान करण्याची काहीच गरज नाही, कारण 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात जरी प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्द नसून 'ह्रस्वस्य

गुणः' सू. २४२ या सूत्रानें बनलेला लाक्षणिक एङन्त 'गो' शब्द आहे तरी, 'गो' शब्दातील 'ओ' चे जागीं अवङादेश केल्यास किंवा त्या ओकाराला 'अक्' आगम केल्यास भिन्न प्रकारचीं रूपें सिद्ध न होता, 'चित्रगवाग्रम्' असे एकच प्रकारचे रूप सिद्ध होतें. 'अवङ् = अव' आदेश केल्यास 'चित्रगव + अग्रम् = चित्रगवाग्रम्' असे रूप होते, 'अक्' आगम केल्यास 'चित्रगो + अ + अग्रम्' अशी स्थिति झाली असता, 'एचोऽयवायाव' सू ६१ या सूत्रानें 'चित्रगो' यातील 'ओ' चे जागीं 'अव्' आदेश होऊन 'चित्रगव् + अ + अग्रम् = चित्रगव + अग्रम् = चित्रगवाग्रम्' असेच रूप होतें. म्हणून प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण करण्याची काही गरज नाही व केवळ एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण करणें योग्य आहे, मग तो एङन्त 'गो' शब्द प्रतिपदोक्त असो किंवा लाक्षणिक असो, असा शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, 'हे चित्रगो अग्रम्' या स्थळीं अवङादेश केल्यानें किंवा 'अक्' आगम केल्यानें जरी 'चित्रगवाग्रम्' असें दिसण्यात एकच प्रकारचे रूप सिद्ध होतें तरी, अवङादेश केल्यानें ज्या प्रकारचें स्वरयुक्त रूप सिद्ध होतें त्याहून भिन्न प्रकारचे स्वरयुक्त रूप 'अक्' आगम केल्यानें सिद्ध होतें व अशा रीतीनें त्या दोन प्रकारच्या रूपात स्वराचा फरक पडतो, आणि ज्या 'अक्' आगम विधायक वार्तिकाचें भाष्यकारानी प्रत्याख्यान केले आहे ते वार्तिक मुद्दाम स्वर-सिद्धयर्थ केले असल्यामुळें, वरील अवङादेशस्थापनपर भाष्यावरून हा देखील सिद्धांत निघता की, जेथें अवङादेश केल्यानें व 'अक्' आगम केल्यानें भिन्नस्वरयुक्त रूपें सिद्ध होतात तेथें देखील, वार्तिक-प्रत्याख्यान योग्य ठरण्याकरिता व वार्तिकारम्भपश्चात आणि वार्तिक-प्रत्याख्यानपश्चात सारख्याच स्वराचीं रूपें सिद्ध होण्याकरिता अवङादेश करणे अनुचित आहे व हे अनौचित्य टाळण्याकरिता प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण करणें आवश्यक

आहे. 'हे चित्रगो + अग्रम्' या स्थली 'चित्रगो' हा संबुद्धयन्त शब्द 'सामन्त्रितम्' सू. ४११ या सूत्रान्वयें आमन्त्रितसंज्ञक असल्यामुळें, 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५३ या सूत्रान्वयें आद्युदात्त आहे, म्हणजेच अनुदात्तान्त आहे. याला 'अक् = अ' आगम केल्यास तो आगम 'आगमा अनुदात्ता.' या वचनान्वयें अनुदात्त असल्यामुळें, 'चित्रगो + अ' येथें 'एचोऽयवायाव.' सू. ६१ या सूत्रानें 'यदागमा:' या परिभाषान्वयें अपदान्त ठरणाऱ्या 'गो' यातील 'ओ' या अनुदात्त स्थानीचे जागी जो 'अव्' आदेश होतो तो 'स्थानेऽन्तरतम:' सू. ३९ या सूत्रान्वयें अनुदात्त होतो, म्हणजे त्या आदेशातील 'अ' हा अच् अनुदात्त होतो, व त्या पुढील 'अक् = अ' हा आगम देखील अनुदात्त असल्यामुळें, अवादेश होऊन 'चित्रगव' असे जें रूप होतें त्यातील 'ग' व 'व' या दोहोंमधील अकार अनुदात्त होतो आणि त्यामुळें अगागमपक्षात 'चित्रगव' हा शब्द आद्युदात्त ठरतो. पण अवङादेश केल्यास, 'चित्रगो' हा संबुद्धयन्त शब्द आमन्त्रितसंज्ञक आहे तरी, 'आमन्त्रितस्य च' हे सूत्र 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्राच्या मानानें परसूत्र असल्यामुळें, 'पूर्वात्पर बलवत' या न्यायान्वयें ते परसूत्र प्रथम प्रवृत्त होऊन 'चित्रगो' हा शब्द आद्युदात्त झाल्यावर नंतर अवङादेशाचे पूर्वसूत्र प्रवृत्त होतें. तो अवङादेश' 'एव तर्ह्याद्युदात्तनिपातनं करिष्यते' या भाष्यवचनान्वयें निपातनानें आद्युदात्त मानला असल्यामुळें, 'सति शिष्टस्वरबलीयस्त्वम्' या वार्तिकान्वयें तो शिष्ट–अखेरीस झालेला–स्वर बलवत्तर ठरतो व 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू ३६५० या सूत्रान्वयें बाकीचे अच् अनुदात्त होतात व अशा रीतीनें 'चित्रगव' यातील 'ग' मधील अकार उदात्त होत असल्यामुळें 'चित्रगव' हा शब्द मध्योदात्त ठरतो सारांश 'अक्' आगम केल्यानें 'चित्रगव' हा शब्द आद्युदात्त होत असल्यामुळें व अवङादेश केल्यानें तो शब्द मध्योदात्त होत असल्यामुळें, दोन रूपाच्या स्वरात फरक पडतो हे उघड आहे. अशा रीतीनें वार्तिकारभपक्षात व

वार्तिकप्रत्याख्यानपक्षात 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली स्वरात फरक पडून भिन्न स्वरयुक्त रूपें होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरिता हें मानणे आवश्यक आहे की, प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दालाच 'अवङ् स्फोटायनस्य' या प्रकृत सूत्रान्वयें अवङादेश होतो. तसे मानले म्हणजे, वरील उदाहरणात 'चित्रगो' हा एङन्त शब्द प्रतिपदोक्त नसून 'ह्रस्वस्य गुणः' सू. २४२. या सूत्रानें बनलेला लाक्षणिक एङन्त असल्यामुळें, अवङादेशाची प्राप्तीच होत नाही व भिन्नस्वरयुक्त रूपें होण्याची आपत्ति आपोआपच टळते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न——न च गवाक्ष इत्यादावृवङ आद्युदात्तस्य श्रवणं मा भूदिति तस्योपदेशिवद्भावो वाच्य इति समासान्तोदात्तादिवामन्त्रिताद्युदात्तादपि प्रागवङ्स्वरप्रवृत्तौ पश्चादामन्त्रितस्वरे स्वरभेदाभाव इति वाच्यम्, गवाक्ष इत्यादौ समानकालप्रवृत्तिकस्य परत्वेन प्रथम प्राप्तस्य समासस्वरस्य प्रागप्रवृत्तौ उपदेशिवद्भाववचनचारितार्थ्येनाङ्गसञ्ज्ञासापेक्षबहिरङ्गगुणापेक्षयाऽन्तरङ्गत्वात्पूर्वमेवामन्त्रितस्वरप्राप्त्या तदप्रवृत्तिसंपादनेऽस्य सामर्थ्याभावात् । तद्ध्वनयन्नाह—अगितीत्यादि । यथाभ्यासे त्वाद्युदात्तनिपातनोपदेशिवद्भावयो. करणे गौरवादस्यौचित्यमिति भावः । स्थानिवत्सूत्रे भाष्येऽप्युक्त "गोः पूर्वत्वे स्थानिवत्त्वप्रतिषेधो वक्तव्यः । चित्रग्वग्रं "सर्वत्र विभाषा गोः" इति पूर्वत्वं प्राप्नोति । नैष दोषः, 'एङ' इति वर्तते, तत्र "अनल्विधौ" इति प्रतिषेधो भविष्यति । एवन्तर्हि चित्रगोऽग्रमित्यत्र प्राप्नोति" इति । अत्र पूर्वत्वशब्देन तदपवादप्रकृतिभावावङौ, विनिगमनाविरहात् । "सर्वत्र" इति "अवङ्—" इत्यस्याप्युपलक्षणम् । अत एव प्रकृतिभावे इति त्यक्त्वा पूर्वत्वे इत्युक्तं वार्तिके, भाष्ये च । चित्रगोशब्दस्य लाक्षणिकत्वे ऽपि स्थानिवत्त्वात्प्राप्तौ तत्प्रतिषेधः कृतः । एङः प्रतिपदोक्तस्याश्रयणे तु तत्र कार्यमिति लाघवमिति दिक् । टाप्स्यादिति । ङीप

उपलक्षणमिदम् । इष्टसिद्धेरिति । गवीत्यस्य स्थाने गवे इति स्यादिति तद्ग्रन्थव्याख्यानमपि न समञ्जसम् ।।

(आता शंकाकार पुन्हा अशी शंका करतो की,) 'गवाक्ष' इत्यादि उदाहरणात 'अवङ्' आदेशाच्या आद्युदात्त स्वराचे श्रवण न व्हावे, म्हणजे 'गवाक्ष' हा शब्द आद्युदात्त न व्हावा, याकरिता भाष्यकारानी 'एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्य '— म्हणजे मूळ उपदेशातच प्रथम आद्युदात्त 'अवङ्' आदेश करावा— असे वचन पठित केले आहे व त्यामुळें ('गवाक्ष' इत्यादि स्थली) 'समासस्य' सू ३७३४ या सूत्रानें होणारा अन्तोदात्त स्वर करण्यापूर्वीच 'अवङ्'च्या आद्युदात्त स्वराची जशी प्रथम प्रवृत्ति केली जाते त्याचप्रमाणे ('हे चित्रगो अग्रम्' या स्थली) 'आमन्त्रितस्य च' सू ३६५३ या सूत्रानें होणारा आद्युदात्त स्वर करण्यापूर्वीच 'अवङ्'च्या आद्युदात्त स्वराची प्रथम प्रवृत्ति केल्यानें व नंतर 'आमन्त्रितस्य च' या सूत्रानें होणारा स्वर केल्यानें ('हे चित्रगो अग्रम्' या स्थलीं 'अक्' आगम केला किंवा अवङादेश केला तरी सारखीच स्वरयुक्त रूपें सिद्ध होतात व त्याच्या) स्वरात काही फरक पडत नाही (आणि म्हणून प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण करण्याची काहीच आवश्यकता नाहीं व केवळ एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण करणे योग्य आहे या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,) ही शंका बरोबर नाही, कारण 'गवाक्ष' इत्यादि उदाहरणात 'अवङ्' चा आद्युदात्त स्वर व *'समासस्य' या सूत्रानें होणारा स्वर या दोन्ही स्वराची युगपत्* प्राप्ति होते आणि 'समासस्य' हे परसूत्र असल्यामुळें त्या पर सूत्रानें होणारा स्वर प्रथम न व्हावा (व अवङादेशाचे सूत्र पूर्वसूत्र असून देखील त्या आदेशाचा आद्युदात्त स्वर प्रथम व्हावा) याकरिता 'एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्यः' हे वचन पठित केले आहे आणि अशा रीतीनें ते भाष्यवचन ('गवाक्ष' इत्यादि उदाहरणात) चरितार्थ होत असल्यामुळें, ('हे चित्रगो + अग्रम्' या स्थलीं)

प्रत्ययामुळें होणाऱ्या अङ्गसंज्ञेची अपेक्षा करणाऱ्या बहिरङ्ग गुणाच्या मानानें 'आमन्त्रितस्य च' या सूत्रानें होणारे स्वरकार्य अन्तरङ्ग असून, त्याच्या अन्तरङ्गत्वामुळें जी त्या कार्याची प्रथम प्राप्ति होते तिचा बाध करण्याचें सामर्थ्य (इतर स्थली चरितार्थ झालेल्या 'एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्य' या) भाष्यवचनात नाहीं (आता-पर्यंत शब्दरत्नकारानी हे सिद्ध करून दाखविले आहे की, 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली 'गो' शब्दाला 'अक्' आगम केल्यास ज्या प्रकारचे स्वरयुक्त रूप सिद्ध होतें त्या प्रकारचे स्वरयुक्त रूप 'गो' शब्दाला 'अवङ्' आदेश केल्यानें सिद्ध न होता भिन्न स्वरयुक्त रूप सिद्ध होते व म्हणून वार्तिकारम्भपक्षात व वार्तिकप्रत्याख्यानपक्षात फलैक्यसिद्धि-म्हणजे एकच प्रकारची स्वरयुक्त रूपें सिद्ध-होत नसल्यामुळें, प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दालाच आद्युदात्त अवङादेश करावा व लाक्षणिक एङन्त 'गो' शब्दाला तो आदेश करू नये हे मानणे आवश्यक आहे यावर टाकाकार असे म्हणतो की 'गवाक्ष = गो + ङस् + अक्षि + सु + अच्' या तत्पुरुषसमासात 'समासस्य' सू ३७३४ या पर सूत्रानें होणारा अन्तोदात्त स्वर प्रथम केल्यास व नंतर प्रकृत पूर्व सूत्रानें होणारा आद्युदात्त 'अवङ्' आदेश केल्यास, 'सति शिष्टस्वरबलीयस्त्वम्' या वार्तिकान्वयें, अखेरीस होणारा स्वर बलवत्तर ठरून गकारापुढील अकार उदात्त होईल व त्यामुळें 'गवाक्ष' यातील बाकीचे अच् 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू ३६५० या सूत्रान्वयें अनुदात्त होऊन 'गवाक्ष' हा तत्पुरुषसामासिक शब्द आद्युदात्त होण्याची व इष्ट अन्तोदात्तस्वरयुक्त रूप सिद्ध न होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरिता 'एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्य' हें वचन भाष्यकारानीं प्रकृत सूत्रावरील भाष्यांत मुद्दाम पठित केले आहे त्या वचनान्वयें आद्युदात्त 'अवङ्' आदेश जरी पूर्व सूत्रानें प्राप्त होता तरी तो प्रथम केला जातो व 'समासस्य' हें परसूत्र असून देखील त्या सूत्रानें होणाऱ्या स्वराची नंतर प्रवृत्ति केली जाते त्यामुळें 'समासस्य' या सूत्रानें नंतर झालेला अन्तोदात्त स्वर 'सति शिष्टस्वरबलीयस्त्वम्' या

वार्तिकान्वयें बलवत्तर ठरून पूर्वी झालेला 'अवङ्' आदेशाचा आद्युदात्त स्वर 'अनुदात्त पदमेकवर्जम्' या सूत्रान्वयें अनुदात्त होतो व त्यामुळें 'गवाक्ष' या स्थलीं अन्तोदात्त इष्ट स्वराची सिद्धि होते. त्याचप्रमाणे 'हे चित्रगो अग्रम्' या स्थलीं देखील 'एवमप्यु-पदेशिवद्भावो वक्तव्य' या भाष्यवचनाचा आश्रय केल्यास, येथें देखील पूर्वसूत्रानें होणारा आद्युदात्त 'अवङ्' आदेश प्रथम केल्यानें जरी 'चित्रगव' यातील गकारापुढील अकार उदात्त होऊन तो शब्द मध्योदात्त होतो तरी, 'चित्रगो' या आमन्त्रितसंज्ञक शब्दाला 'आमन्त्रितस्य च' या पर सूत्रानें होणारा आद्युदात्त स्वर नंतर केल्यानें तो नंतर केलेला स्वर 'सति शिष्टस्वरबलीयस्त्वम्' या वचनान्वयें बलवत्तर ठरून गकारापुढील उदात्त अकार 'अनुदात्त पदमेकवर्जम्' या सूत्रान्वयें अनुदात्त होतो व त्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणे आद्युदात्त अवङादेश केल्यानें देखील 'चित्रगव' हा शब्द अखेरीस आद्युदात्त होतो त्याचप्रमाणे 'चित्रगो' यातील 'ओ' ला 'अक्' आगम केल्यानें देखील, तो आगम अनुदात्त असल्यामुळें व 'चित्रगो' हा आमन्त्रितसंज्ञक शब्द आद्युदात्त असल्या-मुळें, 'चित्रगव' हा शब्द आद्युदात्तच होतो व अशा रीतीनें आद्युदात्तअवङादेशपक्षात व 'अक्' आगमपक्षात एकच प्रकारचे 'चित्रगव' हें आद्युदात्त स्वरयुक्त रूप सिद्ध होत असल्यामुळें, म्हणजे स्वरात फरक न पडता फलैक्यसिद्धि होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचें ग्रहण करावे असे जें शब्दरत्नकारानीं म्हटले आहे तें म्हणणें योग्य ठरत नाहीं या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, 'हे चित्रगो अग्रम्' या स्थलीं 'ह्रस्वस्य अङ्गस्य अन्त्यस्य इको गुण स्यात् सम्बुद्धौ' या अर्थाच्या वाचक 'ह्रस्वस्य गुण.' सू. २४२ या अङ्गाधिकारात पठित असलेल्या सूत्रानें होणारा गुण, 'यस्मात्प्रत्ययविधि:' सू. १९९ या सूत्रान्वयें अङ्गसंज्ञा होण्यास कारणीभूत असणाऱ्या पुढील सम्बुद्धिप्रत्ययामुळें होणारा व अशा रीतीनें परनिमित्तक असल्यामुळें, बहिरङ्ग ठरतो

व ती बहिरङ्ग गुण झाल्यानंतर व 'चित्रगु' चें 'चित्रगो' असें एडन्त रूप झाल्यावर प्राप्त होणारे आद्युदात्त अवङादेशरूप कार्य अर्थातच बहिरङ्ग ठरते व त्याच्या मानानें 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५३ या परसूत्रान्वयें होणारा आद्युदात्त स्वर केवळ आमन्त्रितान्त-रूपसापेक्ष व अशा रीतीनें परनिमित्तक नसून अपरनिमित्तक असल्यामुळे अन्तरङ्ग ठरतो आणि 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' परि. ५० - ही परिभाषा असल्यामुळें, अन्तरङ्ग आमन्त्रितस्वरकार्य प्रथम झाल्यावरच नतर बहिरङ्ग गुणकार्य होऊन आद्युदात्त 'अवङ्' आदेश होऊ शकतो. त्यामुळें 'चित्रगो' हा शब्द प्रथम प्रवृत्त होणाऱ्या 'आमन्त्रितस्य च' या सूत्रान्वयें जरी आद्युदात्त होतो तरी, आद्युदात्त 'अवङ' आदेश नतर झाल्यावर 'सति शिष्टस्वरबलीय-स्त्वम्' या वार्तिकान्वयें, नतर झालेला 'अवङ्' आदेशाचा आद्युदात्त स्वर बलवत्तर ठरून 'चित्रगव' या शब्दातील गकारापुढील अकार उदात्त होतो आणि 'अनुदात्त पदमेकवर्जम्' या सूत्रान्वयें 'चित्रगव' या शब्दातील बाकीचे अच् अनुदात्त होऊन 'चित्रगव' हा शब्द मध्योदात्त ठरतो सारांश पूर्वी सांगितल्याप्रमाणे 'अक्' आगम केल्यानें 'चित्रगव' हा शब्द आद्युदात्त होत असल्यामुळें व आद्युदात्त 'अवङ्' आदेश केल्यानें तो शब्द मध्योदात्त होत असल्यामुळें, अगागमपक्षात व आद्युदात्त अवङादेशपक्षात सिद्ध होणाऱ्या रूपाच्या स्वरात फरक पडतो हे उघड आहे. म्हणून प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एडन्त 'गो' शब्दाचे ग्रहण करणे आवश्यक आहे. तसे केले म्हणजे, वरील उदाहरणात 'चित्रगो' हा एडन्त शब्द लाक्षणिक असून प्रतिपदोक्त नसल्यामुळें, प्रकृत सूत्रानें होणाऱ्या अवङादेशाची प्राप्तीच होत नाही व त्यामुळें भिन्नस्वरयुक्त रूपें होण्याची आपत्ति आपोआपच टळते. पण बहिरङ्ग गुणादेशाच्या निमित्तामुळें होणारा आद्युदात्त 'अवङ्' आदेश प्रथम न करिता 'आमन्त्रितस्य च' या सूत्रानें अन्तरङ्ग स्वरकार्य प्रथम करून नंतर तो आदेश केल्यास तसे करणे 'एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्यः' या भाष्य-

वचनाच्या विरुद्ध ठरतें असें शङ्काकारानें म्हटल्यास, त्यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'गवाक्ष' इत्यादि उदाहरणांत जेथें पूर्वसूत्रानें व परसूत्रानें प्राप्त होणाऱ्या कार्यांची युगपत् प्राप्ति आहे व तीं कार्यें सारख्याच दर्जाचीं आहेत, म्हणजे त्यांपैकीं एक अन्तरङ्ग व दुसरें बहिरङ्ग नाहीं, तशाच ठिकाणी वरील भाष्यवचन प्रवृत्त होऊं शकतें. पण ज्या स्थलीं अन्तरङ्ग व बहिरङ्ग अशा दोन कार्यांची प्राप्ति आहे तशा ठिकाणीं 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषेचा बाध करून बहिरङ्ग कार्य प्रथम करविण्याचें, 'गवाक्ष' इत्यादि ठिकाणीं चरितार्थ झालेल्या, त्या भाष्यवचनांत सामर्थ्य नाहीं. त्यामुळें 'हे चित्रगा अग्रम्' या स्थलीं अगागमपक्षांत व आद्युदात्त अवङादेश-पक्षांत जीं भिन्नस्वरयुक्त रूपें होण्याची आपत्ति येते ती टाळण्या-करितां प्रकृत सूत्रांत प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचें ग्रहण करणें आवश्यक आहे. तसें न केल्यास, आद्युदात्त 'अवङ्' आदेश करावा असें विधान करून भाष्यकारांनीं अगागमविधायक वार्तिकाचें जें प्रत्याख्यान केलें आहे तें अयोग्य ठरण्याची आपत्ति येते, कारण वर सांगितल्याप्रमाणें वार्तिकारम्भपक्षांत व वार्तिकप्रत्याख्यानपक्षांत जर एकच प्रकारचीं रूपें सिद्ध होत असतील तरच वार्तिकप्रत्याख्यान योग्य ठरतें आणि प्रकृत सूत्रांत प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचें ग्रहण केल्यानें, वरील उदाहरणांत पदान्तीं असणारा एङन्त 'गो' शब्द लाक्षणिक असल्यामुळें, 'अवङ्' आदेशाची किंवा 'अक्' आगमाची प्राप्तीच होत नाहीं व 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होऊन 'हे चित्रगोऽग्रम्' असें एकच प्रकारचें रूप सिद्ध होतें व 'चित्रगवाग्रम्' असें रूप मुळींच सिद्ध होऊं शकत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) वर जें सांगितलें आहे तें सर्व ध्वनित करण्याच्या हेतूनेंच 'अगिति सूत्र-मिदमुक्तिम्' असें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे. 'अवङ् स्फोटायनस्य' असें यथापठित सूत्र मानल्यास, 'आद्युदात्तनिपातन

करिष्यते' व 'एवमप्युपदेशिवद्भावो वक्तव्यः' हीं वचनें पठित करण्याची गरज पडत असल्यामुळें तसे सूत्र पठित करण्यात गौरव आहे आणि म्हणून 'गोरक् स्फोटायनस्य' असे सूत्र पठित करणेच योग्य आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे, (कारण तसे सूत्र पठित केल्यानें वरील दोन भाष्यवचनें पठित करण्याची गरज न पडतां सर्वत्र इष्टस्वरसिद्धि होते व प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केल्यानें 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली 'अक्' आगम होण्याची व 'हे चित्रगवाग्रम्' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति टळते.) 'स्थानिवदादेशः' १. १. ५६ या सूत्रावरील भाष्यात देखील असे म्हटले आहे की, 'गो' शब्दाला पूर्वरूप विधि करतेवेळी 'गो' शब्दाचे जागीं झालेल्या आदेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करूं नये असा प्रतिषेध सांगितला पाहिजे. 'चित्रगु + अग्रम् = चित्रग्वग्रम्' या स्थलीं ('गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू. ६५६ या सूत्रानें 'गो' चे जागीं 'गु' असा जो आदेश होतो तो स्थानिवद्भावानें 'गो'च आहे असे मानल्यास) 'सर्वत्र विभाषा गोः' सू. ८७ या सूत्रानें पूर्वरूपाची प्राप्ति होते. (पण पुढें भाष्यकार म्हणतात की, 'चित्रगु + अग्रम्' या उदाहरणात वर दाखविलेला) हा दोष येत नाही, कारण 'सर्वत्र विभाषा गोः' या सूत्रात ('एङः पदान्तादति' या पूर्व सूत्रातून) 'एङः' या पदाची अनुवृत्ति होते (व एङन्तत्व हा अल्मात्रवृत्ति–केवळ अल्‌चे ठिकाणी राहणारा–धर्म असल्यामुळें) 'अनल्विधौ' हा प्रतिषेध तेथें लागू पडतो (व त्यामुळें 'गु' हा एङन्त 'गो' शब्द आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत नाही. पण जरी 'चित्रगु + अग्रम्' या स्थलीं वर सांगितल्याप्रमाणे पूर्वरूप होण्याची आपत्ति येत नाहीं) तरी, 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात पूर्वरूप होण्याचा दोष येतोच. (या भाष्याचे विस्तृत विवरण 'सर्वत्र विभाषा गोः' या सूत्रावरील शब्दरत्नात पूर्वी केलेच आहे. म्हणून पुन्हा येथें या भाष्याचें विवरण करण्याची कांही गरज नाहीं. या भाष्यांत वास्तविक 'गोः पूर्वणित्त्वात्वस्वरेषु' असे वार्तिक पठित केले आहे.

पण त्या वार्तिकात निर्दिष्ट असलेल्या णित्व, आत्व व स्वरविधि या तीन विधींचा यथापठित प्रकृत सूत्राशीं कांहीं संबंध नसल्यामुळें, शब्दरत्नकारांनी शब्दरत्नांत तें संपूर्ण वार्तिक पठित न करितां 'गोः पूर्वत्वे स्थानिवत्त्वप्रतिषेधो वक्तव्यः' असा प्रकृत सूत्रास लागू पडणारा त्या वार्तिकाचा एकदेश पठित केला आहे. वरील भाष्यांतील 'सर्वत्र विभाषा गोः इति विभाषा पूर्वत्वं प्राप्नोति' या वचनांत निर्दिष्ट असलेल्या) 'पूर्वत्वम्' या शब्दानें ('एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें होणाऱ्या पूर्वरूप एकादेशाचें ग्रहण होत नसून वास्तविक त्या पूर्वरूप एकादेशाचे) प्रकृतिभाव व अवङादेश हे जे अपवाद आहेत त्या दोहोंचेहि ग्रहण होतें; कारण एकाचे-प्रकृतिभावाचे-ग्रहण करावें व दुसऱ्याचें-अवङादेशाचें-ग्रहण करूं नये असा भेद करण्यास कोणत्याहि युक्तीचा आधार देतां येत नाहीं. 'सर्वत्र विभाषा गोः' हें जें सूत्र वरील भाष्यांत निर्दिष्ट केलें आहे तें 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्राचें देखील उपलक्षण आहे, म्हणजे त्या सूत्रानें 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्राचें देखील ग्रहण होतें. (वरील भाष्यवचनांत 'सर्वत्र विभाषा गोः' या सूत्राचा उल्लेख केला आहे व त्या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होणें सांगितलें नसून वैकल्पिक प्रकृतिभाव होणें सांगितलें आहे, आणि जसें 'सर्वत्र विभाषा गोः' हें सूत्र 'एङः पदान्तादति' या सूत्राचें अपवादक सूत्र आहे तसेंच 'अवङ् स्फोटायनस्य' हें सूत्र देखील त्याचें अपवादक सूत्र असल्यामुळें व या द्वितीय सूत्रानें देखील पूर्वरूप एकादेश होणें सांगितलें नसून, विकल्पेंकरून अवङादेश होणें सांगितलें असल्यामुळें आणि तसेंच त्या भाष्यवचनांत 'एङः पदान्तादति' या सूत्राचा निर्देश केला नसून वरील दोन अपवादक सूत्रांपैकीं एका सूत्राचा, म्हणजे 'सर्वत्र विभाषा गोः' या सूत्राचा, स्पष्ट निर्देश केला असल्यामुळें, त्या भाष्यवचनांत निर्दिष्ट असलेल्या 'पूर्वत्व' या शब्दानें पूर्वरूप एकादेशाचें ग्रहण होत नसून त्याचे प्रकृतिभाव व अवङादेश हे जे दोन अपवाद आहेत त्यांचेंच ग्रहण

होते असे शब्दरत्नकाराचे म्हणणे आहे. यावर शकाकार अशी शका करतो की, वरील भाष्यवचनात 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्राचा उल्लेख केला नसून 'सर्वत्र विभाषा गो.' याच सूत्राचा उल्लेख केला असल्यामुळें, त्या भाष्यवचनात निर्दिष्ट असलेल्या 'पूर्वत्व' या शब्दानें केवळ प्रकृतिभावाचे ग्रहण करणे योग्य आहे व अवङादेशाचे ग्रहण करणे उचित नाही. 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात जरी 'गो' हा एङन्त शब्द लाक्षणिक आहे तरी तो एङन्त असल्यामुळें व त्याचे ठिकाणी एङन्तत्व हा धर्म आणण्याकरिता स्थानिवद्भावाची गरज नसल्यामुळें, त्या उदाहरणात प्रकृतिभावाची व तसेच अवङादेशाची जी प्राप्ति आहे त्या दोहोचेहि निवारण व्हावे असा जर भाष्यकाराच्या म्हणण्याचा आशय असता तर, त्यानी वरील भाष्यात जसा 'सर्वत्र विभाषा गोः' या सूत्राचा निर्देश केला आहे तसा 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्राचा देखील निर्देश केला असता व असे स्पष्ट म्हटले असते की, त्या उदाहरणात प्रकृतिभाव व अवङादेश न व्हावा याकरिता 'गो पूर्व' हे वार्तिक पठित करणे आवश्यक आहे. परतु त्यानी तसे म्हटले नसल्यामुळें, वरील उदाहरणात अवङादेशाचा प्रतिषेध व्हावा असे त्या भाष्यावरून सिद्ध होत नाही. या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'सर्वत्र विभाषा गो ' व 'अवङ स्फोटायनस्य' हीं दोन्ही सूत्रे 'एङ पदान्तादति' या सूत्राची अपवादक सूत्रें असल्यामुळें, जरी वरील भाष्यात त्या दोन अपवादक सूत्रापैकी एकाच सूत्राचा निर्देश केला आहे तरी तो निर्देश उपलक्षणात्मक असून त्यानें द्वितीय अपवादक सूत्राचे देखील ग्रहण होते. दोन अपवादक कार्यापैकी एका कार्याचे ग्रहण करावे व दुसऱ्याचे ग्रहण करू नये हें म्हणणे युक्तीला सोडून असल्यामुळें, 'पूर्वत्व' या शब्दानें जसे प्रकृतिभावाचे ग्रहण होते तसेच अवङादेशाचे देखील ग्रहण होते आणि त्यामुळें भाष्यकाराच्या म्हणण्याचा आशय हाच मानला पाहिजे की, 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात जी प्रकृति-

भावाची व तसेच अवङादेशाची प्राप्ति आहे त्या दोहोंचाहि प्रतिषेध करण्याकरिता वरील वार्तिक मानणे आवश्यक आहे.) आणि म्हणूनच वरील वार्तिकात व भाष्यवचनात 'प्रकृतिभाव' या शब्दाचा उपयोग न करिता 'पूर्वत्व' या शब्दाचा उपयोग केला आहे. (वरील वार्तिकात व भाष्यवचनात 'प्रकृतिभाव' हा विशेष कार्याचा बोधक शब्द उच्चारला असता तर अवङादेशविधायक 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्राचे ग्रहण न होता, केवळ प्रकृतिभावाचा विकल्प सांगणाऱ्या 'सर्वत्र विभाषा गोः' याच सूत्राचे ग्रहण झाले असते. परंतु पूर्वरूपाचे प्रकृतिभाव व अवङादेश हे जे दोन अपवाद आहेत त्या दोहोंचेहि ग्रहण होणे इष्ट असल्यामुळें, 'प्रकृतिभाव' हा विशिष्ट शब्द न वापरता वार्तिकात व भाष्यवचनात 'पूर्वत्व' हा अपवाद्य कार्याचा वाचक सामान्य शब्द वापरला आहे आणि त्यामुळें वरील भाष्यावरून हे स्पष्ट होते की, 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात जी पूर्वत्वाची, म्हणजे प्रकृतिभावाची व अवङादेशाची, प्राप्ति आहे त्या दोहोंचाहि प्रतिषेध होण्याकरिता वरील वार्तिक मानणे आवश्यक आहे. सारांश भाष्यकाराच्या मते 'हे चित्रगो अग्रम्' या उदाहरणात प्रकृतिभाव व तसेच अवङादेश हीं कार्ये होणे इष्ट नाही हें वरील विवेचनावरून स्पष्ट होते. या उदाहरणातील) 'चित्रगो' हा शब्द लाक्षणिक एङन्त आहे तरी तशा लाक्षणिक 'गो' या स्थानीचे जागी जी प्रकृतिभावाची व अवङादेशाची प्राप्ति आहे तिचा निषेध व्हावा याकरिता 'गो' पूर्वत्व' हे प्रतिषेधक वार्तिक केले आहे (पण एवढ्याकरिता ते वार्तिक मानण्यापेक्षा, त्या वार्तिकानें सिद्ध होणारे फल, प्रकृत सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केले आहे असे मानल्यानें देखील, सिद्ध होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रात) प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केले आहे हें मानण्यातच लाघव आहे; कारण तसे मानल्यानें वरील प्रतिषेधक वार्तिक पठित करण्याची गरज राहत नाहीं. (पूर्वत्व, णित्व, आत्व व स्वर हे चार विधि करतेवेळी 'गो' शब्दाचे जागीं झालेल्या आदेशाला तो 'गा'च

आहे असे स्थानिवद्भावानें मानू नये याकरितां 'गोः पूर्वणित्त्वात्व-स्वरेषु' हे प्रतिषेधक वार्तिक केले आहे. पण णित्व व आत्व या दोन विधीसंबंधानें भाष्यकार म्हणतात–'णित्त्वम् । चित्रगुः चित्रगू चित्रगव. । गोतो णित् इति णित्त्व प्राप्नोति । आत्वम् । चित्रगु पश्य । शबलगु पश्य । आ ओत इत्यात्व प्राप्नोति । नैष दोष. । तपरकरणात्सिद्धम् । तपरकरणसामर्थ्याण्णित्त्वात्वे न भविष्यतः । या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'गोतो णित्' सू. २८४ या सूत्रात 'गो' हा शब्द तपर पठित केला असल्यामुळें साक्षात् एङन्त असणाऱ्या 'गो' याचेच ग्रहण होऊ शकते आणि 'चित्रगु' या स्थली 'गो' हा शब्द अन्ती नसून 'गु' हा शब्द अन्ती असल्यामुळें, 'चित्रगु' या शब्दापुढें सर्वनामस्थानप्रत्यय आला असता, तो प्रत्यय णिद्वत् होऊच शकत नाही. तसेच 'औतोऽम्शसो.' सू. २८५ या सूत्रात 'ओ' हा तपर पठित केला असल्यामुळें व 'चित्रगु' या शब्दाच्या अन्ती उकार असून ओकार नसल्यामुळें, तशा उकारान्त शब्दापुढें 'अम्' व 'शस्' हे विभक्तिप्रत्यय आल्यास आत्वाची प्राप्तीच होत नाही आणि म्हणून णित्व व आत्व हे दोन विधि कर्तव्य असताना वरील वार्तिक मानण्याची काही गरज नाही. पूर्वत्वविधि, म्हणजे प्रकृतिभाव व अवङादेश, करतेवेळी 'गो'चे जागी झालेला 'गु' हा आदेश 'गो'च आहे असे स्थानि-वद्भावानें मानल्यास, 'चित्रगु + अग्रम्' या स्थली त्या विधीची प्राप्ति होण्याची जी आपत्ति येते तिचे निवारण भाष्यकारानीं 'अनल्विधौ' या प्रतिषेधान्वये केले आहे हे पूर्वी सांगितलेच आहे. पण 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली 'अनल्विधौ' हा प्रतिषेध लागू पडत नसल्यामुळें, त्या उदाहरणात प्रकृतिभाव व अवङादेश होण्याची आपत्ति येते; कारण त्या उदाहरणात जरी 'गो' हा एङन्त शब्द लाक्षणिक आहे तरी तो एङन्त आहेच व त्याचे ठिकाणी स्थानिवद्भावानें एङन्तत्व हा धर्म आणावा लागत नाही. तथापि 'हे चित्रगो = चित्रा + जस् + गो + जस् + सु' या स्थली

'जस्' या दोन अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें लुक् होऊन व 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू. ६५६ या सूत्रानें बहुव्रीहिसमासात उपसर्जनीभूत असलेला 'गो' हा शब्द न्हस्व होऊन 'चित्रगु' असे जें प्रातिपदिक होतें त्याचे सबुद्धीचे रूप करतेवेळी 'न्हस्वस्य गुणः' सू. २४२ या सूत्रानें गुण होऊन 'चित्रगो' असे रूप होतें या स्थली बहुव्रीहिसमासात अवयवरूपानें उपसर्जनीभूत असलेल्या मूळ 'गो'चे जागी 'गु' असा न्हस्व आदेश होऊन त्या 'गु'चे जागी पुढें 'गो' असा जो गुण केल्यानें आदेश झाला आहे तो तरी आदेशच आहे व तो आदेश स्थानिवद्भावानें मूळ 'गो'च आहे असे मानल्यास, वरील उदाहरणात जी प्रकृतिभाव व अवडादेश होण्याची आपत्ति येते ती टाळण्याकरिता स्थानिवद्भाचा निषेध करणारे वरील वार्तिक मानणे आवश्यक आहे. पण शब्दरत्नकार म्हणतात की, 'सर्वत्र विभाषा गो.' व 'अवङ् स्फोटायनस्य' या दोन सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केले आहे असे मानल्यास, पूर्वत्वविधि, म्हणजे प्रकृतिभाव व अवङादेश, कर्तव्य असताना देखील वरील प्रतिषेधक वार्तिक मानण्याची काहीं गरज नाहीं आणि हाच भाष्यकाराच्या म्हणण्याचा आशय आहे असे शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे. परन्तु 'एङ पदान्तादति' या सूत्रातून 'एङ.' या पदाची 'सर्वत्र विभाषा गोः' व 'अवङ स्फोटायनस्य' या दोन उत्तर सूत्रात अनुवृत्ति होते व त्या पूर्वसूत्रात 'एङः' या पदानें लाक्षणिक एङन्ताचे देखील ग्रहण होतें व त्यामुळेंच 'हे हरेऽव, हे विष्णोऽव' इत्यादि प्रयोग शुद्ध ठरतात हें पूर्वी सांगितलेच आहे. मग त्या सूत्रातून वरील दोन सूत्रात अनुवृत्त होणाऱ्या 'एङः' या पदानें प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचेच ग्रहण करावे व लाक्षणिक एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण करू नये हें म्हणणे कसें सयुक्तिक ठरतें ? यावर 'सर्वत्र विभाषा गोः' या सूत्रावरील शब्दरत्नात शब्दरत्नकारानी पूर्वीं उत्तर दिलेच आहे व त्या सूत्रात

प्रतिपदोक्त एङन्ताचे ग्रहण कशा रीतीनें केले जाते हें सांगितले आहे, आणि शकाकाराला देखील हे मान्य आहे कीं, त्या सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केले आहे आणि म्हणूनच 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली प्रकृतिभाव होऊ शकत नाही हे त्याला कबूल आहे मग जर त्या सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण होते तर 'अवङ् स्फोटायनस्य' या पुढील सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण का होऊ नये? भाष्य-कारानी वरील उदाहरणात जसा प्रकृतिभाव होणे अनिष्ट मानले आहे तसाच अवङादेश होणे देखील अनिष्ट मानले आहे हे पूर्वी सिद्ध करून दाखविलेच आहे म्हणून त्या उदाहरणात जी अवङादेश होण्याची आपत्ति येते ती टाळण्याकरिता, एक तर वरील प्रतिषेधक वार्तिक मानले पाहिजे किंवा 'अवङ् स्फोटायनस्य' या सूत्रात प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केले आहे असे मानले पाहिजे. पण वरील प्रतिषेधक स्वतन्त्र वार्तिक मानण्यात गौरव असून प्रकृत सूत्रातच प्रतिपदोक्त एङन्त 'गो' शब्दाचे ग्रहण केले आहे असे मानण्यात लाघव असल्यामुळे, तसेच मानणे इष्ट आहे व त्यामुळें 'हे चित्रगो अग्रम्' या स्थली अवङादेश होऊ शकतो असे जें शकाकाराचे म्हणणे आहे ते अयोग्य ठरते असा 'ननु गोरग्रवचन लाघवमिति दिक्' या शब्दरत्नात जें शब्दरत्नकारानी म्हटले आहे त्याचा भावार्थ आहे) 'स्त्रिया तु टाप् स्यात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यातील 'टाप्' हा प्रत्यय 'ङीप्' या प्रत्ययाचें उपलक्षण आहे, म्हणजे 'टाप्'नें 'ङीप्'चे ग्रहण होते ('गो' शब्दाला अवङादेश केल्यानें जरी 'गव' जसा अदन्त शब्द होतो व त्यामुळें 'अजाद्यतष्टाप्' सु ४५४ या सूत्राने 'टाप् = आ' या स्त्रीप्रत्ययाची प्राप्ति आहे तरी, 'गो' हा शब्द जातिवाचक असल्या-मुळें, 'जातेरस्त्रीविषयात्' सू. ५१८ या सूत्राने 'चित्रगव' या शब्दाहून 'ङीष्' हा स्त्रीप्रत्ययच होऊ शकतो, आणि म्हणूनच 'टाप्' प्रत्ययाने वास्तविक 'ङीप्'चे ग्रहण होते असे शब्दरत्न-

कारानी म्हटले आहे. 'पदान्ते किम्' याचे प्रक्रियाकौमुदीकारानीं 'गवे' असे जें प्रत्युदाहरण दिले आहे त्या उदाहरणासबधानें खण्डनकाराचे असे म्हणणे आहे की, प्रक्रियाकौमुदीकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'गो + ङि' या स्थली पदान्ती नसलेल्या 'गो' शब्दाचे जागी अवङादेश केल्यास, सप्तमीचे) 'गवि' असे इष्ट रूप सिद्ध न होता ('गव + इ' येथें 'आद्गुण' सू ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन) 'गवे' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल परतु हे व्याख्यान देखील समजस–शब्दार्थाला धरून–नाही (तसा जर प्रक्रियाकौमुदीकाराच्या म्हणण्याचा वास्तविक आशय असता तर, त्यानी 'पदान्ते किम्? गवे' असे आपल्या ग्रन्थात न म्हणता 'अवङादेशे कृते सति गवि इत्यस्य स्थाने गवे इति स्यात्' असे म्हटले असते म्हणून खण्डनकारानें केलेले व्याख्यान प्रक्रिया-कौमुदीत जे शब्द वापरले आहेत त्याच्या अर्थाला धरून नसल्यामुळें व त्या प्रत्युदाहरणाचे कसे तरी समर्थन करण्याकरिता केले असल्या-मुळें, ते व्याख्यान बरोबर मानता येत नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे )

मनोरमा—"इन्द्रे च" आरम्भसामर्थ्यान्नित्यमिदम्। "इन्द्रे च नित्यम्" इति पाठस्तु भाष्यासमतत्वादुपेक्षित ॥

'इन्द्रे च' सू ८९ हें सूत्र मुद्दाम आरभिले असल्यामुळें, या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें या सूत्रान्वयें होणारा अवङादेश नित्य होतो ('अवङ् स्फोटायनस्य' या पूर्वसूत्रात 'एङ पदान्तादति' या सूत्रातून 'अति' या पदाची अनुवृत्ति होत नसून 'इको यणचि' या सूत्रातून 'अचि' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, 'गो' या शब्दापुढें 'इन्द्र' हा अजादि शब्द आला असता त्या सूत्रानेंच 'गो' यातील 'ओ' चे जागी अवङादेश होऊ शकतोच पण त्या सूत्रानें होणारा अवङादेश विकल्पेंकरून होणारा असल्यामुळें, तसा विकल्पेंकरून अवङादेश न व्हावा याकरिता प्रकृत सूत्र मुद्दाम पठित

केले आहे आणि या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें या सूत्रान्वयें होणारा अवङादेश विकल्पेंकरून न होता नित्य होतो. ) 'इन्द्रे च नित्यम्' असा जो प्रकृत सूत्राचा पाठ ( काशिकावृत्तीत व प्रक्रियाकौमुदीत ) दिला आहे तो भाष्यकाराना समत नसल्यामुळें ( व भाष्यात 'इन्द्रे च' असाच सूत्रपाठ असल्यामुळें ) त्या पाठाची उपेक्षा केली आहे, म्हणजे त्या पाठाचा स्वीकार केला नाही.

**शब्दरत्न--भाष्यासंमतत्वादिति । "इन्द्रे इति सामर्थ्यान्नित्यम्" इति तदुक्तेरिति भावः ॥**

'भाष्यासम्मतत्वादुपेक्षितः' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, 'इन्द्रे इति सामर्थ्यान्नित्यम्,' म्हणजे प्रकृत सूत्रात 'इन्द्र' हे अजादि पद घालून ते सूत्र मुद्दाम पठित केले असल्यामुळें, त्या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें नित्य अवङादेश होतो, असे भाष्यकारानी म्हटले असल्यामुळे, 'इन्द्रे च नित्यम्' हा जो प्रकृत सूत्राचा पाठ दिला आहे तो स्वीकारार्ह नाही. (पण शब्दरत्नात दिलेले हे वचन सध्या उपलब्ध असलेल्या छापील भाष्यप्रतीत आढळत नाही. प्रकृत सूत्रावरील भाष्यात 'इन्द्रादौ' हे वार्तिक पठित करून भाष्यकारानी 'इन्द्रादाविति वक्तव्यम् । इहापि यथा स्यात् । गवेन्द्र यज्ञे व्रीहीति । तर्हि वक्तव्यम् ? । न वक्तव्यम् । नैव विज्ञायते इन्द्रेऽचीति । कथं तर्हि ? । अचि भवति । कतरस्मिन् ? । इन्द्रेऽचीति।' एवढेंच त्या भाष्यात म्हटले आहे. कदाचित् शब्दरत्नकाराजवळ असलेल्या भाष्यप्रतींत किंवा इतर सूत्रावरील भाष्यात हे वचन असेल. )

## ॥ अथ प्रकृतिभावः ॥

**मनोरमा--एहि कृष्णेति । "दूराद्धूते च" इति प्लुतः । यत्तु कृष्ण ३ एहीति प्राचोक्तं तन्न, "दूराद्धूते च" इत्यादौ "वाक्यस्य टेः-" इत्यधिकारात् ॥**

('प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू. ९० या सूत्रावरील कौमुदीत प्लुताचे) 'एहि कृष्ण ३' हे जें उदाहरण दिले आहे त्या उदाहरणात 'कृष्ण' यातील अन्त्य अकार 'दूराद्धूते च' सू. ९५ या सूत्रानें प्लुत झाला आहे. या सूत्रावरील प्रक्रियाकौमुदीत 'कृष्ण ३ एहि' हे जें प्लुताचे उदाहरण दिले आहे तें बरोबर नाही, कारण 'दूराद्धूते च' इत्यादि सूत्रात 'वाक्यस्य टेः प्लुत उदात्त.' सू. ९३ या अधिकारसूत्राची अनुवृत्ति आहे, म्हणजे त्या अधिकारात 'दूराद्धूते च' इत्यादि सूत्रें पठित आहेत (त्यामुळें 'कृष्ण एहि' या वाक्यात 'कृष्ण' हा शब्द वाक्याच्या शेवटीं नसल्यामुळें त्याचा अन्त्य अकार प्लुत होऊ शकत नाहीं व त्यामुळें येथें प्रकृत सूत्रानें प्रकृतिभाव होऊ शकत नाहीं व 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होऊन 'कृष्णैहि' असा संधियुक्त प्रयोग होऊ शकतो म्हणून 'एहि कृष्ण ३ अत्र गौश्चरति' हेच कौमुदींत दिलेले उदाहरण योग्य आहे, कारण या उदाहरणात 'कृष्ण' हे सबुद्ध्यन्त पद 'एहि कृष्ण' या वाक्याच्या शेवटी असल्यामुळें, त्याचा टि-अन्त्य अकार—प्लुत होतो व त्यामुळें प्रकृत सूत्रानें प्रकृतिभाव होतो आणि 'अकः सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रानें होणारा सवर्णदीर्घरूप एकादेश होत नाहीं.)

शब्दरत्न—प्लुत इति । प्रकृतिभाववचनसामर्थ्यादेव प्लुतस्य तत्र नासिद्धत्वमिति भावः ॥

'इति प्लुतः' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, (जरी प्लुताचे विधान करणारी सूत्रें त्रिपादीत पठित आहेत व 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रान्वयें सपादसप्ताध्यायीच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध आहे तरी, 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या प्रकृत सापादिक सूत्रात प्लुताचा अनुवाद करून त्यापुढें अच् आला असता नित्य प्रकृतिभाव होण्याचे विधान केले असल्यामुळें, त्या) प्रकृतिभावाचे विधान करणाऱ्या वचनाच्या सामर्थ्यानें प्रकृत

सापादिक सूत्राच्या दृष्टीनें प्लुत (त्रैपादिक सूत्रानी होणारा असून देखील) असिद्ध ठरत नाही. (जर प्लुत असिद्ध ठरला असता तर 'एहि कृष्ण ३ अत्र गौश्चरति' या कौमुदीत दिलेल्या उदाहरणात इष्ट प्रकृतिभाव न होता संधि होऊन 'अकः सवर्णे दीर्घः' सू ८५ या सूत्रानें सवर्ण दीर्घ होण्याची आपत्ति आली असती.)

**मनोरमा--चक्रयत्रेति । इह "स्कोः-" इति कलोपो न, यणः कार्यकालपक्षे बहिरङ्गपरिभाषयाऽसिद्धत्वात्, स्थानिवद्भावाच्च । "पूर्वत्रासिद्धीये न-" इति तु नास्ति, "तस्य दोषः संयोगादिलोप-" इत्याद्युक्तेः ॥**

('इकोऽसवर्णे शाकल्यस्य ह्रस्वश्च' सू ९१ या सूत्रावरील कौमुदीत 'चक्रि अत्र चक्र्यत्र' असे जें उदाहरण दिले आहे त्या उदाहरणातील) 'चक्र्यत्र' या स्थली 'स्कोः संयोगाद्योरन्ते च' सू. ३८० या सूत्रानें 'क्र्य्' या संयोगातील आद्य ककाराचा लोप होत नाहीं; कारण कार्यकालपक्षात बहिरङ्गपरिभाषान्वयें यणादेश *असिद्ध ठरतो व दुसरे असे की, येथें स्थानिवद्भाव होत असल्यामुळें* संयोगाच्या आदि असणाऱ्या ककाराचा लोप होत नाहीं. ('चक्री + अत्र' या स्थलीं 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रानें 'चक्री' यातील अन्त्य ईकाराचे जागी यकार होऊन 'चक्र्य्+अत्र' अशी स्थिति होते. येथें 'क्र्य्' हा संयोग पूर्वपदाच्या अन्ती असून त्या संयोगात ककार हा आद्य वर्ण आहे म्हणून 'स्कोः संयोगाद्योः' या सूत्रानें त्या ककाराचा लोप पावतो पण तो लोप होत नाही याचे कारण दीक्षित असे देतात की, यण्कार्य हे 'चक्री' व 'अत्र' या दोन पदाच्या आश्रयानें होणारे कार्य असून पुढें असणाऱ्या 'अ' या अचाच्या निमित्तामुळें होणारे कार्य आहे. पण संयोगादिलोपकार्य 'चक्र्य्' या एकच पदाच्या आश्रयानें होणारे कार्य असून त्या कार्याला पुढें निमित्त असण्याची अपेक्षा नाही व 'क्र्य्' हा संयोग पदान्ती आहे. एवढयाच निमित्ताची संयोगादिककारलोपाला अपेक्षा

आहे. सारांश संयोगादिलोपकार्य एकपदाश्रित व अपरनिमित्तक असून यण्कार्य पदद्वयाश्रित व परनिमित्तक असल्यामुळें, संयोगादिलोपकार्य यण्कार्याच्या मानानें अन्तरङ्ग ठरतें व यण्कार्य बहिरङ्ग ठरतें, आणि अन्तरङ्ग संयोगादिलोपकार्य करतेवेळी पूर्वी झालेले बहिरङ्ग यण्कार्य कार्यकालपक्षांत 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे'—परि ५०—या बहिरङ्गपरिभाषान्वयें असिद्ध ठरत असल्यामुळें व अशा रीतीनें यण्कार्य झालेच नाही व 'चक्री+अत्र' अशीच स्थिति आहे आणि पदान्ती 'क्र्य्' असा संयोगच नाही असे मानावे लागत असल्यामुळें, कार्यकालपक्षांत संयोगादि ककाराचा लोप होत नाही. पण यथोद्देशपक्ष मानल्यास, त्या पक्षांत 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' या सापादिक परिभाषेच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध असल्यामुळें, म्हणजे त्रिपादीचा अभाव असल्यामुळें व अशा रीतीनें त्या पक्षांत त्या परिभाषेची त्रिपादीत उपस्थिति होणे शक्य नसल्यामुळें, 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ या वचनान्वयें सापादिक यण्कार्य प्रथम केल्यावर जेव्हा नंतर त्रैपादिक संयोगादिलोपकार्याची प्राप्ति होते तेव्हा 'क्र्य्' या संयोगातील आद्य ककाराचा लोप कां होऊ नये अशी कोणी शंका केल्यास त्या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात कीं, 'चक्री अत्र' या स्थली 'इको यणचि' या सूत्रानें 'ई' चे जागी जो यकार होतो तो संयोगादिलोपरूप पूर्वविधि करतेवेळीं ईकारच आहे असे 'अचः परस्मिन् पूर्वविधौ' सू. ५० या सूत्रान्वयें स्थानिवद्भावानें मानावे लागत असल्यामुळें, 'चक्र्य्' असे रूप नसून 'चक्री' असेच रूप आहे असे मानणे भाग पडतें त्यामुळें पदान्ती ककारादिसंयोग नाही असे मानावे लागत असल्यामुळें, यथोद्देशपक्षांत देखील ककाराचा लोप होत नाही यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, संयोगादिलोप हें त्रैपादिक कार्य असल्यामुळे व त्रैपादिक कार्य करतेवेळी अजादेशाचे ठिकाणीं, 'पूर्वत्रासिद्धीये न स्थानिवत्' या वार्तिकान्वयें स्थानिवद्भाव करता येत नसल्यामुळें, 'क्र्य्' या संयोगातील आद्य ककाराचा लोप पावतो.

या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, संयोगादिलोप, लत्व व णत्व ही तीन त्रैपादिक कार्यं करतेवेळी वरील प्रतिषेधक वार्तिक लागू पडत नाही या अर्थाचे) 'तस्य दोषः संयोगादिलोपलत्वणत्वेषु' हे वचन असल्यामुळें, प्रकृत स्थली 'पूर्वत्रासिद्धीये न स्थानिवत्' या वार्तिकाची प्रवृत्ति करता येत नाही. (त्यामुळें ईकाराचे जागी झालेला यकार ईकारच आहे असे स्थानिवद्भावानें मानावे लागत असल्यामुळें व अशा रीतीनें पदाच्या अन्ती ककारादिसंयोग नाही असे मानणे भाग पडत असल्यामुळें, वरील उदाहरणात ककाराचा लोप होत नाही. दीक्षिताच्या मते कार्यकालपक्षात बहिरङ्गपरिभाषा–परि. ५०–त्रिपादींत उपस्थित होते पण शब्दरत्नकाराच्या मते त्या पक्षात देखील ती परिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नाही, व हे मत मानल्यास, कार्यकाल-पक्षात देखील संयोगादिककाराचा लोप होत नाही याला 'स्थानिव-त्वाच्च' हा जो द्वितीय हेतु मनोरमेंत दिला आहे तोच कारण मानले पाहिजे.)

**मनोरमा––"दूराद्धूते च" हूतमाह्वानं तच्च सम्बोधन-मात्रोपलक्षणमित्यभिप्रेत्याह–दूरात्संबोधन इति । उपलक्षणतया व्याख्यानस्य फलमुदाहरति–सक्तून् पिबेत्यादि ॥**

'दूराद्धूते च' सू ९५ या सूत्रातील 'हूत' हा शब्द आव्हान–हाका मारणे किंवा बोलावणे–या अर्थाचा वाचक आहे तरी तो केवळ संबोधनाचे उपलक्षण आहे, म्हणजे तो केवळ संबोधनाचा वाचक आहे, हा आशय मनात धरून या सूत्रावरील कौमुदीत 'दूरात्सम्बोधने यद्वाक्यम्' असे व्याख्यान केले आहे. 'हूत' या शब्दाचा उपलक्षणानें 'संबोधन' असा अर्थ होतो असे जें व्याख्यान कौमुदीत केले आहे त्या व्याख्यानानें निष्पन्न होणाऱ्या फलाचे 'सक्तून्पिब देवदत्त ३' हे उदाहरण प्रकृत सूत्रावरील कौमुदीत दिले आहे. (या उदाहरणात 'देवदत्त' हा शब्द वाक्याच्या शेवटी

असून सबुद्धयन्त असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें त्याचा 'टि'–अन्त्य अकार–प्लुत होतो. बालमनोरमेंत प्रकृत सूत्रातील 'हूत' या पदाचा 'यत्र प्रदेशे स्थितस्य प्रयत्नोच्चारित शब्द बोध्यमानो न शृणोति किं त्वधिकं प्रयत्नमपेक्षते तद्दूर हूतमाह्वान, भावे क्त.' असा अर्थ दिला आहे व पुढें असे म्हटले आहे की, 'यदि तु आह्वानमेवात्र विवक्षित स्यात् तर्हि एहि देवदत्तेत्यादौ आह्वानवाचकपदे सत्येव स्यात्। सबोधनपरत्वे तु तदन्यत्रापि भवतीत्यभिप्रेत्यो-दाहरति–सक्तूनिति।' या विषयाचे अधिक विवरण शब्दरत्नात करण्यात येईल.)

शब्दरत्न––उपलक्षणेति। एव चासत्यप्याह्वाने भवतीति भावः।

मनोरमेंत 'हूतमाह्वान तच्च सम्बोधनमात्रोपलक्षणम्' असे म्हटले असल्यामुळें, जेथें सबोधनाचा प्रयोग करून आह्वान केलें नसले तेथें देखील प्लुत होतो. ('सक्तून् पिब देवदत्त ३' या कौमुदीत दिलेल्या उदाहरणात देवदत्ताला आह्वान करून जवळ बोलाविले नसून केवळ 'सक्तून् पिब' असे त्याला सबोधित करून म्हटले आहे असे असून देखील, 'देवदत्त' या सबोधनातील अन्त्य अकार प्लुत होतो. प्रकृत सूत्रात निर्दिष्ट असलेल्या 'हूत' या शब्दाचा 'आह्वान' असा अर्थ विवक्षित असता तर, 'एहि देवदत्त' इत्यादि वाक्यात जसे 'एहि' हे आह्वानवाचक क्रियापद आहे तशा प्रकारचे आह्वानवाचक पद वाक्यात असतानाच प्लुत झाला असता. पण 'हूत' हा शब्द केवळ सबोधनाचे उपलक्षण असल्यामुळें, वाक्यात तसे आह्वानवाचक पद नसले तरी, वाक्याच्या अन्तीं असलेल्या संबोधनाचा टि प्लुत होतो.)

मनोरमा––"गुरोरनृतः" अपिशब्दो गुरोरगुरोश्च टेः प्लुतार्थः। देवदत्तेति। अस्यंहीत्यादिः। एवमग्रेऽपि। सर्वः प्लुत इति। तथा च "अग्नीत्प्रेषणे परस्य च" इति सूत्रे भाष्यम्– "सर्वः प्लुतः साहसमनिच्छताऽपि विभाषा कर्तव्यः" इति।

साहसम् = शास्त्रत्यागः, तदनिच्छताऽपि – शास्त्रमनुरुन्धानेनापीत्यर्थं इति हरदत्तः । वैकल्पिकेष्वनुष्ठानक्लेशं धर्माधिक्यफलकमप्यशक्तत्वादनिच्छतेत्यर्थं इत्यन्ये । एतेन "द्वैपायनो विरहकातर आजुहाव पुत्रेति" इति भागवतं व्याख्यातम्, प्लुतस्य वैकल्पिकत्वात् । किं चेह पुत्रशब्दस्य वाक्यान्तत्वं नास्तीत्यपि सुवचम्, आख्यात॰ प्राग्वर्तिनोऽप्यनुकरणसम्भवात् । अपि च अस्तु प्लुतः, प्रकृतिभावस्तु वैकल्पिकत्वान्मास्तु । तथा च "ई चाक्रवर्मणस्य" इति सूत्रे भाष्यम्– "ईग्रहणेन नार्थः वशा इय वशेयमिति" । प्लुतप्रकृतिभाव सर्वोपि चाक्रवर्मणमते नास्तीति भावः । अपि च इह प्रकृतिभावोऽपि दुर्लभ एव, "अप्लुतवदुपस्थिते" इति सूत्रात् । उपस्थित नामावैदिक इतिशब्दस्तस्मिन्परे प्लुतोऽप्लुतवत्स्यादिति हि तस्यार्थः । एवं चतुर्थापि निर्वाहे स्पष्टे आर्षप्रयोग इति श्रीधरोक्तिनादर्तव्या ॥

'गुरोरनृतोऽनन्त्यस्यापि' सू ९७ या सूत्रात 'अपि' शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें, वाक्यातील 'टि'–अन्त्य अच्–गुरु असला किंवा लघु असला तरी तो प्लुत होतो, म्हणजे 'अन्त्यस्य तु गुरोरगुरोश्च प्लुतः स्यात्' असा अर्थ होतो या सूत्रावरील कौमुदीत 'देवदत्त' हे जें उदाहरण दिले आहे त्यापूर्वी 'एहि' हे क्रियापद अध्याहृत आहे (कारण तसे न मानल्यास, 'देवदत्त' या उदाहरणात क्रियापद नसल्यामुळें, 'एकतिङ् वाक्यम्' या वचनान्वयें होणारी वाक्यसंज्ञा 'देवदत्त' या सुटया शब्दाला होणार नाही व त्यामुळें 'वाक्यस्य टे' या अधिकारात पठित असलेल्या प्रकृत सूत्रानें 'देवदत्त' यात अन्ती नसणारे गुरु अच् व अन्त्य लघु अच् पर्यायानें प्लुत होणार नाहीत तसेच कौमुदीत प्रकृत प्रकरणात) पुढें दिलेल्या उदाहरणात देखील 'एहि' हे क्रियापद त्या उदाहरणापूर्वी अध्याहृत आहे असे समजावे. प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'तेन सर्वः प्लुतो विकल्प्यते' असे जें म्हटले आहे त्याला 'अग्नीत्प्रेषणे परस्य च' सू ८. २. ९२. या सूत्रावरील भाष्यातील 'सर्व. प्लुत साहसमनिच्छताऽपि विभाषा

कर्तव्यः' हे वचन प्रमाण आहे. (वास्तविक त्या भाष्यात 'सर्व एव प्लुतः साहसमनिच्छता विभाषा वक्तव्यः' असे वार्तिक पठित केले आहे. या भाष्यवचनातील) 'साहसम्' या पदाचा 'शास्त्रत्यागः,' व 'तदनिच्छताऽपि' याचा 'शास्त्रमनुरुन्धानेनापि', म्हणजे शास्त्र पाळणाऱ्यानें देखील, असा अर्थ आहे असे हरदत्तानें म्हटले आहे. इतर वैयाकरण 'अनिच्छता' या पदाचा असा अर्थ करतात की, वैकल्पिक विधीचे अनुष्ठान केल्यानें जे क्लेश होतात त्यामुळें अधिक पुण्य लाभतें तरी, अशक्तपणामुळें ज्याला तसे क्लेश करून अधिक पुण्य प्राप्त करून घेण्याची इच्छा नाहीं त्यानें प्लुताचे उच्चारण न केले तरी चालतें. (सारांश हरदत्ताच्या म्हणण्याप्रमाणें वरील भाष्यवचनाचा असा अर्थ होतो की, पाणिनीय शास्त्राच्या अनुरोधानें वागणाऱ्या पुरुषानें देखील प्लुत सर्वत्र विकल्पेंकरून उच्चारावा—म्हणजे प्लुताचे उच्चारण करणे किंवा न करणे हे त्याच्या इच्छेवर अवलंबून आहे व त्यानें वाटल्यास प्लुत उच्चारावा, न वाटल्यास प्लुत उच्चारू नये, आणि त्यानें प्लुताचे उच्चारण न केल्यानें त्याचे पदरीं काही दोष येत नाहीं—आणि कैयटानें देखील वरील भाष्य-वचनाचा 'शास्त्रत्यागः साहसम्। तेन शास्त्रमत्यजताऽभियुक्त-स्मरणात्सर्वः प्लुतो विभाषा विधेय इत्यर्थः।' असाच अर्थ केला आहे. हरदत्ताच्या व कैयटाच्या व्याख्यानावरून हें स्पष्ट होतें की, सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो. पण इतर वैयाकरण त्या भाष्यवचनाचा असा अर्थ करतात की, जरी प्लुताचे उच्चारण केल्यानें अधिक पुण्य लाभते तरी, ज्याला अशक्तपणामुळें प्लुताचे उच्चारण करण्याचे सामर्थ्य नाहीं त्यानें प्लुत उच्चारला नसता त्याला काही दोष पडत नाही. हा द्वितीय अर्थ मानल्यास, ज्याला प्लुताचे उच्चारण करण्याचे सामर्थ्य आहे त्यानें प्लुत उच्चारलाच पाहिजे असा अर्थ निष्पन्न होऊन विकल्पाची सिद्धि होत नाहीं. म्हणून भाष्यवचनाचा जो प्रथम अर्थ केला आहे तोच मानणें योग्य आहे) प्लुतविधि वैकल्पिक असल्यामुळें, 'द्वैपायनो विरहकातर आजुहाव पुत्रेति' या भागवत-

वचनातील 'पुत्रेति' हा प्रयोग साधु ठरतो. (या भागवतातील श्लोकावर टीका करिताना श्रीधरानें जें म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं 'पुत्र' हा शब्द संबोधन असल्यामुळें, 'दूराद्धूते च' सू. ९५ या सूत्रान्वयें त्याचा अन्त्य अच् प्लुत होतो व त्यामुळें 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू. ९० या सूत्रानें 'पुत्र इति' असा प्रकृतिभाव व्हावयास पाहिजे होता पण तसा प्रकृतिभाव न करिता 'आद्गुणः' सू ६९ या सूत्रानें संधि करून 'पुत्रेति' असा जो प्रयोग केला आहे तो आर्ष आहे. परंतु दीक्षित म्हणतात की, प्लुतविधि वैकल्पिक असल्यामुळें, 'पुत्र' यातील अन्त्य अकार प्लुत न मानल्यानें संधि करण्यात काही प्रत्यवाय येत नाही व 'पुत्रेति' हा प्रयोग साधु ठरतो आणि म्हणून तो आर्ष प्रयोग आहे असे जें श्रीधरानें म्हटले आहे ते म्हणणें योग्य ठरत नाही.) दुसरे असे कीं, वरील भागवतातील श्लोकात 'पुत्र' हा शब्द वाक्याच्या शेवटी नाही असे देखील म्हणणें योग्य ठरते, कारण ('पुत्र एहि' या वाक्यातील 'एहि' या) क्रियापदाच्या पूर्वी असणाऱ्या 'पुत्र' या शब्दाचे वरील श्लोकात अनुकरण केले आहे असा देखील संभव आहे (व 'पुत्र' हा शब्द अनुकरण मानल्यानें अनुकरण हे अनुकार्याच्या अर्थाचे केवळ बोधक असल्यामुळें त्याला संबोधनसंज्ञा होऊ शकत नाहीं व त्यामुळे त्या शब्दातील अन्त्य अचाला 'दूराद्धूते च' या सूत्रानें होणारा प्लुत होत नाही) तिसरे असे कीं, 'पुत्र' यातील अन्त्य अच् प्लुत मानला तरी, प्रकृतिभाव करणें वैकल्पिक असल्यामुळें, प्रकृत स्थली प्रकृतिभाव केला नाही (व संधि केला आहे असे देखील म्हणता येते. प्लुतनिमित्तक) प्रकृतिभाव करणे वैकल्पिक आहे हे मानण्यास 'ई चाक्रवर्मणस्य' सू. ६-१-१३० या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी 'ईग्रहणेन नार्थः वशा इय वशेयमिति' असे जें म्हटले आहे, ते प्रमाण आहे, व त्या भाष्याचा असा भावार्थ आहे की, चाक्रवर्मणाच्या मते प्लुतामुळें होणारा प्रकृतिभाव

कोठेंहि केला जात नाही. (त्यामुळें 'पुत्र' यातील अन्त्य अच् प्लुत मानला तरी, येथें जो प्रकृतिभाव केला नाही तो चाक्रवर्मणाच्या मतान्वयें योग्य ठरतो. सारांश वरील भाष्यान्वयें प्रकृतिभाव वैकल्पिक ठरत असल्यामुळें तो प्रकृत स्थलीं केला नाही व त्यामुळें 'पुत्रेति' हा सचियुक्त प्रयोग साधु ठरतो हें उघड आहे.) चवथें असें की, 'अप्लुतवदुपस्थिते' सू. ९८ हें सूत्र असल्यामुळें, 'पुत्रेति' या स्थलीं प्रकृतिभाव होणें दुर्लभ–अशक्य–आहे. त्या सूत्रातील 'उपस्थित' या शब्दाचा 'अवैदिक इति हा शब्द' असा अर्थ आहे व तसा अवैदिक 'इति' शब्द प्लुतापुढें आला असतां प्लुत अप्लुता-सारखा होतो असा त्या सूत्राचा अर्थ आहे. (त्यामुळें 'पुत्र' यातील अन्त्य अकार प्लुत मानला तरी, त्यापुढें 'इति' हा अवैदिक–पुराणोक्त–शब्द असल्यामुळें, प्लुत अप्लुतासारखा होतो आणि म्हणून येथें प्रकृतिभाव पावतच नाही व 'पुत्रेति' हा सचियुक्त प्रयोगच साधु ठरतो) अशा रीतीनें वर दिलेल्या चार कारणाच्या योगानें 'पुत्रेति' हा प्रयोग स्पष्टपणें साधु ठरत असल्यामुळें, तो आर्षप्रयोग आहे असें जें श्रीधरानें म्हटलें आहे तें स्वीकारार्ह नाहीं.

शब्दरत्न—एहीत्यादिरिति । "वाक्यस्य टेः" इत्युक्तेरिति भावः । हरदत्त इति । कैयटोऽप्येवम् । अत्र पक्षे "विभाषा पृष्ट–" इत्यत्र विभाषाग्रहणमवपुत्यानुवादः । "अभिवादः प्रत्यभिवादे–" इत्यादि पस्पशास्थं भाष्यमपि वैकल्पिकेषु भावानुष्ठानौचित्येन शास्त्राज्ञाननिन्दापरं बोध्यम् । आख्यातप्रागिति । पुत्र एहीति वाक्यस्यस्येत्यर्थः । अनुकरणे दूरात्संबोधनत्वाभावाच्चेत्यपि बोध्यम् । वैकल्पिकत्वादिति । अस्य अप्लुतवद्भावस्य वैकल्पिकत्वेन तत्पक्षे स्याभावेन तत्त्वमित्यर्थः । प्लुतप्रकृतिभाव इति । तस्य मते अप्लुतवद्भावोक्तेरिति भावः । एतेन चाक्रवर्मणस्याचार्यस्याप्लुत-वदित्येव भाष्योक्तेरिदं सर्वं चिन्त्यमित्यपास्तम् । प्रकारान्त-रेणाप्यप्लुतवद्भावोऽत्रेत्याह– अपि चेति । अवैदिक इति । अस्य पुराणस्यत्वेनावैदिकत्वं स्पष्टमेव ॥

'एहीत्यादि:' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हें कीं, ('वाक्यस्य टे:' सू. ९३ या अधिकार सूत्रात) 'वाक्यस्य टे:' असे म्हटले आहे. ('वाक्यस्य टे:' या अधिकारात प्रकृत सूत्र देखील पठित असल्यामुळें, 'एहि देवदत्त' असे वाक्य असले तरच 'देवदत्त' हा शब्द त्या वाक्याच्या शेवटी असल्यामुळें त्याचा टि—अन्त्य अकार—प्लुत होतो. 'देवदत्त एहि' असे वाक्य असल्यास, 'देवदत्त' हा शब्द त्या वाक्याच्या अन्ती नसल्यामुळें, त्याचा 'टि' प्लुत होऊ शकत नाहीं येथें हे लक्षात ठेवावे की, 'पदसमूहो वाक्यम्' हा पक्ष दीक्षितास व शब्दरत्नकारास मान्य नसून 'एकतिङ् वाक्यम्' हाच पक्ष त्याना मान्य आहे.) हरदत्तानें जसे मनोरमेंत दिलेल्या भाष्यवचनाचे व्याख्यान केले आहे तसेच व्याख्यान कैयटानें देखील केले आहे. (कैयटानें केलेले व्याख्यान मनोरमेंत दिलेच आहे. प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'प्राचामिति योगो विभज्यते । तेन सर्व: प्लुतो विकल्प्यते' असे दीक्षितानी म्हटले आहे. त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'प्राचाम्' असा योगविभाग करून त्यात 'वाक्यस्य टे: प्लुत.' या पूर्व सूत्रातून 'प्लुत' या पदाची अनुवृत्ति केल्यानें, 'प्राचा मते प्लुतो भवति, नान्यमते' असा त्या योगविभागाचा अर्थ होतो व हा योगविभाग सर्व प्लुतप्रकरणाला लागू केल्यानें, सर्वत्र प्लुत विकल्पें-करून होतो असा अर्थ निष्पन्न होतो आणि त्यामुळें 'अग्नीत्प्रेषणे' ८ २ ९२ या सूत्रावरील भाष्यात,'सर्व एव प्लुत. साहसमनिच्छता विभाषा वक्तव्य:' हें जें वार्तिक पठित केले आहे ते मानण्याची काही गरज राहत नाही. पण भाष्यकारानी प्रकृत सूत्राचा तसा योगविभाग केला नाही व या सूत्रावरील भाष्यात त्यानी असे म्हटले आहे की, या सूत्रात 'प्राचाम्' या पदाचे ग्रहण अशाकरिता केले आहे की, या सूत्रानें होणारा प्लुत विकल्पेंकरून व्हावा. या भाष्यात ८.२.८६ भाष्यकार म्हणतात— 'अथ प्राग्वचन किमर्थम् ? । प्राग्वचन विभाषार्थम् । प्राग्वचन क्रियते । किं प्रयोजनम् ? । विभाषार्थम्, विभाषा यथा स्यात् ।' या भाष्यावरून हे स्पष्ट होते

की, प्रकृत सूत्रानें होणारा प्लुत विकल्पेंकरून होतो एवढेंच भाष्यकारानी म्हटले आहे व सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो असे त्यानी या भाष्यात म्हटले नाही, व म्हणूनच 'अग्नीत्प्रेषणे' या पुढील सूत्रावरील भाष्यात सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो हा सिद्धान्त सागण्याच्या हेतूनें त्यानीं वरील वार्तिक पठित केले आहे म्हणून शकाकार अशी शका करतो की, दीक्षितानी 'प्रकृत सूत्राचा 'प्राचाम्' असा योगविभाग करून सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो असे जें म्हटले आहे तें बरोबर मानल्यास, 'विभाषा पृष्टप्रतिवचने हे' या पुढील सूत्रात 'हि' हा विकल्पेंकरून प्लुत व्हावा याकरिता 'विभाषा' या पदाचें जें ग्रहण केले आहे ते व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते, कारण सर्वच प्लुत जर विकल्पेंकरून होतो तर, 'हि' हें पद देखील आपोआपच विकल्पेंकरून प्लुत होईल व त्यामुळें त्या सूत्रात 'विभाषा' या पदाचे ग्रहण करण्याची काहीच गरज नव्हती. पण त्या सूत्रात त्या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें दीक्षिताचे म्हणणे बरोबर मानता येत नाही. या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, दीक्षितानी 'प्राचाम्' असा योगविभाग करून सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो असा जो पक्ष मानला आहे ) त्या पक्षात असे मानले पाहिजे की, 'विभाषा पृष्टप्रतिवचने' या सूत्रातील 'विभाषा' हें पद ('प्राचाम्' या योगविभागानें जो सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो त्याचाच ) पृथक् अनुवाद करणारे आहे ( वास्तविक त्या सूत्रात 'विभाषा' हे पद घातले नसतें तरी चालले असतें व त्या सूत्रानें होणारा प्लुत 'प्राचाम्' या योगविभागान्वयें वैकल्पिक ठरलाच असता. म्हणून त्या सूत्रातील 'विभाषा' हें पद 'प्राचाम्' या योगविभागानें सिद्ध होणाऱ्या 'सर्वः प्लुतो विकल्प्यते' या विधानाचे केवळ अनुवादक आहे असे मानावे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. पुन्हा शकाकार अशी शका करतो की, 'अविद्वासः प्रत्यभिवादे' या पस्पशाह्निकातील भाष्यावरून प्लुतविधि नित्य ठरत असल्यामुळें, सर्वत्र प्लुत विकल्पें-

करून होतो असे जें दीक्षितानी म्हटले आहे ते त्या भाष्याच्या विरुद्ध ठरते. या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, ) 'अविद्वांसः प्रत्यभिवादे' इत्यादि पस्पशान्हिकातील भाष्य देखील, विधि वैकल्पिक असला तरी तशा विधीचे अनुष्ठान करणे उचित आहे याचे प्रतिपादन करणारे असून व्याकरणशास्त्रासंबधानें असलेल्या अज्ञानाची निंदा करणारे आहे हें जाणावे. ( त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात–'अविद्वास. प्रत्यभिवादे नाम्नो ये न प्लुतिं विदु । काम तेषु तु विप्रोष्य स्त्रीष्विवायमह वदेत् । अभिवादे स्त्रीवन्मा भूमेत्यध्येय व्याकरणम् ।' या भाष्याचा अर्थ हा आहे की, प्रत्यभिवादनाच्या वेळी व्याकरणशास्त्र न जाणणाऱ्या ज्या गुरूला नामामध्यें प्लुत करून उच्चारण कसे करावे हे माहीत नसते त्या गुरूपुढें प्रवास आटोपून परत आलेल्या शिष्यानें, ज्याप्रमाणे स्त्रियापुढें 'हा मी आलो' असा नामगोत्रनिर्देश न करिता उच्चार केला जातो तसाच उच्चार करावा. स्त्रियापुढें जसा नमस्कार केला जातो तशा प्रकारचा नमस्कार आपल्या शिष्यानीं आपणास करू नये याकरिता व्याकरणशास्त्राचे अध्ययन करणे आवश्यक आहे शकाकार म्हणतो की, या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, प्लुत उच्चारणें हा नित्यविधि आहे पण शब्दरत्न-कार म्हणतात की, प्लुतविधि नित्य आहे या अर्थाचे प्रतिपादन करणारे वरील भाष्य नसून, ज्याना व्याकरणशास्त्राचे अज्ञान आहे त्याची केवळ निंदा करणारे ते भाष्य आहे जर 'प्लुतविधि नित्य असता तर, भाष्यकारानी 'विभाषा पृष्टप्रतिवचने' या सूत्राचा 'विभाषा' असा योगविभाग करून सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो असे जें 'अग्नीत्प्रेषणे' सू. ८-२-९२ या सूत्रावरील भाष्यात म्हटले आहे तसे म्हटले नसते व त्या अर्थाचे वार्तिक देखील पठित केले नसते. पण तसा त्यानी योगविभाग केला असल्यामुळें व वरील वार्तिक पठित केले असल्यामुळें, सर्वत्र प्लुत विकल्पेंकरून होतो हाच भाष्यसिद्धान्त ठरतो आणि म्हणून पस्पशान्हिकातील वरील भाष्य व्याकरणशास्त्र-

विषयक अज्ञानाची निंदा करणारे भाष्य आहे असेच मानणें योग्य आहे म्हणून प्लुतविधि नित्यविधि ठरत नसल्यामुळें, 'पुत्र' यातील अन्त्य अकार प्लुत न केल्यानें प्रकृतिभावाची प्राप्तीच होत नाही व 'पुत्रेति' हा संधियुक्त प्रयोग साधु ठरतो असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे असे शब्दरत्नकार म्हणतात ) मनोरमेंतील 'आख्यातप्राग्वर्तिन ' या पदाचा 'पुत्र एहि' या वाक्यात असलेला 'पुत्र' हा शब्द होय व तो 'पुत्र' शब्द (व्यासानें उच्चारलेल्या शब्दाचें) अनुकरण मानल्यानें त्याला संबोधनसंज्ञा होऊ शकत नाहीं (आणि त्यामुळें 'दूराद्धूते च' सू ९५ या सूत्रान्वयें त्या अनुकरणातील अन्त्य अकाराला प्लुताची प्राप्तीच होत नाही) असे देखील जाणावे 'प्रकृतिभावस्तु वैकल्पिकत्वान्मास्तु अस जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, ('ई चाक्रवर्मणस्य' सू ९९ या सूत्रानें होणारा) अप्लुतवद्भाव वैकल्पिक असल्यामुळें, त्या अप्लुतवद्भाव-पक्षात प्रकृतिभाव होऊ शकत नाही व त्यामुळें प्लुताच्या आश्रयानें होणारा प्रकृतिभाव देखील वैकल्पिक ठरतो (चाक्रवर्मणाच्या मते प्लुत ईकारापुढें अच् आला असता तो प्लुत ईकार अप्लुतवत् होतो असा जरी 'ई ३ चाक्रवर्मणस्य' सू ९९ या सूत्राचा आपाततः अर्थ होतो तरी, 'ईग्रहणेन नार्थ । अविशेषेण चाक्रवर्मणस्या-चार्यस्याप्लुतवत् भवति' असं 'ई चाक्रवर्मणस्य' ६-१-१३० या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानीं म्हटले असल्यामुळें, कोणत्याहि प्लुत अचापुढें अच् आला असता, तो प्लुत अच् आचार्य चाक्रवर्मणाच्या मतें अप्लुतवत होतो असा त्या सूत्राचा अर्थ निष्पन्न होतो पण इतर आचार्यांच्या मतें प्लुत अच् अप्लुतवत् होत नाही अशा रीतीनें चाक्रवर्मणाच्या व इतर आचार्यांच्या मतात फरक असल्यामुळें, अप्लुतवदभाव वैकल्पिक ठरता त्यामुळें अप्लुत-वद्भावपक्षात—प्लुत अप्लुतासारखा होतो या पक्षात—'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू ९० या सूत्रानें होणारा प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव होऊ शकत नाही व प्लुतपक्षातच तो होऊ शकतो अशा रीतीनें

एका पक्षात प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव नित्य होत असून दुसऱ्या पक्षात तो मुळीच होऊ शकत नसल्यामुळें, प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव देखील वैकल्पिक ठरतो त्यामुळें 'पुत्र' यातील अन्त्य अकार प्लुत मानला तरी, प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव' वैकल्पिक असल्यामुळें, 'पुत्रेति' हा संधियुक्त प्रयोग साधु ठरतो व त्यामुळें तो आर्ष प्रयोग आहे असे मानण्याचे काहीं कारण नाही ) 'प्लुतप्रकृतिभाव सर्वोऽपि चाक्रवर्मणमते नास्ति' असे जें मनोरमेत म्हटले आहे त्याचे कारण हे कीं, चाक्रवर्मणाच्या मते (भाष्यकारानी म्हटल्याप्रमाणे) सर्वच प्लुत अप्लुतासारखा होतो म्हणून चाक्रवर्मणाच्या मते प्लुत अप्लुतवत होतो एवढेंच भाष्यकारानी म्हटले असल्यामुळें, प्रकृतिभाव वैकल्पिक ठरतो इत्यादि जें दीक्षितानी मनोरमेत म्हटले आहे ते बरोबर मानता येत नाही असे जे कोणी म्हणतात त्यांचेच म्हणणे वरील विवेचनावरून चूक ठरते (खण्डनकाराचे असे म्हणणे आहे कीं, 'ई चाक्रवर्मणस्य' या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी एवढेंच म्हटले आहे की, चाक्रवर्मणाच्या मते सर्वच प्लुत अप्लुतासारखा होतो पण प्लुत अप्लुतासारखा झाल्यानें प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव देखील होत नाही असे भाष्यकारानी कोठेंहि म्हटले नाहीं त्यामुळें प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव विकल्पेंकरून होतो असे जे दीक्षितानीं म्हटले आहे ते अयोग्य ठरते यावर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, प्लुताच्या निमित्तामुळें प्रकृतिभाव होत असल्यामुळें, प्लुत अप्लुतासारखा होतो असे म्हटल्यानेंच अप्लुतवद्भावपक्षात प्रकृतिभाव होत नाही हे आपोआपच सिद्ध होते आणि म्हणून प्लुत अप्लुतासारखा झाला असता, प्रकृतिभाव होत नाहीं असें स्पष्टपणें वेगळें म्हणण्याची भाष्यकाराना गरज वाटली नाही साराश चाक्रवर्मणाच्या मते प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव वर सांगितल्याप्रमाणें कोठेंहि होत नसून इतर आचार्यांच्या मते तो सर्वत्र होत असल्यामुळे, प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव आचार्यांच्या मतभेदामुळे वैकल्पिक ठरतो हे उघड आहे त्यामुळें 'पुत्र' यातील

अन्त्य अकार प्लुत मानला तरी, प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव वैकल्पिक असल्यामुळें तो न केल्यास, 'पुत्रेति' हा संधियुक्त प्रयोग साधु ठरतो ) 'पुत्रेति' या उदाहरणात इतर रीतीनें देखील ('पुत्र' यातील अन्त्य प्लुत अकार) अप्लुतवत् होतो हें सिद्ध करण्याच्या हेतूनें दीक्षितानी मनोरमेंत 'अपि च इह प्रकृतिभावोऽपि दुर्लभ एव। अप्लुतवदुपस्थिते इति सूत्रात्' ही पंक्ति लिहिली आहे (या पंक्तीचें विवरण मनोरमेंत केलेच आहे ) 'पुत्रेति' या उदाहरणात 'इति' हा शब्द अवैदिक आहे असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हें की, तो पुराणोक्त शब्द असल्यामुळें, म्हणजे भागवतपुराणातील प्रयोगात ता शब्द असल्यामुळें, (व वैदिक प्रयोगांतील तो शब्द नसल्यामुळें) तो वैदिक शब्द नाही हें अगदी स्पष्ट होते

मनोरमा—द्विवचनमिति "सुप्तिङन्तम्" इति अन्तग्रहणेन "सञ्ज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे तदन्तग्रहण नास्ति" इति ज्ञापितत्वादिति भावः। तेनेह न, कुमार्योर्वध्वोश्चागार कुमार्यगार वध्वगारमिति। स्पष्ट चेद भाष्यादौ। द्विवचनान्त प्रगृह्य स्यादिति तु प्राच प्रमाद एव। हरी एताविति। इह शाकल न, "प्लुतप्रगृह्या—" इत्यत्र नित्यग्रहणादित्युक्तम्। अत्र वृत्तिकार। "मणीवादीना प्रतिषेधो वक्तव्य" इति पठित्वा मणीव, रोदसीव, दम्पतीव, जम्पतीवेत्युदाजहार। तच्च मुनित्रयानुक्तत्वादप्रमाणमिति कैयटहरदत्तादय। एव स्थिते—

"मणीवोष्ट्रस्य लम्बेते प्रियौ वत्सतरौ मम" ॥

इति भारतप्रयोग समर्थ्यते। इवार्थ इति। वशब्द इति। "व प्रचेतसि जानीयादिवार्थे च तदव्ययम्" इति मेदिनी ॥

"व वा यथा तथेवैव साम्ये" इत्यमरग्रन्थव्याख्यावसरे "शात्रव व पपुर्यश" इति कालिदासप्रयोगस्याभियुक्तैरुदाहृतत्वात्, "कादम्बखण्डितदलानि व पङ्कजानि" इत्यादिदर्शनाच्चेति भाव।

यत्तु पाठान्तरं "वद्धा यथा तथा" इत्यादि तदयुक्तम्, नामलिङ्गानुशासनप्रक्रमे तद्धितवतेरननुगुणत्वात्, अपत्यसमूहादिपर्यायमध्ये ऽण्फिञ्वुञादीनामनुवतेश्च ॥

('ईदूदेद्द्विवचन प्रगृह्यम्' सू. १०० या सूत्राचे कौमुदीत व्याख्यान करिताना 'द्विवचनान्तम्' असे न म्हणता) 'द्विवचनम्' असे जें म्हटले आहे त्याचे कारण हे की, सुप्तिङन्त पदम्' सू २१ या सूत्रात 'अन्त' शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें, 'सञ्ज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे तदन्तग्रहण नास्ति'–म्हणजे सञ्ज्ञाविधायक सूत्रात प्रत्ययाचे ग्रहण केले असल्यास तो प्रत्यय प्रत्ययान्ताचा वाचक होत नाही व केवळ प्रत्ययाचाच वाचक होतो–परि २७–ही परिभाषा ज्ञापित होते. ('प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेस्तदन्तस्य ग्रहणम्'–परि २३–या परिभाषान्वयें 'सुप्' व 'तिङ्' या प्रत्ययवाचक शब्दाचा सुबन्त व तिङन्त असा अर्थ होऊ शकतोच मग 'सुप्तिङन्त पदम्' या सूत्रात 'अन्त' या शब्दाचे ग्रहण का केले आहे? ते ग्रहण व्यर्थ ठरू पाहते परतु 'सुप्तिङन्त पदम्' हे पदसञ्ज्ञाविधायक सूत्र असल्यामुळें व त्या सूत्रात 'सुप्' व 'तिङ्' या प्रत्ययवाचक शब्दाचा निर्देश केला असल्यामुळें, त्या प्रत्ययानी प्रत्ययान्ताचे ग्रहण होणार नाही हे जाणून पाणिनीनें त्या सूत्रात 'अन्त' शब्दाचे मुद्दाम ग्रहण केले आहे व अशा रीतीनें ते 'अन्त' शब्दाचे ग्रहण चरितार्थ ठरून 'सञ्ज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे तदन्तग्रहण नास्ति' या परिभाषेचे ज्ञापक' ठरते म्हणून 'द्विवचन' हा शब्द 'तान्येकवचनद्विवचनबहुवचनान्येकश' सू २१६१ या सूत्रान्वयें प्रत्ययाचा वाचक असल्यामुळें 'व प्रकृत सूत्र प्रगृह्यसञ्ज्ञाविधायक सूत्र असल्यामुळें, वरील परिभाषान्वयें 'द्विवचनम्' या शब्दाचा 'द्विवचनान्तम्' असा अर्थ करता येत नाही, आणि म्हणून प्रकृत सूत्रातील 'ईदूदेत्' हे पद 'द्विवचनम्' याचे विशेषण असल्यामुळें 'येन विधिस्तदन्तस्य' सू २६ या सूत्रान्वयें त्या पदाचा 'ईदूदेदन्तम्' असा अर्थ करून 'ईदूदेदन्त द्विवचन प्रगृह्यसञ्ज्ञ स्यात्'

असे त्या सूत्राचे कौमुदीत व्याख्यान केले आहे व 'ईदूदेदन्त द्विवचनान्त प्रगृह्यसंज्ञ स्यात्' असे व्याख्यान केले नाहीं असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे) 'द्विवचनम्' या पदाचा 'द्विवचनान्तम्' असा वर सांगितल्याप्रमाणे अर्थ करता येत नसल्यामुळें, 'कुमार्यगारम्, वध्वगारम्' या उदाहरणात ('कुमारी' व 'वधू' याना) प्रगृह्यसंज्ञा होत नाही (व त्यामुळें प्रकृतिभाव न होता 'इको यणचि' सू ४७ या सूत्रानें यणादेश होऊन 'कुमार्यगारम्, वध्वगारम्' अशी संधियुक्त इष्ट रूपें सिद्ध होतात) हें सर्व भाष्यादि ग्रन्थावरून स्पष्ट होते. 'ईदूदेदन्त द्विवचनान्त प्रगृह्यसंज्ञ स्यात्' असे जें प्रक्रियाकौमुदीकारानी प्रकृत सूत्राचे व्याख्यान केले आहे ते अगदी चूक आहे. (प्रकृत सूत्रावरील भाष्यात १ १ ११ भाष्यकारानी या सूत्राचा चार तऱ्हेनें अर्थ करून दाखविला आहे तो असा—१. 'ईदादयो द्विवचन प्रगृह्याः,' २. 'ईदाद्यन्त द्विवचन प्रगृह्यसंज्ञ स्यात्,' ३. 'ईदाद्यन्त यद्द्विवचनान्त तत्प्रगृह्यसंज्ञ स्यात्,' ४ 'ईदाद्यन्त यद्द्विवचन तदन्त प्रगृह्यसंज्ञ स्यात्.' या चार अर्थापैकी कोणताहि अर्थ स्वीकारला तरी कोणकोणते दोष उद्भवतात हे सांगून व 'द्वितीय अर्थ मानल्यानें जो एक दोष उद्भवतो त्या दोषाचे निरसन करून भाष्यकारानी द्वितीय अर्थच सिद्धान्तभूत मानला आहे व इतर तीन अर्थाचे प्रत्याख्यान केले आहे. *तृतीय अर्थाचे प्रत्याख्यान करतेवेळी* 'ईदाद्यन्त द्विवचनान्तमिति- चेल्लुकि प्रतिषेध.' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात— 'ईदाद्यन्त 'द्विवचनान्तमिति चेल्लुकि प्रतिषेधो वक्तव्य । कुमार्योरगार कुमार्यगारम् । वध्वोरगार वध्वगारम् । एतद्धीदाद्यन्त च श्रूयते द्विवचनान्त च भवति प्रत्ययलक्षणेन ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'ईदूदेदन्त द्विवचनान्त प्रगृह्यसंज्ञ स्यात्' असा प्रकृत सूत्राचा अर्थ केल्यास, द्विवचनाच्या प्रत्ययाचा लुक् झाला असता, तशा ठिकाणी प्रगृह्यसंज्ञा होत नाही असा प्रतिषेध सांगितला

पाहिजे. तसा प्रतिषेध न केल्यास, 'कुमारी + ओस् + अगार + सु, वधू + ओस् + अगार + सु' या स्थली 'सुपो धातुप्रातिपदिकयो' सू ६५० या सूत्रानें 'ओस्' या द्विवचनप्रत्ययाचा व 'सु' प्रत्ययाचा लुक् होऊन 'कुमारी + अगार, वधू + अगार' अशी स्थिति झाली असता 'कुमारी' व 'वधू' या शब्दाच्या अन्ती ईकार व ऊकार प्रत्यक्षच आहेत व त्या शब्दाच्या शेवटी द्विवचनप्रत्यय आहे असे 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें मानता येते. त्यामुळें 'कुमारी' व 'वधू' या शब्दाना प्रगृह्यसंज्ञा होण्याची व 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू. ९० या सूत्रानें प्रकृतिभाव होण्याची आपत्ति येते आणि 'कुमार्यगारम्, वध्वगारम्' अशी इष्ट रूपें सिद्ध न होता 'कुमारी अगारम्, वधू अगारम्' अशी अनिष्ट रूपे होण्याची आपत्ति येते. म्हणून तृतीय अर्थ मानणे योग्य नाही असा भाष्यकाराच्या म्हणण्याचा आशय आहे द्वितीय अर्थ मानल्यास, जरी 'कुमारी' व 'वधू' हे शब्द अनुक्रमे ईदन्त व ऊदन्त आहेत तरी त्याचे अन्त्य ईकार व ऊकार द्विवचनसंज्ञक प्रत्यय नसल्यामुळें, प्रकृतिभाव न होता यणादेश होऊन 'कुमार्यगारम्, वध्वगारम्' अशी इष्ट रूपे सिद्ध होण्यात काहीं अडचण येत नाही आणि म्हणूनच 'तस्मादस्तु स एव मध्यम. पक्ष.,' म्हणजे द्वितीय पक्ष मानणेच उचित आहे, असे अखेरीस सागून भाष्यकारानी द्वितीय अर्थच सिद्धान्तभूत अर्थ मानला आहे. त्यामुळें प्रक्रियाकौमुदीकारानीं जो प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे तो भाष्यकारानी प्रत्याख्यात केलेल्या तृतीय अर्थाला धरून असल्यामुळें भाष्यविरुद्ध व चूक ठरतो असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे) प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'हरी एतौ' हे जें त्या सूत्राचे उदाहरण दिले आहे त्या उदाहरणाला ('इकोऽसवर्णे शाकल्यस्य ह्रस्वश्च' सू ९१ हा) शाकलनियम लागू शकत नाही, कारण 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या सूत्रात 'नित्यम्' या शद्बाचे ग्रहण केले आहे (प्रगृह्यसंज्ञक शद्बापुढें अच् आला असता, नित्य प्रकृतिभाव होतो असे

प्लुतप्रगृह्या:' सू. ९० या सूत्रात सांगितले असल्यामुळें, 'हरी एतौ' या उदाहरणात 'हरी' हा शब्द ईदन्त असून द्विवचन असल्यामुळें, त्याला प्रकृत सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा होऊन त्यापुढें 'ए' हा अच् आला असल्यामुळें नित्य प्रकृतिभाव होतो व शाकल नियमान्वयें 'हरि एतौ' किंवा 'हर्येतौ' अशी ऱ्हस्व होऊन किंवा यणादेश होऊन वैकल्पिक रूपें होऊं शकत नाहीत. या सबधानें बालमनोरमेंत 'अकृते सति नित्यग्रहणे परत्वात् शाकल-ह्रस्वसहित: प्रकृतिभाव: प्रसज्येत। नित्यग्रहणे कृते तु तत्सामर्थ्यादेव परमपि शाकल ऱ्हस्वसमुच्चित-प्रकृतिभाव प्लुतप्रगृह्या इति केवल प्रकृतिभावो बाधते' असे म्हटले आहे. येथें हें सागणें आवश्यक आहे की, जरी भाष्यकारानी प्लुतविधि वैकल्पिक मानून प्लुतनिमित्तक प्रकृतिभाव वैकल्पिक मानला आहे तरी, प्रगृह्यविधि व प्रगृह्यनिमित्तक प्रकृतिभाव वैकल्पिक मानला नाही. त्यामुळे 'हरी एतौ' या उदाहरणात प्रगृह्यनिमित्तक प्रकृतिभाव नित्य होतो.) प्रकृत सूत्रावरील वृत्तीत काशिकाकारानें 'मणीवादीना प्रतिषेधो वक्तव्य' हे वचन पठित करून 'मणीव, रोदसीव, दम्पतीव, जम्पतीव' ही त्या वचनाची उदाहरणें दिलीं आहेत. पण हे वचन सूत्रकार पाणिनी, वार्तिककार व भाष्यकार या तीन्ही मुनीनी पठित केले नसल्यामुळें, तें प्रमाण मानता येत नाहीं असे कैयट, हरदत्त इत्यादि वैयाकरणानी म्हटले आहे. (काशिकेत दिलेल्या उदाहरणातील 'मणी, रोदसी, दम्पती, जम्पती' हे शब्द ईदन्त असून द्विवचनाची रूपें आहेत. त्यामुळें त्याना प्रकृत सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा प्राप्त होते व त्याच्यापुढें 'इव' यातील 'इ' हा अच् असल्यामुळें, 'प्लुतप्रगृह्या.' सू ९० या सूत्रान्वयें प्रकृतिभाव झाला पाहिजे आणि 'अक सवर्णे दीर्घ.' सू ८५ या सूत्रानें सवर्णदीर्घ करता येत नाहीं. त्यामुळें 'मणीव' इत्यादि प्रयोग अशुद्ध ठरण्याची आपत्ति येते. पण तसे प्रयोग तर आर्षेत आढळतात. म्हणून ते प्रयोग शुद्ध ठरावे याकरिता काशिकाकारानें 'मणीवादीना प्रतिषेधो वक्तव्य:', म्हणजे 'मणीव' इत्यादि प्रयोगाची सिद्धि व्हावी

याकरिता त्या शब्दापुढें 'इव' हा शब्द आला असता त्या शब्दाना प्रगृह्यसंज्ञा होऊ नये असा प्रतिषेध मागितला पाहिजे, हे वचन पठित केले आहे पण दीक्षित म्हणतात की, तीन्ही मुनींनी हे वचन पठित केले नसल्यामुळें ते वचन प्रमाण मानता येत नाही पण हे वचन प्रमाण न मानल्यास, 'मणीवोष्ट्रस्य' हा भारतातील प्रयोग कसा शुद्ध ठरेल असा कोणी प्रश्न केल्यास,) 'मणीवोष्ट्रस्य लम्बेते प्रियौ वत्सतरौ मम' या भारतातील प्रयोगाचे समर्थन करण्याकरिता प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'इवार्थे व शब्दो वा शब्दो वा बोध्य' असे म्हटले आहे. 'व' हा शब्द 'इव' या अर्थाचा वाचक आहे याला प्रमाण 'व प्रचेतसि जानीयादिवार्थे च तदव्ययम्' हा मेदिनीकोशातील श्लोक आहे (या श्लोकाचा अर्थ असा आहे की, 'व' हा शब्द वरुणाचा वाचक आहे व जेव्हा तो 'इव' या अर्थाचा वाचक असतो तेव्हा तो अव्ययसंज्ञक होतो) 'व वा यथा तथेवैवं साम्ये' या अमरकोशातील श्लोकाचे व्याख्यान करिताना नामांकित पंडितानीं 'शात्रव व पपुर्यश'–रघुवंश सर्ग ४ श्लोक ४२–हे उदाहरण दिले आहे, व 'कादम्बखण्डितदलानि व पङ्कजानि' इत्यादि प्रयोग देखील आढळतात (व या सर्व प्रयोगामध्यें 'व' या शब्दाचा 'इव' या अर्थामध्यें उपयोग केला आहे म्हणून 'मणीवोष्ट्रस्य' या भारतातील प्रयोगात 'मणी इव उष्ट्रस्य' अशी पदें न पाडता 'मणी, व, उष्ट्रस्य' किंवा 'मणी, वा, उष्ट्रस्य' अशीं पदें पाडली असता आणि त्या पदातील 'व' किंवा 'वा' हा शब्द 'इव' या अर्थाचा वाचक आहे असे मानले असता, 'मणी' या प्रगृह्यसंज्ञक शब्दापुढें वकार हा हल् असून अच् नसल्यामुळें, 'प्लुतप्रगृह्या सू ९० या सूत्रानें होणाऱ्या प्रकृतिभावाची प्राप्तीच होत नाही व काशिकेत दिलेले वचन न मानता देखील भारतातील वरील प्रयोग साधु ठरतो असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे या विषयासंबधानें प्रकृत सूत्रावरील प्रदीपात कैयटानें 'मणीवादीनां प्रतिषेधो वक्तव्य इति भाष्यकारवार्तिककाराभ्याम-

पठितत्वादप्रमाणमेतत् । मणीवोष्ट्रस्येति तु प्रयोगो वाशब्दस्योपमानार्थस्य । रोदसीवेत्यादिस्तु च्छान्दसः प्रयोगः । छन्दसि सर्वे विधयो विकल्प्यन्ते इति ।' असे म्हटले आहे व तसेच प्रकृत सूत्रावरील पदमञ्जरीत हरदत्तानें 'न चेद वचन, भाष्यवार्तिककाराभ्यामपठितत्वात्, किंतु मणीवादीना निर्वाहः कर्तव्य इत्यर्थस्तत्र मणीवोष्ट्रस्य लम्बेते इत्यत्र वाशब्दस्योपमानार्थस्य प्रयोगो, रोदसीवेत्यादौ छान्दसत्वादिति निर्वाहः ।' असे म्हटले आहे. अमरकोशातील वरील श्लोकात 'व वा यथा' या पदाचे जागीं ) 'वद्वा यथा' इत्यादि जो क्वचित् प्रतीत पाठ आढळतो तो बरावर नाहीं, म्हणजे अशुद्ध आहे, कारण नामाचा अर्थ व त्याचे लिङ्ग सागण्याकरिता ज्या अमरकोशाचा उपक्रम–प्रारंभ–झाला आहे त्या कोशात तद्धित 'वति' हा प्रत्यय 'इव' या अर्थाचा वाचक आहे हे सागणे (त्या प्रक्रमाशीं जुळत नसल्यामुळें ) संभवत नाहीं. ( 'वत्' हा तद्धित प्रत्यय नाम नसून नामाहून–प्रातिपदिकाहून किंवा सुबन्ताहून–होणारा 'इव' या अर्थाचा वाचक प्रत्यय आहे. सम्पूर्णमुच्यते वर्गैर्नामलिङ्गानुशासनम्' असा उपक्रम करून नामाचे अर्थ व लिङ्ग सागण्यास प्रवृत्त झालेल्या अमरकोशात प्रत्ययाचे अर्थ कोठेंहि सागितले नाहीत. म्हणून केवळ 'वत्' प्रत्ययाचा अर्थ त्या कोशात सागितला आहे हें मानणें अयोग्य आहे. ) तसेच 'अपत्य' व 'समूह' इत्यादि शब्दाचे पर्यायवाचक शब्द सागतेवेळीं 'अण्, फिञ्, वुञ्' इत्यादि प्रत्यय पर्यायरूपानें सागितले नसल्यामुळें, तसा पाठ असणे असंभवनीय आहे. (उदाहरणार्थ आत्मजस्तनयः सूनुः सुतः पुत्रः स्त्रियां त्वमी । आहुर्दुहितरं सर्वेऽपत्यं तोकं तयोः समे ॥' या अमरातील श्लोकात अपत्यार्थवाचक नामें व त्याचीं लिङ्गें सागितलीं आहेत. परंतु 'तस्यापत्यम्' सू. १०८८ या अपत्याधिकारात पठित असलेल्या 'अण्' इत्यादि अपत्यार्थक प्रत्ययाचा त्या श्लोकात मुळीच निर्देश केला नाहीं. तसेच 'समूहो निवहव्यूहसंदोहविसरव्रजाः । स्तोमौघनिकरव्रातवारसंघातसञ्चयाः ॥'

या व पुढील श्लोकात जरी समूहाची पर्यायवाचक नामें व त्याची लिङ्गें दिलीं आहेत तरी, 'तस्य समूहः' सू. १२४३ या अर्थामध्यें होणाऱ्या 'वुञ्, तल्' इत्यादि समूहवाचक प्रत्ययाचा निर्देश कोठेंहि केला नाही. म्हणून त्या कोशात 'वत्' प्रत्ययाचा अर्थ सांगितला आहे हे मानणे बरोबर नाही आणि त्यामुळें 'वद्वा यथा तथा' हा पाठ अशुद्धच मानला पाहिजे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे. )

शब्दरत्न--कुमार्योरिति । अत्र हि प्रत्ययलक्षणेन द्विवचनान्तत्वं श्रुत्या चेदन्तत्वमस्तीति भावः । इदं च द्विवचनान्तमीदन्तमित्यर्थे । ईदन्त यद् द्विवचनं तदन्तमित्यर्थे तदन्तविध्यसम्भव एव दोषो बोध्यः । इत्युक्तमिति । मूले इति शेषः । शात्रव वेति । शात्रव यश इवेत्यर्थः । ववेत्यादिकोशप्रदर्शनेन वशब्द इव पर्यायः, स्वतन्त्र एव न तु सत्या भामादिवत् एकदेश इति सूचयति, "विनापि प्रत्ययं पूर्वोत्तरपदयोर्लोपो वाच्यः" इति वचनेन तादृशस्थले तथाकल्पनेऽप्यखण्डे पदे तथात्वे मानाभावात् ॥

प्रकृत सूत्राचा 'ईदूदन्त द्विवचनान्त प्रगृह्यसंज्ञ स्यात्' असा अर्थ केल्यास, कुमार्योः अगारम्, वध्वोः अगारम्' या उदाहरणात 'कुमारी' व 'वधू' हे शब्द ('प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें) प्रत्ययलक्षणानें द्विवचनान्त मानले जाऊ शकतात व ते शब्द स्वतः ईकारान्त व ऊकारान्त ऐकू येतात. (त्यामुळें त्या तृतीय पक्षात, पूर्वी मनोरमेंत सांगितल्याप्रमाणे, 'कुमारी अगारम्, वधू अगारम्' असा प्रकृतिभाव होऊन अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येते म्हणून प्रक्रियाकौमुदीकारानी जो तृतीय अर्थ मानला आहे तो मानणे उचित नाही ) प्रकृत सूत्राचा 'ईदूदन्त यद्द्विवचन तदन्त प्रगृह्यसंज्ञ स्यात्' असा चवथा अर्थ मानल्यास, तदन्तविधि होणे असंभवनीय आहे एवढाच त्या पक्षात दोष येतो हे ध्यानात ठेवावे (प्रकृत सूत्राचा चवथा

अर्थ केल्यास, 'शुक्ल्यास्तावस्त्रे' या उदाहरणात प्रगृह्यसंज्ञा व त्यामुळें प्रकृतिभाव होण्याची आपत्ति येते असे सांगून व त्या दोषाचे निवारण करून पुढें भाष्यकार म्हणतात--'एवमपि दोष । वक्ष्यत्येतत् । पदसंज्ञायामन्त्यवचनमन्यत्र संज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे तदन्तविधिप्रतिषेधार्थमिति । इदं चापि प्रत्ययग्रहणमयं चापि संज्ञाविधि । तस्मादस्तु स एव मध्यम. पक्ष. ।' या भाष्याचा असा अर्थ आहे की, 'शुक्ल्यास्ताम्' या उदाहरणात वर जो दोष दाखविला आहे त्या दोषाचे निराकरण करता येऊ शकत असले तरी, एक वेगळा दोष येतोच 'सुप्तिडन्तं पदम्' सू २९ या पदसंज्ञाविधायक सूत्रात जें 'अन्त' शब्दाचे ग्रहण केले आहे ते संज्ञाविधायक सूत्रामध्यें प्रत्ययग्रहण केले असता त्या प्रत्ययानें प्रत्ययान्ताचे ग्रहण करता येत नाही हं ज्ञापित करण्याच्या हेतूनें केले आहे असें वार्तिककार पुढें सांगणार आहेत प्रकृत सूत्रात 'द्विवचन' या प्रत्ययवाचक शब्दानें प्रत्ययाचे ग्रहण केले आहे व प्रकृत सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा होणें देखील सांगितले असल्यामुळें हा संज्ञाविधि ठरतो म्हणून प्रकृत सूत्रातील 'द्विवचन' या प्रत्ययवाचक शब्दाचा 'द्विवचनान्त' असा अर्थ होऊ शकत नसल्यामुळें, या चतुर्थ पक्षात 'द्विवचन' याचा 'द्विवचनान्त' असा अर्थ करणे हा दोष येतोच म्हणून मध्यम पक्ष--द्वितीय पक्ष--मानणेंच योग्य आहे वास्तविक वरील भाष्यात सांगितलेला चतुर्थ पक्ष तृतीय पक्षाचाच पोटभेद आहे व या दोन्ही पक्षात 'द्विवचन' या प्रत्ययवाचक शब्दाचा तदन्तविधीनें 'द्विवचनान्तम्' असा चूक अर्थ केला असल्यामुळें, हा दोष या दोन्ही पक्षाना सारखाच लागू पडतो म्हणून भाष्यात वास्तविक तीनच मुख्य पक्ष मानले आहेत व 'तस्मादस्तु स एव मध्यम पक्ष' या भाष्यवचनातील 'मध्यम' या पदावरून हे स्पष्ट होते सारांश तिसरा व चवथा पक्ष मानता येत नाही हे वरील भाष्यावरून स्पष्ट होत असल्यामुळें, तृतीय पक्षाचा आश्रय करून प्रक्रियाकौमुदीकारानीं जें प्रकृत सूत्राचे व्याख्यान केले आहे ते अयोग्य ठरते हे उघड आहे ) 'नित्यग्रहणादित्युक्तम्'

असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यापुढें 'मूले' हे पद अध्याहृत आहे, म्हणजे 'हरी एतौ' या उदाहरणांत 'इकोऽसवर्णे शाकल्यस्य ह्रस्वश्च' सू ९१ हे सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाही असे 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू. ९० या सूत्रावरील कौमुदीत पूर्वी सांगितलेच आहे असा त्या पंक्तीचा अर्थ आहे 'शात्रव व पपुर्यशः' या रघुवंशातील श्लोकपादाचा 'शात्रव यश इव पपु' असा अर्थ आहे. 'व वा यथा तथेवैव साम्ये'–म्हणजे 'व, वा, यथा, तथा, इव, एवम्' हे शब्द 'साम्य' या अर्थाचे वाचक आहेत–इत्यादि श्लोकानें दीक्षितानी मनोरमेंत पठित केले आहेत त्यावरून ते असे सुचवितात कीं, 'व' हा शब्द 'इव' या शब्दाचा पर्यायशब्द सांगितला आहे व तो 'व' शब्द स्वतंत्र शब्द आहे आणि 'सत्या, भामा' इत्यादि शब्द जसे 'सत्यभामा' इत्यादि शब्दाचे एकदेश आहेत तसा 'व' हा शब्द 'इव' या शब्दाचा एकदेश नाही. 'विनापि प्रत्ययं पूर्वोत्तरपदयोर्लोपो वाच्य'–सू. २०३५ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें जरी 'सत्या, भामा' इत्यादि स्थली अनुक्रमें उत्तरपदलोप व पूर्वपदलोप मानता येतो तरी, जेथें अखण्ड पद उच्चारले आहे तशा ठिकाणी वरील वार्तिक प्रवृत्त करण्यास काहीच प्रमाण नाहीं. (साराश जेथें 'सत्या, भामा' अशा प्रकारचा खण्डित शब्द उच्चारला आहे तशाच ठिकाणीं वरील वार्तिक प्रवृत्त करणें उचित आहे आणि ज्याअर्थी अमर इत्यादि कोशात 'इव' या अर्थाचा वाचक 'व' असा अखण्ड शब्द उच्चारला आहे त्याअर्थी वरील वार्तिक प्रवृत्त करून तो 'व' शब्द 'इव' या शब्दाचा एकदेश आहे असे मानणें उचित नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे )

**मनोरमा**—"अदसो मात्" इह एकारो नानुवर्तते, असम्भवात् । इत्यभिप्रेत्याह–ईदूताविति । ननु ऊकारानुवृत्तिर्व्यर्था, स्त्रियौ फले वा 'अमू आसाते' इत्यत्र पूर्वेणैव सिद्धेः । मुत्वस्यासिद्धत्वे ऽप्येकारान्तत्वादत आह–रामकृष्णाविति । पुंसि पूर्वेण न

सिध्यति, ओकारान्तत्वादिति भावः। "अदसो मात्" इति सूत्रं प्रति तु मुत्वमीत्वे नासिद्धे, आरम्भसामर्थ्यात्। एकारोऽपीति। तथा च एकारानुवृत्तिनात्पर्यग्रहणफलकं माद्ग्रहणमिति भावः। अत्रेदं चिन्त्यम्। ईदूत्सप्तम्यर्थे प्रगृह्यम्, अदसः, एच्च द्विवचनमित्येव कुतो न सूत्रितम्। एवं हि पूर्वसूत्रस्थमीदूद्ग्रहणम्, प्रकृतसूत्रे माद्ग्रहणं च मास्तु। एकदेशानुवृत्तिक्लेशोऽपि नेति॥

'अदसो मात्' सू. १०१ या प्रकृत सूत्रात ('ईदूदेत्' या पूर्व सूत्रातून) एकाराची अनुवृत्ति होत नाहीं; कारण ('अदस्' शब्दाची रूपें करिताना मकार झाल्यावर तशा मकारापुढें) एकार येणें असंभवनीय आहे, म्हणजे मकारापुढें एकार येतच नाही. आणि हा आशय मनात धरूनच 'अस्मात्परावीदूतौ प्रगृह्यौ स्तः' असे कौमुदीत प्रकृत सूत्राचे व्याख्यान केलें आहे. प्रकृत सूत्रात ('ईदूदेत्' या पूर्व सूत्रातून) 'ऊत्' या पदाची अनुवृत्ति करणें व्यर्थ आहे, 'स्त्रियौ अमू आसाते, फले अमू आसाते' या स्त्रीलिङ्गाच्या व नपुंसकलिङ्गाच्या 'अमू' या रूपाला 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रानेंच प्रगृह्यसंज्ञा होऊ शकते, कारण मुत्व असिद्ध असल्यामुळें स्त्रीलिङ्गाचें व नपुंसकलिङ्गाचें 'अमू' हे रूप एदन्त आहे असे मानता येते अशी कोणी शंका केल्यास, ती शंका मनात धरूनच प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'रामकृष्णावमू आसाते' हें उदाहरण दिले आहे. या पुल्लिङ्गाच्या 'अमू' या रूपाला, मुत्व असिद्ध मानल्याने पुल्लिङ्गाचे ओकारान्त रूप होत असल्यामुळें, 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा होऊ शकत नाही. 'अदसो मात्' (या प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें) या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें त्याच्या दृष्टीनें ('अदसोऽसेर्दादु दो मः' सू ४१९ व 'एत ईद्बहुवचने' सू ४३८ या त्रैपादिक सूत्रानी अनुक्रमें होणारी) मुत्व व मीत्व ही कार्यें असिद्ध ठरत नाहीत (प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'अमी ईशाः' व 'रामकृष्णावमू आसाते' ही या सूत्राची दोन उदाहरणे दिली आहेत 'अदस् + जस्' या स्थली 'त्यदादीनामः' सू २६५ या सूत्रानें

'अदस्' यातील अन्त्य सकाराचे जागी अकार होऊन व 'अतो गुणे' सू १९१ या सूत्रानें पररूप एकादेश होऊन 'अद + जस्' अशी स्थिति झाली असता, 'अद' हे अदन्त सर्वनाम होत असल्यामुळें, त्यापुढील 'जस्' प्रत्ययाचे जागी 'जस शी' सू २१४ या सूत्रानें 'शी – ई' आदेश होऊन 'अद + ई' अशी स्थिति होते व या स्थितीत 'आद्गुण' सू ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'अदे' असे रूप होते हे रूप जरी एदन्त आहे तरी हें द्विवचनाचे रूप नसून बहुवचनाचे रूप असल्यामुळें, त्याला 'ईदूदेद्द्विवचन प्रगृह्यम' सू १०० या पूर्वसूत्रानें प्रगृह्यसज्ञा होऊ शकत नाही त्याला ती प्रगृह्यसज्ञा व्हावी याकरिता प्रकृत सूत्र आरभिले आहे 'एत ईद्बहुवचने' या सूत्रानें 'अदे' यातील दकाराचा मकार व दकारापुढील एकाराचा ईकार होऊन 'अमी' असे रूप सिद्ध झाले असता, या रूपात मकारापुढें ईकार असल्यामुळें, 'अमी' याला प्रकृत सूत्रानें प्रगृह्यसज्ञा होते व त्यामुळें 'अमी ईशा' या स्थली 'अक सवर्णे दीर्घ' सू ८५ या सूत्रानें सवर्ण दीर्घ न होता, 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू ९० या सूत्रानें प्रकृतिभाव होतो तसेच 'रामकृष्णावमू आसाते' या उदाहरणातील 'अमू' हे द्विवचन असून जरी ऊदन्त आहे तरी 'अदस् + औ = अद + औ' अशी, वर मागितल्याप्रमाणे, स्थिति झाल्यावर 'वृद्धिरेचि सू ७२ या सूत्रानें वृद्धि-रूप एकादेश होऊन 'अदौ' असे जें द्विवचनाचे रूप होते तें औकारान्त असल्यामळें, त्याला 'ईदूदेत्' सू १०० या सूत्रान्वयें प्रगृह्यसज्ञा होऊ शकत नाही त्याला ती सज्ञा व्हावी याकरिता देखील प्रकृत सूत्र आरभिले आहे व 'अदसोऽमे' सू ४१९ या सूत्रानें 'अदौ' यातील दकाराचा मकार व दकारापुढील 'औ' चा ऊकार होऊन 'अमू' असे जें रूप होते त्यात मकारापुढें ऊकार असल्यामुळें, 'अमू' या द्विवच-नाच्या रूपाला प्रकृत सूत्रानें प्रगृह्यसज्ञा होते व त्यामुळें 'अमू आसाते' या स्थली सधिकार्य न होता प्रकृतिभाव होतो वरील 'अमी' व 'अमू' या दोन रूपाना प्रगृह्यसज्ञा व्हावी याकरिता प्रकृत सूत्रात

'ईदूदेत्' या पूर्व सूत्रातून 'द्विवचनम्' व 'एत्' या पदाची अनुवृत्ति न करिता 'ईदूत्' व 'प्रगृह्यम्' याच पदाची अनुवृत्ति केली आहे. 'एत्' या पदाची अनुवृत्ति केली नाहीं याचे कारण हे की, मकारापुढें एकार केव्हांहि येणे शक्य नसून ऊकार व ईकार हेच येणें शक्य आहे प्रकृत सूत्र सापादिक असून त्याच्या दृष्टीनें 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रान्वयें 'अदसोऽसेः' व 'एत ईत्' हीं त्रैपादिक सूत्रें असिद्ध ठरत असल्यामुळें 'अदे' व 'अदौ' यात मीत्व व मूत्व करून 'अमी, अमू' अशीं रूपें झाल्यावर मीत्व व मूत्व असिद्ध ठरतात व त्यामुळें 'अदे, अदौ' अशीच रूपें आहेत असे मानणे भाग आहे व 'अदे' हें जरी एकारान्त रूप आहे तरी तें बहुवचनाचे रूप असल्यामुळें व 'अदौ' हें जरी द्विवचनाचे रूप आहे तरी ते औकारान्त असल्यामुळें, या दोन्ही रूपाना प्रगृह्यसंज्ञा होऊ शकत नाहीं अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण करून, म्हणजे त्रैपादिक सूत्रानीं होणाऱ्या कार्याचा अनुवाद करून, ते सूत्र आरंभिले असल्यामुळें व अशा रीतीनें त्या सूत्राचा 'अदश्शब्दावयमकारात्परावीदूतौ प्रगृह्यसंज्ञौ स्त.' असा अर्थ होत असल्यामुळें, प्रकृत सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक मूत्व, मीत्व असिद्ध ठरत नाहीत व त्यामुळें 'अमी, अमू' याना प्रकृत सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा होते पुन्हा शंकाकार अशी शंका करतो की, 'अमी' या रूपाला प्रगृह्यसंज्ञा व्हावी याकरिता जरी प्रकृत सूत्रात 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रातून 'ईत्' या पदाची अनुवृत्ति करणे योग्य आहे तरी 'उत्' या पदाची अनुवृत्ति करण्याची काहीच गरज नाहीं, कारण 'स्त्रियौ अमू आसाते' फले अमू आसाते या दोन्ही उदाहरणातील 'अमू' या शब्दाला 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रानेंच प्रगृह्यसंज्ञा होते. त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'अमू' हें स्त्रीलिङ्गाचे द्विवचनाचे रूप सिद्ध करतेवेळी, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, 'अद + औ' अशी स्थिति झाली असता 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें 'अद' या अदन्त

शब्दाहून स्त्रीत्वबोधक 'टाप् = आ' प्रत्यय करून व 'अक.सवर्णे दीर्घ' सू ८५ या सूत्रानें सवर्णदीर्घ करून 'अदा+औ' अशी स्थिति झाल्यावर 'औड आप' सू. २८७ या सूत्रानें 'औ' चे जागीं 'शी = ई' असा आदेश होऊन 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश केल्यावर 'अदे' असे जें रूप होते ते द्विवचनाचे एकारान्तरूप असल्यामुळें त्याला 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रानेंच प्रगृह्यसज्ञा होते व 'अदसोऽसे.' या सूत्रानें मूत्व करून 'अमू' असे ज रूप होते त्याला स्थानिवद्भावानें प्रगृह्यसज्ञा होऊ शकतेच. तसेच नपुसकलिङ्गाचे द्विवचनाचे रूप करतेवेळी 'अदस् + औ = अद + औ' अशी, वर सागितल्याप्रमाणे, स्थिति झाली असता, 'नपुसकाच्च' सू ३१० या सूत्रानें 'औ' चे जागी 'शी = ई' असा आदेश होऊन 'अद + ई = अदे' असेच रूप होते व हे रूप देखील द्विवचनाचे रूप असून एकारान्त असल्यामुळें, त्याला 'ईदूदेत्' या पूर्वसूत्रानेंच प्रगृह्यसज्ञा होते आणि मूत्व करून 'अमू' असे रूप झाले असता, त्याला देखील स्थानिवद्भावानें प्रगृह्यसज्ञा होण्यात काही अडचण येत नाहीं. म्हणून प्रकृत सूत्रात 'ऊत्' या पदाची पूर्व सूत्रातून अनुवृत्ति करणे व्यर्थ आहे असे शकाकाराचे म्हणणे आहे या शकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, जरी 'अदस' शब्दाच्या स्त्रीलिङ्गाच्या व नपुसकलिङ्गाच्या द्विवचनाच्या 'अमू' या रूपाला, शकाकारानें म्हटल्याप्रमाणे, 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रानें प्रगृह्यसज्ञा होते तरी, 'अदस्' शब्दाच्या पुल्लिङ्गाच्या 'अमू' या रूपाला त्या पूर्व सूत्रानें, वर सागितल्याप्रमाणे, प्रगृह्यसज्ञा होऊ शकत नाही आणि म्हणूनच 'स्त्रियौ अमू आसाते' किंवा 'फले अमू आसाते' असे प्रकृत सूत्राचे उदाहरण न देता, 'रामकृष्णावमू आसाते' असे त्या सूत्राचे कौमुदीत उदाहरण दिले आहे व या उदाहरणातील 'अमू' या शब्दाला जी पूर्व सूत्रानें प्रगृह्यसज्ञा प्राप्त होत नाही ती प्रकृत सूत्राच्या आरम्भसामर्थ्यानें होते आणि म्हणून त्या शब्दाला ती सज्ञा प्राप्त होण्याकरिता प्रकृत सूत्रात 'ऊत्' या पदाची देखील पूर्व

सूत्रातून अनुवृत्ति करणे आवश्यक आहे तशी अनुवृत्ति न केल्यास, 'अमू' या पुल्लिङ्गाच्या द्विवचनाच्या रूपाला प्रगृह्यसंज्ञा न होण्याची आपत्ति येईल असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'असति माद्ग्रहणे एकारोऽप्यनुवर्तेत' असे जें प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें हे फळ निष्पन्न होत की, ( 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात ) एकाराची अनुवृत्ति होत नाही, म्हणजे एकाराची प्रकृत सूत्रात अनुवृत्ति न व्हावी याकरिताच या सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण केले आहे (प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण केले नसत तर, 'एकयोगनिर्दिष्टाना सह वा प्रवृत्ति सह वा निवृत्ति'—परि १७—या परिभाषान्वये 'ईदूदेत' सू १०० या पूर्व सूत्रातील 'ईदूदेत्' या समाहारद्वन्द्वात निर्दिष्ट व परस्परसबद्ध असलेल्या 'ईत्, ऊत् एत्' या तीन्ही पदाची प्रकृत सूत्रात अनुवृत्ति झाली असती व त्यामुळें 'अव्ययसर्व-नाम्नामकच् प्राक्टे' सू २०२६ या सूत्रानें 'अदस्' या सर्वनामाहून 'अकच्' प्रत्यय केल्यावर 'अदकस्' असे जें रूप होत त्याचे प्रथमच्या बहुवचनाचे रूप करतेवेळी, पूर्वी सागितल्याप्रमाण, त्यदा-द्यत्व, पररूप, 'जस्' प्रत्ययाचे जागी 'शी = ई' आदेश, 'आद्गुण' सू ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश, व 'अदसाऽसे' सू ४१९ या सूत्रानें मत्व व उत्व करून 'अमुके' असं जें अखेरीस एदन्त रूप होत व ज्यात ककारापुढें एकार आहे त्याला देखील प्रगृह्यसंज्ञा प्राप्त होण्याची आपत्ति आली असती व 'अमुके अत्र' या स्थळीं 'एङ पदान्तादति' सू ८६ या सूत्रानें इष्ट पूर्वरूप एकादेश न होता, 'प्लुतप्रगृह्या' सू ९० या सूत्रानें अनिष्ट प्रकृतिभाव झाला असता परन्तु प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें व 'अदस्' शब्दाचा अवयव जो मकार त्यापुढें एकार केव्हाहि येत नसल्यामुळें, प्रकृत सूत्रात एकाराची अनुवृत्ति, माद्ग्रहणरूप प्रतिबंधामुळें, होऊ शकत नाही व त्यामुळें 'अमुके' या एदन्त

रूपाला प्रगृह्यसंज्ञा होऊं शकत नसल्यामुळें, 'अमुके अत्र' या स्थली प्रकृतिभाव होण्याची आपत्ति टळते व पूर्वरूप एकादेश होऊन 'अमुकेऽत्र' असा इष्ट प्रयोग सिद्ध होतो सारांश प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे जे ग्रहण केले आहे ते या सूत्रात 'इदूदेत्' या पूर्व सूत्रातून 'एत्' या पदाची अनुवृत्ति न होता निवृत्ति व्हावी या फलाची सिद्धि करणारे आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे ) येथें ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे की, 'ईदूत्सप्तम्यर्थे प्रगृह्यम्' व नंतर 'अदस' आणि त्यानंतर 'एच्च द्विवचनम्' अशी सूत्रें का पठित केली नाहीत ? अशी सूत्रें पठित केली असती तर, 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रात 'ईदूत्' चे ग्रहण करण्याची व तसेच प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण करण्याची काही आवश्यकता राहिली नसती, आणि अशी सूत्रें पठित केल्यानें एकदेशानुवृत्तिरूप क्लेश–दोप–टाळता आला असता ('ईदूतौ च सप्तम्यर्थे' सू १०९ हे सूत्र पुढें पठित न करिता 'ईदूदेत्' सू १०० या सूत्रापूर्वी 'इदूत्सप्तम्यर्थे प्रगृह्यम्' अशा तऱ्हेनें पठित केले असते व त्याच्या लगेच पुढें प्रकृत सूत्राऐवजी 'अदस.' एवढेंच सूत्र पठित केले असते तर, 'अदस' या उत्तर सूत्रात 'इदूत्स-प्तम्यर्थे' या पूर्व सूत्रातून 'ईदूत्' या पदाची अनुवृत्ति झाली असती व 'अदस्' शब्दाची ईदन्त व ऊदन्त रूपे प्रगृह्यसंज्ञक होतात असा 'अदस' या सूत्राचा अर्थ झाला असता व त्यामुळें 'इदूदेत्' या यथापठित पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'एत्' या पदाची अनुवृत्ति न व्हावी याकरिता या सूत्रात 'मात्' या पदाचे जें ग्रहण केले आहे ते ग्रहण करण्याची काही आवश्यकता राहिली नसती व 'ईदूदेत्' या पूर्व सूत्रातील 'ईदूदेत्' या समासिक पदातून 'ईदूत्' या एकादेशाची अनुवृत्ति करणे हा जो दोप 'एकयोगनिर्दिष्टानाम्'—परि १७—या परिभाषान्वये येतो तोहि टाळता आला असता आणि 'अदस्' शब्दाच्या 'अमुके' या एदन्त रूपाला प्रगृह्यसंज्ञा होण्याची आपत्ति देखील सहज टाळता आली असती. तसेच 'ईदूदेत् द्विवचन

प्रगृह्यम्' असे सूत्र पठित न करिता त्या ऐवजी 'एच्च द्विवचनम्' असे सूत्र 'अदसः' या सूत्राच्या लगेच पुढें पठित केले असते तर, या सूत्रातील 'च' या पदानें पूर्व सूत्रातून 'ईदूत्' चे अनुकर्षण झाले असते व 'प्रगृह्यम्' या पदाची त्या सूत्रातून अनुवृत्ति होऊन या सूत्राचा 'ईदूदेद्द्विवचन प्रगृह्यम्' असाच अर्थ झाला असता. सारांश वर सांगितल्याप्रमाणें तीन सूत्रें पठित केली असतीं तर सर्व इष्ट प्रयोजनें सिद्ध झाली असती व प्रकृत सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण टाळता आले असते व तसेंच एकदेशानुवृत्तिरूप दोषहि टाळता आला असता आणि मात्रालाघव देखील झाले असते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे )

शब्दरत्न—आरम्भसामर्थ्यादिति। ननु कार्यकालपक्षेऽनुनासिकप्रतिषेधेन चारितार्थ्यं, तत्पक्षे हि सञ्ज्ञाशास्त्रस्य न पृथग् बोधकत्व, "पूर्वत्रासिद्धम्" इति चातिदेशः कार्यार्थः। कार्यज्ञानं वाक्यार्थबोधोत्तरमिति यद्देशे वाक्यार्थबोधस्तद्देशस्थत्वमेव तस्य। किं च अधिकारः स। एवं च मुख्यदृष्ट्या अनुनासिकविधेरसिद्धत्वेन तदेकवाक्यतापन्नसञ्ज्ञाया अपि तद्दृष्ट्याऽसिद्धतया मुत्वशास्त्रेऽनुवृत्तपूर्वत्रासिद्धमित्यत्रत्यपूर्वशब्देन तदेकवाक्यतापन्नस्य "अदसो मात्" इत्यस्य ग्रहीतुमशक्यत्वम्। एतेन कार्यकालपक्षेऽपि पाठक्रमपूर्वत्वस्यानपगमेन सञ्ज्ञा प्रत्यसिद्धत्वं दुर्वारमित्यपास्तमिति, चेन्न, अप्रगृह्यादस इति न्यायेनैव सिद्धौ सामान्यसञ्ज्ञापृथक्करणसामर्थ्येन "प्लुतप्रगृह्या" इत्यत्राप्युपस्थितया तत्सामर्थ्येनासिद्धत्वबाधात्। 'हे ऽमुके' 'अमुका' इत्यादौ व्यर्थान्यनर्थविनाशप्रसङ्गात्, तयोरनभिधानाद्वा सूत्रमतेऽपि नानुनासिकप्रसङ्गात्। स्पष्टं चेदं भाष्ये॥

करतो की,) कार्यकालपक्षात ('अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः' सू. ११० या त्रैपादिक सूत्रानें होणाऱ्या) अनुनासिककार्याचा प्रतिषेध व्हावा याकरिता 'अदसो मात्' हे सूत्र चरितार्थ ठरते (व त्यामुळें प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें 'मूत्व, मीत्व' असिद्ध ठरत नाहीत हे म्हणणें बरोबर नाही ) कार्यकालपक्षात सज्ञासूत्र जेथें पठित आहे त्या प्रदेशात त्याच्या अर्थाचा बोध होत नसतो; (विधिसूत्रप्रदेशातच त्याच्या अर्थाचा बोध होत असतो ) 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ हें अतिदेशशास्त्र केवळ कार्यक्रम ठरविणारे, म्हणजे प्रथम सापादिक शास्त्रानें कार्य करावे व नतर त्रैपादिक पूर्वपूर्व शास्त्रानें कार्य केल्यावर उत्तरोत्तर त्रैपादिक शास्त्रानी प्राप्त होणारे कार्य करावे असा क्रम सागणारे, सूत्र आहे विधिसूत्राच्या अर्थाचा बोध झाल्यानतरच त्या सूत्रानें कोणते कार्य विहित आहे याचे ज्ञान होते. म्हणून ज्या प्रदेशात विधिसूत्राच्या अर्थाचा बोध होतो त्या प्रदेशातच सज्ञासूत्र आहे असे मानले पाहिजे—म्हणजे विधिसूत्रात सज्ञेचे ग्रहण केले असल्यास जेव्हा त्या सज्ञेचे विधान करणारे सूत्र त्या विधिसूत्राच्या प्रदेशात उपस्थित होते तेव्हा ते सज्ञासूत्र विधिसूत्रप्रदेशस्थ होत असल्यामुळें, ते त्या प्रदेशातच आहे असे मानावे लागते. दुसरे असे की 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ हें अधिकारसूत्र आहे, म्हणजे या अधिकारात पठित असलेल्या प्रत्येक सूत्राशी सबद्ध होणारें हे सूत्र आहे. त्यामुळें 'अदसोऽसे.' सू ४१९ या पूर्व त्रैपादिक शास्त्राच्या दृष्टीनें 'अणोऽप्रगृह्यस्य' सू ११० हे त्रैपादिक परशास्त्र असिद्ध ठरत असल्यामुळें ('अणोऽप्रगृह्यस्य' या त्रैपादिक परसूत्रानें अप्रगृह्य अन्त्य अणाला अनुनासिक कार्य करतेवेळी, या सूत्रात प्रगृह्यसज्ञेचे ग्रहण केले असल्यामुळें, 'यदा कार्यं तदा सज्ञा' या न्यायान्वयें कार्यकालपक्षात) जेव्हा 'अदसो मात्' हे प्रकृत सापादिक प्रगृह्यसज्ञाविधायक सूत्र त्या अनुनासिक कार्याचे विधान करणाऱ्या त्रैपादिक परसूत्राच्या प्रदेशात उपस्थित होऊन त्या सूत्राशीं एकवाक्यतापन्न होते तेव्हा ते प्रकृत सज्ञासूत्र अनुनासिक विधिसूत्रदेशस्थ झाल्यानें, तें सापादिक

सूत्र असून देखील, 'अदसोऽसे.' या त्रैपादिक पूर्व सूत्राच्या दृष्टीनें, अनुवृत्त होत असणाऱ्या 'पूर्वत्रासिद्धम्' या अधिकारसूत्रान्वयें, असिद्ध ठरते म्हणून त्या अधिकारसूत्रातील 'पूर्व' शब्दानें ('अणोऽप्रगृह्यस्य' या त्रैपादिक पर सूत्राशीं एकवाक्यतापन्न झालेल्या व तद्देशस्थ बनलेल्या) 'अदसो मात्' या सूत्राचे ग्रहण करता येणे अशक्य आहे, म्हणजे 'अदसोऽसे' या त्रैपादिक सूत्राच्या मानानें त्रैपादिकपरसूत्रदेशस्थ बनलेले 'अदसो मात्' हे पूर्व सूत्र आहे असे म्हणता येऊ शकत नाही व ते त्रैपादिकपरसूत्रदेशस्थ असल्यामुळें पर सूत्र आहे असे मानणे भाग पडते. अशी स्थिति असल्यामुळें, अष्टाध्यायीत जसा सूत्रपाठक्रम आहे तो, कार्यकालपक्षात देखील, बदलविता येत नसल्यामुळें, म्हणजे त्या पाठक्रमान्वयेंच सूत्राचे परापरत्व ठरविणे भाग पडत असल्यामुळें, 'अदसो मात्' या प्रकृत सापादिक संज्ञासूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक मुत्वकार्यविधायक 'अदसोऽसे' हे सूत्र असिद्ध ठरते असे जे कोणी म्हणतात ते त्याचे म्हणणे चूक ठरते. (येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,) ही शंका बरोबर नाही, कारण 'अणोऽप्रगृह्यादसोऽनुनासिक,' म्हणजे प्रगृह्यसंज्ञक व 'अदस्' शब्दाची रूपें खेरीज करून इतर पदाच्या अन्ती असलेला 'अण्' विकल्पेंकरून अनुनासिक होतो, असे त्या सूत्राऐवजी सूत्र केल्यानेंच ('अदस्' शब्दाच्या रूपातील अन्त्य 'अण्' अनुनासिक होऊ नये हे) इष्ट प्रयोजन साधता येऊ शकत असून देखील 'अदसो मात्' असे सामान्य प्रगृह्यसंज्ञाविधायक सूत्र मुद्दाम केले असल्यामुळें, त्या सूत्राच्या आरम्भसामर्थ्यानें 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या विधिसूत्राच्या प्रदेशात देखील 'अदसो मात्' हे सूत्र उपस्थित होते व त्या उपस्थितिसामर्थ्यानें ते सूत्र 'अदसोऽसे' या त्रैपादिक सूत्रानें होणाऱ्या 'मूत्व, मीत्व' कार्यांच्या असिद्धतेचा बाध करते, म्हणजे त्या कार्यांना सिद्ध ठरवित (दीक्षिताचे असे म्हणणे आहे की, 'अदसो मात्' या सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण करून, म्हणजे 'अदसोऽसे.' व 'एत ईत्'

या त्रैपादिक सूत्रातीं होणाऱ्या असिद्ध मूत्व मीत्व कार्यांचा अनुवाद करून, ते सूत्र मुद्दाम आरंभिले असल्यामुळें, त्या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें 'अदसोऽसे' व 'एत ईद्बहुवचने' या त्रैपादिक सूत्रानी होणारी मूत्व व मीत्व कार्यें असिद्ध ठरत नाहीत. 'अदसो मात्' या सूत्राच्या दृष्टीनें तीं कार्यें असिद्ध ठरतात असे मानल्यास, ते सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतेहि उदाहरण मिळणार नाही व ते सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. यावर शंकाकार असे म्हणतो की, 'अदसो मात्' हे सूत्र व्यर्थ ठरत नसून इतर रीतीनें चरितार्थ ठरत असल्यामुळे, या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें मूत्व, मीत्व कार्यें असिद्ध ठरतात हे दीक्षिताचे म्हणणे बरोबर मानता येत नाही 'अदसो मात्' हे सूत्र कसे व्यर्थ ठरत नाही व अन्य रीतीनें कसे चरितार्थ ठरते हे सिद्ध करण्याकरिता तो कार्यकालपक्षाचा आश्रय करून असे म्हणतो की, 'यदा कार्यं तदा संज्ञापरिभाषम्' या कार्यकालपक्षात संज्ञासूत्रें व परिभाषा विधि-सूत्राजवळ उपस्थित होऊन व त्या सूत्राशीं एकवाक्यतापन्न होऊन विधिसूत्रप्रदेशस्थ बनतात म्हणून 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः' सू ११० या सूत्रात 'प्रगृह्य' या संज्ञावाचक शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें, त्या विधिसूत्राजवळ 'अदसो मात्' हे प्रगृह्यसंज्ञेचे सूत्र उपस्थित होऊन त्या सूत्राशी एकवाक्यतापन्न झाले असता, 'अणोऽप्रगृह्यस्य' या त्रैपादिक उत्तर सूत्राचा जो प्रदेश आहे तोच 'अदसो मात्' या सापादिक संज्ञासूत्राचा प्रदेश होतो व अशा रीतीनें परत्रैपादिकसूत्रप्रदेशस्थ बनलेल्या 'अदसो मात्' या सूत्राच्या दृष्टीनें 'अदसोऽसे' व 'एत ईत्' हीं पूर्वत्रैपादिक सूत्रें असिद्ध ठरत नाहीत, आणि म्हणून त्या पूर्वत्रैपादिक सूत्रानीं झालेली 'मूत्व, मीत्व' कार्यें 'अदसो मात्' या परत्रैपादिकसूत्रप्रदेशस्थ सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नसल्यामुळें, 'अमू, अमी' याना प्रगृह्यसंज्ञा होते व त्यामुळें त्याचा अन्त्य 'अण्', 'अणोऽप्रगृह्यस्य' या सूत्रात 'अप्रगृह्यस्य' असा प्रतिषेध असल्यामुळें, अनुनासिक

होत नाही. अशा रीतीनें 'अदस्' शब्दाच्या ईदन्त, ऊदन्त रूपाना अनुनासिककार्याचा प्रतिषेध करण्याकरिता 'अदसो मात्' हे सूत्र चरितार्थ ठरत असल्यामुळें, ते सूत्र व्यर्थ ठरत नाहीं. म्हणून 'अदसो मात्' या सूत्राच्या दृष्टीनें 'मूत्व, मीत्व' सिद्ध न मानल्यास ते सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते असे जें दीक्षितानी म्हटले आहे ते योग्य ठरत नाही असा शकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'अदस्' शब्दाच्या ईदन्त व ऊदन्त रूपाना 'अणोऽप्रगृह्यस्य' या सूत्रानें होणाऱ्या अनुनासिककार्याचा प्रतिषेध करणे एवढेंच एक जर 'अदसो मात्' या सूत्राचे प्रयोजन असते तर, 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः' या सूत्राऐवजी 'अणोऽप्रगृह्यस्याऽऽनुनासिकोऽदसो न' असे सूत्र पठित केल्यानें तें प्रयोजन सहज साधता आले असत व ते प्रयोजन साधण्याकरिता, 'नैक प्रयोजन योगारम्भ प्रयोजयति' या न्यायान्वयें, 'अदसो मात्' असे स्वतत्र सामान्य प्रगृह्यसज्ञेचे सूत्र करण्याची काहीच गरज नव्हती असे असून देखील पाणिनीनें 'अदसो मात्' या सूत्रात 'मात्' या पदाचे ग्रहण करून, म्हणजे मूत्व मीत्व कार्याचा अनुवाद करून, ते सामान्य सूत्र मुद्दाम आरभिले असल्यामुळें, ते सामान्य सूत्र, 'प्लुतप्रगृह्य अचि नित्यम्' सू ९० या सापादिक सूत्रात 'प्रगृह्य' शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें, त्या सूत्राजवळ देखील आरभसामर्थ्यानें उपस्थित होऊन त्याशी एकवाक्यतापन्न होते व तद्देशस्थ बनते व त्यामुळें 'अदसोऽसे' व 'एत ईत्' या त्रैपादिक सूत्रानी होणाऱ्या मूत्व मीत्व कार्याच्या असिद्धत्वाचा बाध होऊन व 'अमू आसाते, अमी ईशा' इत्यादि स्थली 'अदस्' शब्दाच्या 'अमू, अमी' या ईदन्त व ऊदन्त रूपाना प्रगृह्यसज्ञा होऊन प्रकृतिभाव होतो व सधिकार्य होत नाही साराश 'अदसो मात्' हे प्रगृह्यसज्ञेचे सामान्य सूत्र 'मात्' या पदाचे ग्रहण करून मुद्दाम आरभिले असल्यामुळें, त्या आरभसामर्थ्यानेंच त्या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें, 'मूत्वमीत्व' कार्य त्रैपादिक असिद्ध शास्त्रानें

होणारीं असून देखील, सिद्ध ठरतात. तसे न मानल्यास ते सामान्य संज्ञासूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते हा जो दोष दीक्षितांनी मनोरमेंत दिला आहे तो योग्य ठरतो असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. येथें हे लक्षात ठेवावे की, शंकाकारानें वरील शंका करिताना यथोद्देशपक्षाचा आश्रय न करिता कार्यकाल-पक्षाचा जो आश्रय केला आहे त्याचे उघड कारण हें आहे की, यथोद्देशपक्षात संज्ञासूत्रें व परिभाषा जेथें पठित आहेत तो प्रदेश सोडीत नाहीत व विधिसूत्राच्या प्रदेशात जाऊन त्याशीं एकवाक्यता-पन्न होत नाहीत त्यामुळें यथोद्देशपक्षात 'अदसो मात्' हे सापादिक संज्ञा सूत्र 'अणोऽप्रगृह्यस्य' या त्रैपादिक सूत्राच्या प्रदेशात उपस्थित होत नाही व तद्देशस्थ बनत नाहीं आणि त्यामुळें त्या पक्षात ते सापादिक सूत्र 'अदसोऽसे. या त्रैपादिक सूत्राच्या मानानें केव्हांहि परसूत्र ठरू शकत नाहीं व 'अदसोऽमेः' हे त्रैपादिक सूत्र त्या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें सिद्ध ठरणे शक्य नाही. परन्तु कार्यकाल-पक्षाची गोष्ट वेगळी आहे. त्या पक्षात पूर्वी सांगितल्याप्रमाणे संज्ञासूत्रें व परिभाषा विधिसूत्राच्या प्रदेशात उपस्थित होऊन व त्या सूत्राशी एकवाक्यतापन्न होऊन विधिसूत्रप्रदेशस्थ बनतात, आणि व्याकरण शास्त्रात यथोद्देशपक्ष व कार्यकालपक्ष हे दोन्ही पक्ष मानले असल्यामुळें व या दोन पक्षापैकीं जो पक्ष इष्ट प्रयोजनाची सिद्धि करण्याकरिता उपयोगी पडत असेल त्या पक्षाचा आश्रय करता येत असल्यामुळें, शंकाकारानें कार्यकालपक्षाचा आश्रय करून वरील शंका केली आहे आणि त्या शंकेचे निरसन देखील शब्दरत्नकारानीं कार्यकालपक्ष मानूनच केले आहे. परतु प्रकृत सूत्रावरील भाष्यात, -१-१-१२- भाष्यकारानी या सूत्राचे दोन्ही पक्षात समर्थन केले आहे या भाष्यात 'मात्प्रगृह्यसंज्ञायां तस्यासिद्धत्वादयावेकादेशप्रतिषेधः' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात 'मात्प्रगृह्यसंज्ञायां तस्य ईत्वस्यऊत्वस्यचाऽसिद्धत्वादयावेकादेशाः प्राप्नुवन्ति, तेषां प्रतिषेधो वक्तव्यः। अमी अत्र अमी आसते, अमू

अत्र, अमू आसाते ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, प्रकृत सूत्रानें मकारापुढील वर्णाला प्रगृह्यसंज्ञा करतेवेळीं त्या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें 'एत ईद्बहुवचने' व 'अदसोऽसेः' या त्रैपादिक सूत्रानी अनुक्रमें होणारे ईत्व व ऊत्व असिद्ध असल्यामुळें, जे 'अय्, आव्' आदेश आणि एकादेश प्राप्त होतात त्याचा निषेध केला पाहिजे. उदाहरणार्थ 'अमी' या 'अदस्' शब्दाच्या रूपात झालेले मकार व ईकार असिद्ध असल्यामुळें 'अदे' असेच 'अमी' चे मूळ-रूप आहे असे मानल्यानें, त्याच्या पुढें 'अत्र' हें पद आल्यानें, 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें पूर्वरूप एकादेशाची प्राप्ति होते व तसेच त्यापुढें 'आसाते' हे पद आल्यानें, 'एचोऽयवायाव.' सू. ६१ या सूत्रानें 'अय' आदेशाची प्राप्ति होते त्याचप्रमाणे 'अदस्' शब्दाच्या 'अमू' या रूपात झालेले मकार व ऊकार असिद्ध असल्या-मुळें 'अदौ' असेच रूप आहे असे मानल्यानें, त्या रूपापुढें 'अत्र' किंवा 'आसाते' हे पद आलें असता, 'आव्' आदेशाची प्राप्ति आहे. हे आदेश न व्हावे व प्रगृह्यसंज्ञानिमित्तक प्रकृतिभाव व्हावा याकरिता त्या आदेशाचा प्रतिषेध केला पाहिजे. असे सांगून भाष्य-कार पुढें म्हणतात.—'ननु च प्रगृह्यसंज्ञावचनसामर्थ्यादयादयो न भविष्यन्ति । वचनार्थो हि सिद्धे । नेद वचनाल्लभ्यम् । अस्ति ह्यन्यदेतस्यवचने प्रयोजनम् । किम् ? । यत्सिद्धेप्रगृह्यसंज्ञाकार्यं तदर्थमेतत्स्यात्—अणोऽप्रगृह्यस्यानुनासिक. इति । नैक प्रयोजन योगारम्भ प्रयोजयति । यद्येतावत्प्रयोजन स्यात्तत्रैवाय ब्रूयात्—अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकोऽदसो नेति । कार्यकालहि संज्ञापरिभाषम् । यत्र कार्यं तत्रोपस्थित द्रष्टव्यम् । प्रगृह्य प्रकृत्येति । उपस्थितमिद भवति अदसो मादिति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'अमी अत्र' इत्यादि वर दिलेल्या उदाहरणामध्यें जर अय्, आव् आदेश व पूर्वरूप एकादेश केले तर प्रकृत प्रगृह्यसंज्ञाविधायक सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल म्हणून प्रकृत सूत्राच्या आरंभ-सामर्थ्यानेंच ते आदेश होणार नाहीत आणि म्हणून वरील प्रतिषेधक

वार्तिक पठित करण्याची काही गरज नाही. यावर भाष्यकार 'वचनार्थो हि सिद्धे' हे वार्तिक पठित करून अशी शंका उपस्थित करतात की, प्रकृत सूत्राच्या आरंभसामर्थ्याने 'अय्, आव्' इत्यादि आदेश होणार नाहीत, कारण तसे आदेश झाल्यास प्रकृत सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते, असा जो दोष वर दाखविला आहे तो दोष वास्तविक येत नाही ज्या ठिकाणी प्रकृत सूत्राच्या दृष्टीनें 'ईत्व, ऊत्व' सिद्ध ठरतात तशा ठिकाणी प्रकृत सूत्राचा उपयोग होत असल्यामुळें ते सूत्र तशा स्थली सावकाश ठरते. उदाहरणार्थ 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः' या उत्तर त्रैपादिक सूत्रानें अनुनासिक-कार्य करतेवेळी त्या सूत्रात 'प्रगृह्य' या संज्ञावाचक शब्दाचे ग्रहण केले असल्यामुळें, जेव्हा प्रकृत संज्ञासूत्र त्या विधिसूत्राच्या प्रदेशात कार्यकालपक्षात उपस्थित होऊन व त्याशी एकवाक्यतापन्न होऊन तद्देशस्थ बनते तेव्हा 'अदसोऽसे.' या पूर्वत्रैपादिक सूत्राच्या मानानें प्रकृत सूत्र परत्रैपादिक सूत्रदेशस्थ होत असल्यामुळें परसूत्र ठरते आणि तेव्हा 'अदसोऽसे ' व 'एत ईत्' या सूत्रानी होणारी 'मूत्व, मीत्व' कार्ये त्याच्या दृष्टीनें, म्हणजे त्या सूत्रानें होणाऱ्या प्रगृह्यसंज्ञेच्या दृष्टीनें, सिद्ध ठरतात. त्यामुळें 'अदस्' शब्दाच्या 'अमू, अमी' या ऊदन्त व ईदन्त रूपाना, 'अणोऽप्रगृह्यस्य' या सूत्रात 'अप्रगृह्यस्य' असा प्रतिषेध असल्यामुळें, त्या सूत्रानें होणारे अनुनासिककार्य होत नाही. अशा रीतीनें अनुनासिक कार्याचा प्रतिषेध व्हावा याकरिता 'अदसो मात्' हे सूत्र चरितार्थ ठरत असल्यामुळें, या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानेंच 'अय् आव्' इत्यादि आदेश होऊ शकणार नाहीत हे म्हणणें अयोग्य ठरते आणि म्हणून वरील प्रतिषेधक वार्तिक मानणे आवश्यक आहे भाष्यकार अशी शंका उपस्थित करून त्या शंकेवर असें उत्तर देतात की, 'अणोऽप्र-गृह्यस्य' या सूत्रानें होणाऱ्या अनुनासिक कार्याचा प्रतिषेध करणें एवढेंच जर 'अदसो मात्' या सूत्राचे प्रयोजन असते तर, 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः' या सूत्राऐवजी 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकोऽदसो न'

असे सूत्र केल्यानें ते प्रयोजन सहज साधता आले असते व तेवढें एक प्रयोजन साधण्याकरिता 'नैक प्रयोजन योगारम्भ प्रयोजयति,' म्हणजे एकाच विशेष उपयोगाकरिता सामान्य सूत्र केले जात नसतें, या न्यायान्वयें 'अदसो मात्' असे स्वतंत्र सामान्य प्रगृह्यसंज्ञेचे सूत्र करण्याची काहीच गरज नव्हती. असे असून देखील पाणिनीनें 'अदसो मात्' असे सामान्य सूत्र मुद्दाम आरंभिले असल्यामुळें, ते सूत्र कार्यकालपक्षात 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या सापादिक शास्त्राशी देखील एकवाक्यतापन्न होऊन सापादिक सूत्र ठरतेच आणि त्या सूत्रानें 'अमू, अमी' याना प्रगृह्यसंज्ञा झाली असता, 'अय् आव्' इत्यादि *आदेश न होता*, '*प्लुतप्रगृह्या*' सू. ९० *या* सूत्रानें प्रगृह्यसंज्ञानिमित्तक प्रकृतिभाव होईलच, आणि म्हणून वरील प्रतिषेधक वार्तिक मानण्याची काही आवश्यकता नाही. हे वरील भाष्य कार्यकालपक्षाला घेऊनच भाष्यकारानी लिहिले आहे. यथोद्देशपक्षाचा आश्रय केला असता, भाष्यकार 'आश्रया-सिद्धत्व च यथा रोरुत्वे' असे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना म्हणतात.— 'आश्रयासिद्धत्व भविष्यति, तद्यथा रुरुत्वे आश्रयासिद्धो भवति । किं पुन कारण रुरुत्वे आश्रयासिद्धो भवति न पुनयत्रैव रु सिद्धस्तत्रैवोत्त्वमप्युच्यते ?। नैव शक्यम् । असिद्धेह्युत्वे आद्गुणाप्रसिद्धि । असिद्धे ह्युत्वे *आद्गुणस्याप्रसिद्धि स्यात् । वृक्षोऽत्र । प्लक्षोऽत्र । तस्मात्त्राश्रया-*सिद्धत्वमेषितव्यम् । तत्र यथाश्रयासिद्धत्व भवत्येवमिहापि भवि-ष्यति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'अतो रोरप्लु-तादप्लुते' सू. १६३ या सापादिक सूत्रात त्रैपादिक सूत्रानी होणाऱ्या रुत्वाचा अनुवाद करून त्या 'रु'चे जागी 'उ' होणे सांगितले असल्यामुळें, ज्याप्रमाणे त्या उत्वाच्या दृष्टीनें 'रुत्व' त्रैपादिक असून देखील सिद्ध समजले जातें त्याचप्रमाणें, 'अदसो मात्' या प्रकृत सापादिक सूत्रात त्रैपादिक सूत्रानी होणाऱ्या 'मुत्व, मीत्व' कार्यांचा अनुवाद करून मकारापुढील ईकाराला व ऊकाराला प्रगृह्यसंज्ञा होणे

सांगितले असल्यामुळें, त्या सापादिक प्रगृह्यसंज्ञेच्या दृष्टीनें त्रैपादिक असिद्ध 'मूत्व, मीत्व' कार्यें सिद्ध आहेत असे मानले पाहिजे. रुत्वावर 'उत्व' अवलंबून असल्यामुळें सापादिक उत्वकार्याच्या दृष्टीनें त्रैपादिक रुत्व जरी सिद्ध ठरते तरी, पाणिनीनें 'अतो रो' हे सूत्र सपादसप्ताध्यायीत का पठित केले व ज्या ठिकाणीं रुत्व आपोआप सिद्ध ठरते अशा ठिकाणी, म्हणजे 'रो सुपि' या त्रैपादिक सूत्रानंतर, ते सूत्र का पठित केले नाही ? तसे करणे शक्य नव्हते तसे केले असतें तर, 'आद्गुण' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक रुत्व असिद्ध ठरले असते व त्यामुळें 'रु' चे जागी उकार झालाच नाहीं असे मानणे भाग पडले असते व त्यामुळें 'आद्गुण.' या सूत्रानें होणारा गुणरूप एकादेश झाला नसता आणि 'वृक्षोऽत्र, प्लक्षोऽत्र' हीं इष्टरूपें सिद्ध होऊं शकली नसती, म्हणून पाणिनीनें 'अतो रो' हें सूत्र, सपादसप्ताध्यायीत पठित केले हे अगदी योग्य केले आणि ज्याप्रमाणे 'अतो रो' या सूत्रात रुत्वाचा अनुवाद करून उत्व होणें सांगितले असल्यामुळें उत्वाच्या दृष्टीनें रुत्व सिद्ध मानले जाते त्याचप्रमाणे 'अदसो मात्' या प्रकृत सूत्रात मूत्व मीत्व कार्यांचा अनुवाद करून प्रगृह्यसंज्ञा होणे सांगितले असल्यामुळें, त्या सूत्रानें होणाऱ्या प्रगृह्यसंज्ञेच्या दृष्टीनें मूत्व मीत्व कार्यें सिद्ध मानली पाहिजेत अशा रीतीनें कार्यकालपक्ष व यथोद्देशपक्ष या दोन्ही पक्षांत भाष्यकारांनी प्रकृत सूत्राचे समर्थन केले आहे या भाष्यात कार्यकालपक्ष मानून भाष्यकारांनीं जी शंका उपस्थित केली आहे तीच शंका शब्दरत्नातील वरील पंक्तीत केली आहे व त्या शंकेचे निरसन जसं भाष्यकारांनी केले आहे तसेच शब्दरत्नकारांनीहि केले आहे, आणि म्हणूनच 'स्पष्ट चेदं भाष्ये' असे पुढील पंक्तीत शब्दरत्नकारांनीं म्हटले आहे ) 'हे अमुक, अमुका' इत्यादि स्थलीं (अणोऽप्रगृह्यस्याऽनुनासिक' सू ११० या सूत्रात सांगितलेली विभाषा) व्यवस्थित विभाषा मानल्यानें किंवा 'अमुक, अमुका' हे प्रयोग भाषेंत रूढ नाहींत असें मानल्यानें, सूत्रकार पाणिनीच्या मते देखील अशा

रूपातील अन्त्य ' अण् ' अनुनासिक होत नाहीं असा भाष्याचा आशय आहे. वर जें विवेचन केले आहे तें प्रकृत सूत्रावरील भाष्यात सांगितले आहे ( शब्दरत्नातील प्रकृत पङ्क्तीत व्यवस्थित विभाषा मानावी इत्यादि जें म्हटले आहे ते प्रकृत सूत्रावरील भाष्यात सांगितले नसून, शब्दरत्नातील पूर्व पङ्क्तीत जी शङ्का उपस्थित केली आहे व तिचे जें निरसन केले आहे त्याची भाष्यात चर्चा केली आहे व त्या चर्चेचाच अनुवाद त्या पङ्क्तीत केला आहे आणि तें भाष्य त्या पङ्क्तीचे विवरण करताना वर दिलेंच आहे ' हे असुक असुका ' हीं ' अदस् ' या सर्वनामाहून अकच् प्रत्यय केल्यावर बनलेली रूपें आहेत. 'अव्ययसर्वनाम्नामकच्प्राक्टेः' सू २०२६ या सूत्रानें 'अदस्' या सर्वनामास ' अकच् ' प्रत्यय केला असता, तो प्रत्यय ' अदस् ' च्या ' टी ' पूर्वी, म्हणजे ' अस् ' च्या पूर्वी, होत असल्यामुळें ' अदकस् ' असे रूप होतें व या साकच् रूपाला देखील ' तन्मध्यपतितस्तद्ग्रहणेन गृह्यते ' –परि. ९०–या न्यायान्वयें सर्वनाम–सञ्ज्ञा होते. ' अदकस् + सु ' या स्थलीं ' औत्वप्रतिषेध. साकचस्य वा वक्तव्य. सादुत्व च ' – सू ४३७ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें, 'अदस्' यातील अन्त्य सकाराचे जागी 'अदस औ सुलोपश्च' सू. ४३७ या सूत्रानें पावलेला 'औ' आदेश न करिता 'अदकस्' यातील दकाराचे जागी 'तदोः स सावनन्त्योः' सू ३८१ या सूत्रानें सकार करून व 'त्यदादीनाम.' सू. २६५ या सूत्रानें 'अदकस्' यातील अन्त्य सकाराचे जागी अकार करून आणि 'अतो गुणे' सू १९१ या सूत्रानें पररूप एकादेश करून 'असक' असे रूप झाले असता, सकारापुढील अकाराचे जागी वरील वार्तिकान्वयें उकार केल्यास 'असुक ' असे वैकल्पिक रूप सिद्ध होतें. 'असुक' या अदन्त शब्दाहून 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें स्त्रीत्वबोधक 'टाप् = आ' प्रत्यय केल्यास स्त्रीलिङ्गाचे 'असुका' असे प्रथमेच्या एकवचनाचे रूप सिद्ध होतें 'असुक' या शब्दाचे सबुद्धीचे रूप करिताना 'एङ्ह्रस्वात्सम्बुद्धेः' सू. १९३ या सूत्रानें

'सु' प्रत्ययाचा लोप होऊन 'हे असुक' असे रूप सिद्ध होतें. 'हे असुक, असुका' ही दोन्ही रूपें जरी 'अदस्' शब्दाला 'अकच्' प्रत्यय केल्यानें झाली आहेत तरी, तो प्रत्यय 'अदस्' या शब्दस्वरूपाच्या 'टि' च्या पूर्वी झाला असून त्या शब्दातील आदि व अन्त्य वर्णांच्या मध्यें पडला असल्यामुळें त्या प्रत्ययासह बनलेला 'अदकस्' हा शब्द 'अदस्' शब्दच आहे असे 'तन्मध्यपतित:' –परि ९०–या न्यायान्वयें मानावे लागत असल्यामुळें, तीं रूपें 'अदस्' शब्दाचीच रूपें आहेत असे मानले पाहिजे. तसे मानल्यास व 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिक:' या सूत्राऐवजी 'अणोऽप्रगृह्यादसोऽनुनासिक:' असा भाष्यानुसार शब्दरत्नात सुचविलेला सूत्रपाठ मानल्यास, 'हे असुक, असुका' यातील अन्त्य अणाला अनुनासिककार्याची प्राप्ति होत नाही हे खरे. पण पाणिनीनें तें सूत्र जसें पठित केले आहे त्या सूत्रपाठान्वयें त्या दोन रूपांतील अन्त्य अणाला अनुनासिककार्याची प्राप्ति होते व अशा रीतीनें यथापठित सूत्रानें अनुनासिककार्य होत असून वर सुचविलेल्या सूत्रपाठान्वयें अनुनासिककार्य होत नसल्यामुळें रूपात फरक पडतो. म्हणून शब्दरत्नातील शंकाग्रन्थात सुचविलेला सूत्रपाठ भिन्नफलक ठरत असल्यामुळे तो पाठ योग्य मानता येत नाही अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिक:' या यथापठित सूत्रानें होणारें अनुनासिककार्य वैकल्पिक असल्यामुळें, भाष्यकारांनीं जो पाठ सुचविला आहे व जो पाणिनीय सूत्रपाठ आहे त्या दोन पाठान्वये सिद्ध होणाऱ्या रूपांत फरक न पडावा याकरितां, 'अणोऽप्रगृह्यस्य' या सूत्रांत सांगितलेली विभाषा व्यवस्थितविभाषा मानणें योग्य आहे. तसे मानले असतां, जरी पाणिनीय सूत्रपाठान्वयें 'हे असुक, असुका' यांतील अन्त्य अणाला अनुनासिककार्याची विकल्पेंकरून प्राप्ति आहे तरी त्या रूपाचा अन्त्य 'अण्' पाणिनीयमतें देखील अनुनासिक होत नाही असे मानल्यानें, दोन्ही मतांत सिद्ध होणाऱ्या

रूपामध्यें काही फरक न पडता एकच प्रकारची रूपें सिद्ध होतात. दुसरे असे की, वर दिलेली दोन रूपें भाषेत रूढ नसून केवळ काल्पनिक रूपें आहेत असे मानले असता, वरील शंका आपोआपच अनुपपन्न ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे )

मनोरमा—"शे" छान्दसमपीद संदर्भशुद्ध्यर्थमुक्तम् । वस्तुतस्त्वनुकरणार्थतया लोकार्थमपि सम्भवत्येव, 'त्वे रायो' 'मे रायः' इत्यादौ त्वे इति, मे इति इत्यनुकरणे प्रयोजनलाभात् । अस्मे इति । अस्मभ्यमित्यर्थः । भ्यसः "सुपां सुलुक्" इति शे आदेशः । "शेषे लोपः" ॥

'शे' सू १०२ हे सूत्र जरी वेदात लागू पडणारे सूत्र आहे तरी (प्रगृह्यसंज्ञाप्रकरणात हें सूत्र अष्टाध्यायीत पठित केले असल्यामुळें) सूत्रसंदर्भ एकदम लक्षात यावा याकरिता (वैदिक प्रक्रियेंत न सांगता) येथेंच ते सांगितलें आहे वास्तविक 'शे' प्रत्ययान्त वैदिक शब्दाचें अनुकरण केल्यास, भाषेंत देखील तसा 'शे' प्रत्ययान्त शब्द मिळण्याचा संभव आहे, म्हणजे लौकिक प्रयोगांत देखील या सूत्राचा उपयोग होणें संभवनीय आहे. 'त्वे रायः, मे रायः' इत्यादि वैदिक प्रयोगांतील 'त्वे, मे' यांचे 'त्वे इति, मे इति' असे अनुकरण केल्यास ('त्वे, मे' यांना प्रगृह्यसंज्ञा होऊन वरील उदाहरणांत प्रगृह्यसंज्ञानिमित्तक प्रकृतिभाव व्हावा हें) प्रयोजन या प्रकृत सूत्राच्या योगानें निष्पन्न होतें. (प्रकृत सूत्रावरील कौमुदींत दिलेल्या 'अस्मे इन्द्राबृहस्पती' या उदाहरणांतील) 'अस्मे' या शब्दाचा 'अस्मभ्यम्' असा अर्थ आहे. 'अस्मद् + भ्यस्' या स्थलीं 'सुपां सुलुक्' सू ३५६१ या सूत्रानें 'भ्यस्'चे जागीं 'शे = ए' हा आदेश झाला आहे, व 'शेषे लोपः' सू ३८५ हें सूत्र नंतर प्रवृत्त केल्यानें 'अस्मे' असें रूप सिद्ध होतें. ('शेषे लोपः' या सूत्राचा कौमुदींत दोन प्रकारें अर्थ केला आहे. प्रथम अर्थामध्यें 'शेषे' हें पद, या सूत्रात 'अष्टन आ विभक्तौ' या पूर्व सूत्रांतून 'विभक्तौ = विभक्ति-

प्रत्यये' हं पद अनुवृत्त करून त्या अनुवृत्त पदाचे, विशेषण मानले आहे व 'शेषे विभक्तौ' या पदाचा 'आत्वयत्वनिमित्तेतरविभक्तौ परत' असा अर्थ करून 'लोप' या पदाचा 'अलोऽन्त्यस्य' या सूत्रान्वयें 'अन्त्यस्य लोपः' असा अर्थ केला आहे. या प्रथम अर्थान्वयें 'अस्मद् + ए' या स्थली अन्त्य दकाराचा लोप केल्यावर 'अस्म + ए' अशी स्थिति झाली असता, 'अस्म' यातील अन्त्य अपदान्त अकारापुढें 'ए' हा गुणसंज्ञक वर्ण असल्यामुळें 'अतो गुणे' सू १९१ या सूत्रानें पररूप एकादेश केल्यानें 'अस्मे' हें रूप सिद्ध होते दुसरा अर्थ असा की, 'शेषे इति सप्तमी स्थानिनोऽधिकरणत्वविवक्षया। तेन मपर्यन्ताच्छेषस्य अदित्यस्य लोप।' या द्वितीय अर्थान्वयें 'अस्मद् + ए' या स्थली 'अस्मद्' यांतील मकारापुढें असलेल्या 'अद्' या वर्णसमूहाचा, म्हणजे 'टि' चा, लोप केल्यानें 'अस्म् + ए = अस्मे' असे रूप सिद्ध होते सारांश दोन्ही अर्थान्वयें 'अस्मे' असेच रूप होतें)

शब्दरत्न—छान्दसमिति। शे आदेशस्यच्छान्दसत्वादिति भावः। मे इतीत्यनुकरण इति। प्रकृतिवदनुकरणमित्यतिदेशेन पदत्वात्पदान्तत्वप्रयुक्त प्रकृतिभावस्तत्र, तेनातिदेशेन प्रगृह्यत्व तु न। त्वे राय इत्यादावनुकार्ये फलाभावेन प्रगृह्यत्वाप्रवृत्त्या तदनुकरणे ऽतिदेशेनासिद्धयोपदेशप्रवृत्तिरेव वाच्येति भावः॥

'छान्दसम्' असे जें मनोरमेंत म्हटले आह त्याचे कारण हे की, (जरी प्रकृत सूत्रात 'छन्दसि' हे पद घातले नाही व तें पद कोणत्याहि पूर्व सूत्रातून अनुवृत्त होत नाही तरी 'सुप्' या विभक्तिप्रत्ययाचे जागी 'सुपा सुलुक्' सू. ३५६१ या सूत्रानें होणारा) 'शे' हा आदेश वेदातच होत असतो. 'त्वे इति, मे इति इत्यनुकरणे प्रयोजनलाभात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, 'प्रकृतिवदनुकरण भवति'–परि. ३६– या अतिदेशान्वयें (भेदानुकरणपक्षात) 'त्वे इति, मे इति' या

अनुकरणस्थली (अनुकार्य 'त्वे, मे' हीं पदें असल्यामुळें) 'त्वे, मे' या अनुकरणाना पदसंज्ञा होत असल्यामुळें (व 'सम्बुद्धौ शाकल्यस्य' सू १०५ या सूत्रावरील मनोरमेंत सांगितल्याप्रमाणे 'प्लुतप्रगृह्या' सू ९० या सूत्रात 'एङ पदान्तादति' या पूर्व सूत्रातून 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति होत असल्यामुळें) पदान्तत्वरूप निमित्तानें होणारा प्रकृतिभाव होतो (पण प्रकृतिभाव होण्यास 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू ९० या सूत्रान्वयें ज्या प्रगृह्यसंज्ञची आवश्यकता आहे ती) प्रगृह्यसंज्ञा त्या अतिदेशानें 'त्वे, मे' या अनुकरणाचे ठिकाणी येऊ शक्त नाहीं, (कारण अनुकार्याला जर प्रगृह्यसंज्ञा असेल तरच ती संज्ञा अनुकरणाचे ठिकाणी वरील अतिदेशान्वयें येऊ शकते पण) 'त्वे राय, मे राय' या अनुकार्यस्थली 'त्वे, मे' या अनुकार्याचे ठिकाणी प्रगृह्यसंज्ञेची प्रवृत्ति होऊ शकत नाही, म्हणजे त्याना प्रगृह्यसंज्ञा होऊ शकत नाही, कारण त्याना प्रगृह्यसंज्ञा केल्यानें कोणतेहि फल निष्पन्न होत नाहीं (प्रगृह्यसंज्ञा केल्यानें दोन फले निष्पन्न होऊ शकतात (१) अच् पुढें आला असता, 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम' या सूत्रान्वयें नित्य प्रकृतिभाव होणे, (२) प्रगृह्य 'अण्' पदान्ती असून त्यापुढें अवसान असता, 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिक' सू ११० या सूत्रानें होणारे अनुनासिक-कार्य तशा अणाला न होणे 'त्वे राय, मे राय' या अनुकार्यस्थली 'त्वे, मे' याच्या पुढें अच् नसून रकार हा हल् असल्यामुळें, त्याना प्रगृह्यसंज्ञा केल्यानें प्रकृतिभावरूप प्रथम फल निष्पन्न होऊ शकत नाहीं आणि तसच 'त्वे, मे' या अनुकार्यातील अन्त्य एकार 'अण' नसल्यामुळें व त्यापुढें अवसानहि नसल्यामुळें अनुनासिक कार्याची प्राप्तीच होत नाही आणि त्यामुळें अनुनासिकरूप कार्याचा प्रतिषेध करण हहि द्वितीय फल संभवत नाही सारांश अनुकार्यस्थली वरील दोन्ही फलाचा अभाव असल्यामुळें, 'त्वे, मे' या अनुकार्याचे ठिकाणी प्रगृह्यसंज्ञा प्रवृत्त होऊ शकत नाही मग अनुकार्यानाच जर प्रगृह्य-संज्ञा नाही तर 'प्रकृतिवदनुकरणं भवति' या अतिदेशानें ती संज्ञा

अनुकरणाचे ठिकाणी कशी येऊ शकणार ? सारांश) अतिदेशानें 'त्वे, मे' या अनुकरणाचे ठिकाणी प्रगृह्यसंज्ञा प्राप्त होऊ शकत नसल्यामुळें त्यांना ती प्रगृह्यसंज्ञा प्राप्त होण्याकरिता, 'शे' हें प्रकृत सूत्र प्रवृत्त करणें आवश्यक आहे. (या सूत्रान्वयें 'त्वे इति, मे इति' या अनुकरणस्थळी 'त्वे, मे' या 'शे' प्रत्ययान्त अनुकरणांना प्रगृह्यसंज्ञा होऊन 'प्लुतप्रगृह्या' सू ९० या सूत्रान्वयें प्रकृतिभाव होतो व अशा रीतीनें भाष्यें–आधुनिक पदपाठात–देखील प्रवृत्त सूत्राचा उपयोग करता येऊ शकत असल्यामुळें, हे सूत्र वैदिक प्रक्रियेंत न सांगता येथेंच सांगितलें आहे हा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे असें शब्दरत्नकार म्हणतात )

मनोरमा––"निपात" अनाङिति पर्युदासादेवाजरूपनिपाते लब्धे निपातग्रहणमुत्तरार्थं स्पष्टार्थमिहैव कृतम् । आ एवमिति । पूर्वं प्रक्रान्तस्य वाक्यार्थस्यान्यथात्वद्योतकोऽयमाकारः । पूर्वमित्थं नामस्था इदानीं त्वेव मन्यसे इत्यर्थः । आ एव किलेति । स्मरणद्योतकोऽयमाकारः तथा च भाष्यम्––

"ईषदर्थे क्रियायोगे मर्यादाभिविधौ च यः ।
एतमातं ङितं विद्याद्वाक्यस्मरणयोरङित् ।।" १ ।। इति ।

अत्र अङिल्लक्षण एव तात्पर्यं, लाघवात् । अन्यस्य ङित्त्वं त्वर्थसिद्धम् । ईषदर्थेत्यादिस्तु अवयुत्यानुवाद. । एवं च 'अभ्र आँ अप' इत्यत्र सप्तम्यर्थवृत्तेरप्याकारस्य ङित्वात् "आङोऽनुनासिकश्छन्दसि" इति प्रवर्तते इति भाव. ।।

'निपात एकाजनाङ्' सू १०३ या सूत्रात 'अनाङ्' असा पर्युदास असल्यामुळें त्या पर्युदासानेंच एकाच्स्वरूप, म्हणजे ज्यात केवळ एक अच् असून इतर कोणताहि वर्ण नाही अशा, निपाताचें ग्रहण झालेंच असतें, (कारण 'अनाङ्' हा पर्युदास असल्यामुळें, 'नञिवयुक्तमन्यसदृशाधिकरणे'–परि ७५–या परिभाषान्वयें 'अनाङ्' याचा 'आङ्' हून भिन्न पण 'आङ्' सदृश असा अर्थ होतो 'आङ्'

हा एकाच्‌रूप निपात असल्यामुळें, तद्भिन्न पण तत्सदृश असा इतर एकाच्‌ निपातच होऊ शकतो. म्हणून प्रकृत सूत्रात 'निपातः' या पदाचे ग्रहण करण्याची वास्तविक काहीं आवश्यकता नव्हती) तरी पण '*निपात*' *या शब्दाची* ('*ओत्*' *या*) उत्तरसूत्रात अनुवृत्ति व्हावी व प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट व्हावा याकरिता प्रकृत सूत्रातच 'निपात' या शब्दाचे ग्रहण केले आहे. (प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'आ एव नु मन्यसे' हे जें उदाहरण दिले आहे त्या उदाहरणातील ङित्‌ नसणारा) 'आ' हा निपात, पूर्वी जें वाक्य उचारले आहे त्या वाक्याच्या अर्थाहून उलट अर्थाचा, द्योतक आहे व त्या उदाहरणाचा 'पूर्वमित्थ नामस्था इदानी त्वेव मन्यसे,' म्हणजे पूर्वी तू असे मानत नव्हतास पण आता असे मानतोस, असा अर्थ आहे. (या उदाहरणाचा वर जो अर्थ दिला आहे त्यात 'पूर्वमित्थ नामस्थाः' हे पूर्ववाक्य धरून त्या वाक्याचा जो अर्थ आहे त्याच्या उलट अर्थाचे प्रतिपादन करणारे 'इदानी त्वेव मन्यसे' हे उत्तर वाक्य आहे व पूर्वी जो ग्रह झाला होता त्याहून आता वेगळ्या प्रकारचा ग्रह झाला आहे या अर्थाचे प्रतिपादन करणारा 'आ' हा अङित्‌ निपात आहे) 'आ एव किल तत्‌' या (कौमुदीत दिलेल्या दुसऱ्या) उदाहरणातील 'आ' हा अङित्‌ निपात 'स्मरण' या अर्थाचा वाचक आहे. 'ईषदर्थे क्रियायोगे मर्यादाभिविधौ च यः। एतमात ङित विद्याद्वाक्यस्मरणयोरङित्‌ ॥' ही कारिका भाष्यात दिली आहे (व या कारिकेत 'आङ्‌' या ङित्‌ निपाताचे व तसेच 'आ' या अङित्‌ निपाताचे अर्थ दिले आहेत) परन्तु या कारिकेत अङित्‌ 'आ' या निपाताचेच अर्थ सागण्यात तात्पर्य आहे, कारण तसे मानण्यात लाघव आहे. (प्रगृह्यसंज्ञा 'आङ्‌' या निपाताला होत नसून 'आ' या अङित्‌ निपाताला होत असल्यामुळें, भाष्यकारानी 'आ' या निपाताचेच सर्व अर्थ सागण्याच्या हेतूनें वरील कारिका पठित केली आहे व त्या ओघात 'आङ्‌' या निपाताचे सर्व अर्थ न सागता काही मुख्य अर्थ सागितले आहेत.) अङित्‌ 'आ' या निपाताचे

वरील कारिकेत जे दोन अर्थ सांगितले आहेत त्याहून भिन्न अर्थाचा वाचक 'आङ्' हा निपात आहे हे आपोआपच सिद्ध होते. वरील कारिकेत 'आङ्' या ङित् निपाताचे जे अर्थ सांगितले आहेत (ते अर्थ परिगणनरूपानें सांगितले नसून त्या निपाताचे जे अनेक अर्थ आहेत त्यांपैकी काहीं मुख्य अर्थ घेऊन) त्याचा पृथक्‌रूपानें अनुवाद केला आहे. असे असल्यामुळेंच, अभ्र आँ अप' या वैदिक उदाहरणांत 'आँ' हा ङित् निपात जरी सप्तमीविभक्तीच्या अर्थाचा वाचक आहे तरी (व वरील कारिकेत 'आङ' या निपाताचा तसा अर्थ सांगितला नाही तरी) 'आँङोऽनुनासिकश्छन्दसि' सू. ३५२५ हे सूत्र प्रवृत्त होते. (व 'आङ्' हा ङित् निपात अनुनासिक होतो. भाष्यकारिकेत 'आङ्' या निपाताचे जे अर्थ दिले आहेत तेवढेच त्या निपाताचे अर्थ आहेत असे मानले नाही म्हणजे, वरील श्रुतीत त्या अर्थांपैकी कोणत्याहि अर्थामध्ये 'आङ्' या निपाताचा उपयोग केला नसून भिन्न अर्थामध्ये उपयोग केला आहे तरी त्याचे जागीं 'आँ' असा अनुनासिक आदेश होऊं शकतोच. सारांश वरील श्रुतीत 'आङ्' या निपाताचा सप्तम्यर्थामध्यें उपयोग केला असल्यामुळें, त्या निपाताचे भाष्यकारिकेत जे अर्थ दिले आहेत ते परिगणनात्मक आहेत असे मानता येत नाही असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे)

शब्दरत्न—अन्यथात्वेति । अनभिमतत्वेत्यर्थः । तदाह-नामंस्था इति । स्मरणेति । विस्मृतस्य स्मरणविषयताद्योतक इत्यर्थः । मर्यादाभिविधावित्यत्र मध्यमपदलोपी समासः । तत्सहितेऽभिविधावित्यर्थः । सप्तम्यर्थेति । तद्वृत्तित्वं च तस्य निरुक्ते स्पष्टम् । अव्ययीभावाभावश्च श्रुतौ छान्दसत्वाद् बोध्यः ।

मनोरमेतील 'अन्यथात्वद्योतकः' या पदातील 'अन्यथात्व' या शब्दाचा 'अनभिमतत्व,' म्हणजे पूर्वी जें मानले होते ते आतां मान्य नाहीं, असा अर्थ आहे व त्या शब्दाचा असा अर्थ असल्यामुळेंच,

'पूर्वमित्थ नामस्या इदानी त्वेव मन्यसे' असा कौमुदीत दिलेल्या प्रथम उदाहरणाचा दीक्षितानी मनोरमेंत अर्थ केला आहे. कारिकेतील 'स्मरण' हा शब्द ज्याचे पूर्वी विस्मरण झाले होतें त्याचे आता स्मरण झाले आहे या अर्थाचा द्योतक आहे. कारिकेतील 'मर्यादाभिविधौ' हा मध्यमपदलोपी समास असून त्याचा 'मर्यादासहितः अभिविधिः' असा विग्रह आहे (इतरेतरयोगद्वन्द्वसमास केला तर 'मर्यादाभिविध्योः' असे रूप होण्याची आपत्ति येते व समाहारद्वन्द्व केला तर 'स नपुंसकम्' सू. ८२१ या सूत्रानें सामासिक शब्द नपुंसक होईल आणि नपुंसकाच्या सप्तमीच्या एकवचनात 'इकोऽचि विभक्तौ' सू. ३२० या सूत्रानें नुमागम होण्याची आपत्ति येईल. म्हणून येथें द्वन्द्वसमास न मानता मध्यमपदलोपीसमास मानणेंच इष्ट आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'अभ्र आँ अपः' या श्रुतीतील 'आँ' हा ङित् निपात सप्तम्यर्थाचा वाचक आहे असे जें मनोरमेंत म्हटले आहे तें निरुक्तावरून स्पष्ट होतें. (यथायमध्यर्थे भवति तथा अभ्र आँ अपः इत्येष निगम.' असे निरुक्ताच्या पाचव्या अध्यायांतील प्रथम पादाच्या सहाव्या खण्डात सांगितले आहे.) 'अभ्र आँ' हा छान्दस प्रयोग असल्यामुळें (व 'सर्वे विधयश्छन्दसि विकल्प्यन्ते'-परि. ३५-असे वचन असल्यामुळें, जरी 'आङ्=आ' हा निपात विभक्त्यर्थाचा वाचक आहे तरी, 'अव्ययं विभक्ति' सू. ६५२ या सूत्रानें पावलेला नित्य) अव्ययीभावसमास येथें झाला नाहीं हे ल्क्षात ठेवावे.

*मनोरमा–"ओत्"। निपातः किम्? देवोऽसि। वायवायाहि।*

'ओत्' सू. १०४ या सूत्राचा 'ओदन्तो निपातः प्रगृह्यसंज्ञः स्यात्' असा अर्थ असल्यामुळें 'देवोऽसि, वायवायाहि' या दोन उदाहरणात प्रकृतिभाव झाला नाहीं. ('देवो, वायो' हें जरी ओदन्त आहेत तरी ओदन्त निपात नाहींत आणि म्हणून त्याना प्रकृत सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा होत नाही व त्यामुळें प्रकृतिभाव न होतां, प्रथम उदाहर-

णात 'एङ पदान्तादति' सू ८६ या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होऊन, 'वायो आयाहि' या द्वितीय उदाहरणात 'ओ' चे जागी 'एचोऽय-वायाव' सू ६१ या सूत्रानें 'अव्' आदेश झाला आहे.)

मनोरमा–"सबुद्धौ"॥ ऋषिर्वेद· "तदुक्तमृषिणा" इत्यादौ तथा दर्शनादित्यभिप्रेत्याह—अवैदिक इति । सम्बुद्धौ किम् ? अहो इति । अत्र परत्वाद्विकल्पो मा भूत् । यत्तु "ओत्" इत्यत्र निपातानु-वृत्तेरिह च सबुद्धिग्रहणस्य प्रत्युदाहरण मृत्यादावुक्त गवित्ययमाहेति. तन्न, तत्र प्रगृह्यसञ्ज्ञासत्त्वेऽपि प्रकृतिभावाप्रसक्ते । "इकोऽसवर्णे" इत्यत्र हि पदान्तग्रहणमनुवर्तते इत्याकरे स्पष्टम् । एव च "प्लुत-प्रगृह्या" इति सूत्रे तत्सम्बन्ध आवश्यक । गविति च न पदम्, अनु-कार्यानुकरणयोरभेदविवक्षया अर्थवत्त्वाभावेन विभक्तेरनुत्पादात् ॥

'सम्बुद्धौ शाकल्यस्येतावनार्षे' सू १०५ या सूत्रातील 'अनार्षे' या शब्दामध्यें असणाऱ्या (ऋषिणा प्रोक्ते = आर्षे' यातील) 'ऋषि' या शब्दाचा 'वेद' असा अर्थ आहे, कारण 'तदुक्तमृषिणा' इत्यादि प्रयोगात 'ऋषि' या शब्दाचा 'वेद' असा अर्थ केलेला आढळतो आणि हा आशय मनात घेऊनच प्रकृत सूत्रातील 'अनार्षे' या पदाचा 'अवैदिके' असा कौमुदीत अर्थ केला आहे 'अहो इति' या उदाहरणात 'ओत्' सू १०४ या पूर्व सूत्रानें प्राप्त झालेल्या नित्य प्रगृह्यसंज्ञेचा प्रकृत उत्तर सूत्रानें बाध होऊ नये व 'अहो' या ओदन्त निपाताला विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा होऊ नये याकरिता प्रकृत सूत्रात 'सम्बुद्धौ' हे पद घातले आहे (तें पद प्रकृत सूत्रात घातले असल्यामुळें व 'अहो' हा सबुद्ध्यन्त शब्द नसून ओदन्त निपात असल्यामुळें, त्या शब्दापुढें जरी 'इति' हा अवैदिक शब्द आहे तरी, त्याला वैकल्पिक प्रगृह्यसंज्ञा न होता, 'ओत्' या पूर्व सूत्रानें नित्य प्रगृह्यसंज्ञा होते व 'प्लुतप्रगृह्या' सू ९० या सूत्रानें नित्य प्रकृतिभाव होता सारांश 'अहविति' असे वैकल्पिक सधियुक्त रूप न होता 'अहो इति' असे एकच प्रकारचे रूप होते )

'ओत्' या सूत्रात ('निपात एकाजनाङ्' या पूर्व सूत्रांतून) 'निपात' या शब्दाची अनुवृत्ति असल्यामुळें व प्रकृत सूत्रात (त्या शब्दाची अनुवृत्ति नसून) 'सम्बुद्धौ' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें, 'सम्बुद्धौ किम्? गवित्ययमाह' असे जें काशिकावृत्तीत व इतर ग्रन्थात प्रत्युदाहरण दिले आहे तें योग्य प्रत्युदाहरण ठरत नाही, कारण त्या प्रत्युदाहरणांत जरी प्रगृह्यसंज्ञा होत असली तरी प्रकृतिभावाची प्राप्तीच नाहीं. याचे कारण हे कीं, 'इकोऽसवर्णे' सू. ९१ या सूत्रात ('एङः पदान्तादति' या पूर्व सूत्रातून) 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति होते असे भाष्यांत स्पष्ट सांगितले आहे. त्यामुळें 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' (हें सूत्र त्या दोन सूत्रांच्या मध्यें पठित असल्यामुळें) या सूत्रांत देखील 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति मानणे आवश्यक आहे. (तसे न मानल्यास मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करण्याचा दोष येईल.) 'गवित्ययमाह' या उदाहरणांतील 'गो' हा शब्द पदसंज्ञक नाहीं; कारण या उदाहरणांत अनुकार्य व अनुकरण या दोहोंत अभेदाची विवक्षा असल्यामुळें, 'गो' हा शब्द अर्थवान् ठरत नाहीं व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति–विभक्ति-प्रत्ययाची उत्पत्ति–होऊं शकत नाहीं. (प्रकृत सूत्रावरील काशिकावृत्तीत 'सम्बुद्धाविति किम्। गवित्ययमाह। अत्रानुकार्यानुकरणयोर्भेदस्याविवक्षितत्वात्। असत्यर्थवत्त्वे विभक्तिर्न भवति।' असे म्हटले आहे. काशिकाकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, प्रकृत सूत्रांतून 'सम्बुद्धौ' हे पद गाळले तर त्यात 'ओत्' या पूर्व सूत्राची अनुवृत्ति होऊन 'ओकारान्त प्रगृह्यसंज्ञ वा स्यात् अनार्षे इतौ परे सति' असा प्रकृत सूत्राचा अर्थ होईल व त्या अर्थान्वयें 'गो इत्ययमाह' या अनुकरणपदमी 'गो' हें अनुकरण ओकारान्त असल्यामुळें त्याला विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा होईल व त्यामुळें वैकल्पिक प्रकृतिभाव होण्याची आपत्ति येईल. परन्तु अभेदानुकरणपक्षांत अनुकरण हें शब्दरूपामुळें केवळ अनुकार्याची उपस्थिति करून देणारें असून अभिधावृत्तीनें किंवा लक्षणावृत्तीनें अनुकार्याचा

अर्थ बोधित करण्यास समर्थ नसल्यामुळें, तें अर्थवान् ठरत नाही व त्यामुळें 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रानें होणारी प्रातिपदिकसंज्ञा त्याला होऊं शकत नाहीं आणि म्हणून 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या सूत्रानें प्रातिपदिकाहून होणारी सुबुत्पत्ति त्याहून होऊ शकत नाही त्यामुळें 'गो' हे अनुकरण जरी ओकारान्त आहे तरी ते सबुद्ध्यन्त ठरत नसल्यामुळें आणि प्रकृत सूत्रात 'सम्बुद्धौ' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें, 'गो' या ओकारान्त अनुकरणाला प्रकृत सूत्रानें होणारी प्रगृह्यसंज्ञा होत नाही व त्यामुळें 'प्लुतप्रगृह्याः' सू. ९० या सूत्रानें होणारा प्रकृतिभाव न होता, 'गो' यातील 'ओ' चे जागीं 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें 'अव्' आदेश होऊन 'गवित्ययमाह' असा प्रयोग सिद्ध होतो व अशा रीतीनें हें उदाहरण 'सम्बुद्धौ किम्' याचे प्रत्युदाहरण ठरते. यावर दीक्षित असे म्हणतात कीं, वरील प्रत्युदाहरणात प्रकृतिभावाची प्राप्तीच होत नाही; कारण 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या ज्या सूत्रानें प्रकृतिभाव होत असतो त्या सूत्रात, वर सांगितल्याप्रमाणे, 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति असल्यामुळें व त्या सूत्राचा 'पदान्ताः प्लुतप्रगृह्याः अचि परे नित्यं प्रकृत्या स्युः' असा अर्थ होत असल्यामुळें आणि काशिकाकारानी स्वतः म्हटल्याप्रमाणे अभेदानुकरणपक्षांत 'गो' या शब्दाहून सुबुत्पत्ति होऊं शकत नसल्यामुळें, त्याला 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी पदसंज्ञा केव्हांहि होऊं शकत नाहीं. म्हणून 'गो' हें ओकारान्त अनुकरण प्रगृह्यसंज्ञक मानले तरी त्यातील अन्त्य 'ओ' पदान्तीं नसल्यामुळें, 'प्लुतप्रगृह्याः' या सूत्रानें प्रकृतिभावाची मुळींच प्राप्ति होत नाहीं आणि म्हणून 'सम्बुद्धौ किम्' याचे 'गवित्ययमाह' हें योग्य प्रत्युदाहरण ठरत नाहीं. प्रकृत सूत्रांतून 'सम्बुद्धौ' हें पद गाळल्यानें जर वरील प्रत्युदाहरणांत 'गो' या शब्दाला वैकल्पिक प्रगृह्यसंज्ञा होऊन प्रकृतिभावाची प्राप्ति झाली असती व ती टाळण्याकरितां 'सम्बुद्धौ' हें पद आवश्यक आहे असें

प्रगृह्यसंज्ञा करून 'ओत्' हे सूत्र चरितार्थ ठरते, आणि ओदन्त निपात खेरीज करून इतर कोणत्याहि ओदन्त शब्दापुढें 'इति' हा अवैदिक शब्द आल्यास, त्या ओदन्त शब्दाला विकल्पानें प्रगृह्यसंज्ञा करून ('विष्णो इति इत्यादि स्थलीं) 'शाकल्यस्येतावनार्षे' सू १०५ हे सूत्र चरितार्थ ठरत त्यामुळें अन्यत्र सावकाश ठरत असलेल्या 'शाकल्यस्येतावनार्षे' या पर सूत्राचे ठिकाणी 'ओत्' या पूर्व सूत्राची प्रवृत्ति न होऊं देण्याचे सामर्थ्य राहत नसल्यामुळें ('अहो इति' या स्थली नित्य प्रकृतिभाव होऊन एकच प्रकारचे रूप सिद्ध होऊ शकते व त्यामुळें) फलात काही फरक पडत नाही (येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे या शंकेवर दीक्षितमतानुयायी कित्येक वैयाकरण असे उत्तर देतात की, ) ही शंका बरोबर नाही; कारण 'ओत्' या सूत्राच्या मानानें 'शाकल्यस्येतावनार्षे' हे परसूत्र असल्यामुळें ('पूर्वात्पर बलवत्' या न्यायान्वयें ) ते विकल्पानें प्रगृह्यसंज्ञा होण्याचे विधान करणारे परसूत्र प्रवृत्त झाले असता ('ओत्' या पूर्वसूत्रानें प्राप्त होणारी प्रगृह्यसंज्ञा) न होऊं देणे येथपर्यंत देखील त्या परसूत्राचा व्यापार चालू राहत असल्यामुळें, जेव्हा ( प्रकृत विभाषासूत्रानें ) विकल्पानें प्रगृह्यसंज्ञा केली जात नाहीं तेव्हा 'सकृद्गतौ'–परि ४०–या न्यायान्वयें 'ओत्' हे बाधित पूर्व सूत्र प्रगृह्यसंज्ञा करून देण्यास प्रवृत्त होऊ शकत नाहीं (दीक्षितानी मनोरमेंत असे म्हटले आहे की, प्रकृत सूत्रातून 'सम्बुद्धौ' हे पद गाळल्यास 'अहो इति' या उदाहरणात 'अहो' या ओदन्त निपाताला 'ओत्' या पूर्व सूत्रानें जी नित्य प्रगृह्यसंज्ञा प्राप्त होती ती प्रकृत परसूत्रानें विकल्पेंकरून होईल व त्यामुळें विकल्पेंकरून प्रकृतिभाव होईल आणि 'अहो इति, अहविति' अशी वैकल्पिक रूपें होण्याची आपत्ति येईल, व ही आपत्ति टाळण्याकरिता व 'अहो इति' असे प्रकृतिभावाचे एकच इष्ट रूप सिद्ध व्हावे याकरिता प्रकृत सूत्रात 'सम्बुद्धौ' हे पद असणे आवश्यक आहे. यावर शंकाकार असे म्हणतो की, प्रकृत सूत्रातून 'सम्बुद्धौ' हें पद

गाळले तरी, 'अहो इति' असे एकच प्रकारचे रूप सिद्ध होऊ शकते व 'अहविति' असे अनिष्ट वैकल्पिक रूप होण्याची आपत्ति मुळीच येत नाही, कारण वर सांगितल्याप्रमाणे 'ओत्' हें पूर्व सूत्र व 'शाकल्यस्येतावनार्षे' हे परसूत्र आपापल्या विषयात सावकाश होणारी सूत्रें असल्यामुळें, जेव्हा त्या दोन्ही सूत्राची 'अहो इति' या उदाहरणात प्राप्ति होते तेव्हा 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू १७५ या सूत्रान्वयें 'ओत्' हे पूर्वसूत्र बाधित होऊन जरी 'शाकल्यस्येतावनार्षे' हे परसूत्र प्रवृत्त होतें तरी, त्या परसूत्रानें होणारी प्रगृह्यसंज्ञा विकल्पेंकरून होणारी असल्यामुळें जेव्हा ती संज्ञा केली जाते तेव्हा 'अहो' हा ओदन्त निपात प्रगृह्यसंज्ञक ठरतो व त्यापुढें 'इति' यातील इकार हा अच् असल्यामुळें, 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या सूत्रानें प्रकृतिभाव होता आणि 'अहो इति' असा प्रयोग सिद्ध होतो पण जेव्हा प्रकृत विभाषासूत्रानें 'अहो' याला विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा केली जात नाही तेव्हा देखील 'पुनः प्रसङ्गविज्ञानात्सिद्धम्'–परि. ३९–या न्यायान्वयें 'ओत्' हे बाधित पूर्वसूत्र प्रवृत्त होत व 'अहो' याला प्रगृह्यसंज्ञा होतेच आणि वर सांगितल्याप्रमाणे प्रकृतिभाव होऊन त्या पक्षात देखील 'अहो इति' असाच प्रयोग सिद्ध होतो म्हणून प्रकृत सूत्रातील 'सम्बुद्धौ' हे पद व्यर्थ आहे आणि त गाळले तरी 'अहो इति' असे एकच प्रकारचे रूप सिद्ध होत असल्यामुळें, या उदाहरणासबधानें दीक्षितानीं मनोरमेंत जें म्हटले आहे तें बरोबर मानता येत नाही येथें हें लक्षात ठेवावे की, शकाकारानें वर जी शका उपस्थित केली आहे ती 'साक्षात्प्रभृतीनि च' सू १ ४ ७४ या सूत्रावरील भाष्याला धरून केली आहे त्या भाष्यात 'तत्र च विप्रतिषेध' या पूर्व वार्तिकाचे प्रत्याख्यान करणारे 'न वा पूर्वेण कृतत्वात्' हे वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात – 'न वा वक्तव्यम्। किं कारणम्? पूर्वेण कृतत्वात्। अस्त्वनेन विभाषा, पूर्वेण नित्यो भविष्यति।' या

भाष्याचा आशय हा आहे की, 'लवणीकृत्य' या उदाहरणात 'ऊर्यादि च्विडाचश्च' सू ७६२ या पूर्व सूत्रानें नित्य गतिसंज्ञा प्राप्त आहे व 'साक्षात्प्रभृति' या गणात 'लवण' हा शब्द पठित असल्यामुळें, 'साक्षात्प्रभृतीनि च' सू ७७५ या परसूत्रानें विकल्पें-करून गतिसंज्ञा प्राप्त आहे विकल्पामुळें जेव्हा उत्तर सूत्रानें गतिसंज्ञा केली जात नाही तेव्हा 'पुन प्रसङ्गविज्ञानात्सिद्धम्' या न्यायान्वयें 'ऊर्यादि च्विडाचश्च' हं बाधित पूर्वसूत्र प्रवृत्त होऊन गतिसंज्ञा होऊ शकतेच व अशा रीतीनें विकल्पानें गतिसंज्ञा न होण्याची आपत्ति टळते या भाष्यावरील प्रदीपात कैयटानें 'लवणी-कृत्येति । तत्र हि परत्वादनेन विभाषा प्राप्नोति, नित्या च गति-संज्ञेष्यते । पूर्वेणेति । पुन प्रसङ्गविज्ञानादिति भाव ' असे म्हटले आहे व वरील भाष्योक्ति आणि कैयटोक्ति मनात धरूनच शंका-कारानें वरील शंका केली आहे या शंकेचे उत्तर शब्दरत्नकार पुढें देणार आहेत, परंतु दीक्षितमतानुयायि वैयाकरणाचे या शंकेवर जें उत्तर आहे तें शब्दरत्नकार प्रथम सांगतात त्या वैयाकरणाच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, प्रकृत सूत्र प्राप्तविभाषेचे सूत्र असल्यामुळें, म्हणजे 'ओत्' या पूर्व सूत्रानें जी नित्य प्रगृह्यसंज्ञा होणे सांगितले आहे ती प्राप्त नित्यसंज्ञा विकल्पेंकरून व्हावी याचे विधान करणारे हें परसूत्र असल्यामुळें, या सूत्राचे प्रगृह्यसंज्ञा न व्हावी हें सांगण्यातच तात्पर्य आहे, कारण 'ओत' या पूर्वसूत्रानें प्रगृह्यसंज्ञा सिद्ध आहेच आणि म्हणून प्रगृह्यसंज्ञा व्हावी हें सांगण्यांत या सूत्राचे तात्पर्य नाहीं आणि 'सर्वत्र प्राप्तविभाषासुभा-वस्य पूर्वेणैव सिद्धतया अपूर्वबोध्यत्वाभावेन भावसमानाधिकर-णोऽभाव एव विधीयते' असा सिद्धान्त आहे. म्हणून प्रकृत सूत्रानें विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा केली नसता, त्या पक्षात 'ओत्' हें बाधित पूर्व सूत्र प्रवृत्त करतां येत नाहीं; कारण तें सूत्र प्रवृत्त केल्यास व दोन्ही पक्षात प्रगृह्यसंज्ञा केल्यास ती संज्ञा नित्य ठरेल व प्रगृह्यसंज्ञा विकल्पेंकरून होणे याकरितां मुद्दाम केलेलें

प्रकृत सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. ही आपत्ति टाळण्याकरिता 'सकृद्गतौ विप्रतिषेधे यद्बाधित तद्बाधितमेव'-परि ४०-हाच न्याय येथें प्रवृत्त करणे योग्य ठरते व 'पुनः प्रसङ्गविज्ञानात्सिद्धम्'- परि ३९-हा न्याय येथें प्रवृत्त करणे अयोग्य आहे. येथें हे सागणे जरूर आहे कीं, 'अचश्च' सू. १·२·२८ या सूत्रावरील प्रदीपात, परविभाषा सूत्रानें विकल्पानें होणारे कार्य न केल्यास, पूर्व बाधित सूत्राची प्रवृत्ति 'पुन प्रसङ्गविज्ञानात्सिद्धम्' या न्यायाचा आश्रय करून करता येत नाहीं हें सागताना कैयटानें 'न चैवविधे' विषये पुन. प्रसङ्गविज्ञानमस्ति। नित्यविकल्पयोर्विरोधात्, पूर्वेण परस्य बाधप्रसङ्गात्। यत्र हि पूर्वो विधिः पर न बाधते तत्र पुनः प्रसङ्ग-विज्ञान क्वचिदाश्रीयते।' असे स्पष्ट म्हटलें आहे व या कैयटोक्तीला धरूनच दीक्षितमतानुयायि वैयाकरणानीं वरप्रमाणे वरील शकेचे उत्तर दिले आहे. ते म्हणतात की, प्रकृत सूत्रातून 'सम्बुद्धौ' हें पद गाळल्यास, 'अहो इति' या स्थलीं जेव्हा प्रकृत सूत्रानें विकल्पेंकरून प्रगृह्यसज्ञा केली जाणार नाहीं तेव्हा, कैयटानें म्हटल्याप्रमाणे, 'ओत्' या पूर्व बाधित सूत्राची प्रवृत्ति करून 'अहो' याला प्रगृह्यसज्ञा करता येणे शक्य नसल्यामुळें, त्या पक्षात प्रगृह्यसज्ञा न होण्याची व प्रगृह्यसज्ञानिमित्तक प्रकृतिभाव न होता 'अहविति' असे पाक्षिक अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते आणि म्हणून दीक्षितानी मनोरमेंत जो दोष दिला आहे तो योग्य ठरतो व त्या दोषाचे निवारण करण्याकरिता प्रकृत सूत्रात 'सम्बुद्धौ' हें पद असणे आवश्यक आहे. पुढें ते वैयाकरण असे म्हणतात कीं,) असे आहे म्हणूनच, म्हणजे प्राप्तविभाषास्थली जेव्हा पूर्व नित्य सूत्रानें होणारें कार्य विकल्पेंकरून केले जात नाही तेव्हा तें कार्य करण्याकरिता 'पुनः प्रसङ्गविज्ञानात् सिद्धम्' या न्यायाचा आश्रय करून पूर्वसूत्राची प्रवृत्ति करता येत नाहीं म्हणूनच, 'न यदि,' 'विभाषा साकाङ्क्षे' सू. २७७४,२७७५ हीं निषेधीय प्राप्ताप्राप्तविभाषेचीं सूत्रें आहेत असे जें भाष्यात म्हटलें आहे तें म्हणणें योग्य ठरतें. पर

विभाषासूत्रानें जेव्हा विकल्पेंकरून कार्य केले जात नाहीं तेव्हा ते कार्य करण्याकरिता पूर्वनित्य सूत्र प्रवृत्त होऊ शकते असे मानले तर, 'न यदि' या निषेधक सूत्राच्या मानानें 'विभाषा साकाङ्क्षे' हे परसूत्र असल्यामुळें ('पूर्वात्पर बलवत्' या न्यायान्वयें) तें परसूत्र प्रथम प्रवृत्त केल्यावर देखील 'न यदि' या सूत्रानें जो निषेध सांगितला आहे त्या निषेधाची पर विभाषासूत्रानें विकल्पेंकरून प्रवृत्ति केली नसता, जर 'न यदि' हे सूत्र त्या पश्चात प्रवृत्त केले तर नित्य निषेध होईल व 'विभाषा साकाङ्क्षे' हे प्राप्ताप्राप्त-विभाषेचे सूत्र ठरू शकणार नाही ('न वेतिविभाषा' सू. १·१·४४ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी प्राप्तविभाषेची, अप्राप्त-विभाषेचीं व प्राप्ताप्राप्तविभाषेचीं उदाहरणे दिली असून, 'विभाषा साकाङ्क्षे' हे सूत्र प्राप्ताप्राप्तविभाषेचे उदाहरण दिले आहे. त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात –'न यदि विभाषा साकाङ्क्षे । प्राप्तेऽप्राप्त उभयत्र वेति सन्देह । कथं च प्राप्ते, कथं वाप्राप्ते, कथं वोभयत्र । यदीति वा नित्ये प्राप्तेऽन्यत्र वाप्राप्त उभयत्र वेति । उभयत्र । प्राप्ते तावत् । अभिजानासि देवदत्त यत्कश्मीरेषु वत्स्यामः । यत्कश्मीरेष्ववसाम । यत्तत्रौदनान्भोक्ष्यामहे । यत्तत्रौदनान भुञ्जमहि । अप्राप्ते । अभिजानासि देवदत्त कश्मीरान्गमिष्याम. । कश्मीरान-गच्छाम । तत्रौदनान्भोक्ष्यामहे । तत्रौदनानभुञ्जमहि ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'विभाषा साकाङ्क्षे' या सूत्रानें सांगितलेली विभाषा प्राप्तविभाषा आहे किंवा अप्राप्तविभाषा आहे किंवा प्राप्ताप्राप्तविभाषा आहे असा सन्देह उत्पन्न होतो. 'न यदि' या पूर्व सूत्रानें लृट्चा निषेध नित्य प्राप्त झाला असता तेथेंच या सूत्रानें विकल्प केला तर ही प्राप्तविभाषा होते; 'न यदि' या सूत्राची जेथें प्राप्ति नाही तशाच ठिकाणीं या सूत्रानें विकल्प केला तर ही अप्राप्तविभाषा होते, आणि दोन्ही ठिकाणी या सूत्रानें विकल्प केला तर ही प्राप्ताप्राप्तविभाषा होते, आणि हें सूत्र प्राप्ताप्राप्तविभाषेचेच सूत्र मानणे योग्य आहे. लृट्-

प्रत्ययाचा निषेध प्राप्त असून विकल्प झाल्याचे उदाहरण 'अभिजानासि देवदत्त यत्कश्मीरेषु वत्स्याम यत्कश्मीरेष्ववसाम, यत्तत्रौदनाम्भोक्ष्यामहे अभुञ्ज्महि' हे आहे. जेथें लृट्प्रत्ययाचा निषेध प्राप्त नाही तेथें विकल्प झाल्याचे उदाहरण 'अभिजानासि देवदत्त कश्मीरान्गमिष्यामः अगच्छाम, तत्रौदनान्भोक्ष्यामहे अभुञ्ज्महि' हे आहे 'अभिज्ञावचने लृट्' सू २७७३ हे सूत्र असे सांगते की, वाक्यातील मुख्य धातूचे स्मृत्यर्थक धातु हें उपपद असल्यास, त्या मुख्य धातूहून लङ्प्रत्यय न करिता लृट्प्रत्यय करावा या सूत्राचे 'न यदि' सू २७७४ हे निषेधक सूत्र आहे व हे निषेधक सूत्र असे सांगतें की, वाक्यात 'यद' शब्दाचा प्रयोग केला असल्यास, लङ्-प्रत्ययाचे जागी लृट्प्रत्यय करू नये यानंतर 'विभाषा साकाङ्क्षे' सू. २७७५ हें विभाषेचे सूत्र पठित आहे व हे सूत्र असे सांगतें की, लक्ष्यलक्षकभाव गम्यमान असताना लङ् व लृट् या दोन्ही प्रत्ययाचा विकल्पेंकरून उपयोग करता येतो 'न यदि' या सूत्रानें होणाऱ्या निषेधरूप कार्याचा 'विभाषा साकाङ्क्षे' या विभाषासूत्रानें विकल्प केला असता, ज्यावेळीं विकल्पेंकरून निषेध केला जाणार नाही त्यावेळी 'न यदि' हें बाधित पूर्व सूत्र प्रवृत्त करून निषेधरूप कार्य केले म्हणजे विकल्पेंकरून लृट्प्रत्यय न करिता त्या पक्षातहि लङ्-प्रत्ययच केला तर नित्य निषेध होईल व या प्राप्त स्थली विकल्पेंकरून निषेध न झाल्यानें 'विभाषा साकाङ्क्षे' हें विभाषासूत्र प्राप्तविभाषेचे सूत्र न ठरता केवळ अप्राप्तविभाषेचे सूत्र ठरेल व त्यामुळें तें प्राप्ताप्राप्तविभाषेचे सूत्र आहे असे मानतां येऊं शकणार नाहीं. पण भाष्यकारांनीं तर हें सूत्र केवळ अप्राप्तविभाषेचे सूत्र न मानतां प्राप्ताप्राप्तविभाषेचे सूत्र मानले आहे. म्हणून हे सूत्र जसे अप्राप्तविभाषेचे सूत्र आहे तसेच प्राप्तविभाषेचे देखील सूत्र आहे—म्हणजेच प्राप्ताप्राप्तविभाषेचे सूत्र आहे—हें मानण्याकरिता हें गृहीत करणे आवश्यक आहे कीं, प्राप्तविभाषास्थलीं जेव्हा विकल्पेंकरून कार्य केले जात नाहीं तेव्हा

पूर्व बाधित सूत्राची प्रवृत्ति करून ते कार्य करता येत नाही, कारण त्या पक्षातहि ते कार्य केल्यास, पूर्व सूत्रानें सांगितलेल्या कार्याचा केव्हाहि विकल्प न होता ते कार्य नित्य होईल व विभाषा-सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल म्हणून प्रकृत सूत्रातून 'सम्बुद्धौ' हे पद गाळल्यास, 'अहो इति' या स्थलीं जेव्हा प्रकृत सूत्रानें विकल्पेंकरून 'अहो' याला प्रगृह्यसंज्ञा केली जात नाही तेव्हा ती प्रगृह्यसंज्ञा त्या पक्षात करण्याकरिता 'ओत्' या पूर्व सूत्राची प्रवृत्ति करता येत नसल्यामुळें, 'अहविति' असे अनिष्ट पाक्षिक रूप होण्याची आपत्ति येते असा जो दोष दीक्षितानी मनोरमेंत दिला आहे तो योग्य ठरतो असे दीक्षितमतानुयायि वैयाकरणाचे म्हणणे आहे यावर शंकाकार पुन्हा अशी शंका करतो की,) 'आ कडारा-देका संज्ञा' सू २३२ या सूत्रानें हे ज्ञापित होते कीं, त्या अधिकाराच्या बाहेर ज्या संज्ञा पठित आहेत त्या संज्ञामध्यें परस्परात बाध्यबाधक-भाव होत नाही, आणि म्हणून 'परत्वाद्विकल्पो मा भूत्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे ते म्हणणे बरोबर मानता येत नाही. (शंकाकाराचे असे म्हणणे आहे की, 'आ कडारादेका संज्ञा' हें सूत्र केले असल्यामुळें त्यावरून हे ज्ञापित होते की, त्या सूत्रापासून 'कडारा कर्मधारये' या सूत्रापर्यंत ज्या संज्ञा पठित आहेत त्या संज्ञामध्येंच परस्परात बाध्यबाधकभाव होत असतो 'ओत्' या सूत्रानें होणारी प्रगृह्यसंज्ञा त्या अधिकाराच्या कक्षेंत येत नसल्या-मुळें, म्हणजे 'आ कडारात्' या सूत्राच्या बरेच पूर्वी पठित असलेल्या सूत्रानें होणारी ती संज्ञा असल्यामुळें, 'अहो इति' या उदाहरणात 'अहो' याला 'ओत्' या सूत्रानें झालेल्या प्रगृह्यसंज्ञेचा 'शाकल्य-स्येतावनार्षे' या परसूत्रानें बाध होऊ शकत नाही व अशा रीतीनें 'अहो' याची प्रगृह्यसंज्ञा अबाधित–नित्यकायम–राहत असल्यामुळें, 'अहो इति' या उदाहरणात प्रगृह्यसंज्ञानिमित्तक प्रकृतिभाव नित्य होतो व 'अहविति' असे पाक्षिक अनिष्ट रूप होण्याची आपत्ति मुळींच येत नाही म्हणून 'परत्वाद्विकल्पो मा भूत्' असे जें

दीक्षितानी मनोरमेंत म्हटलें आहे तें म्हणणें अयोग्य ठरते. या शंकेवर दीक्षितमतानुयायी वैयाकरण असे उत्तर देतात कीं,) ही शंका बरोबर नाही, कारण 'ओत्' व 'शाकल्यस्येतावनार्षे' या दोन सूत्रांनी ( भिन्न भिन्न संज्ञा होणें सांगितले नसून ) एकच संज्ञा–प्रगृह्यसंज्ञा–होणें सांगितले आहे व वर दिलेलें ज्ञापक विशेषापेक्ष असल्यामुळें, जेथें एकेच वेळी भिन्न संज्ञाची प्राप्ति होते तशाच ठिकाणी ते ज्ञापक लागू पडते ( 'ओत्' या सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा होणे सांगितले आहे व 'शाकल्यस्येतावनार्षे' या सूत्रानें भिन्न संज्ञा होणे सांगितले नसून प्रगृह्यसंज्ञेचाच विकल्प होणे सांगितले आहे. 'आ कडारादेका संज्ञा' हे जें ज्ञापक शंकाकारानें दिले आहे ते सर्व ठिकाणी लागू पडणारें सामान्यापेक्ष ज्ञापक नसून विशेष स्थलीच लागू पडणारं विशेषापेक्ष ज्ञापक आहे जेथें 'आ कडारात्' या अधिकाराच्या बाहेर पठित असलेल्या संज्ञापैकी दोन किंवा अधिक संज्ञा एकेच वेळी एखाद्या उदाहरणात एकाच लक्ष्याचे ठिकाणीं प्राप्त होतात तशाच ठिकाणी त्या युगपत् प्राप्त होणाऱ्या संज्ञामध्यें परस्परात बाध्यबाधकभाव होत नाही एवढेंच वरील ज्ञापकावरून सिद्ध होते परंतु जेथें पूर्व सूत्रानें एखादी संज्ञा होणे सांगितले आहे व परसूत्रानें त्याच संज्ञेचा विकल्प होणे सांगितले आहे तशा ठिकाणी, ती संज्ञा 'आ कडारात्' या अधिकाराच्या बाहेर असली तरी, वरील ज्ञापक लागू पडत नाही व परसूत्रानें सांगितलेल्या विकल्पानें पूर्वसूत्रानें होणाऱ्या नित्य संज्ञेचा 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या न्यायान्वयें बाध होऊन ती संज्ञा विकल्पेंकरूनच होते. म्हणून प्रकृत सूत्रातून 'सम्बुद्धौ' हे पद गाळल्यास, 'ओत्' हें सूत्र प्रकृत सूत्रात अनुवृत्त होईल व ते अनुवृत्त झाल्यानें 'अहो' या सबुद्धयन्त नसलेल्या पण ओदन्त असलेल्या शब्दाला विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा प्राप्त होईल व विकल्पानें ती संज्ञा केली नसतां, 'अहो इति' या स्थली प्रगृह्यसंज्ञेच्या निमित्तानें होणारा प्रकृतिभाव न होता 'अहविति' असें पाक्षिक अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल

हा जो दोष मनोरमेंत दिला आहे तो योग्य ठरतो असे दीक्षित मतानुयायि वैयाकरणाचे म्हणणे आहे. 'न चैतदभावे' पासून 'इति केचित्' या ग्रंथात सांगितलेल्या शंकाचे दीक्षितमतानुयायिवैयाकरणानी ज्या रीतीनें खण्डन केले आहे ते खण्डन शब्दरत्नकारास मान्य नसल्यामुळें त्यानी' इति केचित्' असा अरुचि प्रदर्शक शब्द वापरला आहे.)

शब्दरत्न—परे तु "ओत्" इत्यस्येतिशब्दनिरपेक्षत्वेनान्तरङ्गत्वमिति परत्वं न युक्तं "सम्बुद्धौ" इति तु निपातपदाननुवृत्तये। अन्यथौदन्तनिपातस्यैवेतौ विकल्पापत्तिः, नित्य-विकल्पविध्योर्युगपत्प्रवृत्तावपि विरोधाभावेन परत्वादित्यस्यासङ्गतेः। एवं च परत्वादित्यस्योत्कृष्टत्वादपवादत्वादित्यर्थः। ओद्ग्रहणानुवृत्त्यैव सिद्धे पुनरोद्ग्रहणेनापि तन्निवृत्तिसिद्धौ वैचित्र्यार्थमेव सम्बुद्धिग्रहणमित्याहुः। आवश्यक इति। अन्यथा "इकोऽसवर्णे" इत्यत्र मण्डूकानुवृत्त्यापत्तिः। सा च सम्बन्ध–तदभावोभयकल्पनापत्त्याऽन्याय्येति भावः। अनुत्पादादिति। अत एव तस्याः श्रवणं न। अभेदविवक्षापदार्थश्चार्थवत्सूत्रे निरूपयिष्यते। न च लिङ्गसर्वनामनपुंसकताभ्युपगमेनोत्पन्नाया विभक्तेर्लुक्, ह्रस्वापत्तेः। न च सुप्सुपेति समासेन निर्वाहः, इतिशब्दस्य शब्दस्वरूपपरतातात्पर्यग्राहकत्वेन तेनैकार्थीभावरूपसामर्थ्यस्य दुरुपपादत्वात्। न च गोभ्यां गोक्षीरमित्याद्येकदेशगोशब्दानुकरणे "ऋलृक्" सूत्रभाष्योक्तेन "प्रकृतिवदनुकरणम्" इत्यतिदेशेन पदत्वं सुलभमिति वाच्यम्, "क्षियो दीर्घात्" इति सूत्रभाष्योक्तेन तदतिदेशानित्यत्वेन तदप्रवृत्तिमाश्रित्यापि सुसाधत्वेनासाधारणप्रयोजनत्वाभावादिति भावः॥

(आता ते 'परे तु' या पुढील पक्तीत स्वतःचे मत सांगतात.) पण इतर वैयाकरणाचे असे म्हणणे आहे कीं, 'ओत्' सू. १०४ या सूत्रानें होणाऱ्या प्रगृह्यसंज्ञेला 'इति' हा अवैदिक शब्द पुढें असण्याची गरज नसल्यामुळें, त्या सूत्रानें होणारी (अपरनिमित्तक)

प्रगृह्यसंज्ञा अन्तरङ्ग ठरते (व तिच्या मानानें 'इति' हा अवैदिक शब्द पुढें आला असता 'शाकल्यस्येतावनार्षे' या सूत्रानें होणारी परनिमित्तक वैकल्पिक प्रगृह्यसंज्ञा बहिरङ्ग ठरते) म्हणून ही परसूत्रानें होणारी वैकल्पिक प्रगृह्यसंज्ञा बहिरङ्ग असल्यामुळें, ती परत्वामुळें पूर्व सूत्रानें होणाऱ्या अन्तरङ्ग नित्य प्रगृह्यसंज्ञेचा बाध करते हे म्हणणे योग्य ठरत नाही; (कारण 'परान्नित्यं बलवत्' व 'नित्यादप्यन्तरङ्गं बलीयः' असे न्याय असल्यामुळें व या न्यायान्वयें परशास्त्राच्या मानानें अन्तरङ्गशास्त्र पूर्वशास्त्र असून देखील बलवत्तर ठरत असल्यामुळें, परशास्त्रानें पूर्व अन्तरङ्ग शास्त्राचा बाध होऊं शकत नाही. त्यामुळें 'परत्वाद्विकल्पो मा भूत्' या मनोरमेच्या पंक्तीतील 'परत्वात्' या पदाचा 'पर-पुढील-सूत्रानें' असा अर्थ करणे योग्य नाही जशी 'ओत्' या पूर्व सूत्रात 'निपात' या शब्दाची अनुवृत्ति होते तशी) प्रकृत सूत्रात 'निपात' या शब्दाची अनुवृत्ति न व्हावी याकरिता या सूत्रात 'सम्बुद्धौ' या पदाचे ग्रहण केले आहे. प्रकृत सूत्रात 'निपात' या शब्दाची अनुवृत्ति होते असे मानल्यास, ओदन्त निपातापुढें 'इति' हा अवैदिक शब्द आला असता तशा निपातालाच विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा होण्याची आपत्ति येईल (व सबुद्ध-यन्त ओदन्त शब्दापुढें 'इति' हा अवैदिक शब्द आला असता तशा ओदन्त सबुद्धयन्त शब्दाला विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा होणार नाही. व त्यामुळें प्रकृत सूत्र केवळ प्राप्तविभाषेचे सूत्र ठरेल व प्राप्ताप्राप्तविभाषेचे सूत्र ठरणार नाही आणि वर दिलेल्या भाष्याशी विरोध येईल) 'ओत्' हा नित्य विधि व 'शाकल्यस्येतावनार्षे' हा वैकल्पिक विधि हे दोन्ही विधि-म्हणजे हीं दोन्ही सूत्रें-'अहो इति' या स्थली युगपत् प्रवृत्त झाली तरी देखील त्या दोन सूत्रात विरोध येत नसल्यामुळें-म्हणजे पूर्व शास्त्र अन्तरङ्ग असून परशास्त्र बहिरङ्ग असल्यामुळें व अशा रीतीनें ती दोन शास्त्रें तुल्यबल नसल्यामुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हा न्याय

या स्थलीं लागू पडत नाही आणि म्हणून त्या दोन सूत्रांत परस्पर-विरोध येत नसल्यामुळें–'परत्वाद्विकल्पो मा भूत्' या मनोरमेच्या पङ्क्तीतील 'परत्वात्' या पदाचा 'पुढील सूत्रानें' असा अर्थ करणें अयोग्य ठरतें म्हणून मनोरमेंतील 'परत्वात्' या पदाचा 'उत्कृष्ट-त्वात्' म्हणजेच 'अपवादत्वात्' असा अर्थ करणे योग्य आहे. प्रकृत सूत्रांत 'आन्' या पूर्व सूत्राची अनुवृत्ति केल्यानें काम भागत असतां, पुन्हा प्रकृत सूत्रांत 'ओत' या शब्दाचें ग्रहण केल्यानें देखील, म्हणजे 'सम्बुद्धौ शाकल्यस्येतावनार्षे' असें सूत्र न करितां 'ओत् शाकल्य-स्येतावनार्षे' असें सूत्र पठित केल्यानें देखील, प्रकृत सूत्रांत 'निपात' या शब्दाची अनुवृत्ति होणे टाळतां येऊं शकत असतां, या सूत्रांत 'सम्बुद्धौ' या पदाचें जें ग्रहण केलें आहे तें केवळ वैचित्र्याकरितां केलें आहे–म्हणजे दोन्ही सूत्रांत 'ओत्' हें एकच पद न घालतां द्वितीय सूत्रांत 'सम्बुद्धौ' हे समानफलक भिन्न पद घातलें आहे व दोन्ही पदांचें फल एकच आहे, कारण 'ओत्' या पदानें जशी 'निपात' या पदाची अनुवृत्ति टाळतां येते तसेंच निपात केव्हाहि सम्बुद्धिप्रत्ययपरक रहात नसल्यामुळें, 'सम्बुद्धौ' या पदानें देखील 'निपात' या पदाची अनुवृत्ति टाळतां येते. ('सम्बुद्धौ किम्? *अहो इति। अत्र परत्वाद्विकल्पो मा भूत्*' या मनोरमेंतील पङ्क्तींत 'परत्वात्' हा जो शब्द घातला आहे तो दीक्षितांनी कोणत्या अर्थामध्यें वापरला आहे? त्या पङ्क्तीचें मनोरमेंत विवरण करितांना 'परत्वात्' या शब्दाचा 'परसूत्र असल्यामुळें' असा जो आपाततः उघड अर्थ होतो तो अर्थ मानला आहे व दीक्षितमतानुयायि वैयाकरणांनी देखील वरील वाक्यांत तोच अर्थ स्वीकारला आहे पण शब्दरत्नकार म्हणतात कीं, 'परत्वात्' या शब्दाचा तसा अर्थ करणें योग्य नाही तसा अर्थ केल्यास तो पङ्क्ति चूक ठरण्याची आपत्ति येते, कारण 'इति' या शब्दाची अपेक्षा नसणारें 'ओत्' हें पूर्व शास्त्र अन्तरङ्ग असून त्याच्या मानानें 'इति' या पर निमित्ताची अपेक्षा बाळगणारें 'शाकल्यस्येतावनार्षे' हें प्रकृत पर सूत्र बहिरङ्ग ठरत असल्यामुळें

आणि 'पूर्वपरनित्यान्तरङ्गापवादानामुत्तरोत्तर वलीय '-परि. ३८- ही परिभाषा असल्यामुळें, 'अहो' या ओदन्त निपाताला 'ओत्' या अन्तरङ्ग शास्त्रानें प्राप्त झालेल्या नित्य प्रगृह्यसंज्ञेचा, प्रकृत सूत्रातून 'सम्बुद्धौ' हें पद गाळले तरी, प्रकृत बहिरङ्गशास्त्र बाध करू शकत नाही 'अभावपर्यन्तमप्यस्य व्यापार' असे जें दीक्षितमतानुयायीचे म्हणणे आहे त्याला काहीच प्रमाण नाही म्हणून 'अहो इति' या स्थली 'अहो' या ओदन्त निपाताला 'ओत्' या पूर्व सूत्रानें होणारी प्रगृह्यसंज्ञा सदैव कायम राहत असल्यामुळें, परत्वामुळें वैकल्पिक प्रकृतिभाव होण्याची आपत्ति मुळीच येत नाही पण प्रकृत सूत्रातून 'सम्बुद्धौ' हें पद गाळल्यानें या सूत्रात 'निपात' या शब्दाची अनुवृत्ति होऊन हें सूत्र निरवकाशत्वामुळें अपवादक ठरेल व 'अन्तरङ्गादप्यपवादो वलीयान्' या न्यायान्वयें प्रकृत अपवादक सूत्र 'ओत्' या पूर्व अन्तरङ्गशास्त्राचा बाध करेल व त्यामुळें 'अहो' या ओदन्त निपाताला प्रकृत अपवादक सूत्रानें विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा होण्याची व विकल्पामुळें प्रगृह्यसंज्ञा केली नसता त्या पक्षात प्रकृतिभाव न होता, 'अहविति' असे पाक्षिक अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल असा वास्तविक 'परत्वाद्विकल्पो मा भूत' या मनोरमेंतील पक्तीचा अर्थ करणे योग्य आहे असे शब्दरत्नकाराचे म्हणणे आहे सारांश त्याच्या मते मनोरमेंतील 'परत्वात्' या पदाचा 'उत्तरसूत्रत्वात्' असा अर्थ न करिता 'निरवकाशत्वेनापवादत्वात् असा अर्थ केला पाहिजे. तसा अर्थ केल्यानेंच ती पंक्ति यथार्थ ठरते, नाही तर वर सांगितल्याप्रमाणे ती पंक्ति चूक ठरण्याची आपत्ति येते पुढें शब्दरत्नकार असे म्हणतात की, प्रकृत सूत्रात 'सम्बुद्धौ' या पदाचे ग्रहण न करिता त्या पदाऐवजी 'ओत्' या पदाचे ग्रहण करून 'ओत् शाकल्यस्येतावनार्षे' असें प्रकृत सूत्र पठित केले असते तरी, पूर्व सूत्रात 'ओत्' हें पद असून पुन्हा प्रकृत सूत्रात 'ओत्' या पदाचें ग्रहण केल्यानें त्या पदाच्या पुनर्ग्रहणसामर्थ्यानें प्रकृत सूत्रात 'निपात' या पदाची अनुवृत्ति होऊ शकली नसती व त्या 'ओत्' पदाचा 'सबुद्धिनिमि-

त्तक ओकार' असा अर्थ होऊन, यथापठित सूत्राचा जसा अर्थ आहे तसाच अर्थ निष्पन्न झाला असता. तरी पण 'ओत्' हे पद प्रकृत सूत्रात घातल्यानें जो संदेह उत्पन्न होण्याचा संभव होता त्याचा निरास व्हावा व एकच शब्द दोन सूत्रात लागोपाठ न उच्चारता द्वितीय सूत्रात भिन्न शब्दाचा प्रयोग करणे इष्ट आहे या हेतूनें पाणिनीनें प्रकृत सूत्रात 'सम्बुद्धौ' हा शब्द घातला आहे व तसा शब्द पाणिनीने घातल्यामुळें हे देखील ध्वनित होते की, मात्रालाघवात तात्पर्य नसून पदलाघवातच तात्पर्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'प्लुतप्रगृह्या इति सूत्रे तत्सम्बन्ध आवश्यक' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हे की, 'एङ. पदान्तादति' या सूत्रातील 'पदान्त' या शब्दाची 'प्लुतप्रगृह्या' या पूर्व सूत्रात अनुवृत्ति न मानल्यास, त्या सूत्रापुढील 'इकोऽसवर्णे' या सूत्रात 'पदान्त' या शब्दाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करण्याची आपत्ती येईल 'इकोऽसवर्णे' या उत्तर सूत्रात 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति आहे व त्याच्यापूर्वी असलेल्या 'प्लुतप्रगृह्या.' या सूत्रात त्या शब्दाची अनुवृत्ति नाहीं अशी उभयविध कल्पना करण्याची आपत्ति येत असल्यामुळें, तशी मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करणे अन्याय्य- सदोष- ठरते. ( 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या सूत्रात 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति आहे याला 'अदसो मात्' १-१-१२ या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे. त्या भाष्यात भाष्यकारांनी 'पदान्तप्रकरणे प्रकृतिभाव.'—म्हणजे पदाच्या अन्त्याला जी कार्यें सांगितली आहेत त्या प्रकरणामध्यें प्रकृतिभाव होणें सांगितले आहे—असे म्हटले आहे या भाष्यावरून हे स्पष्ट होतें की, प्रकृतिभावाचे वरील सूत्र पदान्तप्रकरणात पठित असल्यामुळें, त्या सूत्रात 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति आहे ) 'अर्थवत्त्वाभावेन विभक्तेरनुत्पादात्' असे मनोरमेंत म्हटले असल्यामुळें, 'गो इत्ययमाह' या स्थळी विभक्ति प्रत्ययाचे श्रवण होत नाहीं ( 'गो' या अनुकरणाहून अभेदानुकरणपक्षात सुबुत्पत्ति झाली असती तर 'गोरित्य-

यमाह' असा प्रयोग झाला असता. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्या पक्षात अनुकरण अर्थवान् नसल्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाही व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होत नाहीं आणि 'गविरयमाह' असा प्रयोग होतो.) अभेदविवक्षा कशास म्हणतात हें 'अर्थवदधातुर-प्रत्यय. प्रातिपदिकम् सू. १७८ या सूत्राचे विवरण करतेवेळी सांगण्यात येईल. नपुंसकलिङ्ग सर्व लिङ्गाचे वाचक आहे असें मानले असल्यामुळें वरील उदाहरणातील 'गो' हा शब्द नपुंसकलिङ्गी आहे असे मानल्यानें, त्याहून उत्पन्न झालेल्या 'सु' या विभक्ति-प्रत्ययाचा लुक् झाला आहे असे मानता येते अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाही कारण तसे मानल्यास, 'गो' हा शब्द ऱ्हस्व होण्याची आपत्ति येते ( दीक्षिताचे असे म्हणणे आहे की, 'गो इत्ययमाह' या स्थली 'गो' हा शब्द प्रगृह्यसंज्ञक मानला तरी त्यातील ओकार पदान्ती नसल्यामुळें, 'पदान्त' या शब्दाची अनुवृत्ति असणाऱ्या 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या सूत्रानें त्या उदाहरणात प्रकृतिभाव होणें अशक्य आहे. यावर शंकाकार असे म्हणतो कीं, 'सामान्ये नपुंसकम्'–सू. ८२१ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें नपुंसकलिङ्ग सर्व लिङ्गाचे वाचक मानता येत असल्यामुळें, वरील उदाहरणातील 'गो' हे अनुकरण नपुंसकलिङ्गी मानल्यास व त्याहून झालेल्या 'सु' प्रत्ययाचा 'स्वमोर्नपुंसकात्' सू. ३१९ या सूत्रानें लुक् झाला आहे असे मानल्यास, 'गो' शब्दातील ओकार पदान्ती आहे असे प्रत्ययलक्षणानें मानता येते व त्यामुळें प्रकृतिभाव होण्यात काही अडचण येत नाही. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, 'गो' हें अनुकरण नपुंसक मानल्यास व त्याहून 'सु' प्रत्यय झाला असून त्या प्रत्ययाचा लुक् झाला आहे असे मानल्यास, 'ह्रस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' सू. ३१८ या सूत्रानें 'गो' हा शब्द ऱ्हस्व होईल व 'एच इग्घ्रस्वादेशे' सू. ३२३ या सूत्रान्वयें 'गो' चे गु असे रूप होईल आणि त्यामुळें 'गो इति' असा प्रयोग न होता 'गु इति' असा प्रयोग होईल आणि

त्या प्रयोगातील 'गु' हा शब्द उकारान्त झाल्यानें त्याचे ओदन्तत्व नष्ट होत असल्यामुळें, 'शाकल्यस्येतावनार्षे' हे ओदन्ताला लागू पडणारे सूत्र या स्थली प्रवृत्त होणार नाही व प्रगृह्यसंज्ञा आणि प्रकृतिभाव होऊ शकणार नाही. पुन्हा शंकाकार अशी शंका करतो की, वरील उदाहरणातील 'गो' व 'इति' या दोन शब्दांचा 'सुप्सुपा' सू ६४९ या सूत्रान्वयें समास झाला आहे व 'सुपो धातुप्रातिपदिकयो' सू ६५० या सूत्रानें 'गो' या शब्दा-पुढील अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् झाला आहे असे मानल्यास, 'गो' या शब्दातील ओकार प्रत्ययलक्षणानें पदान्ती आहे असे मानता येते व त्यामुळें 'गो' या शब्दाला प्रगृह्यसंज्ञा होऊन प्रकृतिभाव होऊ शकतो. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात की,) 'गो' व 'इति' या दोन शब्दांचा 'सुप्सुपा = सुबन्तं सुबन्तेन सह समस्यते' सू ६४९ या वचनान्वयें समास होऊ शकत नाही, कारण 'इति' हा शब्द त्याच्या पूर्वी असलेल्या 'गो' या शब्दाच्या केवळ वर्णानुपूर्वीविशिष्ट शब्दस्वरूपाचा बोध करून देणारा असून स्वतंत्र अर्थाचा बोधक नसल्यामुळें, त्या दोन शब्दांत एकार्थी-भावापन्न होण्याचे सामर्थ्य नाही आणि म्हणून त्या दोन पदांचा समास होऊ शकत नाही. ('समर्थः पदविधिः' सू ६४७ हे कौमुदीत समासप्रकरणात प्रथमसूत्र पठित केलें आहे. त्या सूत्रान्वयें दोन पदांचा समासरूप विधि कर्तव्य असताना, त्या दोन्ही पदांत स्वतंत्र अर्थवत्ता असली पाहिजे व तसेच एकार्थीभावापन्न होण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे. तसें असल्यासच, त्या दोन पदांचा समास होऊ शकतो. उदाहरणार्थ, 'राज्ञः पुरुषः' या स्थली 'राज्ञः' व 'पुरुषः' हीं दोन पदें स्वतंत्र अर्थांचीं वाचक असून त्या दोन पदांत परस्पराच्या अर्थामध्यें अन्वित होऊन एकार्थीभावापन्न होण्याचें, म्हणजे समुदायशक्तीनें 'राजसंबंधी पुरुष.' अशा विशिष्ट अर्थाचा बोध करून देण्याचें, सामर्थ्य आहे. म्हणून त्या दोन पदांचा समास होऊ शकतो. बालमनोरमेंत हा विषय विशद रीतीनें स्पष्ट

केला आहे. बालमनोरमाकार म्हणतात – 'एकार्थीभावलक्षणसामर्थ्यं तु प्रक्रियादशायां प्रत्येकमर्थवत्त्वेन पृथक् गृहीतानां पदानां समुदायशक्त्या विशिष्टैकार्थप्रतिपादकतारूपम्.' असे आहे म्हणूनच, 'पश्य देवदत्त कष्ट, श्रितो विष्णुमित्रो गुरुकुलम्' या स्थलीं 'कष्टम्' व 'श्रित' या दोन पदांचा 'द्वितीया श्रितातीत' सू. ६८६ या सूत्रानें होणारा द्वितीयातत्पुरुष समास होऊ शकत नाही, कारण त्या दोन शब्दांत एकार्थीभावापन्न होण्याचें सामर्थ्य नाही. 'गो इति' या प्रकृत उदाहरणांत 'गो' हा शब्द भेदानुकरणपक्षांत जरी अर्थवान् मानता येऊ शकतो तरी, त्याच्या पुढील 'इति' हा शब्द त्या 'गो' शब्दाच्याच विशिष्टवर्णानुपूर्वीचा बोधक असून त्याचे ठिकाणी स्वतन्त्र अर्थवत्ता नसल्यामुळें व 'गो इति' या समुदायांत एकार्थीभावापन्न होऊन समुदायशक्तीनें विशिष्टार्थबोधन करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें, त्या दोन पदांचा समास होऊ शकत नाहीं असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे व शब्दरत्नांतील प्रकृत पङ्क्तीचा हा आशय भैरवीत स्पष्ट केला आहे. भैरवीकार म्हणतात – 'यत्र हि लौकिकविग्रहे व्यपेक्षालक्षणं सामर्थ्यमस्ति तत्र कल्पितेऽलौकिकविग्रहे एकार्थीभावारोपात् समासो भवति। प्रकृते च इतिशब्दस्य स्वातन्त्र्येणार्थबोधनाय प्रयोगाभावेन नैकार्थीभाव इति भाव।' पुन्हा शंकाकार अशी शंका करतो कीं,) 'गो इत्ययमाह' या प्रयोगांतील 'गो' हा शब्द 'गोभ्याम्, गोक्षीरम्' इत्यादि शब्दांत असणाऱ्या 'गो' या पदसंज्ञक एकदेशाचें अनुकरण आहे असें मानलें असतां 'ॠलृक्' या शिवसूत्रावरील भाष्यांत पठित केलेल्या 'प्रकृतिवदनुकरणं भवति'–परि. ३६–या अतिदेशशास्त्रान्वयें 'गो' हा शब्द सहज पदसंज्ञक ठरू शकतो. पण ही शंका बरोबर नाही (असें शब्दरत्नकार म्हणतात,) कारण 'क्षियो दीर्घात्' ८ २ ४६ या सूत्रावरील भाष्यांत वरील अतिदेश अनित्य मानला आहे व त्या अतिदेशाच्या अनित्यत्वामुळें ज्या पक्षांत त्या अतिदेशशास्त्राची

प्रवृत्ति केली जाणार नाही त्या पक्षात तरी निदान, प्रकृतिभाव न होता, 'गवित्ययमाह' असा प्रयोग सहज सिद्ध होईल. म्हणून प्रकृत सूत्रात 'सम्बुद्धौ' या पदाचे ग्रहण नसते तर 'गवित्ययमाह' असा इष्ट प्रयोग सिद्ध होऊ शकला नसता असे काशिकाकारादिकानी सागून तो जो प्रयोग त्यांनी प्रत्युदाहरणरूपानें दिला आहे तो केवळ सबुद्धिग्रहण प्रकृत सूत्रात असल्यामुळेंच सिद्ध होऊ शकतो असे म्हणता येत नाहीं व त्यामुळें तें प्रकृत सूत्राचे असाधारण प्रत्युदाहरण ठरत नाही ('प्रकृतिवदनुकरण भवति' हा पक्ष मानल्यास, 'गोभ्याम्' यातील 'गो' हा एकदेश 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू २३० या सूत्रान्वयें पदसंज्ञक असल्यामुळें व तसेच 'गोक्षीरम्' या समासातील 'गो' या पूर्व पदास, ज्या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा 'सुपो धातुप्रातिपदिकयो' सू. ६५० या सूत्रानें लुक् झाला आहे त्याचा 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें आश्रय केल्यानें पदसंज्ञा होत असल्यामुळें, 'गो इति' यातील 'गो' हा शब्द त्या 'गो' पदाचे अनुकरण मानल्यानें त्याला पदसंज्ञा होऊन जरी पदान्तनिमित्तक प्रकृतिभाव होऊ शकतो तरी, 'प्रकृतिवदनुकरण भवति' हा न्याय भाष्यकारानी अनित्य मानला असल्यामुळें, जेव्हा त्या न्यायाच्या अनित्यत्वामुळें त्याची प्रकृत उदाहरणात प्रवृत्ति केली जाणार नाही तेव्हा 'गोभ्याम्, गोक्षीरम्' यातील 'गो' हें अनुकार्य जरी पदसंज्ञक आहे तरी त्याचे अनुकरण प्रकृत उदाहरणातील 'गो' हा शब्द पदसंज्ञक नाही असे मानता येत असल्यामुळें, 'प्लुतप्रगृह्याः' सू. ९० या सूत्रानें पदान्त प्रगृह्यापुढें अच् आल्यास होणारा प्रकृतिभाव आपोआपच होणार नाही व 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें 'गो', यातील ओकाराचे जागी अवादेश होऊन 'गवित्ययमाह' असा सन्धियुक्त प्रयोग त्या पक्षात सहज सिद्ध होऊ शकतो. म्हणून 'सम्बुद्धौ किम' याचे 'गवित्ययमाह' हें जें काशिकाकारादिकानी प्रत्युदाहरण दिले आहे तें असाधारण त्याच पक्षात सिद्ध होऊ शकणारे प्रत्युदाहरण ठरत नाहीं; कारण वर सांगितल्याप्रमाणे

'प्रकृतिवदनुकरण भवति' हा न्याय अनित्य मानल्यानें देखील त्या उदाहरणाची सहज सिद्धि होऊ शकते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. तो न्याय अनित्य आहे याला शब्दरत्न-कारानीं 'क्षियो दीर्घात्' या सूत्रावरील भाष्य प्रमाण दिले आहे. त्या भाष्यात वरील न्याय अनित्य आहे असे जरी स्पष्ट शब्दात सागितले नाहीं तरी तो न्याय अनित्य आहे हे त्या भाष्यावरून ध्वनित होते. त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात–'नैष धातुर्धा-तोरेषोऽनुकरणम् । यद्यनुकरणमियङादेशो न प्राप्नोति । प्रकृति-वदनुकरण भवतीतीयङादेशो भविष्यति । यदि प्रकृतिवदनुकरण भवतीत्युच्यते स्वाद्युत्पत्तिर्न प्राप्नोति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे की, 'अचिश्नुधातुभ्रुवाम्' सू २७१ या सूत्रानें धातूतील अन्त्य इकारापुढें अच् आला असता त्या इकारचे जागी इयङादेश होणे सागितले आहे पण 'क्षियो दीर्घात्' सू ३०१५ या सूत्रातील 'क्षियः' या निर्देशात असणारा 'क्षि' हा धातु नसून 'क्षि' धातूचे अनुकरण आहे मग त्या अनुकरणाच्या अन्त्य इकाराचे जागीं इयङादेश कसा झाला आहे ? या प्रश्नाचे उत्तर हे आहे की, 'प्रकृति-वदनुकरण भवति' या न्यायान्वयें प्रकृतीला जे नियम लागू पडतात ते त्या प्रकृतीच्या अनुकरणास देखील लागू पडत असल्यामुळें, 'क्षि' या अनुकरणातील अन्त्य इकाराचे जागी 'अचि श्नु' या सूत्रानें इयङादेश झाला आहे. पण 'प्रकृतिवदनुकरण भवति' हा न्याय मानल्यास, 'क्षि' हे अनुकार्य धातुसंज्ञक असल्यामुळें, त्याच्या अनुकरणाला 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपादकम्' सू. १७८ या सूत्रातील 'अधातुः' या प्रतिषेधान्वयें प्रातिपदिकसंज्ञा होऊ शकत नाही व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होऊ शकत नाही. मग 'क्षि' या अनुकरणाहून पञ्चमी-विभक्तीच्या एकवचनाचा प्रत्यय कसा केला आहे ? यावरूनच हें ध्वनित होते की, *तो वरील न्याय अनित्य आहे. तो न्याय जर नित्य* असता तर 'क्षि' या धातूच्या अनुकरणाहून पञ्चमीविभक्तीचा प्रत्यय केव्हाहि होऊ शकला नसता, म्हणजे धातूला सागितलेलीं

कार्येंच होऊ शकली असती व प्रातिपदिकाला सांगितलेली कार्यें केव्हाहि होऊ शकलीं नसती. या भाष्यावरील उद्योतात उद्योतकारानी 'इदमेव दीर्घग्रहणमत्र विभक्तिकरण चातिदेशाऽनित्यत्वे ज्ञापकमिति तत्त्वम्' असे म्हटले आहे. या विषयाचे विवेचन परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरात पान १२९ मध्यें केले आहे व ते तेथें पाहावे.)

मनोरमा-- "उञः" "निपात एकाज्-" इति प्राप्ते विभाषेयम् ॥

'उञ' या एकाच् निपाताला 'निपात एकाजनाङ्' सू. १०३ या सूत्रान्वये जी नित्य प्रगृह्यसंज्ञा प्राप्त होती ती, त्या निपातापुढें 'इति' हा अवैदिक शब्द आला असता, त्याला विकल्पेंकरून व्हावी (व 'उ इति' एवढेंच प्रकृतिभावाचे रूप न होता, 'इको यणचि' सू. ४७ या सूत्रानें सधिकार्य होऊन 'विति' असे पाक्षिक रूप देखील व्हावे) याकरिता 'उञः' सू १०६ हे सूत्र पठित केले आहे (व अशा रीतीनें हे सूत्र प्राप्तविभाषेचे सूत्र ठरते)

मनोरमा--"ऊँ" अनुनासिक इति। तेनास्मिन्परे "यरोऽनुनासिक-" इति विकल्पः। यदेतन्ँ इति पठसि, यदेतदूँ इति वा तद्दीर्घमित्यादि।. एतदर्थमेव तत्रानुनासिकग्रहणम्। अन्यथा यरो ञमि ञम्वेत्येव वावक्ष्यत् ॥

'ऊँ' सू. १०७ या सूत्रात ('उञ्' या निपातापुढें 'इति' हा अवैदिक शब्द आला असता, त्या निपाताचे जागी दीर्घ) अनुनासिक (प्रगृह्य 'ऊँ' असा आदेश विकल्पेंकरून) होण्याचें विधान केले असल्यामुळें, 'यदेतद् उ इति पठसि' या उदाहरणात जेव्हा प्रकृत सूत्रानें 'उ' चे जागी 'ऊँ' असा दीर्घ अनुनासिक आदेश होऊन 'यदेतद् ऊँ इति पठसि' असे रूप होते तेव्हा दकार या 'यर्' पुढें 'ऊँ' हा अनुनासिक वर्ण येत असल्यामुळें, 'यरोऽनुनासिकेऽनुनासिको वा' सू. ११६ या सूत्रानें त्या दकाराचे जागी विकल्पेंकरून नकार हा अनुनासिक आदेश होऊन 'यदेतन्ँ

इति पठसि' व 'यदेतदूं इति पठसि' अशी दोन वैकल्पिक रूपें होतात. (या उदाहरणात होणारा 'ॐ' हा आदेश नित्य प्रगृह्यसंज्ञक असल्यामुळें, यणादेश होत नाही व नित्य प्रकृतिभाव होतो.) 'यरोऽनुनासिके' या सूत्रात 'अनुनासिके' या पदाचे एवढ्याच करिता ग्रहण केले आहे कीं, त्या पदानें (केवळ 'ञम्' प्रत्याहारान्तर्गत वर्णांचेच ग्रहण न होता) 'ॐ' या अनुनासिकाचे देखील ग्रहण व्हावे. 'यरोऽनुनासिके' सू. ११६ या सूत्रात 'अनुनासिके' या पदाचे ग्रहण करण्याचे तसे प्रयोजन नसतें तर, पाणिनीनें तसें सूत्र न करता 'यरो ञमि ञम्वा' असेच सूत्र पठित केले असतें.

शब्दरत्न—एतदर्थमेवेति । एतदर्थमपीत्यर्थः । अनितेः क्विपि सम्बुद्धावान् चिनोषीत्यत्र "नश्छवि" इति रुत्वे "अत्रानुनासिकः" इति पूर्वस्यानुनासिके 'यदेतनाश्चिनोषि' 'कमलॅ आँश्चि नोषि' इत्यत्रापि फलसत्त्वात् । अवश्यदिति । न चैवं न्यासे यथासंख्यापत्तिः, तस्या सार्वत्रिकत्वात्, "आन्महतः" इत्यादिनिर्देशाच्चेति भाव. । पूर्वोक्ते कमलाँश्चिनोषीत्यत्र लस्य नकारापत्तिवारणाय विधेयकोटा-वनुनासिक इति । विधेयकोटौ यकारमारभ्य प्रत्याहारे तु विधेय-विषये सवर्णग्रहणाभावेन पूर्वोक्ते निरनुनासिकलस्यैवापत्तिरिति यथान्यासमेव साधु ।

मनोरमेंतील 'एतदर्थमेव' या पदाचा 'एतदर्थमपि' असा अर्थ आहे, म्हणजे 'एव' हें पद येथें अवधारणार्थक नसून 'अपि' या अर्थाचे वाचक आहे तसा अर्थ करण्याचे फल हे आहे की, 'अन्' धातूहून ('क्विप् च' सू २९८३ या सूत्रानें) 'क्विप्' प्रत्यय करून त्या क्विबन्त प्रातिपदिकाचे सबुद्धीचे रूप करतेवेळी ('अनुनासिकस्य क्विझलोः क्ङिति' सू २६६६ या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन) 'आन्' असे सबुद्धीचे रूप झाल्यावर त्यापुढें 'चिनोषि' हे पद आले असता, 'नश्छव्यप्रशान्' सू. १४० या सूत्रानें 'आन्'

या पदातील अन्त्य नकाराचे रुत्व होऊन व 'अत्रानुनासिकः पूर्वस्य तु वा' सू. १३६ या सूत्रानें नकारापूर्वी असणारा 'आ' हा अनुनासिक होऊन (व 'खरवसानयोर्विसर्जनीय' सू. ७६ या सूत्रानें 'रु = र्' चा विसर्ग होऊन आणि 'विसर्जनीयस्य सः' सू १३८ या सूत्रानें त्या विसर्गाचा सकार होऊन 'आँस् + चिनोषि' अशी स्थिति झाली असता, 'स्तो श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रानें सकारचे जागी शकार होऊन) 'आँश्चिनोषि' असे जें रूप होतें त्यापूर्वी 'यदेतद्' ही पदें आल्यास 'यरोऽनुनासिके' सू. ११६ या सूत्रानें ('एतद्' यातील दकार या 'यर्' चे जागीं नकार हा अनुनासिक आदेश होऊन) 'यदेतनाँश्चिनोषि' असा प्रयोग सिद्ध होऊ शकतो तसेच 'हे कमलँ् आँश्चिनोषि' हा प्रयोग देखील त्या 'अनुनासिक' पदाच्या ग्रहणाचे फल आहे असे मानता येतें. 'प्रातिपदिकाद्धात्वर्थे बहुलमिष्ठवच्च' या गणसूत्रान्वयें 'कमल-माचष्टे' या अर्थामध्यें 'कमल + अम्' याहून 'णिच्' प्रत्यय केला असता, 'कमल + अम् + णिच्' या णिजन्त समुदायाला 'सनाद्यन्ता धातव' सू २३०४ या सूत्रानें धातुसंज्ञा होत असल्यामुळें, 'सुपो धातुप्रातिपदिकयो' सू. ६५० या सूत्रानें 'अम्' या अन्तर्वर्ति-विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'कमल + णि' अशी स्थिति झाली असता, इष्ठवद्भावानें 'टेः' सू १७८६ या सूत्रानें 'कमल' यातील 'टि' चा–अन्त्य 'अ' चा–लोप होऊन 'कमल् + णि' अशी स्थिति होते या णिजन्त धातूहून 'क्विप् च' सू २९८३ या सूत्रान्वयें 'कर्तरि क्विप्' प्रत्यय केला असता, 'णेरनिटि' सू. २३१३ या सूत्रानें 'णि' लोप होऊन व 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें 'क्विप् = व्' या अपृक्त प्रत्ययाचा लोप होऊन 'कमल्' असे प्राति-पदिकाचे रूप सिद्ध होते, व या प्रातिपदिकाहून सबुद्धीचा 'सु' प्रत्यय केला असता, 'हल्ङ्याब्भ्य' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप होऊन 'हे कमल्' असे सबुद्धीचे रूप होतें 'आँश्चि-नोषि' हा प्रयोग कसा सिद्ध होतो हे नुकतेच वर सांगितले आहे.

'हे कमल्' या पुढें 'आंश्चिनोपि' हीं पदें आल्यास, 'कमल्' यातील लकार या 'यर्' पुढें 'आं' हा अनुनासिक असल्यामुळें, त्या लकाराचे जागी 'यरोऽनुनासिके' सू ११६ या सूत्रानें अनुनासिक 'लँ' असा आदेश व्हावा हे देखील त्या सूत्रातील 'अनुनासिके' या पदाच्या ग्रहणाचे फल मानता येते आणि म्हणून 'एतदर्थमेव' या मनोरमेंतील पदाचा 'एतदर्थमपि' असाच अर्थ करणे योग्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'यरो ञमि ञम् वा' असे सूत्र केले असते तर यथासंख्यन्याय लागू पडण्याची आपत्ति आली असती असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे मात्र बरोबर नाही; कारण तो न्याय सर्वत्र लागू पडणारा न्याय नाही, म्हणजे तो न्याय अनित्य आहे आणि 'आन्महत:' सू ८०७ इत्यादि पाणिनीय निर्देश देखील आहेत. (शकाकाराचे असे म्हणणे आहे की, 'यरो ञमि ञम् वा' असे 'यरोऽनुनासिके' या सूत्राऐवजी सूत्र केले असतें तर, 'एतद्+मुरारि:' या स्थली दकार या 'यर्' पुढें मकार हा 'ञम्' असल्यामुळें, 'यथासङ्ख्यमनुदेश समानाम्' सू. १२८ या यथासंख्यन्यायान्वयें दकाराचे जागी मकार होण्याची आपत्ति आली असती व 'एतन्मुरारि:' असे पाक्षिक इष्ट रूप सिद्ध न होता, 'एतम्मुरारि.' असे अनिष्ट रूप झाले असते आणि ही आपत्ति टाळण्याकरिताच 'यरोऽनुनासिकेऽनुनासिको वा' असे पाणिनीनें यथापठित सूत्र केले आहे या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, यथासंख्यन्याय अनित्य आहे व त्याच्या अनित्यत्वामुळें तो प्रवृत्त न केल्यानें, शकाकारानें दर्शविलेली आपत्ति टाळता आली असती तसेच 'यथासंख्यमनुदेश: समानाम्' सू १-३-१० या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात-'अथवैव वक्ष्यामि । यथासंख्यमनुदेश. समाना स्वरितेन । ततोऽधिकार: । अधिकारश्च भवति स्वरितेनेति ।' भाष्यकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'यथासङ्ख्यमनुदेश समानाम्' व त्याच्या लगेंच पुढें पठित असलेले स्वरितेनाधिकार:' या दोन सूत्राचा दण्डपाठ मानावा व त्या सूत्राचा

'यथासंख्यमनुदेश समाना स्वरितेन' व 'अधिकार' असा योग-विभाग करावा तसा योगविभाग केल्यानें समसंख्याक हे जर स्वरितत्वचिन्हानें युक्त पठित केले असले तरच त्याचा यथासंख्यसंबंध होतो असा त्या प्रथम सूत्राचा अर्थ निष्पन्न होता, म्हणून 'यरो ञमि ञम् वा' या सूत्रात 'ञमि, ञम्' हे स्वरितत्वयुक्त पठित न केल्यानें, वरील भाष्यान्वयें या सूत्राला यथासंख्यन्याय लागू पडला नसता तसेच 'आत् महत' या स्थली तकार या यर्' पुढें मकार हा 'ञम' असून देखील पाणिनीनें 'आम्महत' असा निर्देश न करिता 'आन्महत' असा निर्देश केला असल्यामुळें, असे म्हणता आले असते की 'यरो ञमि ञम् वा' या सूत्राला यथासंख्यन्याय लागू पडत नाही म्हणून शंकाकारानें केलेली शंका अयोग्य ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे परंतु 'यरो ञमि ञम् वा' असे सूत्र पठित केले असते तर, मनोरमेंत जें उदाहरण दिले आहे व शब्दरत्नात जी वर सांगितलेली दोन उदाहरणे दिली आहेत त्या तिन्ही उदाहरणात 'यर्' पुढें 'ञम्' किंवा यम्प्रत्याहारान्तर्गत वर्ण नसून अनुनासिक अच्च असल्यामुळें त्या तीन रूपाची सिद्धि झाली नसती आणि म्हणून त्या रूपाची सिद्धि होण्याकरिता 'यरोऽनुनासिके' या सूत्रात निमित्तकोटींत 'अनुनासिके' या पदाचे ग्रहण असणे आवश्यक आहे असं शब्दरत्न-कार म्हणतात व पुढील शब्दरत्नातील पक्तीत असे सिद्ध करू इच्छितात की, विधेयकोटीत देखील 'अनुनासिक' हेच पद असणं आवश्यक आहे आणि विधेयकोटीत 'ञम्' किंवा 'यम्' हे पद असल्यास अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल ) 'कमलाँ श्चिनोऽपि' या पूर्वी दिलेल्या उदाहरणात लकाराचे जागी दन्त्य नकार होण्याची जी आपत्ति येत तिचे निवारण करण्याकरिता वरील सूत्रात विधेय-कोटीत 'अनुनासिक' हेंच पद असणे आवश्यक आहे विधेयकोटींत यकारानें सुरू होणारा 'यम्' प्रत्याहार पठित केल्यास, म्हणजे 'यरोऽनुनासिके यम् वा' असे सूत्र पठित केल्यास, विधीयमान

वर्णाने ('भाव्यमानेन सवर्णाना ग्रहण न'–परि. १९–या परिभाषान्वये लकाराचे जागी अनुनासिक लँकार न होता, यम्प्रत्याहारात अन्तर्भूत असलेला) निरनुनासिक लकारच होण्याची आपत्ति येईल, म्हणून यथापठित ते सूत्र असणेच योग्य आहे ('यरोऽनुनासिके ञम् वा' असे सूत्र पठित केले तर 'हे कमल् आँश्चिनोषि' या उदाहरणात स्थान साम्यामुळे दन्त्य लकाराचे जागी ञम्प्रत्याहारात अन्तर्भूत असलेला दन्त्य नकार होण्याची आपत्ति येईल व 'हे कमनाँ श्चिनोषि' असे अनिष्ट रूप होईल. म्हणून वरील सूत्राऐवजी नसे सूत्र पठित करणे अयोग्य आहे. तसेच 'यरोऽनुनासिके यम् वा' असे सूत्र पठित केल्यास, या स्थली 'यम्' हा आदेशरूपाने विधीयमान असल्यामुळे व 'भाव्यमानेन सवर्णाना ग्रहण न' ही परिभाषा असल्यामुळे, लकाराचे जागी अनुनासिक लँकार न होता निरनुनासिक लकारच होईल व इष्ट रूप सिद्ध होणार नाही म्हणून वर दर्शविलेल्या सर्व आपत्ति टाळण्याकरिता यथापठित ते सूत्र असणेच योग्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे )

मनोरमा—"मय उञो वो वा" ॥ मयः परस्येति । पराविनौ तु प्राचः प्रमादः, "षष्ठीनिर्दिष्टस्य हि आदेशा उच्यन्ते" इति भाष्यात, आदेशविधौ स्थानिनः षष्ठ्या एव न्याय्यत्वाच्च । असिद्धत्वादिति । अत एवेद वत्व त्रिपाद्या विधीयते । प्रकृतिभावमात्रबाधनार्थत्वे हि "इको यण्–" इत्यनन्तर मय उञो वेत्येवावक्ष्यत् । यण चान्ववर्त्तयिष्यत् । इह मय उञ इतौ परे अष्टाविंशतिरूपाणि । तथा हि–"उञः" इति प्रगृह्यत्वे किमु इति, वत्वपक्षे किम्विति । ऊँआदेशे किमूँ इति । आदेशस्य स्थानिवत्त्वेन "मय उञ–" इति प्रकृतिभावापवादभूते आन्तरतम्यादनुनासिके वकारे किम्वँिति । अनुनासिकाननुनासिकयोर्वकारयोः "मयो यण" इति द्वित्वस्य, मकारस्य "अनचि च" इति द्वित्वस्य च विकल्पेन वत्वपक्षे रूपाष्टकम् । तदभावे द्वयमिति दशकम् । प्रगृह्यसञ्ज्ञाविरहपक्षे "मय उञ–" इति वत्वस्यासिद्धत्वात् "इको यण्–" इति यणेव, तस्य

सिद्धत्वान्मोऽनुस्वारे "वा पदान्तस्य" इति परसवर्णपक्षे अनुनासिका-ननुनासिकवकारद्वयोपेतमेकादशं रूपम् । अनुनासिकस्य द्वित्वे "हलो यमाम्" इति लोपस्य वैकल्पिकत्वाबकरणे त्रिवकारं द्वादशं रूपम् । परसवर्णाभावपक्षे अनुस्वारस्य यस्त्वोत्पाक्षिके द्वित्वे द्वे । संकलनया चतुर्दश । इतिशब्देकारस्य "अणोऽप्रगृह्यस्य" इत्यनुनासिक-विकल्पादष्टाविंशतिरिति ॥

'मय उञो वो वा' सू. १०८ (या सूत्रातील 'मय.' ही पञ्चमी असून 'उञ:' ही षष्ठी असल्यामुळें) या सूत्राचे कौमुदीत 'मय. परस्य उञो वो वा स्यादचि' असे व्याख्यान केले आहे प्रक्रियाकौमुदीकारानी 'मय. परादुञोवि परे वो वा स्यात्' असें जें प्रकृत सूत्राचे व्याख्यान केले आहे ते चूक आहे; कारण 'षष्ठी-निर्दिष्टस्य हि आदेशा उच्यन्ते', म्हणजे सूत्रात जो षष्ठीविभक्तीत निर्दिष्ट आहे त्याचेच जागी आदेश होण्याचे विधान केले जाते, असें भाष्यात म्हटले आहे आणि म्हणून आदेशाचे विधान करणाऱ्या सूत्रात स्थानी षष्ठीविभक्तीतच असणे न्याय्य–योग्य–आहे. (प्रकृत सूत्रात 'उञ्' चे जागी विकल्पेंकरून वकारादेश होणे सांगितलें असल्यामुळें, 'उञ.' ही स्थानषष्ठीच मानली पाहिजे, ती पञ्चमी मानता येत नाहीं; म्हणून 'उञ:' ही पञ्चमी मानून प्रक्रिया-कौमुदीकारानी 'मय परादुञ:' असे जें व्याख्यान केले आहे हें व्याख्यान करणे योग्य न ठरता 'मय. परस्य उञ:' असेच व्याख्यान करणे योग्य ठरतें. प्रक्रियाकौमुदीकारानी प्रकृत सूत्राचे जें वरप्रमाणें व्याख्यान केले आहे ते चूक न ठरावे याकरिता प्रसादकारानें आपल्या टीकेंत बरीच ओढाताण केली आहे व 'परादुञ.' हें एक सामासिक पद मानून व त्याचे 'अतति गच्छत्यत् । अत सातत्यगमने । क्विप् । परश्चासावच्च परात् । पराच्चासावुञ् च परादुञ् । तस्य परादुञ: । मय: परस्योञ इत्यर्थ: ।' असे व्याख्यान करून 'मय परस्य उञ:' असा अर्थ निष्पन्न केला आहे. पुढें ते म्हणतात – 'अथवा मय: परादिति पदादित्यधिकारात् पदस्य परोऽवयवो यो ञ्

तस्मात् परस्योञ । मयन्तात्पदात्परस्योञ इत्युक्त भवति । एतच्च येन विधिस्तदन्तस्य इति परिभाषया लभ्यते ।' 'मय परस्य उञ' असे जर प्रक्रियाकौमुदीकारानी सिद्धान्तकौमुदीत जस व्याख्यान केले आहे तस सरळ व्याख्यान केले असतें तर, प्रसादकारानी जी वर खटपट केली आहे ती करण्याची काहीच गरज पडली नसती ) 'उञ्' चे जागी प्रकृत सूत्रानें विकल्पेंकरून होणारा वकारादेश असिद्ध ठरावा याकरिताच हे वकारादेश होण्याचे विधान करणारे सूत्र त्रिपादीत पठित केल आहे (म्हणूनच 'किमु उक्तम = किम्वुक्तम्' या उदाहरणात 'किम्' या पदातील अन्त्य मकाराचे जागी 'मोऽनुस्वार' सू १२२ या सूत्रानें होणारा अनुस्वार होत नाही, कारण जरी पदान्तीं असलेल्या मकारापुढें वकार हा हल् आहे तरी तो 'मोऽनुस्वार' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या मानानें पर असलेल्या प्रकृत त्रैपादिक सूत्रानें झाला असल्यामुळें, तो त्या पूर्व त्रैपादिक सूत्रानें मकाराचा अनुस्वार करतेवेळी 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ या सूत्रान्वयें असिद्ध ठरतो व तो झालाच नाही आणि मकारापुढें 'उ' हा अच्च आहे अस मानणे भाग पडत असल्यामुळें, मकाराचे जागीं अनुस्वाराची प्राप्तीच होत नाही आणि म्हणून 'किंवुक्तम्' अस रूप न होता 'किम्वुक्तम्' असच रूप होत ) केवळ प्रकृतिभावाचा बाध व्हावा एवढेंच जर प्रकृत सूत्राचे प्रयोजन असतें तर, 'इको यणचि' या सापादिक सूत्राच्या लगेंच पुढें 'मय उञो वा' अशा प्रकारें पाणिनीनें प्रकृत सूत्र पठित केल असतें व या सूत्रात 'इको यणचि' या पूर्व सूत्रातून 'यण्' या पदाची अनुवृत्ति केली असती ('किमु उक्तम्' या उदाहरणातील 'उञ् = उ' हा निपात 'निपात एकाजनाङ्' सू १०३ या सूत्रान्वयें नित्य प्रगृह्यसंज्ञक आहे व प्रगृह्यसंज्ञक निपात पदान्तीं असून त्यापुढें 'उक्तम्' यातील 'उ' हा अच् असल्यामुळें, 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू ९० या सूत्रानें येथें नित्य प्रकृतिभावाची प्राप्ति आहे तशा नित्य होणाऱ्या प्रकृतिभावाचा बाध व्हावा, म्हणजे नित्य प्रकृतिभाव न होता 'उञ् = उ' चे जागीं

विकल्पेंकरून वकारादेश व्हावा, याकरिता प्रकृत सूत्र केले आहे असे शकाकाराचे म्हणणे आहे या शकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, एवढेच जर या सूत्राचे प्रयोजन असते तर पाणिनीनें हे सूत्र त्रिपादीत पठित न करिता 'इको यणचि' या सूत्रानतर सपादसप्ताध्यायीत पठित केले असते व त्या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'यण्' या पदाची अनुवृत्ति झालीच असती आणि प्रकृत सूत्रात 'व.' हे पद घालण्याची गरज राहिली नसती व असे करण्यात पद लाघव झाले असते असे असून देखील पाणिनीनें प्रकृत सूत्र त्रिपादीत मुद्दाम पठित केले असल्यामुळें हे स्पष्ट होते की, नित्य प्रकृतिभाव न व्हावा एवढाच पाणिनीचा हेतु नसून 'उञ्=उ' चे जागी होणारा वकारादेश 'मोऽनुस्वार' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरावा हा देखील पाणिनीचा हेतु होता म्हणूनच 'किमु उतवम्' या स्थली जेव्हा 'उञ् = उ' या निपाताचे जागी विकल्पेंकरून वकारादेश केला जातो तेव्हा वर सागितल्याप्रमाणे त्या वकारामागील मकाराचा 'मोऽनुस्वार' सू १२२ या सूत्राने होणारा अनुस्वार होत नाही आणि 'किं वुवतम' असे पाक्षिक अनिष्ट रूप न होता 'किम्वुवतम्' असे पाक्षिक इष्ट रूप सिद्ध होते ) 'किमु इति' या उदाहरणात 'म्' या 'मय्' पुढें 'उञ् = उ' हा निपात असून त्यापुढें 'इति हा शब्द आला असल्यामुळें अठ्ठावीस रूपें होतात तीं 'अशी'— 'उञ् = उ' या निपातापुढें 'इति' हा शब्द आला असल्यामुळें ('उञः' सू १०६ या सूत्रान्वयें) 'उञ्' या निपाताला विकल्पेंकरून प्रगृह्यसज्ञा केल्यानें 'किमु इति' असे एक (प्रकृतिभावाचे) रूप सिद्ध हाते 'उञ् = उ' या निपाताचे जागी प्रकृत सूत्रानें विकल्पेंकरून वकारादेश केल्यास, 'किम्विति' असे दुसरे रूप सिद्ध होते 'उञ् = उ' या निपाताचे जागी 'ऊँ' सू १०७ या सूत्रानें 'ऊँ' असा प्रगृह्य आदेश केल्यास, 'किमूँ इति' असे तिसरे (प्रकृतिभावाचे) रूप सिद्ध होते 'उञ' या (अनुबन्धविशिष्ट) निपाताचे जागी झालेला 'ऊँ' हा आदेश 'उञ् = उ' च आहे

अशी ('स्थानिवदादेशः' सू. ४९ या सूत्रान्वयें) स्थानिवद्भावानें वृद्धि करून प्रकृतिभावाचे बाधक 'मय उञो वो वा' सू. १०८ हें प्रकृत सूत्र प्रवृत्त केल्यास, वकारादेशाचा स्थानी 'ऊँ' हा अनुनासिक असल्यामुळें ('स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या सूत्रान्वयें) आन्तरतम्यानें अनुनासिक वकारादेश होऊन 'किम्वँिति' असे चवथें रूप सिद्ध होतें (वास्तविक असे रूप सिद्ध होऊ शकत नाही हे शब्दरत्नकार सांगणार आहेत) 'मयो यणो द्वे वाच्ये'— सू. ५४ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें अनुनासिक व निरनुनासिक वकाराचे व तसेच 'अनचि च' सू. ४८ या सूत्रानें मकाराचे विकल्पेंकरून द्वित्व केल्यास, वकारादेशपक्षात ('किम्विति' व 'किम्वँिति' या प्रत्येक रूपाची चार रूपें होऊन एकदर) आठ रूपें होतात वकारादेशाभावपक्षात, म्हणजे प्रकृत सूत्रानें विकल्पेंकरून होणारा वकारादेश न केल्यास, (प्रकृतिभावाचीं दोन रूपें होऊन) एकदर दहा रूपें होतात ('उञ' सू १०६ या सूत्रान्वयें 'उञ्' या निपाताला विकल्पेंकरून प्रगृह्यसंज्ञा होत असल्यामुळें जेव्हा) 'उञ्' या निपाताला प्रगृह्यसंज्ञा केली जात नाही तेव्हा त्या पक्षात (प्रकृत त्रैपादिक सूत्रानें 'उञ् = उ' चे जागीं होणारा) वकारादेश असिद्ध असल्यामुळें, 'इको यणचि' सू ४७ या सापादिक सूत्रानेंच वकारादेश होतो व तो वकारादेश सिद्ध असल्यामुळें (व अशा रीतीनें 'किम्' या पदांतील अन्त्य मकारापुढें सिद्ध असलेला वकार हा हल् येत असल्यामुळें 'मोऽनुस्वारः' सू. १२२ या सूत्रानें मकाराचे जागी अनुस्वार केल्यावर 'वा पदान्तस्य' सू १२५ या सूत्रानें अनुस्वाराचे जागीं विकल्पेंकरून परसवर्ण, म्हणजे अनुनासिक 'वँ', केल्यास, एक अनुनासिक व एक निरनुनासिक अशा दोन वकारांनी युक्त 'किवँ् विति' असे त्या परसवर्णपक्षात अकरावे रूप सिद्ध होतें. या अकराव्या रूपांतील ('इ' या अचापुढें असलेल्या) अनुनासिक वकाराचे ('अनचि च' या सूत्रानें) द्वित्व केल्यास व 'हलो यमां यमि लोपः' सू. ६० या सूत्रानें होणारा लोप

वैकल्पिक असल्यामुळें तो न केल्यास, त्रिवकारयुक्त, म्हणजे ज्यात पहिले दोन वकार अनुनासिक असून पुढील तृतीय वकार निर-नुनासिक आहे असे, 'किव्ँव्ँ विति' हें बारावें रूप सिद्ध होतें (वर सांगितल्याप्रमाणें 'वा पदान्तस्य' या सूत्रानें अनुस्वाराचे जागीं परसवर्ण विकल्पेंकरून होत असल्यामुळें परसवर्ण न केल्यास व 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यात भाष्यकारांनी अयोग-वाहांचा अक्षरसमाम्नायात 'अ' पुढें व 'शर्' मध्यें पाठ मानला असल्यामुळें) परसवर्णाभावपक्षात (जो अनुस्वार हा अयोगवाह असा तसाच कायम राहतो) तो अनुस्वार 'यर्' ठरत असल्यामुळें त्याचें 'अनचि च' सू ४८ या सूत्रानें) विकल्पेंकरून द्वित्व केल्यास, 'किंविति' व 'किंंविति' अशी दोन रूपें सिद्ध होतात अशा रीतीनें वरील सर्व रूपांची बेरीज केली असता चवदा रूपें सिद्ध होतात 'अणोऽप्रगृह्यस्या-नुनासिकः' सू ११० या सूत्रानें वरील चवदा उदाहरणांतील 'इति' या पदाच्या अन्तीं असलेल्या (अप्रगृह्य) इकारास विकल्पेंकरून अनुनासिक केल्यास (वरील चवदा रूपांतील प्रत्येक रूपामधील 'इति' या पदात असणारा अप्रगृह्य अन्त्य इकार हा 'अण्' एकदा अनुनासिक व एकदा निरनुनासिक होऊन एकदर) अठ्ठावीस रूपें सिद्ध होतात.

शब्दरत्न–इत्येवावश्यमिति । न चात्रापि न्यासे सन्निपातपरि-भाषयाऽनुस्वाराप्राप्तिरिति वाच्यम्, त्रिपाद्यान्तया पाठेन सन्निपात-परिभाषाऽनित्यत्वस्यापि ज्ञापनादिति भावः ।।

अनुनासिके वकारे इति । इदं कैयटानुरोधेन । "मय उञः–" इत्यत्र विधीयमानस्य सवर्णग्राहकत्वाभावेनानेन सानुनासिकविधाना-भावेन क्वमत्र सः । अन्यथेदमो मस्यानुनासिको ऽकारः स्यात् । अत एवेदृशे विषये गुणानामभेदकत्वरक्षानाश्रयणमिति चिन्त्यम् ।।

'इको यणचि' या सूत्रापुढें 'मय उञो वा' असें सूत्र पठित केलें तरी, या सूत्रानें 'उञ् = उ' चे जागीं होणारा वकारादेश त्या

येथें हे सांगणे आवश्यक आहे की, हरदत्तानें देखील पदमञ्जरीत 'ऊँ आदेशस्यापि स्थानिवद्भावादनेन पक्षे वकारो भवति स चान्तर-तमत्वादनुनासिक:' असेच म्हटले आहे पण शब्दरत्नकार म्हणतात की) 'मय उञो वो वा' या प्रकृत सूत्रात वकारादेश होण्याचे विधान केले असल्यामुळें, तो विधीयमान वकार ('भाव्यमानेन सवर्णानां ग्रहण न'-परि १९- या परिभाषान्वयें) सवर्णाचा, म्हणजे अनुनासिक वकाराचा, ग्राहक होऊ शकत नाही आणि प्रकृत सूत्रात अनुनासिक वकारादेश होण्याचे विधान केले नसल्यामुळें (अनुनासिक 'ऊँ' या स्थानीचे जागीं) अनुनासिक वकारादेश कसा होऊ शकणार ? (तसा अनुनासिक वकारादेश होणे शक्य नाही आणि त्यामुळें किम्विँति' असे मनोरमेंत दिलेले चवर्थे रूप सिद्ध होऊ शकत नाही.) विधेय-रूपानें सूत्रात निर्दिष्ट असलेला 'अण्' सवर्णाचा ग्राहक होतो असे मानल्यास, ('त्यदादीनाम:' सू. २६५ या सूत्रानें) 'इदम्' या शब्दाच्या अन्त्य मकाराचे जागीं होणारा अकारादेश अनुनासिक होण्याची आपत्ति येईल आणि म्हणून अशा ठिकाणीं येणारी ही आपत्ति टाळण्याकरिता 'अभेदका गुणा:'-परि. ११८-हा पक्ष अशा ठिकाणी स्वीकारणे योग्य नाही; (कारण तो पक्ष येथें स्वीकारल्यास जो भाव्यमानपरिभाषा-परि. १९-'अणुदित्सवर्णस्य चाप्रत्यय' सू. १४ या सूत्रातील 'अप्रत्यय:' या प्रतिषेधाच्या आधारावर रचली आहे ती बाधित होईल व तसे करणे मुळीच योग्य ठरत नाही. पाणि-नीय सूत्राच्या आधारावर रचलेल्या त्या परिभाषेचा 'अभेदका गुणा:' ही ज्ञापकसिद्ध परिभाषा बाध करण्यास असमर्थ आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) आणि म्हणून मनोरमेंत दिलेले 'किम्विँति' हे चवर्थे रूप चिन्त्य आहे, म्हणजे तसे रूप वास्तविक सिद्ध होऊ शकत नाहीं.

॥ स्वरसन्धिप्रकरण समाप्तम् ॥

## ॥ अथ हल्सन्धिप्रकरणम् ॥

मनोरमा—"स्तोः श्चुना" ॥ स्तोरिति समाहारद्वन्द्वः । सौत्रं पुंस्त्वम् । श्चुनेति । "सह युक्त-" इति सूत्रे विनापि तद्योगं तृतीयेति वक्ष्यते । योगइत्येतदध्याहारलभ्यम् । अत्र स्थान्यादेश-योर्यथासंख्यं, निमित्तकार्यिणोस्तु न । "शात्" इति ज्ञापकात् । "अल्पाच्तरम्" इत्यादौ तु सौत्रत्वात् श्चुत्व न । तज्ज्ञानमित्यादौ तु भवत्येव । स्तोः श्चौ श्चुरिति सुवचम् । न च "तस्मिन्निति निर्दिष्टे-" इति परिभाषोपस्थानेन यज्ञः याञ्चा इत्यादि न सिध्येत् । "शात्" इति लिङ्गेन तस्या इहानुपस्थानात् ॥

'स्तोः श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रातील 'स्तोः' हा समाहारद्वन्द्व आहे व त्याचे पुल्लिङ्गत्व सौत्र आहे. ('स् च तुश्च' या दोन पदाचा समाहारद्वन्द्व केल्यास 'स नपुंसकम्' सू ८२१ या सूत्रान्वयें सामासिक शब्द नपुंसक झाला पाहिजे व 'इकोऽचि विभक्तौ' सू ३२० या सूत्रानें नुमागम होऊन 'स्तुनः' असे षष्ठीच्या एकवचनाचे रूप झाले पाहिजे. पण 'छन्दोवत्सूत्राणि भवन्ति' असे भाष्यवचन असल्यामुळें, 'छन्दसि दृष्टानुविधिः' या न्यायान्वयें, आचार्य पाणिनीनें जसा सूत्रात प्रयोग केला आहे तोच साधु मानणे भाग आहे व या स्थलीं 'स नपुंसकम्' हें सूत्र प्रवृत्त न करिता 'स्तोः' या पुल्लिङ्गी सौत्र निर्देशाची सिद्धि केली पाहिजे. येथें इतरेतरयोगद्वन्द्व करून एकवचन सौत्र मानल्यास देखील चालू शकतें असे बालमनोरमेंत म्हटले आहे. परतु लिङ्ग व्याकरण-शास्त्रान्वयें ठरत नसून लौकिकप्रयोगावरून ठरत असल्यामुळें व 'द्व्येकयोर्द्विवचनैकवचने' सू १८६ इत्यादि पाणिनीय शास्त्रान्वयें वचन सिद्ध होत असल्यामुळें वचनरूप शास्त्रीय कार्याचा व्यत्यय न मानता लिङ्गरूप अशास्त्रीय कार्याचाच व्यत्यय मानणे उचित

आहे आणि म्हणूनच दीक्षितानीं 'सौत्र पुंस्त्वम्' असे म्हटले आहे) 'सहयुक्तेऽप्रधाने' सू ५६४ या सूत्रान्वयें होणारी तृतीया 'सह' या शब्दाचा प्रयोग केला नसला तरी होऊ शकते हे त्या सूत्राचे व्याख्यान करतेवेळीं सागण्यात येईल, (आणि म्हणूनच प्रकृत सूत्रात 'सह' या शब्दाचा निर्देश केला नसून देखील 'श्चुना' ही तृतीया वरील सूत्रान्वयें झाली आहे त्या सूत्राचे व्याख्यान करिताना दीक्षितानीं कौमुदीत 'विनाऽपि तद्योग तृतीया। वृद्धोयूना इत्यादिनिर्देशात्' असे म्हटले आहे प्रकृत सूत्राचे कौमुदीत व्याख्यान करिताना 'सकार-तवर्गयो शकारचवर्गाभ्या योगे' असं जें म्हटले आहे त्यातील) 'योगे' हा शब्द (जरी प्रकृत सूत्रात साक्षात् निर्दिष्ट नाही व पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात त्या पदाची अनुवृत्ति नाही तरी) अध्याहारानें प्राप्त होतो, म्हणजे 'स्तो श्चुना योगे श्चु' असा प्रकृत सूत्राचा अर्थ आहे. प्रकृत सूत्रात स्थानी व आदेश याचेच ठिकाणी यथासख्यन्याय लागू पडतो, स्थानी व निमित्त याचे ठिकाणीं तो न्याय लागू पडत नाही व हे 'शात्' सू ११२ या ज्ञापकावरून सिद्ध होते (प्रकृत सूत्रात 'स्तो' म्हणजे सकार व तवर्ग, हा स्थानी असून 'श्चु', म्हणजे शकार व चवर्ग, हा आदेश आहे व या दोहोंची सख्या सारखीच, म्हणजे दोन, असल्यामुळें त्याचे ठिकाणी 'यथासङ्ख्यमनुदेशः समानाम्' सू १२८ हा यथासख्यन्याय लागू पडतो व त्यामुळें सकाराचे जागी शकार आणि 'त्, थ्, द्, ध्, न्' याचे जागीं अनुक्रमें 'च्, छ्, ज्, झ्, ञ्' असे आदेश होतात स्थानी 'स्तो' व निमित्त 'श्चुना' याची देखील सख्या सारखीच, म्हणजे दोन, आहे व त्यामुळें त्याचे ठिकाणी देखील यथासख्यसूत्राची प्राप्ति आहे परतु 'शात्परस्य तवर्गस्य चुत्वं न स्यात्' या अर्थाचें 'शात्' हें निषेधक सूत्र पाणिनीनें केले असल्यामुळें व 'प्राप्तस्यैव निषेध' या न्यायान्वयें जें प्राप्त आहे त्याचाच निषेध होऊ शकत असल्यामुळें, हे निषेधक सूत्र चरितार्थ ठरण्याकरिता हे मानणे आवश्यक आहे की, शकार व तवर्ग याचा योग झाला असता प्रकृत सूत्रान्वयें

तवर्गाचे जागीं चवर्ग होण्याची जी प्राप्ति आहे तिचा शकारापुढें तवर्ग आल्यास निषेध व्हावा याकरितां 'शात्' हें निषेधक सूत्र केलें आहे व हें निषेधक सूत्र असल्यामुळेंच, 'प्रश्नः विश्नः' इत्यादि स्थलीं शकारापुढें असलेल्या तवर्गांतील नकाराचा ञकार होत नाहीं. पण शकारापूर्वी तवर्गांतील वर्ण आल्यास, त्या वर्णाचे जागीं चवर्गांतील वर्ण होतोच व बृहत् + शरः = बृहच्छरः' असें रूप होतें. सारांश सकाराचा शकाराशीं आणि तवर्गाचा चवर्गाशीं योग झाल्यासच प्रकृत सूत्र लागू पडतें असें नसून, सकाराचा तवर्गाशीं योग झाल्यास देखील प्रकृत सूत्र लागू पडतेंच, फरक एवढाच कीं, शकाराचा तवर्गाशीं योग झाला असतां प्रकृत सूत्र लागू पडण्या-करितां शकारापुढें तवर्गांतील वर्ण न येतां तो वर्ण शकारापूर्वी असला पाहिजे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, तवर्गाचा चवर्ग होण्यास जसें त्या तवर्गाचा चवर्गाशीं योग असणें हें निमित्त आहे तसेंच त्या तवर्गांतील वर्णापुढें शकार येणें हेंहि त्याचा चवर्ग होण्याचें निमित्त आहे व अशा रीतीनें जी उद्देश्यगत संख्या दोन आहे तिच्या मानानें निमित्तगत संख्या अधिक, म्हणजे तीन, ठरत असल्यामुळें, उद्देश्य व निमित्त यांचे ठिकाणीं यथासंख्यन्याय लागू पडत नाहीं प्रकृत सूत्रांत उद्देश्य व निमित्त यांचे ठिकाणीं देखील यथासंख्यन्याय लागू पडतो असें मानल्यास, सकाराचा शकाराशीं योग झाला असतां सकाराचा शकार होतो व तवर्गाचा चवर्गाशीं योग झाला असता तवर्गाचे जागीं चवर्ग होतो एवढाच प्रकृत सूत्रांतून अर्थ निष्पन्न होईल व 'शात्' हें निषेधक सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. पण तें निषेधक सूत्र मुद्दाम केलें असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्राचा अर्थ करणें इष्ट नाहीं आणि म्हणून पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्रांत स्थानी व निमित्त यांची संख्या समान ठरत नसल्यामुळें, त्यांचे ठिकाणीं यथासंख्यन्याय लावता येत नाहीं हें उघड आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'अलाच्चरम्' सू. १०५ इत्यादि स्थलीं सौत्रनिर्देश असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें तकाराचे पावलेलें

चुत्व झाले नाही. ('अल्पाच्तरम्' या सूत्रात तकाराचा व चकाराचा योग झाला असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें तकाराचे जागी चकार होऊन 'अल्पाच्चरम्' असा प्रयोग व्हावयास पाहिजे होता. पण पाणिनीय सूत्रें छन्दोवत् मानलीं असल्यामुळें, 'छन्दसि दृष्टानुविधिः' या न्यायान्वयें पाणिनीनें सूत्रात जसा प्रयोग केला आहे तो सौत्र प्रयोग साधु मानणे भाग आहे.) 'तज्ज्ञानम्' इत्यादि स्थली चुत्व होतेच. ('तद्+ज्ञानम्' या स्थली दकारापुढें चवर्ग नसून 'ज्ञ्' हा वर्ण आहे.म्हणून येथें प्रकृत सूत्रानें दकाराचे जागीं जकार होऊ नये अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेच्या निरसनार्थ दीक्षितानी 'तज्ज्ञानम्' हे उदाहरण मुद्दाम दिले आहे या उदाहरणात वास्तविक दकारापुढें चवर्गातील जकार आहे, कारण 'ज्ञ' हा वर्ण अक्षर-समाम्नायात पठित नसल्यामुळें तो स्वतंत्र वर्ण आहे असे मानता येत नाही आणि वास्तविक तो वर्ण 'ज्' व 'ञ्' या दोन वर्णांचे बनलेले जोडाक्षर आहे.) 'स्तोः श्चौ श्चु.' असे सूत्र केले असते तर अधिक योग्य झाले असते पण असे सूत्र केले असते तर (त्या सूत्रात 'श्चौ' हा सप्तमीनिर्देश केल्याने) 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' सू. ४०, ही परिभाषा उपस्थित झाली असती व त्यामुळें 'यज्ञ, याञ्चा' इत्यादि रूपें सिद्ध होऊ शकली नसती असे कोणी म्हटल्यास ते म्हणणे बरोबर नाही, कारण 'शात्' हें ज्ञापक असल्यामुळें, प्रकृत सूत्र तसे पठित केले असतें तरी त्याचे ठिकाणी ती परिभाषा, सू. ४०, उपस्थित होऊ शकली नसती (प्रकृत सूत्रावरील काशिकेत 'यज यज्ञ. । याचेर्याञ्चा । शादिति प्रतिषेधो ज्ञापक॰ सङ्ख्यातानु-देशाभावस्य । स्तो श्चाविति सप्तमीनिर्देशो न कृतः । पूर्वेण परेण च श्चुना सन्निपाते श्चुत्व यथा स्यादिति ।' असे म्हटले आहे व यावर टीका करिताना हरदत्तानें पदमञ्जरीत 'श्चुनेति तृतीयानि-र्देश पूर्वभूतेनापि योगे यथा स्यात्, यज्ञ, याञ्चेति, सप्तमीनिर्देशे तु तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्येति परभूतेनैव योगे स्यात् ।' असे म्हटले आहे या दोन्ही ग्रन्थाचा भावार्थ हा आहे की, 'यज्, याच्'

या धातूहून 'यजयाचयत' सू. ३२६८ या सूत्रानें 'नङ्=न' प्रत्यय केला असता 'यज् + न, याच् + न' या दोन्ही स्थली चवर्गापुढें तवर्ग आहे. म्हणून 'स्तोः श्चौ श्चुः' असें सूत्र केलें असतें तर या सूत्रात 'श्चौ' हा सप्तमीनिर्देश असल्यामुळें 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' ही परिभाषा उपस्थित झाली असती आणि वरील दोन उदाहरणात चवर्गापुढें तवर्ग असून तवर्गापुढें चवर्ग नसल्यामुळें 'स्तोः श्चौ श्चुः' हें सूत्र त्या दोन उदाहरणात प्रवृत्त झाले नसतें व तवर्गाचे जागी चवर्ग झाला नसता आणि 'यज्ञः, याञ्चा' ही इष्ट रूपें सिद्ध होऊं शकली नसती. यावर दीक्षित असें उत्तर देतात की, 'शात्' या निषेधक सूत्राची उपपत्ति लावण्याकरिता हें मानणें आवश्यक आहे की, 'स्तोः श्चौ श्चुः' असें सूत्र केलें असतें तरी त्या सूत्रात 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' या परिभाषेची, म्हणजे या परिभाषेनें उपस्थित होणाऱ्या 'पूर्वत्व' या अर्थाची, उपस्थिति होऊं शकली नसती, कारण ती परिभाषा उपस्थित होऊं शकली असती असें मानल्यास, शकारापुढें तवर्ग आला असता त्या तवर्गाचे जागी चवर्गाची प्राप्तीच होत नाहीं असें मानावें लागेल व त्यामुळें 'शात्' हें निषेधक सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. या विषयाचें अधिक विवरण शब्दरत्नात करण्यात येईल.)

शब्दरत्न–विनापि तद्योगमिति । साहित्य च योगक्रियायाम् । एतदिति । संयोग इति तदर्थः । सत्या भामेतिवन्निर्देशः । संयोगश्चाव्यवहितयोरेवेति चितं कट् तैलमित्यादौ न दोषः । यथासंख्यमिति । तयदधनेत्यादेरप्यनादितया तमादाय "परस्मैपदानां णल्" इत्यादौ सूत्रान्तरस्यक्रमेणेव यथासंख्यमिति भावः । श्वादिशब्दैश्चानादिसिद्धलोकप्रसिद्धक्रमेणैवोपस्थितिरिति तात्पर्यम् । ननु तज्ज्ञानमित्यादौ श्चुयोगाभावान्न स्यादत आह—तज्ज्ञानमिति । अन्वयोगे तयोच्चारणमात्रं न त्विदं वर्णान्तरमिति भावः । अनुपस्थानेनि । पूर्वत्वांशानुपस्थानेत्यर्थः । तेन चितमित्यादौ न दोषः ॥

जशी यथासंख्यन्यायाची प्रवृत्ति केली जाते त्याचप्रमाणें 'तथदधन' इत्यादि वर्णपाठ देखील अनादि असल्यामुळें त्या पाठाचा आश्रय केल्यानें प्रकृत सूत्राचे ठिकाणी, म्हणजे प्रकृत सूत्रात निर्दिष्ट असलेल्या 'तु' व 'चु' याचे ठिकाणीं, यथासंख्यन्यायाची प्रवृत्ति केली जाते. तात्पर्य हें की 'चु' इत्यादि शब्दांनी अनादि कालापासून चालत आलेल्या व लोकात प्रसिद्ध असलेल्या वर्णपाठक्रमान्वयेंच वर्णांची उपस्थिति होते (शिवसूत्रात 'चछजझञ, तथदधन,' इत्यादि तऱ्हेचा वर्णक्रमपाठ सांगितला नसल्यामुळें 'त्थ्द्ध्न्' याचे जागी 'च्छ्ज्झ्ञ्' हे आदेश अनुक्रमे होतात हे यथासंख्य सूत्र प्रवृत्त केल्यानें कसे सिद्ध करता येतें अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'परस्मैपदानां णलतुस्' या सूत्रात केवळ आदेशाचा निर्देश केला असून ते आदेश कोणत्या स्थानीचे–प्रत्ययाचे–जागी अनुक्रमें व्हावे हें जरी सांगितले नाही तरी, 'तिप्तस्झि' सू २१५४ या भिन्न सूत्रात निर्दिष्ट असलेल्या प्रसिद्ध प्रत्ययाचे जागीच जसे 'णल्' इत्यादि आदेश अनुक्रमें केले जातात त्याचप्रमाणे जरी शिवसूत्रात भिन्न प्रकारचा वर्णक्रमपाठ असून 'तथदधन' इत्यादि तऱ्हेचा वर्णक्रमपाठ नाहीं तरी, तसा पाठ लोकात अनादि कालापासून प्रसिद्ध असल्यामुळें, त्या लौकिक अनादि वर्णक्रमपाठाचा आश्रय केल्यानें, त्या पाठक्रमानुसार प्रकृत स्थली, म्हणजे 'तु' व 'चु' या स्थली, यथासंख्यन्यायाची प्रवृत्ति करण्यात काही अडचण येत नाहीं. सारांश 'चु, टु, तु' इत्यादि शब्दांनी लोकप्रसिद्ध अनादि वर्णक्रमपाठान्वयेंच वर्णांची उपस्थिति होते. म्हणजे 'तु' या शब्दानें 'त्थ्द्ध्न्' या वर्णांची लौकिक वर्णक्रमपाठानुसार उपस्थिति होत असून 'चु' या शब्दानें 'च्छ्ज्झ्ञ्' या वर्णांची उपस्थिति होते. त्यामुळें 'तु' चे जागी 'चु' होतो असे विधान केल्यानें 'त्थ्द्ध्न्' याचे जागीं अनुक्रमें 'च्छ्ज्झ्ञ्' हे आदेश होतात असाच अर्थ निष्पन्न होतो असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे) 'तज्ज्ञानम्' इत्यादि स्थली तवर्गाचा

चवर्गाशीं संयोग नसल्यामुळे प्रकृत सूत्राने होणारे चुत्व होऊ शकत नाही अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेच्या निवारणार्थ दीक्षितानी 'तज्ज्ञानम्' हें उदाहरण मनोरमेंत दिले आहे. त्याच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे की, 'ज्ञ्' हा वर्ण केवळ 'ज्' व 'ञ्' या दोन वर्णांचे मिळून उच्चारण असून भिन्न स्वतंत्र वर्ण नाही. (याचे विवरण मनोरमेंत केलेच आहे.) 'शात् इति लिङ्गेन तस्या इहानुपस्थानात्' या मनोरमेच्या पंक्तीतील 'अनुपस्थानात्' या पदाचा 'पूर्वत्वांशानुपस्थानात्' असा अर्थ आहे. त्यामुळें 'चितम्' इत्यादि स्थली काही दोष येत नाही ('तस्मिन्निति परिभाषया पूर्वत्वम्, अव्यवहितत्वम् षष्ठ्यर्थांशः इति अंशत्रयमुपस्थाप्यते, यत्र यावानंशः सिद्धो बाधितो वा तमपहाय अवशिष्टांशः उपस्थाप्यते' असा सिद्धान्त आहे व त्याचा असा अर्थ आहे की, 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' या परिभाषेनें पूर्वत्व, अव्यवहितत्व आणि षष्ठ्यर्थ या तीन अंशांची जरी उपस्थिति होऊ शकते तरी, ज्या सूत्रात सप्तमीनिर्देश करुन कार्याचे विधान केले आहे त्या सूत्रात या वरील तीन अंशापैकी ज्या अंशाची उपस्थिति बाधित आहे किंवा अन्य रीतीने सिद्ध आहे तो अंश विधिसूत्रात उपस्थित न होता बाकीचे अंश उपस्थित होतात. म्हणून 'स्तोः श्चो श्चुः' असे प्रकृत सूत्र पठित केले असते तरी या सूत्रात 'स्तोः' हा षष्ठीनिर्देश असल्यामुळें, या सूत्रात षष्ठ्यर्थरूप अंश उपस्थित होण्याची काहीं गरज नाहीं. तसेच 'शात्' या सूत्रानें 'पूर्वत्व' या अंशाची उपस्थिति, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, बाधिक होत असल्यामुळे, तो अंश देखील उपस्थित होऊ शकत नाही. बाकी राहिलेला 'अव्यवहितत्व' एवढाच अंश त्या सूत्रात उपस्थित झाला असता व त्यामुळे त्या सूत्राचा असा अर्थ झाला असता की, सकार किंवा तवर्ग यांचा शकार किंवा चवर्ग याच्याशीं अव्यवहित संबध–संयोग–झाला असता–मग या दोहोपैकी कोणताहि वर्ण पूर्व किंवा पर असो–सकाराचे जागी शकार व तवर्गाचे जागी चवर्ग होतो. सारांश 'स्तोः श्चो श्चुः' असे

प्रकृत सूत्र पठित केले असत तरी, त्या सूत्रात 'पूर्वस्य' या बाधित अंशाची उपस्थिति न होता व तसेच 'षष्ठ्यर्थ' या अंशाची देखील उपस्थिति न होता, केवळ 'अव्यवहितत्व' एवढ्याच अंशाची उपस्थिति झाली असती व त्यामुळें 'चितम्' इत्यादि उदाहरणात जरी चकारानंतर तकार आला आहे तरी चकार व तकार या दोहोमध्यें अव्यवहितत्व नसल्यामुळें, म्हणजे या दोहोमध्यें इकाराचे व्यवधान असल्यामुळें, तकाराचे जागी चकार होऊ शकला नसताच )

मनोरमा--- ष्टुना इहापि कार्यनिमित्तयोर्यथासंख्यं न । "तोष्वि" इति ज्ञापकात् । ष्टौ ष्टुरिति सुवचम् । ईट्टे, ईष्टे, इत्यादौ "न पदान्तात्-" इति ज्ञापकान्न दोषः ।

'ष्टुना ष्टु' सू. ११३ या सूत्रात देखील स्थानी व निमित्त याचे ठिकाणी यथासंख्यसूत्र लागू पडत नाही, कारण 'तो षि' सू. ११५ हें सूत्र याबद्दल ज्ञापक आहे (प्रकृत सूत्रात स्थानी 'स्तो' व आदेश 'ष्टु' या दोहोंची संख्या समान, म्हणजे दोन, असल्या-मुळें त्याचे ठिकाणी यथासंख्यन्याय लागू पडतो, म्हणजे सकाराचे व तवर्गाचे जागीं अनुक्रमें षकार व टवर्ग होतो असा अर्थ होतो. परंतु स्थानी 'स्तो' व निमित्त 'ष्टुना' यांना तो न्याय लागू पडत नाही, कारण 'तवर्गस्य षकारे परे न ष्टुत्वम्' या अर्थाचे 'तो षि' हें निषेधक सूत्र असल्यामुळें व जें प्राप्त आहे त्याचाच निषेध केला जात असल्यामुळें त्या निषेधक सूत्रावरून हें ज्ञापित होतें की, *तवर्गाचा टवर्ग होण्यास त्या दोन वर्गांतील वर्णांचा संयोग* होणे हे जसे एक निमित्त आहे त्याचप्रमाणे तवर्गाचा षकाराशी संयोग होणे हे देखील दुसरे निमित्त आहे, फरक एवढाच कीं, द्वितीय स्थली तवर्गापुढें षकार नसावा तवर्गांतील वर्णाच्या लगेंच पूर्वी षकार आल्यास तवर्गाचे जागी टवर्ग होतोच सारांश उद्देश्यगत दोन या संख्येच्या मानानें निमित्तगत तीन ही संख्या अधिक असल्यामुळें, प्रकृत सूत्रातील उद्देश्य व निमित्त

याचे ठिकाणीं यथासंख्यन्याय लागू पडत नाही. तो न्याय प्रकृत स्थली लावल्यास, सकाराचा षकाराशी संयोग झाला असता सकाराचा षकार होतो व तवर्गाचा टवर्गाशी संयोग झाला असता तवर्गाचा टवर्ग होतो एवढाच प्रकृत सूत्राचा अर्थ होईल, व पूर्व षकाराचा तवर्गाशी संयोग झाला असता देखील तवर्गाचा टवर्ग होतो हा अधिक अर्थ निष्पन्न होऊ शकणार नाही आणि त्यामुळें 'तो षि' हे निषेधक सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. या विषयाचे विस्तृत विवरण मागील सूत्रात केलेच आहे ), 'ष्टौ ष्टु:' असे सूत्र केले असते तर अधिक बरे झाले असते 'ईट्टे, ईष्टे' इत्यादि स्थली 'न पदान्तात्' सू ११४ हे ज्ञापक असल्यामुळें काही दोष येत नाही. ('ईड् + ते' या स्थली 'खरि च' सू १२१ या सूत्रानें 'ईड्' यातील डकाराचा टकार होऊन 'ईट् + ते' अशा स्थिति झाली असता, जरी टकाराच्या लगेंच पुढें तकार आहे तरी टकार पदान्ती नसल्यामुळें, 'न पदान्ताट्टो.' हा निषेध लागू पडत नाही व प्रकृत सूत्राने तकाराचा टकार होऊन 'ईट्टे' असे इष्ट रूप सिद्ध होते. तसेच 'ईष् + ते' या स्थली तकारापुढें षकार नसून षकाराच्या लगेंच पुढें तकार असल्यामुळें, 'तो: षि' हा निषेध लागू पडत नाहीं व प्रकृत सूत्रानें 'ते' या प्रत्ययातील तकाराचा टकार होऊन 'ईष्टे' असे इष्ट रूप सिद्ध होते. 'ष्टौ ष्टु.' असे सूत्र केले असते तरी त्या सूत्रात, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' या परिभाषेचे तीन्ही अंश उपस्थित न होता, 'अव्यवहितत्व' एवढाच एक अंश उपस्थित झाला असता व त्यामुळें 'ईड् + ते, ईष् + ते' या उदाहरणात जरी टवर्गापुढें व षकारापुढें तवर्ग आहे तरी, दोहोंमध्यें व्यवधान नसल्यामुळें, तकाराचा टकार होण्यात काही अडचण आली नसती )

मनोरमा–सर्पिष्टममिति । "ह्रस्वात्तादौ" इति परत्वम् ॥

'सर्पिष्टमम्' या ('न पदान्ताट्टो:' सू ११४ या सूत्रावरील कौमुदीत दिलेल्या) उदाहरणात 'ह्रस्वात्तादौ तद्धिते' सू १३२५

या सूत्रानें सकाराचे पत्व झाले आहे ('सर्पिस् + तमप्' या स्थळीं 'इ' या इण्प्रत्याहारान्तर्गत ऱ्हस्व वर्णापुढें सकार आला असून त्यापुढें तकारानें सुरु होणारा 'तमप्' हा तद्धित प्रत्यय आला असल्यामुळें, 'ऱ्हस्वात्तादौ' या सूत्रानें 'सर्पिस्' यातील अन्त्य सकाराचा षकार होऊन 'सर्पिष् + तमप्' अशी स्थिति होते. या उदाहरणात 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें, किंवा 'सर्पिस्' शब्दापुढील ज्या अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययाचा 'सुपो धातुप्रातिपदिकयो.' सू ६५० या सूत्रानें लुक् झाला आहे त्याचा आश्रय केल्यानें 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें प्रत्ययलक्षणानें, 'सर्पिष्' याला पदसंज्ञा होते व जरी या पदाच्या अन्ती षकार आहे तरी, 'न पदान्ताट्टो:' सू ११४ या सूत्रात 'ष्टो:' असा निर्देश नसून 'टो' एवढाच निर्देश असल्यामुळें, तें निषेधक सूत्र येथें लागू पडत नाही व पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रकृत सूत्रात 'तस्मिन्निति निर्दिष्टे' या परि-भाषेतील 'पूर्वत्व' या अंशाची उपस्थिति होत नसून, केवळ 'अव्यवहितत्व' एवढ्याच अंशाची उपस्थिति होत असल्यामुळें, जरी षकारापूर्वी तकार नसून षकारापुढें तकार आहे तरी, प्रकृत सूत्रानें तकाराचा टकार होतो. येथें हें लक्षात ठेवावे कीं, जरी 'सर्पिस्' या पदातील अन्त्य सकार 'इस्' या उणादिप्रत्ययाचा अवयव आहे तरी, 'आदेश प्रत्यययो:' सू. २१२ या सूत्रानें त्या अन्त्य सकाराचे पत्व होऊं शकत नाहीं; कारण तें सूत्र 'अपदान्तस्य मूर्धन्य:' या अधिकारात पठित आहे व 'सर्पिस्' यातील सकार पदान्तीं आहे, आणि म्हणूनच दीक्षितांनी 'ऱ्हस्वात्तादौ इति पत्वम्' असें मनोरमेंत म्हटलें आहे. सकाराचे पत्व झाल्यावर षकार पदान्ती येत असून देखील त्याचे 'झलां जशोऽन्ते' सू ८४ या सूत्रानें जश्त्व–डकार–होत नाही याचे कारण हें कीं, 'झलां जशोऽन्ते' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें 'ऱ्हस्वात्तादौ' या पर त्रैपादिक सूत्रानें झालेले पत्व 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रान्वयें असिद्ध

ठरत असल्यामुळें व सकाराचा षकार झालाच नाही व सकारच कायम आहे असे मानावे लागत असल्यामुळें षकाराच्या जश्त्वाची प्राप्तीच होत नाही )

**शब्दरत्न– षत्वमिति । न च षस्य पदान्ते जश्त्वं भविष्यतीति तद्व्यर्थमिति वाच्यम् । षत्वस्यासिद्धत्वेनास्य जश्त्वाभावात् ॥**

('सर्पिष् + तमम्' या स्थली) षकार पदान्ती असल्यामुळे त्याचे जश्त्व होणार आणि म्हणून कौमुदीत दिलेले ('सर्पिष्टमम् हे) प्रत्युदाहरण अयोग्य ठरते असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे बरोबर नाही, कारण षत्व असिद्ध असल्यामुळें षकाराचे जश्त्व होऊ शकत नाही (शकाकाराचे असे म्हणणे आहे की, 'सर्पिष् + तमम्' या स्थली पूर्वी सांगितल्याप्रमाणे 'सर्पिष्' यातील षकार पदान्ती असल्यामुळे 'झला जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें जश्त्व होणारच व अशा रीतीनें पदान्ती षकार मिळणे अशक्य आहे आणि म्हणून पदान्त षकाररूप व्यावर्त्याचा अभाव असल्यामुळें, दीक्षितानी 'न पदान्ताट्टो' सू ११४ या सूत्रावरील कौमुदीत षकाराची व्यावृत्ति करून 'टो किम्' असा जो प्रश्न केला आहे व त्याचे 'सर्पिष्टमम्' हे जे प्रत्युदाहरण दिले आहे हा सर्व खटाटोप व्यर्थ ठरतो या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'झला जशोऽन्ते' हे त्रैपादिक पूर्वसूत्र असून 'ह्रस्वात्तादौ' हे त्रैपादिक परसूत्र असल्यामुळें, या परसूत्रानें होणारे षत्व 'झला जशोऽन्ते' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीने असिद्ध ठरते व षत्व झालेच नाही असे मानावे लागत असल्यामुळे, षकाराचे जश्त्व होण्याची प्राप्तीच नाही पण सकाराचे जें षत्व होते ते असिद्ध ठरत असल्यामुळें जरी षकाराचे जश्त्व होऊ शकत नाही तरी, पदान्ती असलेल्या 'सर्पिस्' यातील अन्त्य सकाराच्या जश्त्वाची 'झला जशोऽन्ते' या सूत्राने 'ह्रस्वात्तादौ' या पर त्रैपादिक षत्वशास्त्राला बाधून प्राप्ति आहेच व म्हणून देखील षकाररूप व्यावर्त्याच्या अभावामुळें षकाराची व्यावृत्ति

वरून केलेला 'टोः किम्' हा प्रश्न अनुपपन्न ठरतो व त्याचे 'सर्पिष्टमम्' हे जें प्रत्युदाहरण दिले आहे तेंहि अयोग्य ठरते असे कोणी म्हटल्यास, त्याला उत्तर हे आहे कीं, 'झलां जशोऽन्ते' या जश्त्वविधायकशास्त्राचे 'ससजुषो रुः' सू १६२ हे रुत्वशास्त्र अपवादक असल्यामुळें, सकाराच्या जश्त्वाची प्राप्ति न होता रुत्वाची प्राप्ति होते व रुत्व प्रथम केल्यावर 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें रेफाचा विसर्ग करून व 'विसर्जनीयस्य सः' सू १३८ या सूत्रानें विसर्गाचा सकार करून आणि नंतर 'ह्रस्वात्तादौ' सू १३२५ या सूत्रानें त्या सकाराचे षत्व केले असता जरी षकार पदान्ती येतो तरी विसर्ग, सत्व, षत्व ही पर त्रैपादिक सूत्रांनी होणारी कार्यें 'झलां जशोऽन्ते' या पूर्व त्रैपादिक जश्त्व शास्त्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें व अशा रीतीने षकार पदान्ती नसून 'रु' च कायम आहे असे मानावे लागत असल्यामुळें, जश्त्वाची प्राप्तीच होत नाही. परतु 'न पदान्ताट्टोः' हे 'ह्रस्वात्तादौ' या त्रैपादिक सूत्राच्या मानानें परसूत्र असल्यामुळें, त्या परसूत्राच्या दृष्टीनें 'ह्रस्वात्तादौ' या पूर्व त्रैपादिक सूत्रानें झालेले षत्व सिद्ध ठरते व अशा रीतीनें षकार पदान्ती मिळत असल्यामुळें, 'न पदान्ताट्टोः' या सूत्राला पदान्त षकाराचे व्यावर्त्य मिळू शकते. त्यामुळें त्या सूत्रात 'ष्टोः' असा निर्देश असता तर, 'सर्पिष्टमम्' या स्थली ष्टुत्वाचा निषेध झाला असता. पण षकाराची आवृत्ति करून त्या सूत्रात 'टोः' असा निर्देश केला असल्यामुळें, वरील उदाहरणात ष्टुत्वाचा निषेध होत नाहीं व तकाराचा टकार होऊन 'सर्पिष्टमम्' असे इष्ट रूप सिद्ध होते. म्हणून षकार पदान्तीं मिळूच शकत नाही—कारण तो पदान्ती आल्यास त्याचे जश्त्व अवश्य होणारच—असे जें शंकाकाराचे म्हणणे आहे ते अयोग्य ठरते आणि म्हणून 'न पदान्ताट्टोः' या सूत्रातील 'टोः' याचे 'सर्पिष्टमम्' हे जें दीक्षितानी प्रत्युदाहरण दिले आहे ते योग्य ठरतें असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे )

मनोरमा—प्रत्यये भाषायामिति । यत्तु प्राचा मयटि नित्यमिति पठितम् । यच्च हलन्तप्रकरणे षण्णां, षड्णामित्युदाहृतम् । यच्च "यरोऽनुनासिक–" इति वाऽनुनासिक इति तत्र व्याख्यात तत्सर्वं भाष्यविरोधादुपेक्ष्यम् । यवादिगण इति । "यचि भ तमो मत्वर्थे" इति संहितया पाठे तसाविति तात्पूर्वं दकारं प्रश्लिष्य भत्वेनाप्येतत्समाधातुं शक्यम् ॥

('प्रत्यये भाषायां नित्यम्'–सू ११६ वरील वार्तिक–असें वार्तिक पठित न करिता 'यरोऽनुनासिके' या सूत्रावरील वृत्तींत) प्रक्रियाकौमुदीकारानी *'मयटि नित्य वाच्यम्'* असें जें वार्तिक पठित केलें आहे व तसेंच हलन्त पुंलिङ्ग प्रकरणांत 'षण्णाम्, षड्णाम्' अशीं जीं वैकल्पिक रूपें दिलीं आहेत आणि प्रसादकारानीं 'यरोऽनुनासिके इति वाऽनुनासिक' असें जें त्या वैकल्पिक त्या·संबधानें व्याख्यान केलें आहे तें सर्व भाष्यविरुद्ध असल्यामुळें स्वीकारार्ह नाही. ('मयटि नित्य वाच्यम्' असें वार्तिक मानल्यास, 'मयट्' प्रत्यय पुढें आला असतांच त्याच्या लगेंच पूर्वी असलेल्या पदान्त 'यर्'चे जागीं विकल्पें करून अनुनासिक आदेश न होतां नित्य अनुनासिक होतो असा त्या वार्तिकाचा अर्थ होतो व त्यामुळें 'षष् + आम्' या स्थलीं 'षट्चतुर्भ्यश्च' सू ३३८ या सूत्रानें 'आम्' प्रत्ययाला नुडागम होऊन व 'झलां जशोऽन्ते' सू ८४ या सूत्रानें पदान्त षकाराचें जश्त्व होऊन 'षड् + नाम्' अशी स्थिति झाली असतां, 'स्वादिषु' सू २३० या सूत्रान्वयें पदसंज्ञक असणाऱ्या 'षड्' यांतील अन्त्य 'ड्' या 'यर्' पुढें 'मयट्' प्रत्यय नसून 'नाम्' हा प्रत्यय असल्यामुळें, 'मयटि नित्य वाच्यम्' या वार्तिक पाठान्वयें डकाराचे जागीं नित्य अनुनासिक आदेश न होतां 'यरोऽनुनासिकेऽनुनासिको वा' सू. ११६ या सूत्रानें विकल्पेंकरून अनुनासिक आदेश होतो आणि त्यामुळें 'षण्णाम्, षड्णाम्' अशीं वैकल्पिक रूपें सिद्ध होतात असा प्रक्रियाकौमुदीकारांच्या व प्रसादकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे परंतु दीक्षित म्हणतात कीं, भाष्यांत 'मयटि नित्य वाच्यम्' असें वार्तिक

पठित न करिता 'प्रत्यये भाषायां नित्यम्' असे वार्तिक पठित केले असल्यामुळें प्रक्रियाकौमुदीकारांनी दिलेला वार्तिक पाठ भाष्यविरुद्ध ठरतो व भाष्यपाठ मानल्यानें 'षड् + नाम्' या स्थली 'ड्' या पदान्त 'यर्' पुढें 'नाम्' हा अनुनासिक वर्णानें सुरू होणारा प्रत्यय असल्यामुळें, त्या भाष्यपाठान्वयें डकाराचे जागी विकल्पेंकरून अनुनासिक आदेश न होता नित्य अनुनासिक आदेश होऊन 'षण्णाम्' असेच रूप सिद्ध होतें व 'षड्णाम्' असे वैकल्पिक रूप मुळीच सिद्ध होऊ शकत नाहीं आणि तें जें वैकल्पिक रूप प्रक्रिया कौमुदीकारांनी दिलें आहे तें भाष्यविरुद्ध ठरतें. म्हणूनच षकारान्त पुल्लिङ्गप्रकरणांत दीक्षितांनी कौमुदीत 'षट्चतुर्भ्यश्च इति नुट्। अनामिति पर्युदासान्न ष्टुत्वनिषेध.। यरोऽनुनासिके इति विकल्पं बाधित्वा प्रत्यये भाषायां नित्यमिति वचनान्नित्यमनुनासिकः। षण्णाम्।' असे म्हटले आहे. 'यरोऽनुनासिके' या सूत्रावरील कौमुदीत दीक्षितांनीं 'कथं तर्हि मदोदग्राः ककुद्मन्त इति'— म्हणजे 'मदोदग्राः ककुद्मन्तः' या कालिदासीय प्रयोगातील 'ककुद्मन्तः' हें रूप कसें शुद्ध ठरू शकतें, कारण त्या रूपात 'ककुद्' या पदातील अन्त्य दकार या 'यर्' पुढें 'मतुप्' हा अनुनासिक वर्णानें सुरू होणारा प्रत्यय असल्यामुळें 'प्रत्यये भाषायां नित्यम्' या वार्तिकान्वयें दकाराचे जागीं नित्य अनुनासिक नकाराची प्राप्ति आहे व त्यामुळें 'ककुन्मन्तः' असा प्रयोग असावयास पाहिजे होता —अशी शंका उपस्थित करून त्या शंकेचें 'यवादिगणे दकारनिपातनात्' अशा रीतीनें दीक्षितांनी समाधान केलें आहे त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, यवादिगणांत 'ककुद्' असा दकारान्त शब्द निपातनानें पठित केला असल्यामुळें, 'प्रत्यये भाषायां नित्यम्' या वार्तिकानें दकाराचे जागीं जो नकार पावला होता तो न होता, निपातित दकार जसाचा तसाच कायम राहून 'ककुद्मन्तः' असें रूप सिद्ध होतें व शुद्ध ठरतें 'ककुद्' शब्दापुढें 'मतुप्' प्रत्यय आला असता त्यांतील अन्त्य दकाराचा नकार होणें हें जर पाणिनीला

वर्णांचे ग्रहण केले असल्यामुळें 'तसौ' असा द्विवचनान्त प्रयोग न होता बहुवचनान्त प्रयोग व्हावयास पाहिजे होता अशी कोणी शंका केल्यास त्या शंकेवर तत्त्वबोधिनीत 'तसाविति द्विवचननिर्देशस्तु दतयो. समाहारद्वन्द्व कृत्वा इतरेतरयोगद्वन्द्वे कृते समुपपद्यत इति' असे उत्तर दिले आहे. सारांश दीक्षितानी 'ककुद्मन्त' या कालिदासीय प्रयोगाचे दोन् प्रकारे समर्थन केले आहे.)

**शब्दरत्न– भाष्येति। प्रत्यय इत्येव तत्र पाठादिति भावः। दकारमिति। चर्त्वे नेति भाव। मृच्छब्दस्य यवादिगणे पाठे न मानमिति तत्र 'झय' इति वत्वे मृद्वानित्येवेति तात्पर्यम्। अतः "इति केचित्तन्न, मृन्मानित्यादावतिप्रसङ्गात्" इति क्वाचित्कोऽसांप्रदायिकः पाठ'।**

'भाष्यविरोधादुपेक्ष्यम्' असे जें दीक्षितानीं मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हे की, ('यरोऽनुनासिके' ८ ४ ४५ या सूत्रावरील) भाष्यात 'प्रत्यये भाषाया नित्यम्' असाच वार्तिक पाठ दिला आहे. (याचे विवरण मनोरमेंत केलेच आहे) 'तात्पूर्वं दकार प्रश्लिष्य' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा 'तात्पूर्वं चर्त्वेन दकार प्रश्लिष्य', म्हणजे 'खरि च' या सूत्रानें दकाराचे जागी जो तकार होतो त्याचा प्रश्लेप करून, असा अर्थ आहे (याचे देखील विस्तृत विवरण मनोरमेंत केलेच आहे) 'मृद्' या शब्दाचा यवादिगणात पाठ आहे असे मानण्यास काहीच प्रमाण नसल्यामुळें ('मृद्' या शब्दाहून 'मतुप्' प्रत्यय केला असता) 'झय' सू १८९८ या सूत्रानें 'मतुप्' प्रत्ययातील मकाराचा वकार होऊन 'मृद्वान्' असेच रूप होते असे मनोरमेंतील वरील समाधानपर पङ्क्तीचे तात्पर्य आहे. अशा रीतीनें 'मृद्वान्' हाच प्रयोग शुद्ध ठरत असल्यामुळें, 'मत्वेनाप्ये तत्समाधातु शक्यम्' या मनोरमेंतील पदापुढे 'इति केचित्तन्न, मृन्मानित्यादावति प्रसङ्गात्' अशी जी पङ्क्ति मनोरमेच्या क्वचित् प्रतीत आढळते ती सांप्रदायिक–गुरुशिष्यपरंपरागत–पाठाला धरून नाही (आणि म्हणून तो असांप्रदायिक पाठ स्वीकारार्ह नाही,

इष्ट असते तर त्यानें यवादिगणात 'ककुद्' असा दान्त शब्द पठित न करिता 'ककुन्' असा नान्त शब्दच त्या गणात लाघवार्थ पठित केला असता असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. आता तें रूप शुद्ध ठरतें हे मानण्याला दीक्षित दुसरें समाधान, सांगतात) 'यचि भम्' सू. २३१ व 'तसौमत्वर्थे' सू. १८९६ या दोन एकापुढें एक अष्टाध्यायीत पठित असलेल्या सूत्रांचा मिळून दण्डपाठ केल्यास व 'तसौ' यातील तकारापूर्वी दकाराचा प्रश्लेष केल्यास, भसंज्ञेनें देखील (कौमुदीत केलेल्या शंकेचे) समाधान करता येतें. म्हणजे अशा रीतीनें देखील 'ककुद्मन्त' हे रूप शुद्ध मानता येतं (दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, वरील दोन सूत्रांचा मिळून दण्डपाठ केल्यास व 'तसौ' यातील तकारापूर्वी दकाराचा प्रश्लेष केल्यास, प्रश्लिष्ट दकाराचा 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें तकार होतो व तो तकार 'भम्' यातील 'म्' या हल्पुढें असून त्यापुढें तकार हा सवर्ण 'झर्' असल्यामुळें त्या पूर्व तकाराचा 'झरो झरि' सू. ७१ या सूत्रानें जरी पाक्षिक लोप पावला आहे तरी तो लोप विकल्पेंकरून होणारा असल्यामुळें न केल्यानें, 'तसौ मत्वर्थे' असे सूत्र होतें व लोप केल्यास 'तसौ मत्वर्थे' असेंच सूत्र होतें व त्या सूत्राचा असा अर्थ होतो की, दकारान्त, तकारान्त व सकारान्त शब्दापुढें मत्वर्थीय प्रत्यय आला असता त्या शब्दांना भसंज्ञा होते या अर्थान्वयें 'ककुद्+मतुप्' या स्थली 'ककुद्' या दकारान्त शब्दापुढें 'मतुप' प्रत्यय आला असल्यामुळें, 'ककुद्' याच्या पदसंज्ञेचा बाध होऊन त्याला भसंज्ञा होते. अशा रीतीनें 'ककुद्' या शब्दाला भसंज्ञा झाली असता, त्या शब्दातील अन्त्य दकार अपदान्त ठरत असल्यामुळें व 'प्रत्यये भाषायां नित्यम्' हे वार्तिक पदान्ती असलेल्या 'यर्' लाच लागू पडणारे वार्तिक असल्यामुळें, तें वार्तिक प्रकृत उदाहरणात प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्यामुळें दकाराचे जागीं नकार न होतां 'ककुद्मन्त.' हें रूप शुद्ध ठरतें 'तसौ' या पदात दकार, तकार व सकार या तीन

वर्णांचे ग्रहण केले असल्यामुळें 'तसौ' असा द्विवचनान्त प्रयोग न होता बहुवचनान्त प्रयोग व्हावयास पाहिजे होता अशी कोणी शंका केल्यास त्या शंकेवर तत्वबोधिनींत 'तसाविति द्विवचननिर्देशस्तु दतयो: समाहारद्वन्द्वं कृत्वा इतरेतरयोगद्वन्द्वे कृते समुपपद्यत इति' असे उत्तर दिले आहे. सारांश दीक्षितानी 'ककुद्मन्त:' या कालिदासीय प्रयोगाचें दोन प्रकारे समर्थन केलें आहे.)

*शब्दरत्न—भाष्येति । प्रत्यय इत्येव तत्र पाठादिति भाव: । दकारमिति । चर्त्वं नेति भाव । मृच्छब्दस्य यवादिगणे पाठे न मानमिति तत्र 'झय:' इति वत्वे मृद्वानित्येवेति तात्पर्यम् । अत: "इति केचित्तन्न, मृन्मानित्यादावतिप्रसङ्गात्" इति क्वाचित्कोऽसाम्प्रदायिक: पाठ: ।*

'भाष्यविरोधादुपेक्ष्यम्' असें जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हें की, ('यरोऽनुनासिके' ८.४.४५ या सूत्रावरील) भाष्यात 'प्रत्यये भाषाया नित्यम्' असाच वार्तिक पाठ दिला आहे. (याचे विवरण मनोरमेंत केलेंच आहे.) 'तात्पूर्वं दकारं प्रश्लिष्य' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा 'तात्पूर्वं चर्त्वेन दकारं प्रश्लिष्य', म्हणजे 'खरि च' या सूत्रानें दकाराचे जागी जो तकार होतो त्याचा प्रश्लेष करून, असा अर्थ आहे. (याचे देखील विस्तृत विवरण मनोरमेंत केलेच आहे.) 'मृद्' या शब्दाचा यवादिगणात पाठ आहे असें मानण्यास काहीच प्रमाण नसल्यामुळें ('मृद्' या शब्दाहून 'मतुप्' प्रत्यय केला असता) 'झय.' सू १८९८ या सूत्रानें 'मतुप्' प्रत्ययातील मकाराचा वकार होऊन 'मृद्वान्' असेच रूप होते असे मनोरमेंतील वरील समाधानपर पक्तीचें तात्पर्य आहे. अशा रीतीनें 'मृद्वान्' हाच प्रयोग शुद्ध ठरत असल्यामुळें, 'मत्वेनाप्ये तत्समाधानु शक्यम्' या मनोरमेंतील पदापुढे 'इति केचित्तन्न, मृन्मानित्यादावति प्रसङ्गात्' अशी जी पंक्ति मनोरमेच्या क्वचित् प्रतीत आढळते ती साम्प्रदायिक—गुरुशिष्यपरंपरागत—पाठाला धरून नाही (आणि म्हणून तो असाम्प्रदायिक पाठ स्वीकारार्ह नाही.

कारण तसा पाठ मानल्यास, दीक्षिताच्या मते 'मृद्वान्' असे रूप न होता 'मृन्मान्' असे रूप होते असे मानणे व वरील मनोरमेची पंक्ति समाधानपरक नसून ती खण्डनपर आहे असे उलटें मानणे भाग पडते परंतु 'मृन्मान्' असे रूप सिद्ध होऊ शकत नाही कारण 'मृद्' यातील दकार या 'यर्' पुढें 'मतुप्' प्रत्ययातील मकार हा अनुनासिक वर्ण येत नसून, 'झय' या सूत्रानें त्या मकाराचे जागी झालेला वकार येतो आणि त्यामुळें दकाराचे जागी नकार न होता 'मृद्वान्' असेच रूप सिद्ध होऊ शकते म्हणून तो क्वाचित्कपाठ लेखकाच्या प्रमादामुळें केला गेला असावा असे मानून त्या पाठाची उपेक्षा करणेच योग्य आहे असे शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे )

मनोरमा—उदः स्थाः ॥ "अनुस्वारस्य ययि-" इत्यत्र समस्तमपि सवर्णग्रहणमिह निष्कृष्य सम्बध्यते। एकदेशे स्वरितत्व-प्रतिज्ञानादित्याशयेनाह—पूर्वसवर्णः स्यादिति । अघोषस्येत्यादि । एतेन सस्य तकार इति प्राचां ग्रन्थाः प्रत्युक्ताः। यदपीह "चयो द्वितीयाः शरि" इत्यस्योपन्यसनं तदतिरभसात् ।

'उदः स्थास्तम्भोः पूर्वस्य' सू. ११८ या सूत्रात 'अनुस्वारस्य ययि परसवर्णः' या पूर्व सूत्रातून, 'परसवर्ण' हें जरी त्या सूत्रात सामासिक पद आहे तरी त्यातील, 'सवर्ण' हा एवढाच अंश काढून अनुवृत्त केला जातो, कारण 'परसवर्ण' या पदातील 'सवर्ण' एवढ्याच अंशाचे ठिकाणी स्वरितत्व आहे असे (पूर्वपरपदानें) ज्ञात होते, आणि हा आशय मनात धरूनच 'पूर्वसवर्णः स्यात्' असं प्रकृत सूत्राचे व्याख्यान करिताना कौमुदीत म्हटले आहे, 'अघोषस्य महाप्राणस्य सस्य तादृश एव थकार' असे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले असल्यामुळें, प्राचीन वैयाकरणांनी (प्रसादकार व प्रकाशकार यांनी) 'उदः परस्य सकारस्य पूर्वसवर्णस्तकारः' असे जें आपल्या ग्रन्थात म्हटले आहे ते चूक ठरतें. तसेच त्यांनीं 'चयो

द्वितीयाः'–सू.'१३० वरील वार्तिक–या वार्तिकाचा जो प्रकृत स्थली उपन्यास केला आहे तो काही विचार न करिता केला आहे. (प्रकृत सूत्रात 'उदः' हा परपञ्चमीनिर्देश असल्यामुळें, स्थानषष्ठीनिर्देश असताना उपस्थित होणारी 'अलोऽन्त्यस्य' सू. ४२ ही परिभाषा उपस्थित न होता, येथें पराला कार्य होणे सांगितले असल्यामुळें 'आदे. परस्य' सू. ४४ ही परिभाषा उपस्थित होते व वर सांगितल्याप्रमाणे प्रकृत सूत्रात स्वरितत्वप्रतिज्ञाबलामुळें 'परसवर्णः' यातील 'सवर्ण.' या अंशाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, या सूत्राचा 'उद. परयो. स्थाम्तम्भोः आद्यसकारस्य स्थाने तत्पूर्वस्य उदो दकारस्य य. सवर्ण. स आदेशो भवति' असा अर्थ होतो. आता 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' सू १० या सूत्रान्वयें दकाराचे 'त्, थ्, द्, ध, न्' हे स्पर्शवर्ण सवर्ण आहेत, कारण दोहोत दन्तस्थानसाम्य असून दोहोंचाहि आभ्यन्तरप्रयत्न स्पृष्ट आहे. जरी ऌकार, सकार व लकार याचे देखील दन्तस्थान आहे तरी 'ऌ' हा स्वर व सकार हा ऊष्मवर्ण या दोन वर्णांचा 'विवृतमूष्मणा स्वराण च' या वचनान्वयें 'विवृत' हा आभ्यन्तरप्रयत्न आहे व तसेच लकार या अन्तस्थ वर्णाचा 'ईषत्स्पृष्टमन्तस्थानाम्' या वचनान्वयें 'ईषत्स्पृष्ट' हा आभ्यन्तरप्रयत्न आहे. म्हणून आभ्यन्तरप्रयत्नभेदामुळें हे तीन वर्ण दकाराचे सवर्ण होऊ शकत नाहीत तवर्गातील वर्णच दकाराचे सवर्ण होऊ शकत असल्यामुळें त्या पाच वर्णांपैकी कोणत्या वर्णाचा सकाराचे जागी आदेश करावा? सकाराचे जागी जो आदेश करणे आहे तो 'स्थानेऽन्तरतम' सू. ३९ या परिभाषान्वयें अन्तरतम आदेश असला पाहिजे. म्हणून येथें स्थानीचे व आदेशाचे आन्तरतम्य ठरविण्याकरिता, आभ्यन्तरप्रयत्नभेदामुळें, म्हणजे सकार या ऊष्मवर्ण स्थानीचा 'विवृत' हा आभ्यन्तरप्रयत्न असून आदेशत्वानें प्राप्त होणाऱ्या तवर्गातील वर्णांचा 'स्पृष्ट' हा आभ्यन्तरप्रयत्न असल्यामुळें, येथें आभ्यन्तरप्रयत्नाचा आश्रय करता येत नाहीं व बाह्यप्रयत्नाचाच आश्रय केला पाहिजे. सकार या स्थानीचे अघोष,

श्वास, विवार व महाप्राण हे चार बाह्ययत्न असून तवर्गातील थकाराचेच हे चारहि बाह्ययत्न आहेत. तवर्गातील इतर वर्णांशी सकाराचे तसे बाह्ययत्नसाम्य नाही; कारण त्या वर्गातील प्रथम, तृतीय व पञ्चम वर्ण अल्पप्राण आहेत व चतुर्थवर्णाचे घोष, नाद व संवार हे बाह्ययत्न आहेत म्हणून सकाराचे जागी आन्तरतम्यानें थकार हाच आदेश होऊं शकतो, तकारादेश होऊ शकत नाही. त्यामुळें प्रसादकारादिकानी 'सकारस्य पूर्वं सवर्णस्तकारः', म्हणजे सकाराचे जागी पूर्व वर्णाचा सवर्ण तकार होतो, असे जें म्हटले आहे ते म्हणणें चूक ठरतें असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे म्हणून 'उद् + स्थानम्' या स्थली दकाराचे जागीं 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें तकार होऊन 'उत् + स्थानम्' अशी स्थिति झाली असता, सकाराचे जागी थकार केल्यानें, ज्यात एक तकार व दोन थकार आहेत असे 'उत्थ्थानम्' हें रूप सिद्ध होते व या रूपातील प्रथम थकाराचा 'झरो झरि' सू. ७१ या सूत्रानें विकल्पेंकरून लोप केल्यास, ज्यात एक तकार व एक थकार आहे असे 'उत्थानम्' हे द्वितीय रूप सिद्ध होते. प्रथम रूपातील प्रथम थकाराचा 'झरो झरि' या सूत्रानें विकल्पेंकरून होणारा लोप न केल्यास, त्या प्रथम थकाराचे जागी 'खरि च' या सूत्रानें तकार होऊ शकत नाही. कारण 'खरि च' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें प्रकृत पर त्रैपादिक सूत्रानें सकाराचे जागी झालेला थकार असिद्ध ठरत असून तो विद्यमानच नाही असे मानावे लागते. त्यामुळें लोपाभावपक्षात द्वितकारएकथकारयुक्त रूप सिद्ध होऊ शकत नाही व एकतकारद्विथकारयुक्त रूप जसेचे तसेच कायम राहते. पण प्रसादकारादिकानी म्हटल्याप्रमाणे सकाराचे जागी तकार केल्यास, 'उत्त्थानम्' अशी स्थिति झाली असता, द्वितीय तकाराचा 'झरो झरि' या सूत्रानें वैकल्पिक लोप केल्यानें जरी 'उत्थानम्' असे एकतकारएकथकारयुक्त रूप सिद्ध होते तरी लोपाभावपक्षात एकतकारद्विथकारयुक्त इष्ट पाक्षिक रूप सिद्ध न होता द्वितकार-

एकयकारयुक्त अनिष्ट पाक्षिकरूप होण्याची आपत्ति येते ती आपत्ति टाळण्याकरिता 'चयो द्वितीयाः' हें वार्तिक प्रवृत्त करून द्वितीय तकाराचा थकार करता येत नाहीं; कारण त्या वार्तिकान्वयें 'चय्'चे-वर्गांतील प्रथम वर्णांचे-जागीं, 'शर्' पुढें असतानाच, द्वितीय वर्ण होऊं शकतो व वरील उदाहरणात तकार या 'चय्' पुढें 'शर्' नसून थकार असल्यामुळें, तकाराचे जागीं थकार हा द्वितीय वर्ण त्या वार्तिकान्वयें होऊं शकत नाही व अशा रीतीनें तकारादेशपक्षात एकतकारद्विथकारयुक्त इष्ट पाक्षिक रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. 'उद् + स्थानम्' येथें 'उद्' यातील दकाराचा 'खरि च' या सूत्रानें तकार केला असता तकारापुढें सकार हा 'शर्' येतो हे खरें. पण तो विनाशोन्मुख आहे व 'चयो द्वितीयाः' या वार्तिकानें त्या तकाराचे जागीं थकार केल्यास व नंतर 'स्थानम्' यातील सकाराचे जागी तकार केल्यास थकार होण्यास निमित्त असलेला पुढील सकार हा 'शर्' नष्ट होत असल्यामुळें, 'निमित्तापाये नैमित्तिकस्याप्यपाय' या न्यायान्वये, पुन्हा त्या थकाराचा तकार होईल व त्यामुळें ज्यात प्रथम एक तकार आहे व पुढें दोन थकार आहेत असें इष्ट रूप केव्हांहि सिद्ध होऊं शकणार नाही. म्हणून तकारादेशपक्ष सर्व रीतीनें त्याज्य आहे असें दीक्षिताच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. या विषयाचें अधिक विवरण शब्दरत्नात केलें जाईल )

शब्दरत्न- ननु सवर्णपदमधिकं "परसवर्णः" इत्यत्रैकार्यीभावापन्नस्यान्यत्र सम्बन्धो वक्तुमशक्यः । न च पूर्वस्येत्यस्य सम्बन्ध्याकाङ्क्षायां यत्किञ्चित्सम्बन्धिकल्पनापेक्षया पूर्वत्रोपस्थितार्थवाचकपदाध्याहारौचित्यात्तल्लाभः, "चुटू" इत्यादावादेरप्येवमेव सम्बन्धोपपत्तौ तत्र स्वरितत्वप्रतिज्ञाया वैयर्थ्यापत्तेः । न च स्वरितत्वप्रतिज्ञासामर्थ्यादेकदेशानुवृत्तिः, "तोर्लि" इत्यत्र समुदायानुवृत्त्या तस्याश्चारितार्थ्यादित्यत आह-अनुस्वारस्येत्यादि, एकदेशे इति च । पकारमात्रे स्वरितत्वप्रतिज्ञयैव "तोर्लि" इत्यादावनुवृत्तिसिद्धौ पुनः

सकारांशे तत्प्रतिज्ञया तावतोऽप्यंशस्य उत्तरत्रानुवृत्तिरिति भावः। तदतिरभसादिति। चयोऽभावात्। "दीर्घादाचार्याणाम्" इत्युत्तरं "अनुस्वारस्य ययि" "वा पदान्तस्य "तोर्लि" "उदः स्था" "झयो हो" "शश्छोऽटि" इति षट्सूत्रीपाठोत्तरं "झलां जश् झशि" "अभ्यासे चर्च" "खरि च" "वाऽवसाने" "अणोऽप्रगृह्यस्य" इति पञ्चसूत्र्याः पाठे भाष्यसम्मते थस्य चर्त्वेऽपि तस्यासिद्धत्वाच्छर्परत्वाभावाच्चेति भावः॥

(येथें शकाकार अशी शंका करतो की, प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'पूर्वसवर्ण' असे जें पद घातले आहे त्या पदात) 'सवर्ण' हे अधिक पद घातलें आहे. (कारण प्रकृत सूत्रात 'पूर्वस्य' हे पद असून त्यापुढे 'सवर्णः' हे पद नाही 'अनुस्वारस्य ययि परसवर्ण' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'सवर्णः' या अंशाची अनुवृत्ति होते असे जें दीक्षितानी म्हटले आहे त्यावर शकाकार असे म्हणतो की, 'अनुस्वारस्य ययि' या सूत्रात) 'सवर्ण' हा शब्द 'पर' या शब्दाशी समासात संबद्ध झाला असल्यामुळें व (अशा रीतीनें तो शब्द स्वतन्त्र रीतीनें स्वार्थ सांगणारा नसून 'पर' या शब्दाच्या अर्थामध्यें स्वार्थ एकत्रीभूत झाल्यानें निष्पन्न होत असलेला अर्थ सांगणारा, म्हणजेच) एकार्थीभावापन्न शब्द असल्यामुळें, 'परसवर्णः' या पदातील 'सवर्ण' एवढ्याच अंशाची प्रकृत सूत्रात अनुवृत्ति करता येणे अशक्य आहे पण प्रकृत सूत्रातील 'पूर्वस्य' या संबंधवाचक षष्ठ्यन्त शब्दाला संबंधीची आकांक्षा असल्यामुळें ती आकांक्षा पूर्ण करण्याकरिता वाटेल त्या कोणत्या तरी संबंधीची कल्पना करण्यापेक्षा पूर्व सूत्रात उपस्थित असलेल्या अन्वर्थक 'सवर्ण' (या पदाला संबंधी मानणे व प्रकृत सूत्रातील 'पूर्वस्य' या पदापुढें) या पदाचा अध्याहार करणे हे उचित आहे व असा अध्याहार केल्यानें 'पूर्वस्य सवर्ण. = पूर्वसवर्णः' असा (कौमुदीत दिलेला) अर्थ निष्पन्न होतो असे कोणी म्हटल्यास, त्यावर शकाकार असे उत्तर देतो की, असें मानल्यास, म्हणजे संबंधाकांक्षा पूर्ण करण्याकरिता प्रकृत सूत्रात

पूर्व सूत्रातून 'परसवर्ण' या पदातील 'सवर्ण' या अंशाचा 'पूर्वस्य' याशी संबंध करता येतो असे मानल्यास, 'चुटू' सू १८९ इत्यादि सूत्रात ('आदिर्ञिटुडव' सू २८९ या पूर्व सूत्रातील) 'आदिः' या पदाचा अशाच रीतीनें संबंध लावता येतो व त्यामुळें 'आदि' हे जें पद मुद्दाम स्वरित केलें आहे तें त्याचे स्वरितत्व करणे व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते (शंकाकाराच्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की, 'स्वरितेनाधिकार' सू. ४६ या सूत्रान्वयें स्वरित पठित असलेल्या पदाची उत्तर सूत्रात अनुवृत्ति केली जाते व तशी अनुवृत्ति होण्याकरिताच पूर्व सूत्रातील पद स्वरित केले जात असून संबंधाकांक्षा पूर्ण होण्याकरिता जर पूर्व सूत्रातील पदाचा उत्तर सूत्रात संबंध करता येतो असे मानले तर स्वरित पठित करण्याची खटपट करणे व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते पुन्हा शंकाकार असे म्हणतो की,) स्वरितत्वप्रतिज्ञेच्या सामर्थ्यामुळें (पूर्व सूत्रात स्वरित पठित असलेल्या 'परसवर्ण' या पदातील 'सवर्णः' या) एकदेशाची प्रकृत सूत्रात अनुवृत्ति करता येते हे म्हणणे बरोबर नाहीं, कारण 'तोलि' सू ११७ या सूत्रात 'परसवर्णः' या समुदायाची, म्हणजे संपूर्ण पदाची, अनुवृत्ति होत असल्यामुळें, त्या संपूर्ण पदाचे ठिकाणी केलेली स्वरितत्वप्रतिज्ञा चरितार्थ ठरते ('अनुस्वारस्य ययि परसवर्णः' या सूत्रानंतर 'वा पदान्तस्य', 'तोलि', उद स्थास्तम्भोः पूर्वस्य' ही तीन सूत्रें अष्टाध्यायीत पठित आहेत या तीन सूत्रांपैकी पहिल्या दोन सूत्रात 'परसवर्ण' या संपूर्ण पदाची अनुवृत्ति होणे आवश्यक असल्यामुळें ते संपूर्ण पद स्वरित पठित केले आहे व अशा रीतीनें त्या पदाचे स्वरितत्व चरितार्थ ठरत असल्यामुळें, त्या पदातील 'सवर्णः' या एकदेशाची प्रकृत सूत्रात अनुवृत्ति करता येत नाही असा शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. 'ननु सवर्णपदमधिकम्' येथपासून 'तस्यादचारितार्थ्यात्' येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे या शंकाग्रन्थात उपस्थित केलेल्या सर्व शंका मनात धरूनच त्याचे निराकरण करण्याच्या हेतूनें दीक्षितानी मनोरमेंत)

'अनुस्वारस्य ययि…स्वरितत्वप्रतिज्ञानादित्याशयेनाह' ही पंक्ति लिहिली आहे व त्या पंक्तीचा भावार्थ हा आहे की, 'अनुस्वारस्य ययि परसवर्णः' या सूत्रांतील 'परसवर्णः' या पदामधील केवळ आद्य पकाराचे ठिकाणी स्वरित्वप्रतिज्ञा केल्यानेंच 'तोर्लि' इत्यादि उत्तर सूत्रात 'परसवर्णः' या सपूर्ण पदाची अनुवृत्ति सिद्ध होत असून, पुन्हा 'परसवर्णः' या पदातील सकाराचे ठिकाणी स्वरितत्वाची प्रतिज्ञा केल्यानें उत्तर सूत्रात, म्हणजे प्रकृत सूत्रात 'सवर्णः' एवढ्याच अशाची देखील अनुवृत्ति करता येते. (सध्या उपलब्ध असलेल्या अष्टाध्यायीच्या पाठात जसे अनुनासिकत्वाचे चिन्ह उपलब्ध नाही तसेच स्वरितत्वाचे देखील चिन्ह उपलब्ध नाही. तथापि 'प्रतिज्ञानुनासिक्याः पाणिनीयाः' या वचनान्वयें वृत्तिकारादिव्यवहारबलेन यथाकार्यं प्राक् स्थितः' अशा रीतीनें अनुनासिक पाठाचे वृत्तिकारादिकानीं केलेल्या कार्यावरून अनुमान केले जाते त्याचप्रमाणे पूर्वसूत्रातून उत्तर सूत्रांत 'स्वरितेनाधिकारः' या सूत्रान्वयें इष्ट अशाची अनुवृत्ति होण्याकरिता तो अश पूर्व सूत्रात स्वरित पठित आहे असे अनुमान केले जाते. 'अनुस्वारस्य ययि परसवर्णः' या पूर्व सूत्रातील 'परसवर्णः' या सपूर्ण पदाची 'वा पदान्तस्य', 'तोर्लि' या पुढील दोन सूत्रात अनुवृत्ति होणे इष्ट असून त्याच्या पुढील 'उदः स्थास्तम्भोः', 'झयो होऽन्यतरस्याम्' या दोन सूत्रात 'सवर्णः' एवढ्याच अशाची अनुवृत्ति होणे इष्ट आहे व अशाच तऱ्हेने वृत्तिकारादिकानी अनुवृत्ति केली आहे. म्हणून त्यानीं अशा रीतीनें केलेल्या अनुवृत्तीवरून हे अनुमान निघते की, 'अनुस्वारस्य ययि' सूत्रातील 'परसवर्ण.' या पदाचे ठिकाणी 'प'वर व तसेच 'स' वर स्वरितत्वाचे चिन्ह मूळ अष्टाध्यायी पाठात होते. 'प'वरील स्वरितत्वचिन्हानें 'परसवर्णः' हा सपूर्ण शब्द स्वरित ठरतो व 'स्वरितेनाधिकार.' सू. ४६ या सूत्रान्वयें 'वा पदान्तस्य', 'तोर्लि' या दोन पुढील सूत्रात त्या सपूर्ण पदाची अनुवृत्ति केली जाते. तसेच 'स' वरील स्वरितत्वचिन्हाने 'परसवर्ण·' या पदातील

'सवर्ण.' एवढा अंश देखील स्वरित ठरून तेवढ्याच अंशाची 'उदः स्थास्तम्भोः', 'झयो हो' या पुढील दोन सूत्रांत अनुवृत्ति होण्यांत काही प्रत्यवाय येत नाही व शंकाकारानें केलेली शंका व्यर्थ ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'तदतिर-भसात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हे की, ('उद्+स्थानम्' या उदाहरणांत) 'चय्' चा अभाव आहे, म्हणजे वर्गांतील प्रथम वर्ण नाही. 'दीर्घादाचार्याणाम्' या सूत्रा-नंतर '*अनुस्वारस्य ययि', 'वा पदान्तस्य', 'तोर्लि', 'उदः स्था',* 'झयो हो', 'शश्छोऽटि' या सहा सूत्रांचा पाठ करून त्यानंतर 'झला जश् झशि', 'अभ्यासे चर्च', 'खरि च', 'वाऽवसाने', 'अणोऽप्रगृह्यस्य' या पांच सूत्रांचा भाष्यकारांनी पाठ मानला असल्यामुळें, त्या भाष्यसम्मत पाठान्वयें, थकाराचें चर्त्व केले, म्हणजे तकार केला, तरी तो असिद्ध ठरत असल्यामुळें आणि त्या तकारापुढें 'शर्' नसल्यामुळें, 'चयो द्वितीया शरि' या वार्तिकाची प्रवृत्ति होऊं शकत नाही ('यद्यपीह चयो द्वितीया शरि इत्यस्योपन्यसनं तदतिरभसात्' असे जें दीक्षितांनी मनोरमेंत म्हटले आहे ते प्रसाद-कारासंबधानें म्हटले नाही, कारण प्रकृत सूत्रावरील प्रसादटीकेंत 'चयो द्वितीया.' या वार्तिकाचा उपन्यास केलेला आढळत नाही, आणि नामनिर्देश न करितां ती पंक्ति लिहिली असल्यामुळें, दीक्षि-तांचे गुरु प्रकाशकार यांनीच त्या वार्तिकाचा आपल्या प्रकाशटीकेंत उपन्यास केला असावा असे वाटते. दुर्दैवानें प्रकाशटीका येथें उपलब्ध नसल्यामुळें प्रकाशकारांनी त्या वार्तिकाचा उपन्यास करितांना काय म्हटले आहे हें कळण्यास साधन नाही तरी पण प्रसादकार व हरदत्त यांनीं जसा 'उद्+स्थानम्' या स्थली सकाराचे जागी तकारादेश प्रकृत सूत्रानें होतो असे म्हटले आहे तसेच प्रकाशकारांनी देखील म्हटले असावें, व याखेरीज त्यांनी सकाराचे जागीं झालेल्या तकाराचा 'चयो द्वितीयाः' या वार्तिकान्वयें थकार होतो असे देखील म्हटले असावे असे दिसून येते ते म्हणणे चूक ठरते याचे उघड कारण हें आहे

कीं, 'चयो द्वितीया॰ शरि' या वार्तिकान्वयें वर्गांतील प्रथम वर्णाचे जागी द्वितीय वर्ण कर्तव्य असता, त्या प्रथम वर्णापुढे 'शर्' असणे आवश्यक आहे वरील उदाहरणात सकाराचे जागी केलेल्या तवर्गांतील तकार या प्रथम वर्णापुढें 'शर्' नसून थकार असल्यामुळें व अशा रीतीनें निमित्ताचा अभाव असल्यामुळें, तकाराचे जागी थकार हा द्वितीय वर्ण होऊ शकत नाही. दीक्षिताच्या म्हणण्याप्रमाणे सकाराचे जागी प्रकृत सूत्रान्वये आन्तरतम्यानें वास्तविक थकारच होऊ शकतो, व तो थकार प्रकृत पर त्रैपादिक सूत्रानें होणारा असल्यामुळें, 'खरि च' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीने तो असिद्ध ठरतो व त्यामुळें त्या थकाराचे जागी 'खरि च' या सूत्राने तकार होऊ शकत नाही असे दीक्षितानी प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे हरदत्तानें देखील या विपयासबधानें 'उत्थानेति। सकारस्य पूर्वसवर्णस्तकार.। अन्ये तु बाह्यप्रयत्नसाम्यात् थकारमिच्छन्ति, तत्र थकारद्वयस्य श्रवणम्, न च पूर्वस्य चर्त्वं, तत्र कर्तव्येऽस्य पूर्वसवर्णस्यासिद्धत्वात्।' असे पदमञ्जरीत म्हटले आहे साराश प्रकृत सूत्रानें सकाराचा थकार केल्यावर त्या थकाराचे जागी तकार होऊ शकत नसल्यामुळें, थकारादेशपक्षात देखील तकार या 'चय्' च्या अभावामुळें 'चयो द्वितीया' या वार्तिकाची प्रवृत्ति होऊ शकत नाही. यावर शब्दरत्नकार असे म्हणतात कीं, सकाराचे जागीं थकार केल्यावर त्या थकाराचा 'खरि च' या सूत्रानें तकार होऊ शकत नाही असे जें दीक्षितानीं मनोरमेत म्हटले आहे ते जरी अष्टाध्यायी सूत्रपाठक्रमान्वयें योग्य ठरते तरी, भाष्यकारानी वर सांगितल्याप्रमाणे त्या पाठक्रमात बदल करून 'उद स्था' हे प्रकृत सूत्र त्रिपादीत 'खरि च' या सूत्रापूर्वी पठित केले असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें सकाराचे जागी केलेला थकारादेश 'खरि च' या परसूत्राच्या दृष्टीनें सिद्ध ठरतो व त्यामुळें पूर्व त्रैपादिक प्रकृत सूत्रानें होणाऱ्या थकाराचे जागी 'खरि च' या सूत्रानें तकार होऊ शकतो. मग अशा रीतीनें तकार हा 'चय्' उपलब्ध होत असल्या-

मुळें त्याचे ठिकाणी 'चयो द्वितीया' या वार्तिकाची प्रवृत्ति का करू नये असा प्रकाशकारानुयायीनें प्रश्न केल्यास, शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, भाष्यसम्मत पाठान्वयें 'खरि च' या पर त्रैपादिक सूत्रानें केलेला थकाराचा तकार 'उद स्था' या प्रकृत पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें व अशा रीतीनें थकारच विद्यमान आहे आणि तकार या 'चय्' चा अभाव आहे असें मानावें लागत असल्यामुळें, 'नादिन्याक्रोशे' या पूर्व त्रैपादिक सूत्रात पठित असलेलें 'चयो द्वितीया' हें वार्तिक वरील उदाहरणात प्रवृत्त होऊ शकत नाही दुसरें असें की, त्या उदाहरणात जसा कार्यीचा–'चय्' चा–अभाव आहे तसा निमित्ताचा देखील अभाव आहे, कारण थकाराचे जागी केलेल्या तकारापुढें 'शर्' नसून थकार आहे त्यामुळें देखील 'चयो द्वितीया शरि' हें वार्तिक वरील उदाहरणास लागू पडत नाहीं. साराश सकाराचे जागी प्रकृत सूत्रानें तकारादेश होतो असा प्रकाशकाराच्या म्हणण्याचा आशय नसून, सकाराचे जागी प्रथम थकारच होतो व त्या थकाराचे भाष्यपाठ-क्रमान्वयें चर्त्व करता येत आणि तसें चर्त्व केल्यावर उपलब्ध होणाऱ्या तकाराचे ठिकाणी 'चयो द्वितीया.' या वार्तिकाची प्रवृत्ति केली जाते असा त्याच्या म्हणण्याचा आशय आहे असें मानलें तरी, वर सागितल्याप्रमाणे तो तकार असिद्ध ठरत असल्यामुळें व त्यापुढें 'शर्' नसल्यामुळें, 'चयो द्वितीया शरि' हें वार्तिक वरील उदाहरणात प्रवृत्त होऊ शकत नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे वास्तविक सकाराचे जागी तकार होता असाच प्रकाशकाराच्या म्हणण्याचा आशय आहे व त्या तकाराचे ठिकाणीच त्यानी 'चयो द्वितीया' ह्या वार्तिकाची प्रवृत्ति केली आहे पण पूर्वी मनोरमेंत सागितल्याप्रमाणे सकाराचे जागी प्रकृत सूत्रानें तकार होऊच शकत नाहीं व थकारच होऊ शकतो व त्या थकाराचे 'खरि च' या पूर्व-त्रैपादिक सूत्रानें चर्त्व होऊ शकत नसल्यामुळें व अशा रीतीनें चय्चा अभाव असल्यामुळें आणि 'शर्' देखील पुढें नसल्यामुळें, '

द्वितीया.' या वार्तिकाचा उपन्यास करून ते जें वार्तिक वरील उदाहरणात प्रवृत्त केले आहे ते विचार न करिता प्रकाशकारानी प्रवृत्त केले आहे असे दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे. तथापि प्रकाशकाराच्या मताचे समर्थन करण्याकरिता त्याच्या अनुयायीनी जर असे म्हटले की, दीक्षिताना प्रकाशकाराच्या म्हणण्याचा खरा आशय कळला नाही व प्रकाशकाराच्या म्हणण्याचा वास्तविक वर सागितल्याप्रमाणे आशय होतो व हे त्याचे म्हणणे गृहीत केले तरी देखील, वरील उदाहरणात 'चयो द्वितीया' हे वार्तिक प्रवृत्त होऊ शकत नाही हे सिद्ध करण्याच्या हेतूनें शब्दरत्नकारानी शब्दरत्नात त्या अनुयायीच्या मताचा शकारूपाने उपन्यास करून त्या शकेचे निरसन केले आहे हे लक्षात ठेवावे )

मनोरमा—तच्छिव इति । यत्तु प्राचा तत् शिव इत्यत्र जश्त्वे कृते "खरि च" इत्युक्तम् । तन्न । तदो दान्तत्वेन जश्त्वोपन्यासवैयर्थ्यात् । यत्तु तत्पौत्रेणोक्त तदो "वाऽवसाने" इति चर्त्वे कृते पश्चाच्छिव इत्यनेन सम्बन्धे "झलां जशोऽन्ते" इति जश्त्वे "खरि च" इति चर्त्वमिति तदतिस्थवीयः । जश्त्वं प्रति अवसाने चर्त्वस्यापवादत्वात् । जश्त्वे शिवशब्दानपेक्षणाच्च । भाविन्यवसानभङ्गे "वाऽवसाने" इत्यस्य पूर्वमप्रवृत्तेश्च । प्रवृत्तस्य वा निवृत्तिसम्भवात् । उक्त च "अकृतव्यूहाः पाणिनीयाः" इति "कृतमपि शास्त्र निवर्तयन्ति" इति च । अन्यथा हरिरयमित्यत्रापि त्वदुक्तरीत्या प्रवृत्तो विसर्गः केन वार्यताम् । अथ तनोतीति तदिति क्विबन्त ब्रूषे एवमपि जश्त्वेन दकारोऽस्तु । चर्त्वे कृते श्चुत्वमिति तु न न्याय्यम्, श्चुत्व प्रति चर्त्वस्यासिद्धत्वात् । यत्तु "न मु ने" इत्यत्र "न" इति योग विभज्यासिद्धत्वमिह नेत्याहुः । तदपि न, असिद्धत्वेऽपि रूपसिद्धौ निर्बाधाया योगविभागस्यागतिकगतिभूतस्येहाश्रयणे प्रमाणाभावात् ॥

('खरि च' सू १२१ या सूत्रावरील कौमुदीत दीक्षितानी 'तद् + शिव' या दोन पदाचा सधि करून 'तच्छिव, तच्शिव'

अशी पाक्षिक रूपें दिलीं आहेत. त्यानीं 'तद्+शिवः' अशा स्थितीतच, तवर्गांतील दकारापुढें शकार असल्यामुळें, 'स्तोः श्चुना श्चुः' सू १११ हे सूत्र प्रवृत्त करून दकाराचे जागी आन्तरतम्यानें जकार केला आहे व अशा रीतीनें 'तज्+शिवः' अशी स्थिति झाली असता, 'खरि च' या सूत्रानें जकाराचे जागी चकार करून व 'शश्छोऽटि' सू १२० या सूत्रानें शकाराचे जागी विकल्पानें छकार करून 'तच्छिव, तच्शिव' हीं रूपें साधलीं आहेत. परतु प्रक्रियाकौमुदीकारानी वेगळ्या तऱ्हेची प्रक्रिया दिली आहे. त्यानी 'तद्' हे दान्त सर्वनाम न मानता तकारान्त सर्वनाम मानून 'तत् + शिव.' या स्थितीत 'तत्' या पदाच्या अन्ती असणाऱ्या तकाराचे जागी 'झला जशोऽन्ते' सू ८४ या सूत्रानें प्रथम दकार केला आहे व नतर 'खरि च' या सूत्रानें त्या दकाराचे जागी तकार करून, पुढें त्यानीं 'स्तो श्चुना श्चुः' या सूत्राची प्रवृत्ति करून तकाराचे जागी चकार केल्यावर 'शश्छोऽटि' या सूत्राने शकाराचे जागी विकल्पेकरून छकार केला आहे. दीक्षिताच्या मते ही प्रक्रिया अशुद्ध असल्यामुळें ते असे म्हणतात कीं,) प्रक्रियाकौमुदीकारानी 'तत् शिव इत्यत्र जश्त्वे कृते खरि च' असे जें म्हटले आहे ते बरोबर नाहीः; कारण 'तद्' हा शब्द दकारान्त असल्यामुळें जश्त्वाचा उपन्यास करणे व्यर्थ ठरते—म्हणजे जर 'तत्' असा तकारान्त शब्द असता तरच जश्त्वाचा उपन्यास करणे योग्य ठरले असते. पण तो मूळचा दान्त शब्द असल्यामुळें 'झला जशोऽन्ते' हें सूत्र प्रवृत्त करण्याची त्याना काहीच गरज नव्हती. (त्याच्या या म्हणण्याचे कसे तरी समर्थन करण्याकरिता) त्याचे पौत्र प्रसादकार यानी 'तदो वाऽवसाने इति चर्त्वे कृते पश्चात् शिव इत्यनेन सम्बन्धे जश्त्व झला जशोऽन्ते इति । ततश्च तद् शिव इति स्थिते खरि च । अनेन चर्त्वे (आन्तरतम्यात् स्तोः श्चुना इति चकारे तच् शिव इति स्थिते शश्छोऽटि इत्यनेन पक्षे शस्य छत्वे कृते तच्छिवः इति स्यात् । छत्वाभावे तच् शिव इति') असे जें आपल्या टीकेत म्हटले आहे ते

तर अधिकच दोषयुक्त आहे, कारण अवसान पुढें असतांना ('वाऽवसाने' सू. २०६ या सूत्रानें) होणारें चर्त्व ('झला जशोऽन्ते' या सूत्राने होणाऱ्या) जश्त्वाचे अपवादक आहे दुसरे असे की, जश्त्व करतेवेळी 'शिव' या शब्दाची काही अपेक्षा–गरज–नाही. तिसरे असे की, पुढें अवसान नाहीसे होणार हे माहीत असताना 'वाऽवसाने' या सूत्राची पूर्वी प्रवृत्ति करता येत नाही. ते सूत्र प्रथम प्रवृत्त केले तरी, (अवसान नाहीसे झाले असता त्या सूत्रानें होणाऱ्या कार्याची) निवृत्ति होणारच, म्हणजे ते कार्य नाहीसे होणारच; कारण 'कृतमपि शास्त्र निवर्तयन्ति' व 'अकृतव्यूहाः पाणिनीयाः' परि. ५६ ही वचनें आहेत ही वचने न मानल्यास, 'हरिरयम्' या स्थली झालेल्या विसर्गाचे निवारण तुमच्या रीतीप्रमाणे कसे करता येणार? जर तुमचे असे म्हणणे असेल की, 'तनोतीति तत्' असे क्विवन्त तान्त रूप आहे, तर तकाराचे जश्त्व करून त्याचे जागी दकार होऊ शकतो. पण त्या दकाराचे ('खरि च' या सूत्रानें) चर्त्व केल्यावर, म्हणजे तकार केल्यावर, त्या तकाराचे ('स्तो श्चुना श्चुः' सू १११ या सूत्रानें चुत्व करणे, म्हणजे त्या तकाराचे जागी चकार करणे, हे अयोग्य आहे, कारण श्चुत्वाच्या दृष्टीने चर्त्व असिद्ध आहे 'नमुने' सू ४३९ या सूत्राचा 'न' असा योगविभाग केल्यानें चुत्वाच्या दृष्टीने चर्त्व येथें असिद्ध ठरत नाही असे जें प्रकाशकारानी म्हटले आहे ते देखील बरोबर नाही; कारण श्चुत्वाच्या दृष्टीनें चर्त्व असिद्ध मानून देखील कोणताहि दोष न येता इष्ट रूपाची सिद्धि करता येत असल्यामुळें, जेथें गत्यन्तर नाही, म्हणजे इतर रीतीनें इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकत नाही, तशाच ठिकाणी तसा योगविभाग करणे न्याय्य ठरते व त्यामुळें प्रकृत स्थली तशा योग-विभागाचा आश्रय करण्यास काहीं प्रमाण नाहीं ('स चासौ शिवश्च = तद् + सु + शिव + सु' अशा स्थितीत 'सुपो धातु-प्रातिपदिकयोः' सू. ६१० या सूत्रानें 'सु' या अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययाचा लुक् होऊन 'तद् + शिव' अशी स्थिति झाली असता,

सर्वादिगणात 'तद्' असे दकारान्त सर्वनाम पठित असल्यामुळें व अशा रीतीनें 'तद्' हे पद मूळचेच स्वत सिद्ध दान्त असल्यामुळें दकाराचा दकार करण्याची गरज काय ? जर ते सर्वनाम तान्त पठित असत तर 'झला जशोऽन्ते' या सूत्रानें 'तत्' या पदातील अन्त्य तकाराचा दकार करण्याची गरज पडली असती म्हणून 'तत् शिव इत्यत्र जश्त्वे कृते' असे जें प्रक्रियाकौमुदीकारानी म्हटले आहे ते चूक ठरते हे उघड आहे त्यानी बहुधा चुकीनें 'तत्' असे तान्त सर्वनाम मानून जश्त्वाची प्रवृत्ति केली आहे पण तें सर्वनाम तान्त नसून दान्त आहे हे वर सागितलेच आहे प्रक्रियाकौमुदीकारानी केलेली ही चूक प्रसादकाराच्या ध्यानात आल्यावर त्या चुकीचे कसे तरी समर्थन करण्याकरिता त्यानी असे म्हटले आहे की, 'तद् शिव' या स्थली 'वाऽवसाने' सू २०६ या सूत्रान्वयें 'तद्' यातील अन्त्य दकाराचा तकार केल्यावर 'तत्' असे जें तकारान्त रूप होते त्यापुढें 'शिव' हा शब्द आला असता अवसान नष्ट होत असल्यामुळें, 'तत्' यातील अन्त्य तकाराचा 'झला जशोऽन्ते' या सूत्रानें दकार केला असता जेव्हा 'तद् शिव' अशी पुन्हा स्थिति होते तेव्हा तशा स्थितीत 'खरि च या सूत्रानें 'तद् यातील दकाराचे जागीं पुन्हा तकार केल्यानें 'तत् शिव' अशी स्थिति झाली असता, 'स्तो श्चुना श्चु' हें सूत्र प्रवृत्त केल्यानें तकाराचे जागीं आन्तरतम्यानें चकार होऊन 'तच् शिव' असे रूप होते यावर दीक्षित असे म्हणतात की प्रसादकारानी दर्शविलेली वरील प्रक्रिया शास्त्ररीत्या अशुद्ध आहे, कारण 'तद् शिव' या स्थली 'वाऽवसाने' सू २०६ हे सूत्र प्रथम प्रवृत्त करून 'तद्' यातील दकाराचा तकार केल्यावर 'झला जशोऽन्ते' हे सूत्र नतर प्रवृत्त करता येत नाही व तकाराचे जागी दकार करता येत नाही याचे कारण हें की, जरी 'झला जशोऽन्ते' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या मानानें 'वाऽवसाने' हें पर त्रैपादिक सूत्र आहे तरी, तें जश्त्वाचे अपवादक सूत्र आहे ते जश्त्वाचे कसे अपवादक सूत्र ठरते हे शब्दरत्नात सागण्यात येईल म्हणून अपवादक सूत्र

प्रथम प्रवृत्त केल्यावर बाधित–अपवाद–सूत्राची नतर प्रवृत्ति करता येत नसल्यामुळें, 'वाऽवसाने' या सूत्रानें प्रथम चर्त्व केल्यावर नतर 'झला जशोऽन्ते' या सूत्रानें जश्त्व करता येत नाही हे उघड आहे दुसरें असे की, 'तद्' या पदातील अन्त्य दकाराचे 'वाऽवसाने' सू २०६ या सूत्रानें चर्त्व करून 'तत्' असे रूप झाले असता, त्या रूपातील अन्त्य तकाराचे पुन्हा जश्त्व करण्याकरिता 'तत्' या पदापुढें कोणता तरी शब्द येऊन अवसान नष्ट होणे या निमित्ताची मुळीच अपेक्षा नाही, कारण 'झला जशोऽन्ते' सू ८४ या जश्त्वविधायक शास्त्रानें जश्त्व करण्याकरिता पदान्ती 'झल' असणे एवढचाच निमित्ताची गरज आहे मग त्या झलपुढें अवसान असले किंवा नसले तरी तो पदान्ती असल्यामुळें त्याचे जश्त्व करता येतेंच जश्त्व केल्यावर त्या जश्रूप झल्पुढें 'खर' आल्यास, 'खरि च' सू १२१ या सूत्रानें त्याचे चर्त्व होते व अवसान पुढें असल्यास 'वाऽवसाने' या सूत्रानें त्याचे विकल्पेंकरून चर्त्व होते ही गोष्ट वेगळी 'तद् + सु' यातील 'सु' या विभक्तिप्रत्ययाचा पूर्वी सांगितल्याप्रमाणे लुक् केल्यावर 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू २६२ या सूत्रान्वयें प्रत्ययलक्षणानें 'तद्' याला पदसंज्ञा होते व त्या पदातील अन्त्य दकाराचा 'वाऽवसाने' या सूत्रानें तकार केला असता, 'एकदेशविकृतमनन्यवत्' - परि. ३७ - या न्यायान्वयें 'तत्' हा 'तद्' च आहे असे मानता येत असल्यामुळें, 'तत्' याला देखील पदसंज्ञा होतेच अशा रीतीनें 'तत्' या पदातील अन्त्य तकार हा 'झल्' पदान्ती येत असल्यामुळें, त्यापुढें अवसान असले तरी त्याचे जश्त्व होण्यात काही प्रत्यवाय–अडचण–येत नाही म्हणून 'वाऽवसाने इति चर्त्वे कृते पश्चाच्छिव इत्यनेन सम्बन्धे झला जशोऽन्ते इति जश्त्वे' असे जें प्रसादकारानी म्हटले आहे ते वर दिलेल्या दोन कारणान्वयें अशुद्ध ठरते तिसरे असे की, 'तत्' या पदाचा 'शिव' या शब्दाशी सम्बन्ध होणार व त्यामुळें अवसान नष्ट होणार हे पूर्वीपासून माहीत असल्यामुळें, 'तत्' या पदातील

अन्त्य तकाराचे 'झलां जशोऽन्ते' या सूत्रानें जश्त्व करून उपयोग काय, कारण 'तत्' या पदापुढें 'शिव' हा शब्द येतां-क्षणीच अवसान नष्ट होणार व दकारापुढें शकार हा 'खर्' येत असल्यामुळें 'खरि च' या सूत्रानें पुन्हां दकाराचा तकार करावा लागणारच. म्हणून जें पुढें नाहींसें होणार आहे हें पूर्णपणें माहीत आहे ते करून फायदा काय ? 'प्रक्षाल्नाद् हि पङ्कस्य दूरादस्पर्शनं वरम्' या न्यायान्वयें, अशा ठिकाणी 'निमित्त विनाशोन्मुखं दृष्ट्वा तत्प्रयुक्तं कार्यं न कुर्वन्ति' या शास्त्रीय वचनाचें अवलंबन करणेंच योग्य आहे. सारांश दीक्षितांच्या म्हण-ण्याचा आशय हा आहे कीं, जेव्हां आपणास 'तद्' या शब्दाचा 'शिव' या शब्दाशीं पुढें संधि करणें आहे तेव्हां, 'वाऽवसाने' हें सूत्र प्रथम प्रवृत्त करून व नंतर 'झलां जशोऽन्ते' हें सूत्र प्रवृत्त करून अखेरीस 'खरि च' हें सूत्र प्रवृत्त करणें योग्य नाहीं 'स्तोः श्चुना श्चुः' या सूत्रानें 'तद्' यांतील दकाराचा जकार करून नंतर 'खरि च' हें सूत्र एकदम प्रवृत्त केल्यानें सर्व काम भागत असल्यामुळें, वरील दोन सूत्रें प्रवृत्त करण्याची गरज काय असा त्यांच्या म्हणण्याचा कटाक्ष आहे आतां जर कोणी असें म्हणेल कीं, 'कृतमपि कार्यं निवर्तयन्ति' किंवा 'निमित्त विनाशोन्मुखं दृष्ट्वा तत्प्रयुक्तं कार्यं न कुर्वन्ति' या अर्थाची वाचक 'अकृतव्यूहाः पाणिनीयाः' ही वास्तविक परिभाषाच नाहीं तर, त्यावर दीक्षित असें म्हणतात कीं, जर ही परिभाषा न मानली तर, 'हरिरयम्' इत्यादि प्रयोग सिद्ध होऊं शकणार नाहींत 'हरि + सु' या स्थलीं 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचे जागीं 'रु=' रकार केल्यावर त्या रकारापुढें अवसान असल्यामुळें, 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू ७६ या सूत्रानें त्या रकाराचा विसर्ग होण्याची प्राप्ति आहे व त्या सूत्रानें त्या रकाराचा विसर्ग केल्यास, 'अकृतव्यूहाः' ही परिभाषा न मानली तर, त्या विसर्गाचा नाश करतां येत व रेफाचा पुन्हां प्रादुर्भाव करतां येणे शक्य नाहीं व त्यामुळें 'हरिरयम्' हा इष्ट

प्रयोग सिद्ध होऊ शकणार नाही पण ती परिभाषा मानल्यानें आपणास विसर्गाची निवृत्ति करता येते व रेफाचा पुन्हा प्रादुर्भाव करता येतो व त्या परिभाषेच्या आधारे आपणास असेहि म्हणता येते की, ज्याअर्थी 'हरिर्' या शब्दाचा 'अयम्' या शब्दाशी सन्धि करणे आहे हे आपणास पूर्वीपासून माहीत आहे त्याअर्थी, 'निमित्त विनाशोन्मुख दृष्ट्वा तत्प्रयुक्त कार्यं न कुर्वन्ति' या वचनान्वयें अशा ठिकाणी 'खरवसानयोर्विसर्जनीय' या सूत्राची प्रवृत्ति करणे योग्य नाही, कारण ते सूत्र प्रथम प्रवृत्त केले तरी, अवसान नष्ट होता क्षणीच 'निमित्तापाये नैमित्तिकापाय' या न्यायान्वयें, अवसान-निमित्तक विसर्गाची निवृत्ति होऊन पुन्हा पूर्वीचा रकार प्रादुर्भूत होणारच साराश 'हरिरयम्' इत्यादि प्रयोग सिद्ध होण्याकरिता 'अकृतव्यूहा' ही परिभाषा मानणे आवश्यक आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे व त्या परिभाषान्वयें ज्या चर्त्वाची, अवसान नष्ट झाल्यावर, अवश्य निवृत्ति होणार आहे तसे चर्त्वकार्य प्रथम करणे अयोग्य आहे असे त्याचे म्हणणे आहे म्हणून 'तद् + शिव' अशा स्थितीत 'वाऽवसाने' या सूत्रानें चर्त्व न करिता, 'स्तो श्चुना श्चु' या त्रैपादिक पूर्वसूत्रानें 'तद्' यातील दकाराचा जकार करून, नतर 'खरि च' या त्रैपादिक परसूत्रानें त्या जकाराचा चकार करावा. तसे केले म्हणजे, चकार या 'झय्' पुढे 'शिव' यातील शकार येत असल्यामुळें व त्या शकारापुढें 'इ' हा 'अट्' आला असल्यामुळें, 'शश्छोऽटि' सू १२० या सूत्राने शकाराचा विकल्पानें छकार होऊन, 'तच्छिव' व 'तच्शिव' अशी वैकल्पिक इष्ट रूपें सिद्ध होतात आता 'तत् + शिव' असं जें प्रक्रियाकौमुदी-कारानी उदाहरण दिले आहे त्याचे समर्थन करण्याकरिता काही प्रक्रियाकौमुदीकारानुयायी असे म्हणतात कीं, त्या उदाहरणातील 'तत्' हा शब्द 'तद्' या सर्वनामाचे रूप नसून 'तनोतीति तत्' अशा रीतीनें 'तन्' धातूहून 'क्विप्' प्रत्यय करून सिद्ध झालेला मूळचा तकारान्त शब्द आहे. 'तन्' धातूहून क्विप् प्रत्यय केला

असता, 'अनुदात्तोपदेश' सू. २४२८ या सूत्रानें 'तन्' यातील अन्त्य नकाराचा लोप होऊन व 'ह्रस्वस्य पिति कृति तुक्' सू. २८५८ या सूत्रानें 'तुक् = त्' हा आगम होऊन 'तत्' असें जें रूप सिद्ध होतें त्याचा प्रक्रियाकौमुदीकारानीं वरील उदाहरणांत उपयोग केला आहे असा त्याच्या म्हणण्याचा आशय आहे असे जर मानले तर हें खरें की, 'तत्' या पदांतील अन्त्य तकार पदान्ती असल्यामुळें, 'झलां जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें त्या अन्त्य तकाराचा दकार *करता येतो पण पुढें त्या दकाराचा, 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें* 'शिव' या शब्दांतील शकार हा 'खर्' पुढें असल्यामुळें, तकार केल्यावर त्या तकाराचा 'स्तोः श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रानें चकार करता येत नाही, कारण 'स्तोः श्चुना श्चुः' या त्रैपादिक पूर्व सूत्राच्या दृष्टीनें 'खरि च' या त्रैपादिक उत्तर सूत्रानें झालेला तकार 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रान्वयें असिद्ध ठरत असल्यामुळें तो दकारच आहे असें मानावे लागतें, व त्यामुळें त्या असिद्ध तकाराचे जागीं चकार होऊं शकत नाहीं. यावर प्रकाशकार असें म्हणतात की, 'न मु ने' सू ४३९ या सूत्राचा 'न' असा योगविभाग केल्यास व त्यांत 'पूर्वत्रासिद्धम्' या पूर्व सूत्राची अनुवृत्ति केल्यास, त्या योग-विभागाचा 'क्वचित् पूर्वत्रासिद्ध न' असा अर्थ होतो व त्यामुळें 'न' या योगविभागाची प्रकृत उदाहरणांत प्रवृत्ति केल्यास, 'स्तोः श्चुना श्चुः' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें 'खरि च' हें त्रैपादिक उत्तर सूत्र असिद्ध ठरत नाहीं व असा रीतीनें दकाराचे जागीं 'खरि च' या सूत्रानें झालेला तकार 'स्तोः श्चुना श्चुः' या सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नसल्यामुळें, 'स्तोः श्चुना श्चुः' या सूत्रानें त्या तकाराचे चुत्व करता येतें. सारांश वर सांगितल्याप्रमाणें 'न मु ने' या सूत्राचा योगविभाग केल्यानें 'पूर्वत्रासिद्धम्' हें शास्त्र अनित्य ठरत असल्यामुळें, त्या शास्त्राची प्रकृत उदाहरणांत प्रवृत्ति न केल्यानें प्रक्रियाकौमुदीकारानीं दिलेलें 'तच् शिव.' हें उदाहरण योग्य ठरतें असा प्रकाशकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. यावर

दीक्षित असे उत्तर देतात की, 'न मु ने' या सूत्राचा भाष्यकारानीं 'न' असा योग-विभाग भाष्यांत कोठेंहि केला नाहीं व त्यामुळें तसा योगविभाग करण्यास काहीच आधार–प्रमाण--नाहीं. दुसरे असे कीं, जेथें योगविभाग केल्याशिवाय इष्ट रूपाची सिद्धि होऊं शकत नाहीं तशाच ठिकाणीं अगतिकगतिन्यायानें, म्हणजे गत्यन्तर नसल्यामुळें, योगविभाग करणें इष्ट ठरते. 'योगविभागादिष्टसिद्धि'–परि-१२३–या परिभाषान्वयें इष्ट रूपाची सिद्धि करण्याकरिताच योगविभाग करता येतो. पण 'न मु ने' या सूत्राचा 'न' असा योगविभाग न करिता देखील 'तच्छिवः' या उदाहरणात 'तद् + शिव.' अशा स्थितीतच 'स्तो श्चुना श्चु.' हे सूत्र प्रवृत्त करून 'तद्' यातील अन्त्य दकाराचा जकार केल्यावर नंतर 'खरि च' या सूत्रानें त्या जकाराचा चकार केल्यानें 'तच्छिव' असे इष्ट रूप सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, तसा योगविभाग करण्याची काहीच आवश्यकता नाहीं जर तसा योगविभाग केल्याशिवाय 'तच्छिवः' या इष्ट रूपाची सिद्धि होणें अशक्य असतें तरच तसा योगविभाग करणें योग्य झालें असतें म्हणून प्रकाशकारानीं केलेल्या योगविभागाचें अवलंबन करून वरील रूप त्यानीं दिलेल्या प्रक्रियान्वयें सिद्ध करणें अयोग्य आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे. )

शब्दरत्न– चर्त्वमिति । ततः श्चुत्वे "शश्छोऽटि" इति प्रक्रियेति भावः । चर्त्वापवादत्वादिति । एवं च तत्र कृते जश्त्वाप्रवृत्तिरिति भावः । न च जश्त्वे कृते चर्त्वस्य चारितार्थ्येन तस्यासिद्धत्वादपवादत्वे न मानमिति वाच्यम् । तत्कालेऽवश्यं प्राप्तत्वेन येन नाप्राप्तिन्यायेनापवादत्वस्यसुलभतयोक्तरीतेरसम्भवात् । एतदेवाभिप्रेत्य "मिदचोऽन्त्यात्" सूत्रे भाष्ये उक्तम्–सत्यपि सम्भवे बाधनं भवतीति । अन्यथा कौण्डिन्याय तक्रमित्यनेन ब्राह्मणेभ्यो दधीति प्राप्तदधिदानस्यापि बाधो न स्यात् । तद्दानोत्तरं तत्पूर्वं वा तद्दानस्य चारितार्थ्यात् । अत एव "अजादेर्द्वितीयस्य" इति सूत्रे प्रथमद्विर्वचनोत्तरमस्य चारितार्थ्येन प्रथमद्विर्वचनस्यानेन बाधो न स्यादित्याशङ्क्य सत्यपि

सम्भवे इति न्यायेन बाधकत्वमुक्तं भाष्ये । एव च "दयतेर्दिगि" इति सूत्रस्यकंपटादिग्रन्था असम्भवे एव बाधकतेति वार्तिकानुसारेण प्रवृत्ता अयुक्ता एवेति बोध्यमिति भावः । केन धार्यतामिति । एव चेद्गविषये वाक्यसंस्कारपक्षेणैव साधुत्वान्वाख्यानमिति स्वीकृत्या-कृतव्यूहपरिभाषा त्याज्येति चेदिष्टापत्तिरिति बोध्यम् । अन्ये तु पद-संस्कारे हरिः अस्तीति सविसर्गमपि साध्वेव सत्यभिधाने, परिभाषाया भाष्येऽदर्शनादित्याहुः प्रमाणाभावादिति । योगविभागस्य भाष्येऽदर्शने-नाप्रामाणिकत्वाच्चेत्यपि बोध्यम् ॥

(मनोरमेंत, प्रसादकारानीं दिलेली प्रक्रिया सांगताना) 'चर्त्वम्' असे जें म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, चर्त्व केल्यावर चुत्व केल्यानंतर 'शश्छोऽटि' हें सूत्र प्रवृत्त केले जाते अशी प्रसाद-कारानीं प्रक्रिया दिली आहे ('तद् शिव' या उदाहरणांत प्रथम 'वाऽवसाने' सू २०६ या सूत्रानें 'तद्' या पदातील अन्त्य दकाराचा तकार केल्यावर व नंतर त्या तकाराचा 'झलां जशोऽन्ते' सू ८४ या सूत्रानें दकार केल्यावर आणि नंतर 'खरि च' सू १२१ या सूत्रानें त्या दकाराचा पुन्हा तकार केल्यावर व मग 'स्तोः श्चुना श्चुः' सू १११ या सूत्रानें त्या तकाराचा चकार केल्यावर 'शश्छोऽटि' सू १२० या सूत्रानें 'शिव' यातील शकाराचा विकल्पे-करून छकार केल्यानें 'तच्छिव, तच्शिव' अशीं पाक्षिक रूपें सिद्ध होतात अशी प्रसादकारानीं प्रक्रिया मांगितली आहे प्रसादकाराचें म्हणणें मनोरमेच्या विवरणांत दिलेच आहे.) 'जश्त्व प्रति अत्रमाने चर्त्वस्यापवादत्वात्' असे मनोरमेंत म्हटले असल्यामुळें ('वाऽवसाने' या अपवादक सूत्रानें 'तद्' या पदातील अन्त्य दकाराचें) चर्त्व केल्यावर ('झलां जशोऽन्ते' या बाधित सूत्राची, 'अपवादे प्रवृत्ते पुनरुत्सर्गाप्रवृत्तिः' या न्यायान्वयें, नंतर प्रवृत्ति करतां येत नाहीं व त्यामुळें पुन्हा दकाराचें आगीं आलेल्या तकाराचें) जश्त्व–दकार–करतां येत नाहीं (येथें शंकाकार अशी शंका करतो की, 'झलां जशोऽन्ते' या सूत्रानें) जश्त्व केल्यावर ('वाऽवसाने' या सूत्रानें)

चर्त्वं करता येत असल्यामुळें व अशा रीतीनें ते सूत्र चरितार्थ ठरत असल्यामुळें आणि (त्या त्रैपादिक पर सूत्रानें होणारे) चर्त्वं ('झला जशोऽन्ते' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ या शास्त्रान्वयें) असिद्ध ठरत असल्यामुळें, 'झला जशोऽन्ते' या सूत्राचे 'वाऽवसाने' हे अपवादक सूत्र ठरते हे मानण्यास काही प्रमाण नाही (शकाकाराचे असे म्हणणे आहे की, 'वाऽवसाने' या सूत्रानें 'तद्' या पदातील दकाराचे चर्त्व–तकार–करता येते व अशा रीतीनें ते सूत्र चरितार्थ ठरत असल्यामुळें आणि त्या पर त्रैपादिक सूत्रानें होणारे चर्त्व 'झला जशोऽन्ते' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळे, म्हणजे तकार झालाच नाही व दकारच कायम आहे असे मानता येत असल्यामुळे, 'स्तो श्चुना श्चु' या सूत्राची प्रवृत्ति केल्यानें 'तज् शिव' अशी स्थिति झाली असता, 'खरि च' या सूत्रानें जकाराचा चकार केल्यानें 'तच शिव' असे इष्ट रूप सिद्ध होण्यात काही अडचण येत नाही साराश 'वाऽवसाने' हे सूत्र निरवकाश ठरत नसून वर सांगितल्याप्रमाण चरितार्थ ठरत असल्यामुळें, ते 'झला जशोऽन्ते' या सूत्राचे अपवादक सूत्र मानता येत नाहीं या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, 'वाऽवसाने' या सूत्रानें) चर्त्वं करतेवेळी 'झला जशोऽन्ते या सूत्राची अवश्य प्राप्ति होत असल्यामुळें, म्हणजे जेथें जेथें 'वाऽवसाने' हे सूत्र प्रवृत्त होऊ पाहते तेथे तेथें 'झला जशोऽन्ते' या सूत्राची अवश्य प्राप्ति होत असल्यामुळें व अशा रीतीनें 'वाऽवसाने' हे सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतेहि उदाहरण मिळू शकत नसल्यामुळें तशा अनवकाशत्वामुळे, 'वाऽवसाने' हे सूत्र 'येन नाप्राप्ते' –प. ५८– या न्यायान्वयें 'झला जशोऽन्ते' या सूत्राचे अपवादक सूत्र ठरते असे सहज म्हणता येऊ शकते, आणि म्हणून प्रमादकारानी जी प्रक्रिया सांगितली आहे–म्हणजे अवसान पुढें असताना 'वाऽवसाने' या सूत्रानें प्रथम चर्त्वं करून नतर 'झला जशोऽन्ते' या सूत्रानें जश्त्व करणें–ती प्रक्रिया मुळीच संभवत नाही,

व चूक ठरते. अनवकाशत्वामुळें एक सूत्र दुसऱ्या सूत्राचें बाधक ठरतें हें मनात धरूनच भाष्यकारानी 'सिद्धचेऽन्यायापर' १ १ ४७ या सूत्रावरील भाष्यात 'सत्यपि सम्भवे बाधनं भवति'–म्हणजे सामान्यशास्त्रानें कार्य केल्यानंतर विशेषशास्त्रानें नंतर कार्य होण्याचा संभव असला तरी, विशेषशास्त्र सामान्यशास्त्राचें बाधक ठरतच–असें म्हटलें आहे तें भाष्य वचन न मानल्यास, 'सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो दधि दीयतां तक्रं कौण्डिन्याय' या स्थली कौण्डिन्याला दधिदान करण्यापूर्वी किंवा दधिदान केल्यावर तक्रदान करणे संभवत असून चरितार्थ ठरत असल्यामुळें, तक्रदानानें अवश्य युगपत प्राप्त होणा या दधिदानाचा बाध होऊ शकणार नाही म्हणूनच 'अजादेर्द्वितीयस्य' ६–१–२ या सूत्रावरील भाष्यात पहिल्यानें प्रथम एकाचाचें द्विर्वचन केल्यानें 'अजादेर्द्वितीयस्य' हें सूत्र चरितार्थ ठरत असल्यामुळें त्या सूत्रानें 'एकाचो द्वे प्रथमस्य' या सूत्राचा बाध होऊ शकणार नाही अशी शंका उपस्थित करून भाष्यकारानीं त्या शंकेचें निरसन 'सत्यपि सम्भवे बाधनं भवति' हा न्याय प्रवृत्त करून केलें आहे व 'अजादेर्द्वितीयस्य' हें सूत्र 'एकाचो द्वे प्रथमस्य' या सूत्राचें बाधक ठरतं असें म्हटलें आहे (त्या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात– 'यद्प्युच्यते, असति खल्वपि सम्भवे बाधनं भवति, अस्ति च सम्भवो यदुभयं स्यादिति। नैतदस्ति। सत्यपि सम्भवे बाधनं भवति। तद्यथा, दधि ब्राह्मणेभ्यो दीयतां तक्रं कौण्डिन्यायेति सत्यपि दधिदानस्य सम्भवे तक्रदानं निवर्तकं भवति। एवमिहापि सत्यपि सम्भवे प्रथमद्विर्वचनस्य, द्वितीयद्विर्वचनं बाधिष्यते।' या भाष्याचा अर्थ असा आहे की, वार्तिककारानें जें म्हटलें आहे की, सामान्य-शास्त्रानें कार्य केल्यानंतर जेथें विशेषशास्त्रानें पुढें कार्य होऊ शकत नाहीं तशाच ठिकाणी विशेषशास्त्र सामान्यशास्त्राचें बाधक ठरतें तें वार्तिककाराचें म्हणणें बरोबर नाही, कारण जरी 'एकाचो द्वे प्रथमस्य' या सूत्रानें पहिले प्रथम एकाचाचें द्विर्वचन केल्यावर 'अजादेर्द्वितीयस्य' या सूत्रानें पुढें द्वितीय एकाचाचें द्विर्वचन करता

येण्याचा संभव आहे तरी पण, असा संभव असून देखील, ज्याप्रमाणे 'दधि ब्राह्मणेभ्यो दीयतां तक्रं कौण्डिन्याय' या स्थली दधिदान पूर्वी किंवा नंतर होण्याचा संभव आहे तरी तक्रदान दधिदानाचे बाधक ठरते त्याचप्रमाणे, 'अजादेर्द्वितीयस्य' हे सूत्र 'एकाचो द्वे प्रथमस्य' या सूत्राचे बाधक ठरतेच तसेच 'मिदचोऽन्त्यात्परः' सू १-१-४७ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतातः– 'लोकेहि सत्यपि सम्भवे बाधनं भवति। तद्यथा। दधि ब्राह्मणेभ्यो दीयतां तक्रं कौण्डिन्यायेति सत्यपि सम्भवे दधिदानस्य तक्रदानं निवर्तकं भवति। एवमिहापि सत्यपि सम्भवेऽचामन्त्यात्परत्वं षष्ठी-स्थानेयोगत्वं बाधिष्यते।' या द्वितीय भाष्यात भाष्यकारांनी असा प्रश्न केला आहे की, 'मिदचोऽन्त्यात्परः' सू ३७ हे सूत्र करण्याचे प्रयोजन काय व त्या प्रश्नाचे असे उत्तर दिले आहे की, ते सूत्र 'षष्ठी स्थानेयोगा' सू ३८ व 'प्रत्ययः, परश्च' सू. १८०, १८१ या सूत्राचा अपवाद ठरावा याकरिता केले आहे– म्हणजे (१) 'षष्ठी स्थानेयोगा' या सूत्रानें 'अलोऽन्त्यस्य' सू ४२ या परिभाषेच्या सहायाने जसा अन्त्य वर्णाचे जागी आदेश होतो तसा, जो मित् केला आहे तो, न व्हावा व (२) तसेच तो प्रत्यया-सारखा प्रकृतीच्यापुढे न होता प्रकृतीतील अन्त्य अचापुढें व्हावा ते सूत्र 'षष्ठी स्थानेयोगा' या सूत्राचा अपवाद आहे याची भाष्य-कारांनी 'कुण्डानि, वनानि, पयांसि, यशांसि' अशी चार उदाहरणे दिली आहेत या उदाहरणासंबंधानें शंकाकार अशी शंका करतो की, 'कुण्डानि, वनानि' या उदाहरणात 'नपुंसकस्य झलचः' सू. ३१४ या सूत्रानें सांगितलेला 'नुम्' 'षष्ठी स्थानेयोगा' या सूत्रानें अलोऽन्त्यपरिभाषेच्या सहायानें 'कुण्ड, वन' यातील अन्त्य अकाराचे जागी पावतो व 'मिदचोऽन्त्यात्परः' या सूत्रानें तो 'नुम्' त्या अन्त्य अकाराचे जागी पावत नसून त्याच्या पुढें होणे पावतो व अशी दोन परस्परविरुद्ध कार्ये युगपत् होणे असंभवनीय असल्यामुळें, 'असति सम्भवे बाधनं भवति' या न्यायान्वयें, 'कुण्डानि, वनानि' ही दोन

उदाहरणे अपवादाची योग्य उदाहरणे ठरतात. परतु 'पयासि, यशासि' या दोन उदाहरणात 'नुम्' षष्ठी 'स्थानेयोगा' या सूत्रानें 'पयस्, यशस्' यातील अन्त्य सकारचे जागी व 'मिदचोऽन्त्यात्पर.' या सूत्रानें त्यातील अन्त्य अच् जो अकार त्याच्यापुढें पावतो, व ही दोन कार्यें परस्परविरुद्ध नसल्यामुळें एकेच वेळी करणे सभवनीय आहे व 'असति सम्भवे बाधन भवति' हा न्याय असल्यामुळें, 'पयासि, यशासि' ही दोन उदाहरणे अपवादाची योग्य उदाहरणे मानता येत नाहीत या शकेवर भाष्यकार असे उत्तर देतात की, 'सत्यपि सम्भवे बाधन भवति' असाच न्याय लौकिक व्यवहारात सर्वत्र मानला आहे व तसा न्याय असल्यामुळेंच, 'दधि ब्राह्मणेभ्यो दीयना तक्र कौण्डिन्याय' असे म्हटले असता, जरी कौण्डिन्याला ताक व दही ही दोन्ही देता येणे सभवनीय आहे तरी, त्याला दही न दिले जाता केवळ ताकच दिले जाते म्हणून जसा तक्रदानानें दधिदानाचा बाध होतो त्याचप्रमाणे, 'पयासि, यशासि' या स्थली देखील जरी अन्त्य वर्णाच्या जागी 'नुम्' करणे व शेवटच्या अचापुढें 'नुम्' करणे या दोन कार्यांचा युगपत् सभव आहे तरी, 'मिदचोऽन्त्यात्पर' या सूत्रानें 'षष्ठी स्थानेयोगा' या सूत्राचा बाध होऊन 'नुम्' हा अन्त्य वर्णाचे जागी न होता, अन्त्य अचापुढेंच होतो त्याचप्रमाणे 'झला जशोऽन्ते' या सामान्यशास्त्रानें सर्व जागा व्यापली असल्यामुळें, 'वाऽवसाने' या सूत्रास प्रवृत्त होण्यास ज्याअर्थी कोणतेहि उदाहरण मिळत नाही त्याअर्थी ते सूत्र अनवकाशत्वामुळें 'येन नाप्राप्ते' प ५८ या न्यायान्वयें 'झला जशोऽन्ते' याचे अपवादक सूत्र ठरते व ते सूत्र प्रथम प्रवृत्त केल्यावर 'झला जशोऽन्ते' या बाधित सूत्राची नतर प्रवृत्ति करता येत नाही असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे व त्यानी आपल्या मताचे समर्थन करण्याकरिताच वरील दोन भाष्याचा दाखला आधाररूपानें दिला आहे.) 'सत्यपि सम्भवे बाधन भवति' असा भाष्यकाराचा सिद्धान्त असल्यामुळें, 'दधातेर्दिग लिटि'

सू ७ ४. ९ या सूत्रावरील भाष्याच्या टीकेत 'असति सम्भवे बाधनं भवति' या वार्तिककाराच्या मताला अनुसरून 'असम्भवे एव बाधकता' असे जें कैयटादिकानी म्हटले आहे ते अयोग्य ठरते (कारण 'उत्तरोत्तर मुनीना प्रामाण्यम्' या वचनान्वयें, जरी भाष्यकाराचे मत वार्तिककाराच्या विरुद्ध आहे तरी, तेच स्वीकारले पाहिजे) मनोरमेत 'केन वार्यताम्' असे म्हटले असल्यामुळे त्यावरून हाच निष्कर्ष निघतो की, 'हरिरयम्' अशा प्रकारच्या उदाहरणात–म्हणजे अवसान पुढें असता एक प्रकारचे रूप होणे व अवसान पुढे नसून पदान्तर पुढे असल्यास भिन्न प्रकारचे रूप होणे अशा स्थली–वाक्यसंस्कारपक्ष मानूनच इष्ट रूपाची सिद्धि करणे योग्य आहे पण असा पक्ष स्वीकारल्यानें, 'अकृतव्यूहा' ही परिभाषा त्याज्य–अस्वीकारार्ह व निरर्थक–ठरते असे कोणी म्हटल्यास, ती त्याज्य ठरणे ही इष्टापत्तीच आहे असे समजावे. (वाक्यातील प्रत्येक पदाची पाणिनीय शास्त्रान्वयें स्वतंत्र रीतीनें, इतर पदाकडे लक्ष न देता, सिद्धि करणे हा पदसंस्कारपक्ष असून, वाक्यातील उत्तरोत्तर पदाची सिद्धि करून पूर्वपूर्व पदाची सिद्धि करणे व अशा रीतीनें प्रत्येक पदाचे स्वतंत्र अन्वाख्यान न करिता संपूर्ण वाक्याचे शास्त्ररीत्या अन्वाख्यान करणे हा वाक्यसंस्कारपक्ष होय हे दोन्ही पक्ष व्याकरणशास्त्रात मानले आहेत व जेथें जो पक्ष मानल्यानें इष्ट रूप सिद्ध होत असेल तेथें तो पक्ष मानून इष्टरूपाची सिद्धि करावी असा सिद्धान्त आहे म्हणून वाक्यसंस्कारपक्षात 'हरिर्' यातील रकारापुढे अवसान राहत नसून 'अयम्' हे पदान्तर येत असल्यामुळें, 'खरवसानयोर्विसर्जनीय.' या सूत्राची प्राप्तीच होत नाहीं. म्हणून पदसंस्कारपक्षात त्या सूत्राची प्रवृत्ति बंद करण्याकरिता 'अकृतव्यूहाः पाणिनीया' ही जो भाष्यात पठित न केलेली अप्रमाण परिभाषा मानली आहे ती मानण्यापेक्षा अशा स्थलीं वाक्यसंस्कार पक्षाचा स्वीकार करून इष्ट प्रयोगसिद्धि करणे योग्य आहे, कारण पदसंस्कारपक्ष मानल्यानें 'हरि सु. हरिर्' या स्थलीं अवसान

पुढें आहे असे मानावें लागत असल्यामुळें रेफाचा विसर्ग होण्याची जी आपत्ति येते ती, वाक्यसंस्कारपक्ष मानल्यानें व त्या पक्षात 'हरिर्' यापुढें पदान्तर येत असल्यामुळें, आपोआपच टळते असे शब्दरत्नकाराचे म्हणणे आहे ) इतर वैयाकरण असे म्हणतात की, 'हरि अस्ति' असा प्रयोग जर मार्गेत आढळत असेल तर तो विसर्गयुक्त प्रयोग देखील पदसंस्कारपक्षात शुद्धच ठरतो, कारण 'अकृतव्यूहा ' ही परिभाषा भाष्यात कोठेंहि पठित केलेली आढळत नाही (म्हणून त्या पक्षात 'हरिर्' यातील रेफापुढें अवसान आहे असे मानावे लागत असल्यामुळें, 'खरवसानयोर्विसर्जनीय ' सू ७६ या सूत्रानें त्या रेफाचा विसर्ग होणे, 'अकृतव्यूहा·' या भाष्यानुक्त अप्रमाण परिभाषेच्या अभावीं, टळता येणे शक्य नाहीं व त्यामुळे त्या पक्षात 'हरि अस्ति' असाच प्रयोग होऊ शकतो ) 'योग-विभागस्यागतिकगतिमूतस्येहाश्रयणे प्रमाणाभावात्' असं जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हे की, 'न मु ने' या सूत्राचा 'न' असा योगविभाग भाष्यात केलेला आढळत नाही व तसा योगविभाग करण्यास काहीच प्रमाण नसल्यामुळें तो अप्रामाणिक ठरतो हे देखील जाणावे

मनोरमा – आक्रस्यत इति । "आङ उद्गमने" इति तङ् । "स्नुक्रमोः —" इति नेट् ॥

('नश्चापदान्तस्य झलि' सू १२३ या सूत्रावरील कौमुदीत दिलेल्या) 'आक्रस्यते' या उदाहरणात 'आङ उद्गमने' सू. २७१३ या सूत्रान्वयें 'तङ्' – आत्मनेपदि प्रत्यय–आला आहे व 'स्नुक्रमोर-नात्मनेपदनिमित्ते' सू. २३२३ हें सूत्र असल्यामुळें येथें ('स्य' ला) इडागम झाला नाहीं ('क्रमु पादविक्षेपे' धा न ४७३ हा धातु जरी धातुपाठांत भ्वादिगणात परस्मैपदी पठित आहे तरी, त्या पूर्वी 'आङ' हा उपसर्ग आला असता व 'उद्गमन' हा अर्थ वाच्य असता, त्याहून 'आङ उद्गमने' या सूत्रान्वयें आत्मनेपदी प्रत्यय होतात. या आङ्पूर्वक 'क्रम्' धातूचे लृट्लकाराचे तृतीयपुरुषाचे

एकवचनाचे रूप करतेवेळी 'स्यतासी लृलुटोः' सू २१८६ या सूत्रान्वयें 'स्य' हे विकरण लागून 'आ + क्रम् + स्य + ते' अशी स्थिति झाली असता, 'स्य' हा वलादि आर्धधातुक प्रत्यय असल्या-मुळें, 'आर्धधातुकस्येड्वलादे' सू. २१८४ या सूत्राने त्याला इडागमाची प्राप्ति होते. पण 'स्नुक्रमोः' या नियामक सूत्रान्वयें परस्मैपदी प्रत्यय पुढें असतानाच 'क्रम्' धातूपुढील वलादि आर्ध-धातुकप्रत्ययाला इडागम होणे सांगितले असल्यामुळें व प्रकृत स्थली आत्मनेपदी प्रत्यय पुढें असल्यामुळे, 'स्य'ला इडागम होत नाही, व 'क्रम्' यातील मकार पदान्ती नसल्यामुळें जरी 'मोऽनुस्वार' सू. १२२ या सूत्राने त्या मकाराचे जागी अनुस्वार होऊ शकत नाही तरी, 'नश्चापदान्तस्य झलि' हे प्रकृत सूत्र असल्यामुळें व अपदान्त मकारापुढें सकार हा 'झल्' असल्यामुळें, या सूत्रानें मकाराचे जागी अनुस्वार होऊन 'आक्रंस्यते' हे इष्ट रूप सिद्ध होते )

मनोरमा—समसम्बन्धी विधिरिति । समकर्मकं विधानमिति तु नोक्तम् अनुवाद्ययोरपि यथासङ्ख्यस्येष्टत्वात् "समूलाकृतजीवेषु हन्कृञ्ग्रहः" इत्यत्र यथा ।।

अनुवाद्याची—उद्देश्य व निमित्त याची—संख्या सारखी असल्याम देखील तशा ठिकाणी यथासंख्यसूत्र लागू पडणे इष्ट असल्यामुळें, 'यथासङ्ख्यमनुदेशः समानाम्' सू. १२८ या सूत्राचे व्याख्यान करिताना 'समकर्मक विधान यथासङ्ख्य स्यात्' असे न म्हणता, 'समसम्बन्धी विधिर्यथासङ्ख्य स्यात्' असे कौमुदीत म्हटले आहे (प्रक्रियाकौमुदीकारानी प्रकृत सूत्राचे व्याख्यान करिताना 'समेषूद्-शिषु समाना विधान यथाक्रम स्यात्' असे म्हटले आहे. हे व्याख्यान बरोबर मानल्यास, जेथें उद्देश्य किंवा निमित्त आणि विधेय यांची संख्या सारखी आहे तशाच ठिकाणी यथासंख्यन्याय लागू पडेल व जेथें उद्देश्य व निमित्त याची संख्या सारखी आहे तशा ठिकाणी यथासंख्यन्याय लागू पडणार नाही. ही आपत्ति टाळण्याकरिता

दीक्षितांनी प्रकृत सूत्रातील 'समानाम्' हें पद कर्मणि षष्ठी न मानता, सम्बन्धसामान्यषष्ठी मानून प्रकृत सूत्राचे 'समसम्बन्धी विधिर्यथासंख्य स्यात्' असे व्याख्यान केले आहे त्यामुळें 'एचोऽयवायाव' सू ६१ इत्यादि सूत्रात जेथें उद्देश्य व विधेय याची संख्या सारखी आहे तेथें जसा यथासंख्यन्याय लागू पडतो तसाच तो न्याय जेथें उद्देश्य व निमित्त याची संख्या सारखी आहे तेथें देखील लागू पडतो. त्यामुळें) 'समूलाकृतजीवेषु हन्कृञ्ग्रहः' सू ३३५७ या सूत्रात (कौमुदींत केलेल्या प्रकृत सूत्राच्या व्याख्यानान्वयें) तो न्याय लागू पडतो ('समूलाकृतजीवेषु' या सूत्रानें 'हन्, कृञ्' व 'ग्रह्' या धातूंची 'समूल, आकृत, जीव' ही अनुक्रमें उपपदें असताना त्या धातूहून 'णमुल्' प्रत्यय होणे सांगितले आहे. या सूत्रात 'णमुल्' हे एकच विधेय असून उद्देश्यें तीन व निमित्तें तीन आहेत त्यामुळें अनुवाद्य व विधेय याची संख्या समान असल्यासच यथासंख्यन्याय लागू पडतो असे मानल्यास, वरील सूत्रात उद्देश्य किंवा निमित्त आणि विधेय याची संख्या सारखी नसल्यामुळें तो न्याय त्या सूत्रात प्रवृत्त न होण्याची आपत्ति येते परंतु या सूत्रात उद्देश्य व निमित्त याची संख्या सारखी असल्यामुळें, प्रकृत सूत्राचे कौमुदीत जें व्याख्यान केले आहे त्या व्याख्यानान्वयें तो न्याय या सूत्राला देखील लागू पडतो, कारण येथें समसम्बन्धी विधि होणे सांगितले आहे, म्हणजे तीन उद्देश्यें व तीन निमित्तें याचा अनुक्रमें संबंध झाला असता उद्देश्याहून 'णमुल्' प्रत्यय होण्याचे विधान केले आहे. अशा स्थली देखील यथासंख्यन्यायाची प्रवृत्ति होणे इष्ट असल्यामुळें, प्रक्रियाकौमुदीत जसा प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे तसा अर्थ न करिता, कौमुदीत जसा अर्थ केला आहे तसाच अर्थ करणे योग्य आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे)

**शब्दरत्न—यथासङ्ख्यस्येति। "स्यान्तैकदेशेन सूत्रस्य ग्रहण बोध्यम्॥**

'यथासङ्ख्यस्येष्टत्वात्' या मनोरमेच्या पङ्क्तीतील 'यथासङ्ख्य' या ख्यान्त एकदेशानें 'यथासङ्ख्यमनुदेशः समानाम्' या प्रकृत सूत्राचे ग्रहण केले आहे असे समजावे. (प्रकृत सूत्रात 'यथासङ्ख्यम्' असे प्रथमान्त पद असून 'यथासङ्ख्य' हा शब्द त्या पदाचा एकदेश आहे. 'यथासङ्ख्यम्' या पदाचे 'यथासङ्ख्यम्' असेच वास्तविक अनुकरण होऊ शकते. तरी पण दीक्षितानी त्या संपूर्ण पदाचे अनुकरण न करिता त्यातील 'यथासङ्ख्य' या एकदेशाचेच अनुकरण केले आहे व त्या एकदेशानें देखील प्रकृत सूत्राचे ग्रहण होते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. 'यथासङ्ख्यमित्यस्येष्टत्वात्' असे जर दीक्षितानी मनोरमेंत म्हटले असतें तर शब्दरत्नकाराना वरील पङ्क्ति लिहिण्याची काही गरज पडली नसती )

मनोरमा--ङ्णोः कुक्टुकोः पूर्वान्तत्वात्प्राङ्क्साय इत्यत्र "सात्पदाद्योः" इति षत्वं न। सुगण्ट्साय इत्यत्र "न पदान्तात्" इति ष्टुत्वं न।

पुष्करे तीर्थविशेषे सीदतीति पुष्करसत् तस्यापत्यं पौष्करसादिराचार्यः बाह्वादित्वादिञ्। अनुशतिकादित्वादुभयपदवृद्धिः॥

'ङ्णोः कुक्टुक्शरि' सू. १३० या सूत्रानें होणारे 'कुक्, टुक्' हे आगम पूर्वपदाचे अन्त्यावयव होत असल्यामुळें 'प्राङ्क्साये' या उदाहरणात, 'सात्पदाद्योः' सू. २१२३ हे निषेधक सूत्र असल्यामुळें, षत्व झाले नाही. ('प्राङ्क्साये' या सामासिक पदाचा 'सायात् प्राक्' असा विग्रह आहे. हा अव्ययीभाव समास असून अदन्त असल्यामुळें, 'तृतीयासप्तम्योर्बहुलम्' सू. ६५८ या सूत्रान्वयें 'प्राङ्सायम्' व 'प्राङ्साये' अशी वैकल्पिक रूपें होतात. येथें हे लक्षात ठेवावे की, दिवादिगणात पठित असलेल्या 'षोऽन्तकर्मणि' या धातूतील षकाराचे जागीं 'धात्वादेः षः सः' सू. २२६४ या सूत्रानें सकारादेश होऊन व 'आदेच उपदेशे' सू. २३७० या

या सूत्रानें धातूतील ओकाराचे जागी आकार होऊन 'सा' असा जो आदन्त धातु होतो तो उपसर्गरहित असल्यामुळें, त्याहून 'आतश्चोपसर्गे' सू २८९८ या सूत्रानें होणारा 'क' प्रत्यय न होता व तसेच त्या धातूला कर्मणि उपपद नसल्यामुळें त्याहून 'आतोऽनुपसर्गे कः' सू. २९१५ या सूत्रानें होणारा 'क' प्रत्यय न होता, 'श्याऽऽद्व्यधास्रु' सू. २९०३ या सूत्रानें 'ण=अ' प्रत्यय होतो व हा प्रत्यय णित् असल्यामुळें, 'आतो युक् चिण्कृतोः' सू. २७६१ या सूत्रानें 'सा' या आदन्त धातूला 'युक्=य्' हा आगम होऊन 'साय' असे 'ण' प्रत्ययान्त कृदन्त रूप सिद्ध होतें. 'प्राङ्साये' या उदाहरणात 'प्राङ्' यातील ङकारापुढें 'साय' यातील सकार हा 'शर्' आला असल्यामुळें 'ङ्णोः कुक्टुक् शरि' या प्रकृत सूत्रानें त्याला 'कुक्=क्' हा कित् आगम होतो व 'आद्यन्तौ टकितौ' सू ३६ या सूत्रान्वयें तो आगम समासात असलेल्या 'प्राङ्' या पूर्व पदातील अन्त्य ङकाराच्या अन्ती होऊन 'प्राङ्क्साये' असे रूप होतें आणि 'यदागमाः' – परि. ११ – या परिभाषान्वयें तो आगम ङकाराचा अवयव होऊन 'प्राङ्' या पूर्व पदाचा अन्त्यावयव ठरतो. त्यामुळें 'साये' या उत्तर पदातील सकार हा पदाचा आदि ठरत असल्यामुळें व 'सात्पदाद्योः' हे निषेधक सूत्र असल्यामुळें, 'आदेशप्रत्यययोः' सू २१२ या सूत्रानें प्राप्त होणारे आदेशरूप सकाराचे षत्व होत नाही.) 'सुगण्ट्सायः' या उदाहरणात, 'न पदान्ताट्टो' सू. ११४ हे निषेधक सूत्र असल्यामुळें, ष्टुत्व होत नाही (कारण 'सुगण्' या पूर्व पदातील अन्त्य णकाराला प्रकृत सूत्रानें 'टुक्=ट्' हा कित् आगम होऊन तो आगम वर सांगितल्याप्रमाणे णकाराचा अन्त्यावयव होतो व अशा रीतीनें तो आगमरूप टकार 'सुगण्' या पूर्व पदाच्या अन्ती येत असल्यामुळें, जरी त्याच्यापुढें सकार आला आहे तरी, त्या सकाराचे 'ष्टुना ष्टुः' सू. ११३ या सूत्रानें होणारे ष्टुत्व–षत्व–, 'न पदान्ताट्टोः' हा निषेध असल्यामुळें, होत

नाही.) 'पुष्करे–तीर्थविशेषे–सीदतीति पुष्करसद्, तस्यापत्यं पौष्कर-सादिः' अशी (प्रकृत सूत्रात पठित असलेल्या 'चयो द्वितीयाः शरि पौष्करसादेः' या वार्तिकातील) 'पौष्करसादि' या शब्दाची व्युत्पत्ति आहे या स्थली 'बाह्वादिभ्यश्च' सू. १०९६ या सूत्रानें अपत्यार्थक 'इञ्' प्रत्यय होऊन व 'अनुशतिकादीनां च' सू. १४३८ या सूत्रानें दोन्ही पदांतील आद्य अचाची वृद्धि होऊन 'पौष्करसादिः' हा शब्द सिद्ध झाला आहे.

मनोरमा——ङःसि धुट् "उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्, परत्वात्" इत्यभिप्रेत्याह——सस्येति। सीति सप्तमीनिर्देशस्तु लाघवार्थः। षट्सन्त इति। धुटश्चर्त्वेन तकारः। यत्त्वाहुः——"चयो द्वितीया" इति पक्षे तस्य थ इति तन्न, चर्त्वस्यासिद्धत्वात्। अत एव धुडभावे षट् सन्त इत्यत्र टस्य ठो न। टकारनकारविसर्गाणां द्वित्व-विकल्पात् षोडश। "खयः शर" इति सकारद्वित्वे द्वात्रिंशत्। न च तत्र चर्त्वस्यासिद्धत्वं शङ्क्यम्। "पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे" इत्युक्तेः। न च "शरोऽचि" इति द्वित्वनिषेधः शङ्क्यः, तस्य सौत्रद्वित्वमात्र-विषयत्वात्। अत एव "शरः खयः" इति वार्तिकस्य वत्सः अप्सराः इत्युदाहरणं भाष्ये स्थितम्। धुटः परादित्वं "न पदान्तात्—" इति ष्टुत्वनिषेधार्थम्। अत एव वक्ष्यमाणस्तुगिहेव न कृतः। यत्त्वाहुः——एवमपि प्रक्रियालाघवाय तुडेव कर्तुमुचित इति तन्न। "चयो द्वितीया" इति पक्षे थकारापत्तेः॥ "श्चुत्वं धुटि सिद्धं वाच्यम्" अट्तीश्चट् श्चोतति। इह धुड् न॥

('तस्मादित्युत्तरस्य' हे सूत्र 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' या सूत्राच्या मानानें) परसूत्र असल्यामुळें, 'उभयनिर्देशे पञ्चमी-निर्देशो बलीयान्'–परि. ७१– ही परिभाषा सिद्ध होते व हा आशय मनात धरूनच ('ङःसि धुट्' या सूत्रातील 'सि' या सप्तम्यन्त पदाचा कौमुदीत) 'सस्य' असा अर्थ केला आहे. प्रकृत सूत्रात 'सि' असा जो निर्देश केला आहे तो लाघवाकरितां–मात्रा

कमी होण्याकरिता–केला आहे. ('ङः सि धुट्' या प्रकृत सूत्रात 'सि' हा सप्तमीनिर्देश असल्यामुळें 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' सू ४० ही परिभाषा उपस्थित होते व ती परिभाषा प्रकृत सूत्राचे ठिकाणीं प्रवृत्त केल्यास, 'सकारे परे सति ङकारस्य धुट् स्यात्' असा या सूत्राचा अनिष्ट अर्थ होण्याची आपत्ति यते. परंतु या सूत्रात 'ङ.' असा पञ्चमीनिर्देश देखील असल्यामुळें 'तस्मादित्युत्तरस्य' सू ४१ ही परिभाषा देखील उपस्थित होते व ही परिभाषा 'तस्मिन्निति निर्दिष्टे' या सूत्राच्या मानानें पर असल्यामुळें, 'पूर्वात्पर बलवत्' या न्यायान्वयें ही पर परिभाषा 'तस्मिन्निति निर्दिष्टे' या पूर्व परिभाषेचा बाध करून स्वत. प्रवृत्त होते व त्यामुळें प्रकृत सूत्रातील 'सि' हा सप्तमीनिर्देश षष्ठ्यर्थाचा वाचक होतो व त्यामुळें 'ङात्परस्य सस्य धुट् स्यात्' असा प्रकृत सूत्राचा इष्ट अर्थ निष्पन्न होतो आणि अशा रीतीनें 'सि' ह सप्तम्यन्त पद 'सस्य' या षष्ठ्यर्थाचे वाचक होते या व्याख्यानावरून हे स्पष्ट होते की, जेथें सूत्रात पञ्चमी व सप्तमी या दोन्ही विभक्तीचा निर्देश करून कार्य होणे सांगितले आहे तेथें 'उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्' या परिभाषान्वयें पञ्चमीनिर्देश बलवान् ठरत असल्यामुळे, सप्तम्यन्त पदाचा षष्ठीत विपरिणाम होतो प्रकृत सूत्रात वास्तविक 'सस्य' असा षष्ठीनिर्देश करावयास पाहिजे होता. पण असे षष्ठ्यन्त पद सूत्रात निर्दिष्ट असते तर अधिक मात्रा झाल्या असत्या व म्हणून 'अर्धमात्रालाघवेन'–परि १३३–ही परिभाषा असल्यामुळें, पाणिनीनें प्रकृत सूत्रात कमी मात्राचा 'सि' असा सप्तमीनिर्देश केला असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे) 'षट्त्सन्त' या (प्रकृत सूत्रावरील कौमुदीत दिलेल्या) उदाहरणात 'धुट् = ध्'चा ('खरि च' सू. १२१ या सूत्रानें) तकार झाला आहे (व त्यामुळें 'खरि च' या सूत्रानेंच 'षड्' यातील डकाराचा टकार होऊन 'षट्त्सन्त' असे रूप सिद्ध झाले आहे. वरील उदाहरणात धकाराचा 'खरि च' या सूत्रानें तकार केल्यावर) 'चयो द्वितीयाः शरि' या वार्तिकान्वयें त्या

तकाराचा थकार होतो असे जें प्रकाशकारानीं म्हटले आहे ते बरोबर नाही, कारण ('नादिन्याक्रोशे पुत्रस्य' या पूर्व त्रैपादिक सूत्रात पठित असलेल्या वरील वार्तिकाच्या दृष्टीनें 'खरि च' हें त्रैपादिक परसूत्र असिद्ध ठरत असल्यामुळें, त्या परसूत्रानें झालेल्या धकाराचा) तकार असिद्ध ठरतो (व तो तकार धकारच आहे असे मानावे लागत असल्यामुळें व धकार हा 'चय्' नसल्यामुळें, 'चयो द्वितीयाः' हे वार्तिक वरील उदाहरणात प्रवृत्त होऊ शकत नाहीं) असे आहे म्हणूनच, 'षड् सन्त.' या स्थलीं जेव्हा सकाराला विकल्पेंकरून होणारा धुट् आगम केला जात नाही तेव्हा ('खरि च' या सूत्रानें 'षड्' यातील डकाराचा टकार केल्यावर त्या) टकाराचा ठकार होत नाही, (कारण वर सांगितल्याप्रमाणे 'खरि च' या त्रैपादिक परसूत्रानें जो डकाराचा टकार झाला आहे तो 'चयो द्वितीया.' या वार्तिकाच्या दृष्टीने असिद्ध ठरतो व तो टकार डकारच आहे असे मानावे लागत असल्यामुळें आणि डकार हा 'चय्' नसल्यामुळें, त्याला 'चयो द्वितीया.' हे वार्तिक लागूच पडत नाही. वरील उदाहरणातील 'षट्' यातील) टकार (व 'सन्तः' यातील) नकार व विसर्ग याचे ('अनचि च' सू. ४८ या सूत्रानें) विकल्पेंकरून द्वित्व केल्यास, (धुडागम होणे वैकल्पिक असल्यामुळें) सोळा रूपें सिद्ध होतात. (प्रकृत सूत्रानें होणारा धुट् आगम विकल्पेंकरून होत असल्यामुळें धुडभावपक्षात 'षट्सन्तः' असे रूप होते. या रूपातील टकार, नकार व विसर्ग यापैकी कशाचेहि द्वित्व न केल्यास, 'षट्सन्तः' असेच प्रथम रूप होते. केवळ टकाराचे द्वित्व केल्यास 'षट्ट्सन्तः' असे द्वितीय रूप होते. केवळ नकाराचे द्वित्व केल्यास, 'षट्सन्न्त.' असे तृतीय रूप होते, आणि केवळ विसर्गांचे द्वित्व केल्यास 'षट्सन्तःः' असे चवथें रूप होते. टकार, नकार व विसर्ग यांपैकीं पहिल्या दोनचे द्वित्व केल्यास, 'षट्ट्सन्न्त.' असे पांचवे रूप होते, व नकार आणि विसर्ग याचे द्वित्व केल्यास, 'षट्सन्न्तःः' असें सहावें रूप होतें आणि नकाराचे द्वित्व न करितां केवळ टकार

व विसर्ग या दोहोंचेच द्वित्व केल्यास 'पट्ट्सन्तः:' असे सातवे रूप सिद्ध होतें तीहींचेहि द्वित्व केल्यास 'पट्ट्सन्न्तः.' असे आठवे रूप होतें. अशा रीतीनें धुडभावपक्षात एकदर आठ रूपें सिद्ध होतात. धुडागमपक्षात वर सागितल्याप्रमाणें 'पट्त्सन्त' असे जें रूप होते त्या रूपातील टकार, नकार व विसर्ग याचे विकल्पेंकरून द्वित्व केल्यानें वर प्रमाणेंच आठ रूपें होतात. फरक एवढाच की, या आठहि रूपात टकार व सकार या दोहोमध्यें तकार हा एक अधिक वर्ण येतो अशा रीतीनें धुडागमपक्षात व धुडभावपक्षात एकदर सोळा रूपें होतात. येथें हें लक्षात ठेवावे की, भाष्यकारानीं अक्षरसमाम्नायात अयोगवाहाचा 'अ' पुढें व 'शर्' मध्यें पाठ मानला असल्यामुळें विसर्ग हा अयोगवाह 'यर्' ठरतो व वरील उदाहरणात तो 'सन्त' यातील अन्त्य 'अ' या अच्पुढें असल्यामुळें, 'अनचि च' सू ४८ या सूत्राने त्याचे विकल्पेंकरून द्वित्व होते धुडागमपक्षात 'धुट् = ध्' चा 'खरि च' या सूत्रानें जो तकार होतो तो जरी 'यर्' आहे व वरील उदाहरणात त्याच्या पुढे अच् नाही तरी, तो अचापुढें नसून टकार या हल्पुढें असल्यामुळें, 'अनचि च' हे द्वित्व विधायक सूत्र त्याला लागू पडत नाही वर जी सोळा रूपें सिद्ध करून दाखविली आहेत त्यातील) सकाराचे 'खय शरः' या वार्तिकानें विकल्पेंकरून द्वित्व केल्यास (वरील सोळा रूपातील प्रत्येकाचे सकाराच्या द्वित्वामुळें एक अधिक रूप होऊन व अशा रीतीनें सोळा अधिक रूपें होऊन एकदर) बत्तीस रूपें सिद्ध होतात. ('अनचि च' सू ८४.४७ या सूत्रावरील भाष्यात 'शर खयः' असे वार्तिक भाष्यकारानीं पठित केले आहे परतु 'शर इति पञ्चमी खय इति षष्ठी' व 'खय इति पञ्चमी शर इति षष्ठी' असे त्या वार्तिकाचे भाष्यकारानीं दोन तन्हेनें व्याख्यान केले असल्यामुळें व वरील उदाहरणात 'त्' या 'खय्' पुढें असलेल्या सकार या 'शर्'चे द्वित्व करणे असल्यामुळें, दीक्षितानी त्या वार्तिकाचा मनोरमेंत 'खयः शरः' असा पाठ केला आहे. सकाराचे द्वित्व करतेवेळी

'खरि च' या त्रैपादिक पर सूत्रानें जें पूर्व वर्णाचे चर्त्व केले जातें ते 'अनचि च' या त्रैपादिक पूर्व सूत्रावर पठित असलेल्या 'शरः खय.' या वार्तिकाच्या दृष्टीनें) असिद्ध ठरते अशी शंका करणे योग्य नाही, कारण 'पूर्वत्रासिद्धीयमद्वित्वे' – परि – १२६ – अशी परिभाषा आहे (या परिभाषेचा असा अर्थ आहे की, द्वित्वकार्य खेरीज करून इतर त्रैपादिक कार्य करतेवेळीं 'पूर्वत्रासिद्धम्' हे सूत्र लागू पडते, पण त्रैपादिक द्वित्वकार्य करतेवेळी ते सूत्र लागू पडत नाही. म्हणून प्रकृत स्थलीं सकाराचे द्वित्व करणे असल्यामुळें, 'खरि च' या पर त्रैपादिक सूत्रानें 'ध्' या पूर्व वर्णाचे झालेले चर्त्व 'शरः खय·' या वार्तिकाच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नाही व त्यामुळें 'त्' या 'खय्' पुढें सकार हा 'शर्' आहे असे मानता येत ' असल्यामुळें, त्या वार्तिकानें सकाराचे द्वित्व होण्यात काही प्रत्यवाय येत नाही.) 'शरोऽचि' सू ३४० हे निषेधक सूत्र असल्यामुळें (व 'सन्त.' यातील सकारापुढें 'अ' हा अच् असल्यामुळें) सका· राचे) द्वित्व होऊ शकत नाही अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाही, कारण पाणिनीय सूत्रानी प्राप्त होणाऱ्या द्वित्वालाच ते निषेधक सूत्र लागू पडते. असे आहे म्हणूनच, भाष्यात 'शर खय.' या वार्तिकाची 'वत्स्सः, अप्स्सराः' ही उदाहरणे दिली आहेत (या दोन्ही उदाहरणात सकारापुढें 'अ' हा अच् असून देखील भाष्यकारानी त्या सकाराचे वरील वार्तिकान्वयें द्वित्व केले आहे· या भाष्यावरून हें सिद्ध होतें की, 'शरोऽचि' हा निषेध 'खयः शर.' या वार्तिकानें द्वित्व करतेवेळी लागू पडत नाहीं. 'धुक्' असा कित् आगम प्रकृत सूत्रात पठित न करिता, 'धुट्' असा जो टित् आगम पठित केला आहे व अशा रीतीनें) तो 'धुट्' आगम उत्तरपदाचा आद्यवयव होणें सांगितले आहे त्याचे कारण हे की, 'न पदान्ताट्टो ' सू. ११४ हें ष्टुत्वनिषेधक सूत्र त्याला लागू पडावें. ('धुक्' असा कित् आगम पठित केला असता तर, 'आद्यन्तौ टकितौ' सू. ३६ या सूत्रान्वयें तो आगम उत्तर पदाचा आद्यवयव न होतां पूर्व पदाचा

अन्त्यावयव झाला असता व 'षड् ष् सन्तः' या स्थली षकार हा पदान्तीं असणाऱ्या 'ड्' या टवर्गातील वर्णापुढें आहे असे मानले न जाता, तो षकार पदान्ती आहे असे मानले गेले असते व त्यामुळें 'ष्टुना ष्टुः' सू. ११३ या सूत्रानें त्या षकाराचे टुत्व झाले असते आणि 'न पदान्ताट्टोः' सू. ११४ हा निषेध त्याला लागू पडला नसता. परतु 'धुट्' असा टित् आगम केला असल्यामुळे, तो आगम उत्तर पदाचा आद्यवयव होतो व तो तवर्गातील धकार पदान्ती असलेल्या टवर्गातील 'ड्' पुढें अशा रीतीनें येत असल्यामुळें, 'न पदान्ताट्टोः' हा निषेध त्याला लागू पडतो व त्यामुळें त्या धकाराचे टुत्व न होता 'खरि च' या सूत्रानें त्याचा तकार होऊन आणि नंतर 'षड्' यातील डकाराचा त्याच सूत्रानें टकार होऊन 'षट् त् सन्तः' असे इष्ट रूप सिद्ध होते ) म्हणूनच पुढील सूत्रात – 'शि तुक्' सू. १३३ या सूत्रात – जो 'तुक्' आगम पठित केला आहे तो प्रकृत सूत्रातच पठित केला नाही. (प्रकृत सूत्रात 'तुक्' आगम पठित केला असता तर, तो 'षड्' या पूर्व पदातील डकाराचा अन्त्यावयव झाला असता व तो आगमरूप 'तुक् = त्' पदान्ती आहे व पदान्तापुढें नाही असे मानावे लागले असते आणि त्यामुळें 'न पदान्ताट्टोः' हा निषेध त्याला लागू पडला नसता व त्याचे टुत्व होण्याची आपत्ति आली असती ती आपत्ति टाळण्याकरिता प्रकृत सूत्रात 'धुट्' आगम होण्याचे विधान केले आहे.) हें जरी खरे आहे तरी प्रक्रिया कमी व्हावी, म्हणजे 'खरि च' हे सूत्र प्रवृत्त करण्याची गरज न पडावी, याकरिता प्रकृत सूत्रात 'तुट्' आगम होण्याचे विधान करणे उचित झाले असते असे जें प्रकाशकाराचे म्हणणे आहे ते बरोबर नाही, कारण 'तुट्' आगमाचे विधान केले असते तर, 'चयो द्वितीया ' या वार्तिकानें त्या आगमरूप तकाराचा विकल्पेंकरून थकार होण्याची आपत्ति आली असती. (प्रकृत सूत्रात 'तुट् = त्' असा आगम होण्याचे विधान केले असते तरी तो आगम टित्वामुळें उत्तरपदाचा आद्यवयव झालाच

असता व 'घुट् = घ्' आगम पठित केल्यानें त्याचे चर्त्व होण्याकरिता 'खरि च' सू. १२१ हे सूत्र प्रवृत्त करण्याची जी गरज पडते ती, 'तुट् = त्' हा स्वत.सिद्ध 'चर्' असल्यामुळें, पडली नसती व अशा रीतीनें प्रक्रियालाघव झाले असते आणि म्हणून 'डः सि तुट्' असे प्रकृत सूत्र पठित करणे अधिक योग्य झाले असते असे प्रकाशकाराचे म्हणणे आहे. यावर दीक्षित असे उत्तर देतात की, प्रकृत सूत्र अशा रीतीनें पठित केले असते तर, हे सूत्र त्रैपादिक पूर्व सूत्र असल्यामुळें, 'नादिन्याक्रोशे पुत्रस्य' या त्रैपादिक परसूत्रात पठित असलेल्या 'चयो द्वितीयाः' या वार्तिकाच्या दृष्टीनें 'तुट् = त्' आगम सिद्ध ठरला असता व त्यामुळें त्याला 'चयो द्वितीया·' हे वार्तिक लागू पडले असते आणि त्याचा विकल्पेंकरून थकार होण्याची आपत्ति आली असती. पण 'घुट् = घ्' असा आगम प्रकृत सूत्रात पठित केला असल्यामुळें व धकार 'चय्' नसल्यामुळें, त्याला 'चयो द्वितीयाः' हे वार्तिक लागू पडत नाहीं आणि 'खरि च' या सूत्रानें त्याचा तकार झाल्यावर तो तकार 'चयो द्वितीयाः' या वार्तिकाच्या दृष्टीनें पूर्वी सांगितल्याप्रमाणे असिद्ध ठरत असल्यामुळें, त्याचे जागी विकल्पेंकरून थकार होण्याची आपत्ति टळते. म्हणून प्रकृत सूत्रात 'तुट्' असा आगम पठित न करिता 'घुट्' असा जो आगम पठित केला आहे तसाच आगम पठित करणे योग्य होते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'श्चुत्वं धुटि सिद्धं वाच्यम्', म्हणजे 'धुट्' आगमाच्या दृष्टीनें श्चुत्व सिद्ध समजावे, असे वार्तिक असल्यामुळें, 'अटतीत्यट् श्चोतति' या उदाहरणात 'धुट्' आगम होत नाहीं. ('अटतीति अट्' या स्थलीं 'अट्' धातूहून 'क्विप्' प्रत्यय केला असता 'अट्' असे जें क्विबन्त प्रातिपदिक होते त्याहून प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' प्रत्यय केल्यास, त्या प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्य·' सू. २५२ या सूत्रानें जरी लोप होतो तरी 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'अट्' याला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होते व त्यामुळें

'झलां जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें त्या पदातील अन्त्य टकाराचा डकार झाल्यावर 'अड् श्चोतति' अशी स्थिति होते. येथें जरी 'अड्' यातील डकारापुढें शकार दिसतो तरी तो वास्तविक मूळचा सकार आहे; कारण 'श्चुतिर् क्षरणे' हा धातु सकारानें सुरू होणारा असून त्या सकाराचे 'स्तोः श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रानें शत्व झाले आहे. परंतु हे शत्व त्रैपादिक पर सूत्रानें झाले असल्यामुळें, 'डः सि धुट्' या प्रकृत त्रैपादिक पूर्व सूत्रानें 'धुट्' आगम करतेवेळी ते शत्व 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें असिद्ध ठरते व ते असिद्ध मानल्यास आणि शकार हा सकारच आहे असे मानल्यास, 'अड्' यातील डकारापुढें असलेल्या त्या असिद्ध शकारास, म्हणजे सकारास, 'धुट्' आगम होण्याची आपत्ति येते ही आपत्ति टळावी याकरिता वरील वार्तिक केले आहे व हे वार्तिक असल्यामुळें, सकाराचे जागी श्चुत्वानें झालेला शकार 'धुट्' आगम करतेवेळी सिद्ध ठरतो, आणि अशा रीतीनें 'अड् श्चोतति' या उदाहरणात डकारापुढें सकार नसून शकारच आहे असे मानावें लागत असल्यामुळें 'डः सि धुट्' हे सूत्र या स्थली प्रवृत्त होऊ शकत नाहीं व शकारास 'धुट्' आगम होत नाही आणि 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें 'अड्' यातील डकाराचा टकार होऊन 'अट् श्चोतति' असा प्रयोग सिद्ध होतो.)

शब्दरत्न – परत्वादिति । "तस्मिन्" इति सूत्रापेक्षया "तस्मात्–" इत्यस्य परत्वादित्यर्थः । डकारात्सकारे धुडित्यर्थे "तस्मिन्–" इत्यस्य प्रवृत्तावुपस्थितडकारस्यागमित्वं "तस्मात्–" इत्यस्य प्रवृत्तावुपस्थितसस्य तत्त्वमित्यसम्भवरूपविरोधे परत्वेन व्यवस्थेति सस्यागमित्वनिर्णय इति भावः । स्पष्टं चेदं "तस्मिन्" इति सूत्रे भाष्ये । लाघवार्थं इति । षष्ठ्याः प्रयोग एव कर्त्तव्ये इत्यर्थः । चर्त्वस्यासिद्धत्वादिति । अत एव तुडिति नोक्तम् । अत एव–चर्त्वस्यासिद्धत्वादेव । ननु "धुक् डः सि" इत्यस्तु सप्तमी च यथाश्रुतैव, ड इति च षष्ठ्यन्तं, परमार्थतो वाक्यशक्त्यङ्गीकारेण पूर्वान्तत्वे परादित्वे वा न शक्ततावच्छेदकभेदोऽत आह –– धुटः

परादित्वमिति । श्चोततिरुपदेशे सादिः । श्चुत्वस्य धुटि सिद्धत्वेऽपि तुक्यसिद्धत्वात्सन् श्चोततीत्यत्र तुगेति बोध्यम् ।

('ङः सि धुट्' या प्रकृत सूत्रात 'ङः' हा पञ्चमीनिर्देश पूर्व असून 'सि' हा सप्तमीनिर्देश पर असल्यामुळें, परत्वामुळें पञ्चमीनिर्देश बलवत्तर ठरतो असे दीक्षितानी मनोरमेंत कसे म्हटले आहे अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की,) 'तस्मिन्निति निर्दिष्टे' सू ४० या सूत्राच्या मानानें 'तस्मादित्युत्तरस्य' सू ४१ हे पर सूत्र असल्यामुळें, प्रकृत सूत्रातील पञ्चमीनिर्देश बलवत्तर ठरतो असा मनोरमेंतील 'परत्वात्' या पदाचा अर्थ आहे (व शंकाकारानें त्या पदाचा जसा अर्थ केला आहे तसा अर्थ नाही व त्यामुळें शंकाकाराची शंका अनुपपन्न ठरते) 'तस्मिन्निति निर्दिष्टे' हे सूत्र प्रकृत सूत्राचे ठिकाणी प्रवृत्त केल्यास, ङकारापुढें सकार आला असता त्या ङकाराला 'धुट्' आगम होतो असा प्रकृत सूत्राचा अर्थ होऊन ङकार हा आगमी ठरतो. म्हणजे ङकार हा धुडागमाचा कार्यी ठरून त्याला तो आगम व्हावा असा अर्थ निष्पन्न होतो 'तस्मादित्युत्तरस्य' हे सूत्र प्रकृत सूत्राचे ठिकाणी प्रवृत्त केल्यास, उत्तर पदाचा आद्य वर्ण सकार आगमी ठरतो. (अशा रीतीनें 'तस्मिन्निति निर्दिष्टे' ही पूर्व परिभाषा प्रकृत सूत्रात प्रवृत्त केल्यानें सकार हा निमित्त ठरत असून 'तस्मादित्युत्तरस्य' ही उत्तर परिभाषा प्रकृत सूत्रात प्रवृत्त केल्यानें तो सकार आगमी – कार्यी – ठरतो व) एकाचेच ठिकाणी कार्यित्व व निमित्तत्व हे दोन परस्परविरुद्ध धर्म एकेच वेळीं राहणें असंभवनीय असल्यामुळें, 'तस्मादित्युत्तरस्य' या परसूत्रान्वयें व्यवस्था लावली जाते व त्यामुळें सकार हा आगमी ठरतो असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. 'तस्मिन्निति निर्दिष्टे' १.१.६६ या सूत्रावरील भाष्यावरून हे स्पष्ट होते. (त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात.–'अथ यत्रोभयं निर्दिश्यते किं तत्र पूर्वस्य कार्यं भवत्याहोस्वित्परस्येति । ... उभयनिर्देशे विप्रतिषेधात् पञ्चमी-

निर्देशो–बलीयान्–भविष्यति ।') मनोरमेंत 'लाघवार्थः' असे जें म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, षष्ठी विभक्तीचाच प्रयोग कर्तव्य असून, जो 'सि' असा सप्तमीविभक्तीचा प्रयोग केला आहे तसा प्रयोग करण्यात लाघव आहे. ('स.' असा षष्ठी-विभक्तीचा प्रयोग केला असता तर दोन मात्रा झाल्या असत्या. पण 'सि' असा सप्तमीविभक्तीचा प्रयोग केल्यानें केवळ दीड मात्रा होते व अशा रीतीनें सप्तमीचा प्रयोग करण्यात अर्धमात्रालाघव झाले आहे, व 'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सव मन्यन्ते वैयाकरणाः'–प १३३–या परिभाषान्वयें 'सि' असा लाघवार्थ प्रयोग केला आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे असे शब्दरत्नकार म्हणतात ) 'चर्त्वस्यासिद्धत्वात्' असा जो हेतु मनोरमेंत दिला आहे तो बरोबर असल्यामुळेंच, प्रकृत सूत्रात 'तुट्' आगमाचे विधान केले नाही. ('ड सि तुट्' असे सूत्र केले असते तर, त्या त्रैपादिक पूर्वसूत्रानें झालेला 'तुट्' आगम, 'नादिन्याक्रोशे पुत्रस्य' या त्रैपादिक परसूत्रात पठित असलेल्या 'चयो द्वितीया' या वार्तिकाच्या दृष्टीनें, सिद्ध ठरला असता व त्या तकाराचा विकल्पेंकरून थकार होण्याची आपत्ति आली असती ) 'अत एव धुड्भावे' या मनोरमेच्या पङ्क्ती-तील 'अत एव' या पदाचा 'चर्त्वस्यासिद्धत्वादेव' असा अर्थ आहे. प्रकृत सूत्रात असलेला 'सि' हा सप्तम्यन्त निर्देश जसाचा तसाच कायम ठेऊन व 'ड' हा षष्ठ्यन्त निर्देश मानून प्रकृत सूत्राऐवजी 'धुक् ड सि' असे सूत्र पठित केले आणि वाक्याचा अर्थबोध करणारी जी वास्तविक वाक्यशक्ति मानली आहे तिचा आश्रय केला तर, आगम पूर्वपदाचा अन्त्यावयव केला किंवा उत्तरपदाचा आद्यवयव केला तरी, शक्त, म्हणजे वाक्याच्या अर्थाचा बोध करून देण्यास समर्थ असलेले जें वाक्य, त्याच्या अवच्छेदकात–विशिष्ट वर्णानुपूर्वीत–काही फरक पडत नाही अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर मनोरमेंत 'धुट. परादित्वे न पदान्तात् इति ष्टुत्वनिषेधार्थम्' असे उत्तर दिले आहे. (शंकाकार असे म्हणतो की, प्रकृत सूत्रातील 'डः'

हा पञ्चमीनिर्देश मानल्यास, या सूत्रात 'सि' हा सप्तमीनिर्देश देखील असल्यामुळें ङकार हा आगमी आहे किंवा सकार हा आगमी आहे असा सन्देह उत्पन्न होतो. तसा सन्देह उत्पन्न न व्हावा याकरिता प्रकृत सूत्रातील 'ङ.' हे पद पञ्चम्यन्त न मानता षष्ठ्यन्त मानावें व 'सि' हा सप्तम्यन्त निर्देश जसाचा तसाच कायम ठेवावा व 'धुक् ङ सि' असें प्रकृत सूत्राएवजी सूत्र पठित करावे तसें सूत्र पठित केलें असता, सूत्रात युगपत् पञ्चमीनिर्देश व सप्तमीनिर्देश असल्यानें जो सन्देह उत्पन्न होतो त्याचा निरास होतो आणि 'धुक्' या विधेयांशाच्या सन्निध — लगेच पुढें — 'ङ.' हें षष्ठ्यन्त पद घातले असून त्याच्या नन्तर 'सि' हे पद घातले असल्यामुळें, ङकार हाच आगमी आहे असा निश्चित बोध होतो. 'धुट्' असा टित् आगम पठित केल्यास तो ङकाराच्या पूर्वी होईल व त्यामुळें इष्ट रूपाची सिद्धि होणार नाहीं. म्हणून इष्ट रूपाची सिद्धि होण्या-करिता 'धुट्' च्या ऐवजी 'धुक्' असा कित् आगम पठित करणे इष्ट आहे. तसा कित् आगम पठित केल्यानें तो ङकारापुढें होतो व त्यामुळें इष्ट रूपाची सिद्धि होण्यात काहीं अडचण येत नाहीं. यावर अशी प्रतिशंका करण्यात येते की, ङकारास 'धुक्' आगम केल्यास, 'षड्ध्' असें 'सहा' या सङ्ख्येचा बोध करून देऊं न शकणारे पूर्व पद होईल व 'सन्त' हें उत्तर पद होईल, व 'धुट्' आगम केल्यास, तो उत्तर पदाचा आद्यवयव होऊन 'ध् सन्त' असें उत्तर पद होईल आणि 'षड्' असें पूर्व पद होईल व अशा रीतीनें धुगागमपक्षात व धुडागमपक्षात 'षड् सन्त.' या वाक्यातील दोन पदाच्या वर्णानुपूर्वीत फरक पडेल व सारखाच अर्थबोध न होण्याची आपत्ति येईल. या प्रतिशङ्केवर शङ्काकार असें उत्तर देतो कीं, ङकारास 'धुक्' आगम केला किंवा सकारास 'धुट्' आगम केला तरी, दोन्ही पक्षात निष्पन्न होणाऱ्या वाक्याच्या वर्णानुपूर्वीत फरक न पडता 'षड् ध् सन्त.' असें एकच प्रकारचे वाक्य तयार होतें आणि वाक्याच्या अर्थाचा बोध त्या वाक्यातील पदाच्या अभिधायकतेनें

होत नसून स्वतन्त्र वाक्यशक्तीनें वाक्यार्थाचा बोध होतो असा जो सिद्धान्तपक्ष आहे तो मानल्यानें, दोन्ही पक्षात अखेरीस निष्पन्न होणाऱ्या सारख्याच वर्णानुपूर्वीविशिष्ट वाक्यापासून सारखाच इष्टार्थबोध होऊ शकतो म्हणून सन्देहनिवृत्ति होण्याकरिता 'धुक् ड सि' असेच प्रकृत सूत्राऐवजी सूत्र पठित करणे योग्य आहे असे शकाकाराच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे. वास्तविक 'उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्' ही परिभाषा भाष्यकारानी मानली असल्यामुळें यथापठित प्रकृत सूत्राच्या विषयात सन्देह मुळीच उत्पन्न होत नाही व सकार हाच आगमी ठरतो आणि या खेरीज शब्दरत्न-कार असे म्हणतात की, शकाकाराच्या म्हणण्याप्रमाणे डकारास 'धुक्' आगम केल्यानें कोणता दोष उत्पन्न होतो हे सागण्याच्या हेतूनेंच दीक्षितानीं मनोरमेंत 'धुट परादित्व न पदान्तात् इति ष्टुत्वनिषेधार्थम्' असे म्हटले आहे व त्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे की, 'षड् सन्त' या वाक्यातील 'षड्' या पूर्व पदाच्या अन्त्य डकाराला 'धुक्' आगम केल्यास 'यदागमा'–परि ११–या परि-भाषान्वयें 'षड्ध्' असे पूर्व पद होईल व या पदाच्या अन्ती टवर्गातील वर्ण येत नसून तवर्गातील वर्ण येत असल्यामुळें, 'न पदान्ताट्टो' सू ११४ हा निषेध या स्थली लागू पडणार नाही व 'ष्टुना ष्टु' सू ११३ या सूत्रानें टवर्गातील डकारापुढें असलेल्या तवर्गातील धकाराचे ष्टुत्व–ढकार–होईल व नतर 'खरि च' या सूत्रानें त्या ढकाराचा टकार होईल व नतर त्याच्या पूर्वी असलेल्या डकाराचाहि त्याच सूत्रानें टकार होऊन टकारद्वययुक्त विकृत रूप होण्याची आपत्ति येईल, म्हणजे 'षट्ट् सन्त' असे अनिष्ट रूप होईल पण 'धुट्' आगम केल्यास 'षड्' हे पूर्व पद जसेचे तसेच कायम राहत असून 'ध् सन्त' असे उत्तर पद होते व 'षड्' या पूर्व पदात टवर्गातील डकार अन्ती येत असल्यामुळें, 'न पदान्ताट्टोः' हा निषेध या स्थितीत लागू पडतो व त्यामुळें धकाराचे ष्टुत्व न होता 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें त्या धकाराचा तकार होऊन

आणि नतर त्याच सूत्रानें पूर्व डकाराचा टकार होऊन 'षट् त्सन्तः' असे इष्ट रूप सिद्ध होते. साराश 'धुक्' आगम किंवा 'धुट्' आगम केला तरी 'षड् सन्तः' या वाक्याच्या वर्णानुपूर्वीत काही फरक होत नाही असे जें शंकाकाराचे म्हणणे आहे ते चूक ठरते; कारण 'धुक्' आगम केल्यास 'षट्ट् सन्त.' अशी वाक्याची वर्णानुपूर्वी होत असून, 'धुट्' आगम केल्यानें 'षट् त्सन्तः' अशी वाक्याची भिन्न वर्णानुपूर्वी होते आणि 'धुक्' आगम केल्यानें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येत असल्यामुळें, पाणिनीनें जें 'धुट्' आगम होण्याचे विधान केले आहे तेच विधान योग्य ठरते असे शब्दरत्नकाराचे म्हणणे आहे.) 'श्चुत्' हा धातु उपदेशात – धातुपाठात – सकारादि आहे (व सकाराचे 'स्तो' श्चुना श्चु ' सू १११ या सूत्रानें शत्व झाले आहे हे पूर्वी मनोरमेच्या विवरणात सागितलेच आहे, आणि या विपर्यासबधाची 'नकारजावनुस्वारपञ्चमौ झलि धातुषु । सकारजः शकारश्चेर्षाट्टवर्गस्तवगज. ॥' ही कारिका 'भूवादयो धातव·' सू १८ या सूत्रावरील शब्दरत्नात दिली असून तिचे विवरण तेथें केलेच आहे. 'श्चुत्व धुटि सिद्ध वाच्यम्' या वार्तिकान्वयें) 'धुट्' आगम करतेवेळी जरी श्चुत्व सिद्ध ठरते तरी, 'तुक्' आगम करतेवेळी श्चुत्व असिद्ध ठरत असल्यामुळें, 'सन् श्चोतति' या स्थली ('सन्' यातील अन्त्य नकारास) तुगागम होत नाही हे लक्षात ठेवावे. (कारण 'स्तो. श्चुना श्चु ' या त्रैपादिक पर सूत्रानें झालेला सकाराचा शकार तुक् आगमाचे विधान करणाऱ्या 'शि तुक्' सू १३३ या त्रैपादिक पूर्व सूत्राच्या दृष्टीने, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें, असिद्ध ठरत असल्यामुळें आणि शकार झालाच नाही व सकारच कायम आहे असे मानावे लागत असल्यामुळें, म्हणजे 'सन्' या पदातील अन्त्य नकारापुढे शकार नसून सकारच आहे असे मानणे भाग पडत असल्यामुळें, 'शि तुक्' या सूत्राने होणारा तुगागम 'सन्' यातील नकाराला होत नाही )

मनोरमा— शि तुक् । शीति सप्तमी पूर्वत्र कृतार्थायाः "नः" इति पञ्चम्याः षष्ठीं कल्पयतीत्याह— नस्येति। ननु प्रकृतो धुडेवास्तु किं तुका । मैवम् । "शश्छोऽटि" इत्यस्य हि पदान्ताज्झयः परस्य शस्य छ इत्यर्थ आकारे स्थितः। एवं च धुटः परादित्वात् सञ्च्छम्भुरित्यत्र च्छो न स्यात् । विपूर्वाद्विपेरौणादिके शप्रत्यये "मघवञ्चोतन्त्य भितो विरप्शम्" इत्यादौ यथा । अतः पूर्वान्तस्तुक् कृतः । नन्वेवं कुर्वञ्च्छेते इत्यत्र "पदान्तस्य" इति णत्वनिषेधो न स्यादिति चेन्न, कार्यकालपक्षे बहिरङ्गत्वेन तुकोऽसिद्धत्वात् । यथोद्देशपक्षे "स्तोः श्चुना" इति योगो विभज्यते "न" इति वर्तते "णः" इति च। स्तोः श्चुना योगे णत्वं न स्यात् । नकारार्थमिदम् । सकारग्रहणं वर्गग्रहणं चोत्तरार्थम् । ततः "श्चुः" इति पूर्वमनुवर्तते । एवं "नश्च" इति सूत्रे कुर्वन्त्सीदतीत्यत्र "पदान्तस्य" इति णत्वप्रतिषेधो धुटः परादित्वे प्रयोजनमिति प्राचां ग्रन्थोऽपि यथोद्देशपक्षे बोध्यः। यत्तु वदन्ति । इदं प्रयोजनं बहिरङ्गपरिभाषया गतार्थत्वात्प्रत्युक्तमिति । तत्पाक्षिकम् । त्रिपादीस्थेऽन्तरङ्गे बहिरङ्गपरिभाषेयं न प्रवर्तते इति सुद्ध्युपास्य इत्युदाहरणे स्वोक्त्या सह विरुद्धं चेत्यास्तां तावत् । सञ्च्छम्भुरिति । इह श्चुत्वतुकोरसिद्धतामाश्रित्य "नश्छवि-" इति रुत्वं न शङ्क्यम् । छत्वस्यासिद्धत्वात् ॥

('नश्च' सू. १३२ या सूत्रात 'न' ही पञ्चमी असल्यामुळे व त्या सूत्रात 'ड सि धुट्' या पूर्व सूत्रातून 'सि धुट्' ही पदें अनुवृत्त होत असल्यामुळें, त्या सूत्राचा 'नकारान्तात्परस्य सस्य धुड्वा स्यात्' असा कौमुदीत 'अर्थ केला आहे. 'शि तुक्' सू. १३३ या उत्तर सूत्रात 'नश्च' या पूर्व सूत्रातून 'न' हें पद अनुवृत्त होत असल्यामुळें त्या सूत्राचा देखील 'नकारान्तात्परस्य शस्य तुग्वा स्यात्' असा अर्थ कौमुदीत का केला नाही व 'न' हें अनुवृत्त पद पञ्चम्यन्त न मानता षष्ठ्यन्त मानून 'पदान्तस्य नस्य शे परे तुग्वा स्यात्' असा अर्थ का केला आहे अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेचे दीक्षित असें उत्तर देतात की,) 'शि तुक्'

सू १३३ या प्रकृत सूत्रातील 'शि' ही सप्तमी पूर्व सूत्रात, म्हणजे 'नश्च' या पूर्व सूत्रात, चरितार्थ झालेल्या 'न' या पञ्चमीला षष्ठी बनविते आणि म्हणूनच 'न' या अनुवृत्त पदाचा कौमुदीत 'नस्य' असा अर्थ केला आहे ('न शि तुक्' या स्थली 'न' हे पञ्चम्यन्त पद मानले तर 'उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्'-परि ७१-या परिभाषान्वये प्रकृत सूत्राचा 'नान्तात् पदात परस्य शस्य तुग् वा स्यात्' असा अर्थ होईल परंतु दीक्षित म्हणतात की, जेथे सूत्रात असलेले पञ्चमीनिर्देश व सप्तमीनिर्देश हे दोन्ही अचरितार्थ आहेत किंवा पञ्चमीनिर्देश अचरितार्थ असून सप्तमीनिर्देश चरितार्थ आहे तशाच ठिकाणीं 'उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्' ही परिभाषा लागू पडते पण जेथें सूत्रात असलेला पञ्चमीनिर्देश पूर्वी चरितार्थ झालेला असून सप्तमीनिर्देश अचरितार्थ आहे तशा ठिकाणी ती परिभाषा लागू पडत नाही व अचरितार्थत्वामुळें सप्तमीनिर्देशच पूर्वी चरितार्थ झालेल्या पञ्चमीनिर्देशापेक्षा बलवत्तर ठरतो प्रकृत स्थलीं 'न' ही अनुवृत्त पञ्चमी 'नश्च' या पूर्व सूत्रात चरितार्थ झाली असून 'शि तुक्' या प्रकृत सूत्रातील 'शि' ही सप्तमी कोठेंहि पूर्वी चरितार्थ झाली नसून पुढेंहि अनुवृत्त होत नसल्यामुळे चरितार्थ होत नाही म्हणून येथें सप्तमीनिर्देश बलवत्तर ठरून 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' सू ४० या सूत्रान्वयें अव्यवहित पूर्वाला कार्य होते व त्या सूत्रात 'पूर्वस्य' असा षष्ठीनिर्देश असल्यामुळे, प्रकृत सूत्रात अनुवृत्त असलेल्या व पूर्व सूत्रात चरितार्थ झालेल्या 'न' या पञ्चम्यन्त पदाचा षष्ठीत विपरिणाम होऊन त्याचा 'नस्य' असा अर्थ होतो असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे या विषयाची विस्तृत चर्चा परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरात पान ३५३-३५४ मध्यें केली आहे व ती वाचल्यास समग्र विषय नीट ध्यानात येईल ) प्रकृत असलेल्या, म्हणजे मागील सूत्रात निर्दिष्ट असलेल्या, 'धुट्' आगमाचे प्रकृत सूत्रात विधान केले असते तरी चालू शकले असते व तुगागमाचे विधान करण्याची

काही गरज नव्हती असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे बरोबर नाहीं, कारण 'शश्छोऽटि' सू १२० या सूत्राचा 'पदान्ताज्झय परस्य शस्य छो वा स्यात्', म्हणजे पदान्ती 'झय्' असून त्यापुढें शकार आल्यास त्या शकाराचा विकल्पेंकरून छकार होतो, असा भाष्यात अर्थ केला आहे म्हणून जर प्रकृत सूत्रात 'धुट्' आगम होणे सांगितले असते, तर तो आगम उत्तरपदाचा आद्यवयव झाला असता व त्यामुळें 'सञ्च्छम्भु' या स्थली होणारे च्छत्व झाले नसतें. (काशिकाकारानें असे म्हणणे आहे की, प्रकृत सूत्रात 'ड सि धुट्' या पूर्व सूत्रातून 'धुट्'ची अनुवृत्ति होऊ शकत असता व पदान्त नकारापुढे शकार आल्यास त्या शकाराला 'धुट्' आगम केल्यानें देखील इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकत असता, पाणिनीनें प्रकृत सूत्रात 'तुक्' या भिन्न आगमाचे विधान करावयाचे नव्हते व तें विधान व्यर्थ ठरते, कारण 'सन् शम्भु' या उदाहरणात पदान्त नकारापुढें असलेल्या शकाराला 'धुट्' आगम केल्यानें 'सन् ध् शम्भुः' अशी स्थिति झाली असता, 'स्तो श्चुना श्चु' सू १११ या सूत्रानें धकाराचा झकार होऊन व नंतर त्याच सूत्रानें 'सन्' यातील नकाराचा ञकार होऊन आणि मग 'खरि च' सू १२१ या सूत्रानें झकाराचा चकार होऊन 'सञ् च् शम्भु' अशी स्थिति झाल्यावर 'शश्छोऽटि' सू १२० या सूत्रानें शकाराचा विकल्पेंकरून छकार केल्यानें 'सञ् च् छम्भु' असें पाक्षिक इष्ट रूप सिद्ध होऊ शकतें या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, जर प्रकृत सूत्रात 'धुट्' या आगमाचे विधान केले तर, तो टित आगम 'शम्भु' या उत्तर पदाचा आद्यवयव होईल व 'सन् = सञ्' हे पूर्व पद अनुनासिकान्त होईल आणि अनुनासिक वर्ण 'झय्' नसल्यामुळें तें पद झयन्त मानता येणार नाही. त्यामुळें 'शश्छोऽटि' हें सूत्र प्रवृत्त होऊ शकणार नाहीं आणि 'शम्भुः' यातील शकाराचा छकार होऊ शकणार नाहीं व 'सञ् ध् छम्भुः' असे इष्ट पाक्षिक रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं, कारण 'डः सि

धुट्' ८.३ २९ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी 'परादौ छत्वषत्वविधिप्रतिषेध·' या वार्तिकाचे व्याख्यान करिताना 'शश्छोऽटि' या सूत्रासबधानें 'यद्धि तच्छश्छोटीति झय. पदान्तादित्येव तत् । किं पुनः कारणम् – झय पदान्तादित्येव तत् ? । इह मा भूत् पुरा क्रूरस्य विसृपो विरप्शिन्निति ।' असे म्हटले आहे या भाष्यावरून हे स्पष्ट होते की, पदान्ती असणाऱ्या 'झय्' पुढें शकार आल्यासच, 'शश्छोऽटि' या सूत्रानें त्या शकाराचा विकल्पें· करून छकार करता येतो 'धुट्' आगम केल्यानें वर सांगितल्या-प्रमाणे 'झय्' पदान्ती येत नसल्यामुळें व ज्या चकार या 'झय्' पुढें शकार आहे तो पदान्ती ठरत नसून 'शम्भुः' या. उत्तर पदाचा आद्यवयव ठरत असल्यामुळें, शकाराचे पाक्षिक छत्व होऊ शकत नाही हे उघड आहे परतु 'तुक् = त्' हा आगम केल्यानें तो कित् आगम 'आद्यन्तौ टकितौ' सू ३६ या सूत्रान्वयें 'सन्' या पूर्व पदाचा अन्त्यावयव होऊन 'सन् त् शम्भु· = सन् च् शम्भुः = सञ् च् शम्भु·' या स्थली 'सञ् च्' असे चकारान्त पूर्व पद होत असल्या-मुळे व या पदातील अन्त्य चकार या 'झय्' पुढें 'शम्भु.' या उत्तर पदातील शकार येत असल्यामुळें, 'शश्छोऽटि' हे सूत्र प्रवृत्त होऊन शकाराचा विकल्पेंकरून छकार होतो व 'सञ् च् छम्भु.' हे इष्ट पाक्षिक रूप सिद्ध होते. म्हणून प्रकृत सूत्रात 'धुट्' आगमाचे विधान न करिता पाणिनीनें जें 'तुक्' आगमाचे विधान केले आहे तेच योग्य ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे) उदाहरणार्थ 'वि' या उपसर्गपूर्वक 'रप्' धातूहून औणादिक 'श' प्रत्यय केला असता 'मध्वश्चोतन्त्यभितो विरप्शम्' इत्यादि स्थली शकाराचे जागीं छकार झाला नाही (वरील श्रुतीतील 'विरप्शम्' या स्थलीं 'प्' या झय्पुढें जरी शकार आला आहे तरी, तो पकार पदान्ती नसल्यामुळे आणि 'शश्छोऽटि' या सूत्रानें, वर सांगितल्याप्रमाणें, पदान्ती असलेल्या झय्पुढें शकार आल्यास त्या शकाराचा छकार होत असल्यामुळें त्या श्रुतीत शकाराचा छकार झाला नाही.

'विरप्शम्' हें जसें वैदिक उदाहरण दिलें आहे तसेंच 'चक्शौ' हें लौकिक उदाहरण देखील या विपयामवधाचे देता येतें. 'चक्षिङः ख्यान्' सू. २४३६ या सूत्रानें 'चक्ष्' धातूचे जागीं जो 'ख्या' असा आदेश होतो तो भाष्यांत 'क्शा' असा मानला आहे व या आदेशातील खकाराचे जागीं 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें ककार होऊन 'क्शा' असें त्या आदेशाचें स्वरूप होतें व लिटाचे प्रथम पुरुषाच्या एकवचनाचें 'चक्शौ' असें रूप होतें या रूपांत जरी ककार या झय् पुढें शकार आला आहे तरी तो ककार पदान्तीं नसल्यामुळें, शकाराचा छकार झाला नाहीं ) म्हणूनच पूर्व पदाच्या अन्त्य वर्णाला आगम व्हावा याकरितां प्रकृत सूत्रांत 'तुक्' या कित् आगमाचें विधान केलें आहे (व 'तुट्' असा टित् आगमाचें विधान केलें नाहीं, कारण तसें विधान केलें असतें तर तो टित् आगम पूर्व पदाचा अन्त्यावयव न होता उत्तर पदाचा आद्यवयव झाला असता ) तुगागमाचें विधान केल्यास 'कुर्वंञ्छेते' या स्थलीं 'पदान्तस्य' सू. १९८ हें णत्वनिषेधक सूत्र लागू पडणार नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं, कारण कार्यकालपक्षांत 'तुक्', बहिरङ्ग असल्यामुळें, असिद्ध ठरतो (शङ्काकाराची शङ्का अशी आहे की, 'कुर्वन् शेते' या उदाहरणांत 'कुर्वन्' या पदांतील अन्त्य नकारापुढें 'शेते' या पुढील पदांतील शकार आला असल्यामुळें 'शि तुक्' या प्रकृत सूत्रानें नकारास तुगागम केल्यास, 'कुर्वन्त् शेते' अशी स्थिति झाली असतां, नकार हा पदान्तीं राहत नसून तकार हा पदाच्या अन्तीं येतो त्यामुळें 'पदान्तस्य' हा निषेध येथें लागू पडत नाहीं व 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू. १९७ या सूत्रानें नकाराचें णत्व होण्याचा आपत्ति येते. या शङ्केवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, या स्थलीं कार्यकाल-पक्ष मानल्यास, त्या पक्षांत 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे'–परि. ५०–ही बहिरङ्गपरिभाषा त्रिपादींत उपस्थित होत असल्यामुळें, त्या परिभाषाश्रयें, पुढील पदांत असणाऱ्या शकाराच्या निमित्तामुळें

होणारा परनिमित्तक व पदद्वयसंबंधिवर्णद्वयापेक्ष तुगागम, 'कोण-त्याहि पर निमित्तामुळें न होणाऱ्या एकपदापेक्ष णत्वकार्याच्या मानानें, बहिरङ्ग ठरत असल्यामुळें, असिद्ध ठरतो व तो तुगागम झालाच नाही असे मानल्यानें, नकाराचे पदान्ती असणे नष्ट होत नाही व त्यामुळें त्या नकाराला 'पदान्तस्य' हा निषेध लागू पडून त्याचे णत्व होत नाही ) यथोद्देशपक्ष मानल्यास, 'स्तो श्चुना श्चु.' सू १११ या सूत्राचा 'स्तो श्चुना' असा योगविभाग केल्यानें व त्या भागात ('न भाभू' व 'रषाभ्यां नो ण' या पूर्व सूत्रातून अनुक्रमें) 'न' व 'ण' या पदाची अनुवृत्ति केल्यानें, त्या पृथक् केलेल्या सूत्राचा—भागाचा—'स्तो श्चुना योगे णत्व न स्यात्' असा अर्थ होतो (व त्यामुळें 'कुर्वंन्त् शेते = कुर्वंन्च् शेते' या वरील उदाहरणात नकाराचा चकाराशी संयोग होतो तरी, नकाराचे णत्व होत नाही ) असा योगविभाग नकाराचे णत्व न व्हावे एवढ्या-करिताच केला जातो 'स्तो श्चुना' या, योगविभागानें केलेल्या पृथक् पूर्व सूत्रात, सकाराचे आणि संपूर्ण तवर्गाचे जें ग्रहण केले आहे त उत्तर भागात—'श्चु' या योगविभागानें पृथक् केलेल्या उत्तर सूत्रात—त्याची अनुवृत्ति व्हावी याकरिता केले आहे असें मानावे, (कारण नकाराचे णत्व होऊ नये एवढ्याचकरिता जर 'स्तो. श्चुना' असे योगविभाग करून पृथक् सूत्र मानले जातें तर, त्यात सकाराचे व संपूर्ण तवर्गाचे ग्रहण अनावश्यक ठरून, तवर्गातील केवळ नकाराचेच ग्रहण आवश्यक ठरतें. तरी पण त्या पूर्व भागांत सकाराचे व संपूर्ण तवर्गाचे जें ग्रहण केले आहे तें 'श्चु' या उत्तर भागात त्याची अनुवृत्ति व्हावी एवढ्याकरिता केले आहे असे मानल्यानें ते ग्रहण चरितार्थ ठरते असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) त्यामुळें नतर 'श्चुः' या उत्तर भागांत 'स्तो श्चुना' या पूर्व भागाची अनुवृत्ति होते. म्हणून 'नश्च' सू १३२ या सूत्रात जें 'धुट्' आगमाचे विधान केले आहे तें, तो आगम उत्तर पदाचा आद्यवयव व्हावा व त्यामुळें 'कुर्वन्त्सीदति' या

उदाहरणात 'पदान्तस्य' सू. १९८ हा णत्वप्रतिषेध लागू पडावा, या प्रयोजनाकरिता केले आहे असे जें प्राचीन वैयाकरणानी 'नश्च' या सूत्रावरील आपल्या ग्रन्थात म्हटले आहे ते देखील यथोद्देश-पक्षाला धरून म्हटले आहे हे ध्यानांत ठेवावे. (मनोरमेंतील ही पंक्ति कोणत्या प्राचीन वैयाकरणाच्या ग्रन्थाला उद्देशून लिहिली आहे हे, त्या वैयाकरणाचा किंवा त्याच्या ग्रन्थाचा या पंक्तीत नामनिर्देश केला नसल्यामुळें, खात्रीपूर्वक सांगता येत नाही. तथापि 'नश्च' या सूत्रावरील पदमञ्जरींत मनोरमेंत दिलेली पंक्ति आढळत असल्यामुळें, ही मनोरमेंतील पंक्ति बहुधा हरदत्ताच्या पदमञ्जरीला उद्देशून लिहिली असावी असें वाटते. 'नश्च' या सूत्रावरील पदमञ्जरीत हरदत्तानें 'अत्रापि परादित्वात् कुर्वन् सीदतीत्यादौ पदान्तस्येति णत्वप्रतिषेधो भवति' असे म्हटले आहे. हरदत्ताच्या या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'नश्च' या सूत्रात 'धुक्' असा कित् आगमाचे विधान न करिता 'धुट्' असा टित् आगमाचे विधान केलें असल्यामुळें, तो टित् आगम उत्तर पदाचा आद्यवयव होतो व त्यामुळें 'कुर्वन् सीदति' इत्यादि उदाहरणात 'पदान्तस्य' हा णत्वप्रतिषेध लागू पडतो. जर या सूत्रात 'धुक्' किंवा 'तुक्' असा कित् आगमाचे विधान केले असतें तर, तो आगम 'आद्यन्तौ टकितौ' सू. ३६ या सूत्रान्वयें 'कुर्वन्' या पूर्व पदाचा अन्त्यावयव होऊन 'कुर्वन्ध्' किंवा 'कुर्वन्त्' असे पूर्व पद झाले असते व अशा स्थितींत नकाराचे पदान्तत्व नष्ट होत असल्यामुळें, म्हणजे तो पदान्ती येत नसून त्याच्या पुढील आगमरूप धकार किंवा तकार पदान्ती येत असल्यामुळें, त्या नकाराला 'पदान्तस्य' हा निषेध लागू पडला नसता व 'अट्कुप्वाङ्नुम्' सू. १९७ या सूत्रान्वयें त्याचे णत्व होण्याची आपत्ति आली असती. ती आपत्ति टाळण्याकरिता 'धुट्' या टित् आगमाचे विधान केले आहे व तो टित् आगम 'सीदति' या उत्तर पदाचा आद्यवयव होऊन 'कुर्वन्' हे नकारान्त पूर्वपद जसेचे तसेच कायम राहत असल्यामुळें, त्या

पदातील अन्त्य नकाराचे णत्व, 'पदान्तस्य' हा निषेध असल्यामुळें, होत नाही. यावर दीक्षित म्हणतात की, हे वरील म्हणणे यथोद्देश-पक्षातच लागू पडते, कार्यकालपक्षात लागू पडत नाही; कारण त्रैपा-दिक अन्तरङ्ग कार्य करतेवेळी यथोद्देशपक्षात 'असिद्ध बहिरङ्ग-मन्तरङ्गे'–परि. ५०–ही बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नसल्यामुळें, कित् आगमाचे विधान केल्यास, त्रैपादिक णत्व कार्याच्या मानानें ते आगमकार्य, वर सांगितल्याप्रमाणे, बहिरङ्ग असून देखील असिद्ध ठरत नाही; कारण ते आगमकार्य त्रैपादिक पूर्व सूत्रानें होणारे कार्य असून णत्व कार्य त्रैपादिक उत्तर सूत्राने होणारे कार्य असल्यामुळें, णत्व कार्याच्या दृष्टीने आगमकार्य असिद्ध न ठरता उलट सिद्धच ठरतें. त्यामुळें किदागमपक्षात 'कुर्वन्त्' असे पूर्व पद आहे असे मानावे लागत असल्यामुळें व अशा रीतीनें त्या पूर्वपदाचे नकारान्तत्व नष्ट होत असल्यामुळें, त्याला 'पदान्तस्य' हा निषेध लागू पडत नाही व 'कुर्वन्त्' या पदात अन्ती नसणाऱ्या नकाराचे णत्व होण्याची आपत्ति येते. यथोद्देशपक्षात येणारी ती आपत्ति टाळण्या-करिता त्या पक्षात 'धुट्' या टित् आगमाचे विधान करणे योग्य व आवश्यक ठरते परंतु कार्यकालपक्ष मानल्यास, त्या पक्षात दीक्षिताच्या मते त्रैपादिक अन्तरङ्गकार्य करतेवेळी बहिरङ्ग परिभाषा त्रिपादीत उपस्थित होत असल्यामुळें, ते असे म्हणतात की, त्या पक्षात 'धुक्' किंवा 'तुक्' अशा कित् आगमाचे विधान केले तरी, जरी तो आगम नकारान्त पूर्व पदाचा अन्त्यावयव होतो तरी तो परनिमित्तक आगम, अपरनिमित्तक णत्वकार्याच्या मानानें, बहिरङ्ग ठरत असल्यामुळें, अन्तरङ्ग णत्वकार्य करतेवेळी तो बहिरङ्ग तुगागम 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषान्वयें असिद्ध ठरतो व तो झालाच नाही आणि 'कुर्वन्' असेच नकारान्त पूर्वपद आहे असे मानावे लागत असल्यामुळें, 'पदान्तस्य' या निषेधान्वयें 'कुर्वन्' या पदा-तील अन्त्य नकाराचे णत्व होण्याची आपत्ति मुळीच येत नाही-म्हणून कार्यकालपक्षात हरदत्ताचे वरील म्हणणे लागू पडत नाही

असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) यावर प्रकाशकार असे म्हणतात की, ('धुट्' असा टित् आगमाचे विधान करण्याचे हरदत्तानें वर सांगितलेले) हे प्रयोजन बहिरङ्गपरिभाषा असल्यामुळें गतार्थ होतें, म्हणजे त्या परिभाषेनेंच हें प्रयोजन सिद्ध होत असल्यामुळें '*धुट्' आगमाचे विधान करण्याचे हें प्रयोजन आहे असे मान*ण्याची काहीं गरज राहत नाही. पण हे प्रकाशकाराचे म्हणणे एका पक्षातच–कार्यकालपक्षातच–योग्य ठरते. (यथोद्देशपक्षात तें म्हणणे वर सांगितल्याप्रमाणे योग्य ठरत नाही त्रैपादिक अन्तरङ्ग कार्य करतेवेळी यथोद्देशपक्षात देखील बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होते असे मानले तरच प्रकाशकाराचें वरील म्हणणे उभय पक्षात योग्य ठरते परतु यथोद्देशपक्षात बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नाही त्या पक्षात देखील ती त्रिपादीत उपस्थित होते असे त्याचे म्हणणे मानल्यास) 'सुद्ध्युपास्य ' या उदाहरणाची चर्चा करिताना, त्रैपादिक अन्तरङ्गकार्य करतेवेळी ही बहिरङ्गपरिभाषा त्रिपादींत प्रवृत्त होत नाही असे जें त्यानी स्वतः म्हटले आहे *त्याशी विरोध येतो व म्हणून या विपर्यासबधानें एवढेंच* सागणे पुरे ('सुधी+उपास्य ' या स्थली होणारा यणादेश पर पदातील 'उ' या अच्च्या निमित्तामुळें होणारा असून वर्णद्वित्वकार्य अपरनिमित्तक असल्यामुळें, द्वित्वकार्याच्या मानानें यणादेशकार्य बहिरङ्ग ठरून त्याच्या दृष्टीनें असिद्ध ठरते. म्हणून यणादेश झालाच नाहीं व ईकारच विद्यमान आहे असे मानल्यास धकारापुढें 'ई' हा अच् आहे असे मानावे लागत असल्यामुळें, 'अनचि च' या द्वित्वविधायक सूत्रातील 'अनचि' या प्रतिषेधान्वयें 'सुधी' यातील धकाराचे द्वित्व न होण्याची आपत्ति येते पण त्रैपादिक अन्तरङ्गकार्य करतेवेळी यथोद्देशपक्षात बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत प्रवृत्त होत नाही व त्यामुळें यणादेश बहिरङ्ग असून देखील द्वित्वकार्य करतेवेळी असिद्ध ठरत नाहीं असे सांगून प्रकाशकारानी त्या आपत्तीचे निवारण केले आहे. म्हणून

त्रैपादिक अन्तरङ्गकार्य करतेवेळी यथोद्देशपक्षात देखील बहिरङ्ग-परिभाषा त्रिपादीत उपस्थित होते असे जर ते आता म्हणत असतील तर ते म्हणणे त्याच्या पूर्वोक्त म्हणण्याच्या विरुद्ध ठरते व म्हणून तें म्हणणे बरोबर मानता येत नाही. साराश त्रैपादिक अन्तरङ्गकार्य करतेवेळी जरी कार्यकालपक्षात बहिरङ्ग परिभाषा त्रिपादीत उपस्थित होते तरी, यथोद्देशपक्षात ती उपस्थित होत नसल्यामुळें, 'इदं प्रयोजन बहिरङ्गपरिभाषयागतार्थत्वात् प्रत्युक्तम्' असे जें त्यानी आपल्या ग्रन्थात म्हटले आहे ते यथोद्देशपक्षात अयोग्य ठरत असून कार्यकालपक्षातच योग्य ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'सञ्च्छम्भुः' या उदाहरणात श्चुत्व व तुगागम असिद्ध असल्यामुळें 'नश्छवि' सू १४० या सूत्रानें रुत्वाची प्राप्ति होते अशी कोणी शका केल्यास, ती शका बरोबर नाहीं; कारण (रुत्वकार्याच्या दृष्टीनें) छत्व असिद्ध आहे. ('सन् शम्भुः' या उदाहरणात 'सन्' या नकारान्त पदापुढें 'शम्भुः' या उत्तर पदातील शकार आला असल्यामुळें 'शि तुक्' सू '१३३ या सूत्रानें नकारास 'तुक् = त्' आगम होऊन 'सन्त् शम्भुः' अशी स्थिति झाली असता, 'स्तोः श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रानें तकाराचा चकार होऊन व नतर त्याच सूत्रानें पूर्व नकाराचा ञकार होऊन आणि नतर 'शश्छोऽटि' सू १२० या सूत्रानें शकाराचा छकार होऊन 'सञ्च्छम्भुः' अशी स्थिति होते हें पूर्वी सागितलेच आहे. आता शकाकार असे म्हणतो कीं, 'नश्छवि' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक पर सूत्रानी होणारा तुगागम व श्चुत्व 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें असिद्ध ठरत असल्यामुळें, 'सन् छम्भुः' अशी स्थिति आहे व या दोन पदामध्यें तकाराचे किंवा चकाराचे व्यवधान नाही आणि 'सन्' यांतील अन्त्य नकाराचा ञकार झाला नाही व 'सन्' यातील नकाराच्या लगेच पुढें अम्परक छकार आहे असे मानावे लागत असल्यामुळें, त्या पदान्त नकाराचे 'नश्छवि' या सूत्रानें रुत्व पावतें या शकेवर दीक्षित असे उत्तर

देतात की, 'नश्छवि' या त्रैपादिक पूर्व सूत्राच्या दृष्टीनें 'शश्छोऽटि' सू १२० या त्रैपादिक पर सूत्रानें झालेले शकाराच छत्व असिद्ध ठरत असल्यामुळें, 'सन्' यातील नकारापुढें छकार नसून शकारच आहे असें मानावें लागत व शकार हा 'छव' नसल्यामुळें नकाराला रुत्वाची प्राप्तीच होत नाही )

शब्दरत्न—षष्ठीं कल्पयतीति । न च "शि" इति सप्तमी-निर्देशो लाघवार्थ । द्वयोरचरितार्थत्वे लाघवेनान्यविभक्त्युच्चारण युक्त न त्वन्यथेत्याशयात् । ड्ढेवास्त्विति । शीति च षष्ठ्यर्थे इति भाव । विरप्शमिति । छान्द सार्थमपि बहुश सूत्रकृतो यत्न-दर्शनादिति भाव । णत्व न स्यादिति । एतदृष्ट्या श्चुत्वस्यासिद्धत्व तु न, वचनसामर्थ्यादिति भाव । त्रिपाद्या सर्वथा परिभाषाऽप्रवृत्तौ पक्षद्वयेऽपीदमेव समाधानम् । यथोद्देशपक्षे इति । कार्यकाले तु असिद्धत्वान्न दोष पूर्वान्तत्वेऽपीति भाव ।

(जसा 'ड सि धुट' सू १३१ या सूत्रातील 'सि' हा सप्तमी निर्देश लाघवमूलक आहे तसा 'शि तुक्' या प्रकृत सूत्रातील) 'शि' हा सप्तमीनिर्देश लाघवमूलक नाही, म्हणजे प्रकृत सूत्रात 'शस्य' या षष्ठीचे जागी 'शि' असे कमी मात्राचे सप्तम्यन्त पद घातले आहे असे समजू नयें जेथें सूत्रातील पञ्चमीनिर्देश व सप्तमी-निर्देश हे दोन्ही अचरितार्थ आहेत तशाच ठिकाणीं लाघवाकरिता केलेले भिन्न विभक्तीचे उच्चारण, म्हणजे षष्ठीच्या ऐवजीं केलेले सप्तमीच उच्चारण, योग्य ठरते, नाही तर तसे उच्चारण योग्य ठरत नाही, म्हणजे जेथें सूत्रातील पञ्चमीनिर्देश चरितार्थ असून सप्तमीनिर्देश चरितार्थ नाही तशा ठिकाणी सप्तमीनिर्देश लाघवा-करिता केला आहे असे मानता येत नाही, व हा आशय मनात धरूनच दीक्षितानी मनोरमेंत 'शीति सप्तमी पूर्वत्र कृतार्थया न इति पञ्चम्या षष्ठी कल्पयति' असे म्हटले आहे (याचे विवरण मनोरमेंत केलेच आहे.) 'ड्ढेवास्तु' असे जें मनोरमेंतील शङ्का-

ग्रन्थात म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रकृत 'सूत्रातील 'शि' हा सप्तमीनिर्देश षष्ठ्यर्थाचा, म्हणजे 'शस्य' या अर्थाचा, वाचक मानावा. (तसे मानल्यानें, प्रकृत सूत्रात अनुवृत्त असलेल्या 'न' या पञ्चम्यन्त पदाची षष्ठी कल्पावी लागत नाही व अशा रीतीनें 'धुट्' आगमाचे विधान केल्यानें 'नान्तात्पदात्परस्य शस्य धुड् वा स्यात्' असा प्रकृत सूत्राचा अर्थ होतो. पण तसा अर्थ केल्यानें कोणती आपत्ति येते याचे विवरण मनोरमेंत केलेच आहे. आता शंकाकार अशी शका करतो की, 'शश्छोऽटि' सू. १२० या सूत्रात 'पदान्तात्' या पदाची अनुवृत्ति मानणे आवश्यक आहे हे सिद्ध करण्याकरिता दीक्षितानी मनोरमेंत 'विश्वशम्' हे जें वैदिक उदाहरण दिले आहे ते अयोग्य आहे, म्हणजे त्यानी वैदिक उदाहरण न देता लौकिक उदाहरण द्यावयास पाहिजे होतें, कारण 'दृष्टानुविधिश्छन्दसि' या वचनान्वयें ते वैदिक रूप योग्य आहे असे मानणे भाग आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, पाणिनीनें भाषेंतील रूपें सिद्ध करण्याच्या हेतूनेंच अष्टाध्यायी रचली नसून तीत) वैदिक रूपें सिद्ध करण्याकरिता देखील पाणिनीनें ठिकठिकाणीं बराच प्रयत्न केला आहे हें दिसून येत असल्यामुळें, मनोरमेंत दिलेले 'विश्वशम्' हे वैदिक उदाहरण देखील योग्य ठरतें. (सारांश भाषेंतील रूपें व तसेच वैदिक रूपें सिद्ध करण्याकरिता पाणिनीनें अष्टाध्यायी रचली असल्यामुळें ती जशी लौकिक रूपाना लागू पडते तशीच वैदिक रूपानाहि लागू पडते व 'शश्छोऽटि' या सूत्रात 'पदान्तात्' या पदाची अनुवृत्ति न मानल्यास, 'विश्वशम्' या वैदिक उदाहरणांत शकाराचा विकल्पेंकरून छकार होण्याची आपत्ति येत असल्यामुळें आणि पूर्वी मनोरमेंत दिलेल्या 'ङ: सि धुट्' ८.३.२९ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारांनी देखील, 'शश्छोऽटि' या सूत्रांत 'पदान्तात् झय:' या पदाची अनुवृत्ति मानणे आवश्यक आहे हें सिद्ध करण्याकरिता, 'विश्वशिन्' हें वैदिक उदाहरणच दिले असल्यामुळें, दीक्षितांनी मनोरमेंत दिलेले वैदिक उदाहरण अयोग्य

मानता येत नाहीं. 'शश्छोऽटि' या सूत्रात 'पदान्तात्' या पदाची अनुवृत्ति मानणे आवश्यक आहे हें सिद्ध करण्याकरिता मनोरमेचे विवरण करतेवेळी 'चक्रो' हे लौकिक उदाहरण देखील दिलेच आहे ) 'स्तो' श्चुना योगे णत्व न स्यात्' असं जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'स्तो श्चुना' या, योगविभागानें पृथक् केलेल्या, पूर्व सूत्राच्या-भागाच्या-दृष्टीनें 'श्चु' या उत्तर सूत्रानें-भागानें-झालेले श्चुत्व वचनसामर्थ्यामुळे असिद्ध ठरत नाहीं. ('कुर्वन् शेते' या उदाहरणात 'शि तुक्' या प्रकृत सूत्रानें 'कुर्वन्' या पदातील अन्त्य नकारास 'तुक् = त्' हा आगम करून त्या आगमरूप तकाराचा, योगविभागानें पृथक् केलेल्या 'श्चु.' या उत्तर सूत्रानें, चकार केल्यावर त्या उत्तर सूत्रानें तकाराचे जागीं झालेला चकार 'स्तो श्चुना' या पूर्व सूत्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें, असिद्ध ठरतो व त्यामुळें चकार झालाच नाही आणि तकारच कायम आहे व 'कुर्वन्' यातील नकाराचा तकाराशीं संयोग झाला असून चवर्गातील चकाराशीं संयोग झाला नाही असे मानणे भाग पडते आणि त्यामुळें नकाराचा शकाराशी किंवा चवर्गातील वर्णाशी संयोग झाल्यास नकाराचे णत्व होत नाहीं या अर्थाचे विधान करणारे 'स्तोः श्चुना' हे योगविभागानें पृथक् केलेले णत्व-निषेधक सूत्र वरील उदाहरणास लागू पडत नाही अशी शंकाकाराची शंका आहे या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, 'स्तो श्चुना' या णत्व निषेधक सूत्रात 'श्चुना' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें, त्या पदाच्या ग्रहणसामर्थ्यानें हें सिद्ध होतें कीं, 'श्चु' या उत्तर सूत्रानें झालेले श्चुत्व 'स्तो श्चुना' या पूर्व सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नाहीं. सारांश असिद्ध श्चुत्व कार्याचा अनुवाद करून 'स्तो श्चुना' हें सूत्र आरंभिले असल्यामुळें, त्या आरंभ-सामर्थ्यानें उत्तर सूत्रानें झालेले श्चुत्व पूर्व सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. त्यामुळें नकारापुढें चवर्गातील चकार हा वर्ण आहे असे मानता येत

असल्यामुळें, 'स्तोः श्चुना' हे णत्वनिषेधक सूत्र प्रवृत्त होते व 'कुर्वन्' या पदातील अन्त्य नकाराचे णत्व होत नाही.) 'असिद्ध बहिरङ्गमन्तरङ्गे' ही परिभाषा सपादिक अन्तरङ्ग कार्य करतेवेळीं त्रिपादीत यथोद्देशपक्षात व तसेंच कार्यकालपक्षात प्रवृत्त होत नाहीं असे मानल्यास, दीक्षितानी यथोद्देशपक्षात जें मनोरमेंत समाधान सांगितले आहे तेंच कार्यकालपक्षात देखील समाधान मानले पाहिजे. (दीक्षिताच्या मते कार्यकालपक्षात बहिरङ्ग परिभाषा त्रिपादीत प्रवृत्त होते, पण शब्दरत्नकाराचे मत या विरुद्ध आहे हे पूर्वी सांगितलेच आहे. शब्दरत्नकार म्हणतात की, 'वाह ऊठ्' या सपादिक सूत्रानें ज्ञापित होणारी बहिरङ्ग परिभाषा सपादिक ठरत असल्यामुळें व तिच्या दृष्टीने त्रिपादीचा अभाव असल्यामुळें, ती केव्हांहि त्रिपादीत उपस्थित होऊ शकत नाही आणि त्यामुळें दीक्षितांनी यथोद्देशपक्षात 'स्तोः श्चुना श्चुः' या सूत्राचा योगविभाग करून जें णत्वाचे निवारण करण्याकरिता समाधान सांगितले तेंच कार्यकालपक्षात देखील मानावे.) 'प्राचा ग्रन्थोऽपि यथोद्देशपक्षे बोध्यः' असें जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, कार्यकालपक्षात, प्रकृत सूत्रानें होणारे आगमकार्य णत्वकार्याच्या मानानें बहिरङ्ग असल्यामुळें, असिद्ध ठरतें व त्यामुळें (टित् आगम न करिता कित् आगम करून) तो पूर्वपदाचा अन्त्यावयव मानला तरी काही दोष येत नाही. (कारण तो बहिरङ्ग आगम अन्तरङ्ग णत्वकार्याच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें झालाच नाही असें मानल्यानें, 'कुर्वन्' या पदातील अन्त्य नकार पदान्तीं ठरतो व त्यामुळें 'पदान्तस्य' सू. १९८ या निषेधान्वयें त्या नकाराचे णत्व होत नाहीं. या विषयाचे विस्तृत विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे)

मनोरमा– ङमो ह्रस्वात् । ङम् प्रत्याहारः । सञ्ज्ञायां च ङुट् टित्वं सामर्थ्यात् संज्ञिभिः सम्बध्यते । तेन यथासंख्यं ङुट्णुट्नुटः प्रवर्तन्ते । नित्यग्रहणं विस्पष्टार्थम् । "हे मपरे —" इति "मय उञो वो वा" इति च विकल्पद्वयस्य मध्ये पाठादेव नित्यत्वलाभात् ।

सुगण्णीश इति । ष्यल्लोपो न स्यान्निवत्पूर्वत्रासिद्धे तन्निषेधात् । ङमुटः परादित्वं कुर्वन्नास्ते इत्यत्र णत्वप्रतिषेधार्थम् । अत एव ङमो ह्रस्वादचि द्वे इति नासूत्रि । परं णत्वं प्रति पूर्वस्य सिद्धतया णत्वा-पत्तेरिति प्राञ्चः । यत्त्वाहुः — बहिरङ्गपरिभाषया गतार्थत्वादुभय-मप्यसङ्गतमिति । तदपि पाक्षिकम्, राज्ञ इत्यत्रेव यथोद्देशे ञ्नपादिके-ऽन्तरङ्गपरिभाषाविरहस्योक्तत्वेन प्राचां ग्रन्थस्य सौष्ठवात् । कथ-मन्यथा ड्विय भ्रिय च स्वयमेवोक्तमिति दिक् ॥

'ङमो ह्रस्वादचि ङमुण्नित्यम्' सू. १३४ या सूत्रात 'ङम्' प्रत्याहाराचा निर्देश केला आहे. 'ङमुट्' या स्थली 'ङम्' या प्रत्याहाररूप संज्ञेला जें टित्व केलें आहे त (प्रत्याहाररूप समुदायाचे टित्व केल्यानें कांहींच फल निष्पन्न होत नसल्यामुळें, 'संज्ञाया हि कृतमागलिङ्गं संज्ञिना भवति' या वचनान्वयें) त्या प्रत्याहाराचे वाच्य 'ङ्, ण्, न्' हे जे वर्ण आहेत त्यांशी टित्करणसामर्थ्यामुळें संबद्ध होतें, म्हणजे 'ङुट्, णुट्, नुट्' असे आगमाचे स्वरूप होतं (अशा रीतीनें प्रकृत सूत्रांत तीन उद्देश्यरूप आगमी व तीन विधेय-रूप आगम निर्दिष्ट असल्यामुळें, म्हणजे उद्देश्य व विधेय यांची संख्या समान असल्यामुळें,) येथें यथासंख्यन्यायान्वयें (ह्रस्व अचा-पुढें पदाच्या अन्ती 'ङ्, ण्, न्' असल्यास, त्याच्या पुढील अचाला अनुक्रमें) 'ङुट्, णुट्, नुट्' आगम होतात (प्रकृत सूत्रांत 'ङम' हा पञ्चम्यन्त निर्देश असल्यामुळें, 'उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्' या वचनान्वयें पञ्चमीनिर्देश बलवत्तर ठरून प्रकृत सूत्रांतील 'अचि' हा सप्तम्यन्त निर्देश 'अच' या षष्ठ्यर्थाचा वाचक होतो हें ध्यानांत ठेवावें. या आगमांतील उकार उच्चारणार्थ असून टकार इत्संज्ञक आहे व हे आगम टित् केले असल्यामुळें ते अजादि उत्तरपदाचे आद्यवयव होतात.) प्रकृत सूत्रांत 'नित्यम्' या पदाचे ग्रहण अर्थ स्पष्ट होण्याकरितां केलें आहे, कारण 'हे मपरे वा' सू. १२७ व 'मय उञो वो वा' सू. १०८ या दोन विकल्प-विधायक सूत्रांच्या मध्यें प्रकृत सूत्र पठित असल्यामुळें (या सूत्रांत

'निरयम्' हें पद नसते तरी) हे सूत्र नित्यकार्यविधायक सूत्र मानता आलेच असते. (या पक्तीचे विवरण शब्दरत्नात केलें जाईल.) 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' हे स्थानिवद्भावाचे निषेधक वार्तिक असल्यामुळें, 'सुगण्णीश.' या उदाहरणात 'णि' लोप व 'अ' लोप याचे ठिकाणी ('अचः परस्मिन् पूर्वविधौ' सू ५० या सूत्रानें होणारा) स्थानिवद्भाव करता येत नाही. ('सुष्ठु गणयतीति सुगण् = सु + गण + णिच् + विच्' या स्थली कथादिगणात पठित असलेल्या अदन्त चुरादि 'गण' धातूहून 'विच्' प्रत्यय झाला आहे. येथें 'गण' या अदन्त धातूपुढें 'णिच्' हा आर्धधातुकप्रत्यय आला असल्यामुळें, 'अतो लोप.' सू. २३०८ या सूत्रानें 'गण' यांतील अन्त्य अकाराचा लोप होऊन व 'णेरनिटि' सू २३१३ या सूत्रानें 'णिच्' प्रत्ययाचा लोप होऊन आणि 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें 'विच् = व्' या अपृक्त प्रत्ययाचा लोप होऊन 'सुगण्' असे कृदन्त प्रातिपदिक होतें. या प्रातिपदिकाहून प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' प्रत्यय केला असता, 'सुगण्+सु' या स्थली 'हल्ङ्याब्भ्यो' सू २५२ या सूत्रानें जरी 'सु' प्रत्ययाचा लोप होतो तरी 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू २६२ या सूत्रान्वयें 'सुगण्' याला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होते. या पदांत णकार हा 'ङम्' अन्ती असून तो गकारापुढील 'अ' या ऱ्हस्व अचापुढें आहे आणि या पदान्त 'ङम्' पुढें 'ईश' हे अजादि पद आहे या स्थली, वर सांगितल्याप्रमाणें, जो 'णि' चा व अकाराचा लोप झाला आहे त्या लोपाचे ठिकाणी स्थानिवद्बुद्धि करून 'णि = इ' व 'अ' हे विद्यमान आहेत असें मानल्यास, 'सुगण्' यांतील णकार व 'ईशः' यांतील ईकार या दोहोंमध्यें 'णि' व 'अ' यांचे व्यवधान आहे असें मानणे भाग पडेल व अशा रीतीनें 'ण्' या 'ङम्'च्या लगेच पुढें 'ईशः' यांतील ईकार आहे असें मानता येऊ शकत नसल्यामुळें, त्या ईकाराला 'णुट्' आगम करता येऊ शकणार नाही. परंतु ॲपादिक कार्य करतें.

केव्हीं अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करता येत नाहीं या अर्थाचे 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' हें वार्तिक असल्यामुळें व प्रकृत सूत्रान्वयें 'णुट्' आगम करणें हें त्रैपादिक कार्य असल्यामुळें, णिलोप व 'अ'लोप याचे ठिकाणी स्थानिवद्भाव करता येत नाही व अशा रीतीनें 'ईशः' यातील ईकार 'सुगण्' या पूर्व पदातील 'ण्' या 'ङम्'पुढें आहे असे मानता येत असल्यामुळें, त्या ईकाराला 'णुट्' आगम होतो.) 'ङमुट्' अशा रीतीनें टित् केलेला आगम उत्तर पदाचा आद्यवयव व्हावा याचे प्रयोजन हें आहे की, 'कुर्वन्नास्ते' या स्थली ('पदान्तस्य' सू १९८ हा) णत्वप्रतिषेध लागू पडावा आणि म्हणूनच पाणिनीनें प्रकृत सूत्राऐवजी 'ङमो ह्रस्वादचि द्वे' असे सूत्र केलें नाहीं; कारण तसें सूत्र केलें असते तर, ते त्रैपादिक पूर्व सूत्र असल्यामुळें, णत्वकार्यविधायक पर सूत्राच्या दृष्टीनें तें सिद्ध ठरून णत्व होण्याची आपत्ति आली असती असें प्राचीन वैयाकरणानीं म्हटले आहे. पण प्रकाशकार असे म्हणतात की, बहिरङ्गपरिभाषेनें हें प्रयोजन गतार्थ होत असल्यामुळें, म्हणजे बहिरङ्गपरिभाषेच्या सहायानेंच हें प्रयोजन सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, (त्या प्राचीन वैयाकरणानीं 'ङमुटः परादित्वं कुर्वन्नास्ते इत्यत्र णत्वप्रतिषेधार्थम्' व 'अत एव ङमो ह्रस्वादचि द्वे इति नासूत्रि' अशीं जीं दोन प्रकाराचीं विधानें केलीं आहेत तीं) दोन्ही वरील विधानें अयोग्य ठरतात पण हें प्रकाशकारांचें म्हणणें देखील एकाच पक्षात–कार्यकालपक्षात–लागू पडतें. (यथोद्देशपक्षात लागू पडत नाहीं.) 'राजः' या रूपाची सिद्धि करितांना जशी बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत यथोद्देशपक्षात प्रवृत्त होत नाहीं तशीच 'कुर्वन्नास्ते' या स्थलीं णत्वाचा प्रतिषेध करण्याकरितां ती परिभाषा यथोद्देशपक्षात त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाहीं असें जें प्राचीन वैयाकरणानीं आपल्या ग्रन्थात म्हटलें आहे तेंच म्हणणें योग्य ठरतें. यथोद्देशपक्षांत देखील बहिरङ्गपरिभाषा त्रिपादींत प्रवृत्त होते असें मानलें तर ('सुप्युगाश्वः' या स्थलीं) द्विककारयुक्त व त्रिककारयुक्त रूपें सिद्ध होतात असें जें प्रकाश-

कारानी स्वत: म्हटले आहे ते कसे योग्य ठरू शकणार ? (प्रकृत सूत्रावरील प्रसादटीकेत प्रसादकारानी 'ङमुट: परादित्वकरण कुर्वन्नास्त अत्र णत्व मा भूदिति । पूर्वान्तत्वे हि पूर्वस्य नस्य पदान्तत्वाभावात् पदान्तस्य निषेधो न स्यात् ।' असे म्हटले आहे प्रसादकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, प्रकृत सूत्रात 'ङमुक्' असा कित् आगम पठित न करिता 'ङमुट्' असा जो टित् आगम पठित केला आहे त्याचे प्रयोजन हे आहे की, तो आगम उत्तरपदाचा आद्यवयव व्हावा व त्या आगमाच्या टित्करणानें तो उत्तरपदाचा आद्यवयव होत असल्यामुळें, 'कुर्वन्नास्ते' या उदाहरणात 'कुर्वन्' या पदातील अन्त्य नकाराचे 'पदान्तस्य' सू. १९८ या निषेधान्वयें णत्व होत नाही जर प्रकृत सूत्रात निर्दिष्ट असलेला आगम कित् केला असता तर 'आद्यन्तौ टकितौ' सू ३६ या सूत्रान्वयें तो आगम 'कुर्वन्' या पूर्व पदाचा अन्त्यावयव झाला असता व 'कुर्वन' या पदातील अन्त्य नकार पदान्ती आहे असे मानता येऊ शकले नसते, कारण 'यदागमा.' परि ११ या परिभाषान्वयें आगमरूप नकार पदाच्या अन्ती आहे असे मानणे भाग पडले असते त्यामुळें 'कुर्वन्' यातील अन्त्य नकाराला 'पदान्तस्य' हा णत्वनिषेध लागू पडला नसता व त्या नकाराचे णत्व होण्याची आपत्ति आली असती 'अत एव ङमो ह्रस्वादचि द्वे इति नासूत्रि । पर णत्व प्रति पूर्वस्य सिद्धतया णत्वापत्ते·' असे जे म्हटले आहे ते कोणत्या ग्रन्थात कोणी म्हटले आहे ते कळत नाही, कारण हें वचन काशिकेत किंवा पदमञ्जरीत किंवा प्रसादटीकेत आढळत नाही इतर कोण्या प्राचीन वैयाकरणाचे हें म्हणणे असेल त्या वैयाकरणाच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे की, 'ङमो ह्रस्वादचि द्वे' असे, प्रकृत सूत्राऐवजी, पाणिनीनें सूत्र केलें असतें तर त्या सूत्राचा असा अर्थ झाला असता की, ह्रस्व अचापुढें पदाच्या अन्ती 'ङम्' असल्यास व त्या 'ङम्' पुढें अच् आल्यास, त्या 'ङम्' चे द्वित्व होतें, व या अर्थान्वयें 'कुर्वन्नास्ते' या उदाहरणांत 'कुर्वन्'

या पदातील अन्त्य नकाराचे द्वित्व केल्यानें मूळचा नकार पदान्ती न ठरता, द्वित्वानें झालेला आगन्तुक पुढील नकार पदान्ती ठरला असता आणि त्यामुळें जरी तो पुढील आगन्तुक नकार पदान्ती आला असल्यामुळें 'पदान्तस्य' या णत्वनिषेधान्वयें त्याचे णत्व होऊ शकले नसते तरी, मूळच्या नकाराचें पदान्तत्व नष्ट झाले असल्यामुळें त्याला 'पदान्तस्य' हा निषेध लागू पडला नसता व त्याचे णत्व होण्याची आपत्ति आली असती, कारण णत्व-कार्य त्रैपादिक पर सूत्रानें होणारे असल्यामुळें, त्याच्या दृष्टीनें प्रकृत त्रैपादिक पूर्व सूत्रानें झालेलें द्वित्व कार्य सिद्ध ठरलें असते आणि त्यामुळें णत्वकार्याचा निषेध करते वेळीं द्वित्व कार्य झालेच नाही आणि 'कुर्वन्' यातील नकार पदान्तीच आहे असे मानता येऊ शकले नसत व त्या नकाराचे णत्व होणें टाळता येऊ शकलें नसतें वरील दोन्ही ग्रन्थाचा प्रकाशकारांनीं आपल्या टीकेंत तीं मतें खोडून काढण्याकरिता अनुवाद करून असें म्हटलें आहे की, बहिरङ्गपरिभाषेच्या सहायानें इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकत असल्यामुळें, वरील दोन्ही विधानें व्यर्थ व चूक ठरतात. त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, प्रकृत सूत्रात टित् आगम पठित न करिता कित् आगम पठित केला असता व त्यामुळें तो आगम 'कुर्वन्' या पूर्व पदाचा अन्त्यावयव झाला असता तरी आणि तसेच प्रकृत सूत्रात द्वित्वाचें विधान केलें असतें तरी, इष्ट रूपें सिद्ध होण्यात कांहीं अडचण आली नसती, कारण पुढें असणाऱ्या अच्च्या निमित्तामुळें पदान्तीं असलेल्या 'ङम्' ला आगम करणें किंवा त्याचे द्वित्व करणे हे कार्य परनिमित्तक असल्यामुळें बहिरङ्ग ठरतें व त्याच्या मानानें कोणत्याहि पुढें असणाऱ्या निमित्तामुळें न होणारे अपरनिमित्तक णत्वकार्य अन्तरङ्ग ठरतें, आणि 'असिद्धं बहिरङ्ग-मन्तरङ्गे' ही परिभाषा असल्यामुळें तें आगमरूप किंवा द्वित्वरूप बहिरङ्ग कार्य असिद्ध ठरतें आणि तें झालेच नाहीं असें मानल्यानें, 'कुर्वन् आस्ते' या उदाहरणांत 'कुर्वन्' यातील नकार पदान्तीच

आहे असे मानता येते व त्यामुळें 'पदान्तस्य' सू ११८ या निषेधान्वयें त्या नकाराचे णत्व होऊच शकत नाही आणि म्हणून 'इमुट्' अशा टित् आगमाचे विधान न करिता कित् आगमाचे किंवा द्वित्वाचे प्रकृत सूत्रात विधान केले असते तरी 'कुर्वन्' यातील अन्त्य नकाराचे णत्व होण्याची आपत्ति मुळीच आली नसती यथोद्देशपक्षात व तसेच कार्यकालपक्षात बहिरङ्ग परिभाषा त्रिपादीत त्रैपादिक अन्तरङ्ग कार्य करतेवेळी उपस्थित होते असे मानून प्रकाशकारानी आपल्या टीकेत वरील दोन्ही मताचे खण्डन केले आहे परंतु यथोद्देशपक्षात बहिरङ्ग परिभाषा — परि ५० — त्रिपादीत मुळीच उपस्थित होत नसून कार्यकालपक्षातच ती त्रिपादीत उपस्थित होते असे दीक्षिताचे मत असल्यामुळें ते म्हणतात की, प्रकाशकारानी वरील दोन मताचे केलेले खण्डन कार्यकालपक्षातच योग्य ठरते, कारण त्या पक्षात बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होत असल्यामुळें अन्तरङ्ग णत्वकार्याच्या दृष्टीनें बहिरङ्ग आगमरूप किंवा द्वित्वरूप कार्य असिद्ध ठरून झालेच नाहीं असे मानता येते आणि त्यामुळें 'कुर्वन्' या पदातील अन्त्य नकाराचे णत्व होण्याची आपत्ति टळत परंतु यथोद्देशपक्षात सापादिक बहिरङ्ग परिभाषेच्या दृष्टीनें पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्रिपादीचा अभाव असल्यामुळें, ती परिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नाही आणि त्यामुळे त्रैपादिक णत्वकार्य अन्तरङ्ग असून देखील त्याच्या दृष्टीनें पूर्व त्रैपादिक सूत्रानें झालेले आगम कार्य किंवा द्वित्वकार्य असिद्ध ठरत नाहीं आणि म्हणून त्या पक्षात 'कुर्वन्' यातील नकार पदान्तीं आहे असे मानता येऊ शकत नसल्यामुळें त्या नकाराला 'पदान्तस्य' हा निषेध लागू पडत नाही व नकाराचे णत्व होण्याची आपत्ति येते यथोद्देशपक्षात येणारी ही आपत्ति टाळण्याकरिता, प्रकृत सूत्र जसे पाणिनीनें पठित केलं आहे तसेच असणे आवश्यक आहे असा दी[illegible] म्हणण्याचा आशय आहे पुढें दीक्षि[illegible] असे म्हणतात क[illegible] + शस् =

राजन् + अस्' या स्थली पुढें असणाऱ्या असर्वनामस्थान अजादि 'शस् = अस्' या प्रत्ययाच्या निमित्तामुळें 'राजन्' या अङ्गाला 'यचि भम्' सू २३१ या सूत्रानें भसंज्ञा होत असल्यामुळें, 'अल्लोपोऽनः' सू २३८ या सापादिक सूत्रानें 'राजन्' यांतील 'अन्' मधील होणारा अकारलोप बहिरङ्ग ठरला व त्याच्या मानानें 'स्तोः श्चुना श्चुः' सू १११ या त्रैपादिक सूत्रानें नकाराचा जकार होणे हें अपरनिमित्तक श्चुत्वकार्य अन्तरङ्ग ठरत. यथें कार्यकालपक्ष मानल्यास त्रैपादिक अन्तरङ्ग श्चुत्वकार्याच्या दृष्टीनें सापादिक बहिरङ्ग अकारलोप कार्य असिद्ध ठरेल व अकाराचा लोप झालाच नाहीं आणि जकार व नकार या दोहोंमध्यें अकाराचें व्यवधान आहे असे मानावें लागेल व त्यामुळें नकाराचे चुत्व–जकार–होणार नाही आणि 'राज्ञः' हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाही म्हणून ही आपत्ति टाळण्याकरिता प्रकाशकारांनी या स्थली यथोद्देशपक्षाचा आश्रय करून व त्या पक्षात त्रैपादिक अन्तरङ्ग कार्य करतेवेळी बहिरङ्गपरिभाषा–परि ५०–त्रिपादीत उपस्थित होत नाहीं असे सांगून त्यांनी 'राज्ञः' या रूपाची सिद्धि केली आहे. त्या पक्षात बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नसल्यामुळें, सापादिक अकारलोप बहिरङ्ग असून व त्रैपादिक चुत्वकार्य अन्तरङ्ग असून देखील, त्या त्रैपादिक चुत्वकार्याच्या दृष्टीनें सापादिक अकारलोपकार्य असिद्ध ठरत नाहीं आणि म्हणून जकार व नकार या दोहोंमध्यें अकाराचे व्यवधान नाही असे मानल्यानें नकाराचें चुत्व होऊन 'राज्न्+अस् = राज्ञ्+अस् = राज्ञः' या इष्ट रूपाची सिद्धि होते. सारांश 'राज्ञः' या रूपाची सिद्धि करतेवेळीं प्रकाशकारांनी यथोद्देशपक्षात बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नाहीं असे म्हटले असल्यामुळें, त्यांनी प्राचीन वैयाकरणांच्या वरील दोन विधानांचें केलेलें खण्डन यथोद्देशपक्षात ग्राह्य ठरत नाहीं. यथोद्देशपक्ष व कार्यकालपक्ष या दोन्ही पक्षांत त्रैपादिक अन्तरङ्ग कार्य करतेवेळीं बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होते असे मानल्यास, 'सुपी+उपास्य = सुप्य्+उपास्यः' या स्थली 'इको यणचि

सू.४७ या सापादिक सूत्रानें होणारा यणादेश 'उ' या पुढें असणाऱ्या अच्‌रूप निमित्तामुळें होणारा असल्यामुळें व द्वित्वकार्य पुढें असणाऱ्या कोणत्याहि निमित्ताने होणारें कार्य नसल्यामुळें, अपरनिमित्तक द्वित्वकार्याच्या मानानें परनिमित्तक यणादेश बहिरङ्ग ठरून बहिरङ्गपरिभाषान्वयें असिद्ध ठरेल व ईकाराचे जागी यकार झालाच नाही आणि यकार विद्यमान नसून ईकारच विद्यमान आहे असे मानावे लागेल. मग जर यकार विद्यमानच नाही तर त्याचे द्वित्व कसे होणार ? पण प्रकाशकारानी तर 'यणो मयो द्वे वाच्ये'–सू ५४ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें यकाराचे द्वित्व व पुनर्द्वित्व केले आहे. यथोद्देशपक्षात देखील बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होते असे मानल्यास, त्या यकाराचे द्वित्व होणे मुळीच शक्य नाही आणि म्हणून त्यानी केलेले यकाराचे द्वित्व व त्रित्व त्याच्या प्रकृत म्हणण्याच्या विरुद्ध जाते हे उघड आहे. म्हणून यथोद्देशपक्षात बहिरङ्गपरिभाषा त्रिपादीत उपस्थित होत नाही हेंच मानणे उचित आहे व तसे मानले असता, प्रकाशकारानी प्राचीन वैयाकरणाच्या पूर्वोक्त दोन विधानाचे केलेले खण्डन यथोद्देशपक्षात योग्य न ठरता, कार्यकालपक्षातच योग्य ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे )

मनोरमा–ननु परमदण्डिनावित्यादौ अन्तर्वर्तिविभक्त्या पदत्वान्नुट् स्यादिति चेन्न। "उत्तरपदत्वे चापदादिविधौ" इति प्रत्ययलक्षणप्रतिषेधात् । अत एव परमवाचौ, परमगोदुहौ, परमलिहावित्यादौ कुत्वघत्वढत्वादीनि न । यत्तु प्राचा "ङ्ञि च पदे' इत्यतः "पदे" इत्यनुवर्त्याजादेः पदस्येति व्याख्यानाद् ङमुण् नेत्युक्तं तदनेन प्रत्युक्तम्, इहैव नलोपं वारयितुमुक्तरीतेरेव तेनाप्यनुसर्तव्यत्वात् ॥

'परमदण्डिनौ' इत्यादि स्थली अन्तर्वर्ति विभक्तीचा आश्रय केल्यानें पदसंज्ञा होत असल्यामुळे 'नुट्' आगम होण्याची आपत्ति येते असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे बरोबर नाही; कारण 'उत्तर-

पदत्वे चापदादिविधौ ' हे प्रत्ययलक्षणनिषेधक वार्तिक आहे. हें वार्तिक असल्यामुळेंच, 'परमवाचौ, परमगोदुहौ, परमलिहौ ' इत्यादि उदाहरणांत कुत्व, घत्व, ढत्व इत्यादि कार्यें होत नाहीत. ('परमौ च तौ दण्डिनौ च परमदण्डिनौ = परम औ दण्डिन् औ औ' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू ६५० या सूत्रानें 'औ' या दोन अन्तर्वर्ति-विभक्ति प्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'दण्डिन्' याला प्रत्ययलक्षणानें 'सुप्तिङन्त पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी पदसंज्ञा होऊं शकत असल्यामुळें, त्या पदाच्या अन्तीं असलेल्या नकारापुढील 'औ' या अच्ला प्रकृत सूत्रानें नुडागम पावतो असे शङ्काकाराचें म्हणणे आहे या शङ्केवर दीक्षित असें उत्तर देतात की, 'न लुमताङ्गस्य' १ १.६३ या सूत्रावरील भाष्यांत 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' — म्हणजे पदाच्या आदीला सांगितलेलें कार्य खेरीज करून इतर कोणतेंहि पदसंज्ञेच्या निमित्तामुळें प्राप्त होणारें कार्य सामासिक पदांतील उत्तर पदाला कर्तव्य असतां, ज्यांत 'लु' आहे असा लुक् इत्यादि शब्दांनी जेथें प्रत्यय नाहींसा झाला आहे तेथें 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' हें सूत्र लागू पडत नाहीं व प्रत्यय विद्यमान आहे असें मानून त्या उत्तर पदाला पदसंज्ञा करतां येत नाहीं — हें वार्तिक पठित केलें असल्यामुळें व 'परमदण्डिनौ' या उदाहरणांत 'दण्डिन्' या उत्तरपदाच्या आद्य वर्णाला कांहीं कार्य करणें नसून, 'दण्डिन्' हा समासांतील उत्तर अवयव पदसंज्ञक आहे असें मानून त्यांतील अन्त्य नकार या 'ङम्' पुढें असलेल्या 'औ' या अच्ला प्रकृत सूत्रानें नुडागम कर्तव्य असल्यामुळें, 'दण्डिन्' या उत्तर अवयवाला वरील वार्तिकान्वयें पदसंज्ञा होऊं शकत नाहीं, आणि 'दण्डिन्' यांतील अन्त्य नकार पदान्तीं आहे असें मानतां येत नसल्यामुळें, त्याच्या पुढील 'औ' या अच्ला नुडागमाची प्राप्ति होत नाहीं. 'न लुमताङ्गस्य' या सूत्रावरील भाष्यांत वरील वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतातः — ' उत्तरपदत्वे

चापदादिविधौ लुमता लुप्ते प्रत्ययलक्षण न भवतीति वक्तव्यम् । परमवाचा परमवाचे । परमगोदुहा परमगोदुहे । परमश्वलिहा परमश्वलिहे । पदस्य इति प्रत्ययलक्षणेन कुत्वादीनि मा भूवन्निति । अपदादि विधाविति किमर्थम् ? । दधिसेचौ दधिसेचः । सात्पदाद्योः इति प्रतिषेधो यथा स्यात । ' दीक्षित म्हणतात की हे वरील वार्तिक असल्यामुळेंच, 'परमवाचौ = परमा औ वाच् औ औ' या स्थली ' सुपो धातुप्रातिपदिकयो.' सू ६५० या सूत्रानें 'औ' या अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'वाच्' या उत्तर खण्डाला अन्तर्वर्ति विभक्तीचा आश्रय करून ' प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम् ' या सूत्राच्या सहायानें 'सुप्तिङन्त पदम्' या सूत्रानें होणारी पदसंज्ञा प्रत्यय-लक्षणानें करता येत नाही; त्यामुळें 'वाच्' यातील चकार पदान्तो आहे असे मानता येत नसल्यामुळें व तसेच त्या चकारापुढें झल् नसून 'औ' हा अच् असल्यामुळें, 'चो· कु.' सू. ३७८ या सूत्रानें होणारें कुत्व 'वाच्' यातील चकाराचे होत नाही. त्याचप्रमाणें 'परमगोदुहौ' या उदाहरणात 'दादेर्धातोर्घः' सू ३२५ या सूत्रानें होणारे हकाराचें घत्व 'गोदुह्' या उत्तर अंशातील हकाराचे होत नाही, आणि तसेच 'परमलिहौ' या स्थली 'लिह' या उत्तर अंशातील अन्त्य हकाराचे 'हो ढः' सू ३२४ या सूत्रानें होणारे ढत्व होत नाही, कारण 'गोदुह्, लिह्' या उत्तर अंशाना वरील वार्तिकान्वयें प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा करता येत नसल्यामुळें, त्यातील हकार पदान्ती आहे असे मानता येत नाही व घत्व, ढत्व ही कार्यें हकार पदान्ती असल्यास किंवा त्यापुढें 'झल्' असल्यास होणारी कार्यें आहेत आणि वरील उदाहरणात हकार पदान्तीहि ठरत नाही व त्या हकारापुढें 'झल्' नसून 'औ' हा अच् आहे.) प्रसादकारांनी 'उञि च पदे' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'पदे' या पदाची अनुवृत्ति करून व 'अचि पदे' याचा 'अजादेः पदस्य' असा अर्थ करून ('परमदण्डिना' या स्थली 'आ' या विभक्तिप्रत्ययाला) 'नुट्' आगम होत नाही असे जें म्हटले आहे ते, वरील वार्तिक

असल्यामुळें, व्यर्थ ठरते, आणि 'परमदण्डिना' या उदाहरणातच नकारलोपाचे निवारण करण्याकरिता त्याना, वर सांगितलेल्या रीतीचेच अनुसरण करणे आवश्यक आहे, म्हणजे त्याना वरील वार्तिक मानल्याशिवाय गत्यन्तर नाही (प्रकृत सूत्रावरील टीकेंत प्रसादकारानी 'ननु च परमदण्डिनेत्यत्र प्रत्ययलक्षणेन समासान्तर्वर्तिविभक्त्या अर्थेनास्य नस्य पदान्तत्वात् तस्मात्परस्याचो ङमुट् प्राप्नोति । नैवम् । उजि च पदे इत्यत पदे इत्यनुवर्तते । ततश्चापि पदेऽजापदे पदस्येत्यर्थं स्यात् । अतोऽत्र ङमुट् न भवति ।' असे म्हटले आहे त्याच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'परमदण्डिन् टा = परमदण्डिन् आ = परमदण्डिना' या उदाहरणात 'दण्डिन्' या उत्तर अंशाला प्रत्ययलक्षणानें जरी पदसंज्ञा होते तरी, 'दण्डिन्' या पदापुढें अजादि पद नसून 'आ' हा अजादि प्रत्यय असल्यामुळें व प्रकृत सूत्रात पूर्व सूत्रातून 'पदे' या पदाची अनुवृत्ति केल्यानें व प्रकृत सूत्रातील 'अचि' हे पद 'पदे' याचे विशेषण मानल्यानें 'अचि पदे' याचा षष्ठीविभक्तीत विपरिणाम करून 'अजादे पदस्य' असा अर्थ होत असल्यामुळें, 'आ' या विभक्ति प्रत्ययाला 'नुट्' आगम होत नाही यावर दीक्षित असे म्हणतात कीं, 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' हे वार्तिक मानल्यानेंच 'परमदण्डिन्' यातील 'दण्डिन्' या उत्तर अंशाला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होत नसल्यामुळें आणि म्हणून त्यातील अन्त्य नकार हा 'ङम्' पदान्तीं आहे असे मानता येत नसल्यामुळें, त्याच्या पुढील 'आ' या विभक्ति प्रत्ययाला वर सांगितल्याप्रमाण नुडागम होण्याची आपत्ति टाळता येत असल्यामुळें, ती आपत्ति टाळण्याकरिता 'उजि च पदे' या बरेच पूर्वी असलेल्या सूत्रातून 'पदे' या पदाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करण्याची गरज काय? 'परमदण्डिन् आ' या स्थली 'दण्डिन्' या उत्तर अंशाला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होते असे मानल्यास, 'दण्डिन्' यातील अन्त्य नकाराचा 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू २३६ या सूत्रानें जो लोप होण्याची आपत्ति येते

ती प्रकृत सूत्रात 'पदे' या पदाची अनुवृत्ति केल्यानें देखील कशी टाळता येणे शक्य आहे? म्हणून ती आपत्ति टाळण्याकरिता वरील वार्तिक मानणे भाग आहे आणि ते वार्तिक मानल्यानें वरील उदाहरणात नुडागम होण्याची आपत्ति देखील टाळता येत असल्यामुळें, प्रकृत सूत्रात 'पदे' या पदाची दोषयुक्त मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करण्याचा खटाटोप व्यर्थ ठरतो.)

शब्दरत्न–सञ्ज्ञायाम्-ङमिति प्रत्याहाररूपायाम्। विकल्पद्वयस्य मद्धचे इति। "विभाषामध्ये च ये विधयस्ते नित्या" इति "धुडः सत्वा च" इति सूत्रे भाष्योक्तेरिति भावः। न च तन्मध्ये पाठेन नित्यत्वकल्पने तन्मध्यपतितानां "नपरे नः" इत्यादीनामपि नित्यत्वापत्तिः। स्वरितत्वबलादनुवृत्तस्य पुनर्वाग्रहणान्निवृत्तौ कल्प्यमानायां स्वानन्तर एव तत्कल्पनेनोपपत्तावन्यत्र तत्कल्पने मानाभावात्। तस्मादुत्तरत्र वाग्रहणसामर्थ्यात्पूर्वसूत्रे एव वाग्रहणस्य निवृत्तिरिति भावः। तन्निषेधादिति। "तस्य दोष" इत्यस्य तु न प्राप्तिः। लत्वसाहचर्येणादेशणत्वस्यैव ग्रहणात्। पञ्चमीसमासस्यानित्यत्वाच्चेत्यपि बोध्यम्। परादित्वमिति। ततः परस्याच इति व्याख्यानेनेत्यर्थः। ङम इत्यस्य षष्ठ्यन्तत्वमाश्रित्य ङमन्तपदावयवस्य ह्रस्वात्परस्य ङमो ङमुडजादौ पदे इत्यर्थेन पूर्वादित्वमेव कुतो न कृतम्। "पदस्य" इति च "मादुपधाया" इत्यादाविवावयवषष्ठी। अजादौ पदे इत्युक्तेर्म्ना अभ्यासे इत्यतः शतरि मनिनित्यादावनन्त्यस्य नेति भावः। बहिरङ्गपरिभाषयेति। नुटो बहिरङ्गतया असिद्धत्वादित्यर्थः। उभयम्–ङमुटः परादित्वं, द्वे इति सूत्राकरणं च। पाक्षिकम्–कार्यकालसम्बन्धि। दिगिति। दिगर्थस्तु तत्परिभाषायास्त्रिपाद्यामभाव एव। किं च यदि यदागमा इति न्यायेनागमानामागमिधर्मवैशिष्ट्यमपि बोद्ध्यते इति तेन नकाराद्यवयवनस्यापि पदान्तत्वाणत्वनिषेधसिद्धिरित्युच्यते तर्हि ह्रस्वात्परस्य ङमन्तपदस्याचि परे ङमुडित्येवार्थस्तथा सति स्यान्न प्रागुक्तः, स्याच्चातिमहदनिष्टमिति। स्पष्टम् चेदं सर्वं भाष्ये।

मनोरमेंतील 'सज्ञाया च वृत्त दित्रम्' या पक्तोमधील 'मज्ञायाम्' या पदाचा 'इम् इति प्रत्याहारसज्ञायाम्' असा अर्थ आहे ('अन्त्येनेता सहित आदिर्मध्यगाना स्वस्य च सज्ञा स्यात' या अर्थाच्या वाचक 'आदिरन्त्येन सहेता' सू २ या सूत्रान्वयें सिद्ध होणाऱ्या प्रत्याहाराना 'सज्ञा' म्हणतात, कारण ते प्रत्याहार आदि वर्ण व तसेच आदि वर्ण आणि अन्त्य इत्सज्ञक वर्ण या दोहोमध्ये जे वर्ण अक्षरसमाम्नायात पठित आहेत त्याचे बोधक—वाचक—असतात या मनोरमेंतील पक्तीचे विवरण पूर्वी मनोरमेंत केलेच आहे.) 'विकल्पद्वयस्य मध्ये पाठादेव नित्यत्वलाभात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याच कारण हे कीं, 'पूड क्त्वा च' १ २ २२ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी 'विभाषामध्ये च ये विधयस्ते नित्या भवन्ति' असे म्हटले आहे पण दोन विभाषासूत्राच्या मध्यें पठित असलेली सूत्रें नित्यकार्यविधायक असतात असे मानल्यास ('ह मपरे वा' व 'मय उञो वो वा' या दोन) विभाषासूत्राच्या-मध्यें 'नपरे न' इत्यादि जी सूत्रें पठित आहेत ती सर्व नित्यकार्य विधायक सूत्रें ठरण्याची आपत्ति येईल असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे बरोबर नाही, कारण ('हे मपरे वा' या सूत्रातील 'वा' हे पद स्वरित असल्यामुळें त्याच्या) स्वरितत्वसामर्थ्यानें जरी त्याची उत्तर सूत्रात अनुवृत्ति होते तरी ('मय उञो वो वा' या उत्तर सूत्रात) 'वा' या पदाचे पुन्हा ग्रहण केले असल्यामुळें, ('हे मपरे वा' या पूर्व सूत्रातील) 'वा' या पदाची निवृत्ति झाली आहे, म्हणजे अनुवृत्ति बद झाली आहे, असे मानणे आवश्यक आहे व ती अनुवृत्ति ('मय उञो वो वा' या) उत्तर विभाषासूत्राच्या लगेच पूर्वी असलेल्या सूत्रातच, म्हणजे प्रकृत सूत्रातच, बद झाली आहे असे मानल्यानें उपपत्ति लागत असल्यामुळें, प्रकृत सूत्राच्या पूर्वी असलेल्या सूत्रात ती अनुवृत्ति बद झाली आहे असे मानण्यास काही प्रमाण नाही म्हणून पुढील विभाषासूत्रात 'वा' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें, त्या 'वा' ग्रहणसामर्थ्यानें त्याच्या लगेच पूर्वी

असलेल्या प्रकृत सूत्रातच पूर्वविभाषासूत्रातील 'वा' या पदाची अनुवृत्ति बंद होते असेच मानले पाहिजे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('हे मपरे वा' व 'मय उञो वो वा' या दोन विभाषासूत्राच्यामध्यें 'नपरे न, ङणो: कुक्टुक् शरि, डः सि धुट्, नश्च, शि तुक्, ङमो ह्रस्वादचि ङमुण्नित्यम्' ही सहा सूत्रें पठित आहेत. 'हे मपरे वा' या पूर्वविभाषासूत्रातून 'वा' हे पद 'मय उञो वो वा' या उत्तरविभाषा सूत्रात अनुवृत्त होऊ शकलेच असते. असे असून देखील त्या उत्तर सूत्रात पुन्हा 'वा' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें त्या पदाच्या ग्रहणसामर्थ्यानें हे स्पष्ट होते की, पूर्वी कोठें तरी 'त्या 'वा' पदाची अनुवृत्ति बंद झाली आहे ती कोठें बंद झाली आहे या प्रश्नाचे उत्तर देताना शब्दरत्नकार असे म्हणतात कीं, उत्तरविभाषासूत्राच्या लगेंच पूर्वी असलेल्या सूत्रात, म्हणजे प्रकृत सूत्रात, ती अनुवृत्ति बंद झाली आहे असे मानल्यानें निवृत्तीची आकांक्षा पूर्ण होत असल्यामुळें, त्याच्या पूर्वीच्या सूत्रात देखील ती अनुवृत्ति बंद झाली आहे असे मानण्यास काही प्रमाण नाही. म्हणून प्रकृत सूत्रापूर्वी पठित असलेल्या 'नपरे न' इत्यादि पाच सूत्रात 'हे मपरे वा' या पूर्वविभाषासूत्रातून 'वा' हे पद अनुवृत्त होते व प्रकृत सूत्रात त्या पदाची निवृत्ति होते असे मानता येत असल्यामुळे, प्रकृत सूत्रात 'नित्यम्' या पदाचे ग्रहण केले नसते तरी ते नित्यकार्यविधायकसूत्र ठरलेच असते व अशा रीतीनें प्रकृत सूत्रात 'नित्यम्' या पदाचें ग्रहण करण्याची वास्तविक काही आवश्यकता नव्हती; तरी पण सूत्रार्थ स्पष्ट होण्याकरिता त्या पदाचे ग्रहण प्रकृत सूत्रात केले आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे असे शब्दरत्नकाराचे म्हणणे आहे ) 'तस्य दोषः संयोगादिलोपलत्वणत्वेषु' या वचनाची 'सुगण्णीश.' या उदाहरणात प्राप्ति होत नाही, कारण त्या वचनात लत्वाचे ग्रहण केले असल्यामुळें, लत्वाच्या साहचर्याने णकारादेशाचेच ग्रहण होते. आणखी असे कीं, पञ्चमीसमासपक्ष अनित्य आहे हे

देखील जाणावे. (मनोरमेंत 'सुगण्णीश इति । ण्यल्लोपौ न स्थानिवत्पूर्वत्रासिद्धे तन्निषेधात्' असे म्हटले आहे व या पंक्तीचे विवरण मनोरमेंत केलेच आहे. यावर शंकाकार असे म्हणतो की, 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' या वार्तिकाचे 'तस्य दोष. संयोगादिलोपलत्वणत्वेषु' हे निषेधक वार्तिक आहे व त्या निषेधक वार्तिकाचा असा अर्थ आहे की, जरी त्रैपादिक कार्य करतेवेळी अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करता येत नाही असे 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' हे वार्तिक सांगते तरी संयोगादिलोप, लत्व व णत्व ही तीन त्रैपादिक कार्ये करतेवेळी अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव न केल्यास इष्टरूपाची सिद्धि न होण्याची आपत्ति येत असल्यामुळें, ती तीन कार्यें कर्तव्य असता, अजादेशाचे ठिकाणी स्थानिवद्भाव मानणे आवश्यक आहे. 'सुगण्णीशः' या उदाहरणात 'सुगण्' यांतील णकार हा 'ङम्' पदान्तीं असून त्यापुढें 'ई' हा जो 'ईशः' या उत्तर पदातीअ आद्यच् आहे त्याला प्रकृत सूत्रानें 'णुट् = ण्' हा आगम करणे हे णत्व कार्य असल्यामुळें, या उदाहरणात 'तस्य दोष·' हें निषेधक वार्तिक लागू पडते व त्यामुळें णिलोप व अकारलोप याचे ठिकाणीं त्या निषेधक वार्तिकान्वयें स्थानिवद्भाव होत असल्यामुळें व अशा रीतीनें 'ण्' हा 'ङम्' आणि 'ई' हा उत्तरपदातील आद्य अच् या दोहोंमध्यें 'णि = इ' व 'अ' याचे व्यवधान आहे असे मानणे भाग पडत असल्यामुळें, 'ई' या अचाला णुडागमरूप णत्वकार्य होऊ शकत नाही. या शंकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, पाणिनीय सूत्रात 'लुट्' आगम होण्याचे कोठेंहि विधान केले नसून 'कृपो रो लः' सू. २३५० इत्यादि सूत्रात रकाराचे जागी लकारादेश होणेच सांगितले आहे आणि म्हणून वरील निषेधक वार्तिकातील 'लत्व' या शब्दानें लकारादेशाचेच ग्रहण होते व त्या लत्वाच्या साहचर्यानें, 'सहचरितासहचरितयोः सहचरितस्यैव ग्रहणम्'– परि. ११२– या परिभाषान्वयें, त्या वार्तिकात निर्दिष्ट असलेल्या 'णत्व' या शब्दानें नकाराचे जागी होणाऱ्या

णकारादेशाचेच ग्रहण होऊ शकते व प्रकृत सूत्राने होणाऱ्या 'णुट् = ण्' या आगमरूप कार्याचे ग्रहण होऊ शकत नाही 'सुगण्णीश' या उदाहरणात नकाराचे जागी णकारादेश करणे नसून 'ई' या अचाला 'णुट' आगम करणे असल्यामुळें, वरील निषेधक वार्तिक या उदाहरणास लागू पडत नाही व त्यामुळें 'णि = इ' व 'अ' याचा जो लोप झाला आहे त्याचे ठिकाणी 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' या वार्तिकान्वयें स्थानिवद्भाव होऊ शकत नसल्यामुळें 'ईश' या उत्तरपदातील 'ई' या अचाला णुडागम होण्यात काही अडचण येत नाही पण प्रकृत स्थली जरी नकाराचे जागी णकारादेश करणे नसून 'णुट्' आगम करणे आहे तरी ते णुडागमरूप कार्य एका प्रकारे णत्व कार्यच आहे आणि म्हणून प्रकृत उदाहरणात 'तस्य दोष' हे निषेधक वार्तिक लागू पडते व त्यामुळे स्थानिवद्भावाचा येथें निषेध होऊ शकत नाही अशी कोणी शका केल्यास, ती शका मनात धरून शब्दरत्नकार दुसरे असे उत्तर देतात की, 'अच परस्मिन पूर्वविधौ' सू ५० या सूत्रातील 'पूर्वविधौ' या पदाचा जरी 'पूर्वस्य विधौ' व 'पूर्वस्मात् विधौ' असा दोन तऱ्हेनें भाष्यात विग्रह केला आहे तरी, षष्ठीसमासपक्ष हाच सिद्धान्तपक्ष मानला असून पञ्चमी समासपक्ष अनित्य मानला असल्यामुळें व 'सुगण्णीश' या उदाहरणात ज्या 'अ' व 'णि' चा लोप झाला आहे त्याच्या पूर्वी असलेल्या वर्णाला णुडागम कार्य करणे नसून त्याच्या पुढील 'ई' या अचाला तें कार्य करणे असल्यामुळें, अशा अनित्य पञ्चमीसमास पक्षाचा आश्रय करून प्रकृत स्थली णि लोपाचे व अ लोपाचे ठिकाणी स्थानिवद्भाव करणे योग्य नाही, कारण जेथें अनित्य पक्षाचा आश्रय केल्याशिवाय इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकत नाही तशाच स्थली अगतिकगतिन्यायानें अनित्य पक्षाचा आश्रय करणे योग्य ठरते पण प्रकृत उदाहरणात अनित्य पञ्चमीसमास-पक्षाचा आश्रय करून 'अ' लोप व णि लोप याचे ठिकाणी स्थानिवद्भाव केल्यानें इष्ट रूपाची सिद्धि न होता अनिष्ट रूप

होण्याची आपत्ति येत असल्यामुळें, तशा अनित्य पक्षाचा या स्थलीं आश्रय करणें अयोग्य ठरते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) 'ङमुट परादित्वं कुर्वन्नास्ते इत्यत्र णत्वप्रतिषेधार्थम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे ते (प्रकृत सूत्रातील 'ङम' हें पद षष्ठी न मानता दिग्योगेपञ्चमी मानून व ती पञ्चमी इतरत्र चरितार्थ होत नसून प्रकृतसूत्रनिर्दिष्ट 'अचि' ही सप्तमी 'मय उञो वो वा' या उत्तर सूत्रात चरितार्थ ठरत असल्यामुळें, त्या सप्तमीचा 'अच' असा षष्ठीत विपरिणाम करून प्रकृत सूत्राचा) 'ङमन्तात्पदात्परस्य अच' असा अर्थ केला असल्यामुळें, म्हटले आहे. येथें अशी शंका करण्यात येते की, प्रकृत सूत्रातील 'ङम' हें पद (पञ्चमी न मानता) षष्ठी मानून व ङमन्तपदावयव जो 'ङम्' तो ह्रस्व अचापुढें असल्यास व त्या 'ङम्' पुढें अजादि पद असल्यास त्या 'ङम्' ला 'ङमुट्' आगम होतो असा प्रकृत सूत्राचा अर्थ करून, 'ङमुट' आगम अजादि पदापूर्वी असलेल्या 'ङम्' चा आद्यवयव होतो असें कां मानले नाहीं ? प्रकृत सूत्र 'पदस्य' या अधिकारात पठित असल्यामुळें, ज्याप्रमाणे 'मादुपधायाः' सू १८९७ इत्यादि सूत्रात अनुवृत्त असलेले तें पद अवयवषष्ठी मानलें आहे त्याच-प्रमाण प्रकृतसूत्रात अनुवृत्त असलेले तें पद अवयव षष्ठी मानता येत नव्हे जसा प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे तसा अर्थ करिताना 'अजादौ पदे' असें म्हटले असल्यामुळें, 'म्ना अभ्यासे' या धातूहून 'शतृ = अत्' प्रत्यय केला असता, 'मनन्' इत्यादि रूपांतील अन्ती नस-णाऱ्या नकाराला नुडागम होत नाहीं असा शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे आणि ही शंका मनात धरूनच दीक्षितानी मनोरमेंत 'ङमुट परादित्वं कुर्वन्नास्ते इत्यत्र णत्वप्रतिषेधार्थम्' असें म्हटले आहे (शंकाकार असें म्हणतो की, दीक्षितानी प्रकृत सूत्राचा अर्थ करतेवेळीं 'पदस्य' या अधिकारात पठित असलेल्या प्रकृत सूत्रात अनुवृत्त होणाऱ्या 'पदस्य' या षष्ठ्यन्त पदाचा पञ्चमी विभक्तीत व प्रकृतसूत्रनिर्दिष्ट 'अचि' या सप्तम्यन्त पदाचा षष्ठीविभक्तीत जो

विपरिणाम केला आहे तसे करण्यात गौरव असून, ती पदें विभक्ति-विपरिणाम न करिता जशीची तशीच कायम ठेवण्यात लाघव आहे. म्हणून प्रकृत सूत्रातील 'ङम.' हे जें पद दीक्षितानी पञ्चम्यन्त मानले आहे ते तसे न मानता षष्ठ्यन्त मानावे व 'पदस्य' हे अनुवृत्त पद जसे दीक्षितांनी 'ङम:' या पदाचे विशेष्य मानले आहे तसेंच ते मानावे, पण ते पद अवयवषष्ठ्यर्थक मानावे. तसें मानले असता, 'पदस्य' या पदाचा पञ्चमीविभक्तीत विपरिणाम करण्याची गरज राहत नाही व 'ङम: पदस्य' याचा 'ङमन्तपदावयवस्य' असा अर्थ होतो. तसेच प्रकृत सूत्रात 'अञ्चि च पदे' या पूर्व सूत्रातून 'पदे' या पदाची मण्डूकप्लुतीने अनुवृत्ति करावी व त्या अनुवृत्त पदाचे प्रकृतसूत्रनिर्दिष्ट 'अचि' हे पद विशेषण मानावे तसे मानले असता, 'अचि' या पदाचा षष्ठीविभक्तीत विपरिणाम करण्याची गरज राहत नाही व 'अचि' या सप्तम्यन्त विशेषणाचा, 'यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे' – परि ३३– या परिभाषान्वयें 'अजादौ' असा अर्थ होऊन 'अचि पदे' याचा 'अजादौ पदे परे सति' असा अर्थ होतो व प्रकृत सूत्रांतील 'ङम' या पदाची पुनरावृत्ति केल्याने व ते पुनरावृत्त पद 'ह्रस्वात्' या अवधिवाचक पञ्चम्यन्त पदाशी अन्वित केल्यानें 'ङमन्तपदावयवस्य ह्रस्वात्परस्य ङम ङमुट् स्यात् अजादौ पदे परे सति' असा प्रकृत सूत्राचा अर्थ होतो आणि असा अर्थ करून 'ङमुट्' आगम पूर्व 'ङम्'चा आद्यवयव मानल्यानें इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकते. प्रकृत सूत्राचा वरप्रमाणें अर्थ करतेवेळी 'अजादौ पदे परे सति' असे म्हटले असल्यामुळें, 'मनन्' इत्यादि स्थली पूर्व नकाराला नुडागम होण्याची आपत्ति येत नाही. 'म्ना' धातूहून 'शतृ = अत्' प्रत्यय केला असता तो प्रत्यय शित् असल्यामुळें, 'पाघ्राध्मा' सू २३०७ या सूत्राने 'म्ना' चे जागी 'मन्' असा आदेश होऊन 'मनन्' असे शतृप्रत्ययान्त पुल्लिङ्गाचे प्रथमेच्या एकवचनाचे. रूप होते 'मनन्' हे ङमन्त पद असून याचा अवयव जो प्रथम नकार तो

'अ' या ऱ्हस्व अचापुढें आहे पण त्यापुढें 'शतृ=अत्' प्रत्ययातील 'अ' हा अच् असून अजादि पद नसल्यामुळें, वरील अर्थान्वयें त्या प्रथम नकाराला नुडागम होण्याची आपत्ति टळते. शब्दरत्नकार म्हणतात की, वर सांगितल्याप्रमाणे शकाकारानें जो प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे तो बरोबर मानल्यास, 'कुर्वन्नास्ते' या उदाहरणात 'कुर्वन्' या ङमन्त पदापुढें 'आस्ते' हे अजादि पद असल्यामुळें 'कुर्वन्' यातील अन्त्य नकाराला 'नुट्=न्' आगम केल्यानें तो टित् आगम नकाराचा आद्यवयव होईल व अशा रीतीनें तो आगमरूप नकार पदान्तीं येत नसल्यामुळें त्याला 'पदान्तस्य' सू १९८ हा निषेध लागू पडणार नाही व त्याचे णत्व होण्याची आपत्ति येईल ही आपत्ति टाळण्याकरिता व 'ङमुट्' आगम पूर्व पदातील अन्त्य 'ङम्' चा आद्यवयव न होता पुढील अचाचा आद्यवयव व्हावा याकरिता, प्रकृत सूत्रातील 'ङम' ही षष्ठी न मानता पञ्चमी मानून व 'अचि' या पदाचा षष्ठीत विपरिणाम करून दीक्षितानी कौमुदीत प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे असे शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे ) 'बहिरङ्गपरिभाषया गतार्थत्वादुभयमप्यसङ्गतम्' असे जें प्रकाशकाराचे म्हणणे मनोरमेंत दिले आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, परनिमित्तक नुडागम अपरनिमित्तक णत्वकार्याच्या मानानें बहिरङ्ग असल्यामुळें असिद्ध ठरतो (व तो झालाच नाही असे मानावे लागत असल्यामुळें, त्याचे णत्व होण्याची आपत्ति मुळीच येत नाही ) या वरील पङ्क्तीतील 'उभयम्' या पदाचा 'ङमुट् परादित्वम्, ङमो ऱ्हस्वादचि द्वे इति सूत्राकरण च' असा अर्थ आहे 'तदपि पाक्षिकम् असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यातील 'पाक्षिकम्' या पदाचा 'कार्यकालसम्बन्धि' म्हणजे ते म्हणणे कार्यकालपक्षातच लागू पडते, असा अर्थ आहे (या सर्व विषयाचे विवरण मनोरमेंत केलेच आहे ) 'इति दिक्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यातील 'दिक्' या शब्दाचा असा अर्थ आहे की, बहिरङ्गपरिभाषा निषादीत केव्हाहि, म्हणजे यथोद्देशपक्षात किंवा कार्यकालपक्षात, उपस्थित होत नाहीं.

आणखी असे की, 'यदागमाः'–परि ११–या परिभाषान्वयें (आगम हा आगमीचा केवळ अवयव होत नसून) आगमीचे ठिकाणी जे धर्म असतात ते धर्म त्या आगमीला होणाऱ्या आगमाचे ठिकाणी देखील येतात हे ज्ञापित होत असल्यामुळें ('कुर्वन्नास्ते' या उदाहरणात 'कुर्वन्' यातील अन्त्य नकार पदान्ती असल्यामुळें त्याचे ठिकाणी जो पदान्तत्व धर्म आहे तो) पदान्तत्व धर्म, त्या आगमिरूप नकाराला 'नुट् = न्' आगम होऊन त्याचा आद्यवयव होणाऱ्या 'नुट्' आगमाचे ठिकाणी येतो आणि म्हणून आगमरूप नकार देखील पदान्तत्वधर्म विशिष्ट आहे असे मानता येत असल्यामुळें 'पदान्तस्य' सू १९८ हा निषेध त्या आगमाला देखील लागू पडतो (व त्यामुळें त्या आगमाचे णत्व होण्याची आपत्ति टळते) असे जर म्हणणे असेल तर, प्रकृत सूत्राचा 'ह्रस्वात्परस्य ङमन्त-पदस्य अचि परे ङमुट् स्यात्' असाच अर्थ होईल व शकाकारानें प्रकृत सूत्राचा पूर्वी सांगितल्याप्रमाणे जसा अर्थ केला होता तसा अर्थ करता येणार नाही व त्यामुळें अनिष्ट रूपें सिद्ध होण्याची फार मोठी आपत्ति येईल हे सर्व प्रकृत सूत्रावरील भाष्यात स्पष्ट केले आहे (शकाकारानें 'ङम' ही षष्ठी मानून प्रकृत सूत्राचा जो अर्थ केला आहे तो अर्थ बरोबर मानल्यास, 'कुर्वन्नास्ते' या उदाहरणात आगमरूप पूर्व नकार पदान्ती येत नसल्यामुळें, त्याचे णत्व होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरिता, 'पदान्तभक्त पदान्तग्रहणेन ग्राहिष्यते,' म्हणजे 'आगमीयद्धर्मवैशिष्ट्येन भासते आगमस्याऽपि तद्धर्मवैशिष्ट्येन ग्रहणम्,' या प्रकृत सूत्रावरील भाष्यातील वचनाचा आधार घेऊन, शकाकार असे म्हणतो की, आगमीचे ठिकाणीं जे धर्म असतात ते आगमाचे ठिकाणी देखील येत असल्यामुळें व 'कुर्वन्' यातील अन्त्य नकार हा आगमी पदान्ती असल्यामुळें, त्याचे ठिकाणी असणारा पदान्तत्वधर्म त्याला होणाऱ्या आद्यवयवरूप 'नुट् = न्' या आगमाचे ठिकाणी देखील येतो आणि अशा रीतीनें आगमरूप प्रथम नकार पदान्तत्वधर्म-

विशिष्ट, म्हणजे पदान्तीच आहे, असे मानता येत असल्यामुळें, 'पदान्तस्य' सू. १९८ हा निषेध त्याला देखील सारखाच लागू पडतो व त्यामुळें त्या आगमरूप प्रथम नकाराचे णत्व होण्याची आपत्ति टळते परंतु 'आगमानामागमिधर्मवैशिष्ट्यम्' असा जर 'यदागमा.'—परि. ११—या परिभाषेचा अर्थ केला तर, 'सर्व + आम्' या स्थली 'आम्' हा पदान्ती असल्यामुळें त्याचे ठिकाणी असणारा पदान्तत्वधर्म 'आमि सर्वनाम्न सुट्' सू २१७ या सूत्रानें त्याला होणाऱ्या 'सुट् = स्' या आगमात देखील येईल आणि 'साम्' यातील सकार पदान्तत्व धर्मविशिष्ट ठरेल व त्यामुळें 'अपदान्तस्य मूर्धन्यः' सू २१० या अधिकारात पठित असलेल्या 'आदेशप्रत्यययोः' सू २१२ या अपदान्ताला या सूत्रानें अपदान्त असणाऱ्या सकाराला होणारे षत्व त्या सुडागमाचे—सकाराचे—होणार नाही व 'सर्वेषाम्' असे इष्ट रूप सिद्ध होऊ शकणार नाहीं म्हणून 'पदान्तभक्तः पदान्तग्रहणेन ग्राहिष्यते' असे जें प्रकृत सूत्रावरील भाष्यात म्हटले आहे ते सिद्धान्तभाष्य नसून एकदेशिभाष्य आहे असेच मानणे योग्य आहे व तसे मानले असता, वरील उदाहरणात अपदान्त ठरणाऱ्या नुडागमाचे णत्व होण्याची आपत्ति येते. याशिवाय शब्दरत्नकार असे म्हणतात की, प्रकृत सूत्रात अनुवृत्त होणारे 'पदस्य' हे पद विशेष्य मानले असल्यामुळें ते पद शकाकारानें षष्ठ्यन्त मानलेल्या 'ङम' या पदाचे जसे विशेष्य होतें तसेच ते प्रकृतसूत्रनिर्दिष्ट 'ह्रस्वात्' या पदाशी देखील विशेष्यरूपानें अन्वित होईल व शकाकारानें प्रकृत सूत्रातील 'ङमः' या पदाची जी द्विरावृत्ति केली आहे तशी द्विरावृत्ति करण्यास कोणतेहि प्रमाण नसल्यामुळें आणि तसेच त्यानें प्रकृत सूत्रात 'पदे' या पदाची जी मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति केली आहे तशी अनुवृत्ति करणे दोषयुक्त असल्यामुळें, 'ङम' या पदाची द्विरावृत्ति व 'पदे' या पदाची अनुवृत्ति न करिता प्रकृत सूत्राचा अर्थ केल्यास, 'ह्रस्वात्परस्य ङमन्तपदस्य अचि परे ङमुट् स्यात्' असाच अर्थ होऊ शकतो व

'ङमन्तपदावयवस्य ऱ्हस्वात्परस्य ङमो ङमुट् अजादौ पदे' असा शंकाकारानें पूर्वी केलेला अर्थ मुळीच होऊं शकत नाही आणि त्यामुळें अतिव्याप्तिरूप व अव्याप्तिरूप दोष येईल, म्हणजे जेथें 'ङमुट्' आगम होणे इष्ट नाहीं तेथें तो होण्याची व जेथें तो होणे इष्ट आहे तेथें तो न होण्याची आपत्ति येईल, आणि इष्ट रूपाची सिद्धि होणार नाही. उदाहरणार्थ 'अस्ति पराङ आत्मा, देवदत्त रामान् इति वद' या दोन उदाहरणापैकी प्रथम उदाहरणात 'अस्ति' यातील ऱ्हस्व इकार या अच्पुढें 'पराङ्' हे ङमन्त पद असून त्यापुढें 'आ' हा अच् असल्यामुळें, त्यातील 'ङ्' हा दीर्घ अचापुढें असून देखील त्याला 'ङुट्' आगम होण्याची आपत्ति येईल. तसेच द्वितीय उदाहरणात 'देवदत्त' यातील अन्त्य 'अ' या ऱ्हस्व अच्पुढें 'रामान्' हें ङमन्त पद असून त्यापुढें 'इ' हा अच् असल्यामुळे, जरी 'न्' हा 'ङम्' 'आ' या दीर्घ अच्पुढें आहे तरी त्याला नुडागम होण्याची आपत्ति येईल. पण 'कुर्वन्नास्ते, सन्नच्युत.' इत्यादि स्थली 'कुर्वन्, सन्' हीं ङमन्त पदें ऱ्हस्व अचापुढें नसल्यामुळें, त्याना 'ङमुट्' आगम होऊं शकणार नाही. साराश असा प्रकृत सूत्राचा अर्थ झाल्यानें इष्ट रूपे सिद्ध होऊं शकत नसल्यामुळें व शंकाकारानें प्रकृत सूत्राचा जो पूर्वी अर्थ केला होता तसा अर्थ वर सांगितल्याप्रमाणे होऊच शकत नसून तो बरोबर मानला तरी, णत्व होण्याची जो आपत्ति येत होती ती टाळण्याकरिता त्यानें ज्या भाष्यवचनाचा आधार घेतला आहे ते भाष्यवचन सिद्धान्तवचन नसून एकदेशीची उक्ति असल्यामुळें, त्यानें केलेली शंका योग्य मानता येत नाही प्रकृत सूत्रावरील भाष्यात —८-३-३२—भाष्यकार म्हणतात: 'यदि ङम एव ङमुट् क्रियते कुर्वन्नास्ते कृषन्नास्ते,—रषाभ्या नोणः समानपदे इति णत्व प्राप्नोति। पदान्तस्य नेति प्रतिषेधो भविष्यति। पदान्तस्येत्युच्यते, नैप पदान्त.। पदान्तभक्त: पदान्तग्रहणेन ग्राहिष्यते। एवमपि न सिध्यति।' या भाष्यावरून हें स्पष्ट होते की, भाष्यकाराच्या मते

पदान्त 'ङम्' ला 'ङमुट्' आगम करणे इष्ट नसून त्याच्यापुढील अचाला 'ङमुट्' आगम करणे इष्ट आहे आणि म्हणून देखील शब्दरत्नकारानें प्रकृत सूत्राचा केलेला अर्थ स्वीकारार्ह नाही व दीक्षितानीं प्रकृत सूत्राचा कौमुदीत जो अर्थ केला आहे तो मानल्यानें कोणतीहि आपत्ति न येता सर्व इष्ट रूपाची सिद्धि होऊ शकत असल्यामुळें, तोच अर्थ मानणे योग्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे )

शब्दरत्न—प्रत्ययलक्षणप्रतिषेधादिति । इद च प्रकृतसूत्रे भाष्ये स्पष्टम् । अनुसर्त्तव्यत्वादिति । यदि तु स निषेधो "अपदादिविधौ" इति पर्युदासेन पदान्तत्वनिमित्तके विधावेवेति 'न लुमता—" इति सूत्रे भाष्ये स्पष्टम् । किं चोत्तरपदस्य कार्यित्वेएव तत्प्रवृत्तिरत एव माषकुम्भवापेनेत्यादौ "पदव्यवायेऽपि" इति निषेधसिद्धिरित्युच्यते तदा प्राचीनोक्तमजादेः पदस्येति व्याख्यानमेव शरणम् । स्पष्ट चैव व्याख्यान प्रकृतसूत्रे "उञि च पदे" इत्यत्र च भाष्ये । तेन निषेधेन सिद्धमिति प्रकृतसूत्रभाष्योक्तिस्त्वेकदेशिन इत्यास्ता तावत् ।'

'उत्तरपदत्वे चापदादिविधौ इति प्रत्ययलक्षणप्रतिषेधात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे तें प्रकृत सूत्रावरील भाष्यात ८. ३. ३२ सांगितले आहे (त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात 'नैष दोष । उक्तमेतत्—उत्तरपदत्वे चापदादिविधौ लुमता लुप्ते प्रत्ययलक्षण न भवतीति ।') 'उक्तरीतेरेव तेनाप्यनुसर्तव्यत्वात्' असे जरी मनोरमेंत म्हटले आहे तरी, 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' या निषेधक वार्तिकातील 'अपदादिविधौ' हा (प्रसज्यप्रतिषेध न मानता) पर्युदास मानून पदान्तत्वाच्या निमित्तामुळें होणारें कार्य कर्तव्य असताच प्रत्ययलक्षणप्रतिषेध लागू पडतो असे 'न लुमताङ्गस्य' १ १ ६३, या सूत्रावरील भाष्यात म्हटल्याप्रमाणे मानल्यास आणि जेथें उत्तर पद कार्यि आहे, म्हणजे समासांतील उत्तर पदाला कार्य कर्तव्य आहे, तेथेंच वरील निषेधक वार्तिक लागू पडतें असे मानल्यास व तसे मानल्याशिवाय

'माषकुम्भवापेन' इत्यादि स्थली 'पदव्यवायेऽपि' सू १०५७ या निषेधक सूत्रान्वये नकाराचे णत्व होत नाही असे म्हणणे असल्यास प्रसादकारानी प्रकृत सूत्रातील 'अचि' या पदाचे 'अजादे = पदस्य' असे जें व्याख्यान केले आहे तेच मानणे माग आहे प्रकृत सूत्रावरील भाष्यात व 'उजि च पदे' ८ ३ २१ या सूत्रावरील भाष्यात अशाच प्रकारचे व्याख्यान केले आहे आणि त्या व्याख्यानाचा आश्रय केल्यास 'तेन निषेधेन सिद्धम्' असे जें प्रकृत सूत्रावरील भाष्यात म्हटले आहे ते एकदेशिभाष्य आहे-एकदेशीची उक्ति आहे-असे मानले पाहिजे या विषयासबधाने एवढें व्याख्यान पुरे ('उत्तरपदत्वे चापदादिविधौ' या वार्तिकातील 'अपदादि विधौ' हा प्रसज्य प्रतिषेध मानून या वर्तिकाचा 'उत्तरपदस्य पदसज्ञाया कर्तव्याया प्रत्ययलक्षणप्रतिषेधो वाच्य, पदादिविधि वर्जयित्वा' असा पूर्वी अर्थ केला आहे पण शब्दरत्नकार म्हणतात की 'न लुमताङ्गस्य' या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानी 'अपदादिविधौ' हा प्रसज्य प्रतिषेध न मानता पर्युदास मानला आहे त्या भाष्यात भाष्यकार म्हणतात— 'एव तर्ह्युत्तरपदत्वे च पदादिविधो लुमता लुप्ते प्रत्ययलक्षण भवतीति वक्ष्यामि तन्नियमार्थं भविष्यति, पदादिविधावेव न पदान्तविधाविति।' म्हणून 'नञिवयुक्तम्'-परि ७५-या न्यायान्वयें 'अपदादिविधौ' या पर्युदासाचा 'पदान्तत्वनिमित्तके विधावेव' असा तद्भिन्न पण तत्सदृश अर्थ होतो व त्यामुळे वरील वार्तिकाचा 'उत्तरपदस्य पदसज्ञाया कर्तव्याया पदान्तत्वनिमित्तके विधौ कर्तव्ये एव प्रत्ययलक्षणप्रतिषेधो वाच्य' असा अर्थ होतो या अर्थान्वयें 'परमदण्डिनौ, परमदण्डिना' इत्यादि स्थली 'न लोप प्रातिपदिकान्तस्य' सू २३६ या सूत्रानें पावणारा पदान्तत्वनिमित्तक नकार लोप होण्याची व तसेच प्रकृत सूत्रानें पुढें असणाऱ्या अजादि प्रत्ययाला ङमन्तपदनिमित्तक नुडागम होण्याची आपत्ति टळते, कारण पदाच्या अन्ती असणाऱ्या नकाराचा लोप करणे व तसेच ङमन्त पदापुढें असणाऱ्या अचाला 'ङमुट्' आगम

करणे ही दोन्ही पदान्तत्वाच्या निमित्तामुळें होणारी कार्ये आहेत व अशी पदान्तत्वनिमित्तक कार्ये करतेवेळीं समासातील उत्तर पदाला पदसंज्ञा कर्तव्य असता, त्या उत्तर पदापुढील ज्या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा 'सुपो धातुप्रातिपदिकयो.' सू ६५० या सूत्रानें लुक् झाला आहे त्याला, प्रकृत वार्तिकाच्या वरील अर्थान्वयें, 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ हें सूत्र लागू पडत नाहीं आणि म्हणून समासातील उत्तरपदाला पदसंज्ञा होऊ शकत नसल्यामुळें, 'परमदण्डिनौ' इत्यादि स्थलीं नकारलोप व 'इमुट्' आगम होऊ शकत नाहीत हें उघड आहे पुढें शब्दरत्नकार असे म्हणतात की, 'माषकुम्भवापेन' इत्यादि उदाहरणात 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू. १९७ या सूत्रानें नकाराचे णत्व होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरिता वरील वार्तिकाचा 'उत्तरपदस्य पदसंज्ञायां कर्तव्यायामुत्तरपदस्य कार्ये कर्तव्ये एव प्रत्ययलक्षणप्रतिषेधो वाच्यः' असा देखील नियामक अर्थ करणे आवश्यक आहे, कारण 'कुम्भ' या उत्तर पदाला पदसंज्ञा करतवेळीं प्रत्ययलक्षणप्रतिषेध केल्यानें त्याला पदसंज्ञा होणार नाहीं व 'पदव्यवायेऽपि' सू १०५१ हा निषेध लागू पडणार नाहीं म्हणून 'कुम्भ' याला पदसंज्ञा होण्याकरिता 'उत्तरपदस्य कार्यित्वे एव प्रत्ययलक्षणप्रतिषेधः' असा अर्थ करणे जरूर आहे व तसा अर्थ केल्यानें 'कुम्भ' या पदाला कोणतेंहि कार्य कर्तव्य नसल्यामुळें प्रत्ययलक्षणप्रतिषेध लागू पडत नाहीं व त्यामुळें 'कुम्भ' याला पदसंज्ञा होऊन 'पदव्यवायेऽपि' या निषेधान्वयें वरील उदाहरणात नकाराचे णत्व होण्याची आपत्ति टळते. परंतु या अर्थान्वयें 'परमदण्डिनौ, परमदण्डिना' इत्यादि स्थलीं 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू २३६ या सूत्रानें नकारलोप करतेवेळीं 'दण्डिन्' हे उत्तरपद कार्यि असल्यामुळें, म्हणजे त्या उत्तर पदांतील अन्त्य नकाराचा लोप कर्तव्य असल्यामुळें, त्याला जरी पदसंज्ञा होत नाहीं व अशा रीतीनें त्यातील अन्त्य नकाराचा लोप होण्याची जरी आपत्ति टळते तरी, प्रकृत सूत्रानें 'इमुट्' आगम करतेवेळीं समासातील 'दण्डिन्'

हे उत्तर पद कार्यि नसल्यामुळें, म्हणजे त्या उत्तरपदास नुडागम करणे नसून त्याच्या पुढील अजादि विभक्तिप्रत्ययाला नुडागम करणे असल्यामुळें, तशा कार्यि नसणाऱ्या उत्तर पदाला प्रत्ययलक्षणप्रतिषेध लागू पडणार नाही व त्या उत्तर पदाला पदसंज्ञा होऊन पुढें असणाऱ्या अजादि प्रत्ययाला वरील उदाहरणात प्रकृत सूत्रानें नुडागम होण्याची आपत्ति येईल म्हणून शब्दरत्नकार म्हणतात की, ही आपत्ति टाळण्याकरिता प्रसादकारानी म्हटल्याप्रमाणे प्रकृत सूत्रात 'ङ्ञि च पदे' या पूर्व सूत्रातून 'पदे' या पदाची अनुवृत्ति करणे आवश्यक आहे व प्रकृत सूत्रात निर्दिष्ट असलेले 'अचि' हें पद 'पदे' या अनुवृत्त पदाचे विशेषण मानल्यानें, 'यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे'–परि. ३३–या परिभाषान्वयें, 'अचि' या पदाचा 'अजादौ' असा अर्थ होतो, व प्रकृत सूत्रात 'ङमः' हा पञ्चमीनिर्देश व 'अचि' हा सप्तमीनिर्देश असल्यामुळें, 'उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्'–परि ७१–या न्यायान्वयें, 'अचि पदे' याचा षष्ठी विभक्तीत विपरिणाम होऊन 'अजादेः पदस्य ङमुट् स्यात्' असा सूत्रार्थ होतो त्यामुळें 'परमदण्डिनौ, परमदण्डिना' इत्यादि स्थलीं ङमन्त पदापुढें अजादि प्रत्यय असून अजादि पद नसल्यामुळें, अजादि प्रत्ययाला नुडागम होण्याची आपत्ति टळते. प्रसादकारानी 'पदे' या पदाची प्रकृत सूत्रात जी अनुवृत्ति केली आहे तिला प्रकृत सूत्रावरील व 'ङ्ञि च पदे' या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे असे शब्दरत्नकार म्हणतात प्रकृत सूत्रावरील भाष्यांत ङमन्त पदाला 'ङमुट्' आगम केल्यानें काय दोष येईल हे सांगून ङमन्त पदापुढील अजादि विभक्तिप्रत्ययाला 'ङमुट्' आगम होण्याची जी आपत्ति येते तिचे निवारण करण्याकरितां भाष्यकार म्हणतात–'एवं तर्हि पद इति वर्तते । क्व प्रकृतम् ? । ङ्ञि च पदे इति ।' तसेच 'ङ्ञि च पदे' या पूर्व सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'पद इति किमर्थम् ? । तन्त्रे उत, तन्त्रयुत, तन्त्र उतम् । पदे इति शक्यमवक्तुम्...लक्षणप्रतिपदोक्तयो.

प्रतिपदोक्तस्यैवेति। उत्तरार्थं तर्हि पदग्रहण कर्तव्यम्-ङमो ह्रस्वादचि ङमुण्नित्यमित्यपदे मा भूत्- दण्डिना शकटिना।' वरील संपूर्ण विषयाचे प्रकृत सूत्रावरील शब्देन्दुशेखरात विस्तृत व सुंदर रीतीनें विवेचन केले आहे. त्या ग्रन्थात नागेश म्हणतातः-' भाष्ये तु विभक्ति-व्यत्ययप्रकल्पने गौरवात् पदावयवङम परस्येति वैयधिकरण्य-मेवोक्तम् । दण्डिनेत्यत्र ङमुङभावो मण्डूकप्लुत्या उञि च पदेइत्यतः पदे इत्यनुवर्त्यातादे. पदस्य ङमुडित्यर्थेन बोध्यः । पदस्येत्यस्यावृत्त्या सम्बन्धेऽपि विशेषणविशेष्ययोरुभया सप्तम्यन्तत्वे एव तदादि विधि-प्रवृत्त्या तदलाभः स्यात् । एतदर्थमेवाचीति सप्तमीनिर्देश । ङमन्त यत्पदमित्यर्थेऽपि परमदण्डिनेत्यादावेतद्वारणाय पदे इत्यनुवृत्तिरा-वश्यक्येव। अन्तर्वर्तिविभक्त्या दण्डिन्नित्यस्य पदत्वात् । उत्तरपदत्वे चेति प्रत्ययलक्षणनिषेधस्तु न, माषकुम्भवापेनेत्यादौ पदव्यवायेऽपीति निषेधसिद्धयेतस्य यत्रोत्तरपदस्य कार्यित्व तत्रैव प्रवृत्ते :। तेन निषेधेन सिद्धमित्येतत्सूत्रस्थभाष्योक्तिस्त्वेकदेशिन इति दिक्।' सारांश 'उञि च पदे' या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात वर सांगितल्याप्रमाणें 'पदे' या पदाची अनुवृत्ति करणे आवश्यक असल्यामुळें, 'उत्तरी-तेरेव तेनाप्यनुसर्तव्यत्वात्' असे जें दीक्षितांनी मनोरमेंत म्हटले आहे तें बरोबर मानतां येत नाहीं असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. ते पुढें असे म्हणतात की, प्रसादकारांनी जशी अनुवृत्ति केली आहे तशी अनुवृत्ति करणं हाच सिद्धान्तपक्ष असल्यामुळें, 'तेन निषेधेन सिद्धम्,' म्हणजे 'उत्तरपदे चापदादिविधौ' या निषेधक वार्तिकान्वयें हें सर्व सिद्ध होतें, असे जें प्रकृत सूत्रावरील भाष्यात म्हटले आहे तें एकदेशिभाष्य आहे व सिद्धान्तभाष्य नव्हे असे मानले पाहिजे. )

मनोरमा—समः सुटि। यद्यपि मोऽनुस्वारेण सिद्धं तथाप्यनु-नासिकस्वत्रिमकारार्थमित्यर्थमिदम् ॥

जरी 'मोऽनुस्वारः' सू. १२२ या सूत्रानें ('सम् + स्कर्ता' या स्थलीं 'सम्' या उपसर्गांतील मकाराचा अनुस्वार होऊन)

'सस्कर्ता' असे (एकसकारयुक्त) रूप सिद्ध होऊ शकते तरी मागील वर्ण अनुनासिक व्हावा व त्रिसकारयुक्त रूप सिद्ध व्हावे याकरिता 'सम सुटि' सू १३५ हे प्रकृत सूत्र मुद्दाम केले आहे. ('सम् + कृ + तृच्' या स्थली 'ण्वुल्तृचौ' सू २८९५ या सूत्राने 'कृ' धातूहून 'तृच्' प्रत्यय केला असता 'सपरिभ्या करोतौ भूषणे' सू २५५० या सूत्राने 'कृ' धातूला 'सुट् = स्' आगम होऊन 'सम् + स्कर्ता' अशी स्थिति होते अशा स्थितीत 'सम्' या पदातील मकार पदान्ती असल्यामुळे 'मोऽनुस्वार' या सूत्राने मकाराचे जागी अनुस्वार होऊन 'सस्कर्ता' असे रूप सिद्ध होऊ शकतेच तथापि 'सम्' यापुढे 'सुट् = स्' आला असता 'सम' यातील मकाराचे प्रकृत सूत्राने रुत्व व्हावे व 'अत्रानुनासिक पूर्वस्य तु वा' सू १३६ या सूत्राने 'रु' पूर्वी असलेला 'स' यातील अकार विकल्पेकरून अनुनासिक व्हावा व 'खरवसानयोर्विसर्जनीय' सू ७६ या सूत्राने 'रु' चा, म्हणजे रेफाचा, विसर्ग होऊन आणि 'सपुकाना सो वक्तव्य'–सू १३८ वरील वार्तिक–या वार्तिकाने त्या विसर्गाचा सकार होऊन 'सँस्स्कर्ता' असे सानुनासिक व द्विसकारयुक्त रूप सिद्ध झाल्यावर 'अनचि च' सू ४८ या सूत्राने प्रथम सकाराचे द्वित्व होऊन 'सँस्स्स्कर्ता' असे अनुनासिकयुक्त व त्रिसकारयुक्त इष्ट पाक्षिक रूप सिद्ध व्हावे याकरिता 'सम सुटि' हे प्रकृत सूत्र मुद्दाम केले आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे

शब्दरत्न—त्रिसकारकत्वेति । न च पुनर्द्वित्वेन तदपि सिद्धम् । लक्ष्ये लक्षणस्येति न्यायात् । अत्र चेदमेव ज्ञापक बोध्यम् ।।

सकाराचे पुन्हा द्वित्व केल्याने तसे त्रिसकारयुक्त रूप देखील सिद्ध होऊ शकते असे कोणी म्हटल्यास, ते म्हणणे बरोबर नाही, कारण 'लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्ति', म्हणजे लक्ष्याचे ठिकाणी सूत्राची एकदाच प्रवृत्ति होते, असा न्याय आहे 'सम सुटि' हे

प्रकृत सूत्रच वरील न्यायाचे ज्ञापक आहे हे जाणावे. ('सम् + स्कर्ता या स्थली 'समो वा लोपमेके' या भाष्यवचनान्वयें 'सम्' यातील मकाराचा लोप केला असता, हे वरील वचन 'रु' प्रकरणात पठित असल्यामुळें, 'अत्रानुनासिक पूर्वस्य तु वा' सू १३६ या सूत्रानें 'स' यातील अकार अनुनासिक होऊन 'सँस्कर्ता' असे सानुनासिक रूप सिद्ध होऊ शकतेच. अशा स्थितीत 'स्कर्ता' यातील सकाराचे 'अनचि च' सू ४८ या सूत्रानें द्वित्व केल्यास व त्याच सकाराचे पुन्हा त्याच सूत्रानें द्वित्व केल्यास, त्रिसकारयुक्त रूप सिद्ध होऊ शकतेच आणि म्हणून 'सम सुटि' हे प्रकृत सूत्र असण्याची काही आवश्यकता नाही असे शंकाकाराचे म्हणणे आहे या शंकेवर शब्द-रत्नकार असे उत्तर देतात की, 'लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्तिः' हा न्याय असल्यामुळें, 'स्कर्ता' यातील सकाराचे 'अनचि च' या सूत्रानें एकदा द्वित्व केल्यावर पुन्हा त्याच सूत्रानें त्या सकाराचे द्वित्व करता येत नाही. म्हणून अनुनासिकयुक्त व त्रिसकारयुक्त रूप सिद्ध व्हावे याकरिता 'समः सुटि' हे सूत्र सुद्दाम केले आहे व या सूत्रानें द्विसकारयुक्त रूप सिद्ध केल्यावर 'अनचि च' हें सूत्र प्रवृत्त केलें असता त्रिसकारयुक्त रूप सिद्ध होतें आणि अशा रीतीनें प्रकृत सूत्र 'लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्तिः' या न्यायाचे ज्ञापक ठरतें. प्रकृत सूत्र केलें नसते तर त्रिसकारयुक्त रूप, वरील न्याय असल्या-मुळें, सिद्ध होऊ शकलें नसते आणि अशा रीतीनें ते सूत्र आवश्यक ठरते असा शब्दरत्नकारांचा म्हणण्याचा आशय आहे )

मनोरमा—'अत्रानुनासिकः ॥ अयमधिकारो विधिर्वेति द्वैतम् । आद्येऽत्रग्रहणमनर्थकम् । अधिकारादेव तल्लाभात् । तुशब्दः त्वधिकारपक्षे परस्मात्प्राप्तियो विशेषद्योतनार्थः, परस्य नित्यं रुत्वं, पूर्वस्य तु वाऽनुनासिक इति । विधिपक्षे त्वयं । वाग्रहणं स्पष्टार्थम्, "अनुनासिकात्पर–" इति ज्ञापकादेव सिद्धेः । न हि विकल्पं विनाऽनुनासिकाभावपक्ष इति सम्भवति । इदमेव ध्वनयितुं वृत्तौ तु वेति शब्दौ नोक्तौ ॥

'अत्रानुनासिक पूर्वस्य तु वा' सू. १३६ हे अधिकारसूत्र आहे किंवा विधिसूत्र--कार्यविधायकसूत्र--आहे याबद्दल संदेह उत्पन्न होतो ( प्रकृत सूत्रावर भाष्य नसल्यामुळें व प्रकृत सूत्र अधिकार सूत्र आहे किंवा विधिसूत्र आहे या संबधानें भाष्यात कोठेंहि उल्लेख केला नसल्यामुळें, कित्येक वैयाकरण हे सूत्र अधिकारसूत्र मानतात व कित्येक हे विधिसूत्र मानतात व अशा रीतीनें या सूत्रासंबधानें दोन पक्ष उत्पन्न झाले आहेत )प्रथम पक्ष, म्हणजे प्रकृत सूत्र अधिकारसूत्र आहे हा पक्ष, मानल्यास, या सूत्रातील 'अत्र' या पदाचे ग्रहण व्यर्थ ठरते, कारण हे सूत्र अधिकारसूत्र मानल्यानेंच ('मतुवसो रु सम्बुद्धौ' या सूत्रानंतर पठित केलेले) हे सूत्र 'रु' प्रकरणविषयक सूत्र आहे असे आपोआपच सिद्ध होते (म्हणून 'अत्र,' म्हणजे 'रु प्रकरणे' हा शब्द प्रकृत सूत्रात पठित करण्याची काहीच गरज नव्हती पण या उलट काशिकेत 'अत्रग्रहण रुणा सह सन्नियोगप्रतिपत्त्यर्थम्। अधिकारपरिमाणापरिग्रहे हि सति ढो ढे लोप इत्यत्रापि पूर्वस्यानुनासिक आशङ्क्येत।' असे व्याख्यान करून अधिकारपक्षात 'अत्र' या पदाचे ग्रहण चरितार्थ मानले आहे ) अधिकार पक्षात प्रकृत सूत्रातील 'तु' हा शब्द पूर्व वर्ण व पर वर्ण या दोन वर्णांचे ठिकाणी होणाऱ्या कार्यात भेद दर्शविणारा ठरतो, व तो भेद असा की, पराचे (उदाहरणार्थ 'सम्' यातील मकाराचे) नित्य रुत्व होत असून त्यापूर्वी असलेला अच् विकल्पेंकरून अनुनासिक होतो प्रकृत सूत्र विधिसूत्र आहे हा द्वितीय पक्ष मानल्यास, या सूत्रातील 'तु' हा शब्द व्यर्थ ठरतो, (कारण 'रु' प्रकरणात पठित असलेल्या 'रु' विधायक सर्व सूत्रात नित्य रुत्व होणे सांगितलेच आहे ) प्रकृत सूत्रात 'वा' या पदाचे ग्रहण सूत्रार्थ स्पष्ट व्हावा एवढ्याचकरिता केले आहे हे 'अनुनासिकात्परोऽनुस्वार:' सू १३७ या पुढील ज्ञापकारकावरूनच सिद्ध होते, (कारण अनुनासिक न केल्यास कार्य करावे हे त्या पुढील सूत्रात सांगितले असल्यामुळें अनुनासिक कार्य वैकल्पिक आहे हे आपोआपच सिद्ध होते व अशा रीतीनें प्रकृत

सूत्रात 'वा' या पदाचे ग्रहण करण्याची वास्तविक काहीच गरज नव्हती तरी पण हें सूत्र पठित करताक्षणींच अनुनासिक कार्य वैकल्पिक आहे हें एकदम लक्षात यावे याकरिता या प्रकृत सूत्रात 'वा' या पदाचे ग्रहण केले आहे ) अनुनासिककार्य वैकल्पिक आहे हे मानल्याशिवाय अनुनासिकाभावपक्ष, म्हणजे अनुनासिक होत नाही हा पक्ष, मुळीच संभवत नाहीं (अनुनासिकात्परोऽनुस्वार' या सूत्रातील 'अनुनासिकात्' हे पद ल्यब्लोपे पञ्चमी असून त्याचा 'अनुनासिकं विहाय' म्हणजे अनुनासिक न केल्यास, असा अर्थ आहे व या पदाच्या ग्रहणावरूनच अनुनासिक कार्य वैकल्पिक आहे हे सिद्ध होते) आणि हे ध्वनित करण्याच्या हेतूनेंच प्रकृत सूत्राचे कौमुदीत व्याख्यान करताना 'तु वा' या शब्दाचा उपयाग केला नाही, म्हणजे ते शब्द व्याख्यान करिताना गाळले आहेत

शब्दरत्न— अनर्थकमिति । इदमुपलक्षणं प्रतिसूत्रमावृत्तौ गौरवं चेत्यपि बोध्यम् । स्पष्टार्थमिति । अनेन तुग्रहणमधिकारपक्षेऽपि परस्य रुस्तत. पूर्वस्यानुनासिक इत्यर्थस्य स्पष्ट बोधनार्थं वाशब्दवदिति सूचितम् । विधिपक्षेऽत्रग्रहणं तु एतत्प्रकरणे इत्यर्थलाभार्थम । वस्तुतोऽत्राधिकारत्वमेवोचितम् । "मतुवसो रु–" इति सूत्रे कृतयो "वन उपसंख्यानं" "विभाषा भवत्–" इत्यनयोरुदाहरणे भाष्येऽनुनासिकाद्यनुच्चारणात् । विधित्वे तु तत्र प्रवृत्तिर्दुर्वारैव । अधिकारत्वे तूत्तरत्रैव प्रवृत्ति । स्पष्ट चेदं पूर्वाविति तत्त्वम् ॥

'आद्येऽत्रग्रहणमनर्थकम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यातील 'अनर्थकम्' हा शब्द (दोषान्तराच) उपलक्षण आहे (व तो दुसरा दोष हा की, प्रकृतसूत्र अधिकारसूत्र आहे असे मानल्यास, 'रु' प्रकरणात पठित असलेल्या) प्रत्येक सूत्रांत ते सूत्र पठित करावे लागेल व असे करण्यांत गौरव आहे हे देखील जाणावे. 'वाग्रहणं स्पष्टार्थम्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे

त्यावरून दीक्षित हें सुचवितात कीं, ज्याप्रमाणें अधिकारपक्षात 'वा' या शब्दाचे ग्रहण सूत्रार्थ स्पष्ट होण्याकरिता केले आहे त्याचप्रमाणें त्या पक्षात देखील 'तु' या शब्दाचे ग्रहणहि, पराचे 'रुत्व' व्हावे व त्या पूर्वीचा वर्ण अनुनासिक व्हावा हा अर्थ स्पष्ट होण्याकरिता, केले आहे (या शब्दरत्नातील पक्तीत 'अधिकारपक्षेऽपि' असे म्हटले असल्यामुळें, 'अपि' या शब्दानें विधिपक्षाचा समुच्चय होतो व अधिकारपक्षात 'तु' व 'वा' या पदाचे जे प्रयोजन मनोरमेंत सांगितले आहे तेच त्या पदाचे विधिपक्षात देखील प्रयोजन आहे असे दीक्षित सुचवितात असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृतसूत्र विधिसूत्र आहे असे मानल्यास, या सूत्रातील 'अत्र' या पदाचा 'रुप्रकरणे' असा अर्थ व्हावा याकरिता या सूत्रात त्या पदाचे ग्रहण केले आहे. वास्तविक प्रकृत सूत्र अधिकारसूत्र मानणेच योग्य आहे, कारण 'मतुवसो रुः' ८ ३. १ या सूत्रावरील भाष्यात पठित असलेल्या 'वन उपसङ्ख्यानम्' व 'विभाषा भवत्' या दोन वार्तिकाची उदाहरणे देताना, ज्याला रुत्व झाले आहे त्याच्या पूर्वीचा वर्ण अनुनासिक उच्चारला नाही. प्रकृत सूत्र जर विधिसूत्र असते तर त्या भाष्योदाहरणात या सूत्राची प्रवृत्ति टाळता येणें अशक्य झाले असते (व पूर्व वर्ण भाष्यकारानी अनुनासिक उच्चारला असता) परंतु प्रकृत सूत्र अधिकारसूत्र मानल्यानें, त्याची ('मतुवसो रु.' या पूर्व सूत्रात प्रवृत्ति न होता) उत्तर सूत्रातच प्रवृत्ति होऊ शकते हे सर्व काशिकावृत्तीत स्पष्ट केले आहे व म्हणून प्रकृत सूत्र अधिकारसूत्र मानणेच योग्य आहे. ('मतुवसो रु' या सूत्रावरील भाष्यात 'मतुवसोरादेशे वन उपसङ्ख्यानम्' व 'विभाषा भवद्भगवदघवतामोच्चाऽवस्य' ही दोन वार्तिके पठित केलीं आहेत व प्रथम वार्तिकाचे 'प्रातरित्वः' हे उदाहरण दिले असून द्वितीय वार्तिकाची 'भोः, भगोः, अघोः' ही उदाहरणे दिलीं आहेत. 'प्रात-रेतीति प्रातरित्वा' याचे 'प्रातरित्वः' हें सबुद्धिचे रूप आहे या स्थलीं 'अन्येभ्योऽपि दृश्यन्ते' सू. २९८० या सूत्रानें 'इ' धातूहून

'क्वनिप् = वन्' प्रत्यय झाला असून 'ह्रस्वस्य पिति कृति तुक्' सू २८५८ या सूत्राने त्या धातूला तुगागम झाला आहे या उदाहरणात 'प्रातरित्वन्' या शब्दाचे संबुद्धीचे रूप करतेवेळी भाष्यकारानी नकाराचे जागी 'रु' हा आदेश केला असून देखील त्याच्या पूर्वी असलेला 'अ' हा वर्ण अनुनासिक उच्चारला नाही. त्याचप्रमाणे 'भवत्, भगवत्, अघवत्' याचे संबुद्धीचे रूप करतेवेळी या शब्दातील अन्त्य तकाराचे जागी 'रु' हा आदेश करून व त्या तकारापूर्वी असलेल्या 'अव' चे जागी 'ओ' असा आदेश करून 'रु' पूर्वी असलेल्या 'ओ' या वर्णाचे अनुनासिक उच्चारण केले नाही. यावरून हे सिद्ध होते की, प्रकृत सूत्र विधिसूत्र नसून अधिकारसूत्र आहे जर ते विधिसूत्र असते तर वरील उदाहरणाना लागू पडले असते व त्या सर्व उदाहरणातील 'रु' च्या पूर्वी असलेला वर्ण–अच्–अनुनासिक झाला असता. या भाष्योदाहरणावरूनच हे सिद्ध होते की, प्रकृत सूत्र विधिसूत्र नसून अधिकारसूत्र आहे आणि ते अधिकारसूत्र आहे हे काशिकेत स्पष्टपणे सांगितले आहे त्या सूत्रावरील काशिकेत काशिकाकार म्हणतात–'अधिकारोऽयम् । इत उत्तर यस्य स्थाने रुर्विधीयते ततः पूर्वस्य तु वर्णस्य वाऽनुनासिको भवतीत्येतदधिकृत वेदितव्यम् । यदित ऊर्ध्वमनुक्रमिष्यामस्तत्र ।' यावरून देखील हेच सिद्ध होते की प्रकृत सूत्र अधिकारसूत्र आहे व हे सूत्र अधिकारसूत्र असल्यामुळेच, हे सूत्र 'मतुवसो रु.' या सूत्रानतर पठित केले आहे. हे खरे की, प्रकृत सूत्र अधिकारसूत्र मानल्याने, पूर्वी सांगितल्याप्रमाणे या अधिकारात पठित असलेल्या पुढील प्रत्येक रुविषयक सूत्रात या सूत्राची आवृत्ति करणे हा गौरवरूप दोष येतो. पण इष्ट रूपाच्या सिद्धिकरिता या दोषाचे अगतिकगतिन्यायाने सहन करणे भाग आहे व हे अधिकारसूत्र आहे असे वरील भाष्यावरून ध्वनित होत असल्यामुळे, हे अधिकारसूत्र मानणेच योग्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा— अनुनासिकात् । ल्यब्लोपे पञ्चमीत्याह—अनुनासिकं विहायेति । एवं च संसर्गवद् विप्रयोगस्यापि विशेषावगतिहेतुत्वाद-वत्साऽऽनीयतामित्यत्रेव सम्भावितानुनासिक्यगुणक एव उपस्थितत्वा-दाकाङ्क्षितत्वाच्चावधित्वेन सम्बध्यत इत्यभिप्रेत्याह—रोः पूर्वस्मा-दिति । अनुस्वारागम इति । आगमत्वं च परशब्देनैव लभ्यते "पूर्वौ तु ताभ्यामैच्—" इत्यत्र पूर्वशब्देनैचोरिवेति भावः ॥

'अनुनासिकात्परोऽनुस्वारः' सू. १३७ या सूत्रातील 'अनुना-सिकात्' ही ('ल्यब्लोपे कर्मण्यधिकरणे च'—सू. ५१४ वरील वार्तिक—या वार्तिकान्वयें झालेली) ल्यब्लोपे पञ्चमी असल्यामुळें, या पदाचा 'अनुनासिक विहाय', म्हणजे 'अनुनासिकाभावपक्षे', असा कौमुदीत अर्थ केला आहे (प्रकृत सूत्रातील 'अनुनासिकात्' या पदाचा 'अनुनासिक विहाय' असा अर्थ केल्यावर, 'परः' या अवधि-वाचक शब्दाला अवधीची आकांक्षा असल्यामुळें, अवधि कोणता घ्यावा असा प्रश्न उपस्थित झाला असता, त्या प्रश्नाचे दीक्षित असें उत्तर देतात की, 'संयोगो विप्रयोगश्च साहचर्यं विरोधिता । अर्थः प्रकरणं लिङ्गं शब्दस्यान्यस्य सन्निधिः ॥ सामर्थ्यमौचिती देशः कालो व्यक्तिः स्वरादयः । शब्दार्थस्यानवच्छेदे विशेषस्मृतिहेतवः ॥' या कारिकान्वयें) जसा संसर्गानें, म्हणजे संयोगानें, विशेष अर्थाचा बोध होतो तसाच विप्रयोगानें देखील बोध होत असल्यामुळें, (सवत्सा आनीयताम्' या प्रयोगात 'वत्स' या पदार्थाच्या संयोगानें जसा गाईचा बोध होतो तसाच) 'अवत्सा आनीयताम्' या स्थलीं 'वत्स' या पदार्थाच्या विप्रयोगानें ज्याप्रमाणें गाईचाच बोध होतो त्याच प्रमाणें ('अत्रानुनासिकः पूर्वस्य तु वा' या पूर्व सूत्रानें) ज्या वर्णाला अनुनासिकत्व संभवत होतें (पण विकल्पामुळें ज्याचें अनुनासिकत्व केलें नाही) तोच अनुनासिक वर्ण उपस्थित होऊन अवधिमाकांक्ष 'पर' या शब्दाशीं अवधित्वरूपानें अन्वित होतो (व अवधीची आकांक्षा पूर्ण करतो आणि त्यामुळें त्या अननुनासिक वर्णापुर्वें अनु-स्वाररूप आगम होतो) हा आशय मनात धरूनच प्रकृत सूत्रावरील

कौमुदींत 'रो: पूर्वस्मात् परोऽनुस्वारागम: स्यात्' असे व्याख्यान केले आहे. ज्याप्रमाणे 'न य्वाभ्यां पदान्ताभ्यां पूर्वौ तु ताभ्यामैच्' सू. १०९८ या सूत्रात 'पूर्वं' या शब्दाचा प्रयोग केला असल्यामुळें 'ऐच् = ऐ, औ' हे आगम ठरतात त्याचप्रमाणे प्रकृत सूत्रात 'पर:' या शब्दाचा प्रयोग केला असल्यामुळें, विकल्पानें होणारा अनुस्वार आगम ठरतो (व आदेश ठरत नाही.)

शब्दरत्न—ल्यब्लोपे इति । दिग्योगलक्षणा तु न, अत्रानुस्वार-परानुनासिक: पूर्वस्य तु वेति न्यासेन सिद्धौ "अनुनासिकात्पर–" इत्यस्य वैयर्थ्यापत्तेरिति भाव: । परशब्देनैवेति । प्रसिद्धावेवकार: ।।

प्रकृत सूत्रातील 'अनुनासिकात्' ही दिग्योगलक्षणापञ्चमी नव्हे, कारण तसे मानल्यास, 'अत्रानुस्वारपरानुनासिक: पूर्वस्य तु वा' असे, पूर्व व प्रकृत सूत्र मिळून, एकच सूत्र केल्यानें काम भागले असते व 'अनुनासिकात्परोऽनुस्वार.' हें प्रकृत सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (सारांश 'अनुनासिकात' ही दिग्योगेपञ्चमी मानून वर सांगितल्याप्रमाणे एक सूत्र पठित केले असतें तर त्या सूत्राचा अर्थ असा झाला असता की, पूर्व वर्ण विकल्पेंकरून अनुनासिक होतो व जेव्हा तो विकल्पामुळें अनुनासिक केला जातो तेव्हा त्याच्या पुढें अनुस्वाररूप आगम होतो, आणि तसा अर्थ इष्ट असता तर पाणिनीनें दोन पृथक् सूत्रें न करितां वर दर्शविलेलें एकच सूत्र पठित केले असते व गौरवरूप दोष टाळला असता. पण पाणिनीनें दोन भिन्न सूत्रें पठित केली असल्यामुळें, त्यावरून हें स्पष्ट होतें की, पाणिनीला तसा अर्थ होणे इष्ट नव्हतें व प्रकृत सूत्रातील 'अनुनासिकात्' हें पद ल्यब्लोपे पञ्चमी मानून आणि त्याचा 'अनुनासिक विहाय' असा अर्थ करून जो प्रकृत सूत्राचा अर्थ होतो तसाच अर्थ होणें इष्ट होतें.)
'आगमत्व च परशब्देनैव लभ्यते' या मनोरमेंतील पङ्क्तींत 'पर-शब्देन' या पदापुढें जो 'एव' हा शब्द घातला आहे तो (अवधारण या अर्थाचा वाचक नसून) 'प्रसिद्धि' या अर्थाचा वाचक आहे.

(सारांश जेथें विधिसूत्रात 'पूर्व' किंवा 'पर' हा शब्द उच्चारला असेल व तो विधेयाचे विशेषण असेल तेथें विधेय आगमरूपानें होत असून आदेशरूपानें होत नाही हा प्रसिद्ध सिद्धान्त ध्वनित करण्याच्या हेतूनें दीक्षितांनी मनोरमेच्या वरील पङ्क्तीत 'प्रसिद्ध' या अर्थाचा वाचक 'एव' हा शब्द घातला आहे असे शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे )

मनोरमा---विसर्जनीयस्य खरीति। एतच्च मण्डूकप्लुत्या "खरवसानयोः इति सूत्रादनुवर्तते। नन्वनुस्वारस्यानच्त्वात्ततः परस्य द्वित्वं न स्यादेवेत्यत आह–अनुस्वारविसर्गेत्यादि। अकारोपरीति। यदि त्विकारोपरि पठ्येरन् तर्हि पयःसु यशःसु, इत्यादौ इणः परस्येति षत्वं स्यादिति भावः। अच्त्वादिति। न चैवं हरिः कर्ता, हरिं स्मरेदित्यादौ यणादिप्रसङ्गः। त्रिपादीस्थत्वेन विसर्गादीनामसिद्धत्वात्। अनुस्वारस्यापि द्वित्व इति। अविशब्दात्ककारस्य। वचनान्तरेणेति। "अचो रहाभ्याम्" इति कृतेऽपि "यणो मय" इति भवत्येवेति भावः॥

'विसर्जनीयस्य सः' सू. १३८ या सूत्राचे कौमुदीत व्याख्यान करिताना 'खरि विसर्जनीयस्य सः स्यात्' असे जें म्हटलें आहे त्याचे कारण हें की, 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या पूर्व सूत्रातून प्रकृत सूत्रात 'खरि' या पदाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति होते. अनुस्वार अच् नसल्यामुळें त्याच्या पुढील 'यर्' चे ('अनचि च' सू. ४८ या सूत्रानें होणारें) द्वित्व होऊं शकत नाहीं अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेचे निवारण करण्याकरितां प्रकृत सूत्रावरील कौमुदीत 'अनुस्वारविसर्गजिह्वामूलीयोपध्मानीययमानामकारोपरि शर्षु च पाठस्योपसङ्ख्यातत्वेनानुस्वारस्याप्यच्त्वात्' असे म्हटलें आहे (व या कौमुदीतील पङ्क्तीचा असा अर्थ आहे कीं, अनुस्वार, विसर्ग, जिह्वामूलीय, उपध्मानीय व यम या पांच अयोगवाहांचा 'अइउण्' या शिवसूत्रांतील अकारानंतर व तसेच 'शर्' मध्यें पाठ करावा असे वार्तिककारानें सांगितलें असल्यामुळें, अनुस्वार हा अच् ठरतो.

'अइउण' या शिवसूत्रातील) अकारापुढें अयोगवाहाचा पाठ करण्याचे कारण हें आहे की, जर त्या शिवसूत्रातील इकारापुढें अयोगवाहाचा पाठ केला असता तर (विसर्ग 'इण्' ठरला असता व त्यामुळें) 'पय सु, यश सु' इत्यादि स्थलीं विसर्गापुढील 'सु' हा प्रत्यय 'इण्' च्या पुढें आहे असे मानणे भाग पडले असतें व त्यामुळें (आदेशप्रत्यययोः सू २१२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययांतील सकाराचे) षत्व होण्याची आपत्ति आली असती (पण अयोगवाहाचा 'अइउण्' या शिवसूत्रातील इकारापुढें पाठ न करिता अकारापुढें वार्तिककारानें पाठ केला असल्यामुळें, विसर्ग 'इण्' प्रत्याहारांत समाविष्ट होत नाही व त्यामुळें वरील उदाहरणात 'सु' प्रत्ययातील सकाराचें षत्व होत नाहीं ) अयोगवाह अच् मानल्यास, 'हरिः कर्ता, हरि स्मरेत्' इत्यादि स्थलीं यणादेशादि कार्यें होण्याची आपत्ति येते असे कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाही, कारण विसर्ग इत्यादि त्रैपादिक सूत्रानी होणारें असल्यामुळें ते (सापादिक यणादि शास्त्राच्या दृष्टीनें 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या वचनान्वयें) असिद्ध ठरतात. ('हरि + सु' या स्थलीं 'ससजुषो रुः' सू १६२ या त्रैपादिक सूत्रानें 'सु' प्रत्ययाचे जागीं 'रु' हा आदेश होतो व त्यापुढें 'कर्ता' यातील ककार हा 'खर्' आला असल्यामुळें, 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या त्रैपादिक सूत्रानें 'रु' यातील रेफाचा विसर्ग होतो हा विसर्ग 'हरि' यांतील इकारापुढें आला आहे व तो अच् आहे असे मानल्यास, 'इको यणचि' सू ४७ या सूत्रानें यणादेशाची प्राप्ति होते असी कोणी शंका केल्यास, त्यावर दीक्षित असे उत्तर देतात कीं, त्रैपादिक सूत्रानें होणारा विसर्ग सापादिक यण्शास्त्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें तो झालाच नाहीं असे मानल्यानें, यणादेशाची प्राप्तीच होत नाहीं. तसच हरि + अम्' या स्थलीं 'अमि पूर्वः' सू १९४ या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होऊन 'हरिम्' असे रूप झाल्यावर 'हरि स्मरेत्' या वाक्यांत 'हरिम्' यांतील मकारापुढें 'स्मरेत्' यांतील सकार

हा हल् आला असल्यामुळें 'मोऽनुस्वार ' सू. १२२ या त्रैपादिक सूत्रानें त्या मकाराचा अनुस्वार होतो हा अनुस्वार 'हरि' यातील इकारापुढें आला असल्यामुळें, तो अच् मानल्यास, यणादेशाची प्राप्ति होते पण 'मोऽनुस्वारः' या त्रैपादिक सूत्रानें झालेला अनुस्वार सापादिक यण्शास्त्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें तो झालाच नाहीं असे मानल्यानें, यणादेशाची प्राप्तीच होत नाही )
'अनुस्वारस्यापि द्वित्वे' असे जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटल आहे त्यातील 'अपि' या शब्दानें ककाराचे ग्रहण होते (अयोगवाहांचा 'शर्' प्रत्याहारात पाठ मानला असल्यामुळें व अशा रीतीनें अनुस्वार हा अयोगवाह 'यर्' ठरत असल्यामुळें आणि 'संस्कर्ता' या उदाहरणांत अनुस्वार हा 'यर्' 'स' यातील अन्त्य 'अ' या अच्पुढें आला असल्यामुळें, अनचि च' सू. ४८ या सूत्रानें त्याचे वैकल्पिक द्वित्व होतें त्याचप्रमाणे वरील उदाहरणांत सकार या 'शर्' पुढें ककार हा 'खय्' आला असल्यामुळें, 'शर परस्य खयो द्वे वा स्त ' या अर्थाच्या वाचक 'शर खय '–सू १३८ वरील वार्तिक – या वार्तिकानें ककाराचे देखील वैकल्पिक द्वित्व होते )
'वचनान्तरेण द्वित्वे' असे जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटले आहे त्यातील 'वचनान्तर' या शब्दाचा 'यणो मयो द्वे वाच्ये' –सू ५४ वरील वार्तिक– हे वार्तिक असा अर्थ आहे, व 'अचो रहाभ्यां द्वे' सू ५९ या सूत्रानें ('संस्कर्ता' यातील तकाराचे) द्वित्व केल्यावर देखील, 'यणो मयो द्वे वाच्ये' या वार्तिकानें त्या तकाराचे पुन्हा द्वित्व करतां येतेंच असा कौमुदीतील वरील पंक्तीचा भावार्थ आहे ('संस्कर्ता' या स्थलीं अचापुढें असणाऱ्या रकारापुढील तकार या 'यर' चें 'अचो रहाभ्यां द्वे' या सूत्रानें द्वित्व केल्यावर, रकार हा 'यण्' असल्यामुळें व त्यापुढील प्रथम तकार हा 'मय्' असल्यामुळें 'यणो मयो द्वे वाच्ये' या वार्तिकानें त्या प्रथम तकाराचे पुन्हा द्वित्व करता येतें व त्या तकाराचे दोनदां द्वित्व करतेवेळीं दोन भिन्न शास्त्रांची प्रवृत्ति होत असल्यामुळें, 'लक्ष्ये लक्षणस्य सकृ

प्रवृत्ति.' हा न्याय आड येत नाही असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.)

शब्दरत्न–मण्डूकेति । एकदेशे स्वरितत्वप्रतिज्ञयेत्यपि बोद्धयम् । अत एवावसाने न सः । पूर्वेण सन्निकर्षरूपा संहिता त्ववसानेऽप्यस्त्येव । अत एव संहिताधिकारेऽवसानकार्यपाठः सङ्गच्छते । षत्वं स्यादिति । अत एव पुंस्वित्यादावुकारं निमित्तीकृत्यानुस्वारव्यवधाने षत्वमाशङ्क्य नुम्स्थानिकानुस्वारस्यैव "नुम्विसर्जनीय" इति सूत्रे ग्रहणान्नेति भाष्य सङ्गच्छते । इकाराद्युत्तरं पाठे हि अनुस्वारनिर्णं गृहीत्वा षत्वं दुर्वारं स्यादिति भावः । यणादीति । पूर्वसवर्णदीर्घं आदिशब्दार्थः । अय पाठोऽनित्यः । "अट्कुपु" इति सूत्रे ऽनुस्वारोपलक्षणनुम्ग्रहणात् । अत एव हरिं जयतीत्यादौ "झलां जश् झशि" इति नेति बोद्धयम्" इति कश्चित् । भवत्येवेति । एकस्य द्वितीयोच्चारणस्यैकेन साधुत्वबोधन तयोर्मध्ये परस्य द्वितीयोच्चारणस्यान्येन साधुत्वबोधनमिति भावः ॥

'मण्डूकप्लुत्या' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याशिवाय असे देखील म्हणता येते की, 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या सूत्रातील 'खरवसानयोः' या पदातील 'खर्' हा एकदेश स्वरित मानल्यानें प्रकृत सूत्रात 'खरि' या एकदेशाची अनुवृत्ति करता येते. (सारांश मण्डूकप्लुतिरूप दोष टाळण्याकरिता 'खरवसानयोः' या सूत्रातील 'खर्' हें पद स्वरित मानल्यानें त्या पदाची प्रकृत सूत्रात निर्दोष अनुवृत्ति करता येते आणि 'खरवसानयोः सः' असे सूत्र पठित केल्यानें काम भागत असून देखील, पुन्हा प्रकृत सूत्र आरंभिले असल्यामुळें, या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें हें स्पष्ट होतें की, प्रकृत सूत्रात 'अवसान' या पदाची निवृत्ति होण्याकरिता, 'खरवसानयो.' या स्थलीं 'खर्' हें पद स्वरितत्वयुक्त पठित केले आहे, असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृत सूत्रात 'खरवसानयोः' या समस्त–सामासिक–पदातील केवळ 'खरि' या एकदेशाची अनुवृत्ति होत असून 'अवसाने' या पदाची अनुवृत्ति

होत नसल्यामुळेंच, विसर्गापुढें अवसान असल्यास, त्या विसर्गाचा सकार होत नाही (व तो विसर्गरूपानेंच कायम राहतो) अवसानाची देखील त्याच्या लगेंच पूर्वी असणाऱ्या वर्णाशीं सन्निकर्षरूप संहिता असतेच म्हणूनच, पुढें अवसान असल्यामुळें होणाऱ्या कार्यांचा 'संहितायाम' या अधिकारात जो समावेश केला आहे तो योग्य ठरतो ('संहिता' ही संज्ञा असून 'पर सन्निकर्षः संहिता' सू २८ ह 'संहिता' या शब्दाचा अर्थ सांगणारे संज्ञासूत्र आहे व त्या सूत्राचा कौमुदीत 'वर्णानामतिशयित सन्निधि संहितासंज्ञ स्यात्' असा अर्थ केला आहे 'अवसान' हे वर्ण नसल्यामुळें त्याचा पूर्व वर्णाशी सन्निकर्ष होणे शक्य नाही ही शंका मनात धरून शब्दरत्नकार त्या शंकेचे असें समाधान करतात कीं, अवसानाचा त्याच्या लगेंच पूर्वी असलेल्या वर्णाशीं सन्निकर्ष—एकाच्या लगेंच पुढें दुसरा असणे असा अत्यन्त निकट परस्परसंबंध—असल्यामुळें, वर्ण व त्यापुढील अवसान याच्या सन्निकर्षाला देखील 'संहिता' म्हणतां येतें तस न मानल्यास, 'संहितायाम्' सू १४५ या अधिकारसूत्रात अवसान-निमित्तक कार्यांचा पाणिनीनें जो समावेश केला आहे तो अयोग्य ठरण्याची आपत्ति येते ) अयोगवाहाचा 'अइउण्' या शिवसूत्रांतील 'अ' पुढें पाठ मानला असल्यामुळेंच, 'पुंसु' इत्यादि स्थलीं 'उ' या 'इण्' च्या निमित्तामुळें व अनुस्वाराचे—'शर्' चे सह—व्यवधान असल्यामुळें, 'नुम्विसर्जनीयशर्व्यवायेऽपि' सू ४३४ या सूत्रान्वयें 'सु' प्रत्ययातील सकाराचे षत्व का होऊ नये अशी शंका घेऊन, भाष्यकारानी त्या शंकेचे, 'नुम्विसर्जनीय' या सूत्रांतील 'नुम्' या पदानें कोणत्याहि प्रकारच्या अनुस्वाराचे ग्रहण न होतां 'नुम्' चे जागी झालेल्या अनुस्वाराचेच ग्रहण होतें (व 'पुंसु' यातील अनुस्वार 'नुम्' चे जागी झाला नसून मकाराचे जागीं झाला असल्यामुळें, त्याचे व्यवधान सह्य होत नाहीं) व त्यामुळें षत्व होत नाहीं असा रीतीनें भाष्यात जें निरसन केल आहे तें सुसंगत ठरतें शिवसूत्रातील इकारादिकाच्या पुढें अयोगवाहांचा

पाठ मानला असता तर, अनुस्वाराचा 'इण्' प्रत्याहारात समावेश झाला असता व त्यामुळें 'पुंसु' या स्थलीं षत्व होण्याची आपत्ति टाळता येण अशक्य झाले असते 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यात विसर्ग, जिव्हामूलीय, उपध्मानीय, अनुस्वार, नासिक्य व यम याना अयोगवाह म्हणतात व त्याना अयोगवाह म्हणण्याचे कारण ह कीं, ते अक्षरसमाम्नायात उपदिष्ट नसून देखील प्रयोगाच्या उपयोगी पडतात असे सागून भाष्यकारानीं असा प्रश्न केला आहे की, या अयोगवाहाचा उपदेश-उच्चारण-अक्षरसमाम्नायात कोठें करावा व त्या प्रश्नाचे असे उत्तर दिले आहे की, 'अयोगवाहानामट्सूपदेश कर्तव्य । किं प्रयोजनम । णत्वम् ।' पुढें भाष्यकार म्हणतात 'शर्पूपदेश कर्तव्य । किं प्रयोजनम । जश्भावषत्वे ।' साराश भाष्यकारानीं अस म्हटले आहे की, 'अट्'मध्यें व 'शर्'मध्यें अयोगवाहाचे उच्चारण करावे या वरील भाष्यात भाष्यकारानी असे स्पष्ट म्हटले नाहीं की, अयोगवाहाचे 'अ' नतर व 'इ'च्या पूर्वी उच्चारण 'अट्' मध्यें करावे परतु शब्दकौस्तुभात दीक्षितानी पुढें लिहिल्याप्रमाण म्हटल आहे-'अत्रेदमवधेयम् । अट्सु क्रियमाण उपदेशोऽकारानन्तरमिकारात्प्राक्कर्तव्य । तेनेण्सु अनन्तर्भावात्पयःसु यश स्वित्यादौ इण्कोरित्यधिकृ य विधीयमानमादेशप्रत्यययोरिति षत्व न भवति ।' व मनोरमेंत देखील हेंच भिन्न शब्दात सागितल आहे दीक्षिताचे म्हणणे बरोबर आहे ह सिद्ध करण्याकरिता शब्दरत्नकारानी 'अत एव पुंस्वित्यादावकार भाष्य सङ्गच्छते' असं म्हटले आहे व या पक्तीत ज्या भाष्याचा दाखला दिला आहे त भाष्य 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्य असून पुढें लिहिल्याप्रमाणे आहे- 'षत्व च प्रयोजनम् । सर्पिःषु धनुःषु । शर्व्यवाये इति षत्व सिद्ध भवतीति नुम्विसर्जनीयशर्व्यवायेऽपीति विसर्जनीयग्रहण न कर्तव्य भवति । नुमश्चापि तर्हि ग्रहण शक्यमकर्तुम् । कथ सर्पींषि धनूंषि ? । अनुस्वारे कृते शर्व्यवाये इत्येव सिद्धम् । अवश्य नुमो ग्रहण कर्तव्यम् । अनुस्वारविशेषण नुम्ग्रहणम्-

नुमो योऽनुस्वारस्तत्र यथा स्यादिह मा भूत्पुंस्विति ।' या भाष्याचा अर्थ असा आहे की, 'शर्' मध्यें अयोगवाहाचा, षत्व व्हावे याकरिता, पाठ करावा असे जें म्हटले आहे त्याची उदाहरणे 'सर्पिःषु, धनुःषु' हीं होत या दोन्ही उदाहरणात जरी 'इण्' प्रत्याहारातील वर्णाच्या व 'सु' प्रत्ययातील सकाराच्या मध्यें विसर्गाचे व्यवधान आहे तरी, अयोगवाहाचा 'शर्' मध्यें पाठ केल्यानें विसर्गाचा 'शर्' मध्यें अन्तर्भाव होत असल्यामुळें व 'नुम्विसर्जनीयशर्व्यवायेऽपि' सू ४३४ या सूत्रानें 'शर्' चे व्यवधान सह्य असल्यामुळें, 'सु' प्रत्ययातील सकाराचे षत्व होते, व 'नुम्वि-सर्जनीय' या सूत्रात 'शर्' चे ग्रहण केले असल्यामुळें, 'विसर्जनीय' हें पद त्या सूत्रात असण्याची गरज राहत नाहीं व ते पद त्या सूत्रातून गाळता येते तसेच त्या सूत्रांत 'नुम्' हें पद न घातले तरी देखील चालेल, कारण 'सर्पींषि, धनूंषि' या उदाहरणात नुम्चा अनुस्वार केल्यावर अनुस्वार 'शर्' मध्यें अन्तर्भूत होत असल्यामुळें, 'शर्व्यवाये' या त्या सूत्रातील पदानें ती रूपें सिद्ध होण्यात कांही अडचण येऊं शकत नाही. पण अशा रीतीनें जरी वरील दोन रूपें साधता येतात तरी, 'नुम्विसर्जनीय' या सूत्रांत 'नुम्' हे पद अवश्य ठेविले पाहिजे व ते 'नुम्' पद अनुस्वाराचे विशेषण मानावे तसे मानले म्हणजे, 'नुम्' चा झालेला जो अनुस्वार त्याचेच व्यवधान होत असल्यास, षत्व होऊं शकते व इतर अनुस्वाराचे व्यवधान असतांना षत्व होत नाहीं असा सूत्रार्थ निष्पन्न होतो, आणि त्यामुळें 'पुंसु या स्थली षत्व होणे टळते 'पुम्स् + सु' या उदाहरणात 'स्वादिष्व-सर्वनामस्थाने' सू २३० या सूत्रानें 'पुम्स्' याला पदसंज्ञा होत असल्यामुळें 'संयोगान्तस्य लोपः' सू ५४ या सूत्रानें 'पुम्स्' यांतील अन्त्य सकाराचा लोप होऊन 'पुम् + सु' अशी स्थिति झाली असतां, 'मोऽनुस्वारः' सू १२२ या सूत्रानें 'पुम्' यांतील अन्त्य मकाराचा अनुस्वार होऊन 'पुंसु' असे सप्तमीच्या बहुवचनाचे रूप

होतें. या ठिकाणीं जो अनुस्वार झाला आहे तो 'नुम्' चे जागीं झाला नसून मकाराचे जागीं झाला आहे आणि म्हणून तशा अनुस्वाराचे व्यवधान सह्य होत नसल्यामुळें, 'सु' प्रत्ययांतील सकाराचे षत्व होत नाहीं. जर अनुस्वार अक्षरसमाम्नायात 'इ' नंतर पठित असता तर तो 'इण्' ठरून 'इण्कोः' या अधिकारात पठित असलेल्या 'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययातील सकाराचे षत्व होणे टाळता आले नसते. सारांश भाष्यकारानी 'पुंसु' हे जें उदाहरण दिले आहे त्यावरून हें स्पष्ट होते की, अयोगवाहाचा पाठ अक्षरसमाम्नायात 'अ' नंतर व 'इ' पूर्वी केला आहे व अशा रीतीनें दीक्षितानीं जें म्हटले आहे त्याला वरील भाष्य प्रमाण आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे )
'यणादिप्रसङ्गः' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यांत 'यणादि' या पदातील 'आदि' या शब्दाचा 'पूर्वसवर्णदीर्घ' असा अर्थ आहे. (शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'यणादिप्रसङ्गः' याचीं मनोरमेंत जीं दोन उदाहरणे दिली आहेत त्यांपैकीं जरी 'हरि स्मरेत्' या द्वितीय उदाहरणात यणादेशाची प्राप्ति आहे तरी, 'हरिः कर्ता' या प्रथम उदाहरणात यणादेशाची प्राप्ति नसून पूर्वसवर्णदीर्घाचीच प्राप्ति असल्यामुळें, 'यणादिप्रसङ्गः' यातील 'आदि' शब्दानें पूर्वसवर्णदीर्घाचे ग्रहण होतें 'हरि+सु = हरिस्' या स्थली 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें 'हरिस्' यातील अन्त्य सकाराचे रुत्व होऊन त्यापुढें 'कर्ता' यातील ककार हा 'खर्' असल्यामुळें, 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें रेफाचा विसर्ग होऊन 'हरिः कर्ता' अशी स्थिति होते. अयोगवाहाचा अक्षरसमाम्नायात 'अ' पुढें पाठ मानला असल्यामुळें विसर्ग हा अच् ठरतो व 'हरि' या अगन्त अङ्गापुढील प्रथमाविभक्तीच्या 'सु' प्रत्ययाचे जागी झालेला विसर्ग स्थानिवद्भावानें अजादि विभक्तिप्रत्यय मानता येतो व 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' सू १६४ हें 'इको यणचि' सू. ४७ या सूत्राच्या मानानें परसूत्र असल्यामुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्'

सू. १७५ या वचनान्वयें, यणादेशाची प्राप्ति न होता, पूर्वसवर्ण-दीर्घाचीच प्राप्ति होते परंतु 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेला 'रु' व 'रु'चे जागीं झालेला विसर्ग हे त्रैपादिक सूत्रानीं झाले असल्यामुळें, तो विसर्ग 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सापादिकशास्त्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ या वचनान्वयें, असिद्ध ठरतो व विसर्ग झालाच नाहीं आणि 'सु' प्रत्ययच कायम आहे असे मानावें लागत असल्यामुळें, या प्रथम उदाहरणांत पूर्वसवर्णदीर्घ होण्याची आपत्ति टळते. परंतु भैरवीकार म्हणतात की, 'वस्तुतस्तु प्रथमेऽपि यणादेशस्यैव प्राप्तिर्न तु दीर्घस्य, अल्विधित्वेन स्थानिवद्भावा-भावात् ।' भैरवीकाराच्या या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'हरि र्वर्ता' या प्रथम उदाहरणात देखील पूर्वसवर्णदीर्घाची प्राप्ति नसून यणादेशाचीच प्राप्ति आहे; कारण 'सु = स' या अल्रूप प्रत्ययाचे जागी झालेला विसर्ग हा प्रथमा विभक्तीचा अजादि प्रत्यय आहे असे मानणे हा अल्विधि ठरत असल्यामुळें व 'स्थानिवदादेश.' सू. ४९ या सूत्रात 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, तसा स्थानिवद्भाव करता येत नाहीं व

जागी अनुस्वार झाला आहे व 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, तो द्वितीयेचा अजादि प्रत्यय आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत नाही तसेच 'उभयत आश्रयणे नान्तादिवत्' असे भाष्यवचन असल्यामुळें, अगन्त अङ्गापुढें द्वितीया विभक्तीचा अजादि 'अम्' प्रत्यय आहे असे 'अन्तादिवच्च' सू. ७५ या सूत्रानें मानता येत नाही. त्यामुळें द्वितीय उदाहरणात देखील पूर्वसवर्णदीर्घाची प्राप्तीच होत नाही व यणादेशाचीच प्राप्ति होते परंतु सापादिक यण्-शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक सूत्रानें मकाराचे जागीं झालेला अनुस्वार असिद्ध ठरत असल्यामुळें, यणादेश होण्याची आपत्ति टळते ) एका वैयाकरणाचे असे म्हणणे आहे की, 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू १९७ या सूत्रात 'अनुस्वार' या अर्थाचा वाचक असणारा जो 'नुम्' त्याचे ग्रहण केले असल्यामुळें, अयोगवाहाचा 'अट्' व 'शर्'मध्यें मानलेला पाठ अनित्य ठरतो व तो पाठ अनित्य असल्यामुळेंच, 'हरि जयति' इत्यादि उदाहरणात 'झला जश् झशि' सू ५२ या सूत्रानें अनुस्वाराचे जश्त्व होत नाही असे समजावे (त्या वैयाकरणाच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'अट्कुपु' सू १९७ या सूत्रात निर्दिष्ट असलेला 'नुम्' हा शब्द केवळ अनुस्वाराचा वाचक आहे, मग तो अनुस्वार 'नुम्'चे जागी झाला असो किंवा 'मोऽनुस्वार' व 'नश्चापदान्तस्य झलि' सू १२२, १२३ या सूत्रानीं, मकाराचे किंवा नकाराचे जागी झाला असो किंवा तो स्वाभाविक अनुस्वार असो, व हे त्याचे म्हणणे बरोबर आहे, आणि दीक्षितानी देखील त्या सूत्रा-वरील कौमुदीत 'नुम्ग्रहणमनुस्वारोपलक्षणार्थम्' असेच म्हटले आहे असा त्या सूत्रातील 'नुम्'चा अर्थ असल्यामुळेंच, 'बृहि वृद्धौ' या इदित् धातूस 'इदितो नुम् धातोः' सू २२६२ या सूत्रानें 'नुम् = न्' आगम करून त्या नकारागमाचा 'नश्चापदान्तस्य' सू १२३ या सूत्रानें अनुस्वार होऊन 'बृंह्' असे रूप झाले असता, त्याहून 'ल्युट् = अन' प्रत्यय केल्यानें त्या प्रत्ययातील नकाराचा णकार होऊन 'बृंहणम्' हें रूप जसे सिद्ध होते त्याचप्रमाणे 'तृहू हिंसायाम्'

सू. १७५ या वचनान्वयें, यणादेशाची प्राप्ति न होता, पूर्वसवर्ण-दीर्घाचीच प्राप्ति होते. परतु 'सु' प्रत्ययाचे जागी झालेला 'रु' व 'रु'चे जागी झालेला विसर्ग हे त्रैपादिक सूत्रानीं झाले असल्यामुळें, तो विसर्ग 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' या सापादिकशास्त्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' सू १२ या वचनान्वयें, असिद्ध ठरतो व विसर्ग झालाच नाही आणि 'सु' प्रत्ययच कायम आहे असे मानणे भाग पडत असल्यामुळें, या प्रथम उदाहरणांत पूर्वसवर्णदीर्घ होण्याची आपत्ति टळते. परतु भैरवीकार म्हणतात की, 'वस्तुतस्तु प्रथमेऽपि यणादेशस्यैव प्राप्तिर्न तु दीर्घस्य, अल्विधित्वेन स्थानिवद्भावा-भावात् ।' भैरवीकाराच्या या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'हरिःकर्ता' या प्रथम उदाहरणात देखील पूर्वसवर्णदीर्घाची प्राप्ति नसून यणादेशाचीच प्राप्ति आहे; कारण 'सु=स्' या अल्रूप प्रत्ययाचे जागी झालेला विसर्ग हा प्रथमा विभक्तीचा अजादि प्रत्यय आहे असे मानणे हा अल्विधि ठरत असल्यामुळें व 'स्थानिवदादेशः' सू. ४९ या सूत्रात 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, तसा स्थानिवद्भाव करतां येत नाहीं व त्यामुळें पूर्वसवर्णदीर्घाची प्राप्ति न होता यणादेशाचीच प्राप्ति होते. पण सापादिक यण्शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक सूत्रानें झालेला विसर्ग असिद्ध ठरत असल्यामुळें यणादेश होण्याची आपत्ति टळते. 'हरिं स्मरेत्' या द्वितीय उदाहरणात 'हरि + अम्' या स्थलीं 'अमि पूर्वः' सू. १९४ या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होऊन 'हरि+म्' अशी स्थिति झाल्यावर 'मोऽनुस्वारः' सू. १२२ या सूत्रानें मकाराचे जागी झालेला अनुस्वार जरी अच् मानतां येतो तरी, तो 'अम्' या संपूर्ण प्रत्ययाचे जागी झाला नसून त्या प्रत्ययांतील मकार या एकदेशाचे जागीं झाला असल्यामुळें, तो द्वितीया विभक्तीचा अजादि प्रत्यय आहे असे मानतां येत नाहीं. येथें 'एकदेशविकृतमनन्यवत्'– प. ३७–ही परिभाषा लागू पडत नाहीं; कारण पूर्वरूप एकादेशानें 'अम्' प्रत्ययांतील अकार नाहीसा झाला असून, अवशिष्ट मकाराचे

जागी अनुस्वार झाला आहे व 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, तो द्वितीयेचा अजादि प्रत्यय आहे असे स्थानिवद्भावानें मानता येत नाहीं तसेच 'उभयत आश्रयणे नान्तादिवत्' असे भाष्यवचन असल्यामुळें, अगन्त अङ्गापुढें द्वितीया विभक्तीचा अजादि 'अम्' प्रत्यय आहे असे 'अन्तादिवच्च' सू. ७५ या सूत्रानें मानता येत नाही. त्यामुळें द्वितीय उदाहरणात देखील पूर्वसवर्णदीर्घाची प्राप्तीच होत नाही व यणादेशाचीच प्राप्ति होते परतु सापादिक यण्-शास्त्राच्या दृष्टीनें त्रैपादिक सूत्रानें मकाराचे जागी झालेला अनुस्वार असिद्ध ठरत असल्यामुळें, यणादेश होण्याची आपत्ति टळते ) एका वैयाकरणाचे असे म्हणणे आहे की, 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू. १९७ या सूत्रात 'अनुस्वार' या अर्थाचा वाचक असणारा जो 'नुम्' त्याचे ग्रहण केले असल्यामुळें, अयोगवाहांचा 'अट्' व 'शर्'मध्यें मानलेला पाठ अनित्य ठरतो व तो पाठ अनित्य असल्यामुळेंच, 'हरिं जयति' इत्यादि उदाहरणात 'झलां जश् झशि' सू ५२ या सूत्रानें अनुस्वाराचे जश्त्व होत नाही असे समजावे. (त्या वैयाकरणाच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, 'अट्कुपु' सू १९७ या सूत्रात निर्दिष्ट असलेला 'नुम्' हा शब्द केवळ अनुस्वाराचा वाचक आहे, मग तो अनुस्वार 'नुम्'चे जागी झाला असो किंवा 'मोऽनुस्वार' व 'नश्चापदान्तस्य झलि' सू १२२, १२३ या सूत्रानीं, मकाराचे किंवा नकाराचे जागीं झाला असो किंवा तो स्वाभाविक अनुस्वार असो, व हे त्याचे म्हणणे बरोबर आहे, आणि दीक्षितानी देखील त्या सूत्रा-वरील कौमुदीत 'नुम्ग्रहणमनुस्वारोपलक्षणार्थम्' असेच म्हटले आहे असा त्या सूत्रातील 'नुम्'चा अर्थ असल्यामुळेंच, 'बृहि वृद्धौ' या इदित् धातूस 'इदितो नुम् धातो' सू २२६२ या सूत्रानें 'नुम् = न्' आगम करून त्या नकारागमाचा 'नश्चापदान्तस्य' सू १२३ या सूत्रानें अनुस्वार होऊन 'बृंह्' असे रूप झाले असता, त्याहून 'ल्युट् = अन' प्रत्यय केल्यानें त्या प्रत्ययातील नकाराचा णकार होऊन 'बृंहणम्' हे रूप जसे सिद्ध होतें त्याचप्रमाणे 'तृहू हिंसायाम्'

या धातूत स्वाभाविक अनुस्वार असून त्याच्या ल्युडन्त रूपांत नकाराचे णत्व होऊन 'तृहणम्' असे रूप सिद्ध होते. म्हणून तो वैयाकरण म्हणतो की, अयोगवाहाचा 'अट्' व 'शर्' मध्यें केलेला पाठ नित्य मानल्यास, 'अट्कुपु' या सूत्रात निर्दिष्ट असलेल्या 'अट्' प्रत्याहारानें सामान्य अनुस्वाराच्या वाचक 'नुम्= अनुस्वार' या अयोगवाहाचे ग्रहण होऊ शकलेच असते व त्या सूत्रात पुन्हा 'नुम् = अनुस्वार' याचे ग्रहण करण्याची कांहींच गरज नव्हती; पण असे असून देखील ज्याअर्थी त्या सूत्रात पुन्हा 'नुम्' चे ग्रहण केले आहे त्याअर्थी 'अट्' व 'शर्' मध्यें मानलेला तो अयोगवाहाचा पाठ अनित्य ठरतो हे उघड आहे आणि तो पाठ अनित्य असल्यामुळेंच, जरी त्या पाठान्वयें अनुस्वार 'झल्' ठरतो तरी, 'हरिं जयति' इत्यादि उदाहरणात अनुस्वार या 'झल्' पुढें जकार हा 'झश्' असून देखील, त्या अनुस्वाररूप 'झल्' चे 'झलां जश् झशि' या सूत्रानें पावलेले जश्त्व–जकार–न होता, अनुस्वार जसाचा तसाच कायम राहतो असा त्या वैयाकरणाच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. या शब्दरत्नातील पक्तीत 'कश्चित्' हे अरुचि प्रदर्शक पद घातले असल्यामुळें, शब्दरत्नकारास त्या वैयाकरणाचे मत मान्य नाहीं हे स्पष्ट होतें व त्याचे कारण हें कीं, अयोगवाहाचा 'अट्' व 'शर्' मध्यें मानलेला पाठ अनित्य समजावा असे भाष्यात भाष्यकारानी कोठेंहि म्हटले नाहीं व तो पाठ अनित्य मानण्यास दुसरे कोणतेंहि प्रमाण उपलब्ध नाही. दुसरे असे कीं, 'अट्कुपु' या सूत्रातील ज्या नुम्ग्रहणाचा आधार घेऊन त्या वैयाकरणानें अयोगवाहांचा पाठ अनित्य मानला आहे त्या नुम्ग्रहणाचे भाष्यकारानीं प्रत्याख्यान केले आहे 'अट्कुपु' ८-४-२ या सूत्रावरील भाष्यात 'एवं तर्ह्ययोगवाहानामविशेषेणोपदेशश्चोदितस्तत्राऽनुस्वारे कृतेऽट्य्व्यवाये इत्येव सिद्धम् । यद्येव, नार्थो नुम्ग्रहणेन । अनुस्वारे कृतेऽड्व्यवाय इत्येव सिद्धम् ।' असे भाष्यकारानीं स्पष्ट म्हटलें आहे म्हणून ज्या निरर्थक नुम्ग्रहणाचा आधार घेऊन त्या वैयाकरणानें

'अथ पाठोऽनित्यः' असे जें म्हटले आहे तो आधार भाष्यकारानीं केलेल्या नुम्च्या प्रत्याख्यानानें नाहीसा झाला असल्यामुळें, त्याचें तें म्हणणे चूक ठरतें हें उघड आहे. तिसरें असे की, अयोगवाहाचा वरील पाठ अनित्य न मानल्यास 'हरिं जयति' इत्यादि स्थलीं अनुस्वाराचे जश्त्व होण्याची जी आपत्ति त्या वैयाकरणानें दाखविली आहे ती, तो पाठ नित्य मानून देखील, सहज टाळता येते; कारण 'झला जशोऽन्ते' सू. ८४ हें जश्त्वविधायक सूत्र पठित करून पुन्हा पाणिनीनें 'झला जश् झशि' सू ५२ हें जें दुसरे जश्त्वविधायक सूत्र पठित केले आहे त्यावरूनच हें स्पष्ट होतें कीं, प्रथम सूत्र पदान्ती असणाऱ्या 'झल्'ला लागू पडणारे सूत्र असून, पदान्ती नसणाऱ्या 'झल्'ला लागू पडणारे द्वितीय सूत्र आहे. म्हणून 'झला जश् झशि' या उत्तर त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें 'मोऽनुस्वार.' सू १२२ या पूर्व त्रैपादिक सूत्रानें झालेला मकाराचा अनुस्वार जरी सिद्ध ठरतो तरी, 'हरिं जयति' या स्थली अनुस्वाररूप 'झल्' पदान्ती असल्यामुळें, त्याचे जश्त्व करण्यास 'झला जश् झशि' हे सूत्र प्रवृत्त होऊ शकत नाहीं. तसेच 'झला जशोऽन्ते' सू. ८४ हें सूत्र देखील या उदाहरणात प्रवृत्त होऊ शकत नाही, कारण अनुस्वाररूप 'झल्' जरी पदान्ती आहे तरी, 'मोऽनुस्वार.' या उत्तर त्रैपादिक सूत्रानें झालेला तो मकाराचा अनुस्वार 'झला जशोऽन्ते' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, अनुस्वार झालाच नाही व मकारच कायम आहे असे मानावें लागतें, व मकार हा 'झल्' नसल्यामुळें, त्या सूत्रान्वयें 'हरिं जयति' या उदाहरणात जश्त्वाची प्राप्तीच होत नाहीं. साराश वर सांगितल्याप्रमाणे 'हरिं जयति' इत्यादि उदाहरणात जश्त्व होण्याची आपत्ति मुळीच उद्भवत नसल्यामुळें, अयोगवाहाचा 'अट्' व 'शर्'मध्यें केलेला जो पाठ त्या वैयाकरणानें अनित्य मानला आहे तो तसा मानण्याची कांहींच गरज नाही; कारण तो पाठ नित्य मानून देखील जश्त्व होण्याची आपत्ति सहज टाळता येते हें वर

सिद्ध केलेच आहे.) 'यणो मय इति भवत्येव' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, ('सत्कर्ता' या उदाहरणात तकाराचे जें दोनदा द्वित्व होते त्या दोन द्वित्वापैकी) प्रथम द्वित्व ('अचो रहाभ्यां द्वे' सू. ५९ या) एका शास्त्रानें होत असून, द्वितीय द्वित्व भिन्न शास्त्रानें, म्हणजे 'यणो मयो द्वे वाच्ये' या वार्तिकानें, होत असल्यामुळें, दोन्ही द्वित्वकार्ये साधु ठरतात ('लक्ष्ये लक्षणस्य सकृत् प्रवृत्तिः' या न्यायान्वयें एका लक्ष्याचे ठिकाणी एक सूत्र एकदाच प्रवृत्त होते; परंतु त्याच लक्ष्याचे ठिकाणी शास्त्राची प्रवृत्ति होणे देखील संभवत असल्यास ते भिन्न शास्त्र प्रवृत्त करण्यात वरील न्याय आड येत नाही. म्हणून एकाच तकाराचे दोन भिन्न शास्त्रानी दोनदा केलेले द्वित्व साधु ठरते.)

मनोरमा– पुमः खयि । पुंसः संयोगान्तलोपे कृतेऽवशिष्ट-भागस्येदमनुकरणम् । पर्युदासादिति । "इदुदुपधस्य–" इति षत्व-विधायके सूत्रे इति भावः । अप्रत्ययस्य यो विसर्ग इति वैयधिकरण्येन व्याचक्षाणानां प्राचां मतेनेदम् । वक्ष्यमाणरीत्या सामानाधिकरण्येना-न्वये तु षत्वप्राप्ताविति बोध्यम् ॥)

('पुमः खय्यम्परे' सू. १३९ या सूत्रातील 'पुमः' हे पद 'पुम्' या शब्दाची षष्ठी आहे व 'पुम्स्' हे मूळचे प्रातिपदिक असून त्याहून प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' प्रत्यय केला असता, त्या प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें जरी लोप होतो तरी प्रत्ययलक्षणानें 'पुम्स्' याला पदसंज्ञा होते व त्यामुळें 'संयो-गान्तस्य लोपः' सू ५४ या सूत्रानें) 'पुम्स्' या पदातील सकाराचा लोप केल्यावर जो 'पुम्' शब्द अवशिष्ट राहतो त्याचेच प्रकृत सूत्रात अनुकरण केले आहे (व त्या 'पुम्' या अनुकरणाची प्रकृत सूत्रात निर्दिष्ट असलेली 'पुमः' ही षष्ठी होय ) 'अप्रत्ययस्य इति पर्युदासात्' असे जें प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे ते 'इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य' सू. १५५ या षत्वविधायक सूत्रातील 'अप्रत्ययस्य' या पर्युदासाला अनुलक्षून म्हटले आहे. (व्युत्पत्तिपक्ष

मानल्यास, 'इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य' या सूत्रात 'अप्रत्ययस्य' हा पर्युदास असल्यामुळें, 'कुप्वो ≍क ≍पौ च' सू. १४२ या सूत्रान्वयें 'पुस्कोकिलः, पुस्पुत्रः' इत्यादि स्थली विसर्गाचे जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय याची अनुक्रमें प्राप्ति होते असे जें प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे) ते प्राचीन वैयाकरणानी–हरदत्तादिकानीं–'अप्रत्ययस्य यो विसर्गः' असा जो वैयधिकरण्यानें अन्वय करून 'इदुदुपधस्य' या सूत्राचा अर्थ केला आहे त्या अर्थाला अनुसरून म्हटले आहे. परतु 'इदुदुपधस्य' सू १५५ या सूत्राचा पुढें मनोरमेंत 'अप्रत्ययो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अन्वय करून जसा अर्थ केला आहे तसा अर्थ मानल्यास, 'प' ह्याचीच प्राप्ति होते. ('पातेर्डुम्सुन्' उणादि सू. ६१७ या सूत्रान्वयें 'पा' धातूहून 'डुम्सुन् = उम्स्' प्रत्यय होऊन तो प्रत्यय 'डित्' असल्यामुळें 'अमस्यापि टेर्लोपो डिति' या वचनान्वयें, 'टेः' सू. ३१६ या सूत्रानें 'पा' यातील 'टि' चा – म्हणजे आकाराचा – लोप होऊन 'प् + डुम्सुन् = प् + उम्स् = पुम्स्' असे रूप सिद्ध होते. 'पुमान् चासौ कोकिलश्च पुस्कोकिलः' या स्थली 'पुम्स् सु कोकिल सु' अशा स्थितींत 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'सु' या अन्तर्वर्ति विभक्ति प्रत्ययाचा जरी लुक् होतो तरी, 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'पुम्स्' याला पदसंज्ञा होते व त्यामुळें 'सयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रानें 'पुम्स्' यातील अन्त्य सकाराचा लोप झाला असता, 'पुम् कोकिलः' अशी स्थिति होते. अशा स्थितीत 'पुमः खय्यम्परे' या प्रकृत सूत्रानें 'पुम्' यातील मकाराचे रुत्व होऊन व 'अनुनासिकात्परोऽनुस्वारः' सू. १३७ या सूत्रानें 'पु' च्या पुढें अनुस्वार आगम होऊन 'पुंर् कोकिलः' अशी स्थिति झाल्यावर, 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें रकाराचा विसर्ग होऊन 'पुंः कोकिलः' या स्थितीत 'विसर्जनीयस्य सः' सू. १३८ या सूत्राची प्राप्ति होते. परतु 'कुप्वोः' सू. १४२ हे त्याचे बाधक सूत्र असल्यामुळें विसर्गाचे जागी

सकाराची प्राप्ति न होता, जिव्हामूलीयाची प्राप्ति होते. पण 'कुप्वोः' या सूत्राचे देखील बाधक 'इदुदुपधस्य' सू. १५५ हें सूत्र असल्यामुळें, विसर्गाचे जागी षत्वाची प्राप्ति होते. पण 'अप्रत्ययस्य विसर्गस्य' याचा सामानाधिकरण्यानें अन्वय करून प्रत्ययरूप नसलेला जो विसर्ग त्याचे षत्व होते असा अर्थ मानला तरच, षत्वाची प्राप्ति होते. प्रकृत स्थली 'पुम्' यातील मकाराचे रुत्व होऊन जो विसर्ग झाला आहे तो संपूर्ण 'उम्स्' प्रत्ययाचे जागी झाला नसल्यामुळें प्रत्यय ठरत नसून 'उम्स्' प्रत्ययाचा अवयव जो मकार त्याचे जागी झाला असल्यामुळें अप्रत्यय ठरतो. म्हणून प्रकृत स्थली षत्वाची प्राप्ति होते. पण 'अप्रत्ययस्य विसर्गस्य' याचा वैयधिकरण्यानें अन्वय करून 'प्रत्ययावयवो यो विसर्गस्तभ्दिन्नस्य' असा जो प्राचीन वैयाकरणानी अर्थ केला आहे तो अर्थ मानल्यास, ज्या मकाराचे रुत्व होऊन विसर्ग झाला आहे तो 'उम्स्' या औणादिक प्रत्ययाचा अवयव असल्यामुळें, तो विसर्ग अप्रत्यय मानता येत नाही व त्यामुळें षत्वाची प्राप्ति न होता, जिव्हामूलीयाचीच 'कुप्वो' या सूत्रान्वयें प्राप्ति होते. या वर सांगितलेल्या षत्वप्राप्तीचे व जिव्हामूलीयप्राप्तीचे निवारण करण्याकरिताच, 'सपुंकाना सो वक्तव्य' हे वार्तिक मुद्दाम केले आहे व हें वार्तिक असल्यामुळें, विसर्गाचे जागी षकार किंवा जिव्हामूलीय न होता, सकार होऊन 'पुस्कोकिलः' असें रूप सिद्ध होतें. येथपर्यंत जें विवेचन केले आहे तें व्युत्पत्तिपक्ष मानून केले आहे. पण 'उणादयोऽव्युत्पन्नानि प्राति-पदिकानि'—प २२—म्हणजे उणादि प्रत्यय लावून जीं रूपें सिद्ध केली जातात तीं वास्तविक प्रकृतिप्रत्ययरहित स्वत सिद्ध अव्युत्पन्न प्रातिपदिकें आहेत—या परिभाषान्वयें अव्युत्पत्तिपक्ष मानल्यास व 'पुम्स्' हा शब्द कोणताहि प्रत्यय लागून सिद्ध झाला नसून स्वतःसिद्ध प्रातिपदिक आहे असें मानल्यास, ज्या मकाराचे जागी रुत्व होऊन विसर्ग झाला आहे तो प्रत्ययभिन्न व तसेच प्रत्ययावयवभिन्न देखील ठरत असल्यामुळें,

या अव्युत्पत्तिपक्षांत 'इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य' सू. १५५ या सूत्रानें केवळ षत्वाची प्राप्ति आहे व त्या प्राप्तीचे निवारण करण्याकरिता 'मपुंकाना सो वक्तव्यः' हे वार्तिक केले आहे असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न— वक्ष्यमाणरीत्येति । प्रत्ययरूपो यो विसर्ग इति व्याख्यादर्शरीत्येत्यर्थः । वस्तुतस्तदसङ्गतम् । कविभिः कृतमित्यादौ दोषापत्तेः । एतच्चभन्वये "तु" इति तुनाऽरुचिबोधकेन सूचितम् । यदा तु सूतेः सस्य षकारोऽन्त्यस्य ह्रस्वो म्सुः प्रत्यय इति "स्त्रिपाम्" इति सूत्रभाष्यकैयटोक्तव्युत्पत्तिस्तदा सस्य लोपे मस्यैव प्रत्ययत्वमिति व्याख्यादर्शोक्तसामानाधिकरण्येऽपि षत्वाप्राप्तिरेव । पातेर्डुम्सुन्निति व्युत्पत्तिमादाय तु मूलमिति दिक् ॥

'वक्ष्यमाणरीत्या सामानाधिकरण्येनान्वये तु' असे जें मनोरमेंत म्हटले आहे ते 'इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य' या सूत्रातील 'प्रत्यय' शब्दाचे 'प्रत्ययरूपो यो विसर्गः' असे जें पुढें मनोरमेंत (सामानाधिकरण्यानें) व्याख्यादर्शग्रन्थानुसार व्याख्यान केले आहे त्या व्याख्यानाला अनुसरून म्हटले आहे. वास्तविक तें व्याख्यान बरोबर नाहीं; कारण तें बरोबर मानल्यास, 'कविभिः कृतम्' इत्यादि स्थली दोषाची, म्हणजे विसर्गाचे षत्व होण्याची, आपत्ति येते. ('कवि + भिस्' या स्थली सपूर्ण 'भिस्' हा प्रत्यय असून त्यातील सकार हा प्रत्यय नाहीं व तो प्रत्ययाचा अवयव आहे. म्हणून जर तो सकार अप्रत्यय–प्रत्ययभिन्न–मानला तर त्याचे जागी होणाऱ्या विसर्गाचा 'इदुदुपधस्य' या सूत्रानें षकार होण्याची व 'कविभिष्कृतम्' असा अनिष्ट प्रयोग सिद्ध होण्याची आपत्ति येते. पण वैयधिकरण्यानें अन्वय करून 'प्रत्ययस्य अवयवो यो न भवति' असा 'अप्रत्ययस्य' या शब्दाचा अर्थ केला तरच षत्वाची आपत्ति टळते व 'कविभिः कृतम्' असा इष्ट प्रयोग सिद्ध होऊ शकतो; कारण जरी सपूर्ण 'भिस्' हा प्रत्यय आहे तरी त्यातील सकार हा त्या प्रत्ययाचा अवयव आहेच.) वरील मनोरमेच्या पंक्तीत

'अन्वये' या पदापुढें 'तु' या अरुचिबोधक पदाचा उपयोग केला असल्यामुळें, तसा सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यास अनिष्ट रूपे सिद्ध होण्याची आपत्ति येते असे दीक्षित सुचवितात. 'स्त्रियाम्' ४. १. ३. या सूत्रावरील भाष्यात व त्या भाष्यावरील कैयटवृत्तीत, 'सू' धातूतील सकाराचा पकार होऊन व त्या धातूतील ऊकार ऱ्हस्व होऊन 'पु' अशी स्थिति झाली असता त्याहून 'म्सु=म्स्' हा प्रत्यय केल्यानें 'पुम्स्' हे रूप सिद्ध होते, असे जें म्हटले आहे तशा रीतीनें 'पुम्स्' शब्दाची व्युत्पत्ति केल्यानें, जेव्हा 'पुम्स्' यातील अन्त्य सकाराचा ('संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रानें) लोप होऊन 'पुम्' असे रूप होते तेव्हा 'म्स्' प्रत्ययातील अवशिष्ट राहिलेल्या मकारालाच प्रत्यय म्हणतां येत असल्यामुळें, 'अप्रत्ययो यो विसर्गः' असे जें मनोरमेंत व्याख्यादर्शग्रन्थानुसार सामानाधिकरण्यानें व्याख्यान केले आहे त्या व्याख्यानान्वयें देखील ('पुंस्को-किलः' या उदाहरणात) षत्वाची प्राप्तीच होत नाही. ('स्त्रियाम्' या सूत्रावरील भाष्यात 'सस्त्याने स्त्यायतेड्ट् स्त्री, सूतेः सप् प्रसवे पुमान्' असे वार्तिक पठित केले आहे व या वार्तिकातील 'सूतेः सप् प्रसवे पुमान्' याचे कैयटानें 'सू इत्येतस्य धातोः सप् भवति। सकारस्य पकारो भवतीत्यर्थः। औणादिको म्सुन् प्रत्ययः, ऱ्हस्वश्च बाहुलकात्' असे व्याख्यान केले आहे. 'पुम्स्' शब्दाची वरील वार्तिकान्वयें भाष्यकारानी वर दर्शविल्याप्रमाणे जी व्युत्पत्ति केली आहे तिचा आश्रय केल्यानें 'म्स्' हा प्रत्यय ठरतो व त्या प्रत्ययातील अन्त्य सकाराचा लोप झाल्यावर अवशिष्ट राहिलेला मकार 'यः शिष्यते स लुप्यमानार्थाभिधायी' या न्यायान्वयें प्रत्ययसंज्ञक होतो व त्या मकाराचे जागीं प्रकृत सूत्रानें 'रु' होऊन त्या 'रु' तील रेफाचे जागीं झालेला विसर्ग प्रत्ययरूप विसर्ग ठरतो आणि 'इदुदुपधस्य' या सूत्रात 'अप्रत्ययस्य' हा निषेध असल्यामुळें त्या निषेधाचा 'प्रत्ययरूपो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अर्थ केला तरी, तें सूत्र 'पुंस्कोकिलः' या उदाहरणात लागू पडत नाहीं व त्यामुळें

आर्धधातुकप्रत्यय करणे विवक्षित असता, जो 'ख्याञ्' आदेश होणे सांगितले आहे तो वास्तविक) उपदेशात– आद्योच्चारणात– 'ख्शा' नें सुरु होणारा आदेश आहे. ('ख्या' नें सुरु होणारा तो आदेश नव्हे मग त्या आदेशातील 'ख्शा' चा 'ख्या' कसा होतो ? 'चक्षिङ ख्याञ्' २–४–५४ या सूत्रावरील भाष्यात भाष्यकार म्हणतात– 'किमयं क्शादि, आहोस्वित्ख्यादि । चक्षिङ क्शाञ्ख्याञौ । चक्षिङ क्शाञ्ख्याञिति क्शादिश्च ख्यादिश्च । ख्शादिर्वा । अथ वा ख्शादिर्भविष्यति । केनेदानी क्शादिर्भविष्यति? । चर्त्वेन । अथ ख्यादिः कथम् ? । असिद्धे शस्य यवचनं विभाषा ।' या भाष्यात 'असिद्धे शस्य यवचनं विभाषा ।' हे जें वार्तिक पठित केले आहे त्याचा कैयटानें 'पूर्वत्रासिद्धमित्यधिकारे णत्वविधानानन्तरं शस्य य-व विभाषा वक्तव्यम्' असा अर्थ केला आहे. 'चक्षिङः ख्याञ्' या पाणिनीय सूत्रात 'चक्ष्' धातूचे जागी 'ख्याञ् = ख्या' हा आदेश व्हावा असे स्पष्ट सांगितले असून देखील, तो मूळचा 'ख्शाञ्' आदेश आहे असे सांगणे व त्या आदेशातील शकाराचे जागी यकारादेश होण्याकरिता व 'ख्याञ्' असे त्या आदेशाचे पाणिनिप्रोक्त रूप सिद्ध होण्याकरिता 'असिद्धे शस्य यवचनं विभाषा' हे वार्तिक पठित करणे हा सर्व द्राविडी प्राणायाम करण्याची गरज काय असा प्रश्न येथें सहज उपस्थित होतो म्हणून 'ख्शा' असा मूळ आदेश मानण्याची व वरील वार्तिक पठित करण्याचीं अनेक प्रयोजनें त्या भाष्यात सांगितलीं आहेत व त्या सर्व प्रयोजनांचा प्रकृत मनोरमेंत निर्देश केला आहे त्या वार्तिकाचा कैयटानें असा अर्थ केला आहे तसाच अर्थ दीक्षित करतात व म्हणतात की,) असिद्धकाण्डात– अष्टमाध्यायाच्या चतुर्थ पादात– जें णत्वप्रकरण पठित केले आहे त्याच्या लगेंच नंतर, ज्यात 'ख्शा' या आदेशातील शकाराचे विकल्पेंकरून यत्व होणे सांगितले आहे, तें वरील वार्तिक पठित आहे असे समजावे; आणि म्हणून 'मुप्तख्येन निर्वृत्त सौप्रख्य, तत्र भव. सौप्रख्यीयः' या उदाहरणात, यत्व असिद्ध असल्यामुळें,

'धन्वयोपधाद् वुञ्' सू. १३४५ या सूत्रानें होणारा 'वुञ्' प्रत्यय, होत नाही, इत्यादि वरील वार्तिकाची प्रयोजनें भाष्यात सांगितली आहेत. ('सुप्रचष्टे इति सुप्रख्यः' या स्थलीं 'आतश्चोपसर्गे' सू. २८९८ या सूत्रानें 'क' हा आर्धधातुक प्रत्यय कर्तव्य असता, 'चक्ष्' चे जागी ख्शादेश होऊन व 'आतो लोपः' सू २३७२ या सूत्रानें 'ख्शा' या आदेशातील अन्त्य आकाराचा लोप होऊन, आणि नंतर त्या आदेशातील शकाराचे जागीं 'असिद्धे शस्य यवचनम्' या वार्तिकानें यकार होऊन 'सुप्रख्य' हा शब्द सिद्ध होतो व 'तेन निर्वृत्तम्' सू. १२८० या सूत्रानें 'सुप्रख्येन निर्वृत्तम्' या अर्थामध्यें 'सुप्रख्य' या शब्दाहून चातुरर्थिक 'अण्' प्रत्यय केला असता, 'तद्धितेष्वचामादे' सू. १०७१ या सूत्रानें आद्यचाची वृद्धि होऊन 'सौप्रख्य' असे रूप झाल्यावर येथें देशवाचक 'सौप्रख्य' या 'वृद्धिर्यस्याचामादिस्तद् वृद्धम्' सू. १३३५ या सूत्रान्वयें वृद्ध-संज्ञक असणाऱ्या शब्दांत उपधेमध्यें यकार असल्यामुळे, 'यकारो-पधात् देशवाचिनो वृद्धात् वुञ् स्यात्' या अर्थाच्या वाचक 'धन्वयो-पधाद्वुञ्' या सूत्रानें 'वुञ्' प्रत्यय होण्याची प्राप्ति आहे. परंतु मूळचा 'ख्शा' आदेश आहे व त्या आदेशातील शकाराचे जागी असिद्धकाण्डातील वार्तिकानें यकारादेश होतो असे मानले असल्या-मुळें, 'वुञ्' प्रत्यय होण्याची आपत्ति टळते; कारण 'धन्वयोप-धाद्वुञ्' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक वार्तिकानें झालेले 'ख्शा' या आदेशातील शकाराचे यत्व असिद्ध ठरत असल्यामुळें, उपधेंत यकार नसून शकारच कायम आहे असे मानणें भाग पडत असल्यामुळें, 'धन्वयोपधाद्वुञ्' या सूत्राची प्राप्ति न होता, 'वृद्धाच्छः' सू. १३३७ या सूत्रानें 'सौप्रख्य' शब्दाहून 'छ = ईय्', प्रत्यय होऊन 'सौप्रख्यीयः' असे इष्ट रूप सिद्ध होते. जर मूळचा आदेश 'ख्या' असून 'ख्शा' नाही असे मानले असते व वरील वार्तिक पठित केले नसतें तर, वरील उदाहरणात उपधेंतील यकार असिद्ध ठरला नसता व त्यामुळें 'वुञ्' प्रत्यय होण्याची आपत्ति

आली असती, आणि म्हणूनच भाष्यकारांनी ते वार्तिक पठित करण्याची जी अनेक प्रयोजनें सांगितलीं आहेत त्यांत 'प्रयोजनं सौप्रख्येऽवुञ्विधि·' हें प्रथम प्रयोजन सांगितले आहे. व त्याचे असे व्याख्यान केले आहे कीं, 'सौप्रख्य इति योपधलक्षणो वुञ्विधिर्न भवति। वृद्धाच्छ इति च्छो भवति।' पुढें भाष्यकारांनी 'रुविधि· पुंख्याने। पुंख्यानमिति रुविधिर्न भवति।' हें देखील ख्शादेशाचे व वरील वार्तिकाचे प्रयोजन सांगितले आहे आणि त्याचाच दीक्षित पुढील पङ्क्तीत अनुवाद करितात.) अशा रीतीनें ('पुमः खय्यम्परे' या त्रैपादिक पूर्वसूत्राच्या दृष्टीनें 'असिद्धे शस्य यवचनम्' या उत्तर त्रैपादिक वार्तिकान्वयें 'ख्शा' या आदेशातील शकाराचे जागीं झालेला) यकारादेश असिद्ध ठरत असल्यामुळें, 'पुंख्यानम्' या स्थलीं खकार या 'खय्' पुढें 'य्' हा 'अम्' आहे असे मानता येत नाहीं, (व 'अम्' नसलेला शकारच आहे असे मानणे भाग पडते. त्यामुळें 'पुसः ख्यानम् = पुंख्यानम्' या स्थलीं) 'पुमः खय्यम्परे' या सूत्रान्वयें होणारे 'पुम्' यातील मकाराचे रुत्व होत नाही (आणि 'मोऽनुस्वारः' सू. १२२ या सूत्रानें त्या मकाराचा अनुस्वार होऊन, 'पुंस्ख्यानम्' असे अनिष्ट रूप न होता, 'पुंख्यानम्' असे इष्ट रूप सिद्ध होते. जर 'ख्शा' असा आदेश मानला नसता व वरील वार्तिक मानले नसते तर, यकार हा 'अम्' खकारापुढें आहे व तो असिद्ध नाहीं असे मानावे लागले असतें व त्यामुळें वरील अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती; पण तसा आदेश व ते वार्तिक मानले असल्यामुळें, ती आपत्ति टळते आणि 'ख्यायादेशे न' असे जें 'पुमः खय्यम्परे' या सूत्रावर कौमुदीत वार्तिक पठित केलें आहे तें पठित करण्याची देखील गरज राहत नाही) 'पुंख्यानम्' यातील 'ख्यान' हा शब्द 'चक्ष्' धातूहून 'ल्युट् = अन' प्रत्यय करतेवेळीं 'ख्यान्' आदेश होऊन झाला आहे 'वर्जने प्रतिषेधः' व 'असनयोश्च' हीं वार्तिकें असल्यामुळें (व 'चक्ष् + ल्युट्' या स्थलीं 'ल्युट् = अन' हा प्रत्यय

'चक्ष्' धातूपुढें असल्यामुळें, 'पुंख्यानम्' या स्थलीं 'चक्ष्' धातूचे जागीं) 'ख्याय्' आदेश होणे अशक्य आहे अशी कोणी शंका केल्यास, ती शंका एका रीतीनें बरोबर आहे. परंतु 'बहुल तणि, अनवघकगात्रविचक्षणाजिराद्यर्थम्' या वार्तिकात 'बहुलम्' या पदाचे ग्रहण केले असल्यामुळें, ('चक्ष्' धातूपुढें 'ल्युट् = अन' हा प्रत्यय असून देखील व 'असनयोश्च' हा प्रतिषेध असून देखील, 'चक्ष्' धातूचे जागीं) 'ख्यात्र् = ख्या' आदेश होतो अशा रीतीनें त्या शकेचे समाधान करावें. ('चक्षिङः ख्यात्र्' २. ४. ५४ या सूत्रावरील भाष्यात पठित असलेल्या 'असनयोश्च' या निषेधक वार्तिकाचा अर्थ हा आहे कीं, 'चक्ष्' धातुपुढें 'अस्' किंवा 'अन' हा आर्धधातुक प्रत्यय आल्यास, 'चक्ष्' चे जागीं 'चक्षिङः ख्यात्र्' या सूत्रानें प्राप्त होणारा 'ख्या' हा आदेश करूं नये. म्हणून या निषेधक वार्तिकाच्या आधारावर शंकाकार अशी शका करतो की, 'चक्ष्' धातूहून 'ल्युट् = यु' हा आर्धधातुक प्रत्यय केला असतां, 'युवोरनाकौ' सू. १२४७ या सूत्रानें 'यु' चे जागीं 'अन' असा आदेश होऊन 'चक्ष्' धातूपुढें 'अन' प्रत्यय येत असल्यामुळें, 'चक्ष्' चे जागीं 'ख्या' हा आदेश होऊ शकत नाहीं व त्यामुळें 'ख्यान' असे रूप न होता, 'चक्षण' असें रूप झाले पाहिजे. या शकेवर दीक्षित असे उत्तर देतात की, जरी ही शका 'असनयोश्च' या वार्तिकान्वयें योग्य ठरते तरी, त्याच भाष्यात पठित असलेल्या 'बहुल तणि' या वार्तिकात 'बहुलम्' या पदाचे ग्रहण केलें असल्यामुळें, व 'क्वचित् प्रवृत्तिः क्वचिदप्रवृत्तिः क्वचिद्विभाषा क्वचिदन्यदेव । शिष्टप्रयोगाननुसृत्य लोके विज्ञेयमेतद् बहुलग्रहे तु ॥' असा 'बहुल' शब्दाचा अर्थ असल्यामुळें 'चक्ष् + अन' या स्थलीं 'असनयोश्च' हें निषेधक वार्तिक 'बहुल' ग्रहणाच्या सामर्थ्यानें प्रवृत्त होत नाहीं व 'चक्षिङः ख्यात्र्' या सूत्रानें 'चक्ष्' चे जागीं 'ख्या' आदेश होऊन 'ख्यान' असे इष्ट रूप सिद्ध होतें. 'बहुलं तणि' या वार्तिकातील 'तण्' हा शब्द 'संज्ञा' व 'छन्दस् = वेद' याचा

'चन्' धातूपुढें असल्यामुळें, 'प्रख्यानम्' या स्थलीं 'चक्ष्' धातूचे जागीं) 'ख्याञ्' आदेश होणें अशक्य आहे अशी कोणी शंका केल्यास, ती शंका एका रीतीनें बरोबर आहे परंतु 'बहुल तणि, अन्वक्तव्यगात्रविचक्षणाजिराद्यर्थम्' या वार्तिकात 'बहुलम्' या पदाचे ग्रहण केलें असल्यामुळें, ('चक्ष्' धातूपुढें 'ल्युट् = अन' हा प्रत्यय असून देखील व 'असनयोश्च' हा प्रतिषेध असून देखील, 'चक्ष्' धातूचे जागीं) 'ख्याञ् = ख्या' आदेश होता अशा रीतीनें त्या शंकेचे समाधान करावे ('चक्षिङ ख्याञ्' २ ४.५४ या सूत्रावरील भाष्यात पठित असलेल्या 'असनयोश्च' या निषेधक वार्तिकाचा अर्थ हा आहे कीं, 'चक्ष्' धातूपुढें 'अस्' किंवा 'अन' हा आर्धधातुक प्रत्यय आल्यास, 'चक्ष्' चे जागीं 'चक्षिङ ख्याञ्' या सूत्रानें प्राप्त होणारा 'ख्या' हा आदेश करू नये म्हणून या निषेधक वार्तिकाच्या आधारावर शंकाकार अशी शंका करतो कीं, 'चक्ष' धातूहून 'ल्युट् = यु' हा आर्धधातुक प्रत्यय केला असता, 'युवोरनाकौ' सू. १२४७ या सूत्रानें 'यु' चे जागीं 'अन' असा आदेश होऊन 'चक्ष्' धातूपुढें 'अन' प्रत्यय येत असल्यामुळें, 'चक्ष' चे जागीं 'ख्या' हा आदेश होऊ शकत नाहीं व त्यामुळें 'ख्यान' असें रूप न होता, 'चक्षण' असें रूप झालें पाहिजे या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, जरी ही शंका 'असनयोश्च' या वार्तिकान्वयें योग्य ठरते तरी, त्याच भाष्यात पठित असलेल्या 'बहुल तणि' या वार्तिकात 'बहुलम्' या पदाचे ग्रहण केलें असल्यामुळें, व 'क्वचित् प्रवृत्तिः क्वचिदप्रवृत्तिः क्वचिद्विभाषा क्वचिदन्यदेव । शिष्टप्रयोगाननुसृत्य लोके विज्ञेयमेतद् बहुलग्रहे तु ॥' असा 'बहुल' शब्दाचा अर्थ असल्यामुळें 'चक्ष् + अन' या स्थलीं 'असनयोश्च' हें निषेधक वार्तिक 'बहुल' ग्रहणाच्या सामर्थ्यानें प्रवृत्त होत नाहीं व 'चक्षिङ ख्याञ्' या सूत्रानें 'चक्ष' चे जागीं 'ख्या' आदेश होऊन 'ख्यान' असें इष्ट रूप सिद्ध होतें 'बहुल तणि' या वार्तिकातील 'तण्' हा शब्द 'संज्ञा' व 'छन्दस् = वेद' याचा

आली असती, आणि म्हणूनच भाष्यकारानी ते वार्तिक पठित करण्याची जी अनेक प्रयोजनें सांगितलीं आहेत त्यात 'प्रयोजन सौप्रख्येऽवुञ्विधिः' हें प्रथम प्रयोजन सांगितले आहे. व त्याचे असे व्याख्यान केले आहे कीं, 'सौप्रख्य इति योपधलक्षणो वुञ्विधिर्न भवति। वृद्धाच्छ इति च्छो भवति।' पुढें भाष्यकारानी 'ख्विधि' पुख्याने। पुख्यानमिति ख्विधिर्न भवति।' हे देखील ख्शादेशाचे व वरील वार्तिकाचे प्रयोजन सांगितले आहे आणि त्याचाच दीक्षित पुढील पक्तीत अनुवाद करितात.) अशा रीतीनें ('पुमः खय्यम्परे' या त्रैपादिक पूर्वसूत्राच्या दृष्टीनें 'असिद्धे शस्य यवचनम्' या उत्तर त्रैपादिक वार्तिकान्वयें 'ख्शा' या आदेशातील शकाराचे जागीं झालेला) यकारादेश असिद्ध ठरत असल्यामुळें, 'पुख्यानम्' या स्थलीं खकार या 'खय्' पुढें 'य्' हा 'अम्' आहे असे मानता येत नाहीं, (व 'अम्' नसलेला शकारच आहे असे मानणे भाग पडतें. त्यामुळें 'पुस· ख्यानम् = पुख्यानम्' या स्थलीं) 'पुमः खय्यम्परे' या सूत्रान्वयें होणारे 'पुम्' यातील मकाराचे रुत्व होत नाहीं (आणि 'मोऽनुस्वारः' सू. १२२ या सूत्रानें त्या मकाराचा अनुस्वार होऊन, 'पुंस्ख्यानम्' असे अनिष्ट रूप न होता, 'पुख्यानम्' असे इष्ट रूप सिद्ध होते. जर 'ख्शा' असा आदेश मानला नसता व वरील वार्तिक मानले नसते तर, यकार हा 'अम्' खकारापुढें आहे व तो असिद्ध नाहीं असे मानावे लागले असतें व त्यामुळें वरील अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती; पण तसा आदेश व ते वार्तिक मानले असल्यामुळें, ती आपत्ति टळते आणि 'ख्यायादेशे न' असे जें 'पुमः खय्यम्परे' या सूत्रावर कौमुदींत वार्तिक पठित केले आहे तें पठित करण्याची देखील गरज राहत नाहीं.) 'पुख्यानम्' यातील 'ख्यान' हा शब्द 'चक्ष्' धातूहून 'ल्युट् = अन' प्रत्यय करतेवेळीं 'ख्यान्' आदेश होऊन झाला आहे. 'वर्जने प्रतिषेधः' व 'असनयोश्च' हीं वार्तिकें असल्यामुळें (व 'चक्ष् + ल्युट्' या स्थलीं 'ल्युट् = अन' हा प्रत्यय

'चक्ष्' धातूपुढें असल्यामुळें, 'पुंख्यानम्' या स्थलीं 'चक्ष्' धातूचे जागीं) 'ख्याञ्' आदेश होणें अशक्य आहे अशी कोणी शंका घेतल्यास, ती शंका एका रीतीनें बरोबर आहे. परंतु 'बहुलं तणि, संवचक्षणविचक्षणाजिरायर्थम्' या वार्तिकांत 'बहुलम्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, ('चक्ष्' धातूपुढें 'ल्युट् = अन' हा प्रत्यय असून देखील व 'असनयोश्च' हा प्रतिषेध असून देखील, 'चक्ष्' धातूचे जागीं) 'ख्याञ् = ख्या' आदेश होतो अशा रीतीनें त्या शंकेचें समाधान करावें. ('चक्षिङः ख्याञ्' २. ४. ५४ या सूत्रावरील भाष्यांत पठित असलेल्या 'असनयोश्च' या निषेधक वार्तिकाचा अर्थ हा आहे कीं, 'चक्ष्' धातूपुढें 'अस्' किंवा 'अन' हा आर्ध-धातुक प्रत्यय आल्यास, 'चक्ष्' चे जागीं 'चक्षिङः ख्याञ्' या सूत्रानें प्राप्त होणारा 'ख्या' हा आदेश करूं नये. म्हणून या निषेधक वार्तिकाच्या आधारावर शंकाकार अशी शंका करतो कीं, 'चक्ष्' धातूहून 'ल्युट् = यु' हा आर्धधातुक प्रत्यय केला असतां, 'युवोर-नाकौ' सू. १२४७ या सूत्रानें 'यु' चे जागीं 'अन' असा आदेश होऊन 'चक्ष्' धातूपुढें 'अन' प्रत्यय येत असल्यामुळें, 'चक्ष्' चे जागीं 'ख्या' हा आदेश होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'ख्यान' असें रूप न होतां, 'चक्षण' असें रूप झालें पाहिजे या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, जरी ही शंका 'असनयोश्च' या वार्तिकान्वयें योग्य ठरते तरी, त्याच भाष्यांत पठित असलेल्या 'बहुलं तणि' या वार्तिकांत 'बहुलम्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, व 'क्वचित् प्रवृत्तिः क्वचिदप्रवृत्तिः क्वचिद्विभाषा क्वचिदन्यदेव। शिष्टप्रयोगाननुसृत्य लोके विज्ञेयमेतद् बहुलग्रहे तु ॥' असा 'बहुल' शब्दाचा अर्थ असल्यामुळें 'चक्ष् + अन' या स्थलीं 'असन-योश्च' हें निषेधक वार्तिक 'बहुल' ग्रहणाच्या सामर्थ्यानें प्रवृत्त होत नाहीं व 'चक्षिङः ख्याञ्' या सूत्रानें 'चक्ष्' चे जागीं 'ख्या' आदेश होऊन 'ख्यान' असें इष्ट रूप सिद्ध होतें 'बहुलं तणि' या वार्तिकांतील 'तण्' हा शब्द 'संज्ञा' व 'छन्दस् = वेद' यांचा

वाचक आहे व त्या वार्तिकाचा असा अर्थ आहे की, 'संज्ञा' वाच्य असताना व तसेच वेदात आर्धधातुकाधिकारात धातूचे जागीं जे आदेश होणे सांगितले आहेत ते कोठें कोठें आर्धधातुकप्रत्यय पुढें असून देखील होत नाहीत व जेथें तसे आदेश होण्याचे विधान केले नाहीं तशा ठिकाणी देखील ते क्वचित् होतात. 'चक्षिङः ख्याञ्' या सूत्रावरील भाष्यात 'बहुल तणि' हे वार्तिक पठित करून या वार्तिकाचे व्याख्यान करिताना भाष्यकार म्हणतात. 'बहुल तणीति वक्तव्यम् । किमिद तणीति ? । तणीति सज्ञाछन्दसोर्ग्रहणम् । किं प्रयोजनम् ? । अन्नवधकगात्रविचक्षणाजिराद्यर्थम् ।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें की, 'बहुल तणि' हे वार्तिक करण्याचे प्रयोजन हे आहे की. 'अन्न, वधक, गात्र, विचक्षण, अजिर' इत्यादि सज्ञावाचक रूपें सिद्ध व्हावीं. 'अद् + क्त' या स्थली 'अद्' धातूपुढें 'क्त' हा तकारानें सुरू होणारा कित् आर्धधातुक निष्ठा प्रत्यय असल्यामुळें, 'अदो जग्धिर्ल्यप्ति किति' सू. ३०८० या सूत्रानें 'अद्' चे जागीं 'जग्ध्' हा आदेश पावला आहे. पण 'अन्न' हा शब्द सज्ञावाचक असल्यामुळें या स्थली 'जग्ध्' हा आदेश झाला नाही. 'ण्वुल्तृचौ' सू. २८९५ या सूत्रानें 'हन्' धातूहून 'ण्वुल् = अक' प्रत्यय केला असतां, 'हन् + ण्वुल्' या स्थितीत 'हन्' चे जागी 'वध' हा आदेश पावलाच नाही; कारण 'हनो वध लिङि, लुङि च' सू. २४३३ व २४३४ या सूत्रान्वयें तो आदेश आशीर्लिङात व लुङातच होणे सांगितले आहे. तरीपण 'वधक' हें सज्ञावाचक रूप सिद्ध करतेवेळीं 'ण्वुल्' प्रत्यय पुढें असून देखील तसा आदेश होतो. तसेच 'गात्र' हा शब्द 'इण् = इ' या धातूहून 'सर्वधातुभ्यः ष्ट्रन्' उ. सू ५९८ या सूत्रान्वयें औणादिक 'ष्ट्रन् = त्र' प्रत्यय होऊन सिद्ध झाला आहे. 'इणो गा लुङि' सू २४५८ या सूत्रानें 'इण्' धातूचे जागीं लुङ्लकारातच 'गा' हा आदेश होणे सांगितले आहे. तरी पण 'ष्ट्रन्' प्रत्यय पुढें असून देखील तसा आदेश झाला आहे व 'गात्र' हें सज्ञावाचक रूप सिद्ध झाले आहे. 'विचक्षण' हा

शब्द 'वि' या उपसर्गपूर्वक 'चक्ष्' धातूहून 'अनुदात्तेतश्च हलादेः' सू. ३१२९ या सूत्रानें 'युच् = अन' हा प्रत्यय होऊन सिद्ध झाला आहे. 'वि + चक्ष् + युच्' या स्थली 'चक्ष्' धातूपुढें 'युच्' हा आर्धधातुक प्रत्यय असल्यामुळें, 'चक्षिङः ख्याञ्' सू. २४३६ या सूत्रानें त्या धातूचे जागीं 'ख्याञ्' हा आदेश पावला आहे. तरी पण 'विचक्षण' हा शब्द संज्ञावाचक असल्यामुळें या स्थळीं ख्याञादेश झाला नाहीं. 'अज्' धातूपुढें 'घञ्' व 'अप्' प्रत्यय खेरीज करून इतर आर्धधातुक प्रत्यय झाला असतां त्या धातूचे जागीं 'अजेर्व्यघञपोः' सू. २३९२ या सूत्रानें 'वी' हा आदेश होणें सांगितलें आहे. 'अजिर' या स्थलीं 'अज्' धातूहून 'घञ्' किंवा 'अप्' प्रत्यय झाला नसून 'इरच्' हा आर्धधातुक प्रत्यय झाला आहे. म्हणून वरील सूत्रान्वयें 'अज्' धातूचे जागीं 'वी' हा आदेश पावला आहे. तरी पण 'अजिर' हा शब्द संज्ञा-वाचक असल्यामुळें येथें 'वी' हा आदेश झाला नाहीं. 'अजिर शिशिर' उ. सू ५३ या उणादि सूत्रात 'अज्' धातूहून 'किरच् = इर' प्रत्यय होतो व 'अज्'चे जागीं 'वी' हा आदेश न होता 'अजिर' हा शब्द निपातनानें सिद्ध होतो असे सांगितले आहे. पण या उणादि सूत्राचा भाष्यात उल्लेख केला नाहीं व 'बहुल तणि' या वार्तिकान्वयें त्या शब्दाची सिद्धि केली आहे. सारांश 'पुंख्यानम्' या स्थलीं जरी 'असनयोश्च' हें निषेधक वार्तिक असल्यामुळें 'चक्ष्' धातूचे जागीं 'ख्याञ्' आदेश पावला नाहीं तरी, 'बहुल तणि' या वार्तिकांत 'बहुलम्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें तसा आदेश झाला आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'ख्या' असा आदेश मानण्याचें प्रयोजन सांगणारीं जीं वार्तिकें परिगणन करून भाष्यांत पठित केलीं आहेत तीं 'हविधिः पुंख्याने' 'णत्व पर्याख्याने', 'निष्ठानत्वमाख्याने' हीं इतर वार्तिकें होत. ('प्रयोजन मोस्वरेनुड्विधिः' हें ख्यादेशाचें प्रयोजन सांगणारें प्रथम वार्तिक असून त्याचें पूर्वी व्याख्यान केलेंच आहे. यांशिवाय ख्यादेशाचे

प्रयोजन सांगणारीं चार वार्तिके भाष्यात पठित केलीं आहेत. त्यापैकी तीन वार्तिके वर सांगितलीच आहेत व चवथें 'सस्थानत्व नम: ख्यात्रे' हे होय. 'रुविधि: पुंख्याने' या वार्तिकाचे देखील पूर्वी विवेचन केलेच आहे ) 'पर्याख्यानम्' या उदाहरणात शकाराचे व्यवधान होत असल्यामुळें, 'कृत्यच:' सू. २८३५ या सूत्रानें पावलेले उपसर्गनिमित्तक णत्व होत नाही ('परि+आ+ख्या+अन' या स्थलीं 'आ' या अच्पुढें कृन् प्रत्यय जो 'ल्युट् = अन' आहे त्यातील नकाराचे, 'परि' या उपसर्गांत जो रकार आहे त्याच्या निमित्तामुळें 'कृत्यच:' या सूत्रान्वयें णत्व पावले आहे. जरी रकार व नकार याच्यामध्यें इतर वर्णांचे व्यवधान आहे तरी ते वर्ण 'अट्' प्रत्याहारांतील वर्ण व 'आङ्' हा उपसर्ग असल्यामुळें, त्या सर्व वर्णांचे व्यवधान 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू. १९७ या सूत्रान्वयें सह्य आहे तरी पण 'चक्ष्' धातूचे जागी होणारा 'ख्शा' असा मूळचा आदेश मानला असल्यामुळें, त्या आदेशांतील शकाराचे जागीं 'असिद्धे शस्य यवचनम्' या उत्तर त्रैपादिक वार्तिकान्वयें होणारा यकारादेश 'कृत्यच:' या णत्वप्रकरणान्तर्गत पूर्व त्रैपादिकसूत्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें असिद्ध ठरतो व त्यामुळें शकाराचे जागीं यकार झालाच नाहीं व शकारच विद्यमान आहे असें मानणे भाग पडतें, आणि जसा यकार हा 'अट्' प्रत्याहारान्तर्गत वर्ण आहे तसा शकार नसल्यामुळें व त्याचे व्यवधान सह्य नसल्यामुळें, 'कृत्यच' या सूत्रानें पावलेलें 'अन' यांतील नकाराचे णत्व होत नाहीं. 'ख्शा' असा मूळचा आदेश न मानतां, 'ख्या' असा मूळ आदेश मानला असता तर, यकार असिद्ध ठरला नसता व तो 'अट्' असल्यामुळें, 'अट्-कुपु' सू. १९७ या सूत्रान्वयें त्याचे व्यवधान सह्य झाले असते व 'कृत्यच.' या सूत्रानें 'पर्याख्याणम्' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. पण मूळ 'ख्शा' आदेश मानला असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणे ती आपत्ति टळते व 'पर्याख्यानम्' असे इष्ट

रूप सिद्ध होतें ) तसेंच ,'आख्यानम्' या स्थलीं 'संयोगादेरातो धातोर्यण्वतः' सू ३०१७ या सूत्रानें पावलेलें निष्ठाप्रत्ययातील तकाराचे नत्व होत नाही, कारण यकार असिद्ध ठरत असल्यामुळें, धातूत यण् –यकार– नाहीं असे मानणें भाग पडतें ('आ + ख्या + क्त' या स्थलीं 'ख्या' हा धातु आकारान्त असून संयोगानें सुरू होणारा आहे व 'ख्य्' या संयोगात यकार हा यण् आहे त्यामुळें 'संयोगादेरातो धातोर्यण्वत.' या सूत्रानें निष्ठातकाराचे नत्व पावले आहे. पण तें होत नाहीं; कारण 'क्शा' असा मूळ आदेश मानला असल्यामुळें त्या आदेशातील शकाराचे 'असिद्धे शस्य यवचनम्' या उत्तर त्रैपादिक वार्तिकान्वयें जें यत्व होतें तें 'संयोगादेरातो धातो.' या णत्वप्रकरणान्तर्गत पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें, असिद्ध ठरतें व त्यामुळें यकार झालाच नाहीं व शकारच कायम आहे असे मानणें भाग पडत असल्यामुळें व शकार हा यण् नसल्यामुळें आणि अशा रीतीनें 'ख्या' यण्रहित आहे असे मानावे लागत असल्यामुळें, 'संयोगादेरातो धातो.' या सूत्राची प्राप्तीच होत नाहीं व त्यामुळें निष्ठातकाराचे नत्व न होता, 'आख्यातम्' असे इष्ट रूप सिद्ध होतें. जर मूळ आदेश 'ख्या' मानला असता तर, त्या आकारान्त धातूत यकार हा यण् असल्यामुळें, निष्ठातकाराचे नत्व होण्याची आपत्ति आली असती व 'आख्यानम्' असे अनिष्ट क्तप्रत्ययान्त रूप झाले असतें. पण मूळ आदेश 'क्शा' मानला असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणे, ती आपत्ति टळते.) असे असल्यामुळें, म्हणजे 'चक्ष्' धातूहून आर्धधातुक प्रत्यय करतेवेळीं 'चक्ष्' धातूचे जागीं होणारा आदेश मूळचा 'क्शा' असून 'ख्या' नव्हे असे मानलें असल्यामुळें, 'न ध्याख्या' सू. ३०४० या सूत्रात 'ख्या' चे ग्रहण करण्याची कांहीं आवश्यकता राहत नाहीं असा भाष्यकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (कारण जर 'आख्यातम्' या स्थलीं वर सांगितल्याप्रमाणे निष्ठातकाराचे, 'संयोगादेरातो धातोः' या सूत्रानें होणारें,

प्रयोजन सांगणारीं चार वार्तिकें भाष्यात पठित केलीं आहेत. त्यापैकी तीन वार्तिके वर सांगितलीच आहेत व चवथें 'सस्थानत्व नम. ख्याञे' हे होय. 'रुविधिः पुख्याने' या वार्तिकाचे देखील पूर्वी विवेचन केलेच आहे.) 'पर्याख्यानम्' या उदाहरणात शकाराचे व्यवधान होत असल्यामुळें, 'कृत्यचः' सू. २८३५ या सूत्रानें पावलेले उपसर्गनिमित्तक णत्व होत नाहीं. ('परि+आ+ख्या+अन' या स्थली 'आ' या अच्पुढें कृन् प्रत्यय जो 'ल्युट् = अन' आहे त्यातील नकाराचे, 'परि' या उपसर्गांत जो रकार आहे त्याच्या निमित्तामुळें 'कृत्यचः' या सूत्रान्वयें णत्व पावले आहे. जरी रकार व नकार यांच्यामध्यें इतर वर्णांचे व्यवधान आहे तरी ते वर्ण 'अट्' प्रत्याहारातील वर्ण व 'आङ्' हा उपसर्ग असल्यामुळें, त्या सर्व वर्णांचे व्यवधान 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू १९७ या सूत्रान्वयें सह्य आहे तरी पण 'चक्ष्' धातूचे जागी होणारा 'ख्शा' असा मूळचा आदेश मानला असल्यामुळें, त्या आदेशांतील शकाराचे जागीं 'असिद्धे शस्य यवचनम्' या उत्तर त्रैपादिक वार्तिकान्वयें होणारा यकारादेश 'कृत्यचः' या णत्वप्रकरणान्तर्गत पूर्व त्रैपादिकसूत्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें असिद्ध ठरतो व त्यामुळें शकाराचे जागीं यकार झालाच नाही व शकारच विद्यमान आहे असे मानणे भाग पडते, आणि जसा यकार हा 'अट्' प्रत्याहारान्तर्गत वर्ण आहे तसा शकार नसल्यामुळें व त्याचे व्यवधान सह्य नसल्यामुळें, 'कृत्यचः' या सूत्रानें पावलेले 'अन' यातील नकाराचे णत्व होत नाहीं. 'ख्शा' असा मूळचा आदेश न मानता, 'ख्या' असा मूळ आदेश मानला असता तर, यकार असिद्ध ठरला नसता व तो 'अट्' असल्यामुळें, 'अट्-कुपु' सू १९७ या सूत्रान्वयें त्याचे व्यवधान सह्य झाले असते व 'कृत्यचः' या सूत्रानें 'पर्याख्याणम्' असे अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. पण मूळ 'ख्शा' आदेश मानला असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणे ती आपत्ति टळते व 'पर्याख्यानम्' असे इष्ट

रूप सिद्ध होतें ) तसेंच 'आख्यातम्' या स्थलीं 'संयोगादेरातो धातोर्यण्वतः' सू. ३०१७ या सूत्रानें पावलेलें निष्ठाप्रत्ययातील तकाराचे नत्व होत नाहीं; कारण यकार असिद्ध ठरत असल्यामुळें, धातूत यण् – यकार – नाहीं असे मानणें भाग पडतें. ('आ + ख्या + क्त' या स्थलीं 'ख्या' हा धातु आकारान्त असून संयोगानें सुरु होणारा आहे व 'ख्य्' या संयोगात यकार हा यण् आहे. त्यामुळें 'संयोगादेरातो धातोर्यण्वतः' या सूत्रानें निष्ठातकाराचे नत्व पावले आहे पण तें होत नाहीं; कारण 'क्शा' असा मूळ आदेश मानला असल्यामुळें त्या आदेशातील शकाराचे 'असिद्धे शस्य यवचनम्' या उत्तर त्रैपादिक वार्तिकान्वयें जें यत्व होतें ते 'संयोगादेरातो धातो.' या णत्वप्रकरणान्तर्गत पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें, असिद्ध ठरतें व त्यामुळें यकार झालाच नाहीं व शकारच कायम आहे असे मानणे भाग पडत असल्यामुळें व शकार हा यण् नसल्यामुळें आणि अशा रीतीनें 'क्शा' यण्रहित आहे असे मानावे लागत असल्यामुळें, 'संयोगादेरातो धातोः' या सूत्राची प्राप्तीच होत नाहीं व त्यामुळें निष्ठा-तकाराचे नत्व न होता, 'आख्यातम्' असे इष्ट रूप सिद्ध होतें. जर मूळ आदेश 'ख्या' मानला असता तर, त्या आकारान्त धातूत यकार हा यण् असल्यामुळें, निष्ठातकाराचे नत्व होण्याची आपत्ति आली असती व 'आख्यानम्' असे अनिष्ट क्तप्रत्ययान्त रूप झाले असतें. पण मूळ आदेश 'क्शा' मानला असल्यामुळें, वर सांगितल्या-प्रमाणें, ती आपत्ति टळते.) असे असल्यामुळें, म्हणजे 'चक्ष्' धातूहून आर्धधातुक प्रत्यय करतेवेळीं 'चक्ष्' धातूचे जागीं होणारा आदेश मूळचा 'क्शा' असून 'ख्या' नव्हे असे मानलें असल्यामुळें, 'न ख्यास्या' सू. ३०४० या सूत्रात 'ख्या' चे ग्रहण करण्याची कांहीं आवश्यकता राहत नाहीं असा भाष्यकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे (कारण जर 'आख्यानम्' या स्थलीं वर सांगितल्या-प्रमाणे निष्ठातकाराचे, 'संयोगादेरातो धातोः' या सूत्रानें होणारें,

नत्व पावतच नाही तर, 'ख्या' सबधानें तसा निषेध सागण्याची आवश्यकता काय ? 'प्राप्तस्यैव निषेधः' या न्यायान्वयें जें प्राप्त आहे त्याचाच निषेध करणे उचित आहे. 'चक्ष्' धातूचे 'क्त' प्रत्ययान्त रूप करतेवेळीं, 'क्त' हा आर्धधातुक प्रत्यय पुढें असल्यामुळें, 'चक्ष्' चे जागी ख्शादेश होऊन व नतर त्या आदेशातील शकाराचा यकार होऊन 'ख्या + क्त' अशी स्थिति झाली असतां, 'सयोगादेरातो धातोः' या सूत्राच्या दृष्टीनें पूर्वी सागितल्याप्रमाणें यकार असिद्ध ठरत असल्यामुळें, ते सूत्र प्रवृत्त होऊ शकत नाहीं व 'आख्यातम्' असेच रूप सिद्ध होऊ शकते. म्हणून 'न ध्याख्या' या सूत्रात केलेले 'ख्या' ग्रहण व्यर्थ ठरते.)

मनोरमा— न च ख्या प्रकथने, इत्येतदर्थं तदिति वाच्यम् । तस्य सार्वधातुकमात्रविषयत्वात् । अत्र च "सस्थानत्वं नमः ख्यात्रे" इत्युत्तरवार्तिकं प्रमाणम् । सस्थान इति जिह्वामूलीयस्य प्राचां सञ्ज्ञा । स इह न । "शर्परे विसर्जनीयः" इत्यस्य प्रवृत्तेरिति भावः । यदि स्वतन्त्रोऽपि धातुरार्द्धधातुके इष्येत तदा जिह्वामूलीयस्य दुर्वारतयेद वार्तिकमसङ्गतं स्यात् ।' यत्तु हरदत्तमाधवादिभिरुक्त ख्याधातुरपि ख्शादिर्यत्वविधिरप्युभयसाधारण इति । तच्चिन्त्यम् । भाष्ये चक्षिङ एवोपक्रमात्सार्वधातुकेऽपि ख्शादिप्रयोगापत्तेश्च । न चेष्टापत्तिः । माधवेनार्द्धधातुकेष्वेवायं ख्शादिरित्युक्तत्वात् । सार्वधातुकेऽनभिधानस्यैव शरणीकर्तव्यत्वापत्त्या गौरवप्रसक्तत्वाच्चेत्यास्तां तावत् । स्यादेतत् । बहवः पुमांसोऽस्मिन् कुले बहुपुम् ख्यातीत्यत्र रुत्वं स्यात् । "उरः प्रभृतिषु पुमुशब्दस्यैकवचनान्तस्यैव पाठान्नेह कप् । सार्वधातुके च ख्यातेः प्रयोगो निर्बाध एवेति चेत् । इष्टापत्तेः । संहितायां अविवक्षायां तु रुत्वं नेति स्पष्टमेव । यत्तु प्राचा "ख्याधातौ नेति केचित्" इत्युक्तं तत्र यदि ख्याञादेशो इत्यर्थस्तर्हि केचिदित्यनुचितम् स्वतन्त्रे धातौ चेत्तर्हि सार्वधातुकविषयेऽपि निषेधः स्यात् । न चेष्टापत्तिः । निर्मूलत्वात् ।

(आता येथें शंकाकार अशी शंका करतो कीं, 'न ध्याख्या' या नत्वनिषेधक सूत्रात जें 'ख्या' चे ग्रहण केले आहे तें 'चक्षिङः ख्याञ्' या सूत्रानें आर्धधातुकविषयात 'चक्ष्' चे जागीं होणाऱ्या 'ख्या' या आदेशाचे ग्रहण केलें नसून, 'ख्या प्रकथने' हा न १०६० असा जो स्वतंत्र धातु धातुपाठात अदादिगणात पठित आहे त्याचे वास्तविक ग्रहण केले आहे व तें अशाकरिता केले आहे की, त्या स्वतंत्र धातूहून देखील होणाऱ्या निष्ठातकाराचे 'संयोगादेरातो धातो.' या सूत्रानें होणारें नत्व होऊ नये या शंकेवर दीक्षित असे उत्तर देतात की,) 'न ध्याख्या' या नत्वनिषेधक सूत्रात, 'ख्या प्रकथने' या धातूहून 'क्त' प्रत्यय केला असतां निष्ठातकाराचें नत्व होऊ नये याकरिता, 'ख्या' ग्रहण केलें आहे हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'ख्या प्रकथने' या धातूहून (केव्हांहि आर्धधातुक प्रत्यय होत नसून) केवळ सार्वधातुक प्रत्ययच होत असतात (म्हणून 'आख्यातम्' हें 'ख्या प्रकथने' या धातूचे आर्धधातुक क्तप्रत्ययान्त रूप आहे असे मुळींच मानता येत नाहीं व तें वास्तविक 'चक्ष्' धातूचेंच क्तप्रत्ययान्त रूप आहे असें मानलें पाहिजे या विषयाचें 'चक्षिङ ख्याञ्' २.४.५४ या सूत्रावरील भाष्याच्या उद्योतात स्पष्ट रीतीनें विवेचन केलें आहे उद्योतकार म्हणतात–'वस्तुतः स्वतन्त्रस्य ख्याधातोरार्धधातुके प्रयोगाभाव एवेष्टव्यः । अन्यथा समाख्याय गोसंख्यादौ वुञादि दुर्वारमेव ख्यादित्यस्य ख्शादिग्ववैयर्थ्यापत्ते. । न च पाठिकेंख्यङादिसिद्धिरेव फलम्, सख्यानस्य नमः ख्यात्रे इति भाष्यस्य सर्वथाऽसङ्गते । जिह्वामूलीयस्य वैकल्पिकत्वेन विसर्गसिद्धे-र्जिह्वामूलीयस्य दुर्वारत्वाच्च । एवं च न ध्याख्येत्यत्र तद्ग्रहणे फलाभावात्तदपि न कर्तव्यमेवेति भाष्याशय. ।) 'ख्या प्रकथने' या स्वतंत्र धातूहून सार्वधातुक प्रत्ययच होत असतात याला 'चक्षिङ ख्याञ्' २.४.५४ या सूत्रावरील भाष्यांत पुढें पठित केलेलें 'सख्यानस्य नमः ख्यात्रे' हें वार्तिक प्रमाण आहे 'सख्यान' हा शब्द प्राचीन वैयाकरणांची जिह्वामूलीयाची

संज्ञा आहे 'नमः ख्यात्रे' या उदाहरणात 'शर्परे विसर्जनीयः' सू. १५० या सूत्राची प्रवृत्ति होत असल्यामुळें, जिव्हामूलीय येथें होत नाही असा भाष्यकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. जर स्वतंत्र 'ख्या प्रकथने' या धातूहून आर्धधातुक प्रत्यय होणे इष्ट आहे असे मानले तर, 'नमः ख्यात्रे' या उदाहरणात जिव्हामूलीय टाळणे अशक्य असल्यामुळें, 'सस्थानत्व नमः ख्यात्रे' हे वार्तिक विसंगत–चूक–ठरण्याची आपत्ति येते. ('चक्षिङः ख्याञ्' या सूत्रावरील भाष्यात ख्शादेशाची व 'असिद्धे शस्य यवचनम्' हें वार्तिक पठित करण्याची प्रयोजनें सांगणारी जी वार्तिकें दिली आहेत त्यांतील 'सस्थानत्व नमः ख्यात्रे, हें अन्तिम वार्तिक आहे व तें वार्तिक असें सांगतें की, मूळचा ख्शादेश मानण्याचे व 'असिद्धे शस्य यवचनम्' हे वार्तिक मानण्याचे इतर प्रयोजना खेरीज हे देखील एक प्रयोजन आहे की, 'नमः ख्यात्रे' या उदाहरणात 'कुप्वोः' सू. १४२ या सूत्रानें विसर्गाचे जागी होणारा जिव्हामूलीय न होता, विसर्ग जसाचा तसाच कायम राहावा 'चक्ष्' धातूहून 'ण्वुल्तृचौ' सू. २८९५ या सूत्रानें 'तृच्' हा आर्धधातुक प्रत्यय केला असता, 'चक्ष्' धातूचे जागी 'ख्शा' असा आदेश होऊन त्या आदेशातील शकाराचा 'असिद्धे शस्य यवचनम्' या णत्वप्रकरणानंतर पठित केलेल्या उत्तर त्रैपादिक वार्तिकानें जो यकार होतो तो 'शर्परे विसर्जनीयः' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, यकार झालाच नाहीं व शकारच विद्यमान आहे असें मानावे लागतें. त्यामुळें 'नमः' यातील विसर्गापुढें जो खकार हा 'खर्' आहे त्यापुढें यकार नसून शकार हा 'शर्' आहे असें मानणे भाग पडतें. म्हणून 'कुप्वोः' या सूत्राचे अपवादक 'शर्परे विसर्जनीयः' हें सूत्र प्रवृत्त होत व विसर्गाचा जिव्हामूलीय न होता, विसर्ग जसाचा तसाच कायम राहतो जर मूळ ख्शादेश न मानता, मूळ ख्यादेश मानला असता तर, त्या ख्यादेशांतील यकार असिद्ध ठरला नसता व त्यामुळें 'नमः' यातील विसर्गापुढें जरी 'ख्' हा

'खर्' आहे तरी त्यापुढें स्वत सिद्ध जो यकार आहे तो 'शर्' नसल्यामुळें, 'शर्परे विसर्जनीय' या सूत्राची प्रवृत्ति होऊ शकली नसती व 'कुप्वोः' सू १४२ हे सूत्र प्रवृत्त होऊन विसर्गाचे जागी पाक्षिक जिव्हामूलीय होण्याची आपत्ति आली असती पण मूळ ख्शादेश मानला असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणें ती आपत्ति टळते आता दीक्षित असे म्हणतात की, ख्शादेशाचे प्रयोजन सांगणारें हें अंतिम वार्तिक, 'ख्या प्रकथने'–धातु १०६०–या धातूहून आर्धधातुक प्रत्यय मुळींच होत नाहीत व केवळ सार्वधातुक प्रत्यय होतात, याला प्रमाण आहे व त्या धातूचे विवरण करिताना 'अयं सार्वधातुकमात्रविषय । सम्यानत्व नम स्याते' इति वार्तिक तद्भाष्य चेह लिङ्गम् ।' असेच त्यानी कौमुदीत देखील म्हटले आहे तसे म्हणण्याचे कारण हें की, 'ख्या प्रकथने' या स्वतंत्र धातूहून देखील आर्धधातुक प्रत्यय होतात असे जर मानले तर, त्या धातूहून 'ण्वुल्तृचौ' या सूत्रानें 'तृच्' हा आर्धधातुक प्रत्यय केला असता, 'ख्यातृ' असा जो शब्द सिद्ध होतो त्यातील यकार मूळचा स्वत सिद्ध यकार ठरत असून शकाराचे जागीं झालेला असिद्ध यकार ठरत नसल्यामुळें व अशा रीतीनें 'नम' यातील विसर्गापुढें जमणाऱ्या 'ख' या 'खर्' पुढें 'शर्' येत नसल्यामुळें 'शर्परे विसर्जनीय' हे सूत्र प्रवृत्तच होऊ शकत नाही व 'कुप्वो' हेच सूत्र प्रवृत्त होऊ शकते आणि त्यामुळें 'नम' यातील विसर्गाचा पाक्षिक जिव्हामूलीय होणे हें टाळता येणे अशक्य आहे मग 'नम ख्यात्रे' या स्थली विसर्गाचा जिव्हामूलीय न व्हावा याकरिता मूळचा ख्शादेश मानणे आवश्यक आहे असे जें वार्तिककारानें व भाष्यकारानीं म्हटले आहे तें चूक ठरू पाहते, कारण मूळ ख्शादेश मानला तरी, स्वतंत्र 'ख्या' धातूहून आर्धधातुक 'तृच्' प्रत्यय करून 'नम ख्यात्रे' असा प्रयोग करतांना–म्हणजे स्वतंत्र 'ख्या' धातूला आर्धधातुक प्रत्यय देखील होतात असे मानल्यास– तशा प्रयोगात वर सांगितल्याप्रमाणे विसर्गाचा पाक्षिक जिव्हामूलीय होणें केव्हांहि टाळता येत

नाहीं. पण भाषेंतील सर्व रूपें व प्रयोग ज्याच्या दृष्टीसमोर सदैव खेळत होते अशा सर्वज्ञ भाष्यकाराचे म्हणणे केव्हांहि चूक मानतां येत नाही. त्याच्या व वार्तिककाराच्या मते, 'नमः ख्यात्रे' या स्थलीं विसर्गाचा जिव्हामूलीय होणे अशुद्ध व अनिष्ट असून ती आपत्ति टाळण्याकरिताच त्यांना मूळचा ख्शादेश मानावा लागला म्हणून भाष्यकाराचे म्हणणे बरोबर ठरावे व 'नमः ख्यात्रे' या स्थली विसर्गाचा जिव्हामूलीय केव्हांहि होऊ नये याकरिता हे मानणे आवश्यक आहे की, 'ख्या प्रकथने' या स्वतन्त्र धातूहून आर्धधातुक प्रत्यय मुळीच होत नाहीत व तसे मानले म्हणजेच, 'सस्थानत्वं नमः ख्यात्रे' हे वार्तिक सुसङ्गत-योग्य-ठरते आणि अशा रीतीनें तें वार्तिक, 'ख्या' हा स्वतन्त्र धातु सार्वधातुकमात्र विषयक आहे याचें, ज्ञापक ठरते असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे व हा आशय बालमनोरमाकारानी आपल्या टीकेत स्पष्ट केला आहे ते म्हणतात–
'ख्याधातोरस्यार्धधातुकेऽपि प्रयोगसत्वे तु तृजन्ते ख्यातृशब्दे यकारस्य शकारस्थानिकत्वाभावात् असिद्धत्वाभावात् शर्परे विसर्जनीयः इत्यस्याप्रवृत्तौ कुप्वोः इति जिव्हामूलीयो दुर्वारः स्यात् । ततश्चार्धधातुके सर्वत्र न ख्याधातोः प्रयोग इति विज्ञायते, ज्ञापकस्य सामान्यापेक्षत्वादिति भावः।) हरदत्त, माधव इत्यादि वैयाकरणांचे असे म्हणणे आहे की, 'ख्या प्रकथने' हा धातु देखील 'ख्शा'च आहे व शकाराचे यत्व होणे हे जसे 'चक्ष्' धातूचे जागी आर्धधातुक प्रत्यय पुढें असतांना होणाऱ्या 'ख्शा' या आदेशास लागू पडते तसेच तें 'ख्या = ख्शा प्रकथने' या धातूस देखील लागू पडते पण हे त्यांचे म्हणणे बरोबर मानतां येत नाही; कारण 'चक्षिङः ख्याञ्' २-४-५४ या सूत्रावरील भाष्यांत केवळ 'चक्ष्' धातूचाच उपक्रम केला आहे; आणि 'ख्या प्रकथने' हा धातु मूळचा 'ख्शा' आहे असे मानल्यास ख्या धातूपुढें सार्वधातुक प्रत्यय आले असतां देखील 'ख्शा'नें युक्त होणारी रूपें होण्याची आपत्ति येईल. तशीं रूपें होणे इष्टच आहे व ती आपत्ति नव्हे असे मानतां येत नाहीं; कारण तसें मानल्यास,

आर्धधातुक प्रत्यय पुढें असतानाच 'ख्या प्रकथने' हा धातु 'क्शा' आहे असे समजावे हें जें माधवानें म्हटलें आहे त्याशीं विरोध येतो म्हणून तशी अनिष्ट रूपें टाळण्याकरिता, सार्वधातुक प्रत्यय पुढें आला असता 'क्शा प्रकथने' या धातूचीं आर्षेत रूपें मुळींच आढळत नाहींत अशाच रीतीनें कसे तरी समाधान करून घेण्याची आपत्ति येणार व तसे मानण्यात गौरव आहे. या विपयासंबधानें वर जें सांगितलें आहे तेवढें पुरे ('चक्षिङ. ख्याञ्' सू २४५४ या सूत्रावरील भाष्यात क्शादेश व 'असिद्धे शस्य यवचनम्' हें वार्तिक मानण्याची जीं अनेक प्रयोजनें सांगितली आहेत ती सर्व प्रयोजनें, आर्धधातुक प्रत्यय पुढें असताना 'क्शा प्रकथने' या धातूचीं रूपें होऊ शकतात असे मानल्यास, निष्फल ठरण्याची आपत्ति येते ती आपत्ति टाळण्याकरिता दीक्षितानी असे म्हटले आहे की, 'क्शा प्रकथने' हा धातु सार्वधातुकमात्रविषयकच आहे- म्हणजे सार्वधातुक प्रत्यय पुढें असतानाच त्या धातूची रूपें हात असून, आर्धधातुक प्रत्यय लागून होणारीं त्या धातूची रूपें मुळीच होत नाहीत परतु हरदत्त, माधव इत्यादिकानी भाष्यात सांगितलेली प्रयोजनें व्यर्थ ठरण्याची जी आपत्ति येते तिचे निवारण करण्याकरितां भिन्न उपाय सुचविला आहे. हरदत्तानें 'नन्वसिद्धे शस्य यवचनेऽपि ख्या प्रकथने इत्यस्यौत्पत्तिक एव यकार इति तत्र वुञादिप्रसङ्ग . एव तर्हि सोऽपि क्शादिः शस्य यवचनमपि साधारण द्रष्टव्यम् ।' असे पदमजरीत म्हटले आहे आता येथें असा प्रश्न निघतो कीं, दीक्षितांनी जो आपन्निवारणार्थ उपाय सुचविला आहे तो योग्य आहे किंवा हरदत्तादिकानीं जो उपाय सुचविला आहे तो योग्य आहे ? या दोन उपायापैकीं कोणता उपाय योग्य आहे हे ठरविताना हें लक्षात ठेवले पाहिजे कीं, 'चक्षिङः ख्याञ्' या सूत्रावरील भाष्यात भाष्यकारानीं 'चक्ष्' धातूचाच उपक्रम करून त्या धातूचे ठिकाणी होणारा आदेश मूळचा 'ख्या' नसून 'क्शा' समजावा असे म्हटले आहे. त्या भाष्यांत 'ख्या

प्रकथने' या धातूचा मुळीच निर्देश केला नाही व तो धातु मूळचा 'ख्शा' आहे असे कोठेंहि म्हटले नाही. तो स्वतन्त्र धातु देखील 'ख्शा' मानावा असे जर भाष्यकाराचे मत असते तर त्यानी भाष्यात तसे म्हटले असते. म्हणून हरदत्तादिकाच्या म्हणण्यास भाष्याचा आधार नसल्यामुळें, स्वतन्त्र 'ख्या' धातु 'ख्शा' आहे हे म्हणणे प्रमाणरहित ठरते म्हणूनच भाष्यात सांगितलेली प्रयोजनें व्यर्थ न ठरावी याकरिता दीक्षितानी असे म्हटले आहे की, 'ख्या प्रकथने' हा धातु सार्वधातुकमात्रविषयक आहे व आर्धधातुक प्रत्यय लागून होणारी त्याची रूपें मुळीच होत नाहीत. दुसरे असे की, 'ख्या प्रकथने' हा धातु मूळचा 'ख्शा' आहे असे मानल्यास, त्याची सार्वधातुक प्रत्यय लावून 'ख्शाति, ख्शातः, ख्शान्ति' इत्यादि जी भाषेत कोठेंहि आढळत नाहीत अशी अनिष्ट रूपें होण्याचा प्रसङ्ग येईल तशी रूपें होणे अनिष्ट नसून इष्ट आहे असे निदान माधवास तरी म्हणता येत नाहीं, कारण तसे मानल्यास, आर्धधातुकविषयातच 'ख्या प्रकथने' हा धातु 'ख्शा' समजावा असे जें माधवानें म्हटले आहे त्याशी विरोध येण्याची आपत्ति येते. 'चक्षिङ्' धातूचे विवरण करिताना माधवानें आपल्या धातुवृत्तीत पुढें लिहिल्याप्रमाणे म्हटले आहे—ननु नमः ख्यात्रे इत्यत्र जिव्हामूलीयस्याभावः कथ प्रयोजनमुक्तम्, यस्मात्स दुर्वारः। तथाहि, ख्या प्रकथने इत्यस्मादपि तृचि ख्यातृशब्दस्य सद्भावात् तत्स्थस्य यकारस्यानादेशत्वादसिद्धत्वाभावात् शर्परे खरि विसर्जनीयः इत्यस्याप्रसङ्गात् कुप्वोरिति प्राप्तस्य जिव्हामूलीयस्य बाधकत्वाभावात्। नैष दोषः। ख्यातिरप्यार्धधातुके ख्शादि, असिद्धे शस्य यवचन विभाषेत्येतदपि तस्यापि साधारणमिति।' साराश हरदत्ताच्या मताप्रमाणे 'ख्या प्रकथने' हा धातु सार्वधातुक व तसेच आर्धधातुकविषयांत 'ख्शा' असून माधवाच्या मतें तो धातु केवळ आर्धधातुकविषयांत 'ख्शा' आहे असा त्या दोघाच्या मतांत फरक दिसून येतो, व हरदत्ताचे मत स्वीकारल्यास, त्या 'ख्शा' धातूची सार्वधातुक प्रत्यय पुढें असतांना

काराच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे की, उरःप्रभृतिगणांत 'पुमान्' इत्यादि शब्द एकवचनान्त मुद्दाम पठित केले असल्या-मुळें, येथें वचन विवक्षित आहे आणि म्हणून जेथें बहुव्रीहि-समासांत 'पुमान्' हा एकवचनान्त शब्द चरमावयव असेल तेथेंच 'उरःप्रभृतिभ्यः कप्' या सूत्रानें नित्य 'कप्' प्रत्यय होत असतो. परतु 'बहवः पुमांसः यस्मिन् कुले तत् बहुपुम्' या बहुव्रीहिसमासांत 'पुमांसः' हें बहुवचनान्त चरम पद असल्यामुळें, येथें नित्य 'कप्' प्रत्ययाची प्राप्ति न होता, 'शेषाद्विभाषा' सू. ८९१ या सूत्रान्वयें विकल्पेंकरून 'कप्' प्रत्यय प्राप्त होतो. आणि विकल्पानें होणारा तो 'कप्' प्रत्यय न केल्यास, 'बहुपुम् ख्याति' हा प्रयोग शुद्ध ठरतो आणि या प्रयोगांत 'ख्या प्रकथने' या धातूहून सार्वधातुक 'तिप्' प्रत्यय केला असल्यामुळें) 'ख्याति' हा जो सार्वधातुकप्रत्ययान्त पदाचा प्रयोग केला आहे तो प्रयोग निर्बाध ठरतो, म्हणजे तो प्रयोग अशुद्ध आहे असें म्हणता येत नाहीं व तसा प्रयोग करण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं. ('स्यादेतत्' येथून 'निर्बाध एव' येथपर्यंत शङ्काग्रन्थ आहे. या शङ्केवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, 'बहुपुम् ख्याति' या उदाहरणांत मकाराचें रुत्व होऊन व त्या 'रु'चा 'सपूकानां सो वक्तव्यः'—सू. १३८ वरील वार्तिक— या वार्तिकान्वयें सकार होऊन 'बहुपुंस्ख्याति' असें रूप होण्याची शङ्काकारानें जी आपत्ति दाखविली आहे ती वास्तविक आपत्ति नसून) इष्टापत्ति आहे—म्हणजे तसें रूप होण्यांत व्याकरणरीत्या कांहीं हरकत नाहीं. परतु संहिता विवक्षित नसल्यास, रुत्व होत नाहीं हें अगदीं उघड आहे. ('बहुपुम् ख्याति' हें वाक्य आहे आणि 'नित्या समासे वाक्ये तु सा विवक्षामपेक्षते' या वचनान्वयें वाक्यांत संधि करणें हा नित्य-विधि नसून वैकल्पिक आहे. त्यामुळें त्या वाक्यांतील 'बहुपुम्' व 'ख्याति' या दोन पदांचा संधि न केल्यास, मकाराचें रुत्व पावत नाहीं व 'बहुपुम् ख्याति' हा संधिरहित प्रयोग देखील शुद्ध ठरतो असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'ख्याधातो नैव

केचित्' असे जें प्रक्रियाकौमुदीकारानीं ('अनुनासिकात्परोऽनुस्वारः' या सूत्रावरील वृत्तींत) म्हटलें आहे त्यांतील 'ख्या धातौ' या पदाचा 'ख्यात्रादेशे' या अर्थामध्यें उपयोग केला असल्यास, म्हणजे 'ख्याधातौ न' याचा 'ख्यात्रादेशे न' असा अर्थ असल्यास, त्या पङ्क्तीतील 'केचित्' हा शब्द अयोग्य ठरतो ('पुमः खय्यम्परे' या सूत्रावरील कौमुदींत 'ख्यात्रादेशे न' हें वार्तिक पठित केलें आहे व त्या वार्तिकाच्या तत्त्वबोधिनींत 'चक्षिङः ख्याञित्यत्र ख्शादिरयमादेशः । असिद्धकाण्डे षत्वानन्तरं शस्य यो वेति स्थितमिति वदन्ति । एवं च यत्वस्यासिद्धतयाऽम्परत्वाऽभावात् पुमः खयीति रुत्वं नेत्यर्थः ।' असा अर्थ केला आहे आणि या निषेधक वार्तिकान्वयें 'पुंख्यानम्' या स्थलीं मकाराचें रुत्व होत नाहीं, कारण आर्धधातुक प्रत्यय पुढें असता जेव्हां 'चक्ष्' धातूचे जागीं 'ख्शा' असा आदेश होतो तेव्हां त्या आदेशातील शकाराचे जागीं होणारा यकार 'पुमः खयि' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, 'ख्' हा 'खय् अम्पर' आहे असे मानता येत नाहीं व तो शर्पर आहे असे मानावें लागतें आणि त्यामुळें 'पुमः खयि' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व 'पुम्' यांतील मकाराचें रुत्व होऊं शकत नाहीं ही गोष्ट सर्वांस मान्य असल्यामुळें, 'ख्या धातौ न' याचा वरील अर्थामध्यें उपयोग केला असल्यास, त्या पदापुढें 'इति केचित्' हीं पदें घालणें अयोग्य ठरतें हें उघड आहे, कारण तीं पदें घातल्यानें असा अर्थ होतो कीं, असे कित्येकांचें म्हणणें आहे) जर प्रक्रियाकौमुदीकाराचें वरील म्हणणें 'ख्या प्रकथने' या स्वतंत्र धातुसंबंधानें असेल तर, सार्वधातुक प्रत्यय लागून त्या स्वतंत्र 'ख्या' धातूचीं जीं रूपें सिद्ध होतात तशीं रूपें 'पुम्' शब्दापुढें आलीं असता देखील, 'ख्या धातौ न' या निषेधान्वयें 'पुम्' यांतील मकाराचें रुत्व न होण्याची आपत्ति येईल ही इष्टापत्ति आहे असे मानता येत नाहीं, कारण त्या स्वतंत्र 'ख्या' धातुसंबंधानें 'ख्यात्रादेशे न' हा निषेध आहे असें मानण्यास कोणताहि प्रमाण नाहीं—म्हणजे भाष्यांत तशा अर्थाचा निषेध मुळींच

आढळत नाही. (साराश 'पुम्' शब्दापुढें स्वतंत्र 'ख्या' धातूचीं सार्वधातुक रूपें आल्यास, 'पुम्' यातील मकाराचे प्रकृत सूत्रानें रुत्व होऊ शकतेच).

शब्दरत्न– शकारेणेति । यत्वासिद्धत्वादिति भावः । न कर्तव्यमिति । यत्वासिद्धचा यण्वत्ताविरहेण नत्वाप्राप्तेरिति भावः । अत्र चेति । ख्यातेः सार्वधातुकमात्रविषयत्वे इत्यर्थः । सञ्ज्ञेति । एवं च तदुत्तरभावप्रत्ययेन सख्यानशब्द उच्यते । तेन स्वयाच्यो जिह्वामूलीयोवार्तिके लक्ष्यते । कुत्वं कस्मान्न भवतीत्यत्रैवेति भावः । चशादीति पाठे प्रयोगे चर्त्वप्रवृत्तिरिति भावः । इत्युपतत्वादिति । एवं च माधवो नेव्दापत्ति कर्तुमर्हं इत्यर्थः । अनभिधानस्यैवेति । क्शादेरनभिधानस्यैवेत्यर्थः । गौरवेति । क्शादित्वं स्वीकृत्यानभिधानस्वीकारापेक्षया तदस्वीकृत्यैव ख्यातेरार्धधातुकेऽनभिधानस्यैव स्वीकारे लाघवमिति भावः । रुत्वं स्यात्–रुत्वमित्युपलक्षणं जिह्वामूलीयस्य पत्वस्य च । नमः ख्याति, निःख्यातीत्यादौ ।।

'शकारेण व्यवधानात् कृत्यचः इति णत्व न', म्हणजे 'पर्याख्यानम्' या स्थली 'अट्' नसणाऱ्या शकाराच्या व्यवधानामुळें 'कृत्यचः' सू २८३५ या सूत्रानें उपसर्गस्थ निमित्तामुळें पावलेले नकाराचें णत्व होत नाही, असें जें मनोरमेत म्हटले आहे त्याचें कारण हे की, ('क्शा' या आदेशातील शकाराचे जागीं जो यकार होतो तो) यकार ('कृत्यचः' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें) असिद्ध ठरतो. (याचे विवरण पूर्वी मनोरमेत केलेच आहे.) 'न ख्याञा इति सूत्रे ख्याग्रहण न कर्तव्यम्' असें जें मनोरमेत म्हटले आहे त्याचे कारण हे आहे की, ('क्शा' या आदेशातील शकाराचे जागी होणारा) यकार ('संयोगादेरातो धातोः' सू. ३०१७ या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें) असिद्ध ठरत असल्यामुळें, त्यांत यण् आहे असें मानता येत नाहीं (व त्यामुळें 'आख्यातम्' या उदाहरणांत 'संयोगादेः' सू. ३०१७ या सूत्राची प्राप्तीच होत नाहीं.) व त्यामुळें निष्ठातकाराचे नत्व होत नाहीं. (या पंक्तीचे विवरण पूर्वी

मनोरमेंत केलेच आहे.) 'अत्र च सस्थानत्व नमः ख्यात्रे' या मनोरमेच्या पङ्क्तीतील 'अत्र' या पदाचा 'ख्यातेः सार्वधातुकमात्र-विषयत्वे', म्हणजे 'ख्या प्रकथने' या धातूहून सार्वधातुकच प्रत्यय होतात याला, असा अर्थ आहे. 'सस्थान' हा शब्द जिव्हामूलीयाची संज्ञा असल्यामुळें त्याहून जो भाववाचक 'त्व' प्रत्यय केला आहे त्याच्या योगानें 'सस्थानत्व' या शब्दाचा 'सस्थानशब्द' असा अर्थ होतो आणि त्यामुळें त्या 'सस्थान' शब्दाचा वाच्य—अभिधेय अर्थ—जो जिव्हामूलीय आहे तो 'सस्थानत्व नमः ख्यात्रे' या वार्तिकातील 'सस्थानत्व' या शब्दाचा लक्षणेनें अर्थ होतो. 'कुत्व' कस्मान्न भवति' या प्रयोगातील 'कुत्व' या शब्दाचा ज्या रीतीनें अर्थ केला जातो त्याच रीतीनें वरील वार्तिकातील 'सस्थानत्व' या शब्दाचा वर केलेला अर्थ निष्पन्न होतो. ('सस्थानत्व' व 'कुत्व' या दोन्ही स्थलीं 'तस्य भावस्त्वतलौ' सू. १७८१ या सूत्रानें 'तस्य भावः' या अर्थामध्यें 'त्व' प्रत्यय झाला आहे. या सूत्रातील 'भाव' या शब्दाचा 'प्रकृतिजन्यबोधे प्रकारः' असा कौमुदींत अर्थ दिला आहे. त्याचा अर्थ हा आहे कीं, 'गो' हा शब्द उच्चारला असता 'गो' या प्रकृतीपासून 'गो' या व्यक्तीचा बोध झाल्यावर त्या 'गो' व्यक्तीचे ठिकाणी विशेषणरूपानें भासमान होणारे जात्यादि विशिष्ट धर्म 'भाव' या शब्दाचे वाच्य होत व हेच धर्म त्या 'गो' शब्दाचे प्रवृत्तिनिमित्त होत, म्हणजे त्या शब्दाचा प्रयोग होण्यास कारणीभूत होतात. 'तस्य भावस्त्वतलौ' ५. १. ११९ या सूत्रावरील भाष्यांत 'यद्वा सर्वे भावाः स्वेन भावेन भवन्ति स तेषां भावस्त्वदभिधाने' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात—'किमेभिस्त्रिभिर्भावग्रहणैः क्रियते ? । एकेन शब्दः प्रति-निर्दिश्यते द्वाभ्यामर्थः ।—यद्वा सर्वे शब्दाः स्वेनार्थेन भवन्ति स तेषा-मर्थ इति तदभिधाने या त्वतलौ भवत इति वक्तव्यम् । नैवमन्यत्र भवति ।' व या वार्तिकाचा उद्योतांत 'सर्वे शब्दाः स्वेन अर्थेन—वाच्येन करणेन—यस्मात्प्रवृत्तिनिमित्ताद्भवन्ति—वाच्यार्थबोधनाय

शकाराचे यत्व केल्यास, 'चख्यौ, चख्ये' इत्यादि रूपें सिद्ध होऊ शकतात व विकल्पानें यत्व न केल्यास, प्रयोगात खकाराचे 'खरि च' या सूत्रानें चर्त्व—ककार—होऊन 'चक्शौ, चक्शे' इत्यादि रूपें सिद्ध होतात, आणि 'क्शादीति पाठे प्रयोगे चर्त्वप्रवृत्ति' असे जें शब्दरत्नात म्हटले आहे त्याचा वरप्रमाणे भावार्थ समजावा ) 'आर्धधातुकेष्वेवाय ख्शादि.' असे माधवानें स्वत च म्हटले असल्यामुळें, 'ख्शा' या धातूपुढें सार्वधातुक प्रत्यय आले असता जी रूपें सिद्ध होतात ती इष्टच आहेत असे त्याला म्हणता येत नाहीं (कारण त्यानें तसे म्हटल्यास पूर्वी जें त्यानें म्हटले आहे त्याशीं विरोध येईल हें उघड आहे ) मनोरमेंतील 'अनभिधानस्यैव' या पदाचा 'ख्शादेरनभिधानस्यैव' असा अर्थ आहे (याचे मनोरमेंत विवरण केलेच आहे ) मनोरमेंत 'गौरवग्रस्तत्वात्' असे जें म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे की, 'ख्या प्रकथने' हा धातु 'ख्शा' आहे व तशा धातूचा सार्वधातुक प्रत्यय पुढें आला असता प्रयोग होत नाही असे मानण्यापेक्षा, 'ख्या' हा स्वतन्त्र धातू असून तो 'ख्शा' असा धातु नाही व त्या धातूचा आर्धधातुक प्रत्यय पुढें आला असता प्रयोग होत नाही, म्हणजें तो सार्वधातुकमात्रविषयकधातु आहे, असे मानण्यात लाघव आहे 'बहुपुम् ख्यातीत्यत्र रुत्व स्यात्' असे जें मनोरमेंतील शङ्काग्रन्थात म्हटले आहे त्यातील 'रुत्वम्' हा शब्द जिह्वामूलीय व षत्व याचे उपलक्षण आहे, म्हणजे त्या शब्दानें जिह्वामूलीय व षत्व याचे देखील उपलक्षणानें ग्रहण होतें, आणि त्यामुळें 'नमः ख्याति, नि ख्याति' इत्यादि स्थली अनुक्रमें जिह्वामूलीय व षत्व होण्याची आपत्ति येते असा त्या मनोरमेंतील शङ्काग्रन्थाचा भावार्थ आहे (शङ्काकाराचे असे म्हणणे आहे की, 'ख्या प्रकथने' हा धातु सार्वधातुकविषयांत 'ख्शा' आहे असे न मानता तो स्वतन्त्र 'ख्या' धातु आहे असें मानले तर, 'बहुपुम् ख्याति' या उदाहरणात 'पुम्' यातील मकारापुढें 'ख्याति' यातील 'ख्य' हा अक्षर 'खय्' असल्यामुळें,

त्या मकाराचे 'पुमः खय्यम्परे' सू. १३९ या प्रकृत सूत्राने जसे रुत्व होण्याची आपत्ति येते त्याचप्रमाणे 'भमः स्याति' या उदाहरणात विसर्गापुढे क वर्गातील खकार असल्यामुळे त्या विसर्गाचे जागी 'कुप्वोः' सू १४२ या सूत्राने विकल्पें करून जिह्वामूलीय होण्याची आपत्ति येते आणि तसेच 'नि स्याति' या उदाहरणात प्रत्ययाचे जागी न झालेल्या व 'निस्' या उपसर्गातील सकाराचे जागी झालेल्या विसर्गापुढे कवर्गातील खकार असून त्या विसर्गापूर्वी ऱ्हस्व इकार उपधेत असल्यामुळे, 'इदुदुपधस्य चा प्रत्ययस्य' सू. १५५ या सूत्राने त्या विसर्गाचे षत्व होण्याची आपत्ति येते पण तो स्वतंत्र 'ख्या' धातु मूळचा 'ख्शा' आहे व त्यातील शकाराचे 'असिद्धे शस्य यवचनम्' या मॆपादिक उत्तर वार्तिकाने यत्व झाले आहे असे मानल्यास, वर दर्शविलेल्या तीन्ही आपत्ति टळतात; कारण प्रथम उदाहरणात मकारापुढे जो खकार आहे त्यापुढे यकार हा 'अम्' नसून शकार हा 'शर्' आहे असे मानावे लागत असल्यामुळे, त्या उदाहरणात प्रकृत सूत्राने रुत्वाची प्राप्तीच होत नाही तसेच द्वितीय व तृतीय उदाहरणात विसर्गापुढे खकार असून त्यापुढे शकार हा 'शर्' आहे असे मानावे लागत असल्यामुळे, 'कुप्वोः' व 'इदुदुपधस्य' याचे बाधक 'शर्परे विसर्जनीयः' सू १५० हे सूत्र प्रवृत्त होते व त्यामुळे द्वितीय उदाहरणात विसर्गाचे जागी जिह्वामूलीय न होता आणि तृतीय उदाहरणात विसर्गाचे षत्व न होता, त्या दोन्ही उदाहरणात विसर्ग जसाचा तसाच कायम राहतो या शंकेवर मनोरमेत 'इष्टापत्तेः' असे उत्तर दिले आहे व त्याचे विवरण मनोरमेत केलेच आहे.)

मनोरमा– यस्मिंश्चायस्वेति । यत्तु प्राचा यावोग्युक्तं तत्र परस्मैपदमयुक्तम् । आयतेऽिरस्वात् । आयत इति आ॰ म इत्यपरेऽप्यर्थं वसंति विवक्षितावावारश्चिपि वा बोध्यम् । प्रशान्तिनि । प्रपूर्वाच्छाम्यते॰ विवप् । "अनुनासिकस्य क्वि—" इति दीर्घः । "मो नो धातोः" इति नः । तस्यासिद्धत्वान्नलोपो न ।

('नश्छव्यप्रशान्' सू. १४० या सूत्रावरील कौमुदीत दीक्षितांनी त्या सूत्राचे 'चक्रिँस्त्रायस्व–चक्रिंस्त्रायस्व' असे अनुनासिकपक्षाचे व अनुस्वारपक्षाचे एक उदाहरण दिले आहे. पण प्रक्रिया–कौमुदीकारांनी त्या सूत्राचे 'विसर्जनीयस्य सः' या सूत्रावरील वृत्तीत 'चक्रिँस्त्राहि–चक्रिंस्त्राहि' असे उदाहरण दिले आहे. या उदाहरणासंबधानें दीक्षित असे म्हणतात कीं,) प्रक्रियाकौमुदीकारांनी या उदाहरणात जो परस्मैपदाचा 'त्राहि' असा प्रयोग केला आहे तो अयोग्य आहे; कारण (धातुपाठात भ्वादिगणात 'त्रैङ् पालने' असा) 'त्रै' धातु ङित् पठित आहे (व 'अनुदात्तङित आत्मनेपदम्' सू. २१५७ या सूत्रान्वयें 'त्रै' धातूहून आत्मनेपदाचेच प्रत्यय होऊ शकतात ) अथवा 'त्रायते इति त्राः' (अशा रीतीनें 'त्रै' धातूहून 'क्विप् च' सू. २९८३ या सूत्रानें कर्तरि क्विप् प्रत्यय केल्यावर 'आदेच उपदेशे' सू. २३७० या सूत्रानें तो धातु आकारान्त होऊन व 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें 'क्विप् =व्' या प्रत्ययाचा लोप होऊन 'त्रा' असा जो क्विबन्त शब्द सिद्ध होतो त्या शब्दाहून 'सर्वप्रातिपदिकेभ्यः क्विब्वा वक्तव्यः'–सू. २६६५ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें) 'त्रा इव आचरति' या अर्थामध्यें आचारार्थक कर्तरि क्विप् प्रत्यय केल्यास ('सनाद्यन्ता धातवः' सू. २३०४ या सूत्रानें त्याला धातु सज्ञा होऊन 'त्रा' असा जो नामधातु होतो त्या धातूचे) 'त्राहि' हे रूप आहे असे समजावे. म्हणजे अशा रीतीनें त्या प्रयोगाचे समर्थन केले पाहिजे (व 'त्रा' हा नामधातु अकारान्त नसून आकारान्त असल्यामुळें 'अतो हेः' सू. २२०२ या सूत्रानें होणारा 'हि' प्रत्ययाचा लुक् न होता 'त्रा+शप्+हि=त्रा+अ+हि=त्राहि' असे रूप होते असे समजावे. आता प्रकृत सूत्रातील 'अप्रशान्' या प्रतिषेधाचें 'प्रशान्तनोति' असे जें कौमुदीत उदाहरण दिले आहे त्या उदाहरणात) 'प्र' या उपसर्गपूर्वक 'शम्' धातूहून क्विप् प्रत्यय केला असता, 'अनुनासिकस्य क्विझलोः क्ङिति' सू. २६६६ या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन व 'मो नो धातोः'

सू. ३४१ या सूत्रानें 'शाम्' यांतील अन्त्य मकाराचा नकार होऊन 'प्रशान्' असें रूप होतें. 'प्रशान्' या स्थली ('मो नो धातोः' या त्रैपादिक उत्तर सूत्रानें मकाराचे जागी झालेला) नकार ('न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या त्रैपादिक पूर्व सूत्राच्या दृष्टीनें 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें) असिद्ध ठरत असल्यामुळें, म्हणजे नकार झालाच नाहीं व मकारच विद्यमान आहे असें मानावे लागत असल्यामुळें, त्या अन्त्य नकाराचा लोप होत नाहीं. ('शम्' धातूहून क्विप् प्रत्यय केल्यावर जरी उपधा दीर्घ होऊन 'शाम्' असें क्विबन्त प्रातिपदिक होतें तरी 'क्विबन्ता धातुत्वं न जहति' या न्यायान्वयें एकदेशविकृत 'शाम्' हा 'शम्' धातूच आहे असें मानता येतें व त्यातील अन्त्य मकाराचें 'मो नो धातोः' या सूत्रानें नत्व होतें हें लक्षात ठेवावें )

शब्दरत्न– त्रायतेर्ङित्त्वादिति । अत्र त्रायतेरित्युक्त्या सत्यपि परस्मैपदे त्रायेत्यस्य प्राप्त्या त्राहीत्यस्यासिद्धिः सूचिता । आचारक्विपि चेति । नामधातौ मूलधात्वादेर्ङित्त्वाद्यभावात् "अनुदात्तङित" इत्यादेः प्रवृत्तिर्नेत्यभिमानः । अत एव "त्राहि मां पुण्डरीकाक्ष" इति सङ्गच्छते इति भावः । आर्षं तत्र तङ्ग्न्ये शाम्यतेरिति । न तु शान तेजने इत्यत्र, तस्य पदान्ते नलोपेन नान्तत्वासम्भवादिति भावः । न च "प्रशान्" इति पर्युदासेन नान्तग्रहणेन सिद्धे "नः" इति व्यर्थमिति वाच्यम् । अस्य लक्षणवशा- संपन्ननान्तत्वेन पर्युदासेनापि लक्षणवशासम्पन्ननकारान्तानामेवाप्तेः ॥

. 'त्रायतेर्ङित्वात्' या मनोरमेतील पंक्तीत 'त्रायते' असा प्रयोग केला असल्यामुळें दीक्षित असें सुचवितात की, 'त्रै' धातु परस्मैपदी मानला तरी 'त्राय' असेंच रूप सिद्ध होऊं शकतें व 'त्राहि' असें रूप मुळींच सिद्ध होऊं शकत नाहीं. (मनोरमेंत 'परस्मैपदमप्युक्तम्' असें जें म्हटलें आहे त्यांतील 'परस्मैपदम्' हा शब्द 'आर्ष' याचें देखील उपलक्षण आहे, म्हणजे त्या पंक्तीचा

'परस्मैपदमात्व चायुक्तम्' असा अर्थ आहे, व हें 'ग्रायतेङिल्वात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्यातील 'ग्रायतेः' या प्रयोगावरून सिद्ध होते असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. 'इक्श्तिपौ धातुनिर्देशे–सू. ३२८५ वरील वार्तिक- या वार्तिकान्वयें 'ग्रै' धातूहून 'श्तिप्' हा कृत् प्रत्यय केला असता, 'तिङशित्सार्व-धातुकम्' सू-२१६६ या सूत्रान्वयें 'श्तिप्' हा शित् प्रत्यय सार्व-धातुक ठरत असल्यामुळें, जरी श्तिप् प्रत्यय 'कर्तरि' या अर्थामध्यें होत नसून धातूच्या स्वरूपाचा निर्देश करणें या अर्थामध्यें होतो तरी, 'उपसर्गात्सुनोति सुवति' सू २२७० इत्यादि निर्देश-प्रामाण्यानें 'कर्तरिशप्' सू २१६७ या सूत्रानें 'श्तिप्' हा सार्व-धातुक प्रत्यय पुढें आला असल्यामुळें, 'ग्रै' धातूहून 'शप्' प्रत्यय होऊन 'ग्रै'+शप्+श्तिप् = ग्रै+अ+ति' अशी स्थिति झाली असता, 'एचोऽयवायाव.' सू ६१ या सूत्राने 'ऐ' चे जागीं 'आय्' आदेश होऊन 'ग्राय्+अ+ति=ग्रायति' असे जें कृदन्ताचे रूप होते त्याचे 'ग्रायतेः' हे षष्ठीचे एकवचन आहे. या रूपाची सिद्धि करिताना जसे 'शप्' विकरण लावले आहे व ते विकरण–प्रत्यय–शित् असल्यामुळें आणि 'आदेच उपदेशेऽशिति' सू. २३७० या सूत्रात 'अशिति' हा प्रतिषेध असल्यामुळें, जसे 'ग्रै' यातील 'ऐ' चे आत्व झाले नाही व त्या 'ऐ' चे जागी 'आय्' आदेश झाला आहे त्याचप्रमाणे 'ग्रै' हा धातु परस्मैपदी मानला तरी, त्याचे लोट्लकाराचे मध्यमपुरुषाचे एक-वचनाचे रूप करतेवेळी, तो धातु भ्वादिगणात पठित असल्यामुळें व त्यापुढें 'सेर्ह्यपिच्च' सू. २२०१ या सूत्रानें 'सि' चे जागी होणारा 'हि' हा सार्वधातुकप्रत्यय असल्यामुळें, त्याहून 'कर्तरि शप्' या सूत्रानें 'शप् = अ' प्रत्यय–विकरण–करणे भाग आहे व तो प्रत्यय शित् असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणें 'ग्रै' यातील 'ऐ' चे आत्व होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'ग्राहि' हें रूप मुळीच सिद्ध होऊं शकत नाही. 'ग्रै' +शप्+हि=ग्रै+अ+हि =ग्राय्+अ+हि=

त्राय+हि' अशी स्थिति झाल्यावर 'त्राय' या अदन्त अङ्गापुढें असलेल्या 'हि' प्रत्ययाचा 'अतो हेः' सू. २२०२ या सूत्रानें लुक् होऊन 'त्राय' असेंच रूप सिद्ध होऊं शकतें. म्हणून प्रक्रियाकौमुदींत दिलेल्या उदाहरणांत 'त्राहि' असा जो प्रयोग केला आहे तो सर्व तऱ्हेनें अशुद्ध ठरतो असा दीक्षिताच्या म्हणण्याचा भावार्थ आहे असें शब्दरत्नकाराचें म्हणणें आहे.) मूळ 'त्रैङ्' हा धातु ङित् असल्यामुळें त्या धातूहून कर्तरि क्विप् प्रत्यय करून नतर आचारार्थक क्विप् प्रत्यय केला असता 'त्रा' असा जो नाम धातु सिद्ध होतो त्याचे ठिकाणीं, मूळ धातूच्या ङित्वाचा—आत्मनेपदित्वाचा—आश्रय केल्यानें 'अनुदात्तङित आत्मनेपदम्' सू. २१५७ या सूत्राची जरी प्रवृत्ति होते तरी, तें सूत्र अशा नामधातूचे ठिकाणी प्रवृत्त होत नाहीं असें मानल्यानें 'त्राहि' हें रूप होऊं शकतें, आणि म्हणूनच 'त्राहि मां पुण्डरीकाक्ष' इत्यादि प्रयोग साधु ठरतात असा दीक्षिताच्या म्हणण्याचा आशय आहे (या पंक्तींत 'अभिमान' हें जें अरुचिप्रदर्शक पद घातलें आहे त्याचें कारण भैरवींत 'उपदेशे यो ङित् तदन्तत्वानपायेनात्मनेपदस्य दुर्वारत्वात्' असें दिलें आहे व हें पुढील पङ्क्तींत स्पष्ट करण्यांत येईल.) पण इतर वैयाकरणांचें असें म्हणणें आहे कीं, 'त्राहि' हा प्रयोग आर्ष प्रयोग आहे. (कारण 'त्रै' धातु आत्मनेपदी असल्यामुळें, त्याच्या मतें त्या धातूहून आचारार्थक क्विप् प्रत्यय केला असतां, त्याहून नतर क्विप् प्रत्यय करून 'त्रा' असा जो नाम धातु सिद्ध होतो त्याहून देखील आत्मनेपदी प्रत्ययच होऊं शकतात, कारण मूलधातूचें जें पद असतें तेंच नाम धातूचें होऊं शकतें असा सिद्धान्त आहे आणि म्हणूनच भैरवींत देखील 'उपदेशे यो ङित् तदन्तत्वानपायेनात्मनेपदस्य दुर्वारत्वात्' असेंच स्पष्टीकरण केलें आहे व त्यामुळें व्याकरणशास्त्रदृष्ट्या 'त्राहि' हा प्रयोग साधु मानतां येत नाहीं.) 'प्रपूर्वात् ताम्यतेः क्विप्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रपूर्वक 'तमु ग्लानौ' या धातूहून

निर्दिष्ट 'अप्रशान्' हा प्रयोग अशुद्ध ठरण्याची आपत्ति येईल. म्हणून ती आपत्ति टाळण्याकरिताच दीक्षितानीं प्रपूर्वक 'शाम्' धातूहून क्विप् प्रत्यय करून 'अप्रशान्' या रूपाची सिद्धि मनोरमेंत मागितल्याप्रमाणे केली आहे. त्या रूपात 'मो नो धातोः' सू. २४१ या उत्तर त्रैपादिक सूत्रानें मकाराचे जागी झालेला नकार 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, त्या अन्त्य नकाराचा लोप न होता 'अप्रशान्' असें प्रथमेच्या एकवचनाचें रूप सिद्ध होतें व त्यामुळें सूत्रनिर्दिष्ट 'अप्रशान्' हा प्रयोग शुद्ध ठरतो म्हणून दीक्षितानीं 'प्रपूर्वात् शाम्यतेः क्विप्' असें मनोरमेंत म्हटलें आहे असा शब्द-रत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'नश्छव्यप्रशान्' या सूत्रांत 'अप्रशान्' हा नकारान्त पर्युदास असल्यामुळें, ('प्रशान्' हा शब्द सोडून) इतर नकारान्त पदाच्या अन्त्य नकारास रुत्वाची प्राप्ति होते असा अर्थ आपोआपच सिद्ध होतो व त्यामुळें त्या सूत्रांत 'नः=नकारान्तस्य' (हें पद घालण्याची कांहींच गरज नव्हती व तें) पद व्यर्थ ठरतें असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं, कारण 'प्रशान्' या रूपांत जसा ('मो नो धातोः' सू. २४१ या सूत्रान्वयें) मकाराचे जागीं नकार झाला आहे तसा लाक्षणिक नकार ज्या पदांच्या शेवटीं असेल तशाच नकाराचें पर्युदास-बलानें प्रकृत सूत्रानें रुत्व होऊं शकतें असा त्या सूत्राचा अनिष्ट अर्थ होण्याची आपत्ति येईल. (शब्दकाराचें असें म्हणणें आहे कीं, प्रकृत सूत्रांत 'अप्रशान्' असा नकारान्त पर्युदास असल्यामुळें, त्या पर्युदासाच्या बलानें 'प्रशान्' या नकारान्त पदाहून भिन्न पण तत्सदृश असा इतर नकारान्त पदांचेंच, 'नञिवयुक्तम्'—परि. ७५—या परिभाषान्वयें, ग्रहण होऊं शकेल आणि म्हणून प्रकृत सूत्रांत 'नः' हें पद घालण्याची कांहींच गरज नव्हती; कारण तें पद त्या सूत्रांत घातलें नसतें तरी 'प्रशान्भिन्नस्य नान्तस्य पदस्य अम्परे छवि रुः स्यात्' असा त्या सूत्राचा अर्थ झालाच असता.

क्विप् प्रत्यय करून 'प्रशान्' हे रूप सिद्ध झाले आहे असे समजू नये, कारण त्या धातूहून क्विप् प्रत्यय केल्यास, पदान्ती येणाऱ्या नकाराचा ('न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें) लोप होईल व सूत्रनिर्दिष्ट 'अप्रशान्' असा नकारान्त प्रयोग होणे असंभवनीय ठरेल– म्हणजे तसा प्रयोग व्याकरणरीत्या सिद्ध होणे असंभवनीय असल्यामुळें, तो प्रयोग अशुद्ध ठरण्याची आपत्ति येईल ('नश्छव्यप्रशान्' सू १४० या सूत्रातील 'अप्रशान्' हे नञ्तत्पुरुष होऊन सिद्ध झालेल्या सामासिक शब्दाच्या प्रथमेचे एकवचन असून, त्या प्रथमान्त पदाचा षष्ठीच्या अर्थामध्ये सौत्र प्रयोग केला आहे. शकाकार असे म्हणतो की, धातुपाठात भ्वादिगणामध्यें 'शान तेजने' हा प्रतिपदोक्त नकारान्त धातु पठित असल्यामुळें व त्या प्रपूर्वक धातूहून क्विप् प्रत्यय केल्यानें नकारान्त रूप सिद्ध होऊ शकत असल्यामुळें, दीक्षितानी प्रपूर्वक 'शम्' धातूहून क्विप् प्रत्यय करून 'अप्रशान्' हे रूप सिद्ध करण्याची व्यर्थ खटपट का केली आहे? या शंकेवर शंकरनकार असे उत्तर देतात कीं, सूत्रनिर्दिष्ट 'अप्रशान्' हा प्रथमान्त प्रयोग प्रपूर्वक 'शम्' धातूहून क्विप् प्रत्यय केल्यानेंच सिद्ध होऊ शकतो व प्रपूर्वक 'शान्' धातूहुन क्विप् प्रत्यय केल्यानें तसा प्रयोग मुळींच सिद्ध होऊ शकत नाहीं, कारण प्रपूर्वक 'शान्' धातूहून 'क्विप् = व' प्रत्यय केल्यास, 'वेरपृक्तस्य' सू ३७५ या सूत्रानें क्विप् प्रत्यय नाहींसा झाल्यावर 'प्रशान्' असे जें कृदन्त प्रातिपदिक होते त्याहून प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' प्रत्यय केला असता, 'हल्ङ्याब्भ्य' सू २५२ या सूत्रानें त्या प्रत्ययाचा जरी लोप होतो तरी, 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू २६२ या सूत्रान्वये 'प्रशान्' हा शब्द प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञक ठरत असल्यामुळें, 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें 'प्रशान्' यांतील जो अन्त्य नकार असिद्ध नसून मूळचा स्वतःसिद्ध नकार आहे त्याचा लोप होऊन प्रथमेच्या एकवचनाचें 'अप्रशान्' असे रूप न होता, 'अप्रशा' असे रूप होईल व सूत्र-

निर्दिष्ट 'प्रशान्' हा प्रयोग अशुद्ध ठरण्याची आपत्ति येईल. म्हणून ती आपत्ति टाळण्याकरितांच दीक्षितांनीं प्रपूर्वक 'शम्' धातूहून क्विप् प्रत्यय करून 'प्रशान्' या रूपाची सिद्धि मनोरमेंत मागितल्याप्रमाणे केली आहे. त्या रूपांत 'मो नो धातोः' सू. ३४१ या उत्तर त्रैपादिक सूत्रानें मकाराचे जागीं झालेला नकार 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या पूर्व त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, त्या अन्त्य नकाराचा लोप न होतां 'प्रशान्' असें प्रथमेच्या एकवचनाचें रूप सिद्ध होतें व त्यामुळें सूत्रनिर्दिष्ट 'प्रशान्' हा प्रयोग शुद्ध ठरतो. म्हणून दीक्षितांनी 'प्रपूर्वात् शाम्यतेः क्विप्' असें मनोरमेंत म्हटलें आहे असा शब्द-रत्नकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'नश्छव्यप्रशान्' या सूत्रांत 'अप्रशान्' हा नकारान्त पर्युदास असल्यामुळें, ('प्रशान्' हा शब्द सोडून) इतर नकारान्त पदाच्या अन्त्य नकारास रुत्वाची प्राप्ति होते असा अर्थ आपोआपच सिद्ध होतो व त्यामुळें त्या सूत्रांत 'नः—नकारान्तस्य' (हें पद घालण्याची कांहींच गरज नव्हती व तें) पद व्यर्थ ठरतें असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं, कारण 'प्रशान्' या स्थलीं जसा ('मो नो धातोः' सू. ३४१ या सूत्रान्वयें) मकाराचे जागीं नकार झाला आहे तसा स्वाभाविक नकार ज्या पदाच्या शेवटीं असेल अशाच नकाराचें पर्युदास-बलानें प्रकृत सूत्रानें रुत्व होऊं शकेल असा त्या सूत्राचा अनिष्ट अर्थ होण्याची आपत्ति येईल. (शब्दरत्नकाराचें असें म्हणणें आहे कीं, प्रकृत सूत्रांत 'अप्रशान्' असा नकारान्त पर्युदास असल्यामुळें, त्या पर्युदासाच्या बलानें 'प्रशान्' या नकारान्त पदाहून भिन्न पण तत्सदृश असा इतर नकारान्त पदाचेंच, 'नञिवयुक्तम्'—परि. ७५—या परिभाषेन्वयें, ग्रहण होऊं शकतें आणि म्हणून प्रकृत सूत्रांत 'नः' हें पद घालण्याची कांहींच गरज नव्हती; कारण तें पद त्या सूत्रांत घातलें नसतें तरी 'प्रशान्भिन्नस्य नान्तस्य पदस्य अम्परे छवि रुः स्यात्' असा त्या सूत्राचा अर्थ सांगाव करता.

म्हणून प्रकृत सूत्रातील 'न•' या पदाचे ग्रहण व्यर्थ ठरतें. या शङ्केवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात कीं, 'अप्रशान्' या पर्युदासांतील अन्त्य नकार मूळचा नसून लक्षणवशसपन्न, म्हणजे 'मो नो धातोः' या पाणिनीय सूत्रानें 'शम्' धातूतील अन्त्य मकाराने जागीं झालेला लाक्षणिक, नकार असल्यामुळें, त्या पर्युदासाच्या बलानें 'नञिवयुक्तम्' या परिभाषान्वयें लक्षणवशसपन्न–लाक्षणिक–नकाराचेच रुत्व होईल व 'चक्रिन् त्रायस्व, शार्ङ्गिन् छिन्धि' इत्यादि उदाहरणात नकारान्त पदापुढें अम्पर 'छव्' असून देखील त्या पदातील अन्त्य नकार लाक्षणिक नसून मूळचाच–स्वत सिद्ध–नकार असल्यामुळें, तशा स्वत सिद्ध नकाराचे रुत्व होऊ शकणार नाही ही आपत्ति टाळण्याकरिता आणि पदान्त नकार मूळचा नकार असला व त्यापुढें 'अम्पर छव्' असला तरी त्याचे प्रकृत सूत्रानें रुत्व व्हावे याकरिता प्रकृत सूत्रात 'न = नकारान्तस्य पदस्य' या पदाचे मुद्दाम ग्रहण केले आहे आणि अशा रीतीनें तें पद आवश्यक व चरितार्थ ठरतें )

मनोरमा – नॄन्पे पकारोपर्यकार उच्चारणार्थः । तेन नॄः पुनातीत्यादि सिद्धम् । "उभयथर्क्षु–" इत्यत "उभयथा" इत्यनुवृत्तेर्विकल्पः फलित इत्याशयेनाह—रुः स्याद्वेति ॥

'नॄन्पे' सू. १४१ या सूत्रात पकारापुढील अकार उच्चारणार्थ आहे, म्हणजे 'पे' याचा 'पकारे परे' असा अर्थ आहे. त्यामुळें 'नॄः पुनाति' इत्यादि प्रयोग सिद्ध होतात. ('नॄन् पुनाति' या स्थळीं 'नॄन्' या द्वितीयान्त पदातील अन्त्य नकारापुढें अकारान्त 'प' नसून 'पु' असल्यामुळें, 'पे' मधील पकारापुढील अकार उच्चारणार्थ न मानला व 'प' चा 'पकार' असा अर्थ न केला तर, प्रश्न उदाहरणातील त्या अन्त्य नकाराचे रुत्व न होण्याची आपत्ति येईल व 'नॄः पुनाति' असा जो नकाराचा 'रु' झाल्यानें रेफाचा विसर्ग होऊन इष्ट वैकल्पिक प्रयोग सिद्ध होतो तो होऊं शकणार नाही.)

'उभयथर्क्षु' या पूर्व सूत्रातून 'उभयथा' या पदाची प्रकृत सूत्रात अनुवृत्ति होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें होणारे रुत्वकार्य वैकल्पिक ठरतें आणि हा आशय मनात धरूनच 'रु. स्याद्वा' असे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे.

मनोरमा—कुप्वोः । सूत्रे खर्परत्वाद्विसर्गः जिह्वामूलीयस्य खत्वात् । "खर्परे शरि" इति विसर्गस्य लोपः, जिह्वामूलीयस्य शर्त्वात् । "वा शरि" । इति विसर्ग एव वा । आदेशयोः कपावुच्चारणार्थौ । चाद्विसर्ग इति । यत्तु प्राचा चाद्विकल्प इत्युक्तं तन्न । ≍क≍पाभ्यां मुक्ते विसर्गस्य सत्त्वप्रसङ्गात् ॥

'कुप्वो ≍क≍पौ च' सू १४२ या सूत्रात ('कुपु + ओस् = कुप्वोस्' यातील अन्त्य सकारापुढें) जो जिव्हामूलीय आहे तो 'खर्' असल्यामुळें, म्हणजे जिव्हामूलीयाचा 'खर्' प्रत्याहारात पाठ मानला असल्यामुळें व अशा रीतीनें जिव्हामूलीय 'खर्' ठरत असून तो 'कुप्वोस्' यातील अन्त्य सकारापुढें असल्यामुळें, ('ससजुषो रु' सू. १६२ या सूत्रानें त्या पदान्त सकाराचे रुत्व झाल्यावर रेफाचा 'खर व सानयोर्विसर्जनीय' सू ७६ या सूत्रानें) विसर्ग होतो व जिव्हामूलीय हा 'शर्' (देखील असून त्यापुढें ककार हा 'शर्') असल्यामुळें, 'खर्परे शरि'—सू. १५१ वरील वार्तिक—या वार्तिकानें विसर्गाचा (विकल्पेंकरून) लोप होतो. अथवा 'वा शरि' सू १५१ या सूत्रानें (विसर्गापुढें जिव्हामूलीयरूप 'शर्' असल्यामुळें) विसर्ग जसाचा तसाच विकल्पेंकरून कायम राहतो (व त्यामुळें 'कुप्वो≍क≍पौ' आणि 'कुप्वोः≍क≍पौ' हे दोन्ही प्रकारचे प्रकृत सूत्राचे पाठ साधु ठरतात) आदेशांतील, म्हणजे विधेयांतील, 'क, प' हे वर्ण अनुक्रमें जिव्हामूलीय व उपध्मानीय यांचे उच्चारण व्हावें एवढ्याचकरिता प्रकृत सूत्रात घातले आहेत (त्यामुळें विसर्गाचे जागीं 'क्, प्' हे वर्ण आदेश न होतां जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेश होतात.) प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'चाद्वि-

सर्गः' असे म्हटले आहे पण या सूत्रावरील वृत्तीत प्रक्रियाकौमुदी-कारानीं 'चाद्विकल्पः', म्हणजे 'च' हे पद विकल्पाचे वाचक आहे, असे जें म्हटले आहे ते बरोबर नाही, कारण विकल्पामुळें जेव्हा विसर्गाचे जागी जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेश केले जाणार नाहीत तेव्हा जो विसर्ग कायम राहील त्याचे ('विसर्जनीयस्य स.' सू. १३८ या सूत्रानें) सत्व होण्याची आपत्ति येईल. ('चाद्विसर्ग.' व 'चाद्विकल्पः' ही दोन भिन्न प्रकारचीं व्याख्यानें कशी केली आहेत, त्या दोहोंत फरक काय, व त्या दोन व्याख्यानांपैकी कोणतें ग्राह्य व कोणते त्याज्य आहे हें पुढील विवेचनावरून नीट ध्यानात येईल. प्रकृत सूत्रातील 'च' या निपाताचा 'समुच्चय'– म्हणजे 'आणि'–असा जो मामुली अर्थ आहे तो दीक्षितानीं स्वीकारला आहे व समुच्चयाकरिता दोन किंवा दोहोंहून अधिक पदार्थांची आवश्यकता असल्यामुळें, त्यानी प्रकृत सूत्रातील 'च' या पदानें 'शर्परे विसर्जनीय.' या पूर्व सूत्रातून 'विसर्जनीय.' हे पद अनुकृष्ट होतें असे. म्हटले आहे आणि प्रकृत सूत्रात 'विसर्जनीयस्य स.' या सूत्रातील 'विसर्जनीयस्य' हें पद अनुवृत्त होत असल्यामुळें, दीक्षितमतान्वयें प्रकृत सूत्राचा 'कुप्वोः परयोः विसर्गस्य क्रमाद् जिव्हामूलीयोपध्मानीयौ स्तः, पक्षे विसर्गस्य विसर्ग एव भवति नत्वन्यत्' असा अर्थ होतो या अर्थान्वयें जेव्हा विसर्गाचा जिव्हामूलीय किंवा उपध्मानीय केला जात नाही तेव्हा त्या पक्षात विसर्गच व्हावा व विसर्गाचे ठिकाणी कोणताहि भिन्न विकार किंवा आदेश होऊ नये असे विधेयरूपानें सांगितले असल्यामुळें, म्हणजे असे स्पष्ट विधान केले असल्यामुळें, 'विसर्जनीयस्य सः' सू. १३८ या सूत्रानें होणारा विसर्गाचा सकार न होता, विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो, कारण जेथें जेथें प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊ पाहते तेथें तेथें 'विसर्जनीयस्य सः' या सूत्राची अवश्यप्राप्ति असल्यामुळें व अशा रीतीनें प्रकृत सूत्र निरवकाश ठरूं पाहत असल्यामुळें, तशा निरवकाशत्वामुळें, 'येन नाप्राप्ते'–परि. ५८–या न्यायान्वयें प्रकृत सूत्र

'विसर्जनीयस्य सः' या सूत्राचे अपवादक सूत्र ठरून त्या सूत्राचा बाध करितें व विसर्गाचे सत्व होऊ देत नाही. परंतु प्रकृत सूत्रातील 'च' या पदाचा दीक्षितानी 'समुच्चय' असा जो अर्थ केला आहे तसा अर्थ न करिता, प्रक्रियाकौमुदीकारानी त्या पदाचा 'वा' असा विकल्परूप अर्थ करून 'चाद्विकल्पः' असे व्याख्यान केलें आहे ते व्याख्यान बरोबर मानल्यास, 'कुप्वो. परयोः विसर्गस्य वा जिव्हा-मूलीयोपध्मानीयौ क्रमात् स्तः' असा प्रकृत सूत्राचा अर्थ होईल, व विसर्गाचे जागीं विकल्पेंकरून जिव्हामूलीय किंवा उपध्मानीय केला नसता, त्या पक्षात विसर्गाचे काय व्हावे असे त्या अर्थामध्यें विधान केले नसल्यामुळें, 'विसर्जनीयस्य सः' हे सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतीहि अडचण राहणार नाही. दीक्षितानी केलेल्या अर्थाविषयें या दोन सूत्रात जो बाध्यबाधकभाव होतो तो या द्वितीय अर्थात उत्पन्न होत नसल्यामुळें, 'विसर्जनीयस्य सः' हे सूत्र अवश्य प्रवृत्त होईल व त्यामुळें विसर्गाचे अनिष्ट सत्व होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरिता व 'विसर्जनीयस्य स' या सूत्राची प्रवृत्ति न होऊ देण्याकरिता दीक्षितानी 'चाद्विसर्गः' असे म्हटले आहे म्हणून दीक्षि-तानी केलेला अर्थ ग्राह्य असून, प्रक्रियाकौमुदीकारानी 'चाद्विकल्पः' असा जो अर्थ केला आहे तो स्वीकारार्ह नाही हें उघड आहे.)

शब्दरत्न—ननु "कुप्वोः" इत्यत्र जिह्वामूलीयस्य खर्वा-द्विसर्गे तस्य सत्वे सश्रवणापत्तिरत आह–सूत्रे इत्यादिशर्वादित्यन्तेन । विसर्गलोपश्च सत्वापवादः । एवं च सूत्रे निर्विसर्गपाठ इति भावः । सविसर्गपाठेऽप्याह–"वा शरि" इति । स च सत्वापवादः । "खर्परे" इति च वैकल्पिकमिति भावः । उच्चारणार्थाविति । तयोरुच्चारणस्य तौ विना असम्भवेन नान्तरीयकतया तयोरुच्चारणं न तु तयोर्विधे-यत्वम् । किं तु तन्मात्रे तयोर्लक्षणा व्याख्यानादिति भावः । चाद्विकल्प इति । निपातानामनेकार्थत्वाच्चशब्दो विकल्पार्थ इति तदाशयः । सत्वप्रसङ्गादिति । चानुकृष्टविसर्गस्तु सत्वापवाद इति नास्माकं दोष इति भावः ॥

जिव्हामूलीय हा 'खर्' असल्यामुळें जेव्हा ('कुप्वोस्' या पदातील अन्त्य सकाराचे, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, 'रुत्व व नंतर विसर्ग होऊन) 'कुप्वो.' असे जें विसर्गयुक्त रूप सिद्ध होते त्यातील विसर्गाचा ('विसर्जनीयस्य सः' सू. १३८ या सूत्रानें) सकार होऊन सकाराचे श्रवण होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरिता मनोरमेंत 'सूत्रे खर्परत्वाद्विसर्ग ...जिव्हामूलीयस्य शर्त्वात्' ही पंक्ति लिहिली आहे. (प्रकृत सूत्राचा विसर्गरहित पाठ साधु ठरविण्याकरिता दीक्षितांनी 'खर्परे शरि' या वार्तिकाची प्रवृत्ति केली आहे व त्या सूत्राचा सविसर्ग पाठ साधु ठरविण्याकरिता 'वा शरि' या सूत्राची प्रवृत्ति केली आहे. 'वा शरि' हे सूत्र 'विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें होणाऱ्या सत्वाचे अपवादक सूत्र असल्यामुळें, विसर्गलोपाभावपक्षात त्या बाधित सूत्रानें विसर्गाचा सकार न होता विसर्ग जसाचा तसाच कायम राहतो. 'खर्परे शरि' या वार्तिकानें होणारा) विसर्गलोप ('विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें होणाऱ्या) सत्वाचा अपवाद आहे आणि म्हणूनच कौमुदीत प्रकृत सूत्राचा विसर्गरहित पाठ केला आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे प्रकृत सूत्राचा 'कुप्वोः' असा विसर्गसहित पाठ मानल्यास, 'वा शरि इति विसर्ग एव वा' असे दीक्षितांनी मनोरमेंत म्हटले आहे, म्हणजे 'वा शरि' सू १५१ या सूत्रानें जेव्हा विकल्पामुळें विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो तेव्हा त्या विसर्गाचे 'विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें होणारे सत्व होत नाहीं, असे दीक्षिताचे म्हणणे आहे. (व तसे म्हणण्याचे कारण हे कीं,) 'वा शरि' हे सूत्र ('येन नाप्राप्ते'–परि. ५८–या न्यायान्वयें 'विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें होणाऱ्या) सत्वाचे अपवादक आहे. 'खर्परे शरि' या वार्तिकानें होणारा विसर्गलोप वैकल्पिक आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे (व जेव्हा विकल्पामुळें विसर्गाचा लोप होत नाही तेव्हा त्या पक्षात विसर्गाचे सत्व न होता विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो.) 'आदेशयोः कपादुच्चारणार्थं'

असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचें कारण हें की, 'क' व 'प' या वर्णांच्या सहायाशिवाय जिव्हामूलीय व उपध्मानीय यांचें उच्चारण करणें अशक्य असल्यामुळें, आवश्यकत्वामुळें – अगतिकगति-न्यायानें – त्या दोन वर्णांचें प्रकृत सूत्रात उच्चारण केले आहे व त्या दोन वर्णांचें आदेशरूपानें विधान केले नाही, परंतु ककार व पकार हे अनुक्रमें केवळ जिव्हामूलीय व उपध्मानीय यांचे लक्षणावृत्तीनें वाचक आहेत, कारण (लक्ष्यामध्यें ककार व पकार दिसत नसून जिव्हामूलीय व उपध्मानीय हेच दिसत असल्यामुळें, लक्षणावृत्तीचा आश्रय करून) तसे व्याख्यान केले आहे. (सारांश 'क्' व 'प्' हे वर्ण आदेशरूपानें व्हावे असे प्रकृत सूत्रात विधान केले नसून जिव्हा-मूलीय व उपध्मानीय हे आदेशरूपानें व्हावे असे विधान केले आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'चाद्विकल्पः' असे जें प्रक्रियाकौमुदीकारानीं म्हटले आहे त्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, निपात अनेक अर्थांचे वाचक असल्यामुळें, प्रकृत सूत्रातील 'च' हा निपात विकल्पाचा – 'वा' या अर्थाचा – वाचक आहे (व जसा दीक्षितांनी तो निपात 'समुच्चय' या अर्थाचा वाचक मानला आहे त्या अर्थाचा तो प्रकृत सूत्रात वाचक नाही असे प्रक्रियाकौमुदी-काराचे मत आहे) 'सत्वप्रसङ्गात्' असे जें मनोरमेंत म्हटले आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('शर्परे विसर्जनीय' या पूर्व सूत्रातील) 'विसर्जनीय' हा जा शब्द प्रकृत सूत्रातील 'च' नें अनुकृष्ट होतो तो अनुकृष्ट 'विसर्जनीय = विसर्ग' सत्वाचा अपवादक असल्यामुळें, आमच्या पक्षात विसर्गाचें सत्व होण्याची आपत्ति येत नाहीं (कारण 'कुप्वोः' हे प्रकृत सूत्र पूर्वी सांगितल्याप्रमाणे 'विसर्जनीयस्य सः' यांचे अपवादक सूत्र आहे. त्यामुळें प्रकृत सूत्रानें विसर्गाचे जागी विकल्पेंकरून जिव्हामूलीय न करिता विसर्ग जसाचा तसाच कायम ठेवल्यास, 'विसर्जनीयस्य सः' हे बाधित सूत्र त्या विसर्गाचे सत्व करण्यास प्रवृत्त होऊ शकत नाही व त्यामुळें विसर्गाचे सत्व न होता, विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो.)

**मनोरमा—कानाम्रेडिते ।। कान् कानिति वाच्ये आम्रेडित-ग्रहणं यत्र द्विरुक्तिस्तत्रैव यथा स्यादिह मा भूत् । कान् कान् पश्यसि । अत्रैकः किंशब्दः प्रश्ने, द्वितीयः क्षेपे । कान् कुत्सितान् पश्यसीत्यर्थः ।**

'कानाम्रेडिते' सू १४३ या सूत्रात 'कान् कान्' अशीं पदें न उच्चारता 'आम्रेडिते' या पदाचे जें ग्रहण केले आहे तें अशा-करिता की, जेथें 'कान्' या पदाची ('नित्यवीप्सयो.' सू. २१४० या सूत्रानें एकाच अर्थात) द्विरुक्ति केली आहे तशाच ठिकाणी 'कान्' या पूर्व पदातील अन्त्य नकाराचे रुत्व व्हावे व इतर स्थलीं तसे रुत्व होऊ नये. उदाहरणार्थ 'कान् कान् पश्यसि' या स्थलीं 'कान्' हें प्रथम पद प्रश्नार्थक व 'कान्' हें ('क = कुत्सित' या प्रातिपदिकाचे द्वितीयेच्या बहुवचनाचे) द्वितीय पद कुत्सितार्थक—निंदावाचक—मानल्यास व त्या वाक्याचा 'कान् कुत्सिनान् पश्यसि' असा अर्थ केल्यास, (या उदाहरणात 'कान्' या शब्दाची समान अर्थामध्यें द्विरुक्ति केली नसल्यामुळें,) प्रथम 'कान्' या पदांतील अन्त्य नकाराचे रुत्व होत नाही

**मनोरमा—कस्कादिषु च ।। अत्र प्राचा विसर्जनीयस्य ≍क≍पौ नेत्युक्त, नासौ सूत्रार्थः । ≍क≍पयोरस्वरितत्वात्, नञश्चाप्रकृतत्वात् । किं स्वार्थिकार्थकथन तदिति ध्वनयन्नाह—≍क≍पयोरिति । कौतस्कुत इति । कुतः कुतः आगत इत्यर्थेऽव्ययात्त्यपि प्राप्ते गणपाठ-सामर्थ्यादण् । सर्पिष्कुण्डिकेति । "नित्यं समासे" इत्येव सिद्धे इह पाठस्य प्रयोजनं तु तत्रैव वक्ष्यते ।**

प्रक्रिया कौमुदीकारानीं 'कस्कादिषु च' सू. १४४ या सूत्राचा असा अर्थ केला आहे की, कस्कादिगणात पठित असलेल्या शब्दातील पूर्वपदापुढील विसर्गाचे जागी जिव्हामूलीय व उपध्मानोय आदेश होत नाहीत. परंतु हा सूत्रार्थ नव्हे; कारण 'कुप्वोः' या सूत्रातील '≍क≍पौ' हें पद स्वरित नाहीं व प्रकृत सूत्रात कोणत्याहि पूर्व सूत्रातून 'नञ्' या पदाची अनुवृत्ति होत नाहीं. वास्तविक प्रक्रिया-

कौमुदीकारानी जें म्हटले आहे तें प्रकृत सूत्राच्या अर्थापासून निष्पन्न होणाऱ्या फलाचे कथन आहे आणि हें ध्वनित करण्याच्या हेतूनेंच '✕क✕ पयोरपवाद ' असे प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे (प्रकृत सूत्रातील 'कस्कादिषु' ही विषयसप्तमी असून, या सूत्रात 'इण ष ' या पूर्व सूत्राची व 'विसर्जनीयस्य स ' या पूर्व सूत्रातून 'विसर्जनीयस्य' या पदाची आणि तसेच 'सोऽपदादौ' या पूर्व सूत्रातून 'स ' या प्रथमान्त पदाची अनुवृत्ति होते व त्यामुळें प्रकृत सूत्राचा 'कस्कादिगणे इण परस्य विसर्गस्य ष स्यात अनिण परस्य विसर्गस्य स स्यात' असा अर्थ होतो हा वास्तविक सूत्रार्थ असून प्रक्रियाकौमुदीकारानी 'एषु विसर्जनीयस्य✕क✕पा न' असा जो प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे तो सूत्रार्थ नव्हे परतु प्रकृत सूत्र पठित केले असल्यामुळें जें फल निष्पन्न होतें, म्हणजे प्रकृत सूत्र 'कुप्वो ' या सूत्राचे अपवादक सूत्र ठरतें, तें फल सागितलें आहे व हे फल सिद्धान्तकौमुदीत देखील सागितले आहे) 'कौतस्कुत ' या स्थली जरी ('अव्ययात् त्यप ' सू १३२४ या सूत्रान्वयें)'त्यप् ' प्रत्ययाची प्राप्ति आहे तरी ('कौतस्कुत ' या शब्दाचा कस्कादिगणात पाठ केला असल्यामुळें, त्या) गणपाठसामर्थ्यानें ('त्यप ' प्रत्यय न होता 'तत आगत ' सू १४५३ या सूत्रानें) 'कुत कुत आगत ' या अर्थामध्यें 'अण्' प्रत्यय होऊन 'कौतस्कुत ' हें रूप सिद्ध होत 'सर्पिष्कुण्डिका' या स्थली 'नित्य समासेऽनुत्तरपदस्थस्य' सू १५९ या सूत्रानें षत्व सिद्ध होऊ शकत असून देखील तो शब्द कस्कादि-गणात का पठित केला आहे याचे प्रयोजन त्या सूत्रावरील मनोरमेंत सागण्यात येईल

शब्दरत्न—गणपाठसामर्थ्यादिति । एतेन पञ्चम्यन्तात्स्वार्थे तसिल्विधानेनाव्ययादुत्सर्गत प्रथमैकवचनोत्पादेन पञ्चम्य तत्वाभावात् "तत आगत " इत्यर्थे कथमणित्यपास्तम् । "अव्ययानाम् " इति टिलोप ।

'गणपाठसामर्थ्यादण्' असें मनोरमेंत म्हटले आहे आणि

म्हणून, 'पञ्चम्यास्तसिल्' सू. १९५३ या सूत्रानें पञ्चमी-विभक्त्यन्ताहून स्वार्थे 'तसिल्' प्रत्यय होणे सांगितले असल्यामुळें व अव्ययाहून सामान्य नियमान्वयें प्रथमेच्या एकवचनाचा प्रत्यय केला जात असल्यामुळें आणि अशा रीतीनें 'कुतः कुतः' या स्थली पञ्चमीविभक्तीचा अभाव असल्यामुळें त्या शब्दाहून 'तत आगतः' या अर्थामध्यें 'अण्' प्रत्यय कसा होऊ शकणार असे जे कोणी म्हणतात त्याचे ते म्हणणे चूक ठरते. ('पञ्चम्यास्तसिल्' या सूत्रानें 'किम्' या सर्वनामाहून 'तसिल् = तस्' प्रत्यय केला असतां, तो प्रत्यय तकारानें सुरू होणारा असल्यामुळें, 'किम्' चे जागीं 'कु तिहोः' सू. १९५४ या सूत्रानें 'कु' हा आदेश होऊन 'कुतः' असे रूप सिद्ध होते व हें रूप तद्धिततसिल्प्रत्ययान्त असल्यामुळें, 'तद्धितश्चासर्वविभक्तिः' सू ४४८ या सूत्रावरील कौमुदींत 'तसि-लादयः प्राक् पाशपः' इत्यादि जें भाष्यान्वयें परिगणन केले आहे त्या परिगणनान्वयें, 'कुतः' हा शब्द अव्ययसंज्ञक ठरतो आणि म्हणून 'कुतः कुतः' या अव्ययसमुदायाहून 'अण्' प्रत्ययाची प्राप्ति होत नसून वास्तविक 'अव्ययात् त्यप्' या सूत्रानें 'त्यप्' प्रत्ययाची प्राप्ति होते. अव्यय अर्थवान् असल्यामुळें 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्राति-पदिकम्' सू १७८ या सूत्रानें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन 'ङ्याप् प्रातिपदिकात्' सू १८२ या अधिकारसूत्रान्वयें जरी त्याहून सुबुत्पत्ति होऊ शकते तरी, 'अव्ययादाप्सुपः' सू. ४५२ या सूत्रानें विभक्ति-प्रत्ययाचा लुक् होतो व सुबुत्पत्ति करून देखील न केल्यासारखीच होते. तरी पण अव्ययाला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होण्याकरिता 'उत्सर्गत एकवचनं करिष्यते' या भाष्यवचनान्वयें अव्ययाहून प्रथमेच्या एकवचनाचाच प्रत्यय करता येतो व इतर विभक्तिप्रत्यय करतां येत नाहीत. म्हणून 'तत आगतः' या अर्थामध्यें पञ्चम्यन्ता-हून होणारा 'अण्' प्रत्यय 'कुतः कुतः' या अव्ययसमुदायाहून पञ्चम्यन्ताच्या अभावामुळें करतां येत नाहीं आणि वर सांगितल्या-प्रमाणें 'त्यप्' प्रत्ययच करतां येतो असे शास्त्रकाराचे म्हणणे आहे.

या शकेवर शब्दरत्नकार असे उत्तर देतात की, पाणिनीय-कस्कादि गणपाठांत 'तत आगत' या अर्थीं 'कुत कुत' या अव्यय-समुदायाहून 'अण्' प्रत्यय करून सिद्ध होणारे 'कौतस्कुत' हे रूप पठित केलें असल्यामुळें, त्या गणपाठाच्या सामर्थ्यानें वरील शका अनुपपन्न ठरते, म्हणजे पाणिनीनेंच 'अण्' प्रत्यय केला असल्या-मुळें तसा प्रत्यय होऊं शकत नाहीं असें जें शकाकाराचे म्हणणें आहे तें पाणिनीच्या मताविरुद्ध असल्यामुळें अयोग्य ठरतें ) कौतस्कुत' या उदाहरणांत 'अव्ययानां भमात्रे टिलोपः' सू-१३२४ वरील वार्तिक-या वार्तिकान्वयें टिलोप झाला आहे (कुत कुत' + अण्' या स्थळीं 'तद्धितेष्वचामादे' सू १०७५ या सूत्रानें आद्य अचाची वृद्धि होऊन व 'कस्कादिषु च' या प्रकृत सूत्रानें प्रथम 'कुत' यांतील विसर्गाचा सकार होऊन आणि वरील वार्तिकानें 'टि' चा, म्हणजे 'कौतस्कुतस्' या भसंज्ञक अङ्गांतील अन्त्य 'अस्' चा, लोप होऊन 'कौतस्कुत' असें जें तद्धितान्त प्रातिपदिक होतें त्याचे 'कौतस्कुत' हें प्रथमेचें एकवचन आहे )

मनोरमा – "सेनासुरा –" इति। यदि हि च्छस्य तुक् स्यात् तर्हि च्छस्य चर्त्वे सति चद्वयं स्यात्। सन्निपातपरिभाषया चर्त्वा-प्रवृत्तौ तु च्छकारोपरि चकारः श्रूयेतेति भावः॥

('दीर्घात्' सू १४८ या प्रकृत सूत्रांत 'छे च' हें सूत्र अनुवृत्त होतें व या प्रकृत सूत्राचा कौमुदींत अर्थ करितांना दीक्षितांनी 'दीर्घस्याय तुक् न तु छस्य' असें म्हटले आहे वास्तविक 'उभय-निर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान्' –परि ७१ – ही परिभाषा असल्यामुळें, दीक्षितांनीं जसा 'ड सि धुट्' सू १३१ या सूत्राचा 'डात्परस्य सस्य धुट् स्यात्' असा अर्थ केला आहे त्याचप्रमाणें 'दीर्घात्' या प्रकृत सूत्राचा देखील 'दीर्घात्परस्य छस्य तुक् स्यात्' असा त्यांनी अर्थ करावयास पाहिजे होता पण तसा अर्थ न करितां 'दीर्घस्याय तुक् न तु छस्य' असें जें त्यांनी कौमुदींत प्रकृत सूत्राचे

व्याख्यान केले आहे ते योग्य नाही असे कोणी म्हटल्यास, त्या व्याख्यानाला 'विभाषा सेनासुराच्छाया' सू. ८२८ या सूत्रातील 'सेनासुराच्छायो' हा निर्देश प्रमाण आहे असे त्यानी प्रकृत सूत्रावरील कौमुदीत म्हटले आहे व त्याचेच ते आता विवरण करितात.) 'मेनासुराच्छाया' या स्थली जर छकाराला तुगागम केला असता तर छकाराचे चर्त्व – चकार – होऊन द्विचकारयुक्त रूप झाले असते ('सेनासुराच्छाया' या स्थली 'आ' या दीर्घ अचापुढें छकार आहे. म्हणून जर प्रकृत सूत्रानें छकाराला 'तुक् = त्' आगम केला असता तर तो कित् आगम 'आद्यन्तौ टकितौ' सू. ३६ या सूत्रान्वयें छकारापुढें झाला असता व 'छ्त्' अशा स्थितीत 'स्तोः श्चुना श्चुः' सू. १११ या सूत्रानें तकाराचा चकार होऊन व नतर 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें छकाराचा चकार होऊन 'सेनासुराच्चाया' असे द्विचकारयुक्त रूप झाले असते. पण तसा निर्देश न करिता पाणिनीनें 'सेनासुराच्छाया' असा वरील सूत्रात निर्देश केला असल्यामुळें हे स्पष्ट होते की, दीर्घ अचापुढें छकार आल्यास, छकारास 'तुक्' न होता दीर्घ अचालाच 'तुक्' होतो. म्हणून 'सुरात् छाया' अशी स्थिति होते व या स्थितीत 'स्तो. श्चुना श्चु·' या सूत्रानें तकाराचा चकार होऊन 'सुराच्छाया' हा निर्देश शुद्ध ठरतो. येथें छकारापुढें 'खर्' नसल्यामुळें त्याचे चर्त्व होत नाही.) पण सन्निपातपरिभाषा – परि. ८६ – असल्यामुळें जर (छकाराला तुगागम केल्यावर त्या छकाराचे) चर्त्व करता येऊ शकत नाहीं असे मानले तर, वरील पाणिनीय निर्देशात छकारापुढें चकाराचे श्रवण व्हावयास पाहिजे होते. (येथें अशी शका करण्यात येते कीं, 'छस्य चर्त्वे सति चद्वय स्यात्' असे जें दीक्षितानीं मनोरमेंत म्हटले आहे तें म्हणणे बरोबर नाहीं; कारण सन्निपात-परिभाषा असल्यामुळें छकाराचे चर्त्व करताच येत नाहीं. चर्त्व केल्यास 'आ' हा दीर्घ अच् व त्यापुढील छकार याच्या ज्या सन्निपातामुळें तुगागम झाला आहे त्या सन्निपाताचा विनाश होईल.

वास्तविक या शंकेत काहीच अर्थ नाहीं, कारण 'कष्टाय क्रमणे' इत्यादि पाणिनीय निर्देशावरून सन्निपात परिभाषा अनित्य आहे हे ज्ञापित होत असल्यामुळें व प्रकृत स्थली ती अनित्य परिभाषा प्रवृत्त केली किंवा न केली तरी इष्ट रूपाची सिद्धि होत नसल्यामुळें दीक्षितानी त्या परिभाषेची उपेक्षा करून 'चद्वय स्यात्' असे प्रथम म्हटले आहे व ते म्हणणे काही वावगें ठरत नाहीं तथापि दीक्षित पुढें म्हणतात की, जर प्रकृत स्थलीं सन्निपात परिभाषा प्रवृत्त केली तर 'खरि च' सू. १२१ या सूत्रानें छकाराचे चर्त्व न होता 'सुराछ्छाया' असा पाणिनीय निर्देश असावयास पाहिजे होता पण पाणिनीनें तसा निर्देश न करिता किंवा 'सुराच्चाया' असा चकारद्वययुक्त निर्देश न करिता 'सुराच्छाया' असा निर्देश केला असल्यामुळें त्या निर्देशावरूनच हे स्पष्ट होते की, दीर्घ अचापुढें छकार आला असता प्रकृत सूत्रानें होणारा तुगागम छकारास न होता, दीर्घ अचालाच तुगागम होतो

शब्दरत्न– सन्निपातेति । असिद्धविषयेऽपि सा प्रवर्तते । यद्वा पूर्वत्र कर्तव्येऽसिद्धत्वेऽपि तत्र कृते उत्तरस्यासिद्धत्वे मानाभाव इति नासिद्धत्वेन सन्निपातपरिभाषाप्रवृत्तिप्रतिबन्धः शङ्क्य इति भाव । चैकल्पिकेष्वपि भावानुष्ठानस्यैवौचित्य फलाधिक्यायेति तात्पर्यम् ।

'सन्निपातपरिभाषया चर्त्वाप्रवृत्तौ' असे जें दीक्षितानी मनोरमेंत म्हटले आहे त्याचे कारण हे की, सन्निपातपरिभाषा असिद्ध विषयात म्हणजे त्रैपादिक असिद्धकार्य करतेवेळी देखील प्रवृत्त होते. ('उपजीव्यविरोधस्यान्याय्यत्वम्' या लौकिक न्यायाच्या आधारावर ती परिभाषा रचली असून कोणत्याहि सापादिक सूत्रातील निर्देशावरून ती ज्ञापित होत नसल्यामुळें, जरी सापादिक तुगागमकार्याच्या दृष्टीनें त्रैपादिक चर्त्वकार्य असिद्ध आहे तरी ती लौकिक न्यायसिद्ध परिभाषा असे असिद्ध कार्य करतेवेळीं देखील प्रवृत्त होते व छकाराचे चर्त्व होऊ देत नाहीं) अथवा सापादिक

तुगागमकार्य करतेवेळी जरी 'खरि च' सू. १२१ या त्रैपादिक सूत्रानें होणारे चर्त्वकार्य असिद्ध ठरते तरी, सापादिक तुगागम-कार्य प्रथम केल्यावर नंतर 'खरि च' या सूत्रानें होणारे चर्त्वकार्य असिद्ध मानण्यास काही प्रमाण नाही. म्हणून चर्त्वकार्य असिद्ध असल्यामुळे सन्निपातपरिभाषा ('सेनासुराच्छाया' या स्थली) प्रवृत्त होण्यास प्रतिबंध येतो अशी शंका करू नये, म्हणजे ही शंका अयोग्य ठरते. (तुगागमकार्य सापादिक असून चर्त्वकार्य त्रैपादिक असल्यामुळें जेव्हा या दोन्ही कार्यांची एखाद्या लक्ष्याचे ठिकाणी युगपत् प्राप्ति होते तेव्हा 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें सापादिक शास्त्र त्रैपादिक शास्त्राला बाधून स्वतःच प्रथम प्रवृत्त होतें. पण तें सापादिक शास्त्र प्रथम प्रवृत्त होऊन त्या सूत्रानें होणारे कार्य झाल्यावर नंतर त्रैपादिक शास्त्राची प्रवृत्ति होऊं देण्यांत 'पूर्वत्रा-सिद्धम्' हें वचन आड येत नाही व त्रैपादिकशास्त्र नंतर प्रवृत्त होऊं शकतेच. म्हणून वरील पाणिनीय निर्देशातील छकाराला सापादिक शास्त्रानें होणारा तुगागम प्रथम केल्यास 'सुराछाया' या स्थली 'छ्त्' अशी स्थिति झाली असता, 'स्तोः श्चुना श्चुः' या सूत्रानें तकाराचा चकार केल्यानें 'छ्च्' अशी जेव्हा स्थिति होते तेव्हा छकारापुढें चकार हा 'खर्' असल्यामुळें 'खरि च' हें त्रैपादिक सूत्र प्रवृत्त करतेवेळीं 'पूर्वत्रासिद्धम्' हें वचन आड येत नाही व तें सूत्र प्रवृत्त केल्यास पूर्वी सांगितल्या-प्रमाणे पाणिनीय निर्देशात द्विचकारयुक्त रूप निर्दिष्ट असावयास पाहिजे होतें. पण लौकिक न्यायसिद्ध सन्निपात परिभाषा त्रिपादीत प्रवृत्त होण्यात कोणताहि प्रतिबंध येत नसल्यामुळें त्रैपादिक चर्त्वकार्य करतेवेळी ती परिभाषा प्रवृत्त केल्यास, वरील पाणिनीय निर्देशातील छकाराचे जागी 'खरि च' या सूत्रानें होणारा चकार करता येत नाहीं; कारण छकाराच्या निमित्तामुळें जो 'तुक् = त्' आगम झाला आहे व ज्याचे जागीं 'स्तोः श्चुना' या सूत्रानें चकार झाला आहे तो तुगागम दीर्घ अच् व छकार या

सन्निपाताचा विघात – नाश – करण्यास प्रवृत्त होऊं शकत नाहीं छकाराचे जागी चकार केल्यास, वरील सन्निपात नष्ट होतो हें उघड आहे म्हणून सनिपात परिभाषा असल्यामुळें 'खरि च' हें सूत्र प्रवृत्त न केल्याम छकाराचा चकार न होता छकारापुढें पाणिनीय निर्देशात चकाराचे श्रवण व्हावयास पाहिजे होतें पण त्या निर्देशात चकारद्वय नसून किंवा छकारापुढें चकार नसून छकारापूर्वीं चकार असल्यामुळें त्या निर्देशावरून हे स्पष्ट होते की, दीर्घ अचापुढें छकार आला असता, छकारास तुगागम होत नसून दीर्घ अचालाच प्रकृत सूत्रानें तुगागम होतो म्हणून प्रकृत सूत्राचा दीक्षितांनीं कौमुदींत जसा अर्थ केला आहे तसाच अर्थ करणें योग्य आहे असा शब्दरत्नकाराच्या म्हणण्याचा आशय आहे ) कार्य वैकल्पिक असले तरी अधिक फलाची प्राप्ति होण्याकरिता ते वैकल्पिक कार्य करणें उचित आहे असे या पाणिनीय निर्देशाचे तात्पर्य आहे (दीर्घ अच् पदान्ती असून त्यापुढें छकार, आला असता जरी 'पदान्ताद्वा' सू १४९ या सूत्रानें दीर्घ अचाला तुगागम करणें वैकल्पिक आहे तरी, तसा वैकल्पिक तुगागम केल्यानें अधिक फलाची प्राप्ति होत असल्यामुळे तसा तुगागम करणें उचित आहे हे वरील पाणिनीय निर्देशावरून सिद्ध होतें, कारण त्या निर्देशात 'सुरा' या पदातील अन्त्य 'आ' या दीर्घ अचापुढें छकार आला असल्यामुळें त्या दीर्घ अचाला वर सांगितल्याप्रमाणे तुगागम करणें वैकल्पिक असून देखील पाणिनीनें तुगागम केला आहे )

हल्सन्धिप्रकरण समाप्तम्

सर्वत्र मान्यता पावलेलें

# मनोरमा व शब्दरत्न

यांचें विवरणात्मक

# मराठी भाषांतर

## (भाग १ ला)

(संज्ञा प्रकरणम्)

(प्रस्तुत पुस्तक 'विदर्भ साहित्य संघ', 'महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे', 'नागपूर विश्वविद्यालय' इत्यादि संस्थाकडून पुरस्कृत झालें आहे)

विवरणकर्ता

कै. रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम्. ए.
सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर

प्रांतो-प्रान्तींच्या विद्वानांनी प्रशंसा केलेले हे पुस्तक व्याकरण शास्त्रावरील अत्यंत सरळ भाषेंत केलेले विवेचन आहे प्रदीप, भाष्य, उद्योत, काशिका, पदमंजरी या ग्रंथांतील उताऱ्यामुळे पुस्तक सर्वांकरिता उपयुक्त झाले आहे
किं रु ७॥ ट ख वेगळा

-: पुस्तक मिळण्याचा पत्ता :-
स. ना. वाडेगांवकर, रा. ब. वाडेगांवकर
यांचा बंगला धन्तोली, नागपूर